# एम.ए. भाग - १

# राज्यशास्त्र - अभ्यासपत्रिका क्र. १

# राजकीय सिद्धांत

© UNIVERSITY OF MUMBAI

**डॉ. सुहास पेडणेकर**
कुलगुरू,
मुंबई विद्यापीठ, मुंबई

**डॉ. कविता लघाटे**
प्राध्यापक नि-संचालक
दूर व मुक्त अध्ययन संस्था,
मुंबई विद्यापीठ, मुंबई

**प्रा. अनिल आर. बनकर,**
सहयोगी प्राध्यापक इतिहास आणि सहाय्यक संचालक व
प्रभारी अध्ययन साहित्य विभाग,
दूर व मुक्त अध्ययन संस्था, मुंबई विद्यापीठ, मुंबई

**समन्वयक** : **प्रा. भूषण आर. ठाकरे**
सहाय्यक प्राध्यापक
दूर व मुक्त अध्ययन संस्था, मुंबई विद्यापीठ, मुंबई

**संपादक** : **प्रा. दत्तात्रय म. तोंडे**
सहाय्यक प्राध्यापक
दूर व मुक्त अध्ययन संस्था, मुंबई विद्यापीठ, मुंबई

**लेखक :** : **डॉ. मृदूल निळे**
प्राध्यापक, राज्यशासन व नागरिकशास्त्र विभाग,
दूर व मुक्त अध्ययन संस्था, मुंबई विद्यापीठ, मुंबई

**मराठी भाषांतर** : **कविता जोशी**
सेवा निवृत शिक्षिका, नंदादीप विद्यालय,
गोरेगाव (पूर्व), मुंबई - ४०००६३

**जुलै २०१९, एम.ए. भाग - १, राज्यशास्त्र अभ्यासपत्रिका क्र. १, राजकीय सिद्धांत**

**प्रकाशक :** प्रभारी संचालक, दूर व मुक्त अध्ययन संस्था, मुंबई विद्यापीठ,
विद्यानगरी, मुंबई -४०० ०९८.

**अक्षर जुळणी :** अश्विनी आर्टस्,
गुरुकृपा चाळ, एम्. सी. छगला मार्ग, बामणवाडा,
विलेपार्ले (पूर्व), मुंबई - ४०० ०९९.

**मुद्रण** :

# अनुक्रमणिका


| क्रमांक | अध्याय | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|
| | **विभाग - १** | |
| १) | राजकीय सिद्धांताच्या अभ्यासाचे दृष्टीकोन - १ | ०१ |
| २) | राजकीय सिद्धांताच्या अभ्यासाचे दृष्टीकोन - २ | ०९ |
| ३) | प्रत्यक्षार्थ, वैज्ञानिक पद्धती आणि त्याचे परीक्षण, सामाजिक शास्त्राच्या संशोधनातील समकालीन दृष्टीकोन | १८ |
| ४) | राज्याचे सिद्धांत - अभिजात, अनेक सत्तावादी, आणि नव अनेक सत्तावादी | ३९ |
| ५) | राज्याचे सिद्धांत - अभिजन, अनेकसत्तावादी, नव - अनेक सत्तेवादी, मार्क्सवादी आणि नव - मार्क्सवादी राज्याचे सिद्धांत | ५० |
| ६) | सत्ता - अधिसत्ता | ६१ |
| ७) | अधिमान्यता - राजकीय बंधन | ६६ |
| ८) | कायदा, स्वतंत्र, हक्क | ७२ |
| ९) | राजकीय संकल्पना : न्याय, समता आणि नागरी समाज | ८५ |
| १०) | राष्ट्रवाद | ९७ |
| ११) | लोकशाही संबंधित समकालीन लोकशाहीवर चर्चा | १०२ |
| १२) | समकालीन वादविवाद, चर्चा : प्रातिनिधिक निवेदन पद्धती आणि प्रतिनिधींचा सहभाग यांची स्वरुपे | ११९ |
| १३) | राजकीय सिद्धांताच्या पायाभूत संकल्पना आणि उदारमतवाद | १३४ |
| १४) | साम्यवाद आणि समाजवाद | १४८ |
| १५) | फॅसिझम -जमातवाद, गांधीवाद | १६५ |
| १६) | विकास आणि जागतिकीकरण | १८३ |
| १७) | आधुनिकता आणि लैंगिकता यावर समकालीन चर्चा | १९४ |
| १८) | सांस्कृतिक विविधता आणि पर्यावरण यावर समकालीन वाद, चर्चा | २१० |


❖❖❖❖

## अभ्यासक्रम

## एम. ए. भाग १ - प्रश्नप्रत्रिका क्र. १

## राजकारणाविषयक सिद्धांत.

१) राजकारणाविषयक सिद्धांताचे दृष्टीकोन / विषयः- नमुने घालून देणारा, संस्थात्मक, वर्तवणूकविषयक, मार्कसिस्ट, मार्कसिस्ट मार्कसिस्ट नतरचा, स्त्री - पुरुष समतावादी

२) सकारत्मकता ,शास्त्रीय कार्यपद्धती व त्याचे टीकात्मक निबंध समाजशास्त्रातील संशोधनात समकालीन दृष्टीकोन / विषय

३) राज्याचे सिद्धांतः- पहिल्या दर्जाजे, बहुविध व नव- बहुविध श्रेष्ठ दर्जाचे मार्कसिस्ट व नव-मार्कसिस्ट,

४) प्रमुख संकल्पनाः- सत्ता, अधिकार, कायद्याने संमत, आणि राजकारणाविषयक बंधन

५) राजकारणाविषयक कल्पनाः- कायदा, स्वातंत्र्य, हक्क, न्याय समानत आणि नागरी समाज

६) राष्ट्रीयत्वताः बदलत्या संकल्पना, ओळखीच्या समस्या, मानववंशशास्त्रता आणि नागरिकत्व

७) राजकीय तत्वज्ञानः- अर्थ, महत्त्व, उदारमतवादपणा, नवउदारमतवादापणा पुढारी मानणाऱ्या मार्कसिझम, समाजवाद, फॅसिझम (एक देश एक पुढारी मानणाऱ्या देशाचा पक्ष) जातीयवादपणा, गांधीवाद.

९) विकास/ प्रगतीः- अर्थ व निरनिराळे दृष्टीकोन, जागतिकीकरण

१०) आधुनिकता, लिंग, वातावरण, बहुआयामी सांस्कृतिकीकरण ह्यांतील समकालीन चर्चा/ वादविवाद.

### अभ्यासाठी / वाचनासाठी सुचविलेले ग्रंथ


१) अर्नेल, बार्बाराः- पॉलिटिक्स अँड फेमिनिझम, ऑक्सफोर्ड, ब्लॅकवेल, १९९९.

२) अॅरोनोविट्झ, स्टॅनले :- दी पॉलिटिक्स ऑफ आयडेंटीटी, लंडन,राऊटलेज, १९९२

३) बॅरी, नॉर्मनः- एन इंट्रोडक्शन टू मॉडर्न पॉलिटिकल थेअरी, लंडन, मॅक्मिलन १९८१

४) बिले, फ्रँकः- दी ब्लॅकवेल डिक्शनरी ऑफ पॉलिटिकल सायन्स, ऑक्सफोर्ड, ब्लॅकबेल, १९९९

५) बीयॅम, डेव्हिडः- दी लेजिटिमेशन ऑफ पॉवर, हाऊंडामिल्स, मॅक्मिलन, १९९१

६) बेल, डेव्हिडः- कम्युनिटॅरीएनिझम अँड ईडस् क्रिटिक्स, ऑक्सफोर्ड युनिव्हसिटी प्रेस, १९९३

७) न्यु, सिंग सीःअँड डेनीमार्क रॉबर्ट ए, : - दी अंडरडेव्हलपमेंट ऑफ डेव्हलपमेंट थाऊजंड ओक्स, सेज पब्लिकेशन्स, १९९६

८) क्लार्क, डेसमंड एम अँड जोन्स, चार्लसः- दी राईटस ऑफ नेशन्सः नेशन्स अँड नॅशनॅलिझम इन ए चेजिंग वर्ल्ड, कॉर्क युनिर्व्हसिटी प्रेस, १९९९

९) कोहेन, जे. अँड ॲराटो एः- सिव्हिल सोसायटी अँड पॉलिटिक्ल थेअरी केंब्रिज, एमआयटी प्रेस, १९९२

१०) डी क्रेस्पिग्ने, अँथोनी, इट, एएल, (एडिटर्स) :- कॉन्टेपेरेरी पॉलिटिकल थेअरी, लंडन, नेल्सन, १९७०

११) डॉडसन ॲन्ड्रयुः ग्रीन पॉलिटिकल थॉट , लंडन, राऊडलेज्ड, २००० रिप्रिंट

१२) डून जॉनः- दी हिस्टरी ऑफ पोलिटिकल थेअरी अँड अदस एसेज् केंब्रिज, केब्रिंज युनिर्व्हसिटी प्रेस, १९९६

१३) इस्कले, आरः एन्व्हॉयरमेंटॅलिझम अँड़ पॉलिटिकल थेअरी टोवर्डस एन ंइकोसेंट्रिक ॲप्रोच लंडन, युनिर्व्हसिटी ऑफ कॅलिफोर्निया, १९९२.

१४) ईटिझओनी, एः दि स्पिरिट ऑफ कम्युनिटीः राईटस् रिस्पॉनसिबिलिटिज अँड दी कम्युनिटॅरियन अजेंडा, न्युयॉर्क, क्राऊन पब्लिशिंग ग्रोआटीज डी १९९३

१५) इव्हांस, पीटर, राऊश्चेमेगर डी., अँड स्कोकपॉल टी (एडिटर्स)फ्लिगिंग दी स्टेट बँक इन, केंब्रिज, केंब्रिज, युनिर्व्हसिटी प्रेस १९८६.

१६) फ्रायर, एलिझाबेथ- दी प्रॉब्लेम्स ऑफ कम्म्युनिटारियन पॉलिटिक्स युनिटी अँड कांफ्लिक्ट , ऑक्सफोर्ड, ऑक्सफोर्ड युनिर्व्हसिटी प्रेस, २०००

१७) गेल्लनर, अर्नेस्ट (एडिटर) :- कल्चर आयडेंटीटी अँड पॉलिटिक्स, लंडन केंब्रिज युनिर्व्हसिटी प्रेस १९८७

१८) गिअर्स, नॉर्मन अँड वॉकलर, रॉबर्टः एनलायटनमेंट अँड मॉड़र्निटी, बॅसिंगस्टोक, मॅक्मिलन, १९९९

१९) गुडीन, रॉबर्ट इ. अँड क्लिंगमॅन हँस - डाईटरः- ए. हँडबुक ऑफ पॉलिटिकल सायन्स, ऑक्सफोर्ड युनिर्व्हसिटी प्रेस, १९९६

२०) ग्रीनस्टेन एफ आय अँड पोल्सबाय, एन (एडिटर्स) हँडबुक ऑफ पोलिटिकल सायन्स रिडिंग मॅस्सेच्युसेट्टस, एडिसन वेहसले, १८७५

२१) हलबरस्टॅम , मायकेलः- टोटालिटॅरिएनिझम अँड दी मॉडर्न कन्स्पेशन ऑफ पॉलिटिक्स न्यु हेवन कनेक्टिकट येल युनिर्व्हसिटी प्रेस २०००

२२) हॉल, जे. ए. (एडिटर):- सिव्हिल सोसायटी, केंब्रिज पॉलिसी प्रेस, १९९५

२३) हार्डिम , आरः- लिबरेलिझम, कॉन्स्टिटयुशनॅलिझम अँड डेमॉक्रेसी, ऑक्सफोर्ड , ऑक्सफोर्ड युनिर्व्हसिटी प्रेस, १९९९.

२४) हार्वे, एल - क्रिटिकल सोशल रिसर्चः उनविन हायमन. लंडन. १९९०

२५) हावकेसवर्थ, ब्रायन अँड कोगन मॅरिस (एडिटर्स) :- एनसायक्लोविडिया ऑफ गव्हर्नमेंट , व्हॉल्युम १ अँड २, ऑक्सफोर्ड युनिर्व्हसिटी प्रेस,१९९२

२६) हेल्ड, डेव्हिड :- पोलिटिकल थेअरी अँड दी मॉर्डन स्टेट : एसेज ऑन स्टेट पॉवर अँड डेमोक्रेसी,केंब्रिज , पॉलिसी प्रेस १९८९

२७) हेदेनी, बीजॉर्न: डेव्हलमेंट थेअरी दी थी वर्ल्डस:- एसेक्स, लाँगमन, १९९०

२८) हे वूड, अँड्रयू :- पॉलिटिकल आयाडिलॉजीज: एन इंट्रोडक्शन : हाऊंडमिल्स, मॅक्मिलन, १९९२

२९) हर्स्ट, पी अँड थॉम्पसन डी:- ग्लोबलायझेशन इन क्वेशन, केंब्रिज, पॉलिटी प्रेस, १९९६

३०) हर्स्ट पाऊल :- फॉम स्टॅटिझम टू प्लुरेलिझम; लंडन, युनिव्हसिटी ऑफ कॅलिफोर्निया प्रेस लिमिटेड, १९९७.

३१) जोसेफ, साराह:- इन्टरागेटिंग कल्चर, न्यु दिल्ली सेज पब्लिकेशन्स, १९९८

३२) जॉयसी, पीटर:- एन इंट्रोडक्शन टू पॉलिटिक्स, लंडन, होड्डार अँड स्टाऊग्टॉन, १९९९

३३) कायम्लिका, विल :- मल्टिकल्चरल सिटीझनशिप :- ऑक्सफोर्ड,ऑक्सफोर्ड युनिर्व्हसिटी प्रेस, १९६५

३४) मेकॉर्मिक, एन:- क्वेश्र्वनिंग सॉव्हरिन्टि, ऑक्सफोर्ड,ऑक्सफोर्ड युनिर्व्हसिटी प्रेस, १९९९

३५) महाजन, गुरप्रीत (एडिटर):- डेमॉक्रेसी, डिफरन्स अँड सोशल जस्टिस, न्यु दिल्ली, ऑक्सफोर्ड युनिर्व्हसिटी प्रेस, १९९८

३६) मार्श डेव्हिड अँड स्टोकर गॅरी: थेअरी अँड मेथडस इन पोलिटिकल सायन्स, हाऊंडमिल्स, मॅक्मिलन, १९९५

३७) मिलर, डेव्हिड:- प्रिन्सिपल्स ऑफ सोशल जस्टिस, केंब्रिज मॅस्सेच्युसेट्टस, हार्वड युनिर्व्हसिटी प्रेस १९९९

३८) मिल्स, सी. राईट, दी पॉवर इलाटेस, न्युयॉर्क, ऑक्सफोर्ड युनिर्व्हसिटी प्रेस, १९५६

३९) मोहंती, मनोरंजन :- कंन्टेपोरेरी इंडियन पोलिटिकल थेअरी, न्यू दिल्ली, संस्कृति, १९९९

४०) नोझिक रॉबर्ट:- ॲनाची, स्टेट अँड युटोपिया, ऑक्सफोर्ड, बेसिल ब्लॅकवेल, १९७६

४१) ओसुलिव्हान, नोअेल:- पोलिटिकल थेअरी इन ट्रान्झिशन, लंडन, राऊटलेज्ड, २०००

४२) ओकिन, एस . एफ:- इन्फ्रोमेन इन वेस्टर्न पोलिटिकल थॉट, प्रिन्सटन, एन . जे. प्रिन्सटन युनिर्व्हसिटी प्रेस, १९७९

४३) पारेख, बिकू:- क्लोनिएलिझम, ट्रडिशन अँड रिफॉर्म: ॲन ॲनालिसिस ऑफ गांधीजी पॉलिटिकल डिसलोर्सेस, न्यू दिल्ली, सेज पब्लिकेशन्स, १९८९

४४) पेटमॅन कॅरोल अँड ग्रॉस एलिझाबेथ (एडिटर्स):- फेनिनिस्ट चॅलेंजिस; सोशल अँड पोलिटिकल थेअरी:- बोस्टन नार्थइस्ट युनिर्व्हसिटी प्रेस, १९८९

४५) पिअरे, जॉन (एडिटर):- डिबेट गर्व्हनन्स: ॲथोरिटी, स्टिअरिंग अँड डेमोक्रेसी, ऑक्सफोर्ड,ऑक्सफोर्ड युनिर्व्हसिटी प्रेस, २०००

४६) प्लांट, रेमंड :- मॉडर्न पोलिटिकल थॉट, ऑक्सफोर्ड, ब्लॅकवेल पब्लिशर्स, १९९७ रिप्रिंट

४७) प्रकाश अस्सेम अँड हार्ट जेफ्फरे ए (एडिटर्स):- ग्लोबलायझेशन अँड गर्व्हनन्स, लंडन रॉऊडलेज्ड, १९९९.

४८) रोचे, एमः- रिथिंकिंग सिटिझनाशिपः- वेल्फेअर, आयडिआलॉजू अँड चेंज इन मॉडर्न सोसायटी, केंब्रिज पॉकिटी प्रेस, १९९२

४९) संडेल, एम. (एडिटर):- लिबरॉलिझम अँड इटस् क्रिटिक्स, ऑक्सफोर्ड, बेसिल ब्लॅकवेल, १९८४

५०) स्श्रेष्टर, मायकेल जीः- दी रिव्हाव्हल ऑफ सिव्हिल सोसायटी, हांऊडमिल्स, मॅक्मिलन, १९९९

५१) शेपिरो, इयान अँड कायाम्लिका, विक (एडिटर्स):- एथ्निसिटी अँड ग्रुप राईटसः- न्युयॉर्क न्युयॉर्क युनिर्व्हसिटी प्रेस, १९९७

५२) शिवा, वंदनाः- स्टेयिग अलाईव्ह. वुमेन इकॉलॉजी अँड सर्व्हाव्हल, काली फॉर वुमेन, न्यु दिल्ली, १९९०

❖❖❖❖

# १

# राजकीय सिद्धांताच्या अभ्यासाचे दृष्टीकोन - १

१.० उद्दीष्टे
१.१ प्रस्तावना
१.२ आदर्शवादी दृष्टीकोन
१.३ संख्यात्मक दृष्टीकोन
१.४ वर्तनवादी दृष्टीकोन
१.५ सारांश
१.६ प्रश्नोत्तरे
१.७ संदर्भ ग्रंथ

## १.० उद्दिष्ट्ये

१. आदर्शवादी दृष्टीकोनाचे राजकीय सैध्दांतिक दृष्टीने आकलन.
२. संस्थात्मक दृष्टीकोनाचे राजकीय सैध्दांतिक दृष्टीने आकलन
३. वर्तनवादाचा राजकीय सैध्दांतिक दृष्टीकोनातून अभ्यास

## १.१ प्रस्तावना

प्राचिन व मध्ययुगिन राज्यशास्त्राच्या अभ्यासाची उत्कृष्ट पध्दती कोणती याबाबत भिन्न भिन्न मते असू शकतात. मध्ययुगिन काळी राज्यशास्त्राचा अभ्यास करताना राज्य आणि शासनसंस्था यांचाच प्रामुख्याने अभ्यास केला जात असे. पण आज राजकारणातील आधुनिक प्रवाहामुळे राज्यशास्त्राच्या अभ्यासाचे स्वरुप बदलून गेले आहे. गेल्या अडीच हजार वर्षापासून राज्यशास्त्राचा अभ्यास विविध दृष्टीकोनातून होत आला आहे. राज्यशास्त्राच्या अभ्यासाचे दोन खंड आपणांस पाडता येतील. विसाव्या शतकाच्या सुरुवातीपासून अभ्यासाला जे नवीन दिशा प्राप्त होऊ लागली. त्यातून आधुनिक राज्यशास्त्राचा उदय होण्यास सुरुवात झाली. तत्पूर्वी राज्यशास्त्राच्या अभ्यासाचे वस्तुनिष्ट व आदर्शवादी (Normative) स्वरुप होते. राज्य आणि शासन संस्था यांचा अभ्यास करणे आणि तत्वज्ञानाच्या भूमिकेतून आदर्श राज्याची संकल्पना शोधून काढणे या अर्थानेच प्लेटोपासून मार्क्सपर्यंत सर्वच राज्यशास्त्रज्ञांनी राज्यशास्त्राचा अभ्यास केला आहे. उदा. इतिहासाचे अध्ययन करुन राजकीय सिध्दांत मांडण्याची राज्यशास्त्राची पध्दत होती. सिजविक, फ्रिमन, हेन्री मन हे ते विचारवंत होत. तर

ऑस्टीनसारख्या विचारवंतानी वैधानिक दृष्टीकोनातून राजकीय प्रश्नाची चर्चा केली आहे. प्रचलित राजकीय व सामाजिक परिस्थती तसेच राजकीय घडामोडी व उपयोगीता यातून हे सिध्दांत निर्माण झाले होते.

कोणत्याही विषयातील सत्याचे आकलन करण्यासाठी, विशिष्ट निष्कर्षाप्रत येण्यासाठी किंवा एखादा सिध्दांत प्रस्थापित करण्यासाठी ज्या वेगवेगळ्या दृष्टीकोनाचा अवलंब केला जातो ह्यास आपण अभ्यासपध्दती म्हणतो, याला कोणी दृष्टीकोन असंही म्हणतात.

राज्यव्यवहारातील विभिन्न समस्यांचे आकलन करण्यासाठी, समस्यांची सोडवणूक करण्यासाठी राजकीय सिध्दांताचे विश्लेषण, अध्ययन केले जाते.

## १.२ आदर्शवादी दृष्टीकोन (Normative Approach)

प्रस्तावना : राज्यशास्त्राच्या अभ्यासाच्या, आदर्शवादी दृष्टीकोनाला पारंपारिक दृष्टीकोन असे ही म्हणतात. प्लेटो ते कार्लमार्क्स या कालावधीत राज्यशास्त्रामध्ये जे विविध सिध्दांत मांडले ते आदर्श राज्य, समता व न्यायावर आधारित राज्य स्थापन करणे यावर आधारलेले आहे. ह्यांनी राज्य आणि शासनसंस्थाच्या अभ्यासावर अधिक भर दिला. विशिष्ट आदर्श आणि मूल्य लक्षात घेऊनच त्यांनी राज्यशास्त्राचा अभ्यास केला होता. आदर्शवादी दृष्टीकोनाचे स्वरुप तत्त्वज्ञानात्मक, ऐतिहासिक, संस्थात्मक, औपचारिक आणि कायदेशीर आहे. या दृष्टीकोनाचा मूल्यांवर भर असतो. 'काय आहे' यापेक्षा 'कसे असावे' या दृष्टीकोनातून मूल्यांना महत्व देऊन विचार मांडण्यात येतात.

**वैशिष्ट्ये :**

१) **आदर्शवादाला प्राधान्य :** न्याय, समता, स्वातंत्र्य इ. आदर्श आणि मूल्यांना लक्षात घेऊन राजकीय विचारवंतांनी राज्यशास्त्राचा अभ्यास केला आहे. अस्तित्वात असलेल्या, आहे त्या परिस्थितीकडे दुर्लक्ष करुन भविष्यकालीन आदर्श व्यवस्था कशी आणता येईल. या दृष्टीकोनाचा भर असतो. उदा प्लेटोची आदर्श राज्याची कल्पना, मार्क्सची साम्यवादाची कल्पना विशिष्ट मूल्ये आणि आदर्श मनात ठेवून मांडलेले सिध्दांत आहेत. यावरुन असे दिसून येते की, आदर्शाला महत्व देणारा हा दृष्टीकोन आहे.

२) **नैतिक मूल्यांना महत्व :** समाज, राज्य, शासनसंस्था कोणत्या नैतिक तत्वावर आधारलेली असावी याकडे अधिक लक्ष दिल्यामुळे हा दृष्टीकोन मूल्यप्रधान झाला आहे. उदा. चांगले, वाईट, योग्य, अयोग्य इ. आदर्श आणि चांगल्या राज्यासाठी काय चांगले असेल ते नैतिक दृष्टीकोनातून ठरविण्यात येते.

३) **औपचारिक, संस्थात्मक अभ्यासावर आणि वैधानिकतेवर भर :** राज्याची उत्पत्ती कशी झाली, राज्याचे प्रकार, राज्याची कार्ये शासनाचे प्रकार, शासनाचे गुणदोष, राज्यघटना, कायदेनिर्मिती न्यायमंडळ कसे असावे अशा स्वरुपाच्या औपचारिक, सैध्दांतिक संस्थांना महत्व देणाऱ्या अभ्यासावरच या दृष्टीकोनाचा भर होता. त्यामुळे राज्यशास्त्राच्या अभ्यासाला एक प्रकारे औपचारिक आणि वैधानिक स्वरुप आले. त्यामुळे राज्यातील वस्तुस्थिती याकडे दूर्लक्ष झाले.

४) **काल्पनिकतेवर भर :** कल्पनेप्रमाणे विशिष्ट गृहीत गोष्टी लक्षात घेऊन सिध्दांत मांडण्यात येत असे. गृहीत तत्वाप्रमाणे चांगली व्यवस्था कशी आणावी याकडेच राज्यशास्त्राच्या अभ्यासकाचा अधिक रोख होता. उदा. राज्याचा उदय कसा झाला हे स्पष्ट करणारे सिध्दांत काल्पनिक आहेत ह्या सिध्दांताना ऐतिहासिक आधार नाही.

५) **इतिहास आणि तत्वज्ञानाचे वर्चस्व :** ऐतिहासिक जीवन आणि ऐतिहासिक परिस्थितीचे विश्लेषण करता निष्कर्ष काढले जात. आणि त्यानुसार राजकीय तत्वज्ञानात्मक सिध्दांत मांडले जात असे. या दृष्टीकोनामुळे राजकीय विचारवंताचा कल सिध्दांत मांडण्याकडे अधिक असे.

**आदर्शवादी दृष्टीकोनाचे मूल्यमापन :**

या दृष्टीकोनाचे फायदे आणि तोटे दोन्ही आहेत. या दृष्टीकोनानुसार राज्यशास्त्राचा अभ्यास झाल्यामुळे खालीलप्रमाणे, दोष, त्रुटी निर्माण झाल्यात.

**दोष :**

१) **ऐतिहासिक पूरावा नाही :** परंपरावादी आदर्शवादी दृष्टीकोनानुसार विविध विचारवंतानी जे सिध्दांत मांडलेले आहेत ते कल्पनेवर आधारलेले आहेत.

२) **अतिसैध्दांतिक :-** हा दृष्टीकोन अतिसैध्दांतिक असल्यामुळे अनेक प्रकारचे सिध्दांत राज्यशास्त्रात विकसित झाले. परंतु वास्तवता दुर्लक्षित झाली. आदर्श जग आणि वास्तविक जग अशी तफावत निर्माण झाली.

३) **मतभिन्नता :-** गृहीत तत्वाप्रमाणे राज्यशास्त्राचा अभ्यास झाल्यामुळे प्रत्येक विचारवंताच्या कल्पनेनुसार राजकीय सिध्दांत, राज्यशास्त्राचे स्वरुप, राज्यशास्त्राच्या व्याख्या, राज्याच्या उदय याविषयी विविध प्रकारच्या मतप्रणाली अस्तित्वात आल्या. राज्यशास्त्राची सुध्दा एकच सार्वत्रिक अशी व्याख्या अस्तित्वात येऊ शकली नाही.

अशा प्रकारे आदर्शवादी दृष्टीकोनावर टिका होत असली तरी या दृष्टीकोनाचे समर्थन करणाऱ्यांनी आदर्शवादी दृष्टीकोनाचे फायदे खालीलप्रमाणे दिले आहेत.

**गुण :-**

१) या दृष्टीकोनामुळे राज्यशास्त्राचा पायाभूत अभ्यास झाला. उदा. विविध सिध्दांत विकसित झाले. ह्याचा फायदा वास्तववादी दृष्टीकोनातून अभ्यास करणाऱ्यांना झाला. वास्तववादी दृष्टीकोनानुसार राज्यशास्त्राचा अभ्यास करणाऱ्यांना यामुळे मार्गदर्शन मिळाले.

२) न्याय, नैतिकता इ. चांगल्या मूल्यांचे समर्थन करण्याविषयी आदर्शवादी दृष्टीकोन मार्गदर्शन करतो.

३) राज्यशास्त्र विषयाला आधार प्राप्त झाला. पाया आणि आधारभूत सिध्दांत विकसित झाल्यामुळे राज्यशास्त्र विषयाचा पाया रचला गेला.

अशाप्रकारे आदर्शवादी दृष्टाकोनाची राज्यशास्त्राच्या अभ्यासात महत्वाची भूमिका आहे. प्लॅमेनाटझने म्हटल्याप्रमाणे शासनाच्या प्रयोजनांविषयीचे पध्दतशीर चिंतन आणि शासनाशी संबंधित व्यवहारिक तत्वज्ञान राज्यशास्त्राच्या आदर्शात्मक दृष्टीकोनात अभिप्रेत होते.

**आपली प्रगती तपासा :**

१) राजकीय सिध्दांताच्या आकलनामध्ये आदर्शवादी दृष्टीकोनाची भूमिका स्पष्ट करा.
२) राजकीय सिध्दांताच्या दृष्टीने आदर्शवादी दृष्टीकोनाचे टिकात्मक परिक्षण करा.

## १.३ संस्थात्मक दृष्टीकोन

कायदेविषयक दृष्टीकोनाशी मिळता जुळता दृष्टीकोन म्हणजे संस्थात्मक दृष्टीकोन होय. राजकीय संस्थाचा, शासनविषयक संस्थाचा उगम, त्यांच्या रचना, त्यांचे अधिकार, कार्ये यांचा अभ्यास म्हणजे संस्थात्मक दृष्टीकोन होय. २० ह्या शतकाच्या पहिल्या तीन दशकात असे अभ्यास भरपूर झाले. ब्राईस, कार्ल फेड्रीक, हरमन फायनर, मॉरीस दूवेर्जर हे त्याच काही अभ्यासक. शासनाची अंग कायदेमंडळ यांचे अधिकार, कार्ये परस्परसंबंध, यांचे वर्णन त्या त्या देशांच्या आणि राज्यघटनांच्या संदर्भात यामध्ये करण्यात आले आहे. मात्र, शासन संस्थांच्या औपचारिक मांडणीला जोडून सामाजिक परिस्थिती, जातीय, धार्मिक, आर्थिक परिणामांवरही विचार मांडले. अशा रितीने काही आधुनिक घटक या अभ्यासामध्ये घेण्यात आले.

राज्याच्या विविध संस्थांच्या अध्ययन आणि विश्लेषणामुळे राजकारण समजून घेण्यास मोठी मदत होते. ब्राईसच्या ग्रंथाचे नावच मुळी “आधुनिक लोकशाही” असे आहे. या ग्रंथात तो काही मूलभूत प्रश्न उपस्थित करतो. राजकीय पक्षपध्दतीने राजकारणाची नैतिकता घालवली आहे काय ? कला आणि विज्ञान याची लोकशाहीत भरभराट होते काय ? इत्यादी याने यशस्वी लोकशाहीच्या अटीची चर्चाही केलेली आहे. कार्ल फ्रेड्रीकने “घटनात्मक शासन व लोकशाही” हा ग्रंथ लिहिला. अनेक देशांची उदाहरणे देत याने घटनात्मक रचनांची मांडणी केली. राजकीय पक्ष, दबाव गट, प्रसार माध्यमे यांची भूमिका विशद केली. आर्थिक, सामाजिक परिस्थितींचा शासनसंस्थांशी असलेल्या अन्योन्य संबंध स्पष्ट केला. अशा रितीने संस्थात्मक अभ्यासांमध्ये केवळ वर्णनांऐवजी विश्लेषण आणि केवळ शासनाऐवजी शासनबाह्य घटक आणि राजकीय परिस्थितीला जोडून आर्थिक, सामाजिक परिस्थिती याचे विश्लेषण करण्यात आले.

**आपली प्रगती तपासा :**

१) राजकीय सिध्दांताच्या अभ्यासातील संस्थात्मक दृष्टीकोनाचे महत्व विशद करा.

२) राजकीय सिध्दांतामधील संस्थात्मक दृष्टीकोनाची चर्चा करा.

## १.४ वर्तनवाद

विसाव्या शतकात राज्यशास्त्राला वास्तववादी स्वरुप प्राप्त करुन देण्याचे जे प्रयत्न होत होते त्यात वर्तनवादी दृष्टीकोनाचा प्रामुख्याने विचार करावा लागेल. पारंपारिक राज्यशास्त्राच्या अपूरेपणातून निर्माण झालेला सिध्दांत आहे.

पारंपारिक राज्यशास्त्र, राज्य व शासनाच्या अध्ययनावर भर देते आणि विश्लेषणासाठी तत्वज्ञान, नितिशास्त्र, इतिहास, न्यायशास्त्र यांचा आधार घेते. वर्तनवाद हा सिध्दांत नाही, तो एक अत्यंत महत्वपूर्ण असा अभ्यासविषयक दृष्टीकोन आहे, असे रॉबर्ट ढाल म्हणतो ते खरे आहे. पहिल्या महायूद्धकाळात अमेरिकांनी या पध्दतीचा उच्चार केला असला तरी १९२८ मध्ये फ्रँककेंट याने 'पॉलीटीकल बिहेव्हियर' या पुस्तकात हा सिध्दांत मांडला. हर्बर्ट टिंग्टस्टन याने १९३७ मध्ये हा विचार पुन्हा मांडला. तरी पण विसाव्या शतकात ग्रॅहम वॅलास व बेटले यांनीच या सिध्दांताला  खरे स्वरुप प्राप्त करुन दिले. ग्रॅहम वॅलेस म्हणतो की व्यक्तीच्या मानसशास्त्राच्या अभ्यासाशिवाय राजकारणाचा अभ्यास अर्थशून्य आहे. कारण राजकीय घडामोडीत वर्तन अत्यंत महत्वपूर्ण भूमिका बजावत असते त्यामुळे बेंटलेने व्यक्तीचा अभ्यास समूहातील घटक या नात्याने केला.

मेरीयम हा शास्त्रज्ञ सुध्दा असे म्हणाला की, राजकीय वर्तन हाच राज्यशास्त्राच्या अभ्यासातील संशोधनाचा मुख्य विषय बनला पाहिजे. त्यानंतर हेराल्ड लास्वेल, व्ही.ओ.की. डेव्हीड ट्रमन, हर्बर्ट सिमन, ग्रॅब्रियल अल्मंड या विचारवंतानी राजकारणाच्या अभ्यासाच्या दृष्टीने राजकीय वर्तनवादावर जास्त भर दिला आहे.

दुसऱ्या महायुध्दानंतर मोस्का, मॅक्स वेबर, वॉलकट पार्सन यांनी बराच प्रभाव निर्माण करुन हा सिध्दांत विकसित केला. या सर्वांनी पारंपारिक राज्यशास्त्राच्या उपलब्धीबद्दल असमाधान व्यक्त करुन हा विचार पुढे आणला. दुसऱ्या महायुध्दाच्या पावशतकात वर्तनवादाचा विचार वेगाने मान्यता पावला आणि तो इतका महत्वाचा झाला आहे की, वर्तनवादाची जोड दिल्याशिवाय कोणत्याही राजकीय समस्याची सोडवणूक करणे अवघड झाले आहे.

**वर्तनवाद म्हणजे काय ?**

शास्त्रीय संशोधन करीत असताना राज्यशास्त्राच्या अभ्यासासाठी जे. बी. वॅटसन यांनी वर्तनवाद हा शब्द वापरला आहे. संशोधक जे काही स्वतः अनुभवू शकेल, अवलोकन करु

शकेल किंवा इतर लोकांनी घेतलेल्या अनुभवाची माहिती तो घेऊ शकेल ह्या सर्व पूराव्यांच्या आधारावर माणसाच्या राजकारणातील वर्तनाविषयी कोणत्या प्रकारची माणसे केव्हा कशी वागतात या विषयाचे विश्लेषण करणे म्हणजे वर्तनवाद होय. डेव्हीड इस्टन म्हणतो की वर्तनवादी संशोधनाने मनुष्यालाच अभ्यासाचा केंद्रबिंदू मानले आहे. हेन्ल एलू म्हणतो की वर्तनवाद हीच खरी अभ्यासपध्दत आहे. तर रॉबर्ट ढाल म्हणतो की वर्तनवादामुळे राज्यशास्त्राचे खरेखुरे आकलन होते.

**डेव्हीड इस्टन या शास्त्रज्ञाने वर्तनवादाचे खालील वैशिष्ट्ये स्पष्ट केले आहेत.**

१) **नियमितता :** वर्तनवादी असे मानतो की माणसे जेव्हा राजकारणात भाग घेतात तेव्हा त्यांच्या वागण्यात विशिष्ट असा नियमितपणा असतो. उदा. श्रीमंत लोक नेहमीच निवडणूकीत उजव्या विचारांच्या पक्षांना आपली मते देतात. हा सिध्दांतच आहे. वर्तनवाद्यांच्या मते वर्तनातील नियमितपणा किंवा सारखेपणा शोधून एक सर्वमान्य सिध्दांत शोधून काढता येईल. या सिध्दांताच्या आधारावर भविष्यात कोणती माणसे कशी वागतील याचे निश्चित अनुमान सहज काढता येतील.

२) **निष्कर्षाचा पडताळा :-** राज्यशास्त्रातील संशोधकाने पुरावे गोळा करता जे निष्कर्ष काढले आहेत ते खरे आहेत की खोटे हे तपासून पाहिले पाहिजे. दुसऱ्या संशोधकाला दुसऱ्या ठिकाणी त्याच क्षेत्रात त्याचा पडताळा घेता आला पाहिजे.

३) **संशोधकाच्या पध्दती आणि तंत्र :** वर्तनवादी संशोधकांनी संशोधनाच्या अनेक रिती व तंत्रे शोधली आहेत. नमुना निवडण्याच्या अनेक रिती संशोधक शोधीत असतात. निःपक्षपातीपणे संशोधन करता यावे म्हणून नमुना पाहणी, सर्वेक्षण, मुलाखती घेणे ही नवी तंत्रे शोधून काढली आहेत. त्यामुळे मूल्य बाजूला ठेवून त्याचसमोर असलेल्या माहितीच्या आधारे मूल्यनिरपेक्ष दृष्टीकोन स्वीकारु शकतो.

४) **शास्त्रशुध्दता :-** भौतिकशास्त्रात दोन प्रकारची शास्त्रे आहेत असे मानले जाते. एक शुध्द शास्त्र व एक व्यवहारीक शास्त्र. शुध्द शास्त्रात टिकाऊ स्वरुपाचे सिद्धांत मांडले जातात कोणत्याही काळात तसेच लागू पडतात ते मुलभूत असतात. ते मूलभूत सिध्दांताच्या आधारे उपयुक्त संशोधन केले जाते. वर्तमानकाळातील प्रश्न व सामाजिक समस्या सोडवण्यासाठी मूलभूत तत्वांचा आधार घेऊन वर्तनवादी संशोधक या पध्दतीचा आधार घेतात.

५) **मूल्यनिरपेक्षता :–** वर्तनवादी लोकांच्या मते निष्कर्ष हे नेहमी सत्याच्या आधारवर काढले पाहिजेत. त्यात मूल्यांचा प्रश्न आणता कामा नये. मूल्य ही आत्मनिष्ट असतात. संशोधन हे वस्तूनिष्ट असायला पाहिजे. योग्य काय आणि अयोग्य काय याबाबत संशोधकांनी मत देऊ नये तर प्रत्यक्ष काय आहेय याचाच विचार करावा.

६) **व्यवस्थितपणा :-** संशोधकाने सर्वमान्य असलेल्या संशोधन पध्दतीचा अवलंब करावा. व त्यावर त्याचे संशोधन अवलंबून असावे. एका गृहीत तत्वावर एखादी गोष्ट खरी ठरली तरी ती दुसऱ्या गृहीतावर त्याने पडताळून पाहावी व सिध्दांताची मांडणी करावी. व्यवस्थित व पध्दतशीर संशोधन झाले तर भौतिकशास्त्रातील कोटेकोट स्वरुपाचे सिध्दांत राज्यशास्त्रात मांडता येतील.

७) **विशुध्दशास्त्र :-** हा दृष्टीकोन असे स्पष्ट करतो की सिध्दांत आणि सिध्दांताचा व्यवहारीक उपयोग यांचा परस्पर संबंध आहे. व्यक्तीच्या वर्तनाचा जेव्हा शास्त्रशुध्द विचार होतो तेव्हा व्यवहारीक उपयोग अभ्यासाला प्राधान्य दिले पाहीजे.

८) **आंतरशास्त्रीय संबंध :** राज्यशास्त्राला विशुध्द शास्त्राचा दर्जा प्राप्त करायचा असेल तर त्यासाठी अन्य सामाजिक शास्त्रांचा जास्तीत जास्त उपयोग अभ्यासकांनी करावा.

थोडक्यात असे म्हणता येईल की वर्तनवादी दृष्टीकोन व्यक्ती आणि गटाच्या वर्तनाचा अभ्यास करतो. केवळ सत्याचे आकलन करीत नाही तर सिध्दांत आणि संशोधन यात परस्परावलंबित्व निर्माण करतो. वस्तुनिष्ठ सिध्दांताची मांडणी करून शास्त्रशुध्द संशोधन पध्दतीला तो भर देतो.

**आपली प्रगती तपासा :**

१) राजकीय सिध्दांताच्या अभ्यासामध्ये वर्तनवादी दृष्टीकोनाचे महत्त्व विशद करा.

२) वर्तनवादी दृष्टीकोनाचे राजकीय सिध्दांताच्या दृष्टीकोनातून सुलभपणे परीक्षण करा.

## १.५ सारांश

सामाजिक शास्त्रांच्या अभ्यासामध्ये विविध दृष्टीकोनांना महत्त्व प्राप्त झाले आहे. त्या दृष्टीकोनामुळे राज्यशास्त्राचा अभ्यास करणे सोपे झाले आहे. राज्यशास्त्रामध्ये विविध प्रकारच्या दृष्टीकोनांचा समावेश आहे.

आदर्शत्मक दृष्टीकोन हा आदर्शवादी मुल्य व तत्त्वावर आधारीत आहे. त्याचे उद्दीष्टे हे आहे की मुल्याधारीत अभ्यासपध्दतीला चालना देणे. अनुभववादी दृष्टीकोनात अनुभवअंती निष्कर्ष काढले जातात आणि आदर्शात्मक दृष्टीकोनामध्ये प्रथमतः तत्व व मुल्यांचा विचार केला जातो. त्यावरून निष्कर्ष बाधण्याचा प्रयत्न सुरु होतो.

राजकीय संस्थेच्या रचनेचा, कार्याचा, कामकाजाच्या राज्यशास्त्राच्या दृष्टीकोनातून अभ्यास करणे म्हणजे संस्थात्मक दृष्टीकोन होय.

संशोधक जे काही स्वतः अनुभवू शकेल, अवलोकन करू शकेल किंवा इतर लोकांनी घेतलेल्या अनुभवाची माहीती तो घेऊ शकेल त्या सर्व पुराव्यांच्या आधारावर माणसाच्या राजकारणातील वर्तनाविषयी कोणत्या प्रकारची माणसे किंवा कशी वागतात या विषयाचे विश्लेषण

करणे म्हणजे वर्तनवाद होय. मानवाचे राजकीय वर्तनाच्या अभ्यास वर्तनवादाच्या दृष्टीकोनातून अभ्यासता येतो.

## १.६ पाठ्यावर आधारीत प्रश्न

१) राजकीय सिध्दांताच्या अभ्यासातील दृष्टीकोनाचे महत्त्व स्पष्ट करा.
२) राज्यशास्त्राच्या अभ्यासातील आदर्शवादी दृष्टीकोनाचे महत्त्व स्पष्ट करण्याविषयी चर्चा करा.
३) संस्थात्मक दृष्टीकोनाचा राजकीय सिध्दांताच्या अभ्यासावर झालेला परिणाण स्पष्ट करा.
४) वर्तनवादाची वैशिष्ट्ये स्पष्ट करून त्याचे राज्यशास्त्राच्या अभ्यासातील महत्त्व स्पष्ट करा.

## १.७ संदर्भ ग्रंथ

१) Barry, Nooman, An Introduction to Modern Political Theory, Macmilan, Londaon, 1981
२) D. P. Gauba, An Introduction to political theory, Macmillans, India, 2013
३) Bealey, frank, The Balckwell Dictionary of political science, Black kleel, 1999,
४) बोराळकर, कृ. दि., ाजकीय सिध्दांत विद्या बुक्स पब्लिशर्स, महाराष्ट्र, 1996
५) धांगरेकर, चि. ग., राज्यशास्त्राची मुलतत्त्वे, श्री. मंगेश प्रकाशन, महाराष्ट्र, १९९९

❖❖❖❖

# २

# राजकीय सिद्धांताच्या अभ्यासाचे दृष्टीकोन - २

**घटक रचना :**

२.० उद्दीष्टे
२.१ प्रस्तावना
२.२ मार्क्सवादी दृष्टीकोन
२.३ उत्तर मार्क्सवादी दृष्टीकोन
२.४ राजकीय सिध्दांतातील स्त्रीवादी दृष्टीकोन
२.५ सारांश
२.६ पाठ्यावर आधारीत प्रश्न
२.७ संदर्भ ग्रंथ

## २.० उद्दिष्ट्ये

१. मार्क्सवादी दृष्टीकोनांचा राजकीय सिध्दांतात समावेश करुन मार्क्सवादाच्या मुख्य वैशिष्ट्यांचा चर्चा करणे.
२. राजकीय सिध्दांतामधील उत्तर मार्क्सवादी दृष्टाकोन समजून घेऊन, मार्क्सवादावरील महत्वपूर्ण समिक्षांचा आढावा घ्या.
३. स्त्रीवादी संकल्पनांचे आकलन करुन, राजकीय सिध्दाताच्या अभ्यासामध्ये स्त्रीवादी दृष्टीकोनाचा आढावा घ्या.

## २.१ प्रस्तावना

एकोणिसाव्या शतकात भांडवलशाहींच्या विरोधात एक प्रचंड लाट निर्माण झाली. समाजवाद हा त्यावरील प्रभावी उपाय म्हणून उपयोजिला गेला. भांडवलशाहीला प्रचंड विरोध करुन समाजवादाची मुहूर्तमेढ रोवण्याचे महान कार्य सुप्रसिध्द तत्वज्ञ कार्ल मार्क्स याने केले.

समाजवादाचे तीव्र स्वरुप म्हणजेच साम्यवाद. ह्याची निश्चित व्याख्या करणे अडचणीचे आहे कारण प्लेटो, मार्क्स, लेनिन, ट्रॉटस्की, स्टॅलिन, मावोत्सेतुंग, टिटो इत्यांदीनी त्यावर वेगवेगळे विचार स्पष्ट केले आहेत. याशिवाय साम्यवादी तत्वज्ञान आणि त्याचे प्रत्यक्ष व्यवहारीक स्वरुप यातही बराच फरक दिसून येतो. मार्क्सने सामान्यतः वर्ग संघर्षाचा लढा, क्रांती या सर्व गोष्टींवर भर दिला तसेच त्यानंतर समकालीन परिस्थीतीत उत्तरमार्क्सवादी दृष्टीकोनाने राजकीय सिध्दांताच्या अभ्यासात मार्क्सवादी दृष्टीकोनाच्या भिन्न असे अस्तित्व निर्माण केले आहे.

## २.२ मार्क्सवादी दृष्टीकोन

मार्क्स थोर विचारवंत होता, व्यासंगी विद्वान होता, शास्त्रीय संशोधक होता पण या सगळ्यांपेक्षाही एन्गेल्सने म्हटल्याप्रमाणे मार्क्स हा क्रांतिकारक होता.

सामाजिक विचारांची सत्यासत्यता केवळ सैध्दांतिक पातळीवर तपासणे शक्यनसते, क्रांतिकारक कृतीच्या निकषांवरच ती अजमावता येते, या सूत्रावर मार्क्सवादाची उभारणी झालेल्या असल्यामुळे चिरंतन "मानवी गरजा" पूर्वनिर्धारित प्रयोजने, "अपरिहार्य" साध्ये, "अंतिम" किंवा "अमूर्त" आदर्श यांना मार्क्सवादी दृष्टीकोनात स्थान असूच शकत नाही.

राजकीय वास्तवामुळे तीन पध्दतीचा अवलंब करुन मार्सवादी दृष्टीकोन पहातो.

१) ऐतिहासिक भौतिकवादाचे पध्दतीशास्त्र
२) राजकीय सिध्दांतात्मक अध्ययन पध्दती
३) यष्टी अध्ययनाची समाजशास्त्रीय तंत्रे

राजकीय विश्लेषणाच्या तीन पातळ्यांशी या तीन पध्दती अनुक्रमे जुळतात. ह्या तीन पातळ्या अशा

१) ऐतिहासिक भौतिकवादाने ठरवून दिलेली सर्वसाधारण विश्लेषण पातळी.
२) मध्यमस्तरीय राजकीय सिध्दांताची बांधणी आणि
३) राजकीय जीवनाशी संबंधीत विशिष्ट घटीताचाच अभ्यास करण्यासाठी विशिष्ट अनुभवनिष्ट पध्दतीचा केलेला अवलंब.

**ऐतिहासिक भौतिकवाद (Historical materialism) :**

नावाने प्रचलित असलेला पण मार्क्सने मात्र "इतिहासाचा भौतिक अन्वयार्थ" अशा शब्दात मांडलेला विचार राज्यशास्त्राच्या संशोधकांना बराच मार्गदर्शक ठरणारा आहे. उत्पादक श्रम करुन माणूस आपल्या गरजा पूर्ण करु लागला तेव्हापासून खऱ्या मानवी इतिहासाला सुरुवात झाली. उत्पादन- व्यवहार हा सामाजिक राजकीय वास्तवाचा मूलाधार मानून इतिहासाचा भौतिक अन्वयार्थ मार्क्सने सांगितला आहे. यात राजकीय सिध्दांताच्या सर्वसाधारण अभ्यासाची एक पध्दती अनुस्यूत आहे. राज्यव्यवस्थेची निर्मिती, विकास आणि ऐतिहासिक स्थित्यंतरे यांचा या पध्दतीने अभ्यास केला जाऊ शकतो.

मार्क्सच्या मते कामगारवर्गाने जाणीवपूर्वक भांडवलदार वर्गाशी केलेला संघर्ष हा संपूर्ण समाजाच्या पूनर्रचनेसाठीच अंतिमतः कारणीभूत ठरत असतो. कारण अन्यही वर्गांना भांडवलशाहीच्या दोषांचा उपसर्ग पोचतच असतो. व कामगार क्रांतीतून ह्या दोषांचे निराकारण घडते. खाजगी मालकी, वैयक्तिक स्वार्थ व नफेखोरी कायमची नष्ट करुन मानवी अस्तित्वात आणणारी क्रांती राज्यशास्त्राच्या अभ्यासकांना अभ्यासावी लागतेच. पण अशा समग्र अभ्यासाला पूरक ठरणाऱ्या मध्यमस्तरीय राजकीय सिध्दांताचे अध्ययनही तितकेच महत्वाचे असते.

ऐतिहासिक भौतिकवादाचा विचार एक अध्ययनपध्दती म्हणून केल्यास असे दिसते की राज्यसंस्था, राज्यव्यवस्था व राजकारण या व्यामिश्र सामाजित घडितांची उकल करणे त्यातून

शक्य होते. "पाया आणि इमारत" असे रुपक मांडून मार्क्सने उत्पादक पध्दतीचा राज्यसंस्था, सामाजिक जाणिवा, धर्म, संस्कृत विचार यांच्याशी असलेला संबंध स्पष्ट केला आहे. उत्पादन पध्दत हा "पाया" आणि बाकीच्या सगळ्या गोष्टी म्हणजे त्यावर उभारलेल्या "इमारती " असा हा संबंध स्थूलमानाने असला आणि सामान्यतः पायाबरहुकूम इमारत बदलते, असे स्पष्टपणे सूचित केलेले असले तरी यात केवळ एकेरी संबंध नसतो. "इमारती" तील बदलांचा ही "पाया" वर परिणाम पडतो. म्हणजेच त्या दोहोतील संबंध द्वंदात्मक असतात. अशी मार्क्सवादाची भूमिका आहे. राज्यसंस्था व राजकारण यांच्या अभ्यासाला हा दृष्टीकोन उपयुक्त ठरतो.

भौतिकवादी द्वंद्वात्मकता (डायलेक्टिकल मटेरिअॅलिझम) राजकीय वास्तवाच्या अभ्यासासाठी वापरण्याचे काही लाभ अभ्यासकाला मिळतात. भौतिकवादी व्द्वंव्दालकतेचा अर्थ असा की निसर्ग, मानवी समाज व विचार ही जी वास्तवाची तीन क्षेत्रे आहेत त्यापैकी प्रत्येकाला परस्परविरुध्द तत्वे असतात. आणि त्यांच्यातील व्द्वंव्दात्मक संबंधातून त्या तिन्ही क्षेत्रातील विकास घडत असतो. "समष्टीचे परस्परविरुध्द ध्रुव परस्परपुरक असतात." हा या विकासाचा पहिला मुलभूत नियम आहे. समाजाचे वर्गीय विश्लेषण त्याच्या आधारे करता येते. राज्यव्यवस्थेचे स्वरुप, आंतरराष्ट्रीय संबंध. राज्याचे अंतर्गत व बहिर्गत धोरण इत्यादींचे आकलन करुन घेण्यात हा नियम उपयुक्त ठरु शकतो. एकमेकांविरुध्द असलेल्या दोष, अभाव व मर्यादा यांचे निरासन करुन समष्टींचे अधिक प्रगल्भ अवस्थेत रुपांतर करण्यात कारणीभूत असतात. हा व्द्वंव्दात्मकतेचा गाभा आहे. राजकीय संरचना त्यांची कार्ये त्यांचे संघर्ष व आंतरक्रिया तपासण्याच्या दृष्टीने या व्द्वंव्दांत्मकतेचा गुरुकिल्लीसारखा उपयोग होऊ शकतो.

राजकीय प्रक्रियांचा अभ्यास करायचा म्हणजे जुन्या नव्यांचा संघर्ष किंवा कोणत्या प्रश्नासंबंधी क्रांतिकारी व स्थितीवादी भूमिकांमध्ये निर्माण झालेले ताणतणांव लक्षात घ्यावे लागतात. भांडवलशाहीच्या संदर्भात वर्ग कलहाची संकल्पना मार्क्सने मांडली आहे. ती राजकारण जीवनाच्या सर्वसाधारण विश्लेषणाला आधारभूत ठरु शकते. संपत्तीचे उत्पादन करुनही राहणारे श्रमीक वर्ग आणि त्या उत्पादनातून निर्माण झालेल्या संपत्तीवर आपली मालकी प्रस्थापित करण्यात यशस्वी झालेला भांडवलदार वर्ग यांच्यातील हेतूपूर्ण संघर्ष इतिहास निर्माण ठरणारा असतो. हे वर्गकलहाचे मुख्य सूत्र आहे.

राजकीय परिवर्तनाचा अभ्यास तीन पातळ्यांवर तीन भिन्न अध्ययनपध्दतीचा अवलंब करून केला जाऊ शकतो. अशी मार्क्सवादी दृष्टीकोनाची मांडणी आहे. राजकीय अन्वेषणाच्या तीन पातळ्यांच्या पध्दतीशास्त्रीय गरजा भिन्न प्रकारच्या आढळतात. सर्वात वरची पातळी संपूर्ण इतिहास प्रक्रियेचा वेध घेते; कारण मधली पातळी राज्यव्यवस्थेच्या विशिष्ट ऐतिहासिक राज्यावरच कार्याचा शोध घेते. आणि अनुभवनिष्ठ पध्दतींचा अवलंब करुन तिला सुक्ष्म पातळीवर (मायक्रो लेव्हल) राजकीय वास्तव अभ्यासता येते. वरच्या पातळीवरचे अध्ययन करण्यास विचारप्रणालीची स्पष्ट व ठाम बैठक असणे आवश्यक असते. मध्यम व निमस्तरीय संशोधन विचारप्रणालीशी तितकासा साक्षात संबंध असत नाही. मध्यम पातळीवरील संशोधने सामाजिक प्रक्रियांमागील सर्वसाधारण कार्यकारणाचा व तर्कसंगतीचा शोध घेतात, तर अनुभववादी संशोधन मुख्यत्वे तथ्यांचे संकलन सूबध्द मांडणी एवढेच करतात.

सामाजिक राजकीय अध्ययनांमध्ये नवी संशोधन तंत्र, गणिती पध्दत. संगणक तंत्रज्ञान, माहिती-नियंत्रणशास्त्र (सायनेटीक्स) वैगेरेचे महत्व निर्विवाद आहे. तथ्ये गोळा करुन

साठवणे. राजकीय घडामोडींशी संबंधित तथ्ये तत्काळ व अचूकपणे उपलब्ध करणे. इत्यादी गोष्टी त्यामधून साध्य झाल्या आहेत. व्यवस्थापक दृष्टीकोन, संख्याशास्त्रीय पध्दती, आशय विश्लेषण, संसूचनात्मक विश्लेषण, तौलानिक अभ्यास ही आधुनिक तंत्रे निश्चित महत्वाची आहेत. मार्क्सवादी दृष्टीकोन त्यांना मुळीच त्याज्य समजत नाही. फक्त त्यांची भूमिका एवढीच असते की या सर्व पध्दतीचा समग्रतेने व साक्षेपाने वापर केला जावा. मार्क्सवादी पध्दतीशास्त्राचा व राजकारणाच्या भौतिकवादी सिध्दांताचा विसर न होऊ देता या पध्दती आवलंबात आणल्या जाव्यात.

अर्थकारणाप्रमाणे भौगोलिक परिस्थिती लोकसंख्यात्मक वैशिष्ट्ये आणि मानसशास्त्रीय घटक यांचाही बराच प्रभाव या संस्थेच्या स्वरुपावर व राजकारणावर पडत असतो. भौतिक नैसर्गिक शास्त्रांचाही प्रभाव नाकारता येत नाही. वांशिक भेदभाव वर्चस्वाचा एक दीर्घकालीन आजारच उखडून टाकला आहे. हे लव घेणे आवश्यक आहे. त्याचप्रमाणे विशिष्ट राजकीय प्रक्रियेचा किंवा घटिताच्या मुळाशी वस्तुनिष्ट घटक जसे असतात तसेच व्यक्तिनिष्ट घटकही असतात. त्यामुळे समाजातील वरच प्रवृत्ती व त्यांचा आपसातील संघर्ष अभ्यासकाला लक्षात घ्यावा लागतो. यातून समकालीन राज्यव्यवस्थांच्या स्वरुपाविषयीचे त्याचे आकलन सखोल होऊ शकते.

भौतिक व्दंव्दात्मक दृष्टीकोनातून पाहिल्यास मानवमात्राच्या व देशांच्या राजकीय जीवनाचा विश्वोत्पतीस दृश समग्र पट अभ्यासकासमोर उभा राहू शकतो. पण त्याचबरोबर त्याला पूरक म्हणून विशिष्ट राज्यव्यवस्थेचा विशिष्ट प्रसंगाच्या अनुभववादी समाजशास्त्रीय विश्लेषणातून उपलब्ध झालेल्या संकल्पना व प्रवर्ग (कॅटेगरीज) यांचाही उपयोग तितकाच महत्वपूर्ण ठरतो.

वर्गीय दृष्टीकोनातून सामाजिक जीवनात विशिष्ट पैलू अभ्यासायचा तर त्यासाठी केवळ सर्वसाधारण सैध्दांतिक व्याख्या पुरेशा ठरणार नाहीत. तर राज्यकर्त्या वर्गातील तसेच शोषित वर्गातील विविध गटांच्या राजकीय हितसंबंधाचे डोस व सांगोपांग विश्लेषणही आवश्यक ठरेल. ऐतिहासिकभौतिकवादातून सर्व सामाजिक, आर्थिक रचनांमध्ये आकृतीबंध आरपार पाहता येतील; तसेच सर्वसाधारण संकल्पना व प्रवर्ग ठरवता येतील; पण समाजातील शासक व शोषीत वर्गांतर्गत विभिन्न स्तरांच्या व गटांच्या भूमिका, त्यांचे राजकीय वजन आणि कार्याचे प्रकार सखोल व ठोस विश्लेषण करण्यासाठी समाजशास्त्रीय अध्ययनपध्दती व अनुभवनिष्ट तंत्रेच अवलंबात आणावी लागतील.

राजकारणाचा अभ्यास वर्गाच्या व अन्य सामाजिक गटांच्या अनुषंगाने करणारा, आणि राजकीय विकासाची तपासणी भैतिक संवादाच्या आधारे करणारा मार्क्स दृष्टीकोन राजकीय जीवनाच्या शास्त्रीय विश्लेषणाच्या आणि मध्यवर्ती महत्वाचा आहे. मार्क्सवादी पध्दतीशास्त्र अशाप्रकारे तिन्ही पातळ्यांवरच्या राजकीय विश्लेषणाचा समन्वय साधून अंतविरोध व पेच सोडवण्याचा प्रयत्न करते. त्यामुळेच समकालीन राजकीय विश्वातील सातत्याचा व साधनांच्या लिकेलस आकलनासाठी लागणारी एक अत्यंत समावेशक व विश्वसनीय चौकट या दृडष्टीकोनातून अभ्यासकाला गवसत असते.

समाजाच्या स्थतीगतीचे स्पष्टीकरण वर्तनवादी वा वर्तनवादोत्तर अभ्यासकांना जेवढे देता आले नाही तेवढे मार्क्सवादाने दिले आहे. सामाजिक परिवर्तनाचे गतिशास्त्र व दिशादर्शन या दृष्टीकोनातून अभ्यासकांना लाभले आहे. त्यामुळे मानव समाज व इतिहास यांचा अभ्यास करण्याते ते सर्वोत्तम शास्त्र ठरले आहे. तात्कालिक तथ्यांच्या पलीकडे जाण्याची क्षमता ऐतिहासिक दृष्टीच्या जोडीला स्वप्ने पाहण्याचे धारिष्ट आणि ती स्वप्ने साकार करण्यासाठी लागणारी दिककालातील दूरदृष्टी ही या दृष्टीकोनाची वैशिष्ट्ये आहेत. मार्क्सवादाला मर्यादा काहीही असोत पण एक गोष्ट वादातील आहे की हा दृष्टीकोन "शास्त्रीय असूनही मानवतावादाने परिपूर्ण आहे ...... नव्हे, "नव्या माणसाला" जन्म देणारी ती सामाजिक कूस आहे." वर्तनवादी वर्तनवादोत्तर कृती किंवा सर्वच तथाकथित "आधुनिक" विश्लेषणपध्दतीची या संदर्भात मार्क्सवादाची तूलनाच होवू शकत नाही.

## २.३ उत्तर-मार्क्सवादी दृष्टीकोन

उत्तर मार्क्सवादी सिध्दांताचा उदय ही १९६० नंतरची घटना आहे. कारण सोव्हीयत रशियाचे साम्यवादी प्रारुप अपयशी ठरल्यानंतर राजकीय सिध्दांताचे विश्लेषण करण्यासाठी उत्तर मार्क्सवादाची गरज भासू लागली. उत्तर मार्क्सवाद स्वीकार्यह होण्याचा पाठीमागे खालील घटनांच्या भूमिका आहेत.

१) १९६८ मधील जागतिक पातळीवर आलेले विद्यार्थी संघर्ष.
२) माओवादाचा उदय आणि व्हियतनामचे युध्द.
३) विज्ञान तंत्रज्ञानामुळे सामाजिक-आर्थिक क्षेत्रात आलेले अमुलाग्र बद्दल.
४) भांडवलवादामधील झालेले रचनात्मक बद्दल आणि कामगारचे महत्व कमी झाले.

लुईस अलशूजर आणि मिशेल फोकॉल्ट यांचे उत्तर मार्क्सवादाच्या संकल्पनेच्या निर्मितीत महत्वाची भूमिका आहे. तसेच बाकी विचारवंतांनी आर्थिक, ऐतिहासिक, स्त्रीवादी, साहीत्यिक व सांस्कृतिक दृष्टीने पण उत्तर-मार्क्सवादात भर पाडली आहे. यामध्ये जुडीथ बटलर, जॉन फ्रो, रिचार्ड वोल्फ, अर्नेस्टो लाक्लाँ, टोनी बेनेट, इत्यादी. उत्तर मार्क्सवादाने वर्ग संघर्ष आणि आहे रे आणि नाही रे च्या पुढे जाऊन लिंगात्मक, वर्गात्मक व वांशिक ते बद्दल भाष्य करण्याचा प्रयत्न केला आहे. या विधानाचा विचार केला असता उत्तर मार्क्सवाद हा मार्क्सवादावरची टिका आहे.

उत्तर मार्क्सवाद हा असा दावा करतो की समाजवाद आर्थिक व सामाजिक सिध्दांताची आपत्ती आहे. बाकी सर्व उपसिध्दांत हे समाजवादामधून घेतलेले आहेत. उत्तरमार्क्सवादाने लिंगात्मक, वंशवादाला (तसेच भारताच्या संदर्भात जातीयवादाला) यांच्या अभ्यासाला प्राधान्य दिले आहे. तसेच राज्यसंस्था ही लोकशाही व स्वातंत्र्याला अपायकारक आहे असा दावा उत्तर मार्क्सवादाने केला आहे. तसेच राज्यसंस्था समाज कल्याणाचे धोरण राबवण्यात कमी पडल्या आहेत. उत्तर मार्क्सवाद्यांत म्हणणं असं आहे की, राज्यसंस्थेच्या ठिकाणी नागरी संस्थेने जागा घेतली पाहिजे. आणि त्यातून सामाजिक संकलन घडून आणावे यावर भर दिला आहे. चौथा असा आहे की, केंद्रीय नियोजनाचे तपासनी हे सुध्दा उत्तर मार्क्सवाद्यांचं अभ्यासाचा विषय होता.

उत्तर मार्क्सवाद्यांचा पाचवा मुद्दा असा आहे की, राजकीय सत्ता मिळवण्यासाठी समाजवादी संघर्ष निर्माण झाले त्यातून राज्यव्यवस्था भ्रष्ट होत आहेत. आणि ह्या भ्रष्ट राज्य व्यवस्था हुकूमशाहीसारख्या राजकीय रचनेला जन्म देत आहेत. आणि ह्या व्यवस्था लोकशाही, स्वातंत्र्य व नागरी समाजाच्या विचारांचे उल्लंघन करतात, यास प्रतिसाद देताना उत्तर मार्क्सवाद असे मांडतो की स्थानिक संस्थानी स्थानिक प्रश्नांचे समाधान व बढावा देण्यासाठी राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरासारखेच प्राधान्य द्यावे.

उत्तर मार्क्सवाद्यांचा सहावा मुद्दा असा आहे की, वर्गवाद जास्त काळ टिकणार नाही. त्यानंतर सातवा मुद्दा असा आहे की, वर्ग, संघर्ष हा कोणत्याच समस्याचे समाधान असू शकत नाही. त्यामुळे फक्त सामाजात अशांतता पसरविली जाऊ शकते. उत्तर मार्क्सवादी वर्ग संघर्षाची जागा नागरी समाजाने घेतली पाहिजे असा आग्रह धरतात. नवे विधान असे आहे की साम्राज्यवाद हा अप्रस्तूत असा मुद्दा आहे कारण साम्राज्यवाद भूतकाळातील संकल्पना तेवढीशी समकालीन संबंधीत वाटत नाही.

**आपली प्रगती तपासा :**

१) राजकीय सिध्दांतातील उत्तर मार्क्सवादाचे मुख्य वादांची चर्चा करा.

२) राजकीय सिध्दांताच्या अभ्यासातील उत्तर मार्क्सवादाचे सूक्ष्मपणे विश्लेषण करा.

## २.४ राजकीय सिध्दांतातील स्त्रीवादी दृष्टीकोन

स्त्रीवादी सिध्दांताचे हे मुख्य प्रतिपादन आहे की, समाजात सत्तेचा मोठ्या प्रमाणात अवलंब केला जातो. सत्ता संकल्पनेच्या विश्लेषणात दृष्टीकोन, स्त्री हा एक शोषित वर्ग आहे. आमचे शोषण सर्वव्यापी असून आमच्या जीवनाच्या प्रत्येक आयामास प्रभावित करते. पुरुष हेच आमच्या शोषणाचे मूल स्त्रोत आहे असे आम्ही मानतो. पुरुषांचे अधिपत्य हे प्रभूत्वाचे सर्वात प्राचीन आणि सर्वपरीचीत असे रुप आहे.

**स्त्रीवादाचा उदय :**

समकालीन संदर्भात १९७० च्या दशकात स्त्रीवादी आंदोलनाचा प्रारंभ झाला ; परंतु स्त्री-पुरुष संबंधविषयक विवाद अनादीकाळापासून सुरु असलेला दिसून येतो. प्राचीन ग्रीक तत्वज्ञ प्लेटोने पालक वर्गांतर्गत स्त्री-पुरुष समानतेचा स्वीकार केला होता ; परंतु ॲरिस्टॉटलने पुरुषांच्या तुलनेत स्त्रीयांच्या हिनतेवर जोर देऊन त्यांना गुलामांचाच दर्जा बहाल केला. प्राचीन काळी वा मध्ययुगात स्त्रीयांच्या हिन स्थितीविरुध्द कोणत्याही आंदोलनाचा संकेत मिळत नाही. स्त्रीवादी आंदोलनाचे संकेत अठराव्या आणि एकोणिसाव्या शतकांतील युरोपीय चिंतनात शोधता येतात. उदारमतवादी परंपरेतील मेरी वोल्स्टनक्राफ्ट (१७५९-९७) यांच्या "विंडीकेशन ऑफ द राईटस ऑफ वूमेन " (१७९३) या ग्रंथात स्त्रीयांना कायदा, राजकारण आणि शैक्षणिक क्षेत्रात

समानता प्रदान करण्यासाठी मर्मग्रही यूक्तीवाद करण्यात आला आहे. विशेषतः वोल्स्टनक्राफ्ट यांनी स्त्री-पुरुषांसाठी असणाऱ्या भिन्न भिन्न सद्‌गुणाविषयी प्रचलीत धारनांना आव्हान देत सामाजिक जीवनात स्त्री-पुरुषांसाठी समान परिस्थिती आणि भुमिकेची मागणी केली. पुढे जॉन स्टूअर्ट मिल (१८०६-७३) ने आपल्या "सब्जेक्शन ऑफ विमेन" (Subjection of Women) या महत्वपूर्ण ग्रंथात असा युक्तीवाद केला की, स्त्री-पुरुष संबंध मैत्रीवर आधारीत असले पाहिजेत, प्रभूत्वावर नव्हेत. मिलने विवाहविषयक कायदे आणि स्त्रीमताधिकारावर विशेष भर देत सुयोग्य आणि प्रतिभावंत स्त्रीयांना समान संधी प्रधान करण्याची तरफदारी केली. एकोणिसाव्या शतकात मार्क्सवादी विचारांच्या प्रवर्तकांनी स्त्री-पुरुष संबंधाविषयी सखोल रुची दर्शवली. त्यांनी हे नमुद केले की, कुटूंबसंस्था ही श्रमविभागणीचा मूलस्त्रोत आहे, ज्यात स्त्री-पुरुष संबंध प्रभूत्व आणि खासगी मालमत्ताविषयक धारणांना मूर्त रुप देतो.

१९७० च्या दशकात युरोप आणि अमेरिकेतील अनेक जागृत महीलांनी असे निदर्शनास आणले की. स्त्रीयांच्या मताधिकाराची चळवळ आणि स्त्रीयांची अवस्था याविषयी उदारमतवाद आणि समाजवाद या दोन्ही विचारांनी महत्वपूर्ण योगदान दिले असून देखील पश्चिमी संस्कृतीत स्त्रीयांच्या हलाखीच्या परिस्थितीचा अंत करण्याच्या दिशेने कोणतेही ठोस प्रगती आली नव्हती. तेव्हापासून स्त्री अधिकारांच्या रक्षणासाठी एका नवा आंदोलनाची सुरुवात झाली.

**स्त्रीवादातील प्रमुख प्रवाह :**

व्यापक स्तरावर स्त्रीवादी आंदोलनात अनेक प्रकारचे विचार आणि कार्यक्रम प्रस्तूत करण्यात आले. त्यापैकी प्रमुख तीन विचारप्रवाहांचा खालीलप्रमाणे आढावा घेता येईल.

### १) उदारमतवादी प्रवाह (Liberal stream ) :-

स्त्री अधिकाराच्या पुनरुत्थनासाठी नव्या संघर्षाचा आरंभ करणे हे या प्रवाहाचे प्रमुख उद्दिष्ट्ये होय. या अंतर्गत स्त्रीयांना संधीची निरपवाद समता प्रदान करण्यावर आणि लैंगिकतेवर आधारीत भेदभावाचे समुळ उच्चाटन करण्यावर भर दिला जातो.

समान कामास स्त्री-पुरुषांना समान वेतन, गर्भपात कायद्यात सुधारणा इ. या प्रवाहाने मांडलेले कार्यक्रम आहेत. हा स्त्रावादी चळवळीतील सर्वात लोकप्रिय गट आहे. परंतु तितका प्रभावशाली गट मानला जात नाही.

### २) जहाल स्त्रीवादी प्रवाह (Radical stream) :-

या प्रवाहात शुन्नमिय फायरस्टोनसारख्या जहाल स्त्रीवादी विदूषीने असा तर्क काढला की, वर्तमान स्थितीत फुटकळ स्वरुपांच्या सुधारणांच्या आधारे स्त्रीयांवर होणाऱ्या अत्याचारांच्या मुळाशी जाता येत नाही. आर्थिक परिवर्तन अथवा आर्थिक सत्तेने देखील स्त्रीतांना फारसा लाभ होणार नाही. सर्व इतिहास हा स्त्रीयांवरील पुरुषी अत्याचारांचा इतिहास आहे ; हे पुरुषसत्ताक व्यवस्थेचे जीवंत उदाहरण आहे. याचा अर्थ असा की स्त्री-पुरुषातील शारीरीक भेदास एक जीवशास्त्रीय तथ्य मानून स्त्रीला संतती जन्मास घालणारे आणि त्याचे पालन पोषण करणारे यंत्र मानले जाते ; परंतु सामाजिक जीवनातील स्त्री-पुरुषांच्या अशा या भिन्न भिन्न भूमिकांच्या कोणताही जीवशास्त्रीय आधार आढळत नाही. मुलांना हट्टी,

उध्दट आणि उनाड बनण्याचे शिक्षण दिले जाते, तर मुलींना आज्ञाधारक, लाजाळू आणि दबून राहण्याचे शिक्षण दिले जाते.

### ३) समाजवादी प्रवाह (Socialist stream ) :-

इंग्लिश विदूषी शीला रोबॉथम या प्रवाहाच्या प्रतिनिधी होत. हा प्रवाह जहाल स्त्रीवादप्रणीत पुरुषसंज्ञेचे विश्लेषण आणि मार्क्सलादी वर्गमिमांसा यांचा समन्वय साधण्याचा प्रयत्न करतो. याचा असा दावा आहे की, स्त्रीयांच्या परवशनेची सर्व कारणे एकमेकांशी निगडीत आहेत याचे एक कारण जीवशास्त्रीय आहे, जे अनादी काळापासून चालत आलेले आहे. दुसरे कारण म्हणजे, आर्थिकदृष्ट्या पुरुषप्रधान व्यवस्था ज्यात पुरुषाला खाजगी संपत्तीच्या रुपात पाहिले जाते . एवढेच नव्हे तर स्त्रीलादेखील संपत्तीच्या रुपात पाहिले जाते. तिसरे कारण म्हणजे, भांडवलशाही व्यवस्था ज्यात स्त्रीला श्रमाचा मूल स्त्रोत म्हणून तिचे शोषण केले जाते. खुद भांडवलशाही व्यवस्था ऐतिहासिक गतिनियमाचे अपत्य आहे.

**स्त्रीवादातील समाजवादी प्रवाहाच्या मते या ,समस्येवर पुढील उपाय योग्य ठरेल :**

अ) एका बाजूने लैंगिकतेवर आधारीत श्रमविभागणी आणि विभक्त कुटूंबपधद्तीच्या धारना नष्ट करुन मानवी समतेवर आधारीत नवी व्यवस्था स्थापित केली जाते आणि

ब) दुसऱ्या बाजूने भांडवली व्यवस्थेचा अंत करुन समाजवादी अर्थव्यवस्था प्रस्थापित केली जाते. ज्यामुळे परात्मेपासून मुक्त अशा वर्गविहीत समाजाचा उदय होऊ शकेल.

**टिकात्मक मूल्यमापन :-**

स्त्रीवादाने स्त्रीयांवर युगानयुगे होणाऱ्या अन्याय आणि अत्याचाराकडे लक्ष वेधून या अन्यायाचा निराकरणाचा मार्ग दाखवला; परंतु जेव्हा स्त्रीमुक्तीच्या नावाखाली स्त्री-पुरुष संघर्षाचा मुद्दा उठवला जातो. तेव्हा स्त्रीपुरुषांचे परस्परांविषयीचे बंध नष्ट होऊ लागतात. अशी स्थितीत पुरुषांना आपल्याकडे आकर्षित करण्यासाठी स्त्रीयांमध्ये जेव्हा स्पर्धा सुरु होते. तेव्हा ती खूद स्त्रीयांनाच हानीकारक ठरते. स्त्रीवादाचा हा दावा खरा आहे की, स्त्रीयांना दूर्बल, अबला समजले जाऊ नये ; परंतु समाजात या बाबतीतच स्त्रीयांचा आत्मसन्मान आहे की तिला ममता, प्रेरणा आणि शक्तीचा अनंत स्त्रोत मानला जातो.

**आपली प्रगती तपासा :**

१) स्त्रीवादाची व्याख्या स्पष्ट करा आणि स्त्रीवादाचे विविध समाजातील स्वरुपावरती भाष्य करा.

२) स्त्रीवादाची राजकीय सिध्दांतामधील भूमिका स्पष्ट करा.

३) राजकीय सिध्दांतातील स्त्रीवादी दृष्टीकोनाचे सूक्ष्मपणे परिक्षण करा.

## २.५ सारांश

राजकीय सिध्दांताच्या अभ्यासामध्ये मार्क्सवादी  दृष्टीकोनाचे अनन्यसाधारण महत्त्व आहे. मार्क्सवादी दृष्टीकोन राजकीय सिध्दांताचा अभ्यास करताना वर्ग-संघर्षावर भर देतो. तसेच आहे रे किंवा नाही रे वर्गाचा संघर्षाचे मूळ तपासण्याचा प्रयत्न करतो व जगातील कामगारांना एकत्र येण्याचे आव्हान करुन कामगारांच्या हातात सत्ता देण्याचा विचार मार्क्सवाद मांडतो. मार्क्सवादामध्ये राज्यसंस्थांना तेवढेसे महत्व नाही तर राज्यहीन समाजाचे समर्थन मार्क्सवाद करतो.

स्त्रीवादी दृष्टीकोन हा स्त्रीयांना समान अधिकार, दर्जा मिळवून देण्याची मांडणी करतो. स्त्रीवादामध्ये विविध समाजातील स्त्रीयांच्या समता, स्वातंत्र्य व पुरुषी वर्गाचे स्त्रीयांवरील वर्चस्व या सर्व गोष्टींवर प्रकाश टाकतो. स्त्रीयांबद्दल पुरुषी मानसिकता ही कशा प्रकारची आहे याचे सुध्दा वर्णन करतो. स्त्रीची आर्थिक, सामाजिक व राजकीय क्षेत्रातील मागासपण स्त्रीवाद राज्यशास्त्राच्या सिध्दांतामध्ये स्त्रीवादी दृष्टीकोनाच्या आधारे मांडतो. उत्तर मार्क्सवाद हा मार्क्सवादावरची टिकाच समजली जाते. उत्तर मार्क्सवाद स्थानिक प्रश्नांना, जागतिक व राष्ट्रीय समस्यांच्या रांगेत घेऊन जाण्याचा प्रयत्न करतो. तसेच उत्तर मार्क्सवाद राज्यसंस्थेच्या जागी नागरी समाज स्थापन्याची शिफारस करतो. मार्क्सवादी वर्गसंघर्षाच्या पलीकडे जाऊन, उत्तर मार्क्सवाद जात, लिंग, वंश या घटकाच्या अभ्यासावर प्रकाश टाकण्याचा प्रयत्न करतो की बाह्य निधिच्या आधारे स्थानिक लोकांचा विकास झाला पाहिजे. उत्तर मार्क्सवादाचा विचार हा साम्यवादी सोव्हीयन रशियाचे साम्राज्याचे प्रारुप अयशस्वी ठरल्यानंतर उदयास आला.

## २.६ पाठ्यवर आधारीत प्रश्न

१) राजकीय सिध्दांताताल मार्क्सवादी दृष्टीकोनातून तयार झालेल्या मुख्य वादांची चर्चा करा.
२) राजकीय ,सिध्दांतातील उत्तर मार्क्सवादी दृष्टीकोनावर निर्बंध लिहा.
३) राज्यशास्त्राच्या अभ्यासातील मार्क्सवादी दृष्टीकोन व उत्तर मार्क्सवादी दृष्टीकोन यांचा तुलनात्मक अभ्यास करा.
४) राजकीय सिध्दांतातील स्त्रीवादी दृष्टीकोनांच्या मुख्य वैशिष्ट्य स्पष्ट करा.

## २.७ संदर्भ ग्रंथ

१) Barry, Nooman, An Introduction to Modern Political Theory, Macmilan, Londaon, 1981
२) Bealey, frank, The Balckwell Dictionary of political science, Black kleel, 1999,
३) Cohen, J. and Arato, A., civil society and political Theory, Mit pren, canbridge, 1992.
४) De crepigny, Anthony etal (Ets), antemprary political Theory, Nelson, London, 1970.

❖❖❖❖

# ३

# प्रत्यक्षार्थ, वैज्ञानिक पध्दती, आणि त्याचे परिक्षण, सामाजिक शास्त्राच्या संशोधनातील समकालीन दृष्टीकोन

**पाठ्य रचना**

३.० उद्दिष्ट्ये
३.१ प्रस्तावना
३.२ प्रत्यक्षार्थवाद
३.३ तार्कीक प्रत्यक्षार्थवाद
३.४ संशोधनाच्या वैज्ञानिक पध्दतीचे टिकात्मक परिक्षण
    ३.४.१ वैज्ञानिक पध्दतीचे टिकात्मक परिक्षण
३.५ सामाजिक शास्त्राच्या संशोधनाचे समकालीन दृष्टीकोन
    ३.५.१ संस्थात्मक विश्लेषण
    ३.५.२ वर्तनवादी दृष्टीकोन
    ३.५.३ विवेकी निवड सिध्दांत
    ३.५.४ स्त्रीवादी दृष्टीकोन
    ३.५.५ मार्क्सवादी दृष्टीकोन
    ३.५.६ उत्तर मार्क्सवादी दृष्टीकोन
३.६ सारांश
३.७ पाठ्यावर आधारीत प्रश्न
३.८ संदर्भ ग्रंथ

## ३.० उद्दिष्ट्ये

१) प्रत्यक्षार्थवादाची व तार्किक प्रत्यक्षार्थवादी संकल्पना समजून घेणे.
२) वैज्ञानिक पध्दतीचा समाजशास्त्रातील समावेश आणि त्याचे टिकात्मक परिक्षण
३) सामाजिक शास्त्राच्या संशोधनातील समकालीक दृष्टीकोनांचे महत्व आणि समकालीन संशोधन अभ्यासात समाविष्ट केलेले उत्तर समकालीन दृष्टीकोनांचे आकलन.

## ३.१ प्रस्तावना

प्रत्यक्षार्थवाद असा सिध्दांत आहे जो केवळ वैज्ञानिक पध्दतीव्दारे प्राप्त केलेले ज्ञान उपयुक्त, विश्वसनीय अणि प्रमाण मानतो. या सिध्दांताचे समर्थक असे प्रतिपादन करतात की, सामाजिक शास्त्रास मान्यता देण्यासाठी नैसर्गिक शास्त्राच्या अभ्यासपध्दतीचा अवलंब केला

पाहिजे. याच दृष्टीकोनातून एकोणिसाव्या शतकातील फ्रेंच तत्वज्ञ ऑगस्त कॉम्त (१७९८-१८१७) यांना प्रत्यक्षार्थवादाचा मुख्य प्रवर्तक मानले जाते. कॉम्स यांच्या "द पॉझिटिव्ह फिलॉसॉफी (The positive philosophy)" (१८३०-४२) या सुप्रसिध्द ग्रंथानुसार मानवी ज्ञानाच्या प्रत्येक शाखेस आपली प्रौढावस्था संपादन करण्यापूर्वी तीन सैध्दांतिक अवस्थातून मार्गक्रमण करावे लागते. धर्मशास्त्राची, तत्वमिमांसेची आणि वैज्ञानिक-प्रत्यक्षार्थवादाची अवस्था.

## ३.२ प्रत्यक्षार्थवाद

### प्रत्यक्षार्थवादाची संकल्पना

प्रत्यक्षार्थवाद असा सिध्दांत आहे जो केवळ वैज्ञानिक पध्दती ने प्राप्त केलेले ज्ञान उपयुक्त, विश्वसनीय आणि प्रमाण मानतो. या सिध्दांताचे समर्थक असे प्रतिपादन करतात की, सामाजिक शास्त्रास मान्यता देण्यासाठी नैसर्गक शास्त्राच्या अभ्यासपध्दतीचा अवलंब केला पाहिजे. याच दृष्टीकोनातून १९ व्या शतकातील फ्रेंच तत्वज्ञ. ऑगस्त कॉम्त (१७९८-१८५७) यांना प्रत्यक्षार्थवादाचा मुख्य प्रवर्तक मानले जाते. कॉम्त यांच्या "द पॉझिटिव्ह फिलॉसॉफी" (१८३०-४२) या सुप्रसिध्द ग्रंथानुसार मानवी ज्ञानाच्या प्रत्येक शाखेस आपली प्रौढावस्था संपादन करण्यापूर्वी तीन सैध्दांतिक अवस्थांतून मार्गक्रमण करावे लागते. ह्या अवस्था अभ्यासने योग्य ठरेल.

१) धर्मशास्त्राच्या प्रभावाची अवस्था
२) तत्वमिमांसेची अवस्था
३) वैज्ञानिक-प्रत्यक्षार्थवादी अवस्था

**१) धर्मशास्त्राच्या प्रभावाची अवस्था :-** यात सर्व घटनांचे स्पष्टीकरण अलौकीक वा अध्यात्मिक शक्तींच्या संदर्भात दिले जाते. ही ज्ञानाची प्रारंभावस्था होय.

**२) तत्वमीमांसेची अवस्था :-** यात सर्व घटनांचे स्पष्टीकरण अमूर्त तत्वे आणि अनुमानाच्या आधारे दिले जाते. ही ज्ञानाची मध्यवस्था आहे. ही नकारात्मक अवस्था असून तिचे स्वतःचे ऐतिहासिक महत्व आहे. यात भौतिक तसेच सामाजिक जीवनविषयक जुन्या संकल्पनांवर जोरदार टिका करुन ह्यांना नाकारले जाते. ही अवस्था प्रत्यक्षार्थवादाच्या स्थापनेसाठी आवश्यक भूमिका तयार करते; कारण नवी व्यवस्था प्रस्थापित करण्यासाठी जुन्या व्यवस्थेच्या अवशेषांना नष्ट करणे अत्यावश्यक असते.

**३) वैज्ञानिक-प्रत्यक्षार्थवादी अवस्था :-** यात असे मानले जाते की, सर्व घटनाक्रम निर्विकार प्राकृतिक नियमांनी बध्द असतात; निरीक्षण आणि प्रयोगाव्दारे या नियमांचा शोध लावता येतो. या पध्दती अंतर्गत वास्तविक कार्यकारण संबंधाचे ज्ञान प्राप्त केले जाते.

## ३.३ तार्कीक प्रत्यक्षार्थवाद

प्रत्यक्षार्थवादाच्या  समर्थकांनी कॉम्तच्या तथ्य-मुल्य संबंधविषयक मांडणीचा स्वीकार केला नाही; त्यामुळे २० व्या शतकाच्या प्रारंभी या विषयासंबंधी जो नवा दृष्टीकोन उदयास आला त्यास नव-प्रत्यक्षार्थवाद वा तार्कीक प्रत्याक्षार्थवाद असे म्हठले जाते.

या दृष्टिकोनाच्या विकासात जर्मन समाजशास्त्रज्ञ मॅक्स वेबर (१८६४-१९२०) आणि "व्हिएन्ना सर्कल" च्या अभ्यासकांचे विशेष योगदान लक्षात घ्यावे लागते. मॅक्स वेबरने "सायन्स ॲज ए व्होकेशन" (१९१९) या प्रसिध्द ग्रंथात हा विचार व्यक्त केला तो म्हणतो.

"विज्ञान या प्रश्नाचे उत्तर देत नाही की, आपण काय केले पाहिजे आणि आपण कोणत्या प्रकारचे जिवन जगले पाहजे? सर्वसामान्य वा शैक्षणिक ज्ञान आपल्याला सृष्टीच्या अविष्काराच्या अर्थ लावण्यात कोणतेच सहाय्य करता नाही". याच प्रकारे टि.डी. वॅल्डन या तत्ववेत्यांने आपल्या "व्होकेब्यूलरी ऑफ पॉलिटीक्स "(१९६३) या बहुचर्चित ग्रंथात वेबरच्या या विचारांचा पुनरुच्चार केला आहे. आणि कोणतेही राजकीय तत्वज्ञान आपापल्या अभिरुचीचा विषय आहे असे म्हटले आहे. एखादी व्यक्ती आपली अभिरुची सांगू शकते, परंतु त्यावर तर्क वितर्क करण्यात कोणताच फायदा नसतो. तार्किक प्रत्यक्षार्थवादास निःसंदिग्धपणे एका आंदोलनाचे रुप देण्यात "व्हिएन्ना सर्कल" ने महत्वपूर्ण भूमिका बजावली असल्याचे दाखले उपलब्ध आहेत. हा संप्रदाय व्हिएन्ना विद्यापीठाचे मोरीटज श्लिक (१८८२-१९३६) यांच्या नेतृत्वाखाली वृध्दींगत याला तार्किक प्रत्यक्षार्थवाद्यांनी असा युक्तीवाद केला की, चिंतनात्मक तत्वज्ञान केवळ ज्याला अनुभवजन्य दृष्टीने पडताळून पाहता येत नाही, अशाच प्रश्नाशी संबंधीत असते. जसे सत्य (truth), शिव (god) आणि सुंदर म्हणजे काय? त्यांचे असे म्हणणे होते की, ज्या प्रश्नाची शास्त्रीय उत्तरे देता येत नाहीत, असे प्रश्न निरर्थक आहेत, ते केवळ भ्रामक प्रश्न आहेत. अशा ज्ञानावरच विश्वास ठेवला पाहिजे की जे नैसर्गिक शास्त्रांच्या कठोर पध्दती व्दारा प्राप्त केलेले आहे. अशा रितीने त्यांनी तत्वमीमांसात्मक ज्ञानाचे विशेषत्वाने खंडन केले.

## ३.४ वैज्ञानिक संशोधनाच्या अध्ययन पध्दती आणि त्याचे टिकात्मक परिक्षण

आधूनिक काळातील शोधामागे एक प्रकारची शास्त्रोक्त प्रवृत्ती असलेली दिसून येते. तिचा विकास पध्दतशीरपणे होत आला आहे. विज्ञानाच्या प्रगतीचे मूळ हे याच पध्दतीत आहे. शास्त्रीय संशोधन पध्दतीच्या मागे जी तार्कीक सुसंगती आहे. ती सुध्दा टप्प्याने विकसित झाली आहे. वैज्ञानिक शास्त्रांना चार-पाच शतकांची परंपरा लाभलेली आहे. ऑगस्ट कॉम्त या फ्रेंच तत्ववेत्याचे समाजशास्त्रासारक्या शास्त्राला 'प्रत्यक्षवादी शास्त्र' अशी संज्ञा प्राप्त करून देऊन त्याच्या अभ्यासाच्या विशिष्ठ पध्दतीचा पूरस्कार केला. खऱ्या अर्थाने सामाजिक शास्त्रांना शास्त्र म्हणून प्रतिष्ठा केवळ गेल्या द्विशतकातच प्राप्त झालेली आहे.

सामाजीकरण हा ज्ञान मिळविण्याचा खरा मार्ग असल्याकारणाने नैसर्गिक व सामाजिक या शास्त्रांतर्गत मांडण्यात आलेले सिध्दांन्त सामान्यीकरणाच्या आधारेच मांडले गेले आहेत. उदा. हायड्रोजनचे दोन अणू व ऑक्सीजनचा एक अणू एकत्र आला तर पाणी हा द्रव पदार्थ तयार होतो. सामाजिक शास्त्रांतर्गत वैज्ञानिक संशोधनासाठी विविध विचारवंतानी विविध पध्दतीचा उल्लेख केलेला आहे. यातील काही प्रमुख विचारवंताच्या वैज्ञानिक संशोधनासाठी वापरण्यात येणाऱ्या पध्दतीचा आढावा खालीलप्रमाणे घेता येईल.

### १) क्षेत्र अध्ययन पध्दती (Field study method)

सामाजिक जिवनाच्या विविध क्षेत्रांमध्ये नियोजनाचा अवलंब करावयाचा असेल तर विविध अंगाची वस्तुनिष्ठ माहीती जमविणे अत्यंत आवश्यक झाले आहे. व त्यातून सामाजिक क्षेत्रांतर्गत व्यापक क्षेत्र पाहणी पध्दती अमलात आलेली आहे. या पध्दतीद्वारे सर्वसाधारणत: सामाजिक कल किंवा सामाजिक बदलाची प्रवृत्ती तसेच प्रादेशिक क्षेत्राचे अध्ययन केले जाते.

फेसिंगर आणि काट्झ यांनी क्षेत्रीय अध्ययन पध्दतीबाबत सहा बाबी प्रमुख मान्यल्या आहेत. ज्या अतंर्गत

१) अभ्यासाचे क्षेत्र व त्याचे उद्देश्य निश्चित करणे.
२) प्रारंभिक स्वरुपाची माहीती मिळविण्यासाठी सहभागी निरीक्षण करून माहीती उपलब्ध करणे.
३) संशोधनाची रुपरेषा बनवणे.
४) तथ्य संकलनासाठी प्रश्नावली, मुलाखत तंत्र इ.चा वापर करणे.
५) संशोधन क्षेत्रातंर्गत कूशलतापूर्वक वेगवेगळ्या साधनांचा वापर करून माहीती मिळवणे.
६) मिळविलेल्या माहीतीचे विश्लेषण करणे.

क्षेत्रीय अध्ययनाची व्याप्ती मर्यादीत असली तरी या पध्दतीला सामाजिक संशोधनातर्गत प्राधान्यता दिली जाते. कारण संशोधनाचे निष्कर्ष या पध्दतीचा वापर केल्यामुळे विश्वसनीय व उपयुक्त सिध्द होतात.

### २) प्रयोगात्मक पध्दती (Experimental method) :

प्रयोगात्मक पध्दती ही एक प्रकारची निरीक्षण पध्दती आहे, या पध्दती अंतर्गत एक निश्चित प्रकारचे गृहीतक समोर ठेवून संशोधक निरीक्षण करत असतो, ज्यात केवळ संशोधन क्षेत्रात एका घटकावर प्रयोग करून दुसऱ्या घटकांना स्थिर केले जाते. प्रयोगात्मक पध्दतीच्या माध्यमातून कोणत्याही ज्ञानाला विज्ञानात रुपांतरित करता येते. नैसर्गिक विज्ञानात प्रयोग पध्दतीचाच वापर केला जातो. म्हणूनच मर्फी व न्युकोंब यांनी नमूद केले आहेत की, प्रयोगात्मक पध्दती सर्वोत्तम पध्दती असून ज्याद्वारे तांत्रिक विश्लेषण करणे सेपे होऊ शकते. इ.स. १९३७ मध्ये येल विद्यापीठातील प्रो. जॉर्ज. पि. मरडॉक यांनी भिंतीशिवाय प्रयोगशाळा ही संकल्पना मांडली व याद्वारे प्रयोगात्मक समूह व नियंत्रित समूह यामध्ये तुलना करून अध्ययन करण्यात आले.

### ३) व्यष्टी अध्ययन पध्दती (Case study method) :

सामाजिक शास्त्रातंर्गत ज्या सामाजिक परीस्थीतीतून अध्ययन केले जाते ते साधाणत: परिमाणात्मक (Quantitative) व गुणात्मक (Qualitative) या पध्दतीने केले जाते. समाजशास्त्र सामाजिक संबंधाचा अभ्यास करणारे शास्त्र आहे व सामाजिक संबंध हे बहूतांशी गुणात्मक असतात. या सबंधांना सहजगत्या मापता येत नाही. त्याकरिता या संबंधाच्या मापनाकरिता व्यष्टी अध्ययन पध्दती उपयूक्त ठरते. या पध्दती अंतर्गत विशिष्ट घटकांचे सर्वांगिण अध्ययन केले जाते.

### ४) सामाजिक सर्वेक्षण पध्दती (Social survey method)

सामाजिक सर्वेक्षण पध्दतीचा उपयोग प्राचीन कालखंडापासून होत आला आहे. केवळ आज या पध्दतीला वैज्ञानिक रूप प्राप्त झाले आहे. पी. व्ही. यंग यांच्या मते, सामाजिक सर्वेक्षण

पध्दती हि निश्चित भौगोलिक सीमा प्रदेशात सामाजिक सुधारणेच्या तसेच विकासाच्या हेतूने रचनात्मक योजनांच्या संबंधीत आहे तर मोर्से यांच्या मते, सर्वेक्षण एखाद्या सामाजिक स्थितीच्या, समस्येच्या किंवा लोकसंख्येच्या उद्दीष्टांच्या हेतू साध्य करण्याकरिता एक वैज्ञानिक व व्यवस्थित विश्लेषणाची पध्दती आहे.

**५) सांख्यिकीय पध्दती (Statistical Method)**

सामाजिक जीवनाचा संदर्भात परिणामात्मक तथ्यांचे सांख्यिकीय पध्दतीच्या माध्यमातून सहजरूपाने अध्ययन करता येणे शक्य होते. महत्त्वपूर्ण बाबींना सूत्रांच्या स्वरुपात व्यक्त करण्यात हि पध्दत अत्यंत उपयुक्त ठरली आहे. समाजशास्त्रीय संशोधनात संसोधन सामग्रीला संक्षिप्त स्वरुपात योग्य पध्दतीने मांडण्यास्तव सांख्यीकीय पध्दतीचा वापर केला जातो. या पध्दतीद्वारा एकत्रित केली गेलेली सामग्री गणितावर आधारीत असते. स्मिथ यांच्या मते, सांख्यिकीय पध्दतीचा उपयोग तथ्यांच्या निर्वचनप्रक्रीयेकरीता उपयुक्त ठरतो.

**६) आदर्शप्रकार विश्लेषण पध्दती (Ideal type Analysis method)**

आदर्शप्रकार विश्लेषण पध्दतीद्वारे समाजाच्या गुणात्मक बाबींचे अध्ययन केले जाते. सर्वप्रथम जर्मनीत जॉर्ज सिमेल, मॅक्स वेबर, दरखिम यांनी या पध्दतीचा वापर केला. त्यांच्या मते, सामाजिक शास्त्रामध्ये अमूर्त विचार आहेत व यांच्या अध्ययनाकरिता विशिष्ट प्रकारची पध्दती वापरावयास हवी, जिला त्यांनी आदर्श प्रकार विश्लेषण पध्दती संबोधले.

**७) निगमनात्मक व आगमनात्मक पध्दती (Deductive and Indeductive method)**

निगमनात्मक पध्दती अंतर्गत विभाजनाचे सूत्र प्रामुख्याने उपयोगात आणले जाते. कोणत्याही विषयवस्तूस अध्ययनासाठी घेतल्यास त्याचे सातत्याने विभाजन करीत अशा स्तरापर्यंत पोहचविले जाते की, जेथे विभाजित तत्वाचे त्यापेक्षा जास्त प्रमाणात विभाजन करता येते अशक्यप्राय होते.

आगमनात्मक पध्दती हि अशा प्रकारची पध्दती आहे की, या पध्दती अंतर्गत संशोधन करताना विषय वस्तू सातत्याने जोडली जाते व जोडण्याची परिस्थीती जोपर्यंत अस्तित्वात आहे तोपर्यंत ती जोडली जाते व ही परिस्थीती ज्यावेळेस अशक्य बनते त्यावेळेस या स्थितीवर विषयवस्तूचे अध्ययन केले जाते.

आगमनात्मक व निगमनात्मक पध्दतीचा वापर समाजस्तरीय संशोधनात प्रामुख्याने केला जाताना दिसून येत आहे.

**आपली प्रगती तपासा :-**

१) वैज्ञानिक पध्दतीचा व्याख्या देऊन, त्याच्या महत्त्वाच्या वैशिष्ट्यांची चर्चा करा.

२) सामाजिक शास्त्रांच्या अध्ययनामधील वैज्ञानिक पध्दतीची गरज स्पष्ट करा.

मानवाच्या इतिहासाइतकाच मानवाचा ज्ञान मिळविण्याचा प्रयत्न जुना आहे कारण ज्ञान संपादन करणे ही मानवाची स्वभावप्रवृत्तीचा आहे. साधनांचा वापर करून ज्ञान मिळविण्याचा प्रयत्न ही करीत आहे. हा अभ्यास सामान्य नियमांचे आधारे करून त्यांन नियमांची मांडणीही केली व या नियमांअधारे तो आपले वर्तमानकालीन व भविष्यकालीन जीवन सुसह्य करण्यासाठी प्रयत्न करू लागला. मानवी बुध्दीमत्तेचा व जिज्ञासुवृत्तीचा जसजसा विकास होऊ लागला तसतसे वैज्ञानिक अभ्यास पध्दतीत हळूहळू बदल होऊ लागले. जिज्ञासावृत्ती हीच खरी शोधाची जननी म्हणून ओळखली जाऊ लागली. एखाद्या घटनेची वास्तवता व सत्यता शोधून काढण्यासाठी ज्या क्रमवार पायऱ्यांचा अवलंब केला जातो त्या सर्व पायऱ्यांना मिळून शास्त्रीय अध्ययनाची पध्दत अशी संज्ञा दिली जाते. संशोधन ही एक शास्त्रीय अध्ययन पध्दतीवर क्रमावर पायऱ्या जाणून घेतल्याशिवाय संशोधनाचे स्वरुप स्पष्ट होत नाही. म्हणून शास्त्रीय अध्ययनाच्या क्रमवार पायऱ्या या पुढील प्रमाणे विशद करता येतील.

### १) **समस्या सूत्रण** (Formulation of Problems)

ज्या विषयाचे किंवा घटनेचे अथवा समस्येचे अभ्यासकाला शास्त्रीय पध्दतीने अध्ययन करावयाचे आहे. ह्याविषयाची निश्चित व सुस्पष्ट संकल्पना ही अभ्यासकाच्या मनात असणे अत्यंत आवश्यक आहे. एखादी घटना का घडली ? असा प्रश्न अभ्यासक स्वत:हून जेव्हा विचारतो किंवा एखाद्या घटनेच्या किंवा समस्येचा संदर्भात अभ्यासक जेव्हा प्रश्न उपस्थित करतो तेव्हा त्याला नेमके कशाचे अध्ययन करावयाचे आहे याची निश्चित जाणीव होत असते म्हणून अध्ययनाचे नेमके अध्ययन क्षेत्र निश्चित करणे हा समस्या सूत्रणाचा मूलभूत हेतू असतो.

### २) **निरीक्षण** (observation)

शास्त्रीय अध्ययनांची मूलभूत कसोटी ही निरिक्षण तंत्रावर आधारलेली असते. पाहणे (to look at) आणि निरीक्षण करणे (To observe) या दोन संज्ञा समानार्थी स्वरुपातून शास्त्रीय परिभाषते वापरल्या जात नाहीत. कारणांचा शोध घेण्याऐवजी केवळ मानसिक समाधानांसाठी किंवा मौजेखातर किंवा वेळ व्यतीत करण्यासाठी जेव्हा एखाद्या घटनेचे अवलोकन केले जाते तेव्हा त्यास पाहणे अशी संज्ञा दिली जाते. व अशी पाहण्याची प्रवृत्ती सर्वसामान्य बहुसंख्य लोकात आढळून येते. परंतु तीच घटना जेव्हा कारणमिमांसे संदर्भात अवलोकन केली जाते, तेव्हा त्यात निरीक्षण अशी संज्ञा वापरणे हे शास्त्राच्या दृष्टीने अत्यंत योग्य ठरते. म्हणजेच सहेतूक पध्दतीने म्हणजेच कारण शोधण्याच्या उद्देशातून जेव्हा एखाद्या घटनेचे सुक्ष्म अवलोकन केले जाते. तेव्हा त्यास निरीक्षण अशी संज्ञा वापली जाते. समस्या सुत्रणात अभ्यासकाने जो विषय किंवा जी घटना शास्त्रीय अध्ययनासाठी निवडेलेली असते त्या विषयाच्या संदर्भात आवश्यक ती माहिती गोळा करणे हाच निरीक्षणाचा मूलभू हेतू असतो.

### ३) **वर्गीकरण** (Classificaition)

शास्त्रीय अध्ययनांत फक्त माहिती गोळा करण्यावर भर दिला जात नाही. निरिक्षणाद्वारे जी माहिती गोळा केलेली असेल त्या माहितीचे विशिष्ट गुणधर्मानुसार साम्य व फरक लक्षात घेऊन अनेक रकान्यात त्या माहितीचे विभाजन केले जाते व या माहितीच्या विभाजनाला शास्त्रीय परिभाषते वर्गिकरण म्हणतात.

### ४) **गृहितके** (Hypothesis)

संकलीत केलेल्या माहितीचे वर्गिकरण केल्यानंतर ढोबळ स्वरुपात एखादी घटना अथवा समस्या का घडली असावी या बाबत एक पूर्व अंदाज अभ्यासकाला व्यक्त करता येतो. परंतु हा

अंदाज शास्त्रीयतेवर अधारलेला असतो. घटनेच्या किंवा समस्येच्या संदर्भात निष्कर्षापर्यंत पोहचण्यासाठी गृहितके अभ्यासकाला मार्गदर्शक ठरत असतात.

### ५) **सामान्यीकरण** (**Generalization**)

घटनेच्या किंवा समस्येच्या अथवा अभ्यास विषयाच्या संदर्भात कार्यकारण संबंधाच्या आधारावर अभ्यासक जेव्हा एखादा शास्त्रीय अंदाज व्यक्त करतो त्या अंदाजाचा पडताळा करून एखाद्या शास्त्रीय निष्कर्षाची मांडणी एखाद्या शास्त्रीय विधानात जेव्हा केली जातो तेव्हा त्याना सामान्यीकरण अशी संज्ञा दिली जाते शास्त्रीय अंदाजाचा पडताळा करून पाहणे म्हणजे तो अंदाज फक्त अनेक उदाहरणांना लागू करून परिणाम अभ्यासणे होय.

### ६) **पूर्वकथन किंवा भविष्य कथन**(**Prediction**)

सामान्य स्वरुपाच्या शास्त्रीय विधानाच्या आधारावर समान स्वरुपाची एखादी घटना भविष्य काळात घडण्याची जर दाट शक्यता असेल तर त्या घटनेचे कोणते बरे वाईट परिणाम मानवी जीवनावर होतील याचा अंदाज अगोदरच व्यक्त करणे म्हणजे पूर्वकथन होय, या अंदाजास शास्त्रीयतेचा व माहीतीचा पूरावा प्राप्त झाल्यामुळे तो अंदाज खरा ठरण्याची दाट शक्यता असते. उदा. हवामान खात्याने पुढील २५ किंवा ४८ तासात हवामानात कोणत्या प्रकारचा संभाव्य बद्दल होईल ? कमी दाबाचा हवेचा पट्टा कुठे निर्माण होईल ? वारे कोणत्या दिशेने व कीती वेगाने वाहत जातील ? या बाबत व्यक्त केलेला अंदाज हा अधिक तर्कशुध्द व शास्त्रीय असतो.

वरील विवेचनावरून एखाद्या घटनेचा किंवा समस्येचा शास्त्रीय पध्दतीने अभ्यास करतेवेळी ज्या क्रमवार पायऱ्यांचा अवलंब केला जातो. त्यावरच एखाद्या घटनेची सतत्या किंवा वास्तवता अभ्यासकाला स्पष्ट करता येते. म्हणून शास्त्र हि संकल्पना अभ्यासविषयापेक्षा जास्त अभ्यासपध्दतीवरच अवलंबिलेली असते. मानवा सभोवतालच्या कोणतीही नैसर्गिक अथवा मानवनिर्मित सामाजिक घडामोडींचे अध्ययन हे कोणत्याही अभ्यासकाला शास्त्रीयतेच्या निकषावर जरूर करता येते. शासन ही संकल्पना अभ्यासविषयावर, अभ्यासकावर, निष्कर्षाच्या स्वरुपावर अवलंबिलेली नसून ती शास्त्रीय अध्ययन पध्दतीवरच अवलंबिलेली असते. या संदर्भात काही विचारवंतात मतभेद दिसून येतात व हा मतभेद विशेष करून नैसर्गिक व सामाजिक घडामोडींशी निगडीत आहे. काही विचारवंताच्या मते नैसर्गिक शास्त्राप्रमाणे सामाजिक शास्त्रात प्रायोगिक अभ्यास पध्दतीचा व शास्त्रीय उपकरणांचा अवलंब करता येत नसल्यामुळे सामाजिक घाडामोडींचे अथवा समस्येचे अध्ययन करणाऱ्या विषयांना शास्त्राचा दर्जा देण्यात आला व या सर्व सामाजिक शास्त्रांच्या मूलबूत उद्देश्य हा सामाजिक वास्तवतः (Social Reality) जाणून घेण्यासाठी निगडीत आहे. म्हणून कशाचा अभ्यास केला यापेक्षा अभ्यास कसा केला यावर शास्त्राचे स्वरुप अवलंबिलेले आहे.

पाहिलेल्या घटनांचे पृथःकरण करून, वर्गीकरण करून त्यांचा संदर्भ तपासून त्यामागे असणाऱ्या नियमांच्या दिशेने घडणारा विचारांचा प्रवास म्हणजेच विज्ञान होय.

## ३.४.१ वैज्ञानिक पध्दतीचे टिकात्मक परिक्षण / समिक्षा

जर्मन तत्वज्ञ कार्ल हेम्पेल ‘The Raven parado(1965)’ हा ग्रंथ प्रकाशित केला. त्या ग्रंथात त्यांनी वैज्ञानिक पध्दतीमधील उणिवा काय आहेत दाखवून दिल्या. तसेच फेयरबेंड

या विचारवंत असे म्हणतो की विज्ञान हे अराजकता निर्माण करण्यास कारणीभूत आहे कारण विज्ञानाला त्याची स्वतःचा कथाविषय (Mythology) असतो.

मार्टिन हायडेगर यांचा प्रसिध्द ग्रंथ 'व्हाट इज थिंग'(What is thing) या ग्रंथातून वैज्ञानिक पध्दतीवर टिका करण्यात आली आहे.

सामाजिक विज्ञानात काही शास्त्रज्ञ असे आहेत जे वैज्ञानिक स्वरुपाचे सामाजिक शास्त्रातील स्थान अमान्य करतात. हा दृष्टीकोन वैज्ञानिक पध्दतीचा स्वीकार करीत नसून सामाजिक शास्त्रीय ज्ञानाला व्यवहारिक हिताच्या दृष्टीने उपयोगात आणण्यावर विश्वास ठेवतो. रॉबर्ट लिंड यांनी त्यांच्या 'knowledge for what ?' या ग्रंथात समाजशास्त्रांनी आपल्या ज्ञानाचा वापर सामाजिक निर्मितीसाठी केला पाहिजे, असे नमूद केले. लिंड हे विज्ञानातील आदर्शाला नाकारून मानवी मूल्य (मूल्याभिमुखता) याची समाजविज्ञान अभ्यासविषयात आवश्यकता नमूद करतात. त्याशिवाय सामाजिक वास्तवता जाणणे शक्य नाही. तसेच मानवी मूल्य हे सामाजिक विज्ञानाची दिशा निश्चित करतात. ज्याच्याद्वारे मानव नेहमी संस्कृतीची पूनःनिर्मिती करतो.

सी. राईट मिल्स यांनीही वैज्ञानिक पध्दतीची चिकीत्सा केली असून त्यांनी मानवतावादी दृष्टीकोनाच्या पूरस्कार केला. समाजशास्त्रीय कल्पना एक समाज शास्त्रीय दृष्टी आहे, आमचे जिवन व्यक्तीगत, सामाजिक व ऐतिहासिक या तत्वांशी संबंधीत आहे, असे ते म्हणतात.

पीटर बर्जर एक घटनाशास्त्री अभ्यासक (अमेरिका) समाजशास्त्रज्ञामध्ये मानसिक जिज्ञासेचा गुण आवश्यक असल्याचे नमूद करतात. वस्तू जशी दिसते तशी नसते समाजशास्त्रीय संवेदना, कल्पना यांच्या आधारे समाज व सामाजिक वास्तवता समजणे आवश्यक आहे.

यावरून स्पष्ट आहे की सामाजिक विज्ञानाचे मूल्य-मुक्त वस्तूनिष्ठ, व मूल्ययूक्त, व्यक्तीनीष्ठ (value oriented subjective) असे दोन प्रकारचे दृष्टीकोन आहेत.

नैसर्गिक विज्ञानात मूल्य तटस्थता मूल्यमूक्त विचार स्वीकृत तथ्य आहे तर सामाजिक विज्ञानात विवादास्पद आहे. काही अभ्यासक सामाजिक विज्ञानात मूल्य तटस्थता किंवा मूल्य मुक्तता असली पाहीजे, असे मानतात तर काही अभ्यासक मुक्तता शक्य नाही असे मानतात किंवा हि बाब अयोग्य असल्याचे स्पष्ट करतात.

उल्फ यांच्या मते, घटनेचे प्रत्यक्षदर्शी स्वरुप व्यक्तीगत इच्छा, पूर्वग्रह व प्रचलीत कल्पना यांनी प्रभावित न होता, खरीखुरी वस्तूस्थिती स्वीकारण्याची वृत्ती हाच संशोधनाप्रत पोहचण्याचा मार्ग आहे. म्हणूनच सामाजिक शास्त्रांतील संशोधनातर्गत वस्तूनिष्ठतेची गरज अधिकाधिक वाटते.

**आपली प्रगती तपासा :-**

१) वैज्ञानिक पध्दतीच्यासमिक्षेचे महत्त्वाचे घटक कोणते आहेत स्पष्ट करा.
२) वैज्ञानिक पध्दतीची सामाजिक शास्त्रातील अध्ययना मधील भूमिकेचे टिकात्मक परीक्षण करा.

## ३.५ सामाजिक शास्त्राच्या संशोधनाचे समकालीन दृष्टीकोन

वेगवेगळी सामाजिक शास्त्रे (समाजशास्त्र, राज्यशास्त्र, मानसशास्त्र, अर्थशास्त्र इ) ही आपल्या पध्दतीने संकल्पना मांडीत असतात व ह्या संकस्पनांचे पुन्हा पुन्हा चाचणी घेणे हे सामाजिक शास्त्राचे महत्वाचे काम आहे. कारण समाजात नेहमी परिवर्तन होणे हा समाजाचा स्थायीभाव आहे. स्टूअर्ट चेस यांच्या म्हणण्यानूसार 'अभ्यासाच्या आशयापेक्षाही अभ्यास पध्दतीमुळेच शास्त्र ठरत असते.'

कोणत्याही शास्त्राला ज्याप्रमाणे स्वतःचा स्वतंत्र अभ्यासविषय असतो. त्याचप्रमाणे त्या शास्त्रामध्ये काही विशिष्ट संकल्पना निर्माण झालेल्या असतात. स्लेसिंजर आणि स्टिफेन्सन यांच्या मते ज्ञानाच्या कक्षा विस्तारीत करणे, त्याचे अचूकता तपासणे आणि सिध्दांताच्या मांडणीसाठी किंवा कलेच्या व्यावहारीक उपयोगासाठी हे ज्ञान कितपत उपयोगी पडते, हे पाहण्यासाठी शास्त्रीय पध्दती शोधून काढणे, त्याचे विश्लेषण करणे आणि सामाजिक जीवनाच्या संकल्पना मांडण्याची व्यवस्थीत पध्दत म्हणजे सामाजिक संशोधन होय."

राज्यशास्त्रातील संशोधनाच्या समकालीन दृष्टीकोनांचा विचार करता सामाजिक शास्त्रज्ञांचा संशोधनाचा कल हा संस्थात्मक विश्लेषण, वर्तनवादी दृष्टीकोन, आणि विवेकी निवड सिध्दांत तसेच स्त्रीवादी, मार्क्सवादी, उत्तर-आधुनिकता दृष्टीकोन यांच्या गुणात्मक दृष्टीकोनातून आहे.

### ३.५.१ संस्थात्मक विश्लेषण

विसाव्या शतकाच्या पूर्वाधामध्ये संस्थात्मक विश्लेषणाच्या दृष्टीकोनाला जास्त महत्व प्राप्त झाले होते. संस्थात्मक विश्लेषणाची लोकप्रियता १९५० नंतर वर्तनवाद सिध्दांताच्या उदयामुळे ऱ्हास पावत चालली. संस्थात्मक विश्लेषणामुळे सामाजिक व राजकीय संस्थामधील नियम परंपरा, संकेत अशा गोष्टी ज्या संस्थावादाच्या उदयाला कारणीभूत होत्या, त्याच्यावर यामध्ये प्रकाश टाकण्यात आलेला दिसून येतो. राज्यशास्त्राच्या संशोधनामध्ये संख्यात्मक विश्लेषणाचे महत्व औपचारिक राजकीय संस्थाशी जोडले गेले. उदा. राज्यघटना, कायदेमंडळ, शासकीय यंत्रणा, सामान्यतः तुलनात्मक राज्यशास्त्रामध्ये संशोधक संशोधन करीत असताना

संस्थाचा व संस्थाच्या उदयाचे निर्णयात्मक वेळेचा विचार करतो. संस्थात्मक विश्लेषणाच्या भरभराटीच्या काळात राज्यशास्त्राच्या संशोधनाचा विषय हा राज्याच्या संकल्पनेभोवती फिरत होता; तसेच राज्याच्या अभ्यासामुळे राजकीय संस्थांना प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षरित्या महत्व प्राप्त होते. तसेच शासन हा राज्यसंस्थेचा एक भाग आहे अशी चर्चा होऊ लागली व त्यामुळे राज्यसंस्था ही राज्याचा अविभाज्य भाग बनली.

संशोधनातील संख्यात्मक विश्लेषणांचे महत्व जरी कमी झाले असले तरी, समकालीन संशोधन पद्धतीमध्ये संख्यात्मक विश्लेषणाची वैधता टिकून आहे. कारण वर्तमानातील संस्थात्मक विश्लेषण राजकीय संस्थाकडे फक्त तुलनात्मक दृष्टीने पाहत नाहीत तर व्यापक दृष्टीकोनातून पाहतात. उदा. सत्ता, सत्तेचे अधिग्रहण, राजकीय धारणा आणि वेगवेगळ्या राजकीय कृती, इ.
व्हिव्हियन लॉडन डेस यांनी नवीन संस्थात्मक विश्लेषण हे जुन्या संस्थात्मक विश्लेषणापेक्षा कमी आहे हे स्पष्ट केले.

- जुन्या संकव्पनेतील संस्थेकडून, नवीन संस्थात्मक नियमांवर प्रकाश टाकण्यात आला.
- औपचारिक संस्थेच्या अभ्यासाकडून अनौपचारिक संस्था संकल्पनेकडे वाटचाल.
- संस्थावादातील दूर्लक्षित मूल्यांवर प्रकाश टाकण्याचा प्रयत्न करण्यात आला.
- संस्थेच्या पवित्रत्मकतेच्या दृष्टीकोनातून संस्थेच्या वेगवेगळ्या रचनांकडे लक्ष देण्यात आले.

## ३.५.२ वर्तनवादी दृष्टीकोन

विसाव्या शतकात राज्यशास्त्राला वास्तववादी स्वरुप प्राप्त करुन देण्याचे जे प्रयत्न होत आहेत त्यात वर्तनवादी दृष्टीकोनाचा प्रामुख्याने विचार करावा लागेल, पारंपारिक राज्यशास्त्राच्या अपुरेपणातून निर्माण झालेला हा सिद्धांत आहे. पारंपारिक राज्यशास्त्र राज्य व शासनाच्या अध्ययनावर भर देते. आणि विश्लेषणासाठी तत्वज्ञान, नितिशास्त्र, इतिहास, न्यायशास्त्र यांचा आधार घेते. वर्तनवाद हा सिध्दांत नाही, तो एक अत्यंत महत्वपूर्ण असा अभ्यासविषयक दृष्टीकोन आहे,

पहिल्या महायुध्दकाळात अमेरिकनांनी या पध्दतीचा उच्चार केला असला तरी १९२८ मध्ये फ्रँक केंट याने पॉलिटीकल बिहेव्हियर या पुस्तकात हा सिध्दांत मांडला. हर्बर्ट टिंगस्टन याने १९३७ मध्ये हा विचार पुन्हा मांडला. तरी पण विसाव्या शतकात ग्रॅहम वॅलास व वेंटाले यांनीच या सिध्दांताला खरे स्वरुप प्राप्त करुन दिले. ग्रॅहम वॅलेस म्हणतो की व्यक्तीच्या मानसशास्त्राच्या अभ्यासाशिवाय राजकारणाचा अभ्यास अर्थशून्य आहे. कारण राजकीय घडामोडीत वर्तन अत्यंत महत्वपूर्ण भूमिका बजावत असते त्यामुळे बेंटलेने व्यक्तीचा अभ्यास समुहातील घटक या नात्याने केला.

मेरीयम हा शास्त्रज्ञ सुध्दा असे म्हणाला की, राजकीय वर्तन हाच राज्यशास्त्राच्या अभ्यासातील संशोधनाचा मुख्य विषय बनला पाहिजे. त्यानंतर हेराल्ड लास्वेल, व्ही.ओ.की. डेव्हीड टुमन, हर्बर्ट सिमन, ग्रॅब्रियल अल्मंड या विचारवंतानी राजकारणाच्या अभ्यासाच्या दृष्टीने राजकीय वर्तनवादावर जास्त भर दिला आहे.

दुसऱ्या महायुध्दानंतर मोस्का, मॅक्स वेबर, वॉल कॉट पार्सन यांनी बराच प्रभाव निर्माण करुन हा विचार पुढे आणला. दुसऱ्या महायुध्दाच्या पावशतकात वर्तनवादाचा विचार वेगाने मान्यता पावला आणि तो इतका महत्वाचा आला आहे की वर्तनवादाची जोड दिल्याशिवाय कोणत्याही राजकीय समस्याची सोडवणूक करणे अवघड झाले आहे.

**वर्तनवाद म्हणजे काय ?**

शास्त्रीय संशोधन करीत असताना राज्यशास्त्राच्या अभ्यासासाठी जे.बी. वॅटसन यांनी वर्तनवाद हा शब्द वापरला आहे. संशोधक जे काही स्वतः अनुभवू शकेल, अवलोकन करु शकेल किंवा इतर लोकांनी घेतलेल्या अनुभवाची माहिती तो घेऊ शकेल ह्या सर्व पूरांव्यांच्या आधारावर माणसाच्या राजकारणातील वर्तनविषयी कोणत्या प्रकारची माणसे केव्हा कशी वागतात. या विषयाचे विश्लेषण करणे म्हणजे वर्तनवाद होय. डेव्हीड इस्टन म्हणतो की वर्तनवादी संशोधनाने मनुष्यालाच अभ्यासाचा केंद्रबिंदू मानले आहे. हेन्ल एलू म्हणतो की वर्तनवाद हीच खरी अभ्यासपध्दत आहे. तर रॉबर्ट ढाल म्हणतो की वर्तनवादामुळे राज्यशास्त्राचे खरेखुरे आकलन होते.

**डेव्हीड ईस्टनप्रणीत वर्तनवादाची वैशिष्ट्ये :**

डेव्हीड इस्टन या शास्त्रज्ञाने वर्तनवादाचे खालील वैशिष्ट्ये स्पष्ट केले आहेत.

१) **नियमितता** :- वर्तनवादी असे मानतो की माणसे जेव्हा राजकारणांत भाग घेतात तेव्हा त्यांच्या वागण्यात विशिष्ट असा नियमितपणा असतो. उदा श्रीमंत लोक नेहमीच निवडणुकीत उजव्या विचारांच्या पक्षांना आपले मते देतात. हा सिध्दांतच आहे. वर्तनवाद्यांच्या मते वर्तनातील नियमितपणा किंवा सारखेपणा शोधून एक सर्वमान्य सिध्दांत शोधून कोणती माणसे कशी वागतील याचे निश्चित अनुमान सहज काढता येतील.

२) **निष्कर्षाचा पडताळा :-** राज्यशास्त्रातील संशोधकाने पूरावे गोळा करुन जे निष्कर्ष काढले आहेत ते खरे आहेत की खोटे हे तपासून पाहिले पाहिजे. दुसऱ्या संशोधकाला दुसऱ्या ठिकाणी त्याच क्षेत्रात त्याचा पडताळा घेता आला पाहीजे.

३) **संशोधनाच्या पध्दती आणि तंत्र :-** वर्तनवादी संशोधकांनी संशोधनाच्या अनेक रिती व तंत्रे शोधली आहेत. नमुना निवडण्याच्या अनेक रिती संशोधक शोधीत असतात. निःपक्षपातीपणे संशोधन करता यावे म्हणून नमुना पाहणी, सर्वेक्षण, मुलाखती घेणे ही नवी तंत्रे शोधून काढली आहेत. त्यामुळे मूल्य बाजूला ठेवून त्याचबरोबर असलेल्या माहितीच्या आधारे मूल्यनिरपेक्ष दृष्टीकोन स्वीकारु शकतो.

४) **शास्त्र शुध्दता :-** भौतिकशास्त्रात दोन प्रकारची शास्त्रे आहेत असे मानले जाते. एक शुध्द शास्त्र व एक व्यवहारीक शास्त्र शुध्द शास्त्रात टिकाऊ स्वरुपाचे सिध्दांत मांडले जातात. ते कोणत्याही काळात तसेच लागू पडतात. ते मूलभूत असतात व्यवहारीक शास्त्रात या मूलभूत सिध्दांताच्या आधारे उपयुक्त संशोधन केले जाते. वर्तमानकाळातील प्रश्न व सामाजिक समस्या सोडवण्यासाठी मूलभूत तत्वांचा आधार घेऊन वर्तनवादी संशोधक या पध्दतीचा आधार घेतात.

५) **मूल्यनिरपेक्षता :-** वर्तनवादी लोकांच्या मते निष्कर्ष हे नेहमी सत्याच्या आधारावर काढले पाहिजेत. त्यात मूल्यांचा प्रश्न आणता कामा नये. मूल्ये ही आत्मनिष्ट असतात. संशोधन हे

वस्तूनिष्ट असायला पाहिजे. योग्य काय आणि अयोग्य काय याबाबत संशोधकांनी मत देऊ नये तर प्रत्यक्ष काय आहे. याचाच विचार करावा.

६) **व्यवस्थितपणा :-** संशोधकाने सर्वमान्य असलेल्या संशोधन पद्धतीचा अवलंब करावा व त्यावर त्याचे संशोधन अवलंबून असावे. एका गृहीत तत्वावर एखादी गोष्ट खरी ठरली तरी ती दुसऱ्या गृहीतावर त्याने पडताळून पाहावी व सिध्दांताची मांडणी करावी. व्यवस्थित व पध्दतशीर संशोधन झाले तर भौतिकशास्त्रातील स्वरुपाचे सिध्दांत राज्यशास्त्रात मांडता येतील.

७) **विशुध्दशास्त्र :-** हा दृष्टीकोन असे स्पष्ट करतो की सिध्दांत आणि सिध्दांताचा व्यवहारिक उपयोग यांचा परस्पर संबंध आहे. व्यक्तीच्या वर्तनाचा जेव्हा शास्त्रशुध्द विचार होतो तेव्हा व्यवहारिक उपयोग करण्याची शक्ती ह्यातून निर्माण होते. म्हणून मनुष्याच्या वर्तनाच्या शास्त्रसुध्द अभ्यासाला प्राधान्य दिले पाहीजे.

८) **आंतरराष्ट्रीय संबंध :-** राज्यशास्त्राला विशुध्द शास्त्राचा दर्जा प्राप्त करायचा असेलतर त्यासाठी अन्य सामाजिक शास्त्रांचा जास्तीत जास्त उपयोग अभ्यासकांनी करावा.
थोडक्यात असे म्हणता येईल की वर्तनवादी दृष्टीकोन व्यक्ती आणि गटाच्या वर्तनाचा अभ्यास करतो. केवळ सत्याचे आकलन करीत नाही तर सिध्दांत आणि संशोधन यात परस्परावलंबित्व निर्माण करतो. वस्तुनिष्ठ सिध्दांताची मांडणी करून शास्त्रशुध्द संशोधन पध्दतीवर तो भर देतो.

**आपली प्रगती तपासा :**

१) राजकीय सिध्दांताच्या अभ्यासामध्ये वर्तनवादी दृष्टीकोनाचे महत्त्व विशद करा.
२) वर्तनवादी दृष्टीकोनाचे राजकीय सिध्दांताच्या दृष्टीकोनातून सुक्ष्मपणे परीक्षण करा.

## ३.५.३ विवेकी निवड सिध्दांत

विवेकी निवड सिध्दांत हा आजच्या काळात राज्याशास्त्राच्या संशोधनात महत्त्वपूर्ण भूमिका बजावत आहे. विवेकी निवड सिध्दांतानुसार संशोधकांना मानवी वर्तनाचे अभ्यास करणे शक्य झाले आहे. सामान्यतः लोक विवेकी निवड सिध्दांतानुसार मत बनवतात जेणेकरून त्याच्या हिताचे अधिकाधिक सरंक्षण होईल आणि विवेकी निवड सिध्दांत हा याच गृहीतकावर अवलंबून आहे. सामान्यतः या सिध्दांताचा उपयोग अर्थशास्त्रीय संशोधनामध्ये जास्तीत जास्त उपयोगिता तपासण्यासाठी करण्यात येतो. राज्यशास्त्रांमध्ये हा दृष्टीकोन १९६० मध्ये उदयास आला, ह्याचे कारण म्हणजे वर्तनवादाला उत्तर होणे.

राज्यशास्त्रामध्ये विवेकी निवड सिध्दांताचा उपयोग हा राजकीय संस्थांच्या आव्हानांना जनता कशी प्रतिसाद देते याचे संशोधन करण्यासाठी उपयोगात येते.

विवेकी निवड सिध्दांन्त हा समकालीन परीस्थितीत वर्तनवादाच्या सिध्दांतापेक्षा संस्थात्मक दृष्टीकोनाच्या जास्त जवळ आहे.

केनेथ ए. शेसल्स याने विवेकी निवड सिध्दांताला वर्तनवादाला वेगळे केले आहे.

रॉय टर्नर यांच्या मते खालील पैकी वैशिष्टे हे विवेकी निवड सिद्धांतात महत्त्वाची भूमिका बजावतात.

- लोक हे निश्चयी आणि ध्येयाधारीत असतात.
- लोक त्यांच्या निकडीला प्रथम प्राधान्य देतात.
- लोक हे त्यांचे आवश्यक प्राधान्य व एखादी गोष्टीची उपयोगीता याचा सारासार विचार करून निर्णय घेतात.
- राजकीय वर्तन हे सामाजिक वर्तनाचा दूसरा भाग आहे. ज्यामध्ये लोक आधीकाधिक वैयक्तीक उपयोगीतेचा विचार करतात.

## ३.५.४ स्त्रीवादी दृष्टीकोन

**स्त्रीवादी दृष्टीकोणाचा विकास किंवा उक्रांती :-**

एक राजकीय शक्ती किंवा राजकीय चळवळ म्हणून स्त्रीवादी दृष्टीकोन तीन टप्प्यामध्ये विकसित झाल्याचे दिसून येते.

१) १९ वे शतक आणि २० व्या शतकाच्या सुरुवातीला स्त्रीयांचे मतदानविषयक हक्क याविषयीची चळवळ हा पहीला टप्पा होय.
२) दुसरा टप्पा म्हणजे स्त्रियांना सामाजिक आणि कायदेविषयक समानता द्यावी या स्वरुपातील होय. १९६० नंतर या टप्प्याची सुरुवाती झाली. उदा. कायद्याद्वारे लिंगभेद नष्ट करण्यात यावा. कामाच्या ठिकाणी स्त्रीयांना संधी द्यावी इत्यादी.
३) लैंगिक शोषनाचा प्रश्न यासंबधीत साधारणपणे १९९० नंतर या टप्प्याला सुरुवात झाली.

अशा प्रकारे स्त्रीवादी दृष्टीकोन विकसित झाला असला तरी दृष्टीकोनाच्या बाबतीत विविध मतप्रणाली दिसून येतात.

**स्त्रीवादी दृष्टीकोनासंबंधी विविध मतप्रणाली :**

१७८९ च्या फ्रेंच राज्यक्रांतीनंतर समता, स्वातंत्र्य, बंधुता, न्याय या संकल्पनांना संपूर्ण जगात महत्त्व प्राप्त झाले. त्यातूनच स्त्री, पुरूष समानात, स्त्रीमुक्ती, स्त्रीशक्तीला चालना देणे, स्त्रीयांना समान हक्क देणे या मुद्यांनाही महत्त्व आले. अर्थात याबाबतीत विविध मतप्रणाली अस्तीत्वात आल्या. ह्या मतप्रणाली (different school of thought)

१) उदारमतवादी स्त्रीवादी दृष्टीकोन
२) मार्क्सचा स्त्रीवादी दृष्टीकोन
३) समाजवाद्यांचा स्त्रीवादी दृष्टीकोन

४) जहाल विचारवाद्यांचा स्त्रीवादी दृष्टीकोन
५) सांस्कृतिक स्त्रीवाद
६) पर्यावरणवादी स्त्रीवाद

स्त्रीवीदी सिध्दांताचे हे मुख्य प्रतिपादन आहे की, समाजात 'लिगंभावा'च्या सत्तेचा मोठ्या प्रमाणात अवलंब केला जातो. सत्ता संकल्पनेच्या विश्लेषणात या दृष्टीकोनास 'लिंगभावात्मक' परिप्रेक्ष्य (Gender perspectie) ही संज्ञा वापरली जाते. हा सिध्दांत 'पुरषसत्ते' स (Patriarely) समाजव्यवस्थेचे प्रमुख लक्षण मानतो. पूरुषप्रधान व्यवस्थेविरूध्द उठवलेला हा विद्रोही आवाज आहे. या अंतभूत विचारास न्यायार्क रोड स्टॉकिंग्स घोषणापत्र – १९६९ या घोषणापत्रात सशक्तपणे अभिव्यक्त केले आहे.

'स्त्री हा एक शोषित वर्ग आहे. आमचे शोषण सर्वव्यापी असून आमच्या जीवनाच्या प्रत्येक आयामास प्रभावित करते.'

पुरुष हेच आमच्या शोषणाचे मूल स्त्रोत होत असे आम्ही मानतो. समकालीन संदर्भात १९७० च्या दशकात स्त्रीवादी आंदोलनाच्या प्रारंभ झाला, परंतु स्त्री-पुरुष संबंधविषयक विवाद अनादी काळापासून सुरु असलेला दिसून येतो. प्राचिन ग्रीक तत्वज्ञ प्लेटोने पालक वर्गातील स्त्री-पुरूष समतेचा स्वीकार करताना स्त्रियांच्या दुर्बलतेवर जोर देऊन त्यांना गुलामाचाच दर्जा बहाल केला. काहीही असले तरी, प्राचीन काळ वा मध्ययुगात स्त्रीयांच्या दयनिय स्थीतीविरूध्द कोणत्याही आंदोलनाचे संकेत मिळत नाही. स्त्रीवादी आंदोलनचे संकेत अठराव्या आणि एकोणीसाव्या शतकांतील युरोपिय चिंतनात शोधता येतात.

उदारमतवादी परंपरेतील मेरी वोल्स्टन क्राफ्ट (१७५९-९७) यांच्या 'विंडिकेशन ऑफ दी राईटस ऑफ वूमेन' (१७९३) या ग्रंथात स्त्रीयांना कायदा, राजकारण आणि शैक्षणिक क्षेत्रात समानता प्रदान करण्यासठी मर्मग्राही यूक्तीवाद करण्यात आला आहे. विशेषतः वोल्स्टन क्रॉफ्ट यांनी स्त्री-पुरूषांसाठी असणाऱ्या भिन्नभिन्न सद्दगुणांविषयीच्या प्रचलीत धारणांना आव्हान देत सामाजिक जिवनात स्त्री-पुरुषांसाठी समान परिस्थीती आणि भूमिकेची मागणी केली. पुढे जॉन स्टुअर्ट मिल (१८०६-७३) ने आपल्या 'सब्जेकशन ऑफ विमेन' (१८६९) या महत्त्वपूर्ण ग्रंथात असा यूक्तीवाद केला की, स्त्री पुरुष संबंध मर्जीवर आधारीत असले पाहीजेत, प्रभूत्वावर नाही. मिलने विवाहविषयक कायदे आणि स्त्रीमताधिकारावर विशेष भर देत सुयोग्य आणि प्रतिभावंत स्त्रीयांना समान संधी प्रदान करण्याची शिफारस केली.

**स्त्रीवादातील प्रमुख प्रवाह**

व्यापक स्तरावर स्त्रीवादी आंदोलनात अनेक प्रकारचे विचारआणि कार्यक्रम प्रस्तुत करण्यात आले. त्यापैकी प्रमूख तीन विचार प्रवाहांचा खालीलप्रमाणे आढावा घेता येईल.

**१) उदारमतवादी प्रवाह**

स्त्री-अधिकारांच्या पुनरूत्थनासाठी नव्या संघर्षाचा आरंभ करणे हे या प्रवाहाचे मुख्य उद्दीष्ट होय. याअंतर्गत स्त्रीयांना संधीची निरपवाद समता प्रदान करण्यावर आणि लैंगिकतेवर आधारीत भेदभावाचे समुळ उच्चाटन करण्यावर भर दिला जातो. समान कामास स्त्री व पुरुष दोघांना समान वेतन, गर्भपात कायद्यात सुधारणा इ. चा प्रवाहाने

मांडलेले कार्यक्रम आहेत. हा स्त्रीवादी चळवळीतील सर्वात लोकप्रिय गट आहे, परंतु यास तितका प्रभावशाली गट मानला जात नाही.

**२) जहाल स्त्रीवादी प्रवाह : (Radical stream)**

या प्रवाहात शुलामिथ फायरमेनसारख्या जहाल स्त्रीवादी विदूषीने असा तर्क मांडला की, वर्तमान स्थितीत फुटकळ स्वरुपाच्या सुधारणांच्या आधारे स्त्रीयांवर होणाऱ्या अत्याचारांच्या मुळाशी जाता येत नाही. आर्थिक परिवर्तन वा आर्थिक सत्तेने देखिल स्त्रीयांना फारसा लाभ होणार नाही. सर्व इतिहास हा स्त्रीयांवरील पुरूषी अत्याचारांचा इतिहास आहे, हे पूरषसत्ताक व्यवस्थेचे जिवंत उदाहरण आहे. याचा अर्थ असा की स्त्री पुरूषातील शारिरीक भेदास जीवशास्त्रीय तथ्य मानून स्त्रीला संतती जन्मास घालमारे आणि त्याचे पालन पोषण करणारे यंत्र मानले जाते, परंतु सामाजिक जीवनातील स्त्री पुरूषांच्या अशा या भिन्न भिन्न भूमिकांचा कोणताही जीवशास्त्रीय आधार आढळत नाही.

**३) समाजवादी प्रवाह (Soccialist stream)**

इंग्लीश विचारवंत शीला रोबाथम या प्रवाहाच्या प्रतिनिधी होत. हा प्रवाह जहाल स्त्रीवादीप्रणीत पुरुषसंस्थेचे विश्लेषण आणि मार्क्सवादी वर्गमिमांसा यांचा समन्वय साधण्याचा प्रयत्न करतो. याचा असा दावा आहे की, स्त्रीयांच्या परावशतेची सर्व कारणे परस्परांशी निगडीत आहेत. याचे एक कारण जीवशास्त्रीय आहे, जे अनादी काळापासून चालत आले आहे. दूसरे कारण म्हणजे, आर्थिक दृष्ट्या पुरूषप्रधान व्यवस्था ज्यात पुरुषाला खाजगी संपत्तीचा स्वामी मानले जाते, एवढेच नव्हे तर स्त्रीलादेखील संपत्तीच्या रुपात पाहीले जाते. तिसरे कारण म्हणजे, भांडवलशाही व्यवस्था ज्यात स्त्रीला श्रमाचा मूल स्त्रोत मानून तिचे शोषण केले जाते.

**टिकात्मक मुल्यमापन**

स्त्रीवादाने स्त्रीयांवर युगानुयुगे होणाऱ्या अन्याय आणि अत्याचाराकडे लक्ष वेधून या अन्यायाला निराकरणाचा मार्ग दाखविला, परंतु जेव्हा स्त्रीमुक्तीच्या नावाखाली स्त्री-पुरुष संघर्षाचा मुद्दा उठवला जातो तेव्हा स्त्रीपुरुषांचे परस्परांविषयीचे बंध नष्ट होऊ लागतात. अशा स्थितीत पुरुषांना आपल्याकडे आकर्षित करण्यासाठी स्त्रीयामध्ये जेव्हा स्पर्धा सुरू होते तेव्हा ती खुद्द स्त्रीयांनांच हानीकारक ठरते. स्त्रीवादाचा हा दावा खरा आहे की, स्त्रीयांना दुर्बळ, अबला समजले जाऊ नये. परंतु समाजात या बाबतीतच स्त्रीयांचा आत्मसन्मान आहे की तिला ममता, प्रेरणा आणि शक्तीचा अनंत स्त्रोत मानला जावा. सभ्य समाजात असे मानले देखिल जाते.

## ३.५.५ मार्क्सवादी दृष्टीकोन (Marxist Approach)

मार्क्सवादी विचारवंत राजकारणाला मानवी जिवनाची मूलभूत अथवा स्वायत्त कृती मानत नाहीत. त्यांच्या मते, कोणत्याही देशाचे आणि युगाचे राजकारण तेथील अर्थव्यवस्थेशी अत्यंत जवळून जोडले गेलेले असते, राजकारणासंबंधी मार्क्सवादी विश्लेषण तीन गृहीतकांवर आधारीत आहे.

१) समाजातील सदस्य सुट्या सुट्या व्यक्तींच्या रुपात आपले हित साधण्यासाठी नागरी समाजाचे संघटन करतात. अशा प्रकारे नागरी समाज हे व्यक्तीच्या स्वहित साधानाचे क्षेत्र आहे. नागरी जिवन हेच समाजातील सदस्यांना परस्परांशी जोडणारे सुत्र आहे, राजकीय

जिवन नव्हे. जर आपण राजकारणावर आले लक्ष केंद्रीत केले तर आपण समाजातील अंतविरोधांकडे लक्ष देऊ शकणार नाही. आणि वर्गसंघर्षाचे अस्तित्वाला जाणू शकणार नाही.

२) सामाजिक जिवनाच्या संरचनेअंतर्गत पाया आणि इमला या भेद करणे गरजेचे आहे. समाजाची आर्थिक सरंचना हा त्याचा आधार व पाया आहे. आणि कायदेशीर अथवा राजकीय संरचना ही त्याची अधिरचना व वरची संरचना आहे. सामाजिक उत्पादनाच्यी प्रक्रियेत मनुष्य अशा संबंधानी बद्ध होतो की ति त्यांच्या इच्छाकड्चे व अनिवार्य असते. हे संबंध त्याच्या भौतिक उत्पादनशक्तीच्या विकासाच्या निश्चित अवस्थेनुरूप प्रस्थापित होत असतात. उत्पादनाचे एकंदर संबंध म्हणजे समाजाची आर्थिक संरचना होय आणि त्यावर कायदेशीर आणि राजकीय अधिरचना उभा राहते. त्याला अनुसरुन सामाजिक जाणिव निश्चित रूप धारण करते. दुसऱ्या शब्दात पायाचे स्वरूपच अधिरचेनेच स्वरुप निश्चित करीत असते. आणि पायाच्या स्वरुपात काही बदल झाल्यास अधिरचनेचे स्वरुप देखील बदलते. उत्पादन शक्तीच्या विकासाबरोबरच समाजाचे वर्गचरित्र्य देखिल बदलते. अशा प्रकारे सरंजामशाही समाज आणि भांडवली समाज यांच्या राजकारणात मूलभूत फरक आढळतो. भिन्न-भिन्न शासन व्यवस्थातील वरवरच्या फरकामुळे आपली दिशाभूल होता कामा नये. आपल्याला त्यांच्या वर्गचारित्र्यानुसार त्यांची तुलना अथवा त्यांच्यात भेद केला पाहीजे. मार्क्सने तत्कालीन शासन व्यवस्थेचे उदा. घेताना लिहीले आहे की उत्तर अमेरीका आणि प्रशियाचे कायदे राज्य एकाच प्रकारच्या संपत्तीच्या प्रभुत्वावर आधारित आहेत. यामुळे त्यांना एकाच श्रेणीत ठेवले पाहिजे. जरी अमेरीका गणराज्य आणि प्रशिया राजेशाही असली तरी.

३) याशिवाय मार्क्स आणि ऐगेल्स यांनी राजकारणाला क्रांतीकारक कार्यक्रमाच्या मार्गदर्शक रुपातदेखील पाहिले. त्यांनी लिहिले आहे की भांडवलशाही व्यवस्थेअंतर्गत मजुरी पध्दती कामगारांच्या परस्पर स्पर्धेवर आधारीत आहे. आणि त्यांच्या शोषणाचे मुळ कारण आहे त्यामुळे कामागार वर्गाने आपल्या शोषण करणाऱ्या भांडवलदार वर्गाचा मुकाबला करण्यासाठी आपले क्रांतीकारी संघटन बनविली पाहीजे.

एका बाजूला उदारमतवादी राजकीय अर्थशास्त्रास हे स्विकारले की, मानवी स्वभाव नेहमीच काही सर्वसाधारण नियमांनी बध्द दिसतो. तर मार्क्सवादी राजकीय अर्थशास्त्राचे समर्थक त्याला एक तिहारीक शास्त्र मानतात. कारण त्यांच्या मते, संपूर्ण ऐतिहासिक युगासाठी एकसारखे नियम शोधता येत नाहीत. त्यामुळे मार्क्सवादी विश्लेषणात मुख्यतः पुढील उद्दीष्ट्ये मानली जातात.

### १) सामाजिक रचना (Social formations)

अर्थात समाजव्यवस्थेच्या भिन्न-भिन्न व रुपांचे वर्गिकरण उदा. सरंजामशाही समाज, भांडवलशाही समाज, समाजवादी समाज इत्यादी.

### २) काळनिश्चिती (Periodization)

यात राजकीय पक्ष, दबावगट आणि अभिजन यांचा जो अभ्यास प्रस्तुत केला आहे. त्यातदेखील ऐतिहासिक वर्णनात्मक शैली वापरली गेली आहे. आधुनिक सामाजिक संशोधनाच्या पध्दतीचा फारसा आधार घेतलेला नाही. या दृष्टीकोनाने अर्थव्यवस्था आणि राजकारण यांच्या परस्परसंबंधाबाबत संशोधकांमध्ये विशेष रूची निर्माण केली आहे.

**निष्कर्ष :**

राजकीय विश्लेषणाच्या आगमनामुळे राजकारणाच्या शास्त्रीय अध्यनात पुरेशी प्रगती झाली आहे. यामुळे शास्त्रीय तथ्य तसेच माहीती (Data) संकलनाच्या आणि त्यांचे स्पष्टीकरण करण्याच्या अनेक नव्या शक्यता पुढे आल्या आहेत. राजकीय विश्लेषणाच्या संबंध वास्तव राजाकारणाशी आहे त्यामुळे ते व्यावहारीक आणि विश्वासू परिणाम मिळविण्याची आशा जागवते. राजकीय विश्लेषणाची जी प्रारुपे अमेरीकन राज्यशास्त्रज्ञांनी विकसित केली आहेत ती सर्व पाश्चात्य उदारमतवादी लोकशाही व्यवस्थांच्या विश्लेषनासाठी उपयुक्त आहेत. विकसनशील देशांसाठी यात असा गर्भित संदेश आहे की, त्यांना आपला राजकीय विकास साधण्यासाठी अशाच सरंचना निर्माण कराव्या लागतील, त्यामुळे याअंतर्गत उदारमतवादी लोकशाहीच्या बाजून वैचारिक पूर्वगृह अध्यायत आहे.

मार्क्सवादी विश्लेषण, वास्तविकतः राजकीय विश्लेषणाच्या मुख्य प्रवाहात मोडत नाही. ते दुसऱ्या विचारप्रणालीवर आधारीत आहे. त्यामुळे त्याचे निष्कर्ष उदारमतवादी राजकीय विश्लेषणाच्या निष्कर्षाबरोबर जोडले जाऊ शकत नाहीत. साम्यवादी देशात जन सहभागाचे जे प्रारूप विकसित झाले आहे, ते उदारमतवादी राजकीय विश्लेषणाच्या कोणत्याही प्रारुपाशी मेळ खात नाही.

## ३.५.६ उत्तर आधुनिक दृष्टिकोन

मराठीमध्ये 'अधूनिक' हा शब्द वापरला जातो, परंतु त्याच्यामागे असणारा मुळ संस्कृत 'अधूना' हा शब्द मात्र गायब झालेला आहे. 'अधुना' म्हणज आता 'हल्ली' आताच्या काळी या क्षणी.

उत्तर अधूनिकतेची स्थिती आधूनिकतेपेक्षा खरोखरीच वेगळी आहे का, का तिला आधूनिकतेचीच एक स्थिती मानावी ? उत्तर-आधूनिकता हि वेगळी स्थिती आहे असे मानले तरी ती मुलतः सांस्कृतिक स्थिती आहे की आर्थिक स्थितीचा परिपाक आहे? आधूनिकता आणि उत्तर आधूनिकता यांची 'संभाषिते' (discourses) वेगवेगळी आहेत का? या प्रश्नांविषयी विचारवंतामध्ये मतभेद आहेत. फ्रेंच विचारवंत झाँ ल्योतार याचे म्हणणे असे आहे की विशिष्ठ प्रकारच्या सांस्कृतिक कथनांचा वा महाकथनांचा ऱ्हास होणे, हे उत्तर अधूनिकतेचे मुख्य लक्ष्य आहे. अमेरीकी मार्क्सवादी विचारवंत फ्रेंडरीक जेमसन याने आर्थिक सास्कृंतिक अवस्था म्हणून उत्तर आधूनिकतेच्या विचार केला आहे. उत्तर अधूनिकता हि विकसित पाश्चात्य भांडवलशाहीची १९६० नंतरची अवस्था आहे. असे जेमसन यांचे म्हणणे आहे. याउलट जर्मन विचारवंत हाबरमास याने आधूनिकेतेला एक अपूर्ण प्रकल्प मानून उत्तर आधूनिकतेचे विश्लेषण केले आहे.

**झां फ्रान्सुआ ल्योतार :**

झां-फ्रान्सुआ ल्योतार (१९२५-१९९८) यांचा The postmodern Condition : A report on knowledge हा ग्रंथ प्रथम फ्रेंचमध्ये १९७९ मध्ये प्रसिध्द झाला. तत्त्वज्ञान, राज्यशास्त्र, सामाजिक विज्ञान यांच्या संदर्भात 'postmodern' ही संज्ञा प्रचलीत करण्याचे आणि आधूनिकतेचे विश्लेषण करून उत्तर-आधूनिकतावादाची व्यापक मांडणी करण्याचे श्रेय त्याच्याकडे जाते. समकालीन पाश्चात्य संस्कृति आज उत्तरआधूनिकतेच्या अवस्थेत आहे, असे

त्याचे म्हणणे आहे. कोणत्याही व्यवहार साकार करणारे 'संस्कृती सापेक्ष' व इतिहाससापेक्ष कथन हे त्याच्या विचारचौकटीमधील पहले तत्व आहे. तर या कथनाच्या समर्थनार्थ येणारे 'अतिकथन' हे दूसरे तत्व आहे. या दोन तत्त्वाच्या साहयाने तो आधूनिक ज्ञानव्यवस्थांचे विश्लेषण करतो व त्यातून निर्माण झालेला संकटकालीन परिस्थितीचे, म्हणजे उत्तर-आधूनिकवादी परिस्थीतीचे आकलन करतो.

खरे म्हणजे पाश्चात्य संस्कृतीने इतर जगावर जो सांस्कृतिक वसाहतवाद लादला त्याचेच हे उत्तम उदाहरण आहे कारण त्याच्या आधारे इतर संभाषिंतापेक्षा म्हणजेच पूर्व आधुनिक पारंपारिक संभाषितांपेक्षा, नव्या विज्ञानाचे संभाषित श्रेष्ठ आहे, असे सिध्द करणे प्रबोधनला शक्य झाले. खरे म्हणजे पारंपारिक संभाषितामध्ये जे ओळखता येण्यासारखे आवाज होते, ते नष्ट केल्याने बोलणाऱ्या व्यक्तीने स्वत्व (Identity) आणि त्या व्यक्तीचा अधिकार (authority) आधूनिक संभाषिताला नव्याने घडवावा लागतो. म्हणजेच स्वसमर्थनार्थ नवी, अधिकाधिक सार्वजनिक अशा स्वरुपाची अतिसंभाषिते किंवा अतिकथने निर्माण करावी लागेल.

तेव्हा ल्योतार यांच्या विचारचौकटीला दूसरा घटक म्हणजे या संभाषित्मक व्यवहाराच्या किंवा कथनाच्या समर्थनार्थ उभा राहिलेले अति-संभाषित आणि अतिकथन (meta narative) हे संभाषित दोन प्रकारचे असते. एक म्हणजे राजकीय समर्थन वा वैधीकरण समर्थनाचे वा वैधीकरणाचे दूसऱ्या प्रकारचे संभाषित म्हणजे ऐतिहासिक कथनाला वैश्विक, सावत्रिक स्वरुप देणारे तत्त्वज्ञानात्मक समर्थक वा वैधीकरण.

ल्योतार यांनी केलेल्या आधूनिकतेच्या विश्लेषणानुसार आधूनिकतेचा सर्वात महत्त्वाच्या ज्ञानशास्त्रीय अविष्कार म्हणजे प्रबोधनाची चळवळ होय. या प्रबोधनाच्या चलवळीने आमसमर्थनार्थ काही महाकथने (ground nanrative) तयार केली. ज्ञान आणि स्वातंत्र्य या मुल्यांचा विकास झाला, याचा इतिहास सांगणारे कथन म्हणते प्रबोधन अधूनिकतेमागे दोन प्रमुखे महाकथने आहेत. त्यातले एक म्हणजे हेगलचे कथन होय. विश्वचैतन्याला स्वतःचे ज्ञान कसे होत जाते, याची दृद्वांत्मक मांडणी हेगलच्या या महाकथनात येते. आधूनिकतेचे दूसरे महाकथन म्हणजे वर्गसंघर्षाच्या प्रक्रीयेमधून मानवाच्या उत्पादन सामर्थ्याचा विकास कसा झाला आणि त्याचा उत्कर्ष श्रमिकवर्गाच्या क्रांतिमध्ये कसा होते, हे सांगणारे मार्क्सचे महाकथन होय.

ल्योतार याच्या मते उत्तर अधूनिकता हि एक सांस्कृतिक अवस्था वा स्थिती असून महाकथने वा अतिकथने ही कोसळून पडते हेच तिथे मुख्य वैशिष्ट आहे. संस्कृती ही बहूविध स्वरूपाच्या लगुकथनांच्या गोधडीतूनच साकार होत असते. तिच्या पलिकडे जाऊन संस्कृतिला वैध ठरवेल असे कोणतेही महाकथन असूच शकत नाही. कारण संस्कृतीपलीकडे इतिहासापलिकडे जाणारे, अतित, निरपेक्ष असे संभाषित वा भाषिक खेळ हि गोष्टच अशक्यप्राय आहे.

ल्योतार यांच्या भूमिकेमध्ये दोन पातळ्यावर मलूभूत विसंगती दिसते, हे येथे लक्षात घेतले पाहिजे. एक म्हणजे महाकथन हे मुळातच अशक्य असते, असे म्हणणे हेच एक महाकथन आहे. वास्तव हे मूलतः एकसत्वरूप असते, असे म्हणणे हे जेवढे महाकथनात्मक आहे. तेवढेच वास्तव हे बहूविध, बहूजिनसी असते. हेही महाकथानात्मकच आहे. वास्तव हे संस्कृतिनिरपेक्ष, इतिहासनिरपेक्ष असे महाकथनच आहे. दुसरे म्हणजे उत्तर अधूनिकतेला ल्योतार यांनी वरवर

पाहता एक ऐतिहासिक कालखंड म्हणून प्रस्थापित केले असले, तरी या कालखंडाची स्वतःची महाकथानके आहेत हे लक्षात घेतले नाही. उदाहरणार्थ, जागतिकीकरण, बाहूसांस्कृतिकता (Multicultralism) ही उत्तर-आधूनिकतेची महाकथने आहेत आणि तिही मुळात संस्कृतीसापेक्ष, इतिहाससापेक्ष, विशिष्ट प्रकारचा आर्थिक साम्राज्यवाद जगाव लादण्यासाठी तयार केलेली कथनेच आहेत. हेही ल्योतार यांनी ध्यानात घेतलेले नाहीत.

फ्रेडरिक जेमसन (जन्म १९३४) याच्या उत्तर आधूनिकवादच्या विश्लेषणामध्ये संस्कृती ही आर्थिक पायामुळे निर्धारीत होत असते. ही मार्क्सची भूमिका ग्राह्य धरलेली आहे. मात्र जेमसन यांची संदर्भचौकट परंपरागत मार्क्सवादी चौकटीपेक्षा अधिक व्यापक स्वरुपाची आहे. साहित्याची संहिता हि तीन प्रकारच्या ऐतिहासिक संरचनामधून निर्माण होत असते. एक म्हणजे राजकीय इतिहासाची चौकट दूसरी वर्गकलह केद्रंस्थानी असणारी सामाजिक इतिहासाची चौकट, तर तिसरी उत्पादन पध्दतीवर लक्ष केंद्रित करणारी आर्थिक इतिहासाची चौकट. या प्रकारच्या तिहेरी विश्लेषणामधून एक अधिक समृध्द अशी संहिताविश्लेषणाची चौकट उपलब्ध होते, असा जेमसन यांचा विश्वास आहे.

हाबरमास (जन्म १९२९) हा प्रारंभी फ्रँकफूर्ट प्रणालीच्या प्रभावाखाली होता. आधूनिकतेच्या मर्यादांची जाणीव या प्रणालीने करून दिलेली होती. उत्तर-आधूनिक दृष्टीकोन हा खरे पाहता आधुनिकतेच्या, तसेच आधूनिकवादाच्या विरोधी आहे. असे हाबरमास म्हणतो.

**आपली प्रगती तपासा :**

१) समाजिक शास्त्रांचा संशोधनातील समकालीन दृष्टीकोनांच्या महत्त्वाबद्दल चर्चा करा.

२) सामाजिक शास्त्र संशोधन अभ्यासातील विविध समकालीन दृष्टीकांनाबद्दल थोडक्यात चर्चा करा.

## ३.६ चर्चा

प्रत्यक्षर्थवादाच्या सिध्दांतामध्ये केवळ वैज्ञानिक पध्दतीद्वारे प्राप्त केलेले ज्ञान उपयुक्त, विश्वसनीय अति प्रमाण मानतो. या सिध्दांताचे समर्थक असे प्रतिपादीत करता की, सामाजिक शास्त्रास मान्यता देण्यासाठी नैसर्गिक शास्त्राच्या अभ्यासपध्दतीचा अवलंब केला पाहिजे. प्रत्यक्षार्थवादाच्या समर्थकांनी कॉम्तच्या तथ्य मूल्य संबंधाविषयक मांडणीचा स्वीकार केला नाही त्यामुळे २० व्या शतकाच्या प्रारंभी या विषयासंबंधी जो नवा दृष्टीकोन उदयास आला त्यास नव-प्रत्यक्षर्थवाद वा तार्कीक प्रतक्षार्थवाद असे म्हटले जाते.

एखाद्या घटनेची वास्तवता व सत्यता शोधून काढण्यासाठी ज्या क्रमवार पायऱ्यांना अवलंब केला जातो त्या सर्व पायऱ्यांना मिळून शास्त्रीय अध्ययनाची पध्दत अशी संज्ञा दिली

जाते. संशोधन हि एक शास्त्रीय अध्ययन पध्दतीवर क्रमवार पायऱ्या जाणून घेतल्याशिवाय संशोधनाचे स्वरुप स्पष्ट होत नाही. सामाजिक शास्त्रातील वैज्ञानिक संशोधनासाठी विविध विचारवंतानी विविध पध्दतीचा उल्लेख केलेला आहे. एखाद्या घटनेची वास्तवता किंवा सत्यता शोधून काढण्यासाठी ज्या क्रमवार पायऱ्यांचा अवलंब केला जातो. त्या सर्व पायऱ्यांना मिळून शास्त्रीय अध्ययनाची पध्दत अशी संज्ञा दिली गेली आहे. संशोधन हि एक शास्त्रीय अध्ययन पध्दतीवर आधारलेली सत्य शोधण्याची प्रक्रिया असल्यामुळे शास्त्रीय अभ्यास पध्दतीचा क्रमवार पायऱ्यांत त्यांची  विभागणी करण्यात आलेली आहे.

संस्थात्मक विश्लेषणांमुळे सामाजिक व राजकीय संस्थामधील नियम, परंपरा व संकेत प्रकाश झोतात आले. तसेच राज्यशास्त्रीय संस्थात्मक विश्लेषण हे औपचारिक राजकीय संस्थापूरते मर्यादित आहे. उदा. घटना, कायदेव्यवस्था, शासकीय रचना, या संस्थांचा संशोधन पर अभ्यास करताना संशोधकाने तुलनात्मक दृष्टीने या संस्थाचा अभ्यास करावा व कालपरत्वे त्यांच्यात महत्त्वाचे निर्णयात्मक कोणते बदल झाले ते अभ्यासावे.

वर्तनवादी दृष्टीकोनाचे उपायोजन हे नैसर्गिक शास्त्रासारखे आहे. वर्तनवादी दृष्टीकोनात संशोधन अध्ययनात वापर करण्यास मानसशास्त्रज्ञांनी आणि समाजशास्त्रज्ञांनी पहिल्यांदा पसंती दिली. त्यानंतरच्या काही दशकांनी राज्यशास्त्रज्ञांनी वर्तनवादी दृष्टीकोनाचा संशोधनात उपयोग करण्याच प्रयत्न केला.

विवेक निवड सिध्दांत हा आजच्या काळात राज्यशास्त्राच्या संशोधनात महत्त्वपूर्ण भूमिका बजावत आहे. सामान्यतः जे लोक विवेकी निवड सिध्दातानूसार मत बनवतात जेणे करून त्यांच्या हिताचे अधिकाधिक संरक्षण होईल आणि विवेकी निवड सिध्दांत हा याच गृहीतकावर अवलंबून आहे. सामान्यतः या सिध्दांताचा उपयोग अर्थशास्त्रीय संशोधनामध्ये जास्तीत जास्त उपयोगिता तपासण्यासाठी करण्यात येतो.

स्त्रीवादी सिध्दांताचे मुख्य प्रतिपादन आहे की, समाजात लिंगभावाच्या सत्तेचा मोठ्या प्रमाणात अवलंब केला जातो. सत्ता संकलनेच्या विश्लेषणात या दृष्टीकोनास ‘लिंगभावात्मक परिप्रेक्ष्य (Gender perspective) हि संज्ञा वापरली जाते. हा सिध्दांत ‘पुरुषसत्तेस’ समाज व्यवस्थेचे प्रमुख लक्षण मानतो. पुरुषप्रधान व्यवस्थेविरुध्द उठवलेला विद्रोही आवाज आहे. मार्क्सवादी दृष्टीकोन हा सामाजिक शास्त्रातील पहिला समिक्षात्मक संशोधात्मक दृष्टीकोन मानला जातो. या दृष्टीकोनाचे महत्वाचे विधान हे कामगार आणि भांडवलदार यांच्यातील संघर्ष असे आहे. गरीबी व कामगारांच्या आर्थिक मागसलेपणाचे मुळ हे भांडवलवाद आहे असे हा सिध्दांथ सांगतो. उत्तर-आधूनिकतावाद हा आधूनिकतावादाच्या विरूध्दात आहे म्हणण्यापेक्षा आधूनिकतावादारील टिका म्हणते उत्तर-आधूनिकतावाद होय समकालीन पाश्चात्य संस्कृती आज उत्तर आधूनिकतेच्या अवस्थेत आहे. अमेरीकी मार्क्सवादी विचारवंत प्रेडरिक जेमसन याने आर्थिक - सांस्कृतिक अवस्था म्हणून उत्तर आधूनिकतेचा विचार केलेला आहे. उत्तरआधूनिकता ही विकसित भांडवलशाहीची १९६० नंतरची अवस्था आहे असे जेमसन यांचे म्हणणे आहे.

## ३.७ पाठ्यावर आधारीत प्रश्न

१) प्रत्यक्षर्थवादाचे व तार्किक प्रत्यक्षर्थवाताचे मुख्य विधानांचे सुक्ष्मपणे मूल्यांकन करा.

२) वैज्ञानिक पध्दतीची व्याख्या स्पष्ट करून, वैज्ञानिक पध्दतीची राजकीय सिध्दांताच्या अभ्यासातील उपयोगिता सांगा.

३) "राजकीय सिध्दातांच्या अभ्यासामधील प्रत्यक्षर्थवादी संशोधकाच्या परंपरा जसे की संस्थात्मक आणि वर्तनवादी दृष्टीकोन"चर्चा करा.

४) उत्तर आधूनिकता दृष्टीकोन हा कितपत राजकीय सिध्दांताच्या अभ्यासाशी संबंधीत आहे स्पष्ट करा.

## ३.८ संदर्भ ग्रंथ


१) Barry, narman, An Introduction to modern political theory, Macmillan, under 1981

२) Bealey Frank, The Balckweel Dictionary of political science, Balck well, 1999.

३) Gauba, O.P. An Introduction to political theory, Macmillan, 2013

४) प्रा. डॉ. मोर्या सुनिल, सामाजिक संशोधन पध्दती, डायमंड पब्लिकेशन, पुणे, २००८.

५) प्रा. डॉ. खैरनार दिलीप, प्रगत सामाजिक संशोधन पध्दती व सांख्यीकी, डायमंड पब्लिकेशन, पुणे, २०११


❖❖❖❖

# ४

# राज्याचे सिद्धांत - अभिजात, अनेक सत्तावादी, आणि नव अनेक सत्तावादी

**पाठय रचना**

४.० उद्दीष्टे
४.१ प्रस्तावना
४.२ राज्याचा शक्ती सिद्धांत आणि ईश्वरी वरदान सिद्धांत.
४.३ सामाजिक करार सिद्धांत - हॉब्ज, लॉक व त्यांच्या सिद्धांताच्या मर्यादा.
४.४ सामाजिक करार सिद्धांताविषयी जिन जॅक रुसो चे विचार
४.५ सारांश
४.६ पाठयावर आधारित प्रश्न
४.७ संदर्भ ग्रंथ

## ४.० उद्दिष्ट्ये

१) राज्यसंस्थेचे महत्व समजून घ्या.
२) राज्याच्या अभिजात वादी सिद्धांताचे विश्लेषण शक्ती सिद्धांत, ईश्वरी वरदान सिद्धांत,
३) हॉब्ज , लॉक व रुसो यांच्या सामाजिक सिद्धांत समजून घेणे व त्याचे सुक्ष्मपणे मुल्यांकन करणे.
४) लोकप्रिय सार्वभौमत्वाचा परिमानांच्या बदलत्या तांत्रिक युगांच्या दृष्टीकोणातून अभ्यास करा. तसेच रुसोचा राज्यविषयक सिद्धांताचा अभ्यास

## ४.१ प्रस्तावना

राजकीय सिद्धांताच्या अभ्यासातील सर्व संज्ञापैकी महत्त्वपुर्ण संज्ञा म्हण़जे “राज्य” होय“ राज्य ”हि संकल्पना राज्यशास्त्र या विषयाच्या केंद्रस्थानी आहे. राज्यशास्त्रात असा कोणाताच सिद्धांत नाही जो राज्यसंस्थेला स्पष्ट करु शकतो. राज्य संस्थेचे स्पष्टीकरणासाठी वेगवेगळया सिद्धांताची निर्मिती झाली. राज्यशास्त्रांच्या केंद्रस्थानी स्वातंत्र , समता, राजकीय कर्तव्य आ़हेत आणि या सर्व संकल्पना भोवती फिरतात. राज्याचे विविध सिद्धांत जसे उदारमतवाद, समाजवाद, मार्क्सवाद आणि अराजकतावाद हे राज्य या संकल्पनेच्या केंद्रस्थानी आहेत.

प्रामुख्याने राज्य ही संघटीत राजकीय संस्था असून त्याची त्या भागातील भौगोलिक क्षेत्रातील लोकांवर सत्ता असते. " राज्य " हि संकल्पना प्रथमतः मॅकीयाव्हली ने वापरली. राज्य ही नागरिकांवर अधिराज्य गाजवणारी संस्था आहे. तसेच समाज हा अनेक गंटांनी आणि संस्थानी बनलेला आहे, आणि यासर्वानंतर राज्य ही अंतिम संस्था आहे जी अंतिम निर्णय घेऊ शकते अशा राज्याच्या सत्तेलाच सार्वभौम राजसत्ता असे म्हणतात.

इतिहासाच्या प्रदिर्घ कालखंडात राज्यसंस्थेच्या स्वरुपात कालसदृश बदल झाला व होत आहे. त्यामुळे तिचे कार्य, स्वरुप, सत्ता ह्यांमध्ये बदल होणे अपरीहार्य ठरले आहे.

## ४.२ राज्याच्या शक्ती सिद्धांत आणि ईश्वरी वरदान सिद्धांत

राज्याच्या उदयासंबधी अनेक शास्त्रज्ञांनी वेगवेगळी मते मांडली. त्यापैकी काही काल्पनिक आहेत व काही ऐतिहासिक आहेत. राज्याच्या निर्मितीस बरेच घटक कारणीभूत आहेत. ईश्वरी वरदान सिद्धांत हा त्यापैकी एक सिद्धांत आहे.

### ईश्वरी वरदान सिद्धांतः

ज्या वेळेस एखादया गोष्टीचे गुढ आपणास उकलत नाही, तेंव्हा ती गोष्ट आपण ईश्वरावर ढकलतो. आपल्याला असे वाटते. की ती ईश्वराने निर्माण केली आहे. अशी हि सहज प्रवृत्ती आहे. या सिद्धांतानुसार राज्य हे मानवाने निर्माण केले नसून ईश्वरानिर्मित आहे.

ह्या सिद्धांताच्या मतानुसार राज्य हे मानवाने निर्माण केले नाही. ईश्वरानेच इतर वस्तूंसारखी राज्यनिर्मिती केली. राजा हा ईश्वराचा प्रतिनिधी आहे. ईश्वराने राजाला ह्या भुतलावर शासनकारभार करण्यासाठी पाठवलेले आहे. राजा शासनकारभारासाठी ईश्वरालाच जबाबदार आहे. राजाला विरोध करणे म्ह़णजे ईश्वराचा अपमान करणे होय. अशा विरोधामुळे मानवाची अधोगती होते. राजा ईश्वराची इच्छा असेपर्यंत राज्य करतो. राजा सर्व शक्ती व सत्ता याचे उगमस्थान आहे. तोच कायद्याची निर्मिती करतो. त्यामूळे तो कायद्यापेक्षा श्रेष्ठ आहे.

राज्याची सत्ता अमर्यादीत आणि अनियंत्रित असते. राजा काही अनैतिक किंवा विपरित वागला तर ईश्वर त्याला शिक्षा करील. प्रजेला राजाविरुद्ध तक्रार करण्याचा अधिकार नाही.

### सिद्धांतांची एतिहासिक पार्श्वभूमिः

जवळजवळ सर्वच देशांमध्ये या सिद्धांताला मान्यता मिळाली होती. ग्रीस, रोम, जपान, भारत इत्यादी. देशामध्ये 'राजा ईश्वराच्या अंश आहे' अशी दृढ कल्पना रुढ झाली होती. प्राचीन ज्यु लोकांमध्ये 'राजाला विरोध करण्याचा प्रजेला अधिकार नाही' असे त्यांच्या 'ओल्ड टेस्टॅमेंट' ह्या ग्रंथात म्हटलेले आहे.

त्यानंतर मध्ययूगीन काळामध्ये इग्लंडमधील स्टूअर्ट घराण्याचा राजा पहिला जेम्स ह्याने 'दि लॉ ऑफ फ्रि मोनार्क ' ह्या ग्रंथामध्ये राजा हा ईश्वराचा अंश आहे असा सिद्धांत

मांडला. सेंट ऑगस्टीन व पोप ग्रेगरी दि ग्रेट ह्या धर्मगूरुनीही या सिद्धांताचा पूरस्कार केला. सतराव्या शतकात फ्रेंच धर्मगूरु बोसाँक यानेही राजाला ईश्वरी अवतार मानले आहे. ग्रीक व रोमन लोकांना हिच विचारसारणी मान्य होती. प्लुटार्क हा शास्त्रज्ञ असे म्हण्तो. की, एक वेळेस जमिनिशिवाय राज्य निर्माण होईल पन ईश्वरी श्रद्धेशिवाय राज्यनिर्मिती हि पूर्णतः अशक्य गोष्ट आहे.

भारताच्या संस्कृत वाड्:मयातून सुट्या गजाला ईश्वराचा अंश मानले आहे. तिबेट़ीयन लोक दलाई लामा ला 'अवलोकीता' ह्या देवतेचा अवतार मानीत होते.

पण नंतर ईश्वरी वरदान सिद्धांत मागे पडला. सामाजिक करार सिद्धांताने असे सिद्ध केले की जनतेच्या समतेशिवाय राज्यनिर्मिती होऊ शकत नाही.

राजा व प्रजा ह्यांतील संघर्षामध्ये राजाचा पराभव झाला. फ्रान्सची राज्यक्रांती, राष्ट्रवाद, प्रजातंत्रवाद ईत्यादीमूळे ह्या सिद्धांतातील फोलपणा उघड होऊ लागला.

जपानवर बॉम्ब हल्ला केला. सुर्यप्रतिनिधी म्हणविणारा जपानचा राजा अमेरीकेला शरण आला. आणि सिद्धांतावरील लोकांचा विश्वास उडाला.

**ईश्वरी वरदान सिद्धांताचे परिक्षण -**

राज्य ईश्वराने निर्माण केले आहे. राजा हा ईश्वराचा प्रतिनिधी आहे. ह्या सर्व दंतकथा आहेत. त्या मानण्याला कोणताही ऐतिहासिक पूरावा नाही. ह्या सिद्धांताने राजाचे अत्याचारी स्वरुप मान्य करुन एकप्रकारे हूकूमशाहीला प्रोत्साहानच दिले आहे. ह्या सिद्धांताने लोकांचा अभिव्यक्ती स्वातंत्र्य व लोकांना राजाचा धोरणावर टीका करणे चुकीचे आणि विरोधी कृत्य मानले आहे. त्यामूळे ह्रा सिद्धांत लोकशाही विरोधी आहे. चालर्स या सिद्धांताला कसून विरोध केला. तो म्हणतो मनुष्याची जसजशी उत्क्रांती झाली तसतशी मनुष्यानेच राज्यनिर्मिती केली. राज्य हे मनुष्याच्या प्रगतीशील संस्कृतीचा परिणाम आहे.

**सिद्धांताचे गुण :**

समाजाच्या अप्रगत अवस्थेमध्ये लोकांनी कोनाची सत्ता मानावी असा प्रश्न पडला त्यामुळे 'राजसत्ता सर्वश्रेष्ठ मानून लोकांनी त्या सत्तेचे आज्ञापालन करावे ' असे या सिद्धांताने मांडले. त्यामुळे समाजातील बेबंदशाही व अराजकता व असुरक्षिता या गोष्टींना आळा बसला.

राजाला नैतिक,श्रमिक, अध्यात्मिक अधिष्ठान लाभले. त्यामुळे प्राथमिक अवस्थेतील समाज संघटीत झाला. सुव्यवस्था निर्माण झाली व लोकांमध्ये श्रमिक भावनेच्या आधारावर ऐक्याची निर्मिती झाली. आज हा सिद्धांत कोणाच्याही ऐतिहासिक पूराव्याच्या अभावी तो सिद्धांत त्याज्य ठरला आहे.

ह्या सिद्धांताच्या मते राज्य ईश्वरीकृपेमुळे तयार झाले नाही, राज्य सामाजिक करारातून पण तयार झाले नाही. राज्याच्या निर्मितीसाठी दंड किंवा शक्तीचा वापर करणे आवश्यक ठरते. म्हणून राज्यनिर्मितीस व राज्याच्या विकासाला शक्ती हा घटक कारणीभूत

ठरतो. राज्याच्या निर्मितीचे प्रमूख कारण शक्ती सामर्थ्य हेच आहे. राज्य व सरकार सत्तेवरच अधिष्टीत आहेत.

प्रचित काळी मनुष्य टोळीने राहत असत त्यांच्यामध्ये संघर्ष व युद्धे होत असत त्यातुनच विजयी टोळी पराजित टोळींवरती आपली अमर्याद सत्ता वापरत असत. त्यामुळे टोळींप्रमुखाची सत्ता स्वतःच्या व पराजित टोळीवर चालत असे.

'युद्धातून राजा निर्माणा झाला ','war begets the king' असे जेंक्स म्हणतो. अशा सामर्थ्यवान व सत्तेची लालसा असलेल्या योद्धांनी इतरावर आपले प्रभूत्व प्रस्थापित केले.

**शक्ती सिद्धांताचा इतिहास :**

इ.स. १०० साली पोप ग्रेगरी ह्याने शक्ती सिद्धांताचा पूरस्कार केला. तो म्हणतो की ईश्वराविषयी अज्ञान असणाऱ्या लोकांनी लुट, कत्तल व हूकूमशाहीने लोकांवर आपले राज्य प्रस्थापित केले. ऑपन होमर हा शास्त्रज्ञ म्हणतो की समाजाच्या प्राथमिक अवस्थेमध्ये अराजकता होती . लोकांच्या परस्पर संघर्ष चालू होता. लोकांचे जीवन असुरक्षित, भयावह व पशुसमान होते. ह्या संघर्षातूनच जय व पराभूत असे दोन वर्ग निर्माण झाले.

ह्युमने आपल्या 'ओरिजनल कॉन्ट्रॅक्ट ' ह्या ग्रंथात असे स्पष्ट केले की संघर्षातून श्रेष्ठत्व प्राप्त करणारी व्यक्ती राजा झाली व तिची सत्ता ज्या प्रदेशातील लोकांवर चालू लागली त्या प्रदेशात त्याचे राज्य तयार झाले. काही ख्रिश्चन धर्मगुरुंनी चर्चचे श्रेष्ठत्व सिद्ध करण्यासाठी ह्या सिद्धांताचा पुरस्कार केला. राज्य हे पाशवी सामर्थ्यातून निर्माण झाले.पण चर्च हे दैवी शक्तीने निर्माण केले असल्यामूळे लोकांनी धर्मसंस्थेला अग्रमान द्यावा, असे ख्रिश्चन धर्मगुरुंचे मत होते. व्यक्तीवाद लेखकांनी राज्य हे शरीरसामर्थ्यावर आधारित आहे हे तत्व स्विकारले आहे. पूर्वी 'बळी तो काण पिळी'हिच अवस्था होती.

साम्यवादी विचारवंत स्टॅलीन असे म्हणतो की, श्रीमंतानी गरिबांची पिळवणूक करण्यासाठी निर्माण केलेली संस्था म्हणते राज्य होय. ट्रिश्के ह्या जर्मन शास्त्राज्ञाने असे स्पष्ट केले की "राज्य हि आक्रमणात्मक व संरक्षणात्मक कार्य करणारी एक सार्वजनिक शक्ती आहे. तिचे प्रमुख कार्य युद्ध करणे व संरक्षण करणे हे आहे.

आधूनिक काळातही हिटलर व मुसोलीमी ह्या योद्धांनी शक्ती सिद्धांताचाच पुरस्कार केला. हिटलर असे म्हणतो की 'बंदुकीच्या गोळया लोण्याच्या गोळयापेक्षा श्रेष्ठ ठरतात.' मुसोलीनी असे म्हणतो की स्त्रीला जितके मातृत्व प्रिय आहे तितकेच कर्तृत्ववान पूरुषाला युद्ध प्रिय आहे.

**शक्ती सिद्धांताचे दोष :**

हा सिद्धांत पूर्णपणे विश्वासनिय नाही कारण त्यामध्ये खालील दोष आपणाला आढळतात.

राज्यकारभार सुरळीत चालण्यासाठी शक्ती व सामर्थ्य आवश्यक आहे. हि गोष्ट खरी आहे. पण केवळ शक्तीमुळेच राज्यनिर्मिती होते असे म्हणणे चूकीचे आहे, असे डॉ. लिकॉकचे मत आहे. गिलख्रिस्त असे म्हणतो की सत्तेच्या दुरुपयोगामुळे राज्याचे विघटन होते, नैतिक सामर्थ्य हेच राज्यनिर्मितीचे शाश्वत कारण आहे. गिलख्रिस्ट पुढे असे म्हणतो की सत्ता ही राज्याची कसोटी आहे.

कॉंट असे म्हणतो की सत्ता हे राज्याचे अधिष्ठान नाही. चोरांच्या टोळीमध्ये टोळीप्रमुखाजवळ सत्ता असते. त्याच्या टोळीचे व्यवहार विशिष्ट न्याय - अन्यायाच्या योग्ययोग्यतेच्या कल्पनेनुसार होतात. पण चोंराच्या टोळीला आपण राज्य म्हणू शकत नाही. टी. एच्. ग्रीनच्या मते "जनशक्ती हाच राज्याचा आधार आहे. सामर्थ्य हा राज्याचा आधार ठरु शकत नाही."

**आपली प्रगती तपासा :**

१) राज्यांचे महत्त्व स्पष्ट करा. ईश्वरी वरदान सिद्धांताचे व  शक्ती सिद्धांताचे सुक्ष्मपणे मुल्यांकन करा.

______________________________

______________________________

______________________________

______________________________

______________________________

## ४.३ सामाजिक करार सिद्धांताविषयी हॉब्ज चे विचार:

सामाजिक करार सिद्धांताविषयी हॉब्जचे विचार:

हॉब्जचा जन्म १५८८ साली इंग्लडमध्ये सॅलीसबेरो येथे झाला. हॉब्जने आपले राजकीय विचार 'लेवियथन ' या ग्रंथात मांडले आहेत. इग्लंडमध्ये इ.स. १६४२  ते १६४९ ह्या काळात झालेले  युद्ध त्याने प्रत्यक्षपणे पाहिले. त्यावेळी अशांतता, अराजकता व असुरक्षितता निर्माण झाली होती. ती परिस्थिती नाहिशी करण्यासाठी प्रबळ राजतंत्रव्यवस्था श्रेयस्कर आहे असे विचार त्यांने मांडले.

**सामाजिक करार:**

हॉब्जने अशी कल्पना केली की, निसर्गवस्थेला कंटाळलेल्या लोकांनी एक सभा घेतली असावी व त्या सभेत प्रत्येकाने अशी प्रतिज्ञा केली की, मी माझ्यावर प्रभुत्व गाजविण्याचा अधिकार एका विशिष्ट व्यक्तीला व व्यक्तीसमुदायाला एका अटिवर देतो ती अट हिच की तू (म्हणजे मी सोडून समुदायातील प्रत्येक व्यक्ती) तुझ्यावर प्रभूत्व गाजविण्याचा अधिकार त्याच विशिष्ट व्यक्तीला अगर व्यक्तीसमुदायाला द्यावयास तयार आहे.

हॉब्जच्या मतानुसार करार म्हणजे सामुहीक सत्तेला केलेले समर्पण होय. हिच सामुहीक सत्ता म्हणजे सार्वभौम सत्ता आहे. निसर्गावस्थेतील अशाश्वत जीवन नष्ट करण्यासाठी जो करार झाला त्याची वैशिष्टे पूढीलप्रमाणे सांगता येतील.

१) निसर्गाव्यवस्थेतील प्रत्येक व्यक्तीने स्वेच्छेने करार केला.
२) करारान्वये राज्य व एक राज्यकर्ता निर्माण झाला.
३) सार्वभौम हा कराराचा पक्ष नाही तो कराराचा परिणाम आ़हे.
४) सार्वभौम कराराच्या अटीने बांधला गेला नाही.
५) करार करताना प्रत्येक व्यक्तीने कोणताही अधिकार स्वतःकडे राखून ठेवला नाही म्हणून करार मोडण्याचा वा राज्यकर्त्याला विरोध करण्याचा अधिकार कोणालाही नाही.
६) करारामूळे शासन संस्था निर्माण झाली, त्यामुळे शासनाला विरोध करण्याचा व्यक्तीला अधिकार नाही. कारण शासन नष्ट झाले तर राज्य नष्ट होईल.
७) 'व्यक्तीच्या आत्मसंरक्षणाच्या विरोधी' असा आदेश शासनसंस्था देऊ शकत नाही. दिल्यास त्या आदेशाची अवज्ञा करण्याचा अधिकार व्यक्तीला आहे.

**हॉब्जच्या विचारस्मरणातील दोष:**

१) हॉब्जने मनुष्य हा जन्मतः स्वार्थी असतो असे मत मांडले, पण मनुष्य हा जन्मताच स्वार्थी नसतो तर सभोवतीची परिस्थिती मनुष्याला स्वार्थी व दृष्ट बनवते. त्यापुर्वी ॲरीरस्टॅलने असे सिद्ध केले आहे की मनुष्य हा स्वभावतःच बुद्धीवादी व समाज निष्ट प्राणी आहे. बहुतेक इंग्लंडमधील यादवी युद्धामुळे हॉब्जने मनुष्य हा स्वार्थी असतो असा निष्कर्ष काढला असावा.

२) निसर्गव्यवस्थेत परस्परांमध्ये संघर्ष होते आणि प्रत्येकजन एकमेंकांचा शत्रु होता पण मानवाचा विकास हा संघर्षामुळे झालेला नसून सहकार्यातून झालेला आहे.

३) हॉब्जने शासनसंस्था व राज्य यामध्ये भेद केला नाही, पण राज्यसंस्था आणि शासनसंस्था या भिन्न गोष्टी आहेत शासनसंस्था नष्ट झाल्यामुळे राज्यसंस्था नष्ट होत नाही तर एक शासनसंस्था कूचकामी ठरली तर जनता नविन शासनसंस्थेला मान्यता देता हि गोष्ट आज सर्वमान्य आहे.

४) शासनाविरोधी क्रांतीचा अधिकार हॉब्ज लोकांना देत नाही कारण शासन नष्ट झाले तर राज्य नष्ट होईल अशी भ़िती त्याला वाटते. हि भिती निराधार आहे. अकार्यक्षम शासन बदलून नवे शासन निर्माण केल्याचे अनेक उदारणे अपणास देता येतील.

५) सार्वभौम कराराचा पक्ष नाही तर कराराचा परिणाम आहे, हे विधान विचित्र वाटते. सार्वभौम कराराचा पक्ष नसल्यास तो वाटेल तसा वागण्यास मोकळा राहील. त्याची आज्ञा प्रत्येकाला पाळावीच लागेल, असे हॉब्जचे विधानही योग्य वाटत नाही सार्वभौम सत्तेवर रुढी, प्रथा, चालीरीती, संप्रदाय वगैरेचे बंधन असते.

**सामाजिक कराराविषयी जॉन लॉकचे विचार :**

सामाजिक कराराचा दुसरा पूरस्कर्ता जॉन लॉक हा आहे. त्याचा जन्म १६३२ झाली इंगलंडमध्ये झाला. १६८८ साली इंग्लंडमध्ये रक्तहीन क्रांती झाली. इंग्लंडचा राजा दुसरा जेम्स याला गादी सोडून पळावे लागले. लोकांच्या समंतीनुसार विल्यम व मेरी हे 'संयुक्त सार्वभौम '

म्हणून इंग्लंडच्या गादीवर बसले. त्यामुळे प्रजेच्या न्याय अधिकारांविरुद्ध वर्तन करणाऱ्या राजास पदच्युत करण्याचा अधिकार जनतेला आहे. तसेच जनसंमतीनुसार राजाने कार्य करावे. ह्याच मताचा पूरस्कार लॉकने आपल्या राजकीय लिखाणातून केला.

**निसर्गावस्था आणि मनुष्यस्वभाव :**

मानवी जीवनाचे चित्र लॉकने स्वकल्पनेनुसार रेखाटले आहे. पण त्याचे विचार हॉब्जपेक्षा भिन्न आहेत. लॉकचे मते निसर्गवस्था हि समाजपूर्व अवस्था नाही, ती राजकीय जिवनाची पूर्वीची अवस्था आहे, ह्या अवस्थेमधील मानवाचे जीवन हे हॉब्जने वर्णन केल्याप्रमाणे पशुतुल्य व रानटी स्वरुपाचे नव्हते. निसर्गावस्थेमध्ये परस्परसहकार्य, सरंक्षण आणि परस्पराविश्वास होता. निसर्गावस्थेत मनुष्याला स्वातंत्र्य होते. पण तो स्वैराचारी नव्हता. एका व्यक्तीला दुसऱ्या व्यक्तीबद्दल सहानूभूती, प्रेम तसेच कळवळ वाटत होती. नैसर्गिक अधिकारांचा उपयोग करत असताना इतर व्यक्तीच्या नैसर्गिक अधिकारांची जाणीव व्यक्ती ठेवत असे. प्रत्येक व्यक्तीला जिवितस्वातंत्र्याचा तव्दतच मालमत्तेचा अधिकार होता, परंतू आत्मनाश करण्याचा अधिकार व्यक्तीला नव्हता.

**करार करण्याचे कारण :**

निसर्गवस्थेतील जीवन वरीलप्रमाणे सुखी, समाधानी, परस्परसहकार्याचे व शांततेचे असले तरी निसर्गावस्थेतेत पुढील अडचणी होत्या.

१) निसर्गावस्थेतील नैसर्गिक नियमाची निश्चित कल्पना व व्याप्ती ठरलेली नव्हती. निसर्ग नियमाचे पालन व्यक्तीगत होते.
२) निसर्गनियमाचा अर्थ प्रत्येक व्यक्ती व्यक्तीगत लावत असे त्यामूळे निसर्गनियमांचा अर्थ बदलत असे.
३) निसर्गनियमांच्या अमलबजावणीसाठी कोणताही प्रभावी व सामर्थ्यवान सत्ता नव्हती. व्यक्तीने नैसर्गिक नियमांचे उल्लंघन केल्यास तिला शिक्षा देणारी सर्वमान्य अशी सत्ता नव्हती.

निसर्गानियमांचा सुनिश्चित आणि सर्वमान्य असा अर्थ लावण्यासाठीच लोकांनी आपापसात करार केला.

**सार्वभौम सत्ता :**

जनता आणि शासन ह्यामध्ये सार्वभौमाचे विभाजन, मर्यादित सार्वभौमत्व, नियंत्रित जनता हीच सार्वभौम होती. विरोध करण्याचा अधिकार : या करारानूसार जुलमी, अत्याचारी, अन्यायी शासनाला कायदेशीर क्रांतीच्या मार्गाने विरोध करण्याचा अधिकार जनतेला आहे.

**शासन :**

जनतेच्या सार्वभौमत्वाचा पूरस्कार, लोकनिर्वाचीत प्रतिनिधीचे शासन तसेच योग्य मर्यादित राजतंत्राचा पूरस्कार लॉक करतो.

**लॉकच्या विचारातील दोष :**

१) लॉकने निसर्गावस्थेतील रेखाटलेले मानवी जीवनाचे चित्र काल्पनिक व अवास्तव आहे, निसर्गावस्थेतील मनुष्याचे जीवन परस्परसहकार्याचे , शांततेचे आणि परस्पराविश्वासाचे होते. म्हणजे मनुष्यजीवन आजच्या पेक्षा सुखी व आनंदी होते तर राज्य निर्मितीचा प्रयत्न का करण्यात आला असा प्रश्न उद्‌भवतो.

२) कराराच्या अवलंब करुन राज्यनिर्मिती झाल्याचा ऐतिहासीक पूरावा उपलब्ध नाही निसर्गवस्थेतील मानवाच्या हक्काच्या जानिवेतून करार करण्याइतपत बौद्धीक व नैतिक विकास झालेला नव्हता.

३) एका कराराव्दारे राजकीय समाज व दुसऱ्या कराराव्दारे शासन संस्था अस्तित्वात आली असे लॉक म्हणतो. म्हणजे करार दुहेरी स्वरूपाच्या वा एकेरी स्वरुपाचा होता. याबद्दल लॉकने स्पष्टीकरण दिले नाही.

४) सार्वभौम सत्तेचे विभाजन लॉकने केले, पंरतू वैधानिक सार्वभौम सत्तेपेक्षा राजकीय सार्वभौमाचे वर्चस्व त्याने मान्य केले. वैधानिक सार्वभौम सत्तेकडे त्याने दुर्लक्ष केले.

**आपली प्रगती तपासा :**

१) हॉब्ज आणि लॉकच्या सिद्धांताचे सुक्ष्मपणे विश्लेषण करा ?
२) 'लाकचा सिद्धांत हा उदारमतवादी लोकशाहीचा पाया आहे.'यावर चर्चा करा.

## ४.४ रुसोचा सामाजिक कराराचा सिद्धांत

रुसो (ई.स. १७१२ ते १७७८)

सामाजिक कराराविषयी सिद्धांताचा तिसरा पूररस्कर्ता जीन जॅक रुसो हा फ्रेंच राज्यशास्त्रज्ञ आहे.

रूसोने लिहलेले ग्रंथ.

अ) The social contract
ब) Discourse on inequality
क) The New Heloise

वरील तिन ग्रंथातून त्याने जनतेचे सार्वभौमत्व, व्यक्ती विकास करणारे शासन वगैरेसंबधाचे विचार स्पष्ट केले.

त्यांच्या लिखाणाने प्रभावित होऊन, त्याच्या तत्त्वज्ञानाचा परिणाम म्हणून फ्रांन्स आणि अमेरीकेमध्ये 'स्वातंत्र्ययुद्ध ' झाले.

**रुसोच्या मुलभूत कल्पनाः-**

१) मनुष्य स्वतंत्र्य जन्माला आला पण त्याचे जीवन सर्वत्र श्रृंखलांनी जखडलेले आहे.
२) मनुष्याची कृती व्यक्तीगत स्वार्थ व व्यक्ती विषयीची सहानूभूती ह्या तत्त्वानूसार घडते.
३) मनुष्य स्वभावतःच चांगला आहे, परंतू संस्कृती त्याला बिघडवते.
४) व्यक्ती स्वातंत्र्य आणि राज्याची सार्वभौम सत्ता यामध्ये समन्वय घडविणे आवश्यक आहे.

**निसर्गावस्था व मनुष्यस्वभाव :**

निसर्गावस्थेची रुसोचे विचार हॉब्ज व लॉक पेक्षा भिन्न होते. रुसो म्हणतो की निसर्गावस्थेतेत मनुष्य हा स्वातंत्र्य निरागस, निर्भय होता. रुसोचे सुप्रसिद्ध विधान आहे की "मनुष्य हा जन्मतःच मुक्त आहे पण त्याचे जीवन सर्वत्रच श्रृंखलांनी जखडलेले आहे" निसर्गावस्थेतील मानव असंस्कृत असला तरी तो उदात्त (Noble sawage) होता. असे रुसो म्हणतो.

**करार करण्याचे कारण :** लोकसंख्या व भावनाधिष्टीत बुद्धीच्या उदयामुळे भेदभाव संघर्ष सुरु झाला. तो नष्ट करणे, शांतता सुव्यवस्था निर्माण करणे हे कराराचे कारण होते.

**कराराचे स्वरुपः** करारावे स्वरूप हे एकेरी होते एकच करार होता. वैयक्तीक व सामाजिक स्वरुपात करार झाला.

**सार्वभौम सत्ता**ः सार्वभौम सत्तेचे स्थान, सामाजिक ईहा, समाजहित व न्यायाचे प्रतिक म्हणून निरंकूश , अद्येय व अविभाज्य सार्वभौमत्व असे होते.

**विरोध करण्याचा अधिकारः** सार्वभौम सत्ता म्हणजेच सामाजिक इहा हे होते. सामाजिक ईहेत व्यक्ती सहभ़ागी होत त्यामुळे विरोध करण्याचा अधिकर नाही.

**शासन :** प्रत्यक्ष लोकशाहीचा पूरसकर्ता

रुसोने सामाजिक ईहेचा सिद्धांत मांडला. रुसोने म्हटले आहे की मनुष्य स्वभावतःच स्वतंत्र्य असला तरी त्याचे जीवन शृखलांनी जखडलेले आहे. प्रत्येक मनुष्यास दोन प्रकारच्या इच्छा असतात.

१) व्यक्तीनिष्ट इच्छा (Actual will)
२) सामाजिक इच्छा (General will)

व्यक्तीनीष्ट इच्छा संकूचीत, आत्मनिष्ट आणि स्वार्थी असते समाजहिताकडे दुर्लक्ष करणारी असते. सामाजिक इच्छेमध्ये समाजाच्या उच्च व उदात्त भावनांचा समावेश होतो.

**रुसोच्या विचाराचे मुल्यमापन :**

रुसोच्या विचारामध्ये पुढील दोष आढळतात.

१) समाज निर्माण होण्यापूर्वीचे रुसोचे वर्तन हे अतिरंजित व काल्पनिक आहे. नैसर्गिक अवस्थेतील मनुष्य उदात्त रानटी होता, यावर पण विश्वास बसत नाही.

२) रुसोच्या सामाजिक करारही काल्पनिक आहे. त्याला ऐतिहासिक आधार नाही.

३) जनतेच्या सार्वभौमत्त्वाविषयी त्याचे विचार मोलाचे असले तरी ती कल्पना रुसोने संदिग्धतपणे मांडली आहे.

४) रुसोची सामाजिक ईहा निर्दोष नाही. सामाजिक इच्छा व व्यक्तीगत ईच्छा याचे स्वरुप स्पष्ट करताना रुसोचा गोंधळ उडतो.

**आपली प्रगती तपासा :**

१) रुसोची सामाजिक ईहा संकल्पेनेचे सुक्ष्मपणे परिक्षण करा.

२) लॉक आणि रुसोच्या राज्याच्या सिद्धांता मधील साम्य व भेद यावर चर्चा करा.

## ४.५ सारांश

राज्याचा सिद्धांत हे राज्यशास्त्र अभ्यासाच्या केंद्रस्थानी आहेत. ढोबळमानाने सांगायचे झाले तर हे सिद्धांत अभिजात व आधुनिक आहेत. पारंपारिक सिद्धांताच्या अभ्यास करताना एक गोष्ट लक्षात येते की हे सर्व सिद्धांतांना वैज्ञानिक पाया नसला तरीपण कायदा व सुव्यवस्था राखण्याच्या दृष्टीने उत्त्पती महत्वावी होती. हॉब्स , लॉक व रुसो तिघेपण समतेच्या सिद्धांताचे पाठराखण करताना दिसतात. राज्याचे कार्य हे अखंड असे आहे. राज्य हे करायला बांधील आहे. राज्याला अधिकार हे समाजाकडून मिळालेले आहेत. हॉब्ज कायदेविषयक सार्वभौमत्त्वावर भर देतो तर लॉक मर्यादित शासनव्यवस्थेबद्दल बोलतो आणि रुसो सहभागात्मक लोकशाहीचा पूरस्कार करतो.

## ४.६ पाठयवर आधारीत प्रश्नावली

१) शक्ती सिद्धांताची चर्चा करा तसेच शक्ती सिद्धांताचा एकाधिकारशाही वर काय परिणाम झाला स्पष्ट करा.

२) "ईश्वरी वरदान सिद्धांतामुळे व शक्ती सिद्धांतामुळे राज्याचा हुकूमशाही स्वरुपाचे बळकटीकरण झाले आहे " समिक्षा करा.

३) थॉमस हॉब्जच्या सामाजिक करार सिद्धांताचे मुलभूत वैशिष्टे लिहा.

४) "लॉक हा उदारमतवादाचा पूरस्कर्ता होता" समिक्षा करा.

५) रुसोच्या सामाजिक ईहा सिद्धांताच्या मर्यादा स्पष्ट करा.

## ४.७ सदर्भ ग्रंथ


1) कृ. दि. बोराळकर, राजकीय सिद्धांत, विद्या बुक्स पब्लिशर्स औरंगाबाद, महाराष्ट्र, १९९६.

2) प्रा. चिं. ग. धांगरेकर राज्यशास्त्राची मुलतत्त्वे, श्री मंगेश प्रकाशन, नागपूर , महाराष्ट्र, १९९९.

3) Gauba, O.P, An Introduction to political Theory, Macmillan, India,2013.

4) Barry, Normas, An Introduction to modern political Theory, Macmillan, londen ,1981.

5) Bealey , frank , The Blackwell Dictionary of political science, black well ,1999.


❖❖❖❖

# ५

# राज्याचे सिद्धांत - अभिजन, अनेकसत्तावादी, नव - अनेक सत्तेवादी, मार्क्सवादी आणि नव - मार्क्सवादी राज्याचे सिद्धांत

**घटक रचना :**

५.० उद्दीष्टे
५.१ प्रस्तावना
५.२ राज्याचा अभिजनवादी सिद्धांत.
५.३ अनेकतावादी आणि नव–अनेकतावादी सिद्धांत
५.४ राज्याचा मार्क्सवादी सिद्धांत. मार्क्सवादाचे महत्त्वाचे वैशिष्टे
५.५ नव - मार्क्सवाद
५.६ सारांश
५.७ पाठयावर आधारित प्रश्नावली
५.८ संदर्भग्रंथ

## ५.० उद्दिष्टे

१) अभि़जन संकल्पना समजाऊन घेऊन आणि राज्याचा अभिजनवादी सिद्धांताचे सुक्ष्मपणे मुल्याकन करा.
२) अनेकतावाद व नव-अनेकतावादाचे राज्याच्या सिद्धांतावर झालेला परिणामांचे मुल्यांकन
३) राज्याचा मार्क्सवादी सिद्धांत
४) बदलत्या परीस्थीतीत मार्क्सवादी सिद्धांताच्या संबधाचे आढावा घ्या
५) राज्याची नव - मार्क्सवादी सिद्धांत समजून घ्या.

## ५.१ प्रस्तावना :

राजकीय सिद्धांताचा मुख्य विषय राज्य आहे. राज्यसंस्था हि मानवी संघटना आहे. व मनुष्याच्या सुखी जीवनासाठी ती निर्माण झाली आणि सुखी जीवनासाठीच ती अस्तित्वात राहणार आहे असे स्पष्ट मत ॲरिस्टटलने मांडले.

सामाजिक कराराच्या सिद्धांताचे विचारवंत त्याच्या ऐतिहासिक संदर्भातून राज्याच्या निर्मितिची व राज्यसंस्थेची संकल्पनेची रचना करतात. समाज हा अनेक घटकांपासून निर्माण झालेला आहे. राज्याचा अभ्यासाचे अभिजनवादी सिद्धांत ने मानसिकविश्लेषण केले आहे, अनेकतावादी सिद्धांताने विकेंद्रीकरणावर भर दिला आहे तर मार्क्सने आर्थिक घटकांच्या आधारे राज्याचे विश्लेषण केले आहे.

## ५.२ अभिजनवादी सिद्धांत

मार्क्सवादाचे समर्थक असे मानतात की, समाज उत्पादन साधनांच्या मालकी च्या आधारे प्रभूत्वशाली आणि परावलंबी अशा वर्गात विभागला गेला आहे. हा सिद्धांत असे मानतो की, कोणत्याही समाज व संघटनेत सर्व महत्वाचे निर्णय काही निवडक लोकच घेत असतात, उर्वरीत लोक त्याचे पालन करीत असतात. यादृष्टीने प्रत्येक समाज व संघटना दोन भागांत विभागली जाते.

१) अभिजनवर्ग / श्रेष्ठीजन (Elites)
२) सामन्यजन (Common Class)

अभिजनवर्गाचे सदस्य आपली अलौकीक योग्य नावीण्यपुर्ण विचारशक्ती, कार्यकुशलता, वा नियंत्रणक्षमतेच्या अहारी संपूर्ण संघटनेत प्रभावी स्थान प्राप्त करतात. आणि तिला आपल्या इच्छा वा योजनेनुसार कार्यन्वित करतात. दुसऱ्या बाजूला, सनस न्यात नेतृत्वगुण आणि जबाबदारीच्या भावनांचा पुर्णतः अभाव असतो. आणि त्यांना अभिजनवर्गाच्या निर्देशांवर मार्गक्रमण करण्ऱ्या सुरक्षित वाटत असते. थोडक्यात, सामाजिक जिवनात केवळ अभिजन वादीच सत्तेचा उपभोग घेतात; सत्तेच्या विश्लेषणाच्या सदर्भात दृष्टीकोणास अभिजनवादी दृष्टीकोन ही सज्ञा वापरली जाते.

विसाव्या शतकाच्या प्रारंभी अनेक समाज वैज्ञानिकांनी अभिजनवादी सिद्धांताची तरफदारी केली आहे. इटलीचा समाजशास्त्रज्ञ विल्फ्रेडो परेटो (१८४८ ते १९२३) याने आपल्या 'माईंड ॲन्ड सोसायटी' (१९१९ ते १९३६) या बहुचर्चित ग्रंथात हा विचार मांडला की, समाज सढळपणे दोन वर्गात विभागला जातो.

१) अभिजन वर्ग आणि
२) गैरअभिजन वा जनसामान्य

अभिजन वर्गात जे लोक समाविष्ट होतात. जे कोणला तरी कार्यक्षेत्रातील सर्वोच्च क्षमता बाळगत असतात. अभिजन वर्गात सत्ताधारी अभिजन (Governing Elite) आणि बिगरसत्ताधारी अभिजन वर्ग (Non Governing Elite) यांच्यात स्पर्धा चाललेली असते. सत्तेच्या परिवर्तनाबरोबर बिगरसत्ताधारी अभिजन वर्ग सत्ताधारी जनवर्गाला बाजूला सारुन सत्तास्थानी जातात. परेटोने जनवर्गाच्या स्वभाव विशेषाचे विश्लेषण करताना लिहिले की, स्वभाव विशेष असणारे लोक स्थिर परिस्थितीत असाधारणतेची साक्ष देतात. तर कोल्हयाचा धुर्तपणा असणारे लोक नव्या निकषा आधारे बदलत्या परिस्थितीशी समायोजन करुन घेतात.

गीतानो मोस्का (१८५८ ते १९४१) या इटलीतील विचारवंताने आपल्या 'द रुलिंग क्लास 'या ग्रथांत हा विचार मांडला की, लोक अटलपणे दोन वर्गात विभागले जातात. शासक (Ruler) आणि शासित (Ruled). शासक वर्ग धनसंपत्ती, सत्ता आणि प्रतिष्ठा यांनी संपन्न असतो; त्याला सत्तास्थानाना हरविणे अवघड असते. कोणतीही शासनप्रणाली स्विकारली तरी सत्ता नेहमीच अशा अल्पसंख्य वर्गाकडे एकटवलेली असते, त्याला शासक रुपाने ओळखले जाते. काहीही असले तरी आपल्या सत्ता स्थानास अबाधीत ठेवण्यासाठी शासक वर्गाला अशा नैतिक आणि कायदेविषयक सिद्धांताना शरण जावे लागते जे शासितांना मान्य असतात. परेटोच्या मते बुद्धीमत्ता योग्यता हे अभिजान वर्गाचे गुण आहेत. तर मोस्काच्या संघटन क्षमता ही त्यांची प्रमुख विशेषता आहे.

याशिवाय जर्मन समाजशास्त्र रॉबर्ट वेल्स (१८७६ ते १९३६) याने आपल्या 'पॉलिटीकल पार्टीज 'या सुप्रसिद्ध ग्रथांत महाजनशाहीच्या पोलादी नियमाचे (Iron law of oligarchy) विश्लेषण दिले आहे. त्याने असा युक्तिवाद केला की बहूतांश लोक हे वृत्तीने जड, आळशी आणि गुलामगिरी वृत्तीचे असतात, जे स्वयं आपले शासन चालवण्यास असमर्थ असतात. परंतु काही लोक आपले नेतृत्व गुण, वक्तृत्व आणि प्रभावी संवाद कौशल्याच्या जोरांवर लोकांच्या भावनांना आव्हान करुन सत्तेवर आपले वर्चस्व प्रस्थापित करतात. यामुळे समाजात कोणत्याही प्रकारची शासन व्यवस्था स्विकारली तरी ती 'महाजनशाही' चे वा निवडक, अल्पजनांच्या शासनाचे रुप धारण करते

अभिजनवादी सिद्धांताचा असा दावा आहे की, सत्तेच्या उपाययोजनांच्या पातळीवर शासक आणि शासित वर्गात समाजाचे विभाजन अटळ आहे ; म्हणून लोकशाही व्यवस्थे अंतर्गत जेथे वरवर पाहता सर्व निणर्य लोकसंमतीने घेतले जातात. तिथे वास्तविकता या निवडक लोकांसाठीच निर्णय घेतले जातात. आणि जनसामान्यांच्या गळी उतरवून त्यास लोकसंमतीची मोहर लावणयात यशस्वी होतात. दुसऱ्या बाजूला, समाजवादाचे समर्थक 'वर्गहीन' समाजाचे स्वप्न पाहतात. मात्र त्यांचे स्वप्न साकार होण्याची कोणती शक्यता दिसून येत नाही. जर्मन समाजशास्त्रज्ञ मॅक्स वेबर (१८६४-१९२०) याने अभिजनवादी सिद्धांताने प्रभावित होऊन लोकशाहीची नवी व्याख्या मांडण्याचा प्रयत्न केला. त्याने प्रतिपादन केले कि, लोकशाहीस जनसंमतीव्दारा चालणारे शासण मानणे योग्य नाही. म्हणून त्याने लोकशाही व्यवस्थेस 'नेतृत्वासाठी चाललेली स्पर्धा' अशी संज्ञा वापरली. अमेरिकी अर्थतज्ञ जोसिफ शुंपीटर (१८८३ - १९५०) याने मॅक्स वेबरच्या विचारांचे अनुकरण करताना आपल्या 'कॅपिटॅलिझम, सोशालिझम आणि डेमोक्रसी' या प्रमुख ग्रंथात पुढील विचार मांडले. त्यांच्यामते ही बाब खरी आहे की, लोकशाहीत सर्व सामान्य लोकांव्दारे नव्हे तर राजकीय नेतृत्वाव्दारे निर्णय घेतले जातात परंतू लोकांच्या मताचा पाठींबा मिळवण्यासाठी नेतृत्वामध्ये मुक्तसंचार होत असतो. म्हणून अन्य शासनव्यवस्थांच्या तुलनेत लोकशाहीचे वेगळेपण हे आहे की, यात राजकीय नेतृत्व सत्तेचा निरंकूश मनमानीपणे वापर करु शकत नाही, तर ते राजकीय बाजारात अधिकाधिक ग्राहकांना आकर्षित करण्यासाठी अधिक आकर्षक नीती आणि कार्यक्रम सादर करण्याचा प्रयत्न करतात.

विख्यात अमेरिकी विचारवंत सी. राईट मिल्स (१९१६-६२) याने आपल्या 'द पावर इलिट' या ग्रंथात अभिजनवादी सिद्धांताचे एक नवे संस्करण प्रस्तुत करण्याचा प्रयत्न केला आहे; ज्यास त्याने 'सत्ताधारी अभिजन'(Power Elite) ही सज्ञा वापरली आहे. मिलने

समाजाचे जे जटिल चित्र रेखाटले आहे.त्यात सत्ता हाच मुख्य आधार बिंदू आहे. त्याने असे सुचवले की, भिन्न - भिन्न समाज आणि भिन्न - भिन्न युगात सत्तेचे रुप बदलत असते, परंतू सत्ता ही नेहमाच समाजाच्या केंद्रस्थानी राहते. संपूर्ण मानवी आंतरक्रियात अभिजन आणि सर्वहारा, देशिय व परके, श्रेष्ठ आणि कनिष्ठ अशी विभागणी आढळून येते. हे सर्व संबध सत्तेच्या प्रयोंगाची साक्ष देतात. म्हणून समाजशास्त्रीच आकलनात याचा शोध घेणे गरजेचे आहे की, एखादया समाजात सत्तेची प्राप्ती आणि उपभोग या बाबतीत कोणता वर्ग अग्रस्थानी असतो.

मिल्सने असा दावा केला की, युद्धोत्तर अमेरिकेत राजकीय लष्करी आणि व्यापारी अल्पजनांनचे शासन हि राष्ट्रीय पातळीवर सर्व निर्णयांच्या संदर्भात त्यांची निर्णय प्रक्रियेतील मक्तेदारी लोकशाही प्रक्रियेत कुरघोडी करताना दिसते. आणि प्रसारमाध्यमे या प्रक्रियेस विकृत करतात. अशा प्रकारचा विचार मांडून मिल्सने सामाजिक संशोधन कर्त्याच्या पलीकडे जाऊन सामाजिक समिक्षकाची भुमिका बजावली आहे.

हा वर्ग समाजातील धोरणात्मकदृष्या महत्वाच्या स्थानावर आपले वर्चस्व प्रस्थापित करतो. अभिजन वर्ग असा जागृत आहे की, त्याचे सदस्य परस्पर सदभावना , सहिष्णुता, आणि सहकार्याच्या आधारे परस्परांच्या सत्तास्थानास बळकट करण्यासाठी सहाय्य करतात. सर्वसामान्यांच्या दृष्टीने हा वर्ग केवळ संपत्ती,पद, प्रतिष्ठाच नव्हे तर चारित्र्याच्या दृष्टीने देखील उत्तम पातळीवर असतात. त्या वर्गास योग्य - अयोग्य , नीती- अनिती यांच्याशी कोणताही मतलब नसतो. केवळ सत्ता प्राप्त करण्यासाठी व आपले प्रभावी स्थान कायम ठेवण्यासाठी मोडतोडीचे राजकारण करण्यातच रस असतो. अशा प्रकारची संवेदनाशिलता एका उच्चतम अनैतिकतेला जन्म देते. जी अमेरीकी कॉर्पोरेट सत्तेच्या संघटीत बेजबाबदारीस चालना देते.

**टिकात्मक मूल्यमापण (A critical Appraisal) :**

अभिजनवादाच्या प्रारंभीच्या सिद्धांतकर्त्यानी सत्तेस उपभोगाचा योग्यता प्रतिभा आणि नेतृत्वगुण या घटकाशी संबध जोडण्याचा प्रयत्न केला. त्यांनी सर्व सामान्यांच्या अंगी असणाऱ्या निष्क्रियता आणि अयोग्यता या वैशिष्टयानांच त्यांच्या परावलांबनास जबाबदार मानले आहे. काही लेखक विचारवंतानी अभिजनवर्गाच्या स्वार्थमूलक प्रवृत्तीकडे अंगुली निर्देश केला असला तरी हा सिद्धांत अभिजनवगाचे समर्थन करताना दिसतो.

अभिजनवादी सिद्धांताची प्रारभिक मांड़णी जनसामान्यांच्या विविध पद्धतीकडे अपेक्षित लक्ष देत नाही तर अभिजनांच्या नेतृत्वास जनसामांन्याच्या दृष्टीने स्वभाविकपणे ग्राहय मानते म्हणून हा सिद्धांत सत्ता आणि प्रभाव यात भेद करत तर प्रभाव म्हणजे सत्तेची अभिव्यक्ती होय असे मानतो. सत्ता - सिद्धांताच्या परिभाषेत सांगायचे झाल्यास मोस्का आणि मिचेल्स यांनी राजकीय आर्थिक सत्तेकडे दुर्लक्ष करुन वैचारिक सत्तेवर आपले लक्ष केंद्रीत केले परंतु सी. राईटस मिल्स या विचारवंताने तिन्ही प्रकारच्या सत्तेच्या आयामाकडे पुर्णपणे लक्ष दिले.

ज्या लेखकांनी अभिजनवादी सिद्धांताच्या संदर्भात लोकशाही व्यवस्थेची नवी परिभाषा माडंण्याचा प्रयत्न केला गेला ते हे सिद्ध करु शकले नाहीत की, लोकशाहीत सत्ता सर्वसामान्य जनसमुहास आपल्या साधारण परिस्थितीवर प्राप्त होते. सी. बी. मॅकफर्सन [१९११-८७] ने आपल्या 'डेमोक्रॅटिक थिअरी' - एसेज इन रिट्रायवल' (१९७३) या सुप्रसिद्ध ग्रथांत असे नमुद केले की, लोकशाही विषयक अभिजनवादी सिद्धांताचे लोकशाहीस एका मानवतावादी आकांक्षेच्या व्यापक स्तरावरुन खाली खेचुन बजारसंतुलनच्या अवस्थेत रुपांतरीत केले आहे.

मार्क्सवादी असे मानतात की, समाज मुख्यतः खाजगी संपत्तीच्या मालकीच्या आधारे प्रभुत्वशाली व पराधीन वर्गात विभागला जातो. अभिजनवाद या मांडणीला बाजुला सारुन 'सत्तेलाच' सामाजिक विभागणीचा आधार बनवतो आणि ही सत्ता कायम ठेवण्यासाठी भिन्न - भिन्न पद्धतीचे विश्लेषण देतो. या दृष्टीने हा सिद्धांत तर्काधिष्ठीत वाटतो. आजच्या स्पर्धात्मक युगात श्रीमंत तसेच सत्ताधारी वर्ग आपली सत्ता टिकवीण्यासाठी प्रचलित व्यवस्थेत विविध प्रकारे मोडतोड करतात. ते आपल्या निर्णय क्षमतेच्या आधारे समाजातील विकाससंधी मर्यादित करतात. अशा तऱ्हेने सर्वसामान्याना या संधीपासून वंचित ठेवण्याचा ते प्रयत्न करतात. जेणेकरुन सर्वसामान्यांना आपल्या उदारनिर्वाहासाठी अधिकाधिक परिश्रम करणे अटळ बनेल. अशा रितीने अभिजन वर्ग आपली सत्ता आणि संधीचा उपयोग आपली सत्ता टिकविण्यासाठी आणि वृद्धिंगत करण्यासाठी करतो त्यामुळे समाजातील 'जैसे थी' परिस्थिती कायम राहते. या दृष्टचक्राला भेदण्यासाठी समाजातील वंचित आणि उपेक्षित वर्गास सत्तासंपन्न करण्याचे उपाय योजणे अत्यावश्यक आहे.

**आपली प्रगती तपासा :**

१) अभिजनवाद म्हणजे काय ? राज्याचा अभिजनवाद सिद्धांताची चर्चा करा.

## ५.३ अनेकसत्तावादी सिद्धांत (PLURALIST) :

वर्गवर्चस्व , अभिजनवाद आणि स्त्रिवादी सिद्धांत असा दावा करतात की, सत्तेचा अवलंब समाजाला दोन मोठ - मोठया गटांत विभाजीत करतो; परंतू सत्तेच्या अनेक सत्तावादी - सिद्धांतात असे मानले जात नाही. या सिद्धांताच्या मते, समाजातील सर्व सत्ता ही एखादा वर्ग वा गटाच्या हाती केंद्रित झालेली नसते. तर अनेक समुहात वितरीत झालेली असते. या समुहास प्रभुत्वाशाली आणि परिधिन समुहाच्या वर्गवारित बंदिस्त करता येत नाही तर सर्व समुह परस्पराश्रयीत असतात; त्यामुळे आंतरसंबध साधत असताना परस्परांच्या सत्तेत समतोल साधण्याचा प्रयत्न करतात. सार्वजनिक अथवा राजकीय निर्णय या संतुलनाच्या प्रक्रियेचाच परिपाक असतो. हा सिद्धांत समजातील सत्तेच्या वितरणाचे विश्लेषणही करतो आणि या विश्लेषण योग्यही ठरवतो. सत्ता विश्लेषण विषयक या दृष्टीकोनास 'गट परिप्रेक्ष्य ' हि सज्ञा वापरली जाते.

वास्तविक पाहता गट -सिद्धांत उदारमतवादी लोकशाही व्यवस्थेतील त्या प्रक्रीयेचे अंगुलीनिर्देश करतो ज्याव्दारे लोकांच्या परस्पराविरोधी हितसंबधात समन्वय प्रस्थापित करण्याचा प्रयत्न केला जातो. या सिद्धांताच्या मते, उदारमतवादी लोकशाही म्हणजे सापेक्षतः स्वायत्त असणाऱ्या गटांमधील वाटाघाटीची प्रक्रिया होय. या विचारानुसार उदारमतवादी समाजात मनुष्याला आपल्याला हितसंबधाच्या रक्षणासाठी संघटना बांधण्याचे स्वातंत्र्य प्राप्त

होते. अशा हितसंबधी गटाच्या रुपात संघटित होतात. मुक्त समाजात विभिन्न व्यवसायांशी संबधीत लोक, कामगार दुकानदार, व्यापारी, ग्राहक इत्यादी आपापले संघ बनवत असतात. लोकशाही प्रक्रियेत हे संघ अथवा समुह परस्परात सौदेबाजी करुण अशा धोरणांसाठी आपली सहमती व्यक्त करतात त्याद्वारे त्याच्या परस्परविरोधी हितांत समन्वय प्रस्थापित होऊ शकेल. अशा रीतीने शासन जनसामान्यांचा सहमतीव्दारे चालवले जाते.

समकालीन राजकीय सिद्धांतात रॉबर्ट डालने आपल्या 'ए प्रिफेस टू डेमोक्रॅटीक थियरी' (१९५६) या बहुचर्चित ग्रंथात लोकशाही प्रक्रियेचे असे प्रारुप विकसित केले ज्यास 'बहुतंत्रीय व्यवस्था' (Oligarchy) ही संज्ञा वापरली आहे. या संकल्पनेनुसार लोकशाही समाजात निर्णय निर्धा रणाची प्रक्रिया वर-वर पाहता कितीही केंद्रकारी स्वरुपाची भासत असली तरी वास्तवात ही अंत्यत विकेंद्रीत अशा स्वरुपाची प्रक्रिया आहे. या अंतर्गत अनेक स्वायत्त समुह परस्परात तडजोडी सदैव करतात; म्हणुन सार्वजनिक धोरणानिर्मिती त्या सर्व समुहांच्या आंतरक्रियांचा परिणाम असतो. जे या धोरणासंबधी विशेष रुची असल्याचा दावा करतात. या सिदधांतानुसार धोरणानिर्मिती मध्ये शासनाची भुमिका अंत्यत अल्पशी ठरते; कारण ते विभिन्न स्वायत्त समुहांना केवळ सहमतीच्या स्थितीत नेण्यास साहाय्य करते.

या सिदधांतानुसार सामाजिक दृष्टीने समुदाय कशाही तऱ्हेने विभागला गेला तरी राजकीय दृष्टया सर्व व्यक्ती एकाच समुदायाच्या नागरिक असतात. ते एका सामान्य कायद्याने व सार्वजनिक धोरणाने परिबदध असतात; म्हणुन बहुलावादी राजकीय व्यवस्था अशी व्यवस्था आहे ज्यात विविध प्रकारच्या सामाजिक रुढी, धार्मिक आणि नैतिक विचारांमध्ये सहअस्तित्वासठी अनुकुल परिस्थिती निर्माण केली जाते आणि सर्व नागरिकांना समान राजकिय अधिकार प्राप्त होतात. ते सामाजिक प्रक्रीयेत सहभाग घेतात.

बहुलवादी सिदधांत अशा समुदयासाठी विशेषत्वाने उपयुक्त आहे. ज्यात लोक जात, धर्म, भाषा, संस्कृती इत्यादी आधारे विभागलेले असतात. बहुलवादी राजकीय व्यवस्थे अंतर्गत एकाच भुक्षेत्रात भिन्न - भिन्न जातीचे अनेक भाषा बोलणारे, अनेक धर्म मानणारे आणि विभिन्न परंपरांचे अनुयायी असणारे समूह सामंजस्याने राहु शकतात. या व्यवस्थे अंतर्गत कालांतराने सामाजिक, आर्थिक आणि राजकीय दृष्टया परस्परांशी असतात. यातील काही समुह बहुसंख्यांक तर काही अल्पसंख्यांक असू शकतात. बहुलावादी संविधानिक व्यवस्था सहिष्णुतेला चालना देणारी असते आणि अल्पसंख्याकाच्या अधिकाराने रक्षण करते. जेणेकरुन विभिन्न समुदायातील फुटीरतावादी प्रवृत्तीच्या वाढीस प्रतिबंध घालता येईल.

याशिवाय राजकीय बहुलवादी प्रतिनिधीक शासन - पदधतीच्या कामकाज प्रक्रियेत अधिक सुलभ करण्यात सहय्यकायी ठरते. एखादया महाकाय देशात वा मोठया मतदार संघात लोक-प्रतिनिधी आपल्या मतदारसंघातील प्रत्येक व्यक्तीशी नजिकचे संबध ठेऊ शकत नाही. जेव्हा व्यक्ती आपआपल्या हितसंबधाच्या आधारे भिन्न - भिन्न समुहाच्या रुपात संघटीत होतात तेव्हा हे समुह केवळ आपापल्या सदस्यांचा हितसंबधांना अविष्कृत करतात असे नव्हे, तर सामाजिक पुनर्बांधनीत आपली भुमिका स्पष्ट करुन अशा स्वरुपाच्या धोरणानिर्मितीत सहाय्य देतात की ज्यात सर्व लोकांच्या हितांमध्ये सामंजस्य प्रस्थापीत होऊ शकेल आणि सर्व लोक त्या धोरण्याच्या अधिमान्यतेचा स्विकार करण्यास तत्पर राहतील. म्हणून असा दावा केला जातो की व्यक्ती आणि राज्य या दोहोंमधील 'मध्यवर्ती संस्था ' नागरिकांचा असंतोषस उग्र रुप धारण करु देत नाहीत आणि त्यांच्या मनावर अविवेकी विचार स्वार होणार नाही. याचीही काळजी घेतात.

समुहात कोणताही मतभेद निर्माण झाल्यास ते चर्चा आणि वादविवादाच्या माध्यमातून सोडविण्याचा प्रयत्न केला जातो. त्यात वाटाघाटी सुरू झाल्यानंतर छोटया - छोटया बाबीवरील लक्ष अशा महत्त्वपूर्ण मुददयांवर केंद्रीत केले जाते की, त्यावर विरोधी पक्षाची देखील सहमती प्राप्त होते. बहुलवाद जुन्या आणि नव्या पिढींना एकत्र आणून त्यांच्यातील अंतर मिटीवण्याचे कार्य करतो. थोडक्यात, बहुलवाद भूत, वर्तमान आणि भविष्याला साधणाऱ्या सेतूची निर्मिती करण्याचे कार्य करतो.

**टिकात्मक मुल्यमापन (Acritical Appraisal) :**

सत्तेचा बहुलवादी सिद्धांत उदारवादी लोकशाही व्यवस्थेअंतर्गत अभिजन वर्गाच्या मक्तेदारीचे खंडण करतो. आणि सार्वजनिक निर्णय प्रक्रियेस समाजातील भिन्न समुंहाच्या भुमिकेवर भर देत व्यक्तीसाठी अर्थपुर्ण स्वातंत्र्याची आशा बाळगतो. परंतु व्यवहारात यास अनेक अडचणी व त्रुटिंचा सामना करावा लागते बहुलवाद केवळ निर्णय प्रक्रियेवर लक्ष केंद्रीत करतो, ज्यावर कोणताही निर्णय होऊ शकत नाही.

चार्ल्स लिंडलॉम यांनी आपल्या 'पॉलिटीक्स ॲन्ड मार्केटस' (१९७७) या महत्त्वपुर्ण ग्रंथात हे नमुद केले आहे की या व्यवस्थेवर आधारीत समाजात व्यवसाय आणि संपत्तीवर "गैर लोकशाही " नियंत्रण प्रस्थापित होते. तसेच रॉबर्ट डाल यांनी आपल्या ग्रथांत याचा स्विकार केला की, बहुलवादास खऱ्याखुऱ्या समान राजकीय शक्तीमधील विषमता कमी करण्यासाठी डालने पुर्नवापरास चालना देणाऱ्या नितीचे सर्मर्थन केल्याचे दिसत आहे.

बहुलवादी राज्याच्या तटस्थेवर भर देतात, ते मानतात की प्रतिस्पर्धी समुहाच्या सौदेबादीत राज्य एका तटस्थ परंतु हे सिद्ध करणे कठिण आहे की, शक्तीशाली गंटाच्या संघर्षात राज्य तटस्थ राहते अथवा 'आपल्या हितसंबधी ' उदासीन राहते. पुन्हा राज्याचे 'आपले हित ' हे सामान्य हित की 'सत्ताधारी वर्गाचे हित 'असते हा देखील वादाचा विषय आहे.

बहुलवाद 'वैध प्रतिकार आणि अवैध प्रतिकार " यात भेद करताना काही समुहांवर अन्याय करतो. ते जो समुह आपल्यास सहमती देत नाहीत त्यांना अतिरेकी मानून त्यांची निंदा करतात.

एकंदर , बहुलवादावरील प्रस्तुत टीका त्यातील अभ्यास पद्धतीला त्रुटीकडे आपले लक्ष वेधतो; कारण या त्यांच्या राजकीय अग्रक्रमाना प्रतिबिंबित करतात.

**आपली प्रगती तपासा :**

१) राज्याच्या अनेकतावादी सिद्धांताचे सुक्ष्मपणे परीक्षण करा.

**मार्क्सवादी दृष्टीकोन (Marxist Perspective) :**

मार्क्सवादी दृष्टिकोनानुसार राज्यसंस्था ही काही नैसर्गिक संस्था नाही व नैतिक संस्था सुद्धा नाही. जसे की, आदर्शवादी सिद्धांत मांडतो. हे एक कुत्रिम साधन आहे. परंतू उदारमतवादी सिद्धांताच्या मान्यतांच्या उलट, राज्याचा मार्क्सवादी सिद्धांत राज्याला जनतेच्या ईच्छेची अभिव्यक्ती मानतो. व परस्परविरोधी हितामधील सामंजस्याचे साधन म्हणून स्विकार करतो. मार्क्सवादाच्या मते, राज्य अशा वेळी अस्तित्वात येते. जेव्हा समाज खाजगी संपत्तीच्या आधारावर 'आहे रे' व 'नाही रे' अशा दोन परस्परविरोधी वर्गामध्ये म्हणजे धनवान व निर्धन वर्गामध्ये विभागला जातो. जो वर्ग उत्पादनाच्या प्रमुख साधनांचा मालक बनतो, तो आपली स्थिती मजबुत करण्यासाठी राजकीय सत्तेचा पुरेपूर वापर करतो आणि तोच राज्याचे स्वरुप ग्रहण करतो.

या सिद्धांताची प्रमुख तत्त्वे अशी आहेत -

राज्य प्रभुत्वशाली वर्गाचे साधन आहे. (State is an instrument of the dominant Class) राज्याच्या वर्ग सिद्धांतानुसार राजकीय शक्ती आर्थिक शक्तीच्या हातातली कठपुतळी आहे. आर्थिक शक्तीमुळे संपन्न वर्ग, अर्थात धनवान वर्गच राजकीय दृष्टीकोनातून 'प्रभुत्वशाली वर्ग' बनतो आणि 'निर्धन वर्ग', 'परावलंबी वर्ग' बनतो. अशा तऱ्हेने राज्य समाजाच्या ईच्छेचे प्रतिनिधित्व करीत नाही. तर समाजावर ती लादलेली बाब आहे. राज्य संपुर्ण समाजाच्या हितसंवर्धनाचा स्त्रोत बनू शकत नाही; कारण ते धनवान वर्गाच्या हितसंवर्धनाचे साधन आहे आणि त्याच वर्गाच्या हितसंबंधाना चालना देण्यासाठी ते निर्धन वर्गाचे मोठ्या प्रमाणात शोषण करीत असते.

राज्याचा वर्ग सिद्धांत समाज व राज्य यामध्ये स्पष्ट भेद करुन असे मानतो की, समाज हा अनादिकाळापासून अस्तित्वास असलेली एक नैसर्गिक संस्था आहे; परंतु राज्य ही एक कृत्रिम संस्था आहे. ज्याची निर्मिती ही नंतर झाली. त्याची निर्मिती संपुर्ण समाजाने सर्वांच्या हितसंवर्धनासाठी केलेली नाही, तर धनवान वर्गाने आपला स्वार्थ साधण्यासाठी केलेली आहे; त्यामुळे कोणत्याही काळात कोणत्याही देशात राज्य ज्या अधिकारांची प्रस्थापना करीत असते, ते प्रभुत्वशाली वर्गाचे अधिकार असतात. भलेही त्यामध्ये सर्वसामान्य जनतेला स्वातंत्र्य व समानता देण्याचा कितीही दावा केलेला असो!

**राज्य परावलंबी वर्गाच्या शोषणाचे साधन आहे (State is a means of Exploitation of the Dependant Class) -**

राज्य प्रभुत्वशाली वर्गाच्या हातातील बाहुले आहे. आणि या वर्गाच्या हितांना चालना देण्यासाठी ते परावलंबी वर्गाचे शोषण करीत असते; त्यामुळे राज्याचा आधार नैतिकता व न्याय असू शकत नाही, तर सामाजिक अन्याय हाच असू शकतो. राज्य परस्परविरोधीक वर्गामधील संघर्षाचे समाधान करु शकत नाही, तर ते प्रभुत्वशाली वर्गाच्या हितांसाठी या संघर्षास दाबुन टाकत असते. शासितांच्या सहमतीची भ्रामक जाणिव निर्माण करण्यासाठी व आपल्या अस्तित्वाला नैतिक दृष्टिकोनातून रास्त ठरविण्यासाठी राज्य विचारप्रणालीच्या शक्तीचा वापर करीत असते. राज्याच्या वर्ग सिद्धांताचा प्रवर्तक कार्ल मार्क्स आणि फ्रेड्रिक एंगेल्स यांनी 'कम्युनिस्ट मेनिफेस्टो' (साम्यवादी जाहिरनामा) (१८४८) अंतर्गत लिहिले आहे की, खऱ्या अर्थाने सांगायचे झाल्यास राजकीय सत्ता हे दुसरे तिसरे काही नसुन केवळ ती एका वर्गाची छळ, शोषण करणारी दुसऱ्या वर्गाची संघटीत सत्ता आहे.

राज्याचे हे शोषणकारी स्वरुप इतिहासाच्या प्रारंभापासुनच असल्याचे दिसून येते; परंतू भांडवलशाहीच्या परमोच्च सिमेवर पोहोचल्याने आता हे शक्य झाले आहे की, निर्धन वर्ग शक्तीशाली संघटनेद्वारा क्रांती करेल आणि धनवान वर्गाला सत्तेवर बाजूला करुन आणि स्वतः सत्ता सांभाळू शकेल. जेव्हा सर्व वर्ग सत्ता आपल्या हाती घेईल आणि उत्पादनाच्या प्रमुख साधनाचे सामाजिकीकरण करेल. परंतू अशा प्रकारच्या राज्याशी त्याचा कोणत्याही प्रकारचा 'निहीत स्वार्थ' जोडलेला नसेल. त्यामुळे ते त्याला कायम ठेऊ इच्छिणार नाहीत. यातून वर्गविहीन समाजाचा रस्ता खुला होइल. वर्गविहीन समाजामध्ये राज्याचे अस्तित्व निरर्थक होईल त्यामुळे तेव्हा राज्यविहीन समाजाचा उदय होईल. राज्यविहीन समाजामध्ये प्रशासनाचे कार्य संभळणाऱ्या व्यक्ती संपुर्ण समाजाचे हित आपल्यासमोर ठेवतील.

**समिक्षा (Criticism)** -

राज्याचा वर्ग सिद्धांताचे मुख्य योगदान हे आहे की, त्याने इतिहासाची गती निर्धारीत होणाऱ्या प्रक्रियेत आर्थिक शक्तीची भुमिका स्पष्ट केलेली आहे. आणि हे दाखवून दिले आहे की, शासक वर्ग हाच शक्तीचा मालक असतो. परंतू याची मुख्य त्रुटी ही आहे की, हा फक्त आर्थिक तत्त्वांनाच संपुर्ण सामाजिक जीवनाचा आधार मानतो. आणि अशी अपेक्षा करतो की, उत्पादनाच्या प्रमुख साधनांचे सामाजिकीकरण झाल्यावर सर्व मनुष्य स्वातंत्र्य व समानता यांच्या आधारावर व्यवहार करायला लागतील. आणि समाजात बाह्य नियमन आणि नियंत्रणाची आवश्यकता भासणार नाही. परंतू जसे की, समाजवादी देशामध्ये सोव्हिएत संघ, चीन, पोलंड, इत्यादींच्या अनुभवाद्वारे सिद्ध झाले आहे की, आर्थिक जीवनात समाजवाद प्रस्थापित झाल्यानंतर सुद्धा राजकीय प्रभुत्वाचे नवीन-नवीन रुपे विकसीत होत जातात. आणि त्या आधारावर विशेषाधिकार असणारे नवे वर्ग अस्तित्वास येतात. यातून वर्गहिन समाजाचा उदय होत नाही, तर ताठर श्रेणीबद्ध व्यवस्था विकसीत होते.

समाजवादी देशामध्ये वर्गविहीन विचाराला कारण मागे टाकले होते. इतिहास याची साक्ष देतो की, सत्तेची विषमता त्याच काळामध्ये पुर्व युरोपातील समाजवादी देशामध्ये (हंगेरी, पोलंड, पूर्व जर्मनी, झेकोस्लाव्हाकीया, बल्गेरिया, आणि रुमानिया) समाजवादाचे पतन झाले. ज्यातून ही बाब स्पष्ट झाली की, तेथील समाजवादी पक्षांनी सामान्य जनतेच्या भावनांना पायदळी तुडवून आपली निरंकुश सत्ता कायम ठेवली होती.

**नव मार्क्सवादी दृष्टीकोन (Neo - Marxist Approach) :**

कार्ल मार्क्स (१८१८-८३) आणि फ्रेडरीक एंगेल्स (१८२०-९५) यांच्या मतानुसार, समाजातील आर्थिक उत्पादन व्यवस्था तिचा पाया आहे. राज्य व राजकीय व्यवस्था आणि इमल्याचे स्वरुप त्याच्या पायानुसार बदलत असते. त्यामुळे ते अधिरचनेच्या अन्य भागामुळे राज्याला सुद्धा स्वयंभू मानत नाही. त्यांनी राजकीय शक्तीला आर्थिक शक्तीचे कवच मानून राज्याला केवळ प्रभुत्वशाली वर्गाच्या हातातील कठपुतळीच्या रुपात पाहिले.

जर्मन उदारमतवादी समाजशास्त्रज्ञ मॅक्स वेबरने (१८६४-१९२०) मार्क्सच्या या आर्थिक नियतवादाचे खंडन करुन राज्यसत्तेच्या स्वायतत्तेच्या सिद्धांत प्रस्तुत केला. वेबरने २० व्या शतकाच्या प्रारंभी असा विचार मांडला की राज्याजवळक आपली सामर्थ्यशाली संसाधने असतात; त्यांना अधिमान्य बलप्रयोगाचा असा महत्त्वाचा अधिकार मिळालेला असतो. जो खाजगी हिताच्या कार्यकक्षेबाहेर आहे. त्यांच्याजवळ नौकरशाहीच्या भाषामध्ये असे शक्तीशाली संघटन आहे, जे राज्याची धोरणे निर्माण करीत असते; त्यांची अंमलबजावणी करण्याच्या

प्रक्रियेचे निरिक्षण करीत असते; त्यामुळे राज्यसत्तेला केवळ विशिष्ट हितांच्या रक्षणाचे साधन मानले जाऊ शकत नाही.

इटलीचा तत्वज्ञ अंतानिओ ग्रामशी (१८९१-१९३७) पहीला असा विचारवंत होता, ज्याने मार्क्सवादी राजकीय विश्लेषणांतर्गत राज्याच्या सापेक्ष स्वायतत्तेच्या स्विकार केला. ग्रामशीने भांडवली राज्यात प्रभुत्वाचा संरचनाचे दोन स्तर शोधुन काढले आहेत. १) राजकीय समाज जो राज्याची सत्ता व शक्ती अभिव्यक्त करत असतो व समाजावर आपले प्रभुत्व प्रस्थापित करण्यासाठी बलप्रयोगाचा आधार घेत असतो. आणि २) नागरी समाज पायाच्या जवळ आहे आणि समाजावर आपले प्रभुत्व स्थापित करण्यासाठी संमतीच्या तत्त्वांचा आधार घेत असतो. नागरी समाजाच्या संरचना कुटुंब, पाठशाळा व धार्मिक संस्था. इत्यादी नागरीकांना समाजातील स्वीकृत व्यवहाराच्या नियमांशी परिचीत करुन देत असतात आणि यांना हे शिक्षण देत असतात की, त्यांनी शासकवर्ग व खाजगी संपत्तीप्रती स्वाभाविक सन्मानाचा भान ठेवला पाहिजे. यासंरचना भांडवली समाजाच्या नियमांना अधिमान्यता प्रदान करतात, जेणेकरुन यांच्याकडून होणारा अन्यायसुद्धा न्याय्यच असल्याचे प्रतित होईल.

ग्रामशीने नागरी समाजातील संरचना या अधिमान्यता देणाऱ्या संरचना असतात असे मत मांडलेले आहे. या संरचना भांडवली समाजाला अशा तऱ्हेचे कार्य करण्यासाठी साहायभूत ठरतात की, कोणीही त्याच्या सत्तेला आव्हान करु शकत नाही. साधारणतः भांडवली समाज आपल्या स्थैर्यासाठी याच संरचनाच्या दिव्य कुशलतेवर आधारलेला असतो. जेव्हा कधी नागरी समाज या संरचनाच्या माध्यमातून असहमतीच्या स्थितीचा निराश करण्यात विकल होतो तेव्हा राज्याला तिचे दमन करण्यासाठी राजकीय समाजाच्या बलप्रयोगमुक्त संरचनांची मदत घेण्याची गरज पडते. या साऱ्या विश्लेषणामधून हा निष्कर्ष निघतो की, साम्यवादी आंदोलनाची मुळ रणनिती भांडवलशाही राज्याच्या प्रारुपाला मुळापासून छिन्न-भिन्न करण्यापर्यंतच सिमीत राहता कामा नये, तर त्याने त्या मुल्य व मान्यतांवर प्रहार करण्यातही तेवढीच तत्परता दाखविली पाहिजे, जी समाजामध्ये भांडवली धुरिणत्व (Hegemony) कायम ठेवण्यात सक्रीय भुमिका पार पाडीत असतात.

**आपली प्रगती तपासा**

१) राज्याचा नव मार्क्सवादाच्या सिद्धांताचे सुक्ष्मपणे परीक्षण करा.

## ५.६ सारांश :

राज्याच्या अभिजनवादी सिद्धांताने राज्याच्या प्रशासनावर जास्त भर दिला आहे. तसेच राज्य चालवण्यासाठी विशेष असा ज्ञान संपन्नतेची आवश्यकता आहे. तसेच नागरिकांचा सहभाग सुद्धा तेवढाच महत्त्वाचा आहे.

अनेकतावादी सिद्धांत राज्यातील संस्था व गटाच्या महत्त्व विशद करण्यावर भर देतो. या सिद्धांतानुसार राज्याच्या सत्तेला मर्यादा प्राप्त होतात. राज्याने नैतिकपणे नागरीकांच्या हितासाठी धोरण राबविले पाहिजे. त्यातूनच नागरीकांचा राज्यावरचा विश्वास वाढतो. नव अनेकतावाद लोकशाहीला मिळणाऱ्या तंत्रज्ञानात्मक आव्हानांवर प्रकाश टाकतो. जागरुक माध्यमे आणि लोकमते यामुळे नागरीकांच्या स्वातंत्र्यावर येणारे राज्याचे अतिक्रमण थांबवले जाते.

पारंपारिक मार्क्सवादी सिद्धांत, राज्याला लोकांच्या पिळवणुकीचे साधन म्हणून संबोधतो आणि राज्यहीन समाजरचनेची मागणी करतो. तसेच नव-मार्क्सवादाचा सिद्धांतामुळे राज्याची अनेकतावादी वैशिष्टे व नविन कल्पनांना चालना मिळाली.

## ५.७ प्रश्न :

१) राज्याचा अभिजन सिद्धांत हा आधूनिक लोकशाहीशी संबधीत आहे का ? स्पष्ट करा.

२) राज्याचा अनेवतावादी सिद्धांताचे वैशिष्टे सांगा. नव-अनेकतावादाचा आधूनिक लोकशाहीवरील परिणाम स्पष्ट करा.

३) राज्याच्या मार्क्सवादी सिद्धांताचा आढावा घ्या. नव-मार्क्सवाद हा मार्क्सवादापेक्षा कसा वेगळा आहे स्पष्ट करा.

## ५.८ सारांश :


1) Barry, Noorman, An Introduction to modern political Theory, London, Macmillans, 1981.

2) Held David, Political Theory and the Modern State : Essayp in State Power and Democracy, Cambridge, Pelity press 1989.

3) Heyword, Andrew, Political Ideologies : An Introduction, Houndmills, Macmillians, 1992.


❖❖❖❖

# ६

# सत्ता - अधिसत्ता

**घटक रचना :**

६.० उद्दिष्ट्ये
६.१ संकल्पना - सत्ता
६.२ प्रस्तावना
६.३ सत्तेचे प्रकार
६.४ राजकीय सत्तेचे मोजमाप
६.५ संकल्पना - अधिसत्ता
६.६ अधिसत्तेचे नैतिक आधार
६.७ अधिसत्तेचे प्रकार
६.८ सारांश

## ६.० उद्दिष्ट्ये (OBJECTIVES)

- सत्ता किंवा शक्तीची संकल्पना.
- शक्तीचा अर्थ व स्वरुप स्पष्ट करणे.
- शक्तीच्या विविध सिद्धांताची चर्चा करणे.

## ६.१ संकल्पना सत्ता (POWER)

**सत्ता (Power) -**

**प्रस्तावना -** सत्ता ही संकल्पना सामाजिक आणि राजकीय सिद्धांतात महत्त्वपूर्ण मानली गेली आहे. 'मॅक्स वेबर' यांनी सत्तेची व्याख्या पुढीलप्रमाणे केली आहे.

"सत्ता ही संभाव्यरित्या एका राष्ट्राची भूमिका - सामाजिक संबंध सुधारण्याकरिता आणि त्याचा दर्जा सर्व राष्ट्रामध्ये सर्वोच्च बनवण्याचा प्रयत्न मानला आहे."

## ६.२ प्रस्तावना

'रॉबर्ट डहाल' हे सत्तेला अंतरज्ञानाची कल्पना म्हणतात ज्यामध्ये असे भाकीत करतात की,

१) सत्ता ही स्वाभाविकरित्या कोणत्याही व्यक्तीचे वर्चस्व दुसऱ्या व्यक्तीवर करणे असे समजले जाते.

२) सत्ता ही दुसऱ्यावर अधिराज्य गाजवणे असे समजले गेले.

'मार्क्स' च्या मते, सत्तेची व्याख्या म्हणजे "लोकांची सामुहिक सत्ता होय." 'हेना ॲरेंडा' यांच्या मते, सत्ता ही संभाषणाची कृती करण्याची पात्रता होय.

प्रसिद्ध राजकीय विचारवंत 'मायकल फूकॉल्ट' हे "सत्तेला वेगवेगळी संभाषणे करण्याची प्रक्रिया आहे" असे मानले आहे. ज्यामधून 'ज्ञान' हे प्रकर्षाने प्राप्त होते आणि सत्ता ही स्थापन होते. संभाषणातून सत्ता आणि ज्ञान एकत्र होवून त्यामधून सत्ता ही अनपेक्षीतपने स्थापन होते. परंतु नियम बनवण्याचे अधिकार हे सत्तेनिष्ठ लोकापुरतेच मर्यादित असते.

फुकॉल्ट हे सत्तेसंबंधी तुलना करतात सामाजिक नियंत्रणाची व्यवस्था आणि लोकांवरील शिस्तीची परिस्थिती लादण्याची गरज तसेच ज्ञान व सत्तेची संकल्पनांनी निरीक्षणातून निर्मित होते ही संकल्पना शिस्तप्रिय सत्तेत परिवर्तित होते. फुकॉल्ट असे मत मांडतो की, एकत्रित कारणामुळे आणि सामान्य विधानामुळे ते एका चक्रीय प्रक्रियेचा एका स्थरावर जावून पोहोचतात. ही सत्ता संपूर्ण सामाजिक व्यवस्थेवर पसरते ज्याला संस्थाच्या गटातून आणि व्यक्ती साधनातून पाठिंबा मिळतो.

ही सत्ता सर्व सोप्या रितीने सर्व व्यक्तीवर नियंत्रण मिळविण्यास मदत करते. म्हणजेच सत्तेतून लोकांना भयभीत करण्याच्या प्रयत्न करतात. त्यांच्या मते, सत्ता ही सर्वकेंद्री दृष्टिकोण आहे सत्ता ही काही लोकांची बहूमतावर अधिराज्य गाजवने आहे.

फूकॉल्ट यांच्यावर हेबर मास आणि डेरिंडा यांनी टिका केली आहे. कारण ते उदारमतवादी मुल्यांना आणि तत्त्वज्ञानाला विरोध करतात. परंतु ते गुप्तरित्या त्यांना पाठिंबा देतात काही स्त्रीवादी हे अधिराज्य करणाऱ्यांना त्यांच्या पात्रतेवर आणि क्षमतेवर प्रश्नचिन्ह व्यक्त करतात. कारण की ते पितृसत्तेला पाठिंबा देतात हे स्त्रीवादी या समतेला पर्याय म्हणून अधिराज्याची संकल्पना ही स्त्रीयांच्या सहभागातून निर्माण करण्याचा प्रस्ताव मांडतात.

'सिमॉन डी बुआर' त्यांचे प्रसिद्ध पुस्तक "द सेंकड सेक्स" (The Second Sex) यामध्ये त्यांनी पुरुषांच्या सत्तेला अधिन झालेले आणि स्त्रीयांनी अधिन झालेल्या पुरुषांच्या वर्चस्वाखाली राहण्याची समज मांडली आहे. तिच्या मते, स्त्रीयांना दपडशाहीच्या नावाखाली निकृष्ट दर्जा देण्याचा प्रयत्न करतात यालाच ते खऱ्या अर्थाने अधिसत्ता असे म्हणतात.

## ६.३ राजकीय सत्तेचे प्रकार :

१) 'रसेल'ने राजकीय सत्तेचे
   १) पारंपारिक सत्ता
   २) उघड किंवा नग्न सत्ता
   ३) क्रांतीकारक सत्ता असे तीन प्रकार सांगितले

२) 'लॉसवेलने' राजकीय सत्तेचे
   १) दिखावू किंवा भ्रामक
   २) उघड किंवा नग्न
   ३) विधिवत सत्ता असे प्रकार सांगितले आहे.

३) 'बर्स्टीडने' राजकीय सत्तेचे पुढील प्रकार सांगितले.
   १) प्रगट आणि प्रच्छन्न सत्ता
   २) शक्तीवर आणि सहयोगावर आधारित सत्ता
   ३) औपचारिक आणि अनौपचारिक सत्ता
   ४) प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष सत्ता

याशिवाय केंद्रीभुत सत्ता, विकेंद्रीत सत्ता, प्रभावानुसार सत्ता, मध्यम व उच्च दर्जाची सत्ता असेही राजकीय सत्तेचे प्रकार पडतात.

## ६.४ राजकीय सत्तेचे मोजमाप

रॉबर्ट ढालने राजकीय सत्तेचे अध्ययन करण्याच्या चार पद्धती सांगितल्या आहेत.

१) राजकीय पदसोपान परंपरेतील स्थान
२) जाणकार भाष्यकारांनी केलेले विश्वसनीय मूल्यमापन
३) निर्णयप्रक्रिया, निर्णयप्रक्रियेत सहभागी होणारे लोक, त्यांच्या सहभागाचे प्रमाण ह्यांचे अध्ययन.
४) सत्ताधीशांचे तुलनात्मक अध्ययन.

## ६.५ संकल्पना - अधिसत्ता (AUTHORITY) :

**प्रस्तावना -** अधिसत्ता म्हणजे एखाद्या व्यक्तीचा इतरांवर पडलेला प्रभाव तो ज्या व्यक्तीने मान्य केलेला असून त्यामुळे प्रभाव पाडणाऱ्या व्यक्तीला नियम करणे, आज्ञा करणे, त्याचे पालन करुन घेणे याचा हक्क प्राप्त होतो तेव्हा त्याला अधिसत्ता असे म्हणतात.

उदा. 'अ' चा 'ब' वर प्रभाव आहे असे जेव्हा आपण म्हणतो तेव्हा त्याचे कारण म्हणून 'ब' वर 'अ' चा अधिकार असे स्पष्ट होते. तसेच तो अधिकार अधिमान्य आणि योग्य आहे असे म्हणतो अशा पद्धतीने अधिकारातून निर्माण होणारे संबंध हे व्यक्तीच्या मानसिक आणि नैतिक स्वरुपाचे असतात. परंतु कधी कधी भौतिक साधने आणि शारीरिक बळ यांच्या जोरावर ते इतरावर प्रभाव पाडून अधिकार निर्माण करता येतो.

राजकीय व्यवस्थेत लोक स्वेच्छेचा कायदा किंवा नियमांचे पालन करीत असतात. म्हणून अधिकारांची निर्मिती होते. कायद्याचे पालन करताना त्याचे परिणाम आणि शासकांच्या निर्णयाचे पालन गृहीत धरलेले असतात. यादृष्टिने मॅक्स वेबर सारख्या सामाजशास्त्रज्ञाला राजकीय व्यवस्थेच्या संदर्भात होणाऱ्या अधिकार निर्मितीचे कारण म्हणजे परंपरा, कायदा आणि राजकीय नेत्यांचे अलौकिक गुण असे वाटते.

## ६.६ अधिसत्तेचे नैतिक आधार

कराराच्या तत्वानुसार लोकसंमतीने निर्माण झालेले संविधान हे अधिसत्तेचे अंतिम अधिष्ठान मानता येईल का? असा प्रश्न अधिसत्तेच्या नैतिक दृष्टिकोनातून काही विचारवंतांनी मांडला आहे. 'अर्नेस्ट बार्कर' या विचारवंताने आपल्या सामाजिक व राजकीय सिद्धांत (Social

- Political Theory) या ग्रंथात हा प्रश्न राजकीय बंधन (Political Obligation) या संदर्भात प्रामुख्याने विचारात घेतला आहे. त्याने न्यायाचा सिद्धांत मांडून न्यायतत्त्वानुसार (Principle of Justice) केला आहे. वैधानिकदृष्ट्या संविधान हे अधिसत्तेचे अंतिम स्थान असते. न्यायतत्त्वानुसार ते मानणे योग्य ठरणार नाही. कारण संविधानाचा हेतू काय? प्रत्येक मनुष्याला आपल्या इच्छेनुसार आपला संपूर्ण विकास करण्याची योग्य व आवश्यक ती संधी समाजात उपलब्ध होईल अशा समाजाची रचना याला सामाजिक न्याय असे म्हणतात.

राजकीय सत्ता व सामाजिक सत्ता यामध्ये मेळ प्रस्थापीत झाल्यानंतर राजकीय व्यवस्था स्थिर स्वरुपाची आहे असे म्हणताक येईल. परंतु यामध्ये बेबनाव झाल्याच त्यातून बंडाळी व क्रांती उत्पन्न होते व राजकीय सत्तेचे पुर्नघटन होते.

## ६.७ अधिसत्तेचे प्रकार

राजकीय क्षेत्र सोडून अधिसत्ता समाजाच्या इतर क्षेत्रातही समाजाच्या इतर क्षेत्रातही आढळून  येते. कुटुंब, गट व समुह, धार्मिक पंथ, किंवा व्यावसायिक संघ यामध्ये अधिसत्तेचे संबंध येतात, सत्तेचे निरनिराळे प्रकार आहेत. उदा. पितृसत्ता (Patriarchal Authority), माता-पित्याची सत्ता (Maternal and Patenal Authority) आणि गटसत्ता (Group Authority) इ. मॅक्स वेबर याने अधिमान्यता (Legitimacy) या आधारावर अधिसत्तेचे तीन प्रकार सांगितले आहेत.

### १) वैधानिक व विवेकसंपन्नसत्ता (Legal-Rational Authority) :

समाज, राज्य यांचे विधिनियम आणि लोकांची विवेकशक्ती यात अधिसत्तेचे अधिष्ठान असते. विधिनियमानुसार ही अधिसत्ता अंमलात येत असल्यामुळे लोक ती मानतात. जे विधिनियम तयार केले जातात ते लोकांच्या विचारांच्या परिषाक असते. सामाजिक जीवनाच्या दृष्टीने जी मुल्ये श्रेष्ठ मानली जातात. त्यांच्या कसोटीला हे विधिनियम उतरत असतात. शक्ती धारण करणारा अधिकारी आदेश देतो पण हा आदेश स्वतःच्या लहरीनुसार देत नाही तर ज्या नियमाचे आधारे तो शक्तीचे पद धारण करतो त्या नियमाचे बंधन त्याच्यावर आदेश देत असतात.

अनेक लोकांच्या सहजीवनातून अविष्कृत होणारी जीवनाकृती जिला आपण संस्था म्हणतो तिचे काही नियम असतात. तिलाच विधिनियमाचे स्वरुप प्राप्त होते. तिच्या कार्यक्षेत्राची मर्यादा निश्चित केली जाते त्या आधारे अधिकाऱ्यांच्या अधिसत्तेचे न्यायक्षेत्र देखील निर्धारीत केले जाते.

### २) संमोहक अधिसत्ता (Charismatic Authority) :

या प्रकारची अधिसत्ता नैसर्गिक देणगी स्वरुपाची असते अशा अधिसत्तेचा आधार लोकांचा विश्वास हा असतो. सत्ताधारी व्यक्तीच्या ठिकाणी काही अलौकिक गुण आहे असा लोकांचा समज असतो. उदा. हिटलर, नासेर, सुकार्नो व पंडीत जवाहरलाल नेहरु यांच्या ठिकाणी असे संमोहक व्यक्तिमत्त्व होते.

संमोहक हा गुणात्मक विशेषीकरणाचा एक प्रकार आहे. त्याचा संबंध हा बाह्य स्वरुपाच्या गोष्टीपेक्षा आंतरिक स्वरुपाच्या गोष्टीशी जास्त असतो. संमोहक अधिसत्ता ही स्थिर स्वरुपाची नसते.

अधिमान्यता हे अधिसत्तेचे विशिष्ट लक्षण होय शक्ती, बल या पासून ती अगदीच भिन्न असते. कार्यभागाची जी क्रमपदपरात्मक पद्धती निर्माण झालेली असते. तिच्या अंतर्गत वापर होत असतो. उदा. पिता-पुत्र, शिक्षक-विद्यार्थी, शासक-शासित इ. हे अधिसत्तेचे प्रतिक आहेत. सर्वसाधारण परिस्थितीत अधिसत्ता अभाव स्वरुपात स्थित असते ती अवमानली गेल्यास तिचे व्यक्तित्व जाणवते, अधिसत्ता काही निर्बंधकाना अंकित असते. उदा. संविधान, आंतरराष्ट्रीय विधिनियम इ.

### ३) पारंपारिक अधिसत्ता (Traditional Authority) :

पारंपारिक जीवनात परंपरा या आधारावर चालत आलेल्या हुकुमतीच्या स्वरुपाच्या गोष्टी यानुसार अंमलात येणारी सत्ता म्हणजे पारंपारिक सत्ता होय. उदा. पितृसत्ताक पद्धती.

कुटुंबातील वडील पुरुषाची हुकुमत त्यातील सर्व लोकांवर प्रस्थापीत होते त्या वडील पुरुषाची सत्ता कुटुंबातील सर्व व्यक्ती मानतात कारण अशी अधिसत्ता सामाजिक आधारावर परंपरेनुसार निर्माण झालेली असते. पित्याची मुलावर, पतीची पत्नीवर आणि मालकाची नोकरावर ही अधिसत्तेचे उदाहरणे होत.

पवित्र व अभंग अशा नियमाची जी पद्धती निर्माण झालेली असते ती या अधिसत्तेचे निर्धारण असते. समाजाच्या बदलणाऱ्या स्वरुपानुसार या पारंपारिक अधिसत्तेचे अधिमान्यताही डळमळीत स्वरुपाची होते. उदा. पतीची पत्नीवरील सत्ता सुधारलेल्या समाजात अधिमान्य म्हणून समजली जात नाही.

## ६.८ सारांश

अशाप्रकारे सत्ता व अधिसत्ता या दोन संकल्पना १९ व २० व्या शतकात अनेक विचारवंतानी आणि लेखकांनी मोठा फरक आहे असे मानले आहे कारण या दोन्ही शतकातील विचारवंत हे 'सत्ता' या संकल्पनेचे विचार करणारे होते त्यांनी सत्ता या प्रश्नाच्या विचार राज्याच्या संदर्भात केला आहे. तसेच अधिसत्तेची कल्पना ही राज्याइतकी जुनी आहे अधिसत्तेचे स्वरुप व तिचे प्रकार निरनिराळ्या काळी वेगवेगळे राहिले आहेत.

**ग्रंथ संपदा**

१) डॉ. विजय देव - राजकीय विश्लेषक कोश
२) के. सागर, सुगम राज्यशास्त्र, सिद्धांत आणि विचार
३) कृ. दि. बोराळकर, राजकीय सिद्धांत.

❖❖❖❖

# ७

# अधिमान्यता - राजकीय बंधन
# (LEGITIMACY - POLITICAL OBLIGATION)

**घटक रचना :**

७.० उद्दिष्ट्ये
७.१ संकल्पना - अधिमान्यता
७.२ प्रस्तावना
७.३ जीवितजग
७.४ व्यवस्था
७.५ अधिमान्यता मजबूत करणारे घटक
७.६ संकल्पना - राजकीय बंधन
७.७ राजकीय बंधनाचे सिद्धांत
७.८ राजकीय बंधनाचे स्वरुप
७.९ राजकीय बंधन व लोकशाहीची पद्धती

## ७.० उद्दिष्ट्ये

- अधिमान्यतेची संकल्पना स्पष्ट करुन अर्थ स्पष्ट करणे.
- अधिमान्यतेच्या वेगवेगळ्या सिद्धांताची चर्चा करणे.

## ७.१ संकल्पना - अधिमान्यता

**प्रस्तावना** - अधिमान्यतेची संकल्पना सेमॉर लिप्सेट यां अमेरिकन विचारवंताने आपल्या 'पॉलिटिकल सायन्स रिव्ह्यू' या मासिकात १९५९ मध्ये मांडली व 'पॉलिटिकल मॅन' या ग्रंथात संकल्पनेचा विस्तारित मांडणी केली.

## ७.२ प्रस्तावना

अधिमान्यतेची कल्पना नवीन नाही. प्लेटोची न्यायाची कल्पना, ॲरिस्टॉलची विधिनियमाची सार्वभौमता, मध्ययुगातील दैवी इच्छा (Divine will) कराराचे तत्त्व, सामाईक ईच्छा (General will) व उपयुक्ततेचे तत्त्व ही सर्व या अधिमान्यतेची स्वरुपे आहेत.

आधुनिक राज्यशास्त्रात शक्ती, प्रभाव आणि सत्ता त्यांच्या संदर्भात अधिमान्यतेचा प्रश्न विचारात घेतला जातो व त्याच्या अभ्यासही अनुभवाश्रित पद्धतीने केला जातो. प्रत्येक राजकीय व्यवस्थेने कोणत्या ना कोणत्या आधारे अधिमान्यता प्राप्त केलेली असते. कराराच्या आधारे शासकीय सत्तेचे समर्थन करण्यात येत होते. बेथंमने उपयुक्ततावादाच्या आधारावर राजकीय संस्थेचे मुल्यमापन केले होते.

अधिमान्यतेचा अर्थ सरकारचे अस्तित्व आणि सत्ता मान्य करण्याचा प्रयत्न मानला आहे. तसेच त्यांची सत्तेत बढती मिळवण्यास बहुमताचे साधन वारपण्याच्या प्रयत्न केला आहे. ज्याच्या शिवाय सरकार आपले अस्तित्व गमावू शकते. आणिबाणीची परिस्थिती म्हणजे अशी परिस्थिती ज्यात सामाजिक व्यवस्था संकटातील परिस्थितीत निर्णय घेवू शकत नाही. आणि त्यामुळे कोलमडून पडण्याची भिती दिसून येते.

हेबरमास हा मार्क्स यांच्यावर समिक्षात्मक सिद्धांत निर्मित करतो. हेबरमास यांनी नित्से फ्राईड यांच्याकडून प्रेरणा घेतली त्यांचे कार्य हे समाजशास्त्रीय कार्य केले जाते तसेच Frankfurt School चे विचारवंत होरख्यामर, ॲडोर्नो फ्रोम ते मार्क्स यांच्या कडून प्रेरणा घेतात टॉलकॉट पार्सन हा ही त्याचे महत्त्वपूर्ण प्रेरणास्थान आहे. कारण की, पार्सन हा सामाजिक संपर्क प्रस्थापित करतो जो अर्थपूर्ण समाजातील कृती आणि त्याच्या सदस्याचा सहभाग यामधील अवलंबनाची परिस्थिती दर्शवतो.

हेबरमास यांच्या मते सामाजिक माहिततून २० व्या शतकातील समाजातील संरचना दिसून येते त्याचे केंद्र म्हणजेच जीवित जग (Life world) आणि व्यवस्था (system) त्यांच्यातील फरक आणि त्यातील सामाजिक जीवन त्याची एक वेगळी जीवनसंस्था आणि वतर्णुकीची रचना आहे. जीवित जग आणि व्यवस्था हे संवादात्मक, आणि निमित्त भुत कृतीचे केंद्र आहेत. हेबरमास असे मत मांडतो की व्यवस्था ही जीवित तंत्रावर अवलंबून आहे.

## ७.३ जीवितजग

जीवित जग ही संकल्पना आजच्या जगातील दिनक्रमाची ओळख करुन देणारी संकल्पना आहे. एडमंड हुस्सेर्ल यांनी 'असामान्यवाद' निर्मित करुन मार्टिन हेडेगर यांना प्रथमता शिकवून त्यातील नैसर्गिक आणि पूर्व सिद्धांतवादी वृत्ती ती सामान्य लोकांचा जगातील वावर वस्तुनिष्ठ पद्धतीने दर्शवते.

जीवित जग हे त्याच्या नावाने अनौपचारिक रित्या आणि विना भांडवलशाही जगात सामाजिक अस्तित्व निर्माण करते. परिवार, संस्कृती, राजकीय जग, जनसंपर्क माध्यम, स्वयंसेवी संघटना इ. अनियंत्रित सामाजिक व्यवस्थेतून वाटले आहे. जिवितजगात वेगवेगळे कार्यक्षमता दिसून येतात. म्हणजेच ज्यामध्ये वाटून घेतलेले पार्श्वभूमीचे ज्ञान तसेच गृहीत धरलेले आणि कारण असलेले यांचा साठा ज्यावर प्रतिनिधी हे सर्वानुमत घेवू शकते. तोपर्यंत हे वाटून घेलेले संदर्भ पार्श्वभूमीत राहतील त्याचे परिणाम गुपीत राहून प्रक्रीया घडत राहते याला सामाजिक एकात्मतेचा प्रवाह समजला आहे आणि तसेच सहमतीचे परिस्थिती निर्माण करण्याची आणि मतभेद टाळण्याचे प्रयत्न दर्शवतात याचाच अर्थ जीवित जग हे स्थितीप्रिय असून ते

मतभेद, गैरसमज आणि असहमतता टाळण्याचे प्रयत्न करतात. ज्यामधून व्यक्ती मधील संभाषण आणि संवाद सुरु राहील आणि सर्वानुमताची परिस्थिती सदैव राहिल व जीवित जग बनेल. जीवित जग हे आवश्यकरित्या समाजातील मतभेद आणि विभागणी करणारे संघर्ष रोखण्यास उपयुक्त ठरते सामान्य परिस्थितीत म्हणजेच कोणतेही संघर्ष न घडणाऱ्या परिस्थितीत जीवित जग हे सर्व प्रकारची ज्ञानाची सुधारणा आणि प्रेषणाचे साधन बनते हे ज्ञान म्हणजेच तांत्रिक, वैज्ञानिक नैतिक आणि प्रत्यक्ष असेल.

## ७.४ व्यवस्था (SYSTEM)

व्यवस्था म्हणजे संरचना आणि स्थापित निमित्तभुत कृतीची रचना होय. ही व्यवस्था दोन वेगवेगळ्या उपव्यवस्थेत विभागली जाते.

१) पैसा
२) सत्ता

ज्याच्यामुळे प्रतिनिधीच्या हेतू सोप्यारितीने पूर्ण होतात पैसा आणि सत्ता ही चालते-फिरते जनसंपर्क माध्यम मानले गेले आहे ती भांडवलशाही आर्थिक व्यवहार आणि राज्यप्रशासन आणि त्यांच्याशी जुळलेल्या संस्था म्हणजेच लोकप्रशासन, नागरी सेवा आणि राजमान्य राजकीय पक्ष यांनी मदत करतात.

हेबर मास, यांच्या मते, पैसा आणि सत्तेची व्यवस्था सामाजिक जीवनात खोलवर असून प्रतिनिधीच्या माध्यमातून नैसर्गिकरित्या निमित्तयुक्त कृती ही हेतूपूर्ण स्वतंत्रपणे सर्वानुमत मिळवण्यात आणि व्यवस्थेचे निर्णय अमंलात आणण्यास प्रयत्न करतात. हेबरमास हा निमित्तभूत बुद्धी प्रामाण्यातून या समस्या न सोडवता निमित्तभूत तर्कशास्त्रीय संस्थेतून राज्य आणि बाजारपेठाच्या अर्थव्यवस्थेतून करते त्याच्या मते, या संस्था महत्त्वपूर्ण आणि आवश्यक सामाजिक कार्य करते. त्यांना बहिष्कृत करणे किंवा त्यांची मदत न घेणे हा त्यावरील उपाय नाही.

## ७.५ अधिमान्यता मजबूत करणारे घटक

१) राज्यातील लोकांची आर्थिक परिस्थिती हितकारक व सुरक्षित ठेवण्याच्या दृष्टिने सत्ताधारी लोक प्रयत्नशील आहेत. असा विश्वास लोकांना वाटावयास हवा.

२) राजकीय पुढाऱ्याची आश्वासने व त्यांना अनुसरुन कृती यात मेळ असायला हवा.

३) सामाजिक मुल्यांना अनुसरुन लोकांनी मान्य केलेली विचारतत्त्व प्रणाली व सत्तेवर असलेल्या राजकीय पुढाऱ्याकडून तिची स्विकृती यावर अधिमान्यतेची शक्ती अवलंबून असते.

४) राज्यातील लोकांमध्ये दृढ स्वरुपात असलेला उच्च दर्जाचा राष्ट्रभिमान पाहावयास मिळतो. तो त्या राज्याच्या अधिमान्यतेला मजबुती प्राप्त करुन देते.

**अधिमान्यता प्राप्त करण्याचे मार्ग -**

१) लोकांवर लादणे
२) शक्ती व प्रभावाचा उपयोग
३) विचारप्रणालीची निर्मिती
४) संसचून साधनाचा वापर
५) राजकीय सामाजिकीकरणाद्वारे
६) सामाजिक मूल्यांची जोपासना

वरील अधिमान्यतेची प्राप्त करण्याचे मार्ग असलेले दिसून येतात.

## ७.६ संकल्पना - राजकीय बंधन (POLITICAL OBLIGATION)

### ७.६.१ उद्दिष्ट्ये :

- राजकीय बंधनाचा अर्थ व संकल्पना स्पष्ट करा.
- राजकीय बंधनाच्या विविध सिद्धांताची चर्चा करा.

**प्रस्तावना -** बंधन म्हणजे कर्तव्य विधीनुसार पार पाडण्यात येणारे कर्तव्य याला वैधानिक कर्तव्य असे म्हणतात. एखाद्या व्यक्तीला विधीनूसार दुसऱ्या व्यक्तीच्या संबंधात एखादी कृती करावी लागते, त्यावेळी त्या व्यक्तीचे ते वैधानिक बंधन समजले जाते. व्यक्ती व्यक्तीच्या संबंधात विधीनुसार पार पाडण्यात येणारे कर्तव्य याला सामाजिक बंधन असे म्हणतात तर नागरिक व राजकीय सल्ला यांच्या संबंधात राजकीय बंधन निर्माण होते. अशा या संबंधाच्या आधारावर नागरिकाला ज्यावेळी राजकीय सत्तेसंबंधी विशिष्ट कृती करावी लागते. त्यावेळी नागरिकाच्या या कृतीला राजकीय बंधने असे म्हणतात.

सामाजिक बंधनाच्या संबंधात एखाद्या व्यक्तीला दुसऱ्या व्यक्तीच्या संबंधात विशिष्ट प्रकाराची कृती करणे बंधनकारक असते.

## ७.७ राजकीय बंधनाचे सिद्धांत

### १) दैवी अधिकाराचा सिद्धांत (The Theory of Divine Origin) :

दैवी इच्छा ही मनुष्य व त्याचे शासन यांच्या दृष्टिने श्रेष्ठ अशी इच्छा होय. या दैवी इच्छेच्या आधारे राजकीय सत्ता निर्माण झाली व म्हणून मनुष्यास ती मान्य करणे बंधनकारक आहे.

सेन्ट थॉमस ऑक्विनॉस हे या सिद्धांताच्या पुरस्कर्ता होते. राजा हा राज्याच्या मुख्य होय व तो आपली सत्ता परमेश्वरापासून प्राप्त करतो. असे या सिद्धांतानुसार सांगण्यात येते. सुरुवातीला या सिद्धांताचे स्वरुप दैवी निर्मिती यासारखे होते. कालांतराने या सिद्धांताला दैवी अधिकाराचे स्वरुप प्राप्त झाले. राजकीय बंधनाचा हा सिद्धांत आज अमान्य झालेला आहे परंतु या गोष्टीवर विश्वास ठेवण्याचा लोकांचा बराच मोठा वर्ग आजही आपणास पाहावयास मिळतो.

**२) पूर्वापार चालू असलेले रीतीरिवाज व परंपरा या आधारावर मांडण्यात येणारा सिद्धांत :**

या सिद्धांताला मान्यतेचा सिद्धांत असेही म्हणतात. राज्यातील लोकांनी राजाचा हा राज्य करण्याचा अधिकार मालमत्तेच्या स्वरुपाचा अधिकार म्हणून त्याची सत्ता ते मानू लागले.

बोदाँ याने आपल्या ग्रंथात अशा स्वरुपाचे मत मांडले आहे. कुटुंब संस्था ही एक नैसर्गिक स्वरुपाची संस्था होय. राज्यातील प्रमुखाची सत्ता ही कुटुंब प्रमुखाच्या सत्तेच्या स्वरुपाचीच आहे. राज्यातील सत्ता देखील राज्यातील लोकांच्या आत्मीयतेच्या भावनेतूनच निर्माण झाली आहे. बोदाँ याचे हे मत आज मान्य होण्यासारखे नाही कारण आजच्या राज्याचे स्वरुप कुटुंबासारखे नाही. इतकेच नव्हे तर कुटुंबातील प्रमुखाची सत्तादेखील आज नाहीशी झाली आहे.

**३) कराराचा सिद्धांत (The Theory of Contract) :**

राज्याची निर्मिती लोकांनी आपसात केलेल्या करानुसार झाली असे या सिद्धांताचे म्हणणे आहे. लोकांनी हा करार सामुदायिक स्वरुपात केलेला आहे.

१) सामाजिक
२) शासकीय

पहिल्या स्वरुपाच्या आधारे समाजाची निर्मिती झाली, व दुसऱ्या स्वरुपाच्या आधारे राजकीय सत्ता निर्माण झाली.

राष्ट्र-राज्य या स्वरुपात तर आपण समाज मानला तर कराराच्या तत्त्वात काही अंशी सत्यता आहे असे म्हणता येईल. ज्या वैधानिक स्वरुपात राज्य प्रगत होते त्या वैधानिक स्वरुपाच्या आधार संविधान होय. संविधान हा एक प्रकारचा राजकीय करारच आहे. या करारानुसार तरी राज्य निर्माण झाले असले तरी संविधान हा राज्याच्या आधार असल्यामुळे राज्य ही कराराच्या स्वरुपाची एक संघटना होय

राजकीय बंधन या अर्थाने कराराच्या स्वरुपाचे बंधन होय असे मानावे लागते.

## ७.८ राजकीय बंधनाचे स्वरुप

राजकीय बंधनाचे स्वरुप दोन पद्धतीने स्पष्ट करता येते.

१) राजकीय बंधन व न्यायाची कल्पना
२) राजकीय बंधन आणि सामाजिक ईच्छा.

अशा दोन बाजू राजकीय बंधनाच्या आहेत. कराराच्या स्वरुपात संविधानाची कल्पना करुन राजकीय बंधनाचा प्रश्न लक्षात घेणे ही एक बाजू व दूसरी बाजू म्हणजे न्याय तत्त्वाच्या आधारावर राजकीय बंधनाचा प्रश्न विचारात घेणे ही होय.

अशा रीतीने जो एक मुख्य प्रश्न आपल्या समोर निर्माण होतो तो म्हणजे कराराच्या स्वरुपात प्रगट झालेली लोकांची सामायिक इच्छा व न्यायतत्त्वाच्या स्वरुपात व्यक्त होणारे सामाजिक नियम यात मेळ प्रस्थापित करणे हा होय.

## ७.९ राजकीय बंधन व लोकशाहीची पद्धती

सामाजिक विचारांच्या मंथनात सर्वाना सहभागी होता आले पाहिजे हीच प्रक्रिया राजकीय क्षेत्राच्या बाबतीत देखील महत्त्वाची मानली पाहिजे अशी केवळ लोकशाहीचया मार्गानेच उपलब्ध होवू शकते. सामाजिक विचाराच्या विकास अशा या संघर्षात्मक प्रक्रियेच्या आधारे न मांडता ॲरिस्टॉटलने सहयोगाची योजना या स्वरुपात जो सामाजिक विचारांचा विकास मानला आहे तो मान्य करणे योग्य होईल. कारण असा विकास लोकशाहीच्या तत्त्वाला अनुसरुन होत असतो.

अशारीतीने राजकीय बंधनाच्या संदर्भात हा लोकशाही मार्ग फार आवश्यक व महत्त्वाचा मानला पाहिजे.

**ग्रंथसंपदा -**

१) प्रा. रा. अं. तिजारे, डॉ. व. मा. पेशवे, आधुनिक राजकीय सिद्धांत.
२) डॉ. विजय देव, राजकीय विश्लेषक कोश.
३) ओ. पी. गौबा, राजकीय संकल्पना आणि विचारप्रणाली.
४) कृ. दि. बोराळकर, राजकीय सिद्धांत.

❖❖❖❖

# ८

# कायदा, स्वातंत्र्य, हक्क
# (LAW, LIBERTY, RIGHTS)

**घटक रचना :**

८.० उद्दिष्ट्ये
८.१ प्रस्तावना
८.२ कायद्याचे मुलस्त्रोत
८.३ कायद्याचे सिद्धांत
८.४ कायद्याचे वर्गीकरण
८.५ संकल्पना - स्वातंत्र्य (Liberty)
८.६ सकारात्मक आणि नकारात्मक स्वातंत्र्य
८.७ संकल्पना - हक्क (Rights)
८.८ हक्काची वैशिष्ट्ये
८.९ हक्कांचे वर्गीकरण
८.१० हक्कांचे सिद्धांत

## ८.० उद्दिष्ट्ये - कायदा

- कायद्याची संकल्पना आणि अर्थ स्पष्ट करणे.
- कायद्याच्या विविध सिद्धांताची आणि स्त्रोताची / उगम चर्चा करणे.
- कायद्याच्या वर्गीकरणाचे विश्लेषण करणे.

## ८.१ प्रस्तावना

**प्रस्तावना -** कायदा हे सार्वभौमत्वाचे वाहन असते. सार्वभौमत्व कायद्याच्या स्वरुपात अविष्कृत होते आणि प्रत्ययास येते. कायद्यातून असे व्यक्त न झाल्यास सार्वभौमत्व ही केवळ एक सैद्धांतिक संकल्पनाच उरते. कायद्यामधूनच तिला संदर्भ आणि अर्थ लाभतो.

कायदा म्हणजे काय? तर सामाजिक जीवन नियंत्रित करणारे अनेक संकेत, नियम किंवा अटी असतात पण त्या सर्वांना कायदा असे म्हणत नाही. राज्यसंस्थेने घालून दिलेले व

अमलात आणलेले नियम कायदा या संज्ञेला पात्र ठरतात. 'लॉ' या कायद्यासाठी इंग्रजीत असलेल्या शब्दाची उत्पत्ती लॅग शब्दापासून झाली असून त्याचा अर्थ ते स्थिर व टिकावू असते असा होतो. राज्यसंस्थेच्या सभासदासाठी घालून दिलेले जे वर्तननियम राज्यसत्तेच्या यंत्रणेमार्फत अमंलात आणले जातात आणि ज्यांचा भंग केल्यास शिक्षा होते. त्यांना कायदा असे म्हणतात.

विशिष्ट भूभागावर कायद्याखातर सुसंघटित झालेला जनसमूह ही राज्यसंस्थेची वुड्रो विल्सनने केलेली व्याख्या त्यामुळेच अर्थपूर्ण ठरते. कायद्याचा विकास आणि राज्यसंस्थेचा विकास या दोन्ही प्रक्रिया समांतरपणे घडून आल्या आहेत. त्या दोन्ही पैकी कोणत्याही एकाच्या वाटचालीचा विचार दुसऱ्याची वाटचाल लक्षात घेतल्यावाचून करणे अशक्य आहे. कारण अनेक बाबतीत राज्यसंस्थेचे कार्य व अधिकारकत्व हे कायद्याशी समकक्ष असते. अधिसत्ता चालवण्यावर राज्यसत्ता आपला दावा सांगू शकते. ती कायद्याच्याच बळावर आणि त्या अधिसत्तेच्या अंमलबजावणीला दिशा व निश्चितीही मिळते ती सुद्धा कायद्यामधूनच राज्याच्या बहुतेक सर्वच संस्थांच्या व व्यवहारांच्या मुळाशी या ना त्या प्रकारचा कायदा असतोच.

कायद्याची काही ठळक वैशिष्ट्ये सांगता येतील.

१) कायद्यासमोर सर्व समान हे तत्त्वज्ञान सर्वसामान्य झालेले असल्यामुळे कायदा सर्वांना सारखाच लागू असतो.

२) लोकशाहीत कायद्यापेक्षा कोणीही श्रेष्ठ नसतो.

३) कायद्याच्या पाठीशी राज्यसंस्थेची सार्वभौम सत्ता उभी असते.

४) कायद्याची रचना काटेकोर शब्दात केली जाते आणि त्यातच त्याचा भंग करण्याच्या शिक्षेचाही उल्लेख असतो.

५) कायद्याच्या संबंध व्यक्तीच्या बाह्य वर्तनाशी असते.

## ८.२ कायद्याचे मुलस्त्रोत

कायद्याच्या परिभाषेत सांगायचे झाल्यास राज्यसंस्था हाच सर्व कायद्यांचा मुक्तस्त्रोत असतो. कारण राज्यसंस्थेखेरीज अन्य कोणतीच संस्था कायदा करु शकत नाही.

### १) धर्माज्ञा -

आदिम समाजाचे नियंत्रण बव्हंशी धर्मसंस्थेकडून मिळालेल्या आज्ञांनी किंवा आदेशांनी होत असे. आधुनिक समाजात प्रचलित असलेल्याचे दिसून येते. राज्यसंस्था आणि कायदा यांच्या विकासात धर्माने महत्त्वाची भुमिका पार पाडली आहे.

### २) रुढी -

रुढी समाजाच्या मानसिकतेतील इतक्या खोल रुजलेली असतात की त्यांचे मूळ शोधून काढणे अशक्य असते. सार्वत्रिक सवयी, कौटुंबिक प्रथा, यातून रुढीना आकार मिळतो. दीर्घकाल टिकून राहिलेल्या रुढी व प्रथा अशाप्रकारे कायद्यात रुपांतरीत होतात.

**३) न्यायालयीन निवाडे -**

आधुनिक समाजात न्यायालयीन निवाडे हा कायद्याचा महत्त्वाचा मूलस्त्रोत आहे. भारताचे सर्वोच्च न्यायालय हे अभिलेखाचे न्यायालय आहे. लेखी कायद्यात जेव्हा संदिग्धता किंवा अस्पष्टता असते तेव्हा ती काढून टाकून अर्थनिश्चय करण्यासाठी न्यायाधीश जे निर्णय देतात त्यातून कायद्यात बरीच भर पडत जाते.

**४) समन्याय वृद्धी -**

तेव्हा अस्तित्वात असलेला कायदा न्याय करण्यास अपुरा आहे. कारण त्यात पुरेशी स्पष्टता नाही किंवा आवश्यक ती तरतूदच नाही. असे जेव्हा न्यायाधीशाला जाणवते तेव्हा तो स्वतःच्या न्यायबुद्धीला कौल लावतो. एका परीने अशावेळी तो न्यायाधीश नव्या कायद्यालाच जन्म देत असतो. या मागे तत्त्व असे आहे की नैतिक न्याय ही फार मोठी व्यापक गोष्ट आहे. कायदा हे तिचे एक अतिमर्यादित व त्रुटिपूर्ण आविष्कारण आहे.

**५) कायदेनिर्मिती -**

कायदेनिर्मिती किंवा विधिविधान हे राज्यसंस्थेचे एक महत्त्वपूर्ण कार्य असून त्यासाठी प्रत्येक शासन व्यवस्थेत कायदेमंडळाची योजना केलेली असते. प्रत्येक देशातील संविधान किंवा कायदे हे कायदेनिर्मितीची विशिष्ट पद्धती निर्धारित करतात.

## ८.३ कायद्याचे सिद्धांत :

**१) नैसर्गिक सिद्धांत -**

कायद्यामध्ये नैसर्गिक सिद्धांत अंतर्गत, जागतीक, व्यक्तीच्या विवेकनिष्ठतेतून निर्माण होते. नैसर्गिकरित्या या कायद्याची निर्मिती ही कायदा आणि नागरी कायदा यातून होते.

**२) विश्लेषणात्मक सिद्धांत -**

कायद्याच्या दूसरा महत्त्वाचा सिद्धांत म्हणजे विश्लेषणात्मक सिद्धांत आहे जे राजकीय शास्त्रज्ञ राजकीय अधिसत्तेच्या किंवा अधिकारातून निर्माण करतात तयाला ते कायदेशीर सकारत्मकवादातून प्रस्थापित होते. ते सार्वभौमत्व राज्यात लिखित व अलिखित संविधानात असते.

**३) ऐतिहासिक सिद्धांत -**

ऐतिहासिक सिद्धांत हा कायद्याच्या आधारे समाजात शांतता निर्माण करत होता. या सिद्धांताच्या मते, सार्वभौमसत्ता कायद्याची निर्मिती करते व अंमलबजावणीही करते.

**४) सामाजिक सिद्धांत -**

सामाजिक सिद्धांत हा ऐतिहासिक सिद्धांताला आपला विषयक मानतो त्याच्या मते, कायदा हा सामाजिकवादाची निर्मिती करतो. व्यक्तिंना समाजात कायद्याची गरज भासू लागली.

कायदेशीर मूल्यातून सामाजिक गरजाची पूर्तता करण्याची गरज कायद्यामधून झालेली दिसून येते.

## ८.४ कायद्याचे वर्गीकरण :

मॅक आयव्हरने कायद्याचे वर्गीकरण राष्ट्रीय कायदा आणि आंतरराष्ट्रीय कायदा यामध्ये केले आहे. सामान्य कायद्याची विभागणी सार्वजनिक आणि खाजगी अशी करुन सार्वजनिक कायद्यामध्ये प्रशासनीय कायदा सर्वसाधारण कायदा असे दोन वर्ग त्याने पाडले आहे.

**१) राष्ट्रीय कायदा -**

राज्याच्या भूधारकावर राहण्याच्या सर्व व्यक्तीवर आणि संस्थावर ज्याचे चर्वस्व चालते त्यास राष्ट्रीय कायदा असे म्हणतात.

राज्यसंस्थेची सार्वभौम सत्ता राष्ट्रीय कायद्याच्या पाठीशी असते. त्या अधिबलनामुळेच राष्ट्रीय कायद्याची प्रभावी अंमलबजावणी शक्य होते.

**२) आंतरराष्ट्रीय कायदा -**

जगातले विविध राष्ट्राचे वर्तन नियंत्रित करणे हे आंतरराष्ट्रीय कायद्याचे प्रयोजन असते. जगातील राष्ट्रे ज्या नियमांना मान्यता देतात आणि पाळतात त्यांच्या मिळून आंतरराष्ट्रीय कायदा होतो.

**३) संविधानिक कायदा -**

राज्यसंस्थेवर शासीत लोकांवर काही निर्बंध घातले जातातच पण त्याचबरोबर शासन हे ही अनिर्बंध असून चालत नाही. नागरिकाचे हक्क सुरक्षित राहावे. व्यक्ती स्वातंत्र्याची रक्षणाची जबाबदारी राज्यकर्त्यांनी पत्करावी प्रत्येक व्यक्तीला न्यायाची व समान संधीची हमी मिळावी ही संविधानीक कायद्याची प्रयोजने असतात.

**४) सामान्य कायदा -**

संविधानाने दिलेल्या अधिकाराच्या वापर करुन कायदेमंडळाने मंजूर केलेल्या कायद्याला सामान्य कायदा असे म्हणतात. संविधानिक कायद्यापेक्षा सामान्य कायदा हा सामान्यतः अधिक लवचिक असतो. धर्म, रुढी, परंपरा इ. घटकांचा ह्यावर पगडा असतो. विशिष्ट पद्धतीचा अवलंब करुन कायदेमंडळ सामान्य कायदा करते. तसेच त्यात आवश्यक फेरबदल ही करते.

**५) सार्वजनिक कायदा आणि खाजगी कायदा -**

सामान्य कायद्याचे हे दोन प्रकार पडतात. सार्वजनिक कायद्यान्वये राज्यसंस्था आणि शासित जनता यांच्यातील संबंध नियंत्रित होतात. तर खाजगी कायदा व्यक्तीच्या व्यक्तीतील संबंधांचे नियमन करते. प्रत्येकाचे स्वातंत्र्य अबाधित रहावे आणि हक्क सुरक्षित रहावेत यासाठी इतर सर्वांच्या हक्कांवर कायद्यान्वये मर्यादा घालण्यात येतात.

## ८.५ संकल्पना - स्वातंत्र्य (LIBTERTY) :

### ८.५.१ उद्दिष्ट्ये :

- स्वातंत्र्याची संकल्पना व अर्थ यांची चर्चा करणे.
- स्वातंत्र्याच्या विविध प्रकाराची चर्चा करणे.
- स्वातंत्र्याच्या उदारमतवादी आणि मार्क्सवादी विचारातील फरक / मतभेद स्पष्ट करणे.

**प्रस्तावना** - प्राचीन ग्रीक लोकांनी स्वातंत्र्याच्या अर्थ राज्यकारभारात भाग घेण्याची संधी असा केला तसेच ग्रीक लोकांनी प्रसंगी राज्याला विरोध करण्याचा अधिकार नव्हता. राज्य व्यक्तीजीवनाचे सर्वस्व आहे.

Liberty हा शब्द लॅटीन शब्द Liber या शब्दापासून तयार झाला आहे. त्याला अनेक अर्थ प्राप्त झाले. समाजात प्रत्येक व्यक्तीला आपला सर्वांगीण विकास करण्यासाठी अनुकुल परिस्थिती असणे हेच तिचे स्वातंत्र्य आणि तिचा हक्क होय. प्रा. 'लास्कीचे' मत तसेच आहे. ते म्हणतात की, 'अधिकार जन्य परिस्थिती म्हणजे स्वातंत्र्य होय.'

समाजातील व्यक्तीला आपला संपूर्ण विकास करण्यासाठी संधी देण्याची परिस्थिती निर्माण करणे म्हणजेच स्वातंत्र्य होय.

मॅकनी या शास्त्रज्ञाच्या मते, स्वातंत्र्य म्हणजे बंधनाचा अभाव नाही तर अनुचित बंधना ऐवजी उचित बंधनाची व्यवस्था होय.

स्वातंत्र्याच्या सिद्धांत हा १७ व्या आणि १८ व्या शतकातील निर्मिती आहे. प्राचीन काळी गट स्वातंत्र्याची संकल्पना ही वैयक्तिक स्वातंत्र्याच्या संकल्पनेपासून विभिन्न आहे. ग्रीक लोकांकरिता स्वातंत्र्य म्हणजे कोणत्याही बाह्य बंधनापासून मुक्त राहणे होय.

हॉलँड यांच्या मते, स्वातंत्र्यातील अडथळा म्हणजे, वैयक्तिक पसंती होय. परंतु 'लॉक' असे मानतो की, स्वातंत्र्य हे पसंतीवर आधारित आहे. त्यातून समानता वगळता येत नाही. त्याच्या मते, स्वातंत्र्य हे नैसर्गिक आणि असंक्रमणिय हक्क आहे.

'रुसो' यांच्या मते, राजकीय स्वातंत्र्य महत्त्वाचे आहे. कारण की जर सर्व लोक सामाजिक कराराचा भाग होतील तर ते कायद्याची अंमलबजावणी करण्यात उपयुक्त ठरते.

जॉन स्टुअर्ट मिल् यांचे पुस्तक 'On Liberty' हे स्वातंत्र्यावर व्यापकरित्या भाष्य करते. मील हा सुरुवातीपासून लोकांचे स्वातंत्र्य आणि राज्यकर्त्याची सत्ता व त्यांचा ऐतिहासिक संघर्ष दाखवतो.

## ८.६ सकारात्मक आणि नकारात्मक स्वातंत्र्य :

मिल् असे मानतो की, सर्व व्यक्तीचे स्वातंत्र्य हे सत्तेच्या अनुपस्थितीत जर बजावले गेले म्हणजेच कोणत्याही प्रशासकीय किंवा सामाजिक ढवळाढवळी पासून मुक्ती देते त्याला नकारात्मक स्वातंत्र्य मानले आहे. नकारात्मक स्वातंत्र्य हे सकारात्मक स्वातंत्र्याविरुद्ध आहे. सकारात्मक स्वातंत्र्य हे काही मर्यादेत किंवा समतेत बजावले जाते. सामाजिक पातळीवर हे स्वातंत्र्य स्वंयम निर्णयावर आधारित आहे. वैयक्तिक सकारात्मक स्वातंत्र्य हे एखाद्या व्यक्तीची निवड आणि उत्तम जीवन जगण्याचे स्वातंत्र्य मानले जाते. परंतू काही वेळा स्वातंत्र्यावर मर्यादा लावण्याचे काम समाजाकडून होते.

मिल् असा युक्तिवाद मांडतो की, प्रत्येक व्यक्तीला स्वातंत्र्य हे त्याचे आयुष्य जगणे आणि घडवण्यात उपयुक्त ठरते. त्यांच्या मते तीन प्रकारचे स्वातंत्र्य आहे.

१) विचारांचे स्वातंत्र्य
२) मत मांडण्याचे स्वातंत्र्य
३) छंद आणि आवड-निवडीचे स्वातंत्र्य

ही स्वातंत्र्ये सर्व लोकांना एकत्रीत राहण्यास उपयुक्त ठरते. त्यातून एकमेकांना हानी करण्यापासून वंचित ठेवते. मील यांचे हे तत्त्व आर्थिक आणि सामाजिक स्वातंत्र्य सुद्धा आत्मसात करण्याची मुभा देते.

**ईसाया बर्लिन (१९०९ - १९९७) -**

बर्लिन हे मुख्यतः उदारमतवादी आणि अनुकूल पाश्चीमात्यवादी त्यांच्या निबंधात १९५८ मध्ये त्यांनी स्वातंत्र्याची संकल्पना मांडली. सकारात्मक आणि नकारात्मक या दोन्ही संकल्पना विरुद्ध आणि तुलनात्मक संकल्पना आहे. नकारात्मक स्वातंत्र्य हे कोणताही अडथळा किंवा बंधन नसने समजले आहे.

ईसाया बर्लिन यांनी १९५०-१९६० या काळात नकारात्मक आणि सकारात्मक तुलनेची कल्पना ही कांट यांच्याकडून घेतलेली आहे. त्याला खोलवर पाठिंबा देण्याचे काम त्यांनी केले.

स्वातंत्र्याचे संकल्पनेचे विश्लेषण हे अनेक उदारमतवादी विचारवंतानी मांडलेले आहेत. या मध्ये फॅड्रीक हायेक हे महत्त्वाचे विचारवंत आहे ज्यांनी स्वातंत्र्य म्हणजे बळजबरीने बहिष्कार समजले आहे.

## ८.७ स्वातंत्र्याचे प्रकार :

**१) नैसर्गिक स्वातंत्र्य -**

समाज व राज्य अस्तित्वात येण्यापूर्वी मनुष्य नैसर्गिक अवस्थेमध्ये होता. त्यावेळेस कोणतेही कायदे नव्हते. कोणतेही बंधन नव्हते. कालांतराने राज्यसंस्था अस्तित्वात आली त्यामुळे नैसर्गिक स्वातंत्र्य संपुष्टात आले.

नैसर्गिक स्वातंत्र्याची कल्पना तत्त्वज्ञांना मान्य नाही. कारण 'नैसर्गिक' या शब्दाच्या अर्थ सांगणे कठीण आहे. त्यामुळे खऱ्या अर्थाने स्वातंत्र्य नसून पराजकता होती नैसर्गिक अवस्थेमध्ये व्यक्तीला निश्चित स्वरुपाचे अधिकार नव्हते व अधिकाराशिवाय स्वातंत्र्य मिळू शकत नाही.

**२) वैयक्तिक स्वातंत्र्य–**

मनुष्याच्या कार्याचे १) वैयक्तिक कार्य २) सामाजिक कार्ये असे दोन प्रकार पडतात.

व्यक्तिवादी आणि अनेक सत्तावादी विचारक वैयक्तिक स्वातंत्र्याचा पुरस्कार करतात. मनुष्याच्या कल्याणासाठी राज्याने व्यक्तिगत प्रश्नामध्ये हस्तक्षेप करु नये असे त्याचे मत आहे.

कल्याणकारी राज्यामध्ये समाजाचे कल्याण करण्यासाठी वैयक्तिक स्वातंत्र्य मयादित करणे आज आवश्यक आहे.

**३) राष्ट्रीय स्वातंत्र्य** -

१८ व्या शतकात राष्ट्रीय स्वातंत्र्याच्या भावनेचा विकास झाला ज्याप्रमाणे प्रत्येक मनुष्याला स्वातंत्र्य आवश्यक असते. त्याचप्रमाणे राज्यालाही स्वातंत्र्य आवश्यक आहे. राष्ट्रीय स्वातंत्र्य याचा अर्थ राज्याचे स्वातंत्र्य अस्तित्व असा होतो. राष्ट्रीय स्वातंत्र्य उपभोगण्यासाठी राष्ट्र सार्वभौम असावे लागते.

**४) राजकीय स्वातंत्र्य** -

देशाच्या शासन कार्यामध्ये स्वतंत्रपणे व सक्रियतेने भाग घेण्याच्या शक्तीला राजकीय स्वातंत्र्य असे म्हणतात. लोकशाही शासनामध्ये हे राजकीय स्वातंत्र्य आवश्यक आहे. उदा. मतदानाचा अधिकार, निवडणूकीत उमदेवार म्हणून उभे राहण्याचा अधिकार इ. राजकीय स्वातंत्र्याची उदाहरणे आहेत.

**५) आर्थिक स्वातंत्र्य** -

राजकीय स्वातंत्र्यामुळे व्यक्तीच्या जीवनाचे प्रश्न सुटत नाहीत. प्रत्येक व्यक्तीच्या अन्न, वस्त्र, निवारा या तीन प्राथमिक गरजा पूर्ण झाल्या नाहीत. तर तिच्या स्वातंत्र्याला अर्थ ठरत नाही. प्राथमिक गरजा पूर्ण करण्यासाठी अर्थोत्पादनाचे स्वातंत्र्य व्यक्तीला हवे. आर्थिक विवंचनेतून मुक्त झाल्याशिवाय व्यक्तीचा सर्वांगीण विकास शक्य नाही.

**६) नागरिक स्वातंत्र्य** -

समाजाचा सदस्य म्हणून व्यक्तीला प्राप्त होणारे स्वातंत्र्य म्हणजे नागरिक स्वातंत्र्य होय. व्यक्तीला सुसंस्कृत जीवन जगता यावे व आपला सर्वांगिण विकास करता यावा म्हणून नागरी स्वातंत्र्य मिळालेले असते.

नागरीक स्वातंत्र्य म्हणजेच नागरिक या नात्याने व्यक्तीला मिळालेला अधिकार होय. उदा. भाषण स्वातंत्र्य, लेखन स्वातंत्र्य, संघटना इ. नागरिक स्वातंत्र्याचा अधिकार अमर्यादित व निरपवाद नसतो. त्यांची हक्काच्या जबाबदारी राज्य आणि नागरिक या दोघावर असते.

**७) नैतिक स्वातंत्र्य** -

मनुष्य नैतिक दृष्ट्या स्वतंत्र असला तरच तो नागरिक, राजकीय, आर्थिक वगैरे स्वातंत्र्याचा उपभोग घेऊ शकतो.

राजा आणि नागरिक आदर्श राहावेत असे विचार प्लेटो, चाणक्य इ. शास्त्रज्ञांनी मांडले.

अशा प्रकारे स्वातंत्र्याची संकल्पना स्पष्ट करता येते.

## ८.८ हक्क (RIGHTS) :

### ८.८.१ उद्दिष्ट्ये :

- हक्काचा अर्थ व संकल्पनेची चर्चा करणे.
- हक्क / अधिकाराचा स्वरुपाविषयी चर्चा करणे.
- हक्क / अधिकाराच्या विविध सिद्धांताविषयी तपशीलवार चर्चा करणे.
- हक्क / अधिकाराच्या प्रकारांची चर्चा करणे.
- संरक्षणासाठी सहाय्यभूत ठरणाऱ्या विविध अधिकारांची / हक्कांची चर्चा करणे.

**प्रस्तावना** - ॲरिस्टॉटल म्हणतो की, राज्य मनुष्याच्या सुरक्षिततेसाठी निर्माण होते व मनुष्याच्या कल्याणाकरिता ते टिकून राहते. मनुष्याचे कल्याण साधायचे असेल तर त्यासाठी अशा प्रकारची परिस्थिती निर्माण केली पाहिजे की, ज्यात त्याचा सर्वांगिण उन्नती होवू शकते.

जीवन म्हणजे केवळ जगणे नव्हे तर उत्तम प्रकारे जगणे होय. जर उत्तम प्रकारे जीवन व्यतीत करायचे असेल तर अशा प्रकारची परिस्थिती निर्माण करणे आवश्यक असते की, ज्यात असे जीवन जगणे शक्य होईल. व्यक्तीच्या अशाप्रकारे सर्वांगिण विकास करावयाचा असेल तर उपलब्ध करुन दिली पाहिजेत. ही साधने म्हणजेच हक्क होय.

हक्क हे व्यक्तीगत हिताचेच साधन नसून सामाजिक कल्याणाचे एक माध्यम आहे. 'बोसाके' यांच्या मते, हक्कामुळे व्यक्तीगत कल्याण तर होतेच परंतु ज्या सामाजिक समुहाचा आपण एक भाग आहोत त्या सामाजिक समूहाचे हित त्यातून साधते.

ॲरिस्टॉटल यांच्या भाषेत सांगायचे म्हणजे सामुहिक हित सुखी जीवन असते. असे सुखी जीवन प्राप्त करण्यासाठी हक्कांची आवश्यकता असते. असे हक्क जर प्राप्त झाले नाही तर व्यक्तीचे कल्याण होवू शकणार नाही.

'लास्की' यांच्या मते, "हक्क समाज जीवनाच्या त्या अवस्था आहेत ज्याशिवाय कोणतीही व्यक्ती आपला सर्वांगीण विकास साधू शकत नाही." हक्कमानवी जीवनात इतके महत्त्वपूर्ण असले तरी राज्य जोपर्यंत हक्कास मान्यता देत नाही तोपर्यंत हक्कास काही अर्थ नसतो. मनुष्याचे जीवन खऱ्या अर्थाने विकसीत करावयाचे असेल तर हक्क ही अशी मूलभूत आवश्यकता आहे की जिला राज्याकडून मान्यता मिळाली आहे.

## ८.९ हक्कांची वैशिष्ट्ये :

### १) हक्क हे समाजातच निर्माण होतात -

समाजाच्या बाहेर हक्क अस्तित्वात राहू शकत नाही. समाजाबाहेर हक्काची संकल्पना करणे व्यर्थ आहे. जेव्हा माणूस सामाजिक समूहात राहतो. त्यावेळी त्याच्या स्वातंत्र्यावर इतरांकडून आक्रमण होण्याची शक्यता असते. त्यावेळी खऱ्या अर्थाने हक्काची आवश्यकता

असते. समूह जीवन नसेल तर हक्काची गरजच भासणार नाही. त्यामुळे हक्क हे केवळ समाजातच अस्तित्वात येतात.

**२) हक्क हे स्वाभाविक असतात -**

राज्य त्यांना निर्माण करीत नाही केवळ त्यांना मानत्या देते. सामाजिक मान्यता पावलेले व आवश्यक असे हक्क राज्याकडून मान्यता पावतात अशा हक्कांना राज्य वैधानिक मान्यता देते व नागरिकांना असे हक्क उपभोगावयास मिळतात. उदा. जीवन जगण्याचाा अधिकार, अत्यंत स्वाभाविक असा अधिकार आहे. राज्याने त्यास निर्माण केले नाही तर त्यास मान्यता दिली आहे व त्यास वैधानिक मान्यता ही दिली आहे.

**३) हक्क व कर्तव्य एकमेकांशी संबंधीत असतात -**

हक्क व कर्तव्य एकाच नाण्याचा दोन बाजू समजल्या जातात. तसे कर्तव्या पालनाशिवाय हक्कांच्या तरतुदीस काही अर्थ नसतो. सामाजिक तडजोडीसाठी व प्रत्येकाच्या स्वातंत्र्य रक्षणासाठी हक्कांची तरतूद केलेली असते परंतू प्रत्येकाचे स्वातंत्र्य अबाधित राखले जाणे आवश्यक ठरवण्यासाठी प्रत्येकाने कर्तव्याचेही पालन केले पाहिजे.

**४) हक्क हा काही विशेषाधिकार नसतो -**

विशेषाधिकार हे एका किंवा थोड्याच व्यक्तीचे कल्याण साधण्याचा प्रयत्न करतात. हक्क हा व्यापक अर्थाने समाजाचे हित साधण्याचा प्रयत्न करते. एखाद्या हक्काची मागणी मी करतो याचा अर्थ असा की मी तो हक्क इतर सर्वांकरिता मागत आहे. संपूर्ण समाजाचे नैतिक हित त्यातून साधले जाते. हक्क हा व्यक्तीगत हिताप्रमाणेच सामाजिक हित साधण्याचा प्रयत्न करतो. म्हणूनच असे म्हणतात की, हक्कांचे स्वरुप कल्याणकारी असे असते. समाजाचे हित ज्यामध्ये आहे, असेच हक्क प्रदान करण्यात येतात. चोरी करण्याचा किंवा आत्महत्या करण्याचा हक्क कोणालाही प्राप्त होवू शकत नाही.

**५) हक्काचे स्वरुप सतत बदलत असते -**

हक्काचे स्वरुप सारखे राहत नाही. मनुष्याच्या गरजा पूर्ण करण्यासाठी हक्कांची निर्मिती झालेली असते. याविशिष्ट गरजा नष्ट होवून जाते. समजा, काही काळानंतर धर्माची अस्तित्त्व नष्टच झाले तर धार्मिक अधिकाराला काहीही महत्त्व राहणार नाही. मनुष्याच्या गरजा सतत बदलत राहातात. त्यानूसार हक्कातही आपोआप बदल होत जातात. म्हणून ते स्थिर स्वरुपाचे नसतात.

**६) हक्क हे निश्चित स्वरुपाचे असतात -**

कोणत्याही समाजात दिलेल्या हक्कांना निश्चित असे स्वरुप असते. प्रत्येकजण वेगवेगळे हक्क मागू लागला तर समाजात गोंधळ उडेल व हक्कांना काहीच अर्थ उरणार नाही. म्हणून कोणत्याही देशात लोकांना जे हक्क दिले जातात त्याचे निश्चित व विवक्षित असे स्वरुप असते.

## ८.१० हक्काचे वर्गीकरण (CLASSIFICATION OF RIGHTS) :

हक्काचे विभाजन दोन भागात करण्यात येते.

१) नैतिक हक्क

२) वैधानिक हक्क

वैधानिक हक्काचे दोन भागात वर्गीकरण होते.

१) नागरी हक्क

२) राजकीय हक्क

### १) नैतिक हक्क (Moral Rights) -

नैतिक हक्काचा संबंध मनुष्याच्या नैतिक जागृतीशी येतो. नैतिक हक्क त्याच हक्कांना म्हणता येते की जे समाजाच्या सामुदायिक, नैतिक व्यवहारावर आधारलेले आहेत. प्रत्येक शिक्षकाचा हक्क आहे की विद्यार्थ्यांनी त्यास योग्य तो मान द्यावा तसेच प्रत्येक विद्यार्थ्यांचे हक्क आहे की, शिक्षकाने त्याच्याकडे पालकाप्रमाणे लक्ष द्यावे. परंतु नैतिक हक्काचे वैशिष्ट्ये अस आहे की, सरकारचे पाठबळ त्याच्या पाठीमागे नसते. एखादा नैतिक हक्क सुरक्षित राहिला नाही तर राज्य कोणतीही कारवाई करु शकत नाही. एखादे वेळी एखाद्या नैतिक हक्काचे उपयुक्तता व समाजाच्या फार मोठा पाठिंबा लक्षात घेता नैतिक हक्कात राज्य वैधानिक स्वरुप देते ही गोष्ट वेगळी आहे.

### २) वैधानिक हक्क (Legal Rights) -

वैधानिक हक्क राज्याकडून मान्यता पावलेले हक्क असतात. राज्याचे पाठबळ त्या पाठीमागे असते. वैधानिक हक्काचा भंग झाला तर सरकारविरुद्ध किंवा एखाद्या नागरिकाविरुद्ध न्यायालयात जाता येते. वैधानिक हक्क हे सर्वांना समान रितीने दिले जातात. जनता, धर्म, वर्ण इ. बाबतीत भेदाभेद केला जात नाही. उदा. राज्य नागरिकांना भाषण स्वातंत्र्याचा अधिकार दते . हा अधिकार देताना राज्य हे ही कटाक्षाने पाहते की, या हक्कामुळे इतराच्या हक्कावर आक्रमण न होता त्या व्यक्तीचा विचार व्यक्त करण्याचा अधिकार मात्र सुरक्षित राहावा.

**वैधानिक हक्काचे प्रकार -**

१) नागरी हक्क (Civil Rights) -

२) राजकीय हक्क (Political Rights) -

### १) नागरी हक्क (Civil Rights) -

मानवी जीवनाचया मूलभूत गरजा पूर्ण करणारे जे हक्क असतात त्यास नागरी हक्क असे म्हणतात. दुसऱ्या भाषेत असे म्हणता येते की, सुखी, सामाजिक, सन्मानपूर्वक जीवन व्यतित करण्यासाठी ज्या आवश्यक अवस्था असतात त्यांना नागरी हक्क असे म्हणतात. नागरिकांच्या मानसिक, नैतिक व सामाजिक विकास या हक्काद्वारेच होत असतो.

आधुनिक राज्यात प्रत्येक राज्यघटनेने या हक्काचा समावेश केला आहे व ते हक्क जर नष्ट होत असतील तर त्या विरुद्ध उपाययोजना केली ्हे. या हक्काचा सविस्तर विचार होतो. उदा. शिक्षणाचा हक्क नसेल तर बौद्धिक विकास होणार नाही, मालमत्तेचा अधिकार नसेल तर त्याला स्वतःच्या आर्थिक विकास करता येणार नाही.

### २) राजकीय हक्क (Political Rights) -

राज्याच्या दैनंदिन व्यवहारात भाग घेता यावा म्हणून ते हक्क निर्माण करण्यात येतात. त्यांना राजकीय हक्क असे म्हणतात. नागरी हक्क जसे वैयक्तिक दृष्ट्या वापरता येतात तसेच राजकीय हक्काचे नसते राजकीय हक्क नागरिक म्हणून वापरण्यात येतात. राज्याच्या दैनंदिन कारभारात भाग घेण्यासाठी प्रामुख्याने या हक्काचा योजना केलेली असते. राजकीय हक्कांमुळेच लोकशाही प्रत्यक्षात उतरविणे शक्य झाले आहे.

आजचा काळ हा लोकशाहीचा काळ आहे. लोकशाहीत लोक ही सार्वभौम असतात. सर्व सत्ता त्यांच्या हाती केंद्रीत असते. ही सत्ता वापरवयाची असेल तर राजकीय हक्क लोकांना देणे जरुरी आहे. त्याशिवाय राज्यकारभारात लोकांना भाग घेता येणार नाही. उदा. निवडणूकीत उभे राहण्याचा अधिकार लोकांना दिल्याशिवाय त्यांना सरकार चालविता येणार नाही.

'गेटेल' म्हणतो की, "जेव्हा राजकीय अधिकार व्यापक प्रमाणावर लोकांना दिले जातात तेव्हा सरकारचे स्वरुप खऱ्या अर्थाने लोकशाहीवादी बनते." म्हणूनच राजकीय स्वातंत्र्य लोकशाहीशी पूरक झाले आहेत.

राजकीय हक्क हे पूढीलप्रमाणे आहेत.

१) मतदानाचा अधिकार
२) निवडणूकीत उभे राहण्याचा अधिकार
३) सरकारी नोकरी प्राप्त करण्याचा अधिकार
४) शासनावर टिका करण्याचा अधिकार
५) न्यायालयात दाद मागण्याचा अधिकार

हे हक्क राजकीय हक्क म्हणून गणले जातात.

## ८.११ हक्कांचे सिद्धांत (THEORIES OF RIGHTS) :

### १) नैसर्गिक हक्कांचा सिद्धांत (Theories of Natural Rigths) -

१७ व १८ व्या शतकात नैसर्गिक हक्काच्या तत्त्वज्ञानाचा फार मोठा प्रभाव पडला होता. हॉब्ज, लॉक, रुसो, स्पेन्सर आणि स्पिनोझा हे विचारवंत त्याचे पुरस्कर्ते आहेत या हक्कांच्या सिद्धातांच्या थोडक्यात अर्थ असा आहे की, मानवाला जे हक्क मिळाले आहेत ते निसर्गाकडून मिळाले आहेत. राज्य किंवा समाज हा हक्काची निर्मिती करीत असते. मनुष्याला जन्म देण्याचे काम निसर्ग करतो.

राज्य किंवा समाज त्याला घटक म्हणून मान्यता देतात. राज्य माणसाला नष्ट करु शकते परंतु निर्माण करु शकत नाही. म्हणूनच या दृष्टिने जीविताचा हक्क, व्यक्ती स्वातंत्र्याचा हक्क आपोआप नैसर्गिक ठरतात. हे हक्क राज्याने निर्माण केलेल नाहीत. मानवाच्या मूलभूत प्रकृतीतच ते आहेत, समाजाचे कार्य सुरळीत चालावे यासाठी जी स्वातंत्र्ये मानवाला आवश्यक आहेत ती सर्व नैसर्गिक हक्क होत.

नैसर्गिक हक्कातील दोषामुळे हा सिद्धांत आज कोणी फारसा मान्य करीत नाही.

**२) कायदेजन्य हक्कांचा सिद्धांत (Legal Theory of Rigths) -**

या सिद्धांताचा मुख्य अर्थ असा आहे की, हक्क हे राज्याने निर्माण केले आहेत. ते नैसर्गिक नाहीत. फक्त राज्याकडून मानवाला हक्क प्राप्त होतात. राज्य निर्माण होण्यापूर्वी व्यक्तीला हक्क नव्हते. हक्कांचा जन्म राज्याबरोबरच झाला जे हक्क, कायदे व्यक्तीला देत नाहीत ते हक्क व्यक्तीला नाहीतच. ते नैसर्गिक मानले गेलेले आहे. हक्क सुद्धा राज्यानेच मान्य केलेले असतात. राज्याने असे हक्क मान्य केलेले असल्यामुळे नैसर्गिक हक्काच्या तत्त्वज्ञानास काहीही अर्थ राहत नाही.

राज्याने अमान्य केलेल्या हक्कांची अंमलबजावणी होवू शकत नाही. राज्याने मंजूर केलेल्या हक्कांची अंमलबजावणी होते कारण राज्याने मान्य केलेल्या हक्कांचा उपभोग प्रत्येक व्यक्तीला घेता यावा यासाठी लागणारी यंत्रणा राज्याने निर्माण केलेल्या हक्कालाच खरा हक्क असे म्हणता येईल. हक्क हे निसर्गाने निर्माण केले आहेत असे मान्य केले तर हक्कामध्ये वाढ होणे शक्यच नाही. कायदेजन्य हक्काच्या सिद्धांतात ही अनेक दोष आहेत. तरीही असे म्हणता येईल की हक्क हे राज्याने निर्माण केले नाहीत पण राज्याने मान्य केल्याशिवाय ते परिणामकारक होवू शकत नाही.

'बार्कर' यांच्या मते, "राज्य हे हक्काचे जवळचे उगमस्थान आहे."

**३) ऐतिहासिक हक्काचा सिद्धांत (Historical Theory of Rigths) -**

या सिद्धांताच्या मते, हक्क इतिहासाने निर्माण केले आहे. हक्काचा उगम प्राचीन काळापासून रुढी, संकेत, चालीरिती, परंपरा यातून निर्माण झाला आहे. म्हणजे त्या हक्काच्या मागे इतिहासाच्या आधार असतो. एखादी रुढी समाजात निर्माण झाली व काही काळ लोटला की त्या रुढीचे हक्कात परिवर्तन होते.

प्राथमिक अवस्थेमध्ये कायदे म्हणजे दुसरे-तिसरे काही नसून समाजमान्य अशी रुढी, संकेत, चालीरिती होत. १६८८ च्या क्रांतीने इंग्लंडमध्ये निर्माण केलेले हक्क मॅग्नाकार्टा, पिटीशन ऑफ राईट्स अशा ऐतिहासिक घटनावर आधारलेले होते. त्याच हक्काचा पुकारा हा क्रांतीरुपात दिसून आला.

समाजात ज्या रुढी सुरु होतात त्यामागे नेहमीच समाजहीत असते असे नाही. हक्क हे गतिमान असल्यामुळे मानवसमाज गतिमान होतो त्यामुळे आज हा सिद्धांत मान्य होत नाही.

**४) हक्काचा समाजकल्याण सिद्धांत (Social Welfare Theory of Rigths) -**

हक्कांचा समाजकल्याण सिद्धांत असे स्पष्ट करतो की, हक्क हे योग्य किंवा अयोग्य हे सामाजिक उपयुक्ततेवर ठरवावे उपयुक्तता आणि सामाजिक हितसंबंध हे हक्कांचे उगमस्थान आहे.

समाजकल्याणाच्या चौकटीत ज्या हक्कांचा अंतर्भाव होतो तो हक्क समाज मान्य करील व व्यक्तीला ते हक्क मिळतील, 'बेंथमने', जो 'उपयुक्ततावादाचा सिद्धांत' मांडला त्यावरच आधारित हक्कांचा हा सिद्धांत आहे. उपयुक्तता ही हक्काची कसोटी आहे त्याच्या मते, समाजकल्याणा विरुद्ध जाणाऱ्या कोणत्याही गोष्टीला हक्क म्हणता येणार नाही. व्यक्तीला समाजकल्याणा विरुद्ध हक्क असूच शकत नाही. उलट व्यक्तीला मिळणाऱ्या हक्कांनी समाजाचा विकास झाला पाहिजे.

हा सिद्धांत मानवी प्रगतीच्या दृष्टीने अत्यंत उपयुक्त ठरलेला आहे. विशेषतः लोकशाही पद्धतीत शासन लोकांसाठीच राबत असते. राज्याचे स्वरुप या सिद्धांतामुळे बदलून गेले असे म्हणता येईल. आजच्या राज्यावर या सिद्धांताचा फार मोठा प्रभाव पडला आहे.

**५) आदर्शवादी हक्काचा सिद्धांत (Idealist Theory of Rights) -**

या सिद्धांताचे पुरस्कर्ते हक्काकडे नैतिक दृष्टिकोनातून बघतात. व्यक्तीचा आत्मीक विकास व्हावा यासाठी त्याला हक्क असतात. या आत्मीक विकासाला चालना देणारी बाह्य परिस्थिती म्हणजेच हक्क असे ते मानतात. मानवी व्यक्तीमत्त्व पूर्णत्वाला पोहचणे हाच हक्काचा हेतू आहे. स्वतःच्या व्यक्तीमत्त्वाचा पूर्ण विकास करणे हाच मानवाचा मूलभूत हक्क आहे. बाकी सर्व हक्क या हक्कापासून निर्माण होतात. माणसाला आवश्यक असलेल्या जीवित, संपत्ती, व्यक्ती स्वातंत्र्य इ. हक्काकडे पाहताना त्यातून व्यक्तित्वाचा कितपत विकास होतो. याच दृष्टिकोनातून पाहिले पाहिजे.

हक्क हे समाजातच निर्माण होतात असे हा सिद्धांत सांगतो. व्यक्तीविकास हा समाजाचातच होतो व स्वतःच्या आत्मीक प्रेरणेने प्रत्येकास आपला व्यक्तीविकास साधता आला पाहिजे. असे हा सिद्धांत मांडतो. हक्कांना नुसता कायद्याचा आधार असण्यापेक्षा नीतीचा आधार असणे योग्यच, व्यक्ती विकास आणि समाजविकास यात हा सिद्धांत सुसंवाद स्थापन करतो.

**ग्रंथ संपदा :**

१) कृ. दि. बोराळकर, राजकीय सिद्धांत.
२) डॉ. भास्कर लक्ष्मण भोळे, राजकीय सिद्धात.
३) मुळ लेखक - ओ. पी. गाबा, अनुवादक - तुकाराम जाधव, ॲन इट्रोडक्शन टू पोलिटिकल थिअरी - राजनीतीशास्त्र परिचय.

❖❖❖❖

# १

# राजकीय संकल्पना: न्याय, समता आणि नागरी समाज

**घटक रचना :**

१.० उद्दिष्ट्ये
१.१ संकल्पना
१.२ न्यायाची व्याख्या
१.३ न्यायाचे सिध्दांत
१.४ संकल्पना, व्याख्या, स्वरुप
१.५ समतेचे प्रकार
१.६ नागरी समाज संकल्पना
१.७ सारांश
१.८ संदर्भग्रंथ सूची

## १.० उद्दिष्ट्ये

- न्यायाची संकल्पना व अर्थ स्पष्ट करणे.
- न्यायाच्या विविध सिद्धांताची चर्चा करणे.
- आर्थिक न्यायाची संकल्पना विश्लेषीत करणे.
- राजकीय न्यायाच्या संकल्पनेची चर्चा करणे.

## १.१ संकल्पना

**प्रस्तावना** - राजकीय सिध्दांतात न्याय, समता आणि नागरी समाज या तीन महात्वाच्या संकल्पना आहेत पारंपारिक काळातील न्याय ही संकल्पना समकालीन काळात सामाजिक न्याय या दृष्टिने उदयास आली. न्यायाची संकल्पना ही वेगवेगळया दृष्टीकोनातून ही पाहिली जाते. उदा. लोकांनुसार वेळेनुसार आणि वेगवेगळया स्थानानूसार न्यायाचे स्वरुप हे बदलत जाते. अशा बदलाचा प्रवाहात न्यायाची संकल्पना ही बदलत जाते.

**१) न्याय:-** राजकीय सिध्दांतात न्यायाची संकल्पना ही कशा पध्दतीने उदयास येते याचे स्पष्टीकरण पूढीलप्रमाणे करता येईल.

राज्यशास्त्रातील महत्वाची संकल्पना म्हणून न्यायाकडे बघितले जाते ही संकल्पना जशी महत्वपूर्ण आहे तशीच ती वादग्रस्त आहे. याचे कारण न्यायाची व्याख्या करताना राजकीय विचारवतांना मध्ये तसेच अनेक विचारवंतामध्ये एकमत दिसून येत नाही न्यायाचे स्वरुप, व्याख्या या काळानुसार बदलत गेली आहे .इंग्रजी भाषेतील न्यायाला 'Justice' म्हणतात त्याचा मुळ शब्द लॅटिन भाषेतील 'Jus' असा आहे. जशचा अर्थ समन्वय साधलेला असा होतो.

## १.२ न्यायाची व्याख्याः

**१) न्यायाची सापेक्ष कल्पना -**

"व्यक्ति , समाज - राज्य यांचा मुल्यव्यवस्थेशी समन्वय व त्यांचा परस्परांशी समन्वय सुसंवाद राहिल्याने जी विशिष्ट स्थिती निर्माण होते त्यातून न्याय स्थापन होते"

अशी सर्वसाधारण न्यायाची सापेक्ष कल्पना हि मांडता येते.

**२) निरपेक्ष न्यायाची कल्पना -**

"व्यक्ती व समाज ज्या आदर्शांना श्रेष्ठ मानतो त्यानुसार वर्तन आणि इतर कोणत्याही तडजोडीला म्हणजेच समन्वयाला नकार"

याचा अर्थ हा की , सापेक्षवादी दृष्टिकोन सुसंवादाला महत्त्व देतो तर निरपेक्ष दृष्टिकोन नैतिक किंवा विशिष्ट मूल्यानांच जीवनाचा एकमेव आधार मानतो. अशी सर्वसाधारण दोन भागात न्यायाची कल्पना मांडलेली दिसून येते. त्यानूसारचं काही विचारवंतानीही न्यायाच्या संकल्पतेची व्याख्या केलेली दिसून येते.

**१) बार्कर -**

"न्याय हे एकत्र आणणारे आणि समन्वय साधणारे राजकीय मूल्य आहे. न्याय म्हणजे सर्वांशी तडजोड आणि एकत्रीकरण यातून निर्माण होणारी एकात्मता होय"

**२) हिवरशिटन आणि मूरहेड -**

"न्याय म्हणजे अशी जीवनव्यवस्था की, ज्यात मानवी व्यक्तिमत्व व त्यांचे आदर्श साध्य होणे अभिप्रेत आहे"

**३) गिलाख्राईस्त:-**

"न्याय ही वास्तविक उदि्ष्टांच्या प्राप्तीवर अवलंबून राहणारी अवस्था आहे संपुर्ण न्याय निरपेक्ष ज्ञान गृहीत घरतो आणि केवळ ईश्वरातच असते."

**न्यायाच्या संकल्पनेचे आधार -**

'अर्नोल्ड ब्रेस्ट ' याने न्यायसंकल्पनेचे चार तात्विक आधार स्पष्ट केलेले आहेत.

१) ईश्वरी नियम
२) निसर्ग नियम
३) विवेक निष्ठा
४) करार

त्याच्यामते या चार पारंपारिक आधारांचा न्याय या संकल्पनेत प्रयोग केला जातो. चारही पारंपारिकाचा आधार परस्परविरोधी भूमिकांचे समर्थन करण्यासाठी केला जावू शकतो.

**न्याय संकल्पनेचे वर्गीकरण -**

ब्रेस्टने न्याय संकल्पनेचे वर्गिकरण् पूढील दोन प्रकारात केले आहे.

**१) न्यायसंकल्पनेची पंरपरानिष्ठ भुमिका :**

न्याय म्हणजे संस्थापक जीवनाशी सुसंवाद होय ही भूमिका प्रत्यक्ष जीवनातील वस्तुस्थितीशी निगडित असते. त्यामुळे ती सापेक्ष भूमिका आहे.

**२) न्याय संकल्पतेची उत्त्तर - परंपरावादी भूमिका -**

ही भूमिका आत्मानिष्ठ मूल्यवादाचा पुरस्कार करते. न्यायमूल्य हे सापेक्ष नसून विचार आणि आदर्श सापेक्ष असते अशी ही धारणा आहे. व्यक्ती, समाजगट किंवा राज्य यापैकी एखादया विशिष्ट घटकाला पोषक ठरणारे मूल्य मानून त्यानूसार संकल्पना मांडणे आणि त्याला अभिप्रेत ठरणारी स्थिती निर्माण होणे म्हणजे न्याय. अशा प्रकारची आत्मनिष्ठ व निरपेक्ष संकल्पना ते मांडतात.

**न्यायाची ग्रीक कल्पना -**

न्यायासंबंधात विचार करताना लक्षात येते की, ग्रीक विचारवतांनी त्याचा सखोल अभ्यास केला आहे. प्रसिद्ध ग्रीक विचारक प्लेटोने न्यायाची कल्पना 'रिपब्लिक' या ग्रंथात मांडली त्यामधील एक प्रकरण हे "On Justice" या नावानेच आहे हा न्यायावरील ग्रंथ आहे विशेष म्हणजे काही विचारवंतानी न्यायाची सांगड ही 'शीला' शी घातली आहे त्यांच्यामते, जो न्यायाने वागतो तो सतशील असतो. त्यांच्यात खऱ्या अर्थानी शील असते. शीलाचे संबंध सार न्यायात सामावलेले आहे जो न्यायी असतो. तो शीलवान असतो. आणि जो शीलवान असतो तो 'न्यायी'असतो.

ग्रीकांनी इतक्या मोठया प्रमाणात न्याय आणि शील यांचे ऐक्य साधले होते. ग्रीक विचारवंताच्या मते. न्याय या संकल्पनेत बाह्य वर्तूणूक आणि आंतरिक सचोटी या दोन्ही गोष्टी समाविष्ट झालेल्या असतात. असे ही म्हणता येईल की न्यायविषयक कल्पनेचा परिणाम म्हणजे प्लेटोच्या आदर्श राज्याची संविधानिक चौकट होय.

कालपरिस्थितीनूसार न्यायाची कल्पना बदलत राहिली आहे विचारकांनी न्यायासंबंधीची कल्पना वस्तुनिष्ठ आणि आदर्शवादी मूल्यांच्या आधारे मांडलेली आहे. समाज मान्य मूल्यांना परस्परांशी जोडणे य़ा अर्थाने न्यायाकडे बघितले जाते. स्वातंत्र , समता, आणि बंधुत्व या मूल्यांना समाजात जोडणे़ म्हणजे न्याय होय. एका परस्परासंबंधित पूर्ण वस्तूशी ऐक्य स्थापित करणे हे न्यायाचे कार्य मानले जाते अशी भूमिका ॲरिस्टॉटलने मांडलेली आहे.

## १.३ न्यायासंबंधी सिद्धांत -

न्यायासंबधी पूढील सिद्धांत हे न्यायाचे वेगवेगळे सिद्धांत मांडताना पूढील प्रमाणे

१) न्यायाच्या तात्विक सिद्धांत

२) न्यायाच्या धार्मिक सिद्धांत

३) न्यायाच्या नैसर्गिक सिद्धांत
४) न्यायाच्या वैधानिक सिद्धांत
५) न्यायाच्या सामाजिक सिद्धांत

**१) न्यायाच्या तात्विक सिद्धांत -**

न्यायाच्या ग्रीक कल्पनेसंबधात ज्यावेळी विचार केला जातो त्यावेळी प्लेटोच्या न्यायविषयक दृष्टिकोनाची दखल घ्यावीच लागते. त्याने रिपब्लिक या ग्रंथात न्यायाची कल्पना विस्तृतपणे मांडली आहे. सुसंवाद, समन्वय आणि एकता ह्यांना त्याने न्याय म्हटलेले आहे. न्यायकरिता मनुष्याधील बुद्धी साहस आणि भूक या तीन प्रवृत्तींना आधार मानून प्लेटोने समाजाला शासक , सैनिक आणि उत्पादक या तीन वर्गात विभाजित केले आहे. त्याच्या मते वरील तीन वर्गांनी त्यांना सोपविलेले कार्य करणे म्हणजे न्याय होय. त्याने तीन ही वर्गाकडून न्यायाची अपेक्षा केली आहे. प्लेटोने यासंबधात आणखी एक विचार मांड़ला की राज्यात शांतता आणि सुव्यवस्था निर्माण होण्यासाठी या न्यायतत्वाला अनुसरुनच सामाजिक संघटना निर्माण झाली पाहिजे.

प्लेटो म्हणतो की, प्रत्येक व्यक्ति किंवा तो वर्ग स्वतःचेच कार्य करील त्याच प्रमाणे इतर व्यक्तींच्या किंवा वर्गांच्या कार्यात तो हस्तक्षेप करणार नाही प्रत्येकाने वेगवेगळे कार्य करणे हे भिन्नतेचे प्रतिक न ठरता ते एकतेचे प्रतिक आहे. कारण समाजासाठी हे सर्व आवश्यक ठरते.

या विभिन्न व्यक्तिच्या वर्गाच्या कार्यात समन्वय प्रस्थापित झाला पाहिजे. मग न्याय आपोआप स्थापन होतो प्रत्येक व्यक्तीने, वर्गाने आपापल्या नैसगिक प्रवृत्तीनूसार कार्य करणे म्हणजे न्याय होय प्रश्न असा आहे की, व्यक्तीवर अन्याय केव्हा होतो ? आपले स्वतः चे आधार कार्य सोडून इतरांचे कार्य करण्याचा ते जेव्हा प्रयत्न करतो त्यावेळी अन्याय होतो.

प्लेटोच्या न्यायव्यवस्थेत कुणावरही अन्याय होण्याचा प्रश्नच निर्माण होत नाही कारण स्पष्ट आहे की, त्याने पाडलेल्या प्रत्येक वर्गाचे कार्य निश्चित आहे म्हणचेच प्लेटोच्या मते, समाजातील व्यक्ति आणि वर्गात समन्वय घडवून सहयोग निर्माण करणे म्हणजे न्याय होय.

**२) न्यायाचा धार्मिक सिद्धांत -**

धार्मिक सिद्धांताचा आधार हा आहे की, संपूर्ण सृष्टी ईश्वराने निर्माण केलेली आहे त्याने स्थापन केलेल्या नियमाप्रमाणे प्रत्येक व्यक्तीने वागणे म्हणजे न्याय होय.

मध्ययुगीन काळात धार्मिक सिद्धांताचा - नियमांचा मोठा प्रभाव होता या काळातील राजकीय विचारवंत 'सेंट थॉमस ॲकवीनास' म्हणतो की, "ईश्वर सर्व सृष्टीचा निर्माता असल्याने त्याने केलेल्या नियमानूसार समाजातील प्रत्येकाने वागणे. व्यवहार करणे म्हणजे न्याय होय" एक बाब स्पष्ट आहे की ईश्वरी संकेताचा अविष्कार धर्मसंस्थेव्दारा होतो. आणि धार्मिक ग्रंथात हे संकेत स्पष्ट केलेले असतात धार्मिक ग्रंथातील संकेताचे अधिकृत स्पष्टीकरण करण्याचा अधिकार ईश्वराचा प्रतिनिधी या नात्याने धर्मगुरूला प्राप्त होतो. ॲकवीनास तर असे म्हणतो की, "राज्याचे कायदे हे धार्मिक नियमांना अनुसरुन असले पाहिजेत म्हणजे राज्यात न्याय आपोआपच स्थापन होतो."

### ३) न्यायाचा नैसर्गिक सिद्धांत -

न्यायाचा नैसर्गिक नियमानुसार कार्य करणे. ग्रीक - काळातील 'स्टोईक' या विचारवंताने या सिद्धांताचे समर्थन केले आहे रोमन विचारक पॉलिबिअस, सिसेरो यांनीसुद्धा नैसर्गिक सिद्धांताचे समर्थन केले आहे. हे विचारक निसर्ग आणि विवेक एकच मागीत असत. निसर्गाशी सुसंगत म्हणजे व्यक्तीच्या सद्सद् विवेकबुद्धीशी सुसंगत जे जे काही असेल ती गोष्ट न्याय ही स्टोईक विचारकाची धारण होती.

पुढील काळात आंतरराष्ट्रीय कायद्याचा जनक ह्युगो ग्रोशिअस, अमेरिकन व फ्रेंच क्रांतीचे तत्वज्ञान या सर्वांनी या संकल्पनेचा पुरस्कार केलेला आहे. समन्यायाचे तत्त्व विधिनियमांच्या उचित प्रक्रियेचे तत्व हे निसर्ग न्याय या तत्वाशी संबधित आहेत याच कारणामूळे प्रा. डायसी म्हणतात की, "कायदयापेक्षा न्याय श्रेष्ठ " याचा अर्थ हा की एखादावेळी कायदा आणि न्याय यात विरोध निर्माण झाला तर न्याय हे मूल्य स्बीकारले पाहिजे.

थोडक्यात असे म्हणता येते की, निसर्गनियम, नीतीनियम, आणि मनुष्याचे आधार विचार यावर आधारीत जी समाज व्यवस्था निर्माण होते तिला नैसगिक अवस्था असे म्हणतात. अशा नियमानूसार चालणे म्हणजे न्याय होय. नतरच्या काळात हॉब्ज लॉक आणि रुसो यांनी सामाजिक कराराचे प्रतिपादन करताना ज्या नैसर्गिक अवस्थेचे वर्णन केले ती अशाच प्रकारची होती.

### ४) न्यायाचा वैधानिक सिद्धांत -

हॉब्ज, जेरमी बेंथम, जॉन ऑस्टीन यांनी वैधानिक सिद्धांत मांडला त्यात न्यायाची स्थापना हे कायद्याचे मुख्य कार्य आहे त्यामूळे वैधानिक सिद्धांत असे गृहीत धरतो की न्यायतत्वाशी विसंगत नियम हा कायदा नाही तर ती विकृति मानली पाहिजे. न्याय- सिद्धांताची धारणा आहे की, अधिकृत सत्तेने मान्यता दिलेल्या विधिनियमांचा आणि उच्च न्याय मूल्यांचा सुसंवाद होवू शकतो. ही वैधानिक न्याय - सिद्धांताची भूमिका आहे.

### ५) न्यायाचा मार्क्सवादी किंवा आर्थिक सिद्धांत -

परंपरागत न्याय सिद्धांतापेक्षा अगदी वेगळे विचार कार्ल मार्क्सने न्यायसंबंधात मांडले आहेत त्याची भूमिका ही होती की न्यायाची कल्पना समाजाचे आर्थिक जीवन आणि व्यवहार यांवर आधारित असते. व्यक्तीचे जीवन उत्पादन साधनांच्या आधारे निश्चित होते. त्याच्यामते, भाडवदार वर्ग राज्याची निर्मिती करुन त्याचा उपयोग कामागांराचे शोषण करण्यासाठी करतो. भांडवलदार वर्गाच्या हाती समाजातील सामाजिक , राजकीय , आर्थिक, शैक्षणीक अशा विविध संस्था असल्याने कामगार व मजूर वर्गाला न्याय मिळू शकत नाही.

हा निष्कर्ष काढल्यानंतर मार्क्स म्हणतो की, राज्य हे विशिष्ट वर्गाचे प्रतिनिधित्व करते ते नष्ट करुन राज्यविहीन समाज निर्माण केल्या शिवाय खऱ्या अर्थाने न्यायाची स्थापना होवू शकणार नाही. त्याच्या मते, वर्गविहीन , राज्यविहीन समाज निर्माण झाल्यानंतर सर्व लोक समान राहतील. उत्पादनाची साधने समाजाच्या मालकीची होतील पूढे जावून कुणाचेही शोषण होणार नाही व खऱ्यास्वरुपात न्याय स्थापन होईल.

औदयोगीक क्रांतीनतरचे विचारक मुख्यत्वे न्यायकल्पनेचा शोध अर्थशास्त्रात घेवू लागले. त्यांच्या हाती आर्थिक सत्ता असते. तो वर्ग सत्तेचा वापर स्वत:चे हितसंबंध सुरक्षित ठेवण्यासाठी करु लागला. त्याला पोषक अशी कायद्याची व्यवस्था समाजात निर्माण करतो व त्या कायद्यांनाच न्यायाचे स्वरुप प्राप्त होते वेगळ्या शब्दात असे म्हणता येते की, आर्थिकसत्ता ज्याच्या हाती असते त्याच्या हाती न्याय अशाप्रकारे न्याय अर्थसत्तेमधून प्रकट होतो.

**८) सामाजिक न्यायाचा सिद्धांत -**

सामाजिक न्याय या शब्दाचा अर्थ व व्याप्ती फार मोठी आहे. सामाजिक न्यायामागची भूमिका अशी सांगता येते की, 'समाजातील सर्व क्षेत्रातील अन्याय नष्ट होवून व्यक्तीचे अधिकार, समाजाचे हित, शासनाचा आदेश नियंत्रण, न्यायदान व्यवस्थेचा लोकशाही सुसंवाद, राष्ट्राचा विकास, प्रगती आणि सन्माननीय स्थान या सर्वांचा परस्परपूरक समन्वय म्हणजे सामाजिक न्याय होय. सामाजिक, आर्थिक आणि सांस्कृतिक विषमतेवर आधारित असणाऱ्या समाजात सामाजिक न्यायाची अतिशय गरज असते.

सामाजिक न्यायाची भूमिका अशी की, समाजात ज्या वस्तूंची निर्मिती होते त्याचे वितरण संपूर्ण समाजात योग्यप्रकारे झाले पाहिजे. त्याचप्रमाणे सर्वाच्या अन्न, वस्त्र व निवारा या गरजा पूर्ण झाल्या पाहिजे. अशा आवश्यक गरजा पूर्ण करण्याच्या प्रत्येकाला अधिकार असणे ही सामाजिक न्यायाची कल्पना आहे.

## १.४ समता (Equality) संकल्पना , व्याख्या, स्वरुप

**उद्दिष्ट्ये :**

- समानतेचा अर्थ व संकल्पना स्पष्ट करणे.
- समानतेच्या प्रकाराची चर्चा करणे.
- राजकीय समानतेवर लक्ष केंद्रित करणे.
- आर्थिक आणि कायदेशीर समानतेची चर्चा करणे.

**प्रस्तावना -** मानवी जीवनात समानतेला महत्त्वाचे स्थान आहे. स्वस्थ सामाजिक विकास आणि विकसित व्यक्ती मत्वाकरिता समता ही आवश्यक अट मानली जाते. निसर्गाने सर्व मानवांना समान निर्माण केले आहे ही धारणा प्राचीन काळापासून चालत आलेली आहे. अमेरिकेच्या स्वातंत्र्य घोषणेत स्पष्ट केले होते की ईश्वराने सर्व मनुष्यांना समान निर्माण केले आहे त्यात म्हटले होते की, आम्ही या सत्याला स्वीकारतो की सर्व माणसे समान निर्माण झालेली आहेत.

१७८९ च्या फ्रेंच अधिकार घोषणापत्रात समतेच्या अधिकाराला क्रियात्मक स्वरुपात स्वीकृत केले आहे त्यात म्हटले होते की, मनुष्य आपल्या अधिकाराच्या दृष्टिकोनातून स्वतंत्र व समान आहेत व नेहमी स्वतंत्र व समान रहातात. १७८९ च्या फ्रेंच राज्यक्रांतीने स्वातंत्र्य, समता, व बंधुता या तत्त्वांना जन्म दिला. १९१६ ला सोव्हिएत रशियात झारशाही विरोधात क्रांती झाली त्यात आर्थिक विषमतेच्या शेवट झाला.

**समतेचा अर्थ -**

१) "व्यक्ती व्यक्तीत भेदभाव न करता प्रत्येकाला त्याच्या विकासाची समान संधी प्राप्त होते आणि कर्तूत्वानुसार त्याचे सामाजिक स्थान निश्चित होणे म्हणजे समता होय."

२) "जेव्हा माणसांना विषमतेने वागविण्यासाठी पुरेशी सबळ कारणे नसतील तेव्हा त्यांच्याशी समानतेने वागणे ही समता होय."

३) प्रा. लास्की - समतेचा सर्वप्रथम अर्थ म्हणजे समाजात कोणत्याही व्यक्तीला विशेष अधिकार नसावेत दुसरा अर्थ म्हणजे प्रत्येक व्यक्तीला आपल्या विकासासाठी पूर्ण संधी प्राप्त करुन देणे.

सर्व लोकांची नैसर्गिक समता हा एक आदर्श मानला जात असला तरी प्रत्यक्षात नैसर्गिक विषमता ही वस्तुस्थिती आहे. शारीरिक शक्ती, बुद्धिमत्ता, सौंदर्य, कलागुण, स्वभावगुण इ. अनेक बाबतीत प्रत्येकात जन्मतः भेद आढळून येतो. याच कारणामुळे समता याचा अर्थ निरपेक्ष समानता असा होत नाही. सर्वांना समान वागणूक, समान संधी व समान संरक्षण असा त्याचा सापेक्ष अर्थ होतो.

**समानतेची दोन रुपे -**

१) नकारात्मक

२) सकारात्मक

**१) समता म्हणजे सारखेपणा नव्हे** - समानतेचा अर्थ सारखेपणा असा होत नाही. सर्व लोकांना समान शिक्षण देणे, समान काम देणे व समान वेतन देणे याचा अर्थ समानता असा होत नाही. ज्याप्रमाणे आपल्या हाताची बोटे निसर्गतः सारखी नसतात त्याचप्रमाणे निसर्गानेही मनुष्या मनुष्यामध्ये भेद निर्माण केला आहे.

**२) समता म्हणजे मानवनिर्मित विषमता नष्ट करणे** - समतेचा अर्थ मानवनिर्मित विषमता नष्ट करणे असा होतो. प्राचीनकाळापासून समाजरचना विषमता व विशेषाधिकार यावर आधारलेली आहे. ही मानव विषमता बाजूला सारुन प्रत्येकाला त्याच्या नैसर्गिक प्रवृत्तीप्रमाणे विविध प्रकारच्या विकासाची समान संधी उपलब्ध करुन देणे म्हणजेच समता प्रस्थापित करणे होय.

**३) समता म्हणजे विशेषाधिकारांचा अभाव -**

प्रा. लास्की असे म्हणतात की, तोपर्यंत समाजात काही व्यक्तींना अन्न, जात, भाषा, वंश, संपत्ती इ. आधारावर विशेष अधिकार मिळतात. तोपर्यंत समता प्रस्थापित होऊच शकत नाही. विषमतेला कारणीभूत ठरणारे विशिष्ट वर्गाचे, जातीचे व समुदायाचे विशेषाधिकार नष्ट करणे म्हणजेच समानता निर्माण करणे.

**४) समता म्हणजे सर्वांना समान संधी देणे -**

जन्मतः प्रत्येक व्यक्ति गुणात्मक दृष्टिने समान नसते. तरीही प्रत्येक व्यक्तीला आपल्या व्यक्तिमत्त्वाच्या विकास करण्याची समान संधी देणे म्हणजेच समता होय. या संधीचा

फायदा घेऊन व्यक्तीला आपल्या गुणांचा विकास करता येईल. उदा. गरीबाच्या मुलांना पोटभर जेवायला मिळत नाही त्यामुळे त्याची शरीरयष्टी कृश राहते. त्यांना शिक्षण प्राप्त करता येत नाही. याउलट श्रीमंताच्या मुलाना चांगले अन्न मिळते श्रीमंतांची बुद्धिहीन बालकेही संपत्तीची मालक बनतात. गरीबाच्या हुशार व बुद्धिवान मुलगा पैसाही मिळत नाही आणि धड जेवायला पण मिळत नाही. म्हणूनच प्रत्येकाला विकासाला योग्य व समान संधी प्राप्त करुन देणे म्हणजे समता होय.

**५) समता ही समतोल राखणारी प्रक्रिया आहे -**

समता म्हणजे सारखेपणा नाही सर्वांना एकाच पातळीवर आणल्याने समाजातील विविधता नष्ट होते व व्यक्तीचे स्वातंत्र्य संकुचित होते पण त्याचबरोबर व्यक्ती-व्यक्तीमध्ये असलेली तफावत व विषमता नष्ट करणे ही आवश्यक आहे. कारण अशा विषमतेमधूनच संघर्ष उद्‌भवतात आणि मानवजातीचे नुकसान होते.

विषमता निर्माण होवून समाजाला तोल बिघडू नये म्हणूनच समतेद्वारे समतोल राखला जातो. श्रीमंत-गरीब, सुशिक्षित-अशिक्षित उच्चभ्रू जाती व मागासलेल्या जाती यांच्यातील तफावत समाजात असमतोल आणि विषमता निर्माण करते.

अशारीतीने समतेमुळे प्रत्येकाला आपल्या व्यक्तीमत्त्वाचा विकास करण्याची समान संधी प्राप्त होते.

## १.५ समतेचे प्रकार

एकूण पाच प्रकार आहेत ते पुढीलप्रमाणे स्पष्ट करता येतील.
१) सामाजिक समता (Social Equality)
२) राजकीय समता (Political Equality)
३) नागरिक समता व वैधानिक समता (Legal Equality)
४) नैसर्गिक समता (Natural Equality)
५) आर्थिक समता (Economic Equality)

**१) सामाजिक समता (Social Equality) -**

समाज जीवनामध्ये प्रत्येक व्यक्तीची समान प्रतिष्ठा राखणे, धर्म, वंश, भाषा, जाती, लिंग इ. आधारावर भेदाभेद न करणे, प्रत्येकाला आपल्या व्यक्तीमत्त्वाच्या विकासाची समान संधी देणे हा सामाजिक समतेचा अर्थ होतो.

जन्मानुसार जाती निर्माण झाल्या व जाती-जमाती मध्ये श्रेष्ठ-कनिष्ठतेच्या विषमतेमुळे संघर्ष निर्माण झाला.

सामाजिक समता ही केवळ कायद्याने प्रस्थापित होत नाही तर त्यासाठी प्रत्येकाने सद्‌सद्‌विवेक बुद्धीनुसार वागून समतेची भावना वाढीस लावली पाहिजे. उदा. आज ही दक्षिण

आफ्रिकेमध्ये काळा व गोरा असा फरक व्यक्ती मध्ये करण्यात येतो ती एक सामाजिक विषमताच आहे त्याचमुळे राष्ट्रीय ऐक्य धोक्यात येते.

सामाजिक विषमता मग जो भारतीय स्वरुपाची असो, वर्णविषयक असो की धार्मिक समजुतीवर आधारलेली असो परिणामाच्या दृष्टिने ती सारखीच समजली पाहिजे. सामाजिक असंतोषाला तर ती कारणीभूत ठरतेच पण नैतिक दृष्टिनेही मनुष्य जातीला ती कमीपणा आणणारी गोष्ट ठरते.

### २) राजकीय समता (Political Equality) -

आधुनिक लोकशाहीच्या मुलाधार राजकीय स्वातंत्र्य व समता हाच आहे. प्रत्येक नागरिकाला राज्यव्यवस्थेमध्ये सहभागी होण्याचे समान संधी देणे म्हणजेच राजकीय समता होय. प्रातिनिधीक लोकशाहीचे हे मुख्यतत्त्व मानले जाते. राज्याचे स्थैर्य या तत्त्वार पुष्कळ अशी अवलंबून असते. या राजकीय समतेमुळे प्रत्येक नागरीकाला मतदानाचा महत्त्वपूर्ण अधिकार प्राप्त होतो. तसेच आवश्यक ती पात्रता पूर्ण करुन कोणताही नागरिक निवडणूकीद्वारे कोणतेही पद प्राप्त करु शकतो. पूर्वी असा अधिकार लिंग, धर्म, जाती आणि संपत्ती यानुसार प्राप्त होत असे. उदा. फ्रान्समध्ये स्त्रियांना मतदानाचा अधिकार नव्हता. इंग्लंडमध्ये रोमन कॅथॉलिक पंथियांना पार्लमेटंचे सभासदत्व व सरकारी नोकरी करण्याचा अधिकार नव्हता. पण त्यामुळे राजकीय विषमता निर्माण होऊन संघर्ष झाले.

राजकीय समता पूढील गोष्टीच्या पूर्ततेवर अवंलबून असते.

१) सर्व प्रौढ स्त्री-पुरुषांना मतदानाचा हक्क देणे.
२) नागरिकांच्या मताचे मूल्य समान असणे.
३) बहुमताची पद्धती स्पष्ट करणे.
४) कायद्यासमोर प्रत्येकाला समान लेखणे.

### ३) नागरिक समता व वैधानिक समता (Legal Equality)

नागरिक या नात्याने राज्यातील प्रत्येक नागरिकाला समान अधिकार असणे. राज्यातील नागरिकांसाठी एकच कायदा असणे, कायद्यासमोर उच्च-निच्च, श्रेष्ठ-कनिष्ठ, श्रीमंत-गरीब, स्त्री-पुरुष असा भेदभाव कोणत्याही आधारावर न करणे यालाच नागरिक समता असे म्हणतात.

नागरिक वा वैधानिक समतेमध्ये पुढील गोष्टीच्या समावेश होतो.

१) कायद्यासमोर प्रत्येक व्यक्तीला एक व एकच मानणे.
२) प्रत्येकाला समान अधिकार देणे आणि अधिकारांचा समान उपभोग घेता येईल अशी परिस्थिती निर्माण करणे.
३) कायद्याद्वारे मानवनिर्मित विषमता नष्ट करणे.

### ४) नैसर्गिक समता (Natural Equality)

काही विचारवंताच्या मते मनुष्य निसर्गातःच समान आहे. निसर्गानेच प्रत्येकाला समान गुणाची देणगी दिली आहे. प्रत्येकालाच विचारशक्ती व भावना आहे. यामुळे सर्वानाच समान

वागणूक आणि समान संधी दिली पाहिजे. लॉकने या नैसर्गिक समतेचा पुरस्कार केला. मानवी समाजाचा घटक म्हणून मानवाला मूलभूत हक्क देण्यात यावेत अशी समजूत आज दृढ होत आहे.

काही विचारवंत नैसर्गिक समतेला विरोध करतात. त्यांच्या मते निसर्गानेच प्रत्येक व्यक्तीला असमान निर्माण केले. ॲरिस्टॉटलने याच नैसर्गिक असमानतेच्या आधारावर गुलामगिरीचे समर्थन केले. पण नैसर्गिक असमानतेला तर सामाजिक, विषमतेची जोड मिळाली. तर त्याचे समाजावर अनिष्ट परिणाम घडतात. म्हणूनच नैसर्गिक समतेचा अर्थ मर्यादित स्वरुपात घेणेच इष्ट आहे.

### ५) आर्थिक समता (Economic Equality) -

समाज विघटनाचे प्रमुख कारण आर्थिक विषमता हेच आहे. आर्थिक समतेच्या अभावी व्यक्तीची इतर स्वातंत्र्य, निरर्थक ठरतात. आर्थिक समता प्रस्थापित झाल्यावरच इतर सर्व प्रकारची विषमता आपोआपच नष्ट होईल. असे काही शास्त्रज्ञाचे मत आहे.

आर्थिक मक्तेदारीच्या जोरावर समाजातील बहुसंख्य नागरिकांना आपल्या अंकीत ठेवण्याची सवलत ज्या समाजात असेल तिथे आर्थिक समता नांदू शकणार नाही. आर्थिक समतेचा अर्थ सर्वांना समान वेतन देणे असा नव्हे कारण प्रत्येक व्यक्तीची योग्यता सारखीच नसते. पण त्याच वेळेस संपत्तीच्या संचयनामुळे इतरांचे शोषण करणे राजकीय व सामाजिक दृष्ट्या योग्य नसते.

समाजाची उत्पादन साधने आपल्या हाती ठेवून त्यांचा उपयोग राजकीय सत्ता बळकावण्याकडे केला जातो. या वर्गाच्या हाती प्रभावी प्रचारसाधने असल्यामुळे तो आपले आर्थिक वर्चस्व टिकविण्यासाठी त्यांचा उपयोग करीत असतो. म्हणून आर्थिक समतेची आवश्यकता प्रतिपादन केली जाते. केवळ संपत्तीच्या बळावर इतरांचे शोषण करता येऊ नये हे तत्त्व आर्थिक समतेमागे गृहीत धरलेले असते.

## १.६ नागरी समाज (Civil Society) संकल्पना

### उद्दिष्ट्ये

- नागरी समाजाची संकल्पना व अर्थ स्पष्ट करणे.
- नागरी समाजाच्या विविध सिद्धांताची चर्चा करणे.
- राज्याशी नागरी समाज संघटनाचे संबंध स्पष्ट करणे.

**प्रस्तावना** - नागरी समुहाचे संघटन हे एका राज्याचे किंवा कुटुंबाला धरुन नसून ते एक स्वयंसेवी संघटन आणि सामाजिक शाखा यांना घट्ट करण्याचे कार्य ही व्यवस्था करते. १८ व्या शतकात वेगवेगळ्या विचारवंतांनी वेगवेगळ्या पद्धतीने ही संकल्पना मांडलेली दिसून येते.
नागरी समाज हे दोन मुल्यांना महत्त्व देते.

१) सामाजिक मुल्ये
२) सामाजिक संस्था

नागरी समाजाच्या अर्थ समजावून घेताना व्यक्तीचे हक्क,सार्वजनिक कल्याण, कायद्याचे अधिराज्य मुक्त अभिव्यक्ती, सहिष्णुता, लोकहितबुद्धी व विना नफा स्वयंसेवा संस्था हे आधार मानले जातात.

नागरी समाज ही संकल्पना आदर्शात्मक व अनुभववादी दृष्टिने महत्त्वाची संकल्पना म्हणून कार्य करते. ती आदर्शवादी दृष्टिकोनातून ती संस्थाचा अभ्यास परिणामकारकपणे करते ती सामाजिक कार्य व उपक्रम तसेच नागरी प्रवृत्ती अराज्यवादी संस्थांच्या विकासाचे प्रारुप ठरवते.

नागरी समाजाची संकल्पना ही तशी जुनी आहे तिची सुरुवात ही राजकीय तत्वज्ञानी हॉब्ज, लॉक, हेगेल आणि मार्क्स यांनी मांडलेली दिसून येते. तसेच ग्रामशी यांनी ही या संकल्पनेवर सखोल अध्ययन केल्याचे दिसते. नागरी समाजामध्ये वेगवेगळ्या संस्था आहेत. उदा. स्वंयसेवी संस्था, सामुदायिक गट, युनियन, संघटना इ. यांचा समावेश नागरी समाजात होतो.

**नागरी समाजाचे तीन वर्चस्ववादी सिद्धांत -**

१) नव-पुराणमतवादी सिद्धांत
२) बहुलवादी सिद्धांत
३) नव-मार्क्सवादी सिद्धांत

या वरील तीन सिद्धांतात नागरीसमाजाची संकल्पनात महत्त्वाच्या अंगाने स्पष्ट केली आहे.

१) नव-पुराणमतवादी सिद्धांत नागरी समाजाचे स्वातंत्र्य आणि राज्य यांच्या मध्ये मतभिन्नता असल्याचे मानते.

   'ग्रामसी' हे मार्क्सवादी विचारवंत सुसंस्कृत समाज संज्ञा वापरतात या संदर्भात ग्रामसी म्हणतात की, सुसंस्कृत समाजाच्या स्थापनेसाठी राज्य महत्त्वाची भुमिका बजावते तर राज्याच्या प्रकाराचे संरक्षण करण्यासाठी व त्यात परिवर्तन करण्यासाठी सुसंस्कृत समाज प्रयत्न करतो. काही समाजशास्त्रज्ञांच्या मते, शहरात राहणाऱ्या सुशिक्षित व वर्तनात शिष्टाचाराला प्राधान्य देणाऱ्या शहरी व नागरी लोकसंख्येसाठी 'सुसंस्कृत समाजा या संज्ञेचा वापर केला जातो.'

२) बहुलवादी विचारवंत एलेक्स दे टॉकेवेली यांच्या मते, नागरी समाजाचे संघटन हे महत्त्वपूर्ण आहे ते असे मत मांडतात तसेच ते समुहाचे स्वातंत्र्य व व्यक्तीगत स्वातंत्र याविषयी विचार मांडतात.

## १.७ सारांश

अशा पद्धतीने न्याय, समता व नागरी समाज या तीन संकल्पना राजकीय सिद्धांतात स्पष्ट झालेल्या दिसून येतात.

न्यायाची संकल्पना ही सामाजिक न्यायाच्या दृष्टीने कशी प्रस्थापित होते. आर्थिक न्यायाच्या दृष्टीने कशा पद्धतीने येते त्याचबरोबर राजकीय न्याय हा राज्याच्या संदर्भात कशा पद्धतीने प्रस्थापित होतो हे स्पष्ट केले.

समता या संकल्पनेचे स्वरुप अर्थ, विश्लेषणात्मकदृष्ट्या केल्याचे दिसते त्यामध्ये नैसर्गिक, सामाजिक, राजकीय, आर्थिक, कायदेशीर या समतेचे प्रकार स्पष्ट केले आहेत. तसेच नागरी समाजाची संकल्पना ही आदर्शवादी व अनुभववादी दृष्टिकोनातून स्पष्ट केली.

## १.९ ग्रंथसंपदा

१) प्रा. रा. अं. तिजारे,
डॉ. व मा. पेशवे
आधुनिक राजकीय सिद्धात

२) प्रा. श्रीकांत देशपांडे
राजकीय सिद्धांत

३) ओ. पी. गौबा
राजकीय संकल्पना आणि विचारप्रणाली

४) ॲन इंट्रोडक्शन टू पोलिटिकल
थिअरी, राजनीतीशास्त्र परिचय,
ओ.पी. गाबा
मराठी अनुवाद - तुकाराम जाधव

❖❖❖❖

# १०

# राष्ट्रवाद
# (NATIONALISM)

**घटक रचना :**

१०.० संकल्पना
१०.१ राष्ट्रवादाचे बदलते स्वरुप
१०.२ राष्ट्रवाद प्रभावी होण्याचे कारणे
१०.३ राष्ट्रवादाचे तीन दृष्टीकोन
१०.४ सारांश
१०.५ संदर्भग्रंथ सूची

## १०.० संकल्पना

**राष्ट्रवाद (Nationalism) :**

**प्रस्तावना -** नेशिओ या लॅटीन शब्दापासून 'नेशन' (nation) हा इंग्रजी संज्ञा तयार झाली आहे तिच्यासाठी 'राष्ट्र' ही संज्ञा मराठीत वापरली जाते. नेशिओचा अर्थ लॅटिन भाषेत जन्म किंवा वंश असा होतो. सतराव्या शतकात राष्ट्र ही संज्ञा राज्याची वांशिक एकता याच अर्थाने प्रचलित होती. फ्रान्सच्या राज्यक्रांतीच्या काळात ती जनसमूहाच्या राष्ट्रभक्तीची सुचक ठरली.

एकोणिसाव्या शतकापासून 'राष्ट्र' संज्ञेला देशाचे स्वातंत्र्य व सार्वभौमत्व यांचा संदर्भ मिळाला राष्ट्र कल्पनेचा ऐतिहासिक विकासक्रम आपण पुढे पाहू तसेच राष्ट्र म्हणते काय याची स्पष्टता पुढीलप्रमाणे करता येईल.

राष्ट्र राज्य (नेशन स्टेट) असा संयुक्त शब्दप्रयोग वारंवार केला जात असला तरी 'राष्ट्र' व 'राज्य' हे समानार्थी नव्हेत तर संकल्पनात्मक पातळीवर या दोन संकल्पनामध्ये फरक आहे. राष्ट्रीयतेची भावना हा राष्ट्राचा मुलाधार असतो. 'नॅशनॅलिटी' हा शब्द राष्ट्रीयतेच्या भावनेसाठी जसा वापरला जातो त्याचप्रमाणे राष्ट्रक याही अर्थाने वापरला जातो. राष्ट्रक म्हणजे भाषा, संस्कृती, धर्म, वंश इ. आधारावर ज्यात एकीची भावना निर्माण झाली आहे असा समाज.

## १०.१ राष्ट्रवादाचा ऐतिहासिक क्रम आणि बदलते स्वरुप :

एक विचार प्रणाली म्हणून राष्ट्रवाद ही एक अलीकडची बाब आहे राष्ट्र व राष्ट्रभूमी यांना सर्वश्रेष्ठ आदर्श समजून त्यांना आपल्या निष्ठा समर्पित करायला लावणारी आणि त्यांच्यासाठी कोणताही त्याग करण्याची तयारी करुन घेणारी राष्ट्रवाद ही एक आधुनिक

विचारप्रणाली आहे. पूर्वी ती अस्तित्वात नव्हती. कारण राज्याच्या सरहद्दी राष्ट्रीयतेच्या तत्त्वावर आधारित नव्हत्या नगर राज्यांना किंवा सामतांना किंवा धर्म संस्थेला किंवा एखाद्या घराण्याला लोक आपली निष्ठा अर्पण करीत असत. मध्ययुग संपले आणि जगभर राष्ट्र राज्यांच्या उदय झाला एकोणिसाव्या शतकापासून तर राष्ट्रवाद ही युरोपच्या इतिहासाची प्रमुख प्रेरणा होती. पहिल्या महायुद्धानंतर आशियाची आणि दुसऱ्या महायुद्धानंतर आफ्रिकी देशांचे इतिहास घडवण्यातही राष्ट्रवादाच्या विचार प्रणालीचे मोठेच योगदान होते या प्रत्येक वळणावरच्या राष्ट्रवादाची काही ठळक वैशिष्ट्ये नोंदवता येते.

## १०.२ राष्ट्रवाद प्रभावी होण्याचे कारणे

राष्ट्रवाद प्रभावी होण्याची पाच कारणे अभ्यासकाने स्पष्ट केली आहे ती पुढीलप्रमाणे अधिक स्पष्ट करता येईल.

१) केंद्रीभूत राज्यसत्ता विकसित झाल्या. कारण त्यांनी सामंतशाही किंवा सरंजामशाही निष्ठा कायमच्या बंद ठरवल्या आणि सर्व लोकांच्या निष्ठा एकाच मध्यवर्ती अधिसत्तेवर केंद्रित केल्या.

२) व्यापार विनिमय वाढला कारण सुव्यवस्था युक्त मोठाले भूभाग सलगपणे उपलब्ध असणे वाढत्या व्यापारासाठी आवश्यक झाले. आर्थिक व राजकीय सत्तेचे केंद्रीकरण असलेली पण एककेंद्री राज्ये उगवत्या मध्यम वर्गाच्या मागण्या पूर्ण करण्याच्या दृष्टिने उपयुक्त ठरली.

३) राष्ट्रीय भाषा आणि साहित्य यांचा विकास व प्रसार झाला त्यातून राष्ट्राच्या सांस्कृतिक परंपरावर प्रकाश पडला. कवी, लेखक, विद्वान यांनी भाषेचा प्रभावी वापर करुन आपल्या राष्ट्राची महात्मता व थोरवी जनमानसावर बिंबवली.

४) धार्मिक शिक्षणाची पीछेहाट झाल्यामुळे राष्ट्रीय शिक्षणाने त्याची जागा घेतली. विद्यार्थ्यामध्ये राष्ट्रभक्तीची मूल्ये रुजवण्याच्या शाळा निघाल्या.

५) अठराव्या शतकातील राजकीय सिद्धांतानी लोकांच्या सार्वभौमत्वाची संकल्पना तीरकसपणे पुढे मांडली.

**राष्ट्रवादाचे बदलते स्वरुप** -

राष्ट्रवादाचे बदलते स्वरुप हे तीन प्रमुख संकल्पनातून बदलताना दिसून येते.

१) राष्ट्रीयता
२) राष्ट्र
३) राष्ट्र आणि राज्य

अशा तीन अवस्था किंवा संकल्पना या राष्ट्रवादाच्या स्पष्ट होताना दिसतात. काळानुसार त्यामध्ये बदल होत गेले.

### १) राष्ट्रीयता -

राष्ट्रीयता म्हणजे व्यक्तीमधील एकतेची व ऐक्याची भावना ही भावना अंतरी बाळगली. लोक जेव्हा राजकीय दृष्ट्या संघटीत होतात आणि विशिष्ट भूभागावर स्थिरावतात तेव्हा त्यांचे राष्ट्र राज्य निर्माण होते.

राष्ट्रीयतेचे काही वस्तुनिष्ठ व व्यक्तिनिष्ठ घटक आहेत त्यामध्ये उदा. जन्मभुमी, वंश, भाषा, सांस्कृतिक वारसा, आर्थिक हितसंबंध इ. घटक असतात.

**२) राष्ट्र -**

राष्ट्र संकल्पनेचे समर्थक व विरोधक या दोहोची संख्या राज्यशास्त्रामध्ये जवळपास सारखीच आहे. राष्ट्र कल्पनेच्या कोणत्या वैशिष्ट्यांत लक्ष केंद्रीत करतो यावर तिचे समर्थक होऊ की विरोधक हे अवलंबून असते.

१९ व्या शतकातील राष्ट्रवादामागे स्वातंत्र्य, मानवतावाद, लोकशाही विचार इ. तत्त्वे होती.

राष्ट्र हा शब्द 'natio' या शब्दापासून बनला आहे. त्याचा अर्थ 'जन्म' किंवा 'वंश' असा होतो. 'बरगेस' आणि 'लीकॉक' यांनी राष्ट्र म्हणजे 'वांशिक भेद' असे म्हटले आहे ते वांशिक गटाबद्दल बोलतात ते म्हणजे लोकसंख्या, सारखी भाषा, साहित्य, रुढी, परंपरा ज्या चूक व बरोबर आहेत हे ठरवतात.

वंश आणि राष्ट्रीयता या दोन वेगवेगळ्या संकल्पना आहेत. जगात कोणत्याही राष्ट्रात वांशिकता ही आढळून येतेच.

१९७१ ला बांगला देशाची फाळणी होऊन पूर्व पाकिस्तान आणि पश्चिम पाकिस्तान हे दोन विभाग पडले धर्म सारखा असून ही असे दोन भाग पडले हे यावरुन दिसून येते.

बार्कर यांच्या मते, "राष्ट्र म्हणजे अशा लोकांचा समूह त्यामध्ये प्रादेशिकतेत ते एकत्र राहतात."

**३) राष्ट्र आणि राज्य -**

आधुनिक संकल्पना म्हणून राष्ट्र आणि राज्य याकडे बघितले जाते. २० व्या शतकातील राष्ट्रवादाचा पवित्रा मात्र आक्रमक, अहंकारी व हिंसक-विध्वंसक असा होता. नाझी व फासिस्ट राज्यकर्त्यांनी राष्ट्रभावनेचे हत्यार वापरुन अल्पसंख्यांकावर अनन्वित अत्याचार केले. संकुचित दृष्टिकोन, असहिष्णुता, धर्म पिसाटपणा, वंशवाद, साम्राज्यवादी व आक्रमकता असे राष्ट्रवादाचे अनेक अनिष्ठ अविष्कार पाहायला मिळतात.

सांस्कृतिक क्षेत्रातील राष्ट्रवादाने माणसे जोडली पण राजकीय व आर्थिक क्षेत्रात मात्र त्याने माणसे तोडण्याचेच काम केले.

## १०.३ राष्ट्रवादा संबंधीचे तीन दृष्टीकोन

राष्ट्रवाद या संकल्पनेचे तीन प्रमुख दृष्टिकोन आहेत.

१) तत्त्वज्ञानात्मक दृष्टिकोन
२) समाजशास्त्रीय दृष्टिकोन
३) मार्क्सवादी दृष्टिकोन

### १) तत्त्वज्ञानात्मक दृष्टिकोन -

जर्मन तत्वज्ञ कांट याने असे प्रतिपादन केले आहे की, नैतिक अर्थाने प्रत्येक व्यक्ती स्वायत्त असून तिची, स्वतःची अनुभूती हीच नीती मूल्यांना जन्म देत असते. त्यामुळेच अनुभुती घेण्याचे स्वातंत्र्य व्यक्तीला असणे ही तिच्या नैतिक जीवनाची पूर्व अट आहे.

धर्म आणि समाज यांची अतिरेकी बंधने व्यक्तीवर असू नयेत. पण त्याचबरोबर व्यक्तींना परस्पराशी जोडणारा दुवा असायला पाहिजे. जी चिरंतन शक्ती मानवी संस्कृतीला साकार करते. तीच राष्ट्राचे समूह जीवनाला अधिष्ठान मिळवून देते असे 'फिक्टे' या जर्मन तत्ववेत्याने म्हटले आहे.

### २) समाजशास्त्रीय दृष्टिकोन -

आधुनिकीकरणाच्या बहुमुखी प्रक्रियेला तो राजकीय प्रतिसाद मिळतो त्यास 'राष्ट्र' म्हणतात अशी व्याख्या समाज शास्त्रज्ञांनी केली आहे आधुनिकीकरणामुळे लोकांच्या पारंपारिक जीवनक्रम विस्कळीत होतो. नवे तंत्रज्ञान, नवी मुल्ये, नवी श्रमविभागणी व सामाजिक संरचना, नवी उत्पादन पद्धती इ. मुळे व्यक्तींना एकाकीपणा असुरक्षितता, अस्थैर्य, साशंकता वाटते आणि सामाजिक पोकळी वाढू लागते. त्यांना या भयग्रस्त मानसिकतेतून सोडवण्याचे कार्य 'राष्ट्र' ही संस्था करते.

### ३) मार्क्सवादी दृष्टिकोन -

काही मार्क्सवादी अभ्यासक राष्ट्रवादाला केवळ साम्राज्यवादाची प्रतिक्रिया समजतात.

मार्क्सच्या मते, राष्ट्रवाद व भांडवलशाही ही एकाच संस्थेची दोन रुपे आहेत. श्रमिक जोवर आर्थिक व राजकीय दास्यात असतात तोपर्यंत त्यांच्या ठिकाणी राष्ट्रभावनेचा प्रार्दुभाव होऊ शकत नाही. आणि हे दास्य संपले की मग राष्ट्रभावनेचा राजकीय पायाच नष्ट होतो आणि श्रमिकवर्ग आंतरराष्ट्रीय कामगार वर्गही जोडला जातो. त्यामुळे दोन्ही टप्प्यांवर राष्ट्रवाद निरुपयोगी आहे. अर्थात राष्ट्र या संकल्पनेने मानवी इतिहासात बजावलेली भुमिका मार्क्स कधीच अमान्य करीत नाही. भांडवलशाही देशातही भांडवलशाहीच्या सुरुवातीला राष्ट्रवादाने पुरोगामी स्वरुपाचे कार्य पार पाडले. त्याचप्रमाणे आंतरराष्ट्रीय कामगार क्रांती होण्यापूर्वी सर्व देश परकीय दास्यातून मुक्त होऊन स्वतंत्र राष्ट्रे म्हणून अस्तित्वात येणे आवश्यक आहे. या दोन्हीही वस्तुस्थिती मार्क्सने स्विकारल्या आहेत.

लेनिनने राष्ट्रवादाच्या वाटचालीचे तीन कालखंड पाडले आहेत.

### १) (१७८९ ते १८७१) हा कालखंड -

भांडवलशाहीच्या उन्नयनाच्या असून त्यातील राष्ट्रवादाने मध्ययुगीन सरंजामशाहीच्या शृंखला तोडण्याचे कार्य केले.

### २) १८७१ ते १९१४ -

या कालखंडात भांडवलशाहीचे पूर्ण प्रभूत्व प्रस्थापीत होवून भांडवलदार वर्ग प्रतिगामी बनण्याचा आहे. त्यातील राष्ट्रवादाला साम्राज्यवादाचे विकृत वळण मिळाले.

**३)** पहिल्या महायुद्धोत्तर या कालखंडात साम्राज्यवादी राष्ट्रातंर्गत संघर्ष तीव्र होईल असे लेनिनने म्हटले हाते.

दुसऱ्या महायुद्धानंतर आशिया आणि आफ्रिका खंडात साम्राज्यशाही शक्तीशी मुकाबला करण्याची जी पुरोगामी जबाबदारी राष्ट्रवादाने पार पाडली तिची योग्य ती दखल मार्क्सने घेतली आहे.

अशा पद्धतीने बहुतेक विचारवंतानी राष्ट्रवादाची संकल्पनेबद्दल आपले विचार स्पष्ट केले आहेत. राष्ट्रवादाचे काही 'प्रकार' ही पाडतात.

१) पारतंत्र्याविरुद्धचा राष्ट्रवाद
२) विषारी राष्ट्रवाद
३) लोकशाही स्वरुपाचा राष्ट्रवाद
४) अल्पसंख्याकांचा राष्ट्रवाद
५) पुरोगामी व बुरसटलेला राष्ट्रवाद

असे विविध प्रकार राष्ट्रवादाचे पडलेले दिसून येतात.

## १०.४ सारांश

२१ व्या शतकातील राष्ट्रवाद ही संकल्पना महत्त्वाची मानली गेली. अनेक विचारवंतांनी या संकल्पनेच्या बाजू मांडलेल्या दिसून येतात. त्यामध्ये मार्क्सने मांडलेली राष्ट्रवादाची संकल्पना महत्त्वाची आहे.

दुसऱ्या महायुद्धानंतर जगात आंतरराष्ट्रीय समाजात IMF, NATO यासारख्या संघटना जगातल्या राजकारणात उदयास आल्या. यामुळे जागतिकीकरणाचा प्रभाव हा राष्ट्र-राज्यावर पडलेला दिसून येतो.

राष्ट्रवादाची वेगवेगळी पद्धती, प्रकार, दृष्टिकोन आपण अभ्यासली. सगळ्या महत्त्वाची काळ हा दुसऱ्या महायुद्धाच्या समाप्तीनंतर युनोच्या निर्मिती झाल्यानंतर जग २१ व्या शतकातील राष्ट्रवाद हा वंशिकभेदावर असलेला राष्ट्रवादाचा प्रभाव हा जागतिक राष्ट्रवादावर पडलेला आहे.

## १०.५ ग्रंथसंपदा

१) डॉ. भास्कर लक्ष्मण भोळे, राजकीय सिद्धांत.

२) डॉ. विजय देव, राजकीय विश्लेषण कोश.

३) सुगम राज्यशास्त्र, सिद्धांत आणि विचार, के. सागर

❖❖❖❖

# ११

# लोकशाही संबंधित समकालीन लोकशाहीवर चर्चा

**घटक रचना :**

११.० उद्दिष्ट्ये
११.१ प्रस्तावना
११.२ लोकशाहीचा अर्थ आणि व्याख्या
११.३ लोकसत्ताक आदर्शांचा ऐतिहासिक विस्तार
११.४ लोकशाहीचे प्रकार
११.५ आधुनिक, उदारमतवादी लोकशाहीसाठी आवश्यक स्वरुप / मुद्दे
११.६ लोकशाहीपुढील आव्हाने
११.७ सारांश
११.८ पाठावरील प्रश्न

## ११.० उद्दिष्ट्ये

१) लोकशाहीचे मूलभूत तत्त्वज्ञान समजून घेणे.
२) लोकशाहीच्या विस्तारासाठी सहाय्यभूत ठरलेल्या ऐतिहासिक मुद्यांचे विश्लेषण.
३) लोकशाहीच्या विविध प्रकारासंबंधी विविध सिद्धांत व्यवस्थितरीत्या मांडणे.
४) समकालीन जगामध्ये लोकशाहीपुढील आव्हानांचा अभ्यास करणे.
५) सद्यकालीन परिस्थितीमध्ये लोकशाहीचे महत्त्व व यर्थातेचे मूल्यमापन करणे.

## ११.१ प्रस्तावना

राज्यशास्त्राच्या तत्त्वज्ञानामध्ये 'लोकशाही' इतकी गूढ, बिकट व वादग्रस्त संकल्पना दुसरी कोणतीही नाही याचा अर्थ, ती वेगवेगळ्या लोकांसाठी, वेगवेगळ्या संकल्पना सुचवते, आणि दर्शवते. या विषयाच्या विस्तृत व्यापामध्ये विविध मुद्दे दाखल केले जातात. ही एक प्रकारची सरकारी यंत्रणा आहे; जीवनपद्धती आहे, समाजामधील वैविध्यामध्ये जुळवून घेण्याची रीत आहे वगैरे वगैरे. आपल्याकडे आर्थिक लोकशाही आहे जी एकीकडे आर्थिक समतेचा पुरस्कार करते पण त्याच वेळी दुसरीकडे (वैयक्तिक) खाजगी मालमत्ता आणि वारसा हक्काने, रुढीने व्यक्तीला मिळणारे पवित्र हक्क ज्यायोगे तो संपत्ती निर्माण करणे व मालकी हक्काने तिचा उपभोग घेणे यामध्ये सरकार व समाज यांचेकडून कोणताही अडथळा वा हरकत येऊ नये अशी ही तरतूद करते.

या दोन्ही संकल्पना 'आर्थिक लोकशाही' च्या संज्ञेमध्ये मोडतात. मार्क्सवादानुसार 'आर्थिक समता' म्हणजेच 'लोकांची लोकशाही' आणि 'खाजगी मालमत्तेचा हक्क' म्हणजे 'भांडवलवादी लोकशाही'. 'व्यक्तीच्या संपत्ती मिळविण्यासंबंधीचे वैयक्तिक हक्क' आणि समाजातील प्रत्येकासाठी, सामाजिक संपत्तीचे समान वाटप या उघड उघड विसंगत संकल्पना म्हणजे अनेक विरोधाभासी संकल्पना असलेले लोकशाहीचे स्वरुप आहे.

उदाहरणार्थ लोकशाहीची मध्यवर्ती कल्पना म्हणजे, 'बहुमताचे राज्य' पण हीच 'अल्पसंख्यांकाच्या' हक्क आणि दृष्टिकोनाशी विरोध करते. सामाजिक आणि सार्वजनिक धोरणे ठरविताना अल्पसंख्यांक जनतेच्या दृष्टिकोनाकडे गंभीरपणे पहायला नको का? पण असा उदार दृष्टिकोन ठेवल्यास 'बहुमत' वाले सरकार अल्पमतात जाऊ शकते. आपल्याकडे बऱ्याच राजकीय पक्षांना असे वाटते की, अल्पसंख्याकांच्या चांगुल चालनासाठी 'मतपेटीचे' राजकारण करुन, सत्ताधारी सरकार वहुसंख्य जनतेकडे दुर्लक्ष करत असते. प्रश्न असा आहे की बहुसंख्य लोकमताशी मतभेद असूनही अल्पसंख्यांक जनता भयमुक्त, स्वतंत्र राहू शकते का? ही खरी राजकीय लोकशाही प्रणालीची कसोटी आहे. बरेचदा असे म्हटले जाते की लोकशाही जाहीर करणे सेपे आहे पण फार काळ ती टिकवणे, अंगीकारणे कठीण आहे. ही समस्या आधीच्या परकीय वसाहती पण आता स्वतंत्र झालेले देश, विशेषतः आफ्रिका, एशिया खंडातील ज्याला तिसरे जग म्हणतात, त्यांच्याशी संबंधित आहे. इथे असे दिसते की, जिथे एकदा (स्वातंत्र्योत्तर) लोकशाही यंत्रणा कार्यरत होती तिथेच आता एकपक्षीय सरकारी यंत्रणा कार्यरत आहे.

राज्यकर्ते आणि जनता या दोन्ही घटकांना एका विविक्षित अनुशासनाचे पालन लोकशाही राज्य प्रणालीमध्ये करावे लागते. लोकशाहीची मूल्ये अंगी बाणण्यासाठी, ती रुजायला फार काळ लागतो. विशेषतः ज्या देशांमध्ये, हुकुमशाही अमलाखाली समाज होता. 'स्वातंत्र्य' आणि व्यक्तीचा आत्मसन्मान ही दोन लोकशाहीची तत्त्वे म्हणजेच लोकशाहीचे सार आहे. पण हीच दोन तत्त्वे 'बहुमतांचे राज्य' या तत्त्वाशी विरोध दर्शवितात.

'व्यक्तीस्वातंत्र्य' ह्या संकल्पनेला ज्या प्रणालीमध्ये आदर आहे अशी राज्यपद्धती. जसे जे. एस. मील आणि रुसो यांच्या म्हणण्याप्रमाणे, 'जिथे लोकांची सामूहिक विव्दबत्ता किंवा लोकांच्या सामूहिक शहाणपणाला राज्य कारभारासाठी प्रारंभीच दिलेला वाव' म्हणजे लोकशाही. 'लोकांची सत्ता' 'लोकांचा / जनतेचा आवाज' या जनतेची सत्ता कल्पना जितक्या लोकशाहीवादी आहेत तितक्याच 'व्यक्तिस्वातंत्र्याच्या' संकल्पनाही लोकशाहीच्या द्योतक आहेत, हे स्पष्ट आहे की, वरीलपैकी कोणात्याही एकाचा अतिरेक झाल्यास वैयक्तिक स्वार्थामुळे अराजक माजेल किंवा लोकांच्या सामूहिक सत्तेच्या रेट्यामुळे स्वातंत्र्यतेलाच धोका निर्माण होऊ शकतो.

हे तर सर्वश्रृतच आहे की 'जनता' ही संज्ञा साम्यवादी व हुकुमशाही राज्यकर्ते, स्वतःच्या 'लोकशाही विरोधा' ची भूमिका लपविण्यासाठी वापरतात. समूहाचे हक्क आणि व्यक्तीचे हक्क यामध्येही अशाच प्रकारचा विरोधाभास आढळून येतो. एका गटाचा, त्यांची जीवनपद्धती, संस्कृती, धर्म इ. संबंधीचा हक्क जपणे हे नक्कीच लोकशाही मूल्य आहे. तसेच गटाच्या मतांशी असहमत होणे हा लोकशाही मूल्याचाच भाग आहे. कळीचा मुद्धा असा आहे की वैयक्तिक निवडीवर सामूहिक निवडीचे होणारे अतिक्रमण कसे रोखायचे? आधुनिक लोकशाहीपुढे हे खरे आव्हान आहे. परस्परांना व्यापणारे हे मुद्दे पाहता स्पष्टपणे ज्याला 'लोकशाही पद्धत' म्हणता येईल असे स्वरुप स्पष्टपणे मांडता येण्याची गरज आहे.

## ११.२ लोकशाहीचा अर्थ आणि व्याख्या

इतर अनेक राजकीय संज्ञांप्रमाणेच 'डेमोक्रेसी' ही संज्ञा, ह्या शब्दाचे मूळ रुपही ग्रीक भाषेत आहे. जुन्या ग्रीक भाषेतील KRATOS चा अर्थ Power किंवा Rule Democracy म्हणजेच जास्त लोकांनी चालवलेले राज्य. इथे हे लक्षात घेणे आवश्यक आहे की येथे demos म्हणजे ordinary 'सामान्य लोक.' अशा नकारात्मक अर्थाने वापरला होता. अशी ही सर्वसामान्यांची राजवट (अवांछित होती) जी अज्ञानी, अशिक्षित अशा सर्व सामान्यांनी बनवलेली होती. (ती अनेकांना अप्रिय, अवांछित होती) जिच्यामुळे अनेक कल्पना न केलेल्या दुर्दशेला, विपत्तींना सर्वांनाच तोंड द्यावे लागेल. असा समज होता. अशिक्षित, अज्ञानी जन सामान्यांपेक्षा श्रीमंत, अमीर उमराव धनीक, सुशिक्षित लोकच जास्त चांगले राज्यकर्ते होऊ शकतात असे खुद्द प्लेटोचे मत होते. त्याने लोकशाहीचा धिक्कार केला होता. कारण त्याचे गुरु 'सॉक्रेटिस' यांना मृत्यूदंड देण्यास अथेन्सचे लोकशाहीवादी सरकारच कारणीभूत होते. ॲरिस्टॉटल सारख्या इतर अनेक विचारवंताना असे वाटत होते की बंधमुक्त लोकशाही ही झूंडशाही ठरु शकते. तथापि अनेक लोकप्रिय ऐतिहासिक चळवळींनी उदारमतवादाचा प्रसार केला. फ्रेंच राज्यक्रांती आणि अमेरिकन स्वातंत्र्ययुद्ध यांच्या प्रादुर्भावामुळे 'लोकसत्ताक राज्य' ही संकल्पना अधिक आदरणीय आणि हवीहवीशी वाटणारी राज्यप्रणाली बनली याला काळच साक्षी आहे.

अब्राहम लिंकन यांनी केलेली सर्वमान्य अशा लोकशाहीच्या व्याख्येमध्ये तीन प्रकारच्या लोकशाहीचे स्पष्टीकरण आहे. लोकशाहीशी थेट भिडणारी संकल्पना म्हणजे 'लोकांचे सरकार'? या पद्धतीमध्ये लोक त्यांच्या संदर्भातील सक्रीय सहभागी असतील. राज्यकर्ते आणि त्यांची जनता यामध्ये फरक नसेल. ते एकच असतील. लोकांकडून by the people ही संकल्पना 'प्रतिनिधिक सरकार' या संकल्पनेचे प्रतिबिंब आहे. आधुनिक, शहरी, औद्योगिक जीवन प्रणालीमध्ये आहे. आधुनिक, शहरी, औद्योगिक जीवन प्रणालीमध्ये सर्व सामान्य नागरिकाकडे सरकारी बाबींमध्ये भाग घेण्यासाठी, नाही वेळ नाही क्षमता अशी स्थिती आहे. म्हणून तो आपले सार्वभौमत्व आपल्या प्रतिनिधीकडे सोपवतो. त्यांना निवडून दिलेल्या लोकांच्या वतीने तो प्रतिनिधी कार्यवाही करतो तरीही नागरिकांकडे अमर्याद सत्ता असते. त्या प्रतिनिधींचे काम समाधानकारक नसेल तर त्याला नागरिक परत बोलावू शकतात. एका दृष्टीने हे लोकांच्या सार्वभौमत्वाचे वैधानिक दृष्ट्या झालेले प्रातिनिधिक सरकार असे रुपांतर आहे. अर्थात या पद्धतीला ही मर्यादा आहेत. फार पूर्वी 'रुसो' या प्रसिद्ध फ्रेंच तत्त्ववेत्याने इंग्लंडमध्ये प्रचलित असलेल्या निवडणूक पद्धतीची नालस्ती केली होती. त्यांच्या म्हणण्याप्रमाणे पार्लमेंटचे सभासद निवडण्यासाठी इंग्लंडचे नागरिक स्वतंत्र असतात. निवड झाल्याबरोबर तेच नागरिक गुलाम बनतात. त्यांचे महत्त्व निघून जाते. प्रतिनिधी निवडण्याचा पद्धतीमधील मर्यादा सांगणारे मुद्दे भारतीय लेखक व राजकीय चिंतक 'जयप्रकाश नारायण', 'विनोबा भावे', आणि 'महात्मा गांधी' यांच्या लिखाणातून व्यक्त झाले आहेत. त्यांना 'थेट लोकशाही' ची ग्रामपंचायत पद्धती जास्त योग्य वाटते. अर्थात या पद्धतीच्या व्यवहार्यतेसंबंधीही अनेक मतभिन्नता आहेत.

लीकंनची तिसरी उक्ती, 'लोकशाही - लोकांसाठी' ह्या मध्ये लोक कल्याणकारी राज्य यावर विशेष भर दिला आहे. ह्या संकल्पनेवर राज्य संस्थेचा रोख, हेतु हा जन कल्याणच असायला हवा, या मुद्यांवर सर्वच राजकीय विचारवंतांनी भर दिला आहे. राज्य चालवणारी संस्था किंवा सरकार म्हणजे जुलुम, जबरदस्ती करणारी यंत्रणा असे नसून ती फक्त

लोककल्याणासाठी असेल किंवा मध्यस्थ आहे. त्यांच्या लोकांच्या जीवनामध्ये लक्षणीय बदल घडवून आणण्याची, त्यांच्यावर नैतिक जबाबदारी आहे. कमाल लोकसंस्थेला, कमाल आनंददायी जीवनाचे ध्येय साध्य करण्यासाठी कायद्याचे कठोर स्वरुप शिक्षा असतात. झर सर्व तहेची सरकारे असाच विचार करत असतील, तर त्यांच्या मध्ये आणि 'लोकशाही' सरकार यामध्ये काय फरक आहे? एखादा उमदा उमराव किंवा दयाळू हुकुमशहा, सुद्धा कदाचित लोककल्याणकारी योजना आणून पावले उचलत असेल पण यामध्ये अभाव कशाचा आहे, तर तो लोकांचा राज्यकर्त्यांच्या मताशी 'असहमत' असणाच्या हक्कांचा, त्याच्या योजनांवर टीका करण्याच्या हक्काचा, आणि सरकार बदलण्याच्या अत्यूच्य हक्काचे हा जो सरकार बदलण्याच्या जनतेचा हक्क, जो लोकशाहीचा 'मध्य बिंदू' व 'मान बिंदू' आहे, तो सर्वात महत्त्वाचा आहे. यामुळे 'लोकशाही' ही 'अद्वितीय' 'विलक्षण' आहे, जिथे खरे सार्वभौमत्व ही संकल्पना मतदारांच्या हाती आहे लोकशाही सरकार या मध्ये सरकार हे 'धनी' नसून लोकांचे चाकर आहेत. इथे लोक त्यांना काय हवे ते ठरवतात. एखादा उमदा हुकुमशहा चांगल्या हेतूने काही योजना हाती घेईल आणि लोकांना त्याचे त्या योजनाला हेतु सकट मान्य कराव्या त्याच्या त्या योजनांना लोकांना लागतील, जर त्यांना तसे वाटत नसेल तर अशा गोष्टींना देशद्रोह असेच मानले जाते. या पद्धतीमध्ये, साधा नियम म्हणजे लोकांसाठी काय चांगले आहेहे राज्यकर्त्यांना समजते. स्वतःच्या हितरक्षणासाठी लोकांची त्या नियमांचे पालन करावे. हे तत्त्वज्ञान अमानुष असून, व्यक्तिच्या प्रतिष्ठेस आणि स्वाभीमानास घातक, विरोध करणारे आहे. प्रत्येक नागरीकाला स्वतंत्र अस्तित्व असते. त्या नागरीकांची एका परीपूर्ण व्यक्तिमत्त्वामध्ये (रुपांतर) होण्यासाठी सरकारने काही योजना आखण्याची गरज आहे. 'जळे त्याला कळे' किंवा पायतानातला खिळा कुठे टोचतो, हे ज्याच त्यालाच कळत या तत्त्वावर लोकशाहीची उभारणी आहे. त्यामुळे हे तत्त्व नागरिकाला 'नाही' म्हणण्याच्या हक्काची हमी देते. मग भले ही सरकार कोणत्याही योजनांची अमलबजावणी करत असू दे किंवा कितीही चांगला उदात्त हेतू त्यामागे असुदे. भारता मध्ये सध्या जनमताच्या रेट्याचा प्रार्दुभाव कसा होतो याला आपण साक्षी आहोत. उदा. अणुऊर्जा निर्मितीच्या मोठ्या संयुक्त प्रकल्पांना भारतीय शेतकरी विरोध करीथ आहेत; त्यासाठी सरकारला जमीन घ्यायला ते नकार देत आहेत. सरकारचा हेतु, ऊर्जेचे इतर स्त्रोत शोधणे असा प्रामाणिक आहे. पण त्यासाठी आधी आपण रोजगार निर्मिती होईल, असे उद्योगधंदे देशात सुरु केले पाहिजेत. कारण अखेर अशा प्रकल्पांची झळ, ज्या शेतकऱ्यांची जमीन जाणार आहे त्यांना लागणार आहे. तसेच जे लोक ह्या प्रकल्पाजवळ राहतात त्यांना काही धोक्यांना तोंड द्यावे लागणार आहे. म्हणून त्यांना 'नाही' म्हणायचा हक्क असायला हवा किंवा वैकल्पिक मागणी म्हणून जमीनीच्या किंमती एवढी भरपाई पुर्नवसनासाठी मिळायला हवी. याचा परिणाम काहीही असो. पण पीडित किंवा विस्थापित होणाऱ्या लोकांचे गाऱ्हाणे अैकले गेलेच पाहिजे. कारण शेवटी, हा सामान्य माणूस, जो या योजनांचे परिणाम भोगणारे आहे, त्याला हो किंवा नाही म्हणण्याचा अधिकार असलाच पाहिजे. अशा प्रकारे लोकशाही ही नैसर्गिक सरकारी प्रणाली आहे; असे आपण म्हणू शकतो. अर्थातच सर्व योजनांसाठी लोकांची सहमती मिळविण्याची आवश्यकता सर्व प्रकारच्या सरकारी व्यवस्थांना लागते. उदा. आपले राष्ट्र संकटात आहे. म्हणून आपल्याला अण्वस्त्रे निर्मिती करावी लागणार आहे. अशा सारख्या, भावनेला हात घालणाऱ्या कल्पनांच्या सहाय्याने ते लोकांची सहमती मिळवू शकतात. कधी कधी बंदुकीच्या धाकाने, क्रौयाची सीमा ओलांडत अशी अनुमती मिळवली जाते. याचे उत्तम उदाहरण म्हणजे, 'मार्क्स चे सामुहीकरण आणि 'माओ' च्या सर्वश्रृत योजना'. कधी कधी उद्देश भला खरा असूनही, मिळालेली अनुमती तितकी मोकळेपाची नसते. शिक्षा होईल या भीतीने किंवा खोट्या प्रचारामुळे, दिलेल्या चुकीच्या माहितीच्या आधारे योजनांना लोकांची कामचलाऊ सहमती मिळुन जाते. पण

त्याचे गंभीर परिणाम पूढील कालखंडात मध्य पूर्वेत लोकांनी केलेल्या बंडाचा उठाव जो हुकुमशाही राजवटीबद्दल सध्या सुरु आहे त्याद्वारे दिसून आले. सर्वोच्य सत्ता शेवटी लोकांकडेच असते याचे हे उत्तम उदाहरण होय. हे अगदी बरोबर विधान आहे. "तूम्ही काही लोकांना काही वेळा मूर्ख बनवू शकता; तुम्ही जास्तीत जास्त लोकांना जास्तीत जास्त वेळा मूर्ख बनवू शकता पण सर्व लोकांना सर्व वेळी मूर्ख बनवू शकत नाही."

'राजकीय पारदर्शकता' हा लोकशाहीचा महत्त्वाचा गुणधर्म आहे. म्हणून या व्यवस्थेमध्ये लोकांना मुर्ख बनवणे कधीही मान्य नाही. लोकसत्ताक सरकारी पद्धतीमध्ये लोकांची अनुमती मिळविण्यासाठी काही संस्थात्मक यंत्रणा आहेत. असे ठराविक मुदतीने होणाऱ्या निवडणुका, जनमत, मुक्त वातावरणातील चर्चा इत्यादी. याच्या मार्फत कोणतीही योजना लादली जाण्यापासून रोखली जाते. ती उर्त्फूतपणे आतूनच विकसीत होते.

'लोक कल्याणकारी योजना' या टप्प्याच्या स्वरुपाचा उदय आधुनिक लोकशाहीच्या मूळाशी आहे. तत्पूर्वीच्या स्थितीमध्ये भांडवलशाही आणि लोकशाही संलग्न केली होती. त्या ऐतिहासिक परिस्थितीमध्ये, 'लोकशाही' म्हणजे व्यक्तिसाठी अधिक स्वातंत्र मूलतः बंधने आणि आदेश, कायदे यांच्या विरुद्ध बंड होते. जेव्हा राजकीय किंवा सामाजिक बंधने तुटतात तेव्हाच व्यक्तिच्या व्यक्तिमत्त्वाची संपूर्ण वाढ होऊ शकते. अशा विकासाला उत्तम संरक्षण देण्यासाठी राज्याचे, पर्यायाने सरकारचे अधिकार कमी करणे आवश्यक आहे. कारण व्यक्तिच्या विकासात सरकारी अडथळे जास्त असतात. पूर्वीच्या काळाचे तत्वज्ञ, जसे (John Locke) जॉन लॉक, जे. एस. मिल, यांच्यामते स्वातंत्र्य फक्त सरकार कडूनच नाही तर समाजापासूनही हवे. म्हणून त्याचे ब्रीद वाक्यच होते, जे सरकार कमीत कमी हस्तक्षेप करते तेच सरकार उत्तम असते. सरकारे व्यक्तिकेंद्रीत होती. आणि सरकार ची भूमिका रात्रपाळीच्या रखवालदाराची म्हणजे अत्यावश्यक असा दुष्ट प्रवृत्तीची होती. अशा सरकारचे मुख्य कार्य म्हणजे अंतर्गत सुव्यवस्था (कायदा आणि व्यवस्था) ठेवणे आणि परकीय आक्रमणापासून राज्याचे संरक्षण करणे बाकी सर्व बाबी व्यक्तिगत समजल्या गेल्या. पण जिथे जिथे सामाजिक अन्याय किंवा आर्थिक शोषण करण्याची भरपूर संधी होती तिथे तिथे असे सरकार मूक प्रेशकाची भूमिका बजावत असे. तेव्हा डार्विन चा 'सामाजिक उत्क्रांतीवाद' प्रचलित होता. गरीब, दारिद्री विस्कळीत सामाजिक स्तर मात्र धनिक वर्गाच्या दये वर च जगत होते. 'लोकशाही' म्हणजे 'धनिकांची चैन आणि गरीबांचा 'शाप'' होऊन बसली होती. भांडवलवाद्यांची नवीन बाजारपेठा शोधण्याची हावेची परिणती वसाहतवादात आणि साम्राज्यशाहीत झाली होती. तदनंतर राजकीय किंवा आर्थिक सिद्धांता बद्दलच्या पायाभूत संकल्पना. मग 'साम्यवादी हुकुमशाही' या प्रसिस्पर्धी कल्पना अस्तित्वात आली. ह्या संकल्पंनानी, त्वरित परिणाम देण्याचे अभिचन दिले. सर्व दोषांचे खापर 'भांडवलवादी लोकशाहीवर' फोडण्यात आले. मार्कसीस्ट संकल्पनानी शोषित वर्गाला आर्थिक न्याय देण्याचे कबूल केले. प्रसिद्ध रशियन क्रांतीकारक - ट्रोटस्ची याने जाहिर केले मध्यमवर्गीय लोकशाही ही क्रांती विरोधी आणि निष्फळ ठरेल. म्हणजे क्रांतीच्या विरोधात 'लोकशाही' टिकणार नाही. १९२६ मध्ये Hamburg जर्मनी मध्ये, कम्युनीस्ट पार्टीच्या सेक्रेटरी ने उघडपणे म्हटले, लोकशाहीच्या उकीरड्यावर सडण्यापेक्षा, तो स्वतः आगीमध्ये 'आत्मदहन' करेल.

वसाहतवादाशी टक्कर देताना, 'वैयक्तिक स्वातंत्र्यापेक्षा 'समतेचे' तत्त्व जोरदारपणे पुढे आहेत. वसाहत वादाने पिडलेल्या देशांना अशी नवीन संरचना हवी होती कि जिचे सरकार फक्त रात्रपाळीचे रखवालदार ही भूमिका सोडून देशातली गरीबी कमी करण्यासाठी पूढाकार

घेईल.' साम्यवाद, समाजवाद आकर्षक झाले. सरकारपूढे आलेल्या आव्हानांमुळे, लोकशाही च्या धारणे मध्येच दुरुस्ती करणे आवश्यक झाले.

लोकसत्ताक राजकीय यंत्रणे वर दोन दृष्टीकोन राज्य करतात. एक म्हणजे नियमीत राजकीय वेगवेगळे गट करुन आपापल्या मागण्या, स्पर्धात्मक वातावरणात मांडून त्या मान्य करुन घेतात. ही एक नैसर्गिक राजकीय कृती समजली जाते, ज्याबद्दल LAASWELL वर्णन करतो, "कोणाला काय मिळते? कसे?" परंतु याहीपेक्षा कल्पनारम्य, व्यापक असा लोकशाहीचा दृष्टीकोन आहे. यालाच आपण स्व-सुधारणा करणारा दृष्टीकोन म्हणूया. याच कल्पना रम्यते मुळे युरोपीय राष्ट्रांना, मुक्त अर्थ व्यवस्थेकडे, तसे उत्पादनाच्या भांडवलवादी पद्धती मधील उणीवांचे सिंहावलोकन करणे गरजेचे ठरले. मुक्त उद्योगधंद्यातली दुष्ट कुकर्म स्पष्ट होती. आर्थिक विषमता, कामगारांचे शोषण, आणि काही हातांमध्ये संपत्तीची गोठवणूक हेच त्याचे स्वरुप होते. त्यामुळे कमी लोकांना रोजगार मिळू लागले. म्हणून एक योजना तयार झाली. आर्थिक व्यवहारामध्ये सरकार हे महत्त्वाचे प्यादे झाले. सरकारचा हेतूच मुळी, लोकांची जीवनशैली अधिक चांगली करणे हा होता. प्रगतीशील कर योजना आणि 'कल्याणकारी योजना' ही प्रचलित कार्यप्रणाली झाली. किमान वेतन, नियमित कामाचे तास आणि कामगारांच्या हिताचे रक्षण करणारे परिणामकारक कायदे आमलात आणले गेले. मूलभूत गरज जसे अन्, वस्त्र, आणि निवारा, यांचा पूरवठा करण्याची जबाबदारी सरकारने घेतली. म्हातारपणासाठी निवृत्ती वेतन आणि बेरोजगार भत्ता ही आमलात आणला गेला. तरीही ते एकपक्षीय राज्यकारभार करणारे सरकार असे झाले नाही, जरी त्यांच्या कामाच्या कक्षा मध्ये बरीच वाढ झाली. निवड करण्याचे स्वातंत्र तरीही राहिलेच. म्हणजे नवीन लोकशाही प्रणालीने समाजासाठी पायाभूत सुविधा पुरवणारी यंत्रणा उभी केली पण ही निवड करायचा अधिकार शाबूत ठेवला. उदा. सरकार काय शिकवले जावे याबाबत ढवळा ढवळ करणार नाही. अमेरिकेच्या विद्यापिठामध्ये, साम्यवादावर अभ्यासक्रम आहे; तसेच U.S.A. च्या आर्थिक धोरणांचा टीकात्मक अभ्यास असे पाठ्यक्रम आहेत. या विभागांनाही सरकारचे आर्थिक पाठबळ आहे. यावरुन हे सिद्ध होते की, एक लोकसत्ताक सरकार लोकांच्या मनावर, मतांवर नियंत्रण ठेवण्याचा प्रयत्न करत नाही हाच सूक्ष्म आणि मार्मिक फरक आहे. कायदेशीर जुलमी राजवटीतील त्यांची प्रजा आणि लोकसत्ताक राजवटी आणि त्यांची प्रजा यामध्ये लोकशाही मध्ये अनेक ऐच्छिक संस्था, ज्यांचे बहुविध दृष्टीकोण हे तसेच्या जसे जपले जातात. सरकार त्यांना मदत करते. पण त्यांच्यावर वर्चस्व गाजवत नाही. ते सरकार समाजाला आणि त्यांच्या संस्थांचा विकास करण्यास मदत करते पण त्यांच्यात नाक खुपसत नाही. 'निवडीचे स्वातंत्र' या तत्त्वाचा हा अर्कांश नवीन लोकशाहीने तो जपला आहे. बहुविधा मध्ये लोकशाहीचा ठाम विश्वास आहे. यामध्ये विरोधाभास असणारे दृष्टीकोन मान्य होतात, विकास पावतात. इथे पूर्ण स्वातंत्र्य (वैचारिक) असते. अशा तऱ्हेने विविध दृष्टिकोनांचा घुसळण्याने, नवीन आव्हांनाना उत्तरे शोधणे शक्य होईल. जर कुठे लोकशाही अपयशी झाली, तर त्याचे कारण ह्या कल्पना रम्य तरीही अत्यंत आदरणीय, लोभस अशा दृष्टीकोनाचा अभाव हेच असेल.

म्हणून आधुनिक लोकशाही सरकार हे नकारात्मक नाही. तर Pro-active आहे म्हणजे संभाव्य अडचणींचा विचार करुन त्यावर आधीच कृतिसंबंधी विचार करणारे, आणि कृतिवर मर्यादा असणारे आहे. Joseph Schumpeter यांनी आपला भांडवलशाही, समाजवाद, लोकशाही या संबधी केलेल्या कामामध्ये, लोकशाही व्यवस्थेला नवा अर्थ दिला आहे. तो म्हणतो, "लोकशाही यंत्रणा ही संस्थात्मक व्यवस्था आहे ज्यानुसार राजकीय निर्णय घेण्याची क्षमता जनतेकडे असते. स्पर्धात्मक प्रयत्न करुन जनतेची मते उमेदवारांना मिळवता येतात."

**आपली प्रगती तपासा :**

१) 'लोकशाही' या संज्ञेची व्याख्या करा.
२) तिच्या महत्त्वाचे सूक्ष्म दृष्टीने मूल्यमापन करा.

## ११.३ लोकसत्ताक आदर्शांचा ऐतिहासिक विकास

'राजेशाही' ही राजकीय यंत्रणा फार काळापासून प्रस्थापित आहे. तरीही 'गणराज्य' या संकल्पनेची काही मूलतत्त्वे जगाच्या काही भागात अस्तित्वात होती हे मर्म आपण जाणून घेऊ शकलो. उदा. वैदिक काळात 'गण' म्हणजे लहान लहान राजकीय विभाग अस्तित्वात होते. 'गणा'चा नेता निवडला जात असे. राजा किंवा राज्यकर्ता ही निवडला जायचा. पण तो पारंपारिक वंशपरंपरेनुसार नव्हे. मात्र केवळ निवडलेला नेता लोकसत्ताक पद्धतीचे राज्य असेल असे म्हणता येत नाही. एखादे सरकार लोकसत्ताक आहे असे जाहीर करण्यापूर्वी, तिथे, स्वातंत्र्य आणि समता या तत्त्वांचा अवलंब केला जातो. हे पाहणे गरजचे आहे. आम्हाला हे नक्कीच माहित आहे की, 'प्रौढ मत दानाचा हक्क' हे तत्त्व तेव्हा उदयास आले नव्हते. 'गणराज्य' पद्धत आणि 'लोकशाही' पद्धती मध्ये थोडा फरक आहे. हल्लीच्या काळात. या दोन्ही पद्धती राबवणारी 'अमेरिका' आणि भारत ही दोन्ही राष्ट्रे आहेत. पण चीनहा देश 'गणराज्य' आहे पण लोकशाही मानत नाही. 'ब्रीटन' ही गणतंत्र व लोकशाही मानणारे राष्ट्र आहे. मूळात ज्या राजकीय पद्धतीमध्ये नेता हा वंश परंपरेनुसार निवडक्ता जात नाही तेव्हा तीला 'गणतंत्र' असे म्हणतात. लोकशाही-गणराज्य म्हणवून घेण्यासाठी निवडणुकांसाठी मुक्त वातावरण, निवडणुकीत भाग घेण्याचा हक्क, सरकारवर टीका करण्याचा हक्क इ. पूर्वापेक्षित लक्षणे, लक्षात घ्यावी लागतात. काही 'एक पक्षीय' सरकार 'गणराज्य' असू शकतील पण त्यांना लोकशाही म्हणता येणार नाही. तर काही सरकारे 'लोकशाही' असतील पण गणतंत्र नसतील, तर काही मध्ये दोन्हींचा अवलंब केला असेल.

सामाजिक बाबींमध्ये, लोकांचा सक्रीय सहभाग हा शोकशाही पद्धतीसाठी अत्यावश्यक गुण आहे. हाच मुद्दा लाऊन धरला असता. थेट लोकशाही, ज्यामध्ये लोक, सक्रीयतेने सरकारवर नियंत्रण ठेऊ शकतात, ती सर्वोत्कृष्ट होय. ती पद्धती 'मधल्या' माणसाला काढूनच टाकते. नागरिक राजकीय दृष्ट्या जागरुक असतात, मोकळ्या वातावरणात, जिथे महत्त्वाचे मुद्दे चर्चिले जातात व त्यातून जनकल्याणकारी योजना आकारतात. तीच थेट लोकशाही तिथे नागरिक आपला वैयक्तिक स्वार्थ सोडून सर्वांसाठी उत्तम, फायदेशीर अशा गोष्टींसाठी खात्री देतील कारण तिथे पक्षाची खेचाखेच, दडपण नसेल किंवा निवडणूक हरण्याची भीति नसेल. ही एक मोकळ्या मनाच्या माणसाची विचार विनीमय करणारी सभा असेल जिथे, "सर्वसामान्य लोकांच्या भल्याची योजना" पुढे नेली जाईल. असे वातावरण जिथे दडपणाऱ्या भिती शिवाय बौद्धिक स्वातंत्र्याचा प्रादुर्भाव असेल, एक प्रकारे ते फक्त बोलण्याचे स्वातंत्र्य नसेल तर बोलून

झाल्यावर देखील, मिळणारे स्वातंत्र्य असेल, अशा सभेमध्ये विरोध करणाऱ्या कोणालाही शारीरिक इजा होणार नाही. एका दृष्टीने गुप्त मतदान ही संकल्पना, लोकशाहीच्या मूल्यावरचा कलंक आहे. त्यामुळे एवढेच सिद्ध होते की, अजूनही लोक उघडपणे मत व्यक्त करायला फार घाबरतात किंवा आपली निवड व्यक्त करायला का कू करतात. त्यांना उलटया परिणामांची भिती वाटते. म्हणून ते गुप्त मतदानाची निवड करतात. निर्भयतेचा नैतिक पाया थेट लोकशाहीमध्ये सर्व विरोधी मतासकट, खरे खुरे जनमत आजमण्यावर भर दिला जातो. 'लोकांची इच्छा' 'जन सामान्यांची इच्छा' यावर रुसो या प्रसिद्ध फ्रेंच तत्त्वज्ञाचे वर्णन आहे की, खुल्या मनाच्या लोकांची सभा जी काय चांगले असेल ते सर्वांसाठी असावे असे ठरवते. जरी रोजच्या राजकीय जीवनात आमलात आणायला वरील कल्पना जरा जास्तच आदर्शवादी वाटली तरी एक मतासाठी अशा प्रयत्नांचे मर्म जाणणे शक्य आहे. लोकशाहीतील, लोकसभेची 'समिती पद्धत' हे एक उदाहरण आहे. एका समीतीमधील सभासद, जे निरनिराळ्या राजकीय पक्षाचे सभासद असतात, तसेच सत्ताधारी आणि विरोधी पक्षीय नेतेही असतात. ते बुद्धी पुर्वक, समजुन उमजुन, विचाराने एखाद्या मुद्यावर एकमताने निर्णय घेतात, ज्यामध्ये पक्ष निष्ठा नसते तर खरेखुरे एकमत असते. तसेच युद्धकाळात 'राष्ट्रीय सरकार' स्थापले जाऊन, वेगवेगळ्या पक्षांच्या राजकीय फरकांचे विसर्जन होऊन, 'राष्ट्रीय योजना' संरक्षित केली जाते. पण हे अपवाद आहेत. तरीही थेट लोकशाही आणि संसदीय लोकशाही मध्ये फरक आहे. संसदीय लोकशाही मध्ये निवडलेल्या सभासदांची मर्यादा आहे. तर थेट लोकशाही मध्ये, संपूर्ण लोकसंख्या, विचार पूर्वक समस्येला तोंड देऊन, राजकीय धोरण ठरविते.

ही पद्धती अथेन्स मध्ये कार्यरत होती. अथेनीयन लोकशाहीची ती 'कोन शिला' च होती. ज्यामध्ये त्या त्या शहरातील प्रत्येक नागरिकाचा थेट आणि सतत सहभाग प्रत्येत राजकीय जीवन शैलीत असे. परंतु ह्या नागरीकांचा थेट सहभाग असणाऱ्या लोकशाही ला गंभीर मर्यादा होत्या. सर्वांचा सहभाग ही संकल्पना निवडक होती. फक्त ग्रीक पुरुषांना नागरिक मानले जात असे. ग्रीक नसलेली माणसे, बायका आणि गुलामांना वगळले जात असे. नागरिकांच्या वर्तनाबद्दल एक मोठा हुकुम असे. जसे आपल्या वैयक्तिक स्वार्थाचा कधीही विचार न करता, फक्त समाजाचा हिताचाच विचार अग्रभागी ठेवला पाहिजे. पण हे शक्य आहे का? राष्ट्र, जिथे सरकारी अधिकारी, सत्तेचा कधीच गैरवापर होत नाही तिथे नहेमीच सरकार चांगले चालेल, कदाचित तिथे अशा यंत्रणेची गरजच पडणार नाही. वरील वाक्याचे आपण विश्लेषण केले असता असे निर्विवादपणे दिसून येते कि, पुर्वी कधीही खऱ्या अर्थाने लोकशाही अस्तित्वात नव्हती. सामाजिक प्रश्नांसाठी, सतत वेळ देणे हे व्यावहारिक दृष्ट्या किती लोकांना शक्य आहे? समजा, धरुन चालू हे शक्य आहे. तरी त्याची केवढी पूर्वतयारी करावी लागेल? अत्यंत लहान अशा राज्यात, जिथे प्रत्येकाशी संपर्क शक्य आहे, अत्यंत साधेपणाने जिथे व्यवहार चालतात, तसेच जिथे मिळणाऱ्या फायद्यांच्या संदर्भात समता आहे, अशाच ठिकाणी हे शक्य आहे. अन्यथा (समता, हक्क आणि समान अधिकार या मुद्यांच्या अभावी हे होणे नाही.)

रुसो या तत्त्ववेत्याच्या मतानुसार, वरील सर्व मुद्यासहित आणखी एक महत्त्वाचा मुद्दा म्हणजे, चैन, विलास या गोष्टी अजिबात नसतील तर थेट लोकशाही यशस्वी होईल. कारण श्रीमंती आणि गरीब दोघांनाही विलासी वृत्ती बिघडवते. श्रीमतांना मालमत्तेचा लोभ पछाडतो तर गरीबांना हाव किंवा लोभी वृत्ती आड येते. स्वास्थ, सुखासीनता चैनीवृत्ती आणि पोकळ डामडौल या दुर्गुणांनी देश (लोक) विकला जातो.

अशा अत्यूच्य तत्त्वाचा अंगीकार करणारे नागरिक ह्या लोकशाही प्रणालीला अपेक्षित आहेत. 'रुसो' म्हणतो, "अशी देव माणस जिथे सरकार चालवतील तीथेच लोकशाही असेल, असे परीपूर्ण सरकार माणसांसाठी नाहीच."

पण म्हनून मानव जातीला आदर्श राज्य यंत्रणांची इच्छा करण्यापासून रोखले जाऊ शकत नाही. मानवाचे अथक प्रयत्न, ऐतिहासिक उठाव आणि क्रांत्या, हेच दर्शवतात कि, त्यांना परीपूर्ण आदर्श सरकार स्थापणे साध्य करायचे आहे.

**आपली प्रगती तपासा :**

१) थेट लोकशाहीच्या मर्यादा व गुण यांचा मार्मिकपणे आढावा घ्या.

## ११.४ लोकशाहीचे प्रकार

उदारमतवाद आणि लोकशाही या दोन्ही संकल्पना आपण सारख्याच समजण्याची चूक करतो. आणि Liberal म्हणजे 'उदात्त लोकशाही' अशी संज्ञा नेहमीच वापरतो. लोकशाही राज्यामध्ये बरेच राज्यकर्ते, जे उदार मतवादी तर होते, पण ज्यांचे सर्व सामान्य जनते बद्दल चे दृष्टीकोन अत्यंत अपमानात्मक, तिरस्कारयुक्त असे होते. वरकरणी पाहता उदार मतवाद आणि लोकशाही मध्ये बरेच साम्य आहे असे वाटते कारण दोन्ही राज्य यंत्रणा, व्यक्तिचे स्वातंत्र्य, विविधता, समता, सामाजिक आणि राजकीय प्रश्नांना शांततापूर्ण मार्गाने हाताळण्याचा मार्ग इ. गोष्टी मध्ये सारख्याच मूल्याचे प्रतिनिधीत्व करतात. पण हा झाला हल्लीचा नवीन विचार. तत्पूर्वी या दोन्हींमध्ये विसंवाद होता. उदारमतवादी परंपरेनुसार लोकशाहीला विरोधच करत होते. १९ व्या शतकाच्या अखेरीस उदारमतवादी नी मोठ्या नाखुषीनेच लोकशाहीच्या काही मुख्य मागण्याचा स्वीकार केला. उदा. राजकीय क्षेत्रात असायला हवी अशी 'समता'. सर्व साधारण प्रौढ मतदान, उमेदवाराबद्दल तक्रार करणे इ. लोकशाहीच्या प्रमुख धारणा, उदारमत वाल्यांना अजिबात आवडत नसत. त्यांचा प्रमुख उद्देश मालमत्तेचा हक्क हा विशेष महत्त्वाचा होता. जो त्यांच्यामते नैसर्गिक होता. राजेशाहीच्या नियंत्रणातून त्यांना तो हक्क वाचवायचा होता. वास्तविक पाहता दुसऱ्या महायुद्धानंतर बऱ्याच उदारमतवाद्यांनी लोकशाही, सरकार ऐवजी उच्चभ्रू सरकार स्थापावे अशी विनंती केली होती. समस्यांचे गुंतागुंतीचे स्वरुप पाहता सामान्य माणसांना त्यांचे आकलन होईल का याबद्दल त्यांच्या मनात शंका होती. म्हणून त्यांना (उदारमत वाद्यांना) तांत्रीक दृष्ट्या सक्षम सरकार हवे होते. सामाजिक बाबींमध्ये सर्वसामान्यांचा सहभागासाठी ते निरुत्साही होते. परंतू सर्व सरकारांना आपण 'लोकशाहीवादी' आहोत असे म्हणवून घ्यायला आवडत असे. ही प्रवृत्ती दुसऱ्या महायुद्धानंतर बळावली कारण नावातच (लोकशाही हा नावातच) जादू (गुण) होती आणि आहे. सर्व राज्यकर्ते आज लोकशाही राज्य करण्याच्या आव आणतात कारण तसे असणे हे गुणसंपन्नतेचे मानले जाते. Dirergent चा अर्थ

भिन्न या ऐवजी 'रॉबर्ट डहल' Polyachies म्हणजे निरनिराळे दृष्टीकोन असणारी राजवट, असा शब्द 'लोकशाही' ऐवजी वापरतो. तो म्हणतो लोकसत्ताक उदारमतवाद आणि भांडवलवाद ही अदलून बदलून वापरलेली नावे आहेत. ह्या मतप्रवाहाला इतरांकडून आव्हान दिले गेले.

ऐतिहासिक दृष्ट्या पाहिले असता उदारमतवादी म्हणजे लोकशाही वादी नव्हे. उदारमतवाद्यांचे रुढीवादी टीकाकार 'हे लोकशाहीवादी आहेत' असे शिवी दिल्यासारखे म्हणत असत. ज्या उत्कृष्ट, उदारमतवादी लोकशाहीच्या रचना, ज्या मूलतत्त्वांनी ती बनली आहे; तिचे विश्लेषण केले असता, असे दिसून येते कि, आजच्या रुढ लोकशाहीशी त्या अत्यंत विसंगत आहेत. John Lockes अभिरुचीपूर्ण, सरस लोकशाहीचा जनकला, सुद्धा "सार्वत्रिक मतदानाची कल्पना" कधीही योग्य वाटली नाही. त्याच्या प्रथम श्रेणीचा, दोन सरकारसंबंधी 'Two treaties of Government' च्या प्रबंधामध्ये, तो अत्यंत पोटतिडकीने, गौर स्त्रियांचे मतदानाचे हक्क, जमीनदारांचे हक्क आणि व्यापाऱ्यांच्या हक्का बद्दल तरफदारी करत आहे. सामान्य माणसांच्या मतदानाच्या हक्काबद्दल त्याने साधा उल्लेखही केलेला नाही. आपण इंग्रजांच्या राष्ट्रीय घटनात्मक इतिहासाचे निरीक्षण केले असता असे दिसते की, लोकशाही संकल्पनेमध्ये प्रस्थापित राजेशाहीचा नाश करायचा धोका आहे असे समजले जात असे.

चार्लस राजा (१६००-४९) याने ब्रिटीश संसदेला, 'लोकशाहीला आश्रय' देण्याबद्दल दोषी ठरवले होते; ज्या संसदेने त्याला 'गुन्हेगार' ठरविले होते. पण याचा अर्थ अशा नव्हे की जे राजेशाहीच्या विरोधात होते ते सामान्यजनांबद्दल सहानुभूती बाळगत होते. ऐतिहासिक नोंद ही याचाच पुरावा देते. Oliver Cromwell ज्याने लोकशाही विरुद्ध युद्ध पुकारले, खुद्द तो, वा त्याचे कर्मठ सुशिक्षित अनुयायी, या कोणाच्याच लोकशाहीवर विश्वास नव्हता. त्यावेळी इंग्लडमध्ये एक Lovelers नावाची सामाजिक चळवळ सुरु होती जिचे मूळ डाव्या विचारसरणी मध्ये होते. परंतू त्यांनी सुद्धा भिकारी आणि नोकरांना आपल्या कार्यक्रमातून वगळले होते.

मतदानाच्या वाढीव हक्कांमुळे सर्व मानव समान आहेत या उदारमतवादाच्या नितीतत्त्वामुळे, ही लोक सत्तेच्या राजकारणात सहभाग मागून ऊमरावांच्या हक्कांना आव्हान देतील अशी धोक्यांची सूचना Cromwell च्या अनुयायांना आधीच आकलन झाली होती.

अमेरीकन व्याख्याकार, Tocqueville (1805 to 1859) यांनी त्यांच्या काळातल्या अमेरीकन सरकारचे वर्णन 'लोकशाही' असे केले होते. परंतू लोकशाहीचा जर कोणता एक उद्देश १९६० पर्यंत निरीक्षीला गेला असेल तर तो म्हणजे, 'ताबा आणि समतोल यांचे तत्त्व'.

याआधी उल्लेख केल्याप्रमाणे, परंपरावादी उदारमतवादी लोकांना फक्त आपल्या खाजगी मालमत्तेची सुरक्षिततेची काळजी होती. त्याकाळी राजे लोक स्वतःच्या स्वार्थासाठी उमराव लोकांच्या मालमत्तेचे अपहरण (लूट) करत असत. त्यामुळे धनिक वर्ण, ज्यांना उदारमतवादी म्हटले जायचे, त्यांना एक संरक्षक कडे उभारण्याची गरज वाटली. नैसर्गिक हक्काच्या नावाखाली त्यांना हे राजाने केलेले मालमत्तेवरील अतिक्रमण थांबवायचे होते. म्हणून राजाच्या एकाधिकारशाहीला विरोध करण्याचे एकमेव, ढळढळीत कारण, स्वातंत्र्य ची मागणी म्हणजे मालमत्तेचा हक्क हीच होती.

त्यांच्यासाठी मालमत्तेचा हक्क जपण्यासाठी, लोकशाही अस्तित्वात असणे अनिवार्य होते. ही तत्वे परंपरावादी, उदारमतवादी लोकशाही तत्त्वांमध्ये आजच्या आधुनिक लोकशाहीची तत्त्वे, जसे, आर्थिक समता, आर्थिक शोषणापासून संरक्षण, न्याय, इ. ही कुठेही सापडत नाहीत.

अमेरिकनच्या संविधानाच्या नोंदीच्या संस्थापकांपैकी एक संस्थापक Madison याने स्वायत्तराष्ट्रवादी नोंदीमध्ये असे वाचले की, मालमत्तेच्या हक्काशिवाय (वाचून) लोकशाही अपूर्ण आहे; कारण त्यामुळे सुरक्षितता मिळते. ‘थॉमस जेफरसन’, च्या मते पुरुष शेतकरी, ज्यांच्याकडे मालमत्ता आहे, ते मतदार झाले पाहिजेत. त्याकाळी अमेरिका लोकशाहीवादी आहे असे कोणीही म्हणू शकले नसते. कारण तेव्हा तिथे गुलामगिरी होती तसेच तिथल्या मुळच्या अमेरिकन्सची किंवा ज्यांना रेड इंडियन म्हणत असत त्यांची मालमत्ता, आणि धनसंपत्तीचे मालकी हक्क हिरावून घेतले जात होते. त्याकाळच्या विचारवंतासाठी ‘समता’ हा शाप होता. वास्तवात, १९२० मध्ये एका अमेरिकन सरकारी प्रकाशनाने लोकशाहीचा धिक्कार केला होता. जनतेसाठी असलेल्या लोकशाहीच्या नावाखाली लोकनेत्यांनी तीचा वापर डावपेच, घडवून परवाने देण्यासाठी, चळवळी करण्यासाठी अराजक माजवण्यासाठी आणि मालमत्तेचा हक्क अबाधित ठेवण्यासाठी केला. समाजातील अत्यंत अल्प संख्याक, किंवा विशेष वेगळेपणा असलेल्या (भिकारी, चोर, किंवा किन्नर समाज) लोकांना सामाजिक कामकाजात काही मत असावे असे वाटते. हे त्याकाळी फारच जहाल मत होते. (परंपरावाद्यांसाठी) त्यांचे आदर्श म्हणजे फक्त काही निवडक श्रीमंत, सुशिक्षित वर्गाचे, सत्ताधारी सरकार किंवा समाज, याच्याकडून होणाऱ्या अतिक्रमणास थोपवणे. J.S. Mill यांना तर समाजाच्या भल्या च्या ऐवजी ‘व्यक्तीचे सार्वभौमत्व’ हवे होते. ही त्यांची स्वातंत्र्य आणि लोकशाही या शब्दाची समज होती! मूळात ते फक्त परंपरावादी होते. टेनिसन लिहितो, उदारमतवाद्यांना सर्वसामान्य प्रौढांसाठी मतदानाचा हक्क या संकल्पनेचे नवे बदल करायचा हेतूच नव्हता.

सामाजिक समस्यांबद्दल, अदूरदृष्टी (मागचा पूढचा विचार न करा) असून सुद्धा, पारंपारिक उदारमताने पाहतो, व्यक्तिचा आत्मसन्मान, आणि स्वातंत्र्य जपण्याच्या आवश्यकतेवर भर दिला व एकाधिकारी यंत्रणा राबवणारया हुकुमशाही सरकारला ताकीद दिली. त्या पुढील लेखकांनी उदारमतवाद्यांचे मुद्देच विकसित करुन आधुनिक लोकशाहीची संकल्पना पुरवली.

**आपली प्रगती तपासा :**

१. उदारमतवाद आणि लोकशाही याचा परस्पर संबंधाची उकल करा.

______________________________

______________________________

______________________________

______________________________

______________________________

## ११.५ आधुनिक, उदारमतवादी लोकशाहीची आवश्यक लक्षणे

दुसऱ्या महायुद्धानंतरच्या कालखंडात विशिष्ट हुकुमशाही सत्तांनी नवीन शब्द 'मार्गदर्शित लोकशाही' असा वापरायला सुरुवात केली. ही सत्ता लोकशाहीचा अपमानच करत होती. हुकुमशाही सत्तेच्या भंपक मुखवट्याचे समर्थन करण्यासाठीच लोकशाही शब्दामागे चलनी नाण्यासारख्या हा शब्द वापरला जात होतो. लोकांच्या भल्यासाठी, त्यांना मार्गदर्शन करणारे नेते सर्वगुण संपन्न सर्वोत्कृष्ट आहेत याव त्यांचा विश्वास होता. लोकांनी, त्यांच्या भल्यासाठीच कर्तव्य तत्पर रहावे व राज्यकर्त्यांच्या आज्ञा पाळाव्यात. अमेरिकन / एशियन आणि लॅटिन अमेरिकन देशांच्या, हुकुमशाही राजवटी मध्ये अशा खोट्या संकल्पना प्रक्षेपित किंवा जाहीर होत आहेत. तसे 'लोकांची लोकशाही' असा बोलबाला कम्युनिस्ट देशांमध्ये चालला होता. ह्या दिशाभूल करणाऱ्या, फसव्या व्याख्या आहेत. ह्या राजवटीमध्ये लोकशाहीच्या खऱ्या आणि मूळ स्वरुपाच्या मुद्यांचाच अभाव होता. एखादी राजवट 'लोकशाही' पद्धतीची आहे असे म्हणवून घेण्यासाठी खालील अटींची पूर्तता होणे आवश्यक आहे.

१) लोकशाहीच्या अस्तित्वासाठी, एकापेक्षा जास्त राजकीय पक्ष अस्तित्वात असणे गरजेचे आहे. लोकशाही नीतितत्त्वाचा विकास होण्यासाठी २ पेक्षा जास्त पक्ष आवश्यक आहेत नाहीतर एकपक्षीय केंद्रीभूत सत्ता, विरोधी मताचा कोंडमारा करुन काय करते ते आपण पाहिलेच आहे.. लोकशाहीसाठी पूर्वापेक्षित कलमे काय आहेत ते पाहू.

१) २ किंवा ३ प्रस्थापित राजकीय पक्ष, ज्यांना स्वतःची स्पष्ट राजकीय भूमिका असेल

२) फार जास्त राजकीय पक्ष नसावेत कारण त्यामुळे अस्थिरता वाढेल आणि सतत निवडणूकाच घ्यावा लागतील.

३) नागरिकांना निरनिराळ्या राजकिय पक्षाना निवडण्याचे स्वातंत्र्य देते.

४) मतदार राज्यकर्ते बदलू शकतात, जर ते सद्य सरकारच्या कारभारा विषयी असंतुष्ट असतील. ही मतदारांनी राज्यकर्त्यांना दिलेली धोक्याची सूचनाच असेल की त्यांनी (राज्यकर्त्यांनी) नागरिकांच्या पाठिंब्याला गृहित धरु नये.

२) स्वतंत्र मंडळाच्या देखरेखीखाली नियमित निवडणूका व्हाव्यात हे दुसरे कलम. ठराविक कालांतराने, शांततेने निवडणूका घ्याव्यात. नियमित कालखंडाने निवडणूका आयोजित करण्याची घटनात्मक तरतूद असावी. या तरतूदीशी मिळते जुळते दुसरे हक्क म्हणजे 'मतदानाचा हक्क', 'राजकीय पक्ष स्थापन करण्याचा हक्क', 'आपल्या राजकीय मतांचा प्रसार करायचा हक्क' यांचाही यात अंतर्भाव असावा. काही देशामध्ये निवडणुकांचा खर्च ही सरकार करते ज्यायोगे 'M' Power म्हणजे धन सत्ता निवडणूक यंत्रणेला भ्रष्ट करु शकणार नाही.

३) लोकशाहीत, सरकार हे कोणत्याही धर्माचे असून चालणार नाही. ते धर्मातील किंवा धर्म निरपेक्ष असणे जरुरी आहे. कारण लोकशाही मध्ये विचार स्वातंत्र्यावर विश्वास ठेवते. एखाद्या सत्ताधारी राज्यकर्त्यांनी धर्मविषयक एखादे मत जन मानसात ठसविण्यासाठी पाठिंबा दिला तर ते 'विचार स्वातंत्र्या' च्या गाभ्याच्या विरोधात जाईल. लोकशाहीतील प्रत्येक नागरिकाला कोणताही धर्म आचरण्याचा, किंवा कोणताही धर्म न पाळण्याचा हक्क

आहे. त्याच्यावर कोणीही जबरदस्ती करु नये. सामान्यता Secularism म्हणजे धर्मातीत. याचा अर्थ सरकार, धर्मांच्या संदर्भात तटस्थ राहील. हस्तक्षेप करणार नाही आणि नागरीकांना धार्मिक स्वातंत्र्य देईल.

४) निरनिराळ्या राजकीय आणि सामाजिक कल्पनांच्या बंधमुक्त देव घेवी मुळे समाजात लोकशाही वातावरण वाढीस लागते. नागरिकाने निरनिराळ्या कल्पना सहन करण्याची सवय लावून घेतली पाहिजे. जरी तो त्या कल्पनांशी सहमत नसेल. सत्य ही समाजातील कोणा एका पक्षाची मक्तेदारी नाही. निरनिराळ्या संकल्पनांच्या आदानप्रदाना मधून सत्य शोधले गेले पाहिजे. हीच लोकशाहीची मूलभूत संकल्पना आहे. त्यामुळे लोकशाहीतील सरकारवर, असे मोकळे वातावरण ठेवण्याची जबाबदारी आहे. म्हणून संस्थात्मक व्यवस्थापन, जसे वृत्तपत्र, शैक्षणिक स्वातंत्र्य, माहितीचा अधिकार, सरकारी योजनांमध्ये शिरकाव करण्याचा अधिकार इ. काही महत्त्वाचे मुद्दे आहेत ज्यामुळे मुक्त विचार निर्माण होऊ शकतात. कोणत्याही प्रकारची पुस्तकांवर किंवा राजकीय संस्थावर, सिनेमावर नियंत्रण पद्धती घातली असता प्रसार माध्यमे 'लोकशाही विरोधी' बनण्याची शक्यता नाकारता येत नाही.

५) लोकशाही सरकार हे वैविध्यपूर्ण बहुआयामी समाजाचे रक्षण करण्यास कर्तव्याने बांधलेले आहे, कारण आधुनिक राज्ये ही विविध सांस्कृतिक, विविध वंशीय आणि विविध धर्माच्या लोकांनी बनलेली आहेत. अल्पसंख्यांक जनतेला आरक्षण पद्धतीने संरक्षण देऊन बहुसंख्यांक जनतेकडून त्यांच्यावर लादले जाण्यापासून त्यांना वाचवले आहे. तसेच विस्कळीत गटांच्या उन्नतीसाठी सकारात्मक कृती योजना राबवल्या जातील. म्हणजे अल्पसंख्यांकाच्या हक्काचा जाहीरनामा, समाज कल्याणासाठी अभिमुख सरकारी योजना आणि त्यातील भेद ओळखण्यातले सकारात्मक तारतम्य इ. हे आधुनिक लोकशाहीचे महत्त्वाचे मुद्दे आहेत.

६) नागरिकांच्या स्वातंत्र्याचे संस्थात्मक संरक्षण असावे. ही स्वातंत्र्ये म्हणजे त्यांचे नैसर्गिक हक्क आहेत. ते त्यांना 'सरकार' कडून मिळालेले नाहीत. लोकांचे हे हक्क जन्मसिद्ध आहेत. या हक्कांना कशाच्याही संसर्ग होऊ नये म्हणून सरकार संस्थात्मक र्याय त्यासाठी आमलात आणेल. 'स्वतंत्र न्याय व्यवस्था' ही मूलभूत हक्काच्या संरक्षणासाठी केलेली संविधानीक तरतूद आहे. आणि सत्तेचे केंद्रिकरण टाळण्यासाठी सत्तेचे पृथक्करण केले आहे.

७) स्वतंत्रता आणि समता या दोन कोन शीलावर लोकशाहीची भव्य इमारत उभारली गेली आहे. कायद्याचे राज्य, कायद्यापूढे सर्व समान, विशेष सवलतीचा अभाव जात, लिंग, जन्म अथवा वंश याच्या भेदाबद्दल जन्मा बद्दल पूर्वग्रहन बाळगणे इत्यादी मुद्दे हे लोकशाहीचे विशेष अंग आहे.

८) आपले व्यवहार स्वतःच्या क्षमतावर व्यक्ती करु शकते यावर लोकशाहीचा विश्वास असतो. तसेच ती व्यक्ती एक नागरिक म्हणून आपली भूमिका सामाजिक बाबींमध्ये प्रभावीपणे साकारतो. मात्र त्यासाठी त्याला स्वतःच्या मनाने आपली जीवनशैली ठरवण्याची परवानगी असायला हवी. वागण्या बोलण्याचे कोणतेही नियम, त्यांच्या वर कोणीही लादू नयेत. स्वातंत्र्यपूर्ण मोकळ्या वातावरणातच त्याचे व्यक्तिमत्त्व पूर्णपणे विकसित होईल. लोकशाहीची ध्येय धोरणे ही सामुदाइकत्वाच्या विरोधात आहेत. तिचा प्रयत्न आणि झगडा

हा व्यक्तिमत्त्ववादासाठी आहे. वैयक्तिक हक्क आणि समुहाचे हक्क यामध्ये वाद उभा राहिला तर लोकशाही वैयक्तिक हक्कांच्या बाजूने उभी राहील.

९) व्यक्तिला स्वतंत्र राहण्यासाठी आर्थिक स्वावलंबनाची गरज आहे आणि जर त्याच्याकडे काही मालमत्ता असेल तरच हे शक्य आहे. आपल्या आवडीप्रमाणे व्यक्ति आपले व्यक्तिमत्त्व घडवू शकते जर त्याच्याकडे आर्थिक संरक्षण असेल. म्हणून खाजगी मालमत्तेचा हक्क हे लोकशाहीचे महत्त्वाचे अंग आहे. इतर सरकारी यंत्रणेपेक्षा 'हा हक्क' लोकशाहीचे असाधारण वेगळे रुप दर्शवतो.

जहाल मनवाले, याला विरोध करताना असे मत देतात की याचा परिणाम आर्थिक असामानता आणि शोषणामध्ये होईल. पण सामुहिकता व्यक्तिगत प्रेरणेला मारक असते. आपल्याला सुवर्ण मध्य साधायचा आहे. व्यक्तिच्या खाजगी मालमत्ता बनवण्यावर बंधन घातले असता, आर्थिक समता आणि श्रीमंत होण्याचा व्यक्तिचा हक्क दोन्ही साधले जाईल. प्रगतीशील कर योजना आणि कल्याणकारी योजना यांच्याद्वारे हे लोकशाहीत शक्य होईल. कोणतीही मालमत्ता जबरदस्ती बळकावणे हे लोकशाही विरोधी कृत्य मानले जाते.

**आपली प्रगती तपासा :**

२. आधुनिक लोकशाहीची आवश्यक कलमे सांगा.

## ११.६ लोकशाहीपुढील आव्हाने

आधुनिक लोकशाहीपुढे गंभीर आव्हाने आहेत. ह्या आव्हानांचे मूळ हिच्या आत आणि हिच्याविना, असे आहे. सर्वात मोठे अंतस्थ आव्हान म्हणजे सामाजिक हिताबद्दल नागरिकांची उदासिनता कळकळीचा आभाव. मतदान करण्याबद्दल सुशीक्षीतांची टक्केवारी नगण्य आहे. आधुनिक नागरिकांसाठी सामाजिक समस्यां अग्रक्रमाने शेवटच्या ठरतात. आधुनिक समस्या फार तांत्रिक असतात. त्या सोडविण्यासाठी तज्ज्ञ माणसाच्या सल्ल्याची गरज असते. मग नागरिक उदासिन होतात. अशी परिस्थिती बलवान गटांकडून, त्यांच्या फायद्यासाठी फिरवली जाते, सरकारवर प्रभाव टाकून योजना त्यांच्या फायद्यासाठी बनवल्या जातात. (सामुदायिक विभागाच्या बाजाराच्या अर्थव्यवस्थेची वाढ हे प्रस्थापिताच्या द्वारे, लोकशाही व्यवस्थेच्या गैरवापराचे लक्षण आहे). तिसऱ्या जगातील (अविकसित देश) काही देशांमध्ये तर गरीबीची पाळेमुळे हटवणे हे एक लोकशाहीपुढील आव्हान आहे. रोटी (भूक) आणि स्वतंत्रता या दोन्हीमध्ये भूकेला प्राधान्य देण्याची प्रवृत्ती आढळते. एकाधिकारशाही सरकारे त्वरित आर्थिक प्रगतीचे वचन देतात. त्याकडे लोक आपोआपच आकर्षित होतात. तिसऱ्या जगातल्या बहुतांश

देशामध्ये, लोकशाही अयशस्वी झाली आहे. कारण लोकशाहीच्या वाढीला पोषक अशा भल्या, सुजाण नेतृत्वाचा तिथे असलेला अभाव. तसेच हे असे समाज, परंपरावादी, रुढीच्या अधिपत्याखाली असल्यामुळे, लोकशाहीच्या विकासाला ह्यांचा उपयोग होत नाही. गट संस्कृति, व्यक्तिच्या निवडीवर कुरघोडी करते. जातीय गटांचे जोरदार दबाव, धार्मिक संघटना, त्यांच्या मागास आदर्शासहित उमद्या लोकशाही व्यवस्थेमध्ये धूमाकूळ घालतात. एखाद्या व्यक्तिने कोणाशी विवाह करायचा हे त्याचा समाज ठरवतो. त्याने निवड केलेल्या व्यक्तिकडे द्वेषाने बघितले जाते आणि त्यांची हिंसा होते. तसेच व्यक्तिगत मुस्लीम कायदा बदलण्याची मागणी सतत होणारा विरोध, ही दोन फक्त उदाहरणे. भारतासारख्या लोकशाही राज्यव्यवस्थेला अशा घटनांना सामोरे जाण्यासाठी, सामाजिक विरोध कसा आडवा येतो हे दर्शवते. स्वतःला लोकशाहीवादी म्हणवणारे सुद्धा बहुविध सांस्कृतिक समाज ह्या कल्पनेशी अजून जूळवून घेऊ शकत नाहीत. अल्पसंख्यांक भितीच्या दडपणाखाली जगतात. एखद्या प्रो. ॲक्टीव कृतीची मताचे राजकारण समजून त्याच्यावर टीका केली जाते. दुर्दैवाने धार्मिक कहरता, किंवा धर्मांधता डोके वर काढते आहे. एशिया खंडातच नाही तर युरोपियन देशातही वांशिक अल्पसंख्यांकांना वैर भावनेला तोंड द्यावे लागत आहे. दुसऱ्या महायुद्धापूर्वीच्या 'ज्यू विरोधक' घटनांची आठवण वरील परिस्थितीमुळे होते. 'दहशतवादाची वाढ' हे लोकशाही पुढील मोठे आव्हान आहे. दहशतवादाला लगाम घालण्यासाठी, लोकशाहीवाल्या देशातील सरकारांना, व्यक्तिगत, स्वातंत्र्योत्तर बंधने येतील अशी कठोर पावले उचलावी लागतील. कधी कधी सामान्य कायदेशीर उपाय तहकूब करुन बळाचा वापर करावा लागतो. आणि हाच आता नित्यक्रम झाला आहे. अधिकाऱ्यांसमोर असा संभ्रम आहे कि, कोणाला आंतकवादी ठरावे आणि कोण निष्पाप, निर्दोष आहे? प्रतिबंधक अटकसत्र खास न्यायालये, आकस्मिक पोलिस हल्ले, इ. अत्यंत कडक कारवाया कराव्या लागणे, हे दुःखद चित्र आहे. अतिरिक्त कडक कायद्याच्या मदती शिवाय, आंतकवादाचा बिमोड, लोकशाही सरकार करु शकेल का? आपल्या नागरिकांना, सुरक्षित आणि आदरयुक्त जीवनशैली देण्याचे कर्तव्य, आंतकीय परिस्थितीमध्ये लोकशाही पार पाडू शकेल का? हा खरा प्रश्न आहे. आंतकवादाला एक अंतरराष्ट्रीय बाजू आहे. एक राष्ट्राचा आंतकवाद हा त्यांच्या दृष्टीने त्यांनी केलेली स्वातंत्र्याची लढाई असू शकेल; स्व निर्धार असेल, स्वातंत्र्यासाठी केलेला 'आकांत' असू शकेल तर तोच इतरांना 'आतंकवाद' वाटेल. 'लोकांचा स्वतंत्र असण्याचा हक्क' हे लोकशाहीचे मूलतत्त्व आहे. 'काश्मीर प्रश्न' हा लोकशाहीला आव्हानात्मक ठरलेला अंतरराष्ट्रीय आंतकवादाचे, उत्तम उदाहरण आहे. जेव्हा परदेशी सत्ता, दुसऱ्या देशात 'लोकशाही वाढवण्याचा' प्रयत्न करतात त्यांच्या हातातून परिस्थिती तात्काळ निसटते आणि लोकशाही साठी भूप्रदेश सुरक्षित करण्याचा प्रयत्नात गरीब, निष्पाप लोकांचा बळी जातो. इराण आणि अफगाणिस्तानात शेकडो लोक मरतात. कारण युरोपियन सत्तांना तिथे 'लोकशाही' रुजवायची आहे. हे एक 'नव वसाहतवादाचे' नमुनेदार उदाहरण आहे. ज्यायोगे 'लोकशाहीला' वाढते आव्हान दिले गेले आहे.

लोकशाही पूढील आव्हानांना समाधानकारक तयार उत्तरे नाहीत. मनाची परिपक्वता आणि मानवतावादी दृष्टीकोण यांच्या सहाय्याने, आपण ही आव्हाने पेलण्याचा, त्यांना समाधान कारक उत्तरे शोधण्याची आशा करु शकतो.

**आपली प्रगती तपासा :**

‘लोकशाही पुढील आव्हाने’ यावर एक टीपण लिहा.

## ११.७ सारांश

‘लोकशाही’ ही एक केवळ राज्य करण्याची पद्धत नसून ती एक जीवनशैली आहे. पूर्वीच्या विचारवंतांनी ‘लोकशाहीच्या व्यक्तीगत स्वरुपावर भर दिला. सरकारच्या अधिकारांवर नियंत्रण ठेवणे गरजेचे झाले होते. जास्त व्यक्तिगत स्वातंत्र्य म्हणजे जास्त लोकशाही. पण समानतेचे तत्त्व, आणि असलेल्या सत्तेचा दुरुपयोग करुन, दुर्बलांचे होणारे शोषण इ. मुद्यांना महत्त्व दिले नव्हते. दुसऱ्या महायुद्धानंतर ‘लोकशाहीच्या संकल्पनेची’ धारणाच बदलली. आता आर्थिक आणि सामाजिक समतेवर भर आहे. आता नवीन मुद्दे पुढे आले आहेत. जसे, लींग विचारात न घेता दिलेला न्याय, अल्पसंख्यांकाचे हक्क, मानवी हक्क इ. बहुसांस्कृतिक समाजाना नवीन दृष्टीकोनाने हातळण्याची Pro-active गरज आहे. तसे होते आहे.

इतर सर्व राजकीय पद्धतीप्रमाणेच ‘लोकशाही’ पद्धतीचे काही गुण आणि काही उणीवा आहेत. स्वातंत्र्य, समता, सामाजिक न्याय, व्यक्तिगत आत्मसन्मान, हे आदर्श, लोकशाहीचे गुण आहेत. पण तिची कार्यपद्धती अतीशय संथ आहे. त्वरित निर्णय घेतले जात नाहीत. सल्ला मसलतीची लांबड, परिणामकारक अंमलबजावणीला बिघडवून टाकते. राज्यात जर हुकुमशाही असेल (जी लोकशाही विरोधी असते) तर राष्ट्रीय एकात्मता मिळवणे कठीण आहे. दुर्बल लोकशाहीमध्ये काहीही करण्यास सतत नकार आणि एकमताचा अभाव म्हणजे हा मोठाच अडथळा असतो. पैशाच्या बळावर निवडणूका लढल्या जातात. प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे धनिक वर्ग सरकारवर नियंत्रण ठेवतो. अनेक Cynics दोषैकदर्ष म्हणतात, “श्रीमतांचे बळ आणि गरीबांचा ओरडण्याचा हक्क म्हणजे ‘लोकशाही’.”

तरीही इतर कोणत्याही राजवटीच्या रुपापेक्षा ‘लोकशाहीचे स्वरुप’ उजवे आहे. चांगले आहे. तिच्या मध्ये स्वसुधारणेचे बळ आहे. व्यक्तिला उत्कर्षाची संधी तीच देते. अडथळ्यांवर मात करण्यासाठी, संकटे सोडविण्यासाठी कसे प्रयत्न करावेत. यावर वाद विवाद, चर्चा सत्रे या माध्यमातून U.N.O. ही अंतरराष्ट्रीय संस्था मार्गदर्शन करते. अर्थात ते फार उपयुक्त असते असे नाही. पण मग पर्याय फक्त युद्ध आणि विनाश हा असतो. म्हणून मानवाच्या उत्कर्षासाठी आणि शांतीशाठी लोकशाही अत्यावश्यक आहे.

## ११.८ पाठावरील प्रश्न

१) लोकशाहीची व्याख्या करा. लोकशाही तत्त्वज्ञानाचा ऐतिहासिक विकास कसा झाला ते सविस्तर लिहा.

२) आधुनिक लोकशाहीची आवश्यक कलमे कोणती? नवीन आव्हानांना तोंड देण्यास ती कलमे पुरेशी आहेत का?

३) लोकशाहीशी संबंधीत असलेल्या गुण दोषांची चर्चा करा. या संदर्भात तिसऱ्या जगातल्या देशांचा अभ्यास करा.

❖❖❖❖

# १२

# समकालीन चर्चा : प्रातिनिधिक निवेदन पद्धती आणि प्रतिनिधींचा सहभाग यांची स्वरुपे

**घटक रचना :**

१२.० उद्दिष्ट्ये

१२.१ प्रस्तावना

१२.२ प्रतिनिधित्वाचे प्रकार

१२.३ पारंपारिक विचारवंतांचे 'प्रतिनिधी पद्धती' संबंधी दृष्टीकोन

१२.४ 'प्रतिनिधी पद्धती' संबंधी समकालीन मुद्दे

१२.५ अनुमान

१२.६ पाठावरील प्रश्न

## १२.० उद्दिष्ट्ये

१) लोकशाही व्यवस्थेमध्ये प्रातिनिधिक पद्धतीच्या महत्त्वाचे विश्लेषण करणे.
२) लोकशाही मध्ये प्रतिनिधीच्या सार्वजनिक कामाचे स्वरुप समजून घेणे.
३) प्रतिनिधित्व नसणाऱ्या अल्पसंख्यांक गटासंबंधी सिद्धांतिक संकल्पना तयार करणे.
४) प्रतिनिधिक पद्धती संबधी विविध विचारवतांचे विचार व दृष्टीकोन समजून घेणे.
५) सद्य प्रातिनिधिक व्यवस्थेमध्ये असलेल्या तृटी / मर्यादांवर उपाय सुचविणे.

## १२.१ प्रस्तावना

सर्वसामान्य भाषेमध्ये representation या शब्दाचा अर्थ 'हुबेहुब वर्णन' किंवा सादर करणे असा आहे. उदा. एखादा लेखक त्याच्या पुस्तकामध्ये विशिष्ट मूल्ये सादर करतो. किंवा एखादा चित्रकार आपल्या चित्रामार्फत एखाद्या विचार धारेचे प्रतिनिधित्व करतो. ते पुस्तक वाचून, लेखकाला कोणती मूल्ये समर्थनीय वाटतात हे समजते. किंवा ते चित्र पाहून, चित्रकाराला कोणत्या ऐतिहासिक कालखंडाचे महत्त्व दाखवायचे आहे, याबद्दल कल्पना येते. जेव्हा आपण 'मुघल पेन्टींग' असे म्हणतो तेव्हा आपण मुगल राज्यकर्त्याच्या कालखंडातील 'संस्कृती' शी संबंधित चित्र आहे, असे ओळखतो. एका दृष्टीने मोठ्या गोष्टीची ती छोटी प्रतिकृती किंवा नमुना असतो. मात्र राजकारणामध्ये ह्या शब्दाला (representation) निराळा अर्थ आहे. याचा अर्थ एखादी व्यक्ती किंवा एखादा गट, एखाद्या खूप मोठ्या समाजाच्या गटाच्या

वतीने उभा राहतो म्हणजे काम करतो. उदाहरणार्थ, 'गोलमेज परिषदे'ला गांधीजीनी भारताचे प्रतिनिधित्व केले असे म्हटले जाते. या विधानाचा अर्थ असा आहे की, अफाट लोकसंख्येच्या भारतीय नागरिकांच्या आशा, आकांक्षा आणि इच्छा या संबंधीचे प्रतिबिंबच गांधीनी व्यक्त केले. जेव्हा गांधीजी बोलले, ते संपूर्ण देशासाठी, देशवाशीयांसाठी बोलले. लोकांनी (गोलमेजच्या सभासदांनी) गांधीच्या नजरेतून भारत बघितला. म्हणजे थोडक्यात भारतीय जनतेचे प्रतिनिधित्व गांधीजींनी केले. तसेच एखादा वकील, त्याच्या आशिलाचे प्रतिनिधित्व करतो. आशिलाला कायद्याचे ज्ञान नसते. पण वकीलाला आशिलाच्या व्यावहारिक हेतूसंबंधी सर्व कायदेशीर ज्ञान असते. म्हणून आशिल आपला मुकदमा वकीलाकडे सोपवतो. व तो वकील, त्या आशिलाचे न्यायालयामध्ये प्रतिनिधित्व करतो. अशी अनेक उदाहरणे देता येतील.

आधुनिक लोकशाहीतील नागरिक हा वरील आशिलासारखा आहे. त्याच्याकडे कायद्याचे ज्ञान नाही आणि कोणत्याही इतर कामासाठी (नोकरीची कामे व वैयक्तिक कामे करुन झाल्यावर) वेळ उरत नाही. सामाजिक कार्यात परिणामकारक रित्या सहभागी होण्यासाठी आवश्यक अशा परिस्थितीमध्ये तो नाही. दैनंदिन समस्यांनी तो व्यापलेला, गांजलेला आहे. म्हणून हे काम व्यावसायिक राजकारणी लोकांवर सोपवले जाते. ते लोकांचा विश्वास संपादन करतील. त्याचे प्रतिनिधी बनतील आणि त्याच्या वतीने सहभागी होतील. ते प्रतिनिधी आहेत. त्यांना प्रतिनिधित्वाचे अधिकार आहेत, पण ते खुद्द ते नव्हेत; धनी नव्हेत. खरा मापदंड नागरिकच असतो. थेट लोकशाही अस्तित्वात आली. तेव्हापासूनच थेट सहभाग अशक्य आहे. म्हणून बऱ्याच लोकशाही देशांनी 'प्रातिनिधिक' नमुन्याच्या किंवा पद्धतीचा अवलंब केला आहे.

## १२.२ प्रतिनिधिक पद्धतीचे प्रकार

प्रतिनिधित्वाच्या पद्धतीवर आधारलेल्या आधुनिक लोकशाहीला, प्रातिनिधिक लोकशाही असे म्हणतात. या पद्धतीमध्ये प्रतिनिधींच्या मार्फत नागरिक राज्य करतात. प्रतिनिधींना कमीत कमी पाच वर्षासाठी पदावर काम करावे लागते. नागरिक त्यांच्या कराराचे नुतनीकरण करु शकतात किंवा त्यांना काढू ही शकतात. या दोन्ही गोष्टी प्रतिनिधीच्या कार्यक्षमतेवर अवलंबून असतात. काही उदाहरणांमध्ये, एखाद्या प्रतिनिधीला पूर्ननिर्वाचित न करण्यासाठीही घटनात्मक तरतूद आहे. उदा. अमेरिकेमध्ये कोणीही राष्ट्राध्यक्ष दोन कालखंडा पेक्षा अधिक काळ त्या पदावर राहू शकत नाही. ही तरतूद घटनेने मुद्दाम केली आहे. त्यामुळे पदाचा गैरवापर करण्यावर प्रतिबंध राहील.

ठोकळमानाने प्रतिनिधित्व दोन प्रकारचे असते. प्रादेशिक प्रतिनिधित्व आणि कार्यात्मक प्रतिनिधित्व. प्रादेशिक प्रतिनिधित्व पद्धतीमध्ये, जवळपास सारख्याच लोकसंख्येचा भूप्रदेशांमध्ये देशाचे विभाग पाडतात. त्यांना मतदार संघ असे म्हणतात. या मतदार संघातील मतदार, आपला प्रतिनिधी निवडण्यासाठी मतदान करतील सामान्यतः प्रत्येक नागरिकाला एका मताचा अधिकार असतो. मतदानाच्या हक्कामध्ये 'समानता' ही घटनेने दिलेली हमी आहे. लोकशाहीमध्ये, सर्व नागरिकांना प्रशासकीय कारभार चालवण्याचे समान हक्क आहेत. परंतु परंपरावादी उदारमतवादी, जे. एस. गील सारख्या विचारवंतांना हे हक्क, कामगार वर्ग आणि स्त्रियांना द्यावेत असे वाटत नव्हते, असे आढळते. सुशिक्षीत वर्गाच्या मताएवढी किंमत किंवा महत्त्व स्त्रियांच्या आणि कामगारांच्या मताना द्यायला ते तयार नव्हते. विशेषतः त्यांचा असा ठाम विश्वास होता की

अशिक्षित किंवा निरक्षर लोकांपेक्षा सुशिक्षित लोक वरचढ असतात. म्हणून त्यांनी "अनेक मत" (plura vote) योजना, सुचविली. या कारस्थानात त्यांनी, शिकलेल्या, विद्वान पदवीधारकांना चार ते पाच मते, दोन ते तीन मते कौशल्याची किंवा व्यवस्थापनाची कामे करणाऱ्या कामगारांना, सामान्य कामगारांना फक्त एक मत, आणि निरक्षर लोकांना एकही मताचा धिकार नसावा, असे सुचविले.

आधुनिक लोकशाहीमध्ये असा भेद करणारी योजना मान्य केली जाणार नाही. तरीही प्रत्येक देशात, काही विशिष्ट किमान वयासंबंधी योग्यता, राहण्याचा ठिकाणा आणि, पोलीसांकडून गुन्हेगार नसल्याबद्दलचे प्रमाण, या बाबी मतदानाचा हक्क मिळविण्यासाठी आवश्यक असतात. कधी कधी असे घडते कि, मतदार संघाच्या कक्षा पुन्हा आखल्या जातात. उदा. नवा तालुका निर्माण करणे, अचानक लोकसंख्येची वाढ होणे. मग व्यवस्थापनाच्या तत्परतेसाठी मतदार संघाची विभागणी करावी लागते. अशा संभाव्य घटनांमध्ये, संघाची पुर्नआखणी करताना अशी काळजी घेतली पाहिजे की, या नव्या रचनेमुळे कोणत्याही राजकीय पक्षाचा तोटा झाला आहे किंवा एखाद्या पक्षाला गैरफायदा (अयोग्य, बेसुमार) झाला आहे. उदा. भारतामध्ये एक वेगळा तालुका निर्माण केला. जिथे एका विशिष्ट जाती, जमातीची जास्त लोकसंख्या आहे, तिथे जो पक्ष त्या जाती  जमातीसाठी बोलेल तो सहजपणे निवडून येईल. हे लोकशाहीसाठी चांगले नाही. जिथे सर्वांना समान संधी हे तत्त्व प्रातिनिधिक लोकशाहीत आमलात आणतात. 'प्रादेशिक प्रतिनिधित्व' ह्या पद्धतीची तरफदारी करणारे लोक म्हणतात, ही व्यवस्था, प्रतिनिधी आणि जनता यांच्या मध्ये सुसंवादाची संधी पुरविते. उमेदवार त्या प्रदेशाला वारंवार भेट देऊन मतदारांशी संबंध संवर्धन करु शकतो. त्यांच्या समस्या प्रत्यक्ष जाणून घेऊ शकतो. लोकांना ही आपला प्रतिनिधी अधिक जवळून जाणता येतो. पण या पद्धतीचे टीकाकार म्हणतात. समाजामध्ये अनेक पेशांचे लोक असतात. उदा. शेतकरी, व्यापारी, कामगार जयांचे प्रतिनिधित्व एकाच व्यक्ति कडून होऊ शकत नाही. म्हणून ते कार्य, उद्योग केंद्रित प्रतिनिधित्व सुचवितात. या पद्धतीमध्ये, व्यवसायाच्या आधारे निवडतील. उदा. डॉक्टर डॉक्टरला निवडेल. मतदान ही व्यवसायाच्या वृद्धीच्या संदर्भात, त्या पायावर होईल. एक कामगार प्रतिनिधी, कामगार योजनांच्या सभा, मसलतींमध्ये भाग घेऊन, मग त्यावर मत देईल. अशी पद्धत खरोखरच्या हितसंबंधांचे प्रतिनिधित्व करेल. शिवाय भौगोलिक किंवा प्रादेशिक प्रतिनिधित्व करणारे बलदंड नेते, मतदार संघ नक्कीच ताब्यात घेतील आणि कोणी पर्यायी नेता पुढे येणारच नाही. 'रायबरेली' चा नेहरु घराण्याने संवर्धन केलेला मतदार संघ हे एक जातीवंत, मासलेवाईक उदाहरण आहे. ही एखाद्या घराण्याची मक्तेदारी होते जी लोकशाहीला नक्कीच उपयुक्त नाही. या पद्धती मध्ये आणखीक एक धोका आहे. स्थानिक बाबी, राष्ट्रीय बाबींवर वर्चस्व गाजवून, प्रतिनिधिंना क्षूद्र किंवा उथळ दृष्टीकोन घेण्यास भाग पाडतील. तसेच व्यावसायिक प्रतिनिधित्व व्यवस्थेचे टीकाकार म्हणतात की, सर्वसामान्य जनतेच्या हित रक्षणाकरित ही पद्धती खुजी, अपूर्ण आहे. बहुतेक बाबी या परस्पर संबंधित असतात आणि त्यांचे उत्तम प्रतिनिधित्व सर्वसाधारण उमेदवार करु शकतो. ब्रिटन मध्ये 'Guilds' समाजवाद्यांनी व्यावसायिक म्हणजे उद्योगनिष्ठ प्रतिनिधित्वासाठी मोहिम उभारली. पण प्रत्यक्षात कोणत्याही लोकशाही देशात ही पद्धत आमलात आणली गेली नाही. १९३०-४० च्या दरम्यान ही पद्धत 'हुकुमशाही' राजवटीमध्ये प्रचलित होती. त्यांना 'महानगरपालिका' म्हणत असत. ही मंडळे 'लोकतांत्रिक' नव्हती. हुकुमशहा, ज्या त्या क्षेत्रातल्या निपूण व्यक्तीची, 'धोरणे किंवा योजना करण्यासाठी' नेमणुक करत असे. कौशल्यावर आधारित ही नेमणूक असे पण त्यामध्ये लोकांचे प्रतिनिधित्व नसे. या नेमणुकांमध्ये लोकांच्या म्हणण्याला, विचाराला जागा नसे. लोकांच्या इच्छा आकांक्षा

पासून हे प्रतिनिधी पूर्ण अलिप्त असत. ते elit (सर्वोत्तम लोक) ज्यांचा हेतू, फक्त राज्यकर्त्यांना खुष ठेवणे हा होता. कार्यतत्परता आणि जलद निर्णय ही दोनच मार्गदर्शक तत्त्वे या महापालिका पद्धतीचा पाया होता. जनतेच्या भावभावना, महत्त्वाकांक्षा आकांक्षांना यामध्ये अजिबात थारा नव्हता. लोकांनी त्यांना निवडलेही नव्हते आणि त्यांना प्रश्न विचारायचा अधिकारही लोकांना नव्हता. तसेच त्यांना काढून टाकण्याचा अधिकारही लोकांना नव्हता. समाजाचा एखादा विशिष्ट भाग, विशेषतः आर्थिक आणि उद्योगधंदा गट, कदाचित या महापालिकेचे प्रतिनिधित्व करु शके पण कोणत्याही बाजूने त्यांना जनतेचे प्रतिनिधी म्हणणे अशक्य आहे.

प्रातिनिधिक व्यवस्थेचा एका वेगळ्या दृष्टीकोनाला 'जातीय प्रतिनिधित्व' या नावाने ओळखले जाते. या पद्धतीमध्ये, त्याच समाजातील लोक आपल्या मधला एक प्रतिनिधि म्हणून निवडतील. इतर सभासदांना मतदानाचा हक्क नाही या मागची कल्पना अशी की, ज्या त्या समाजाचे हित संरक्षण त्याचा प्रतिनिधीच करु शकतो. निराळ्या समाजातील उमेदवाराला, त्या समाजाच्या प्रश्नांबद्दल सहानुभुती किंवा कळकळ असेलच असे नाही. त्यामुळे उमेदवार निवडण्याच्या त्यांचा हक्कच नाकाराला जातो. भारतामध्ये ब्रिटीश राजवटीत ही पद्धत 'मॅकडोनाल्ड' यांनि सुरु केली. जिला जातीय प्रतिनिधित्व असे म्हटले जाते. एखाद्या भूप्रदेशात जास्त लोकसंख्या मुसलमानांची आहे, अशा ठिकाणी फक्त मुसलमान व्यक्तिच 'उमेदवार' असते आणि मतदारही मुसलमानच असतो हीच पद्धत, शीख, भारतीय ख्रिश्चन्स, ॲग्लो इंडियन समाजासाठी भारतामध्ये सुचवली गेली. परंतु गांधीजींच्या कडक विरोधामुळे 'स्वतंत्र मतदार संघ' ही संकल्पना रद्द झाली. डॉ. भीमराव आंबेडकर यांनी 'पुणे करारांतर्गत' ही तरतुद केली. काही समाजामध्ये मतदार हे सर्व सामान्य होते; तर काही समाजामध्ये संमिश्र होते. असा या जातीय प्रतिनिधित्वाच्या कल्पनेची रचना साम्राज्यवादी शक्तीच्या कारस्थानाचा एक भाग होती. ज्याचा हेतु, भारतीय राष्ट्रीय चळवळ कमकुवत करणे आणि अशा तहेच्या विभाजनाने देशातील जनतेत फूट पाडणे हा होता. 'पाकिस्तान' च्या मागणीचे बीज या पद्धतीमध्ये पेरले गेले. अशीच मागणी 'विभक्त मतदार संघ' निम्न स्तरीय जातीच्या लोकांसाठी केली गेली. पण गांधीजींनी यशस्वीपणे ती मागणी फेटाळली आणि एक 'आरक्षण योजना' आखली जिच्या अंतर्गत उमेदवारांची काही टक्केवारी, मागास वर्गाच्या हिंदु समाजासाठी आरक्षित केली. ज्यामुळे उमेदवार आरक्षित समाजाचा असेल पण मतदार समीश्र समाजाचे असतील. दुर्बल आणि अल्पसंख्यांक गटांना राजकीय सत्तेमध्ये सहभाग मिळवून देण्यासाठी ही पद्धत Pro-active होती. यामध्ये काही समाजाची मक्तेदारी शिरु नये म्हणून हे मतदार संघ पाळीपाळीने बदलत राहतील अशा धोरणाने 'विभक्त मतदार संघ' ही योजना चालवली जाते. यावरील टीकाकांराचे मत म्हणजे, असे करणे हे 'समते'च्या नैसर्गिक हक्काच्या विरोधी आहे त्यांच्यामते एखादी व्यक्ति, त्याच्या एखाद्या मतदार संघात राजकीय दृष्ट्या सक्रीय आणि लोकप्रिय असू शकेल. तिथे निवडून येणे त्याच्यासाठी अगदी सोपे असेल. पण तोच एरीया, एखाद्या विशिष्ट जातीकरीता आरक्षित केला तर, तो जिंकण्याची संधी गमावतो कारण तो त्यांच्या जातवाला नसतो. टीकाकारांच्या मते हे जातीय उमेदवार म्हणजे मोठ मोठ्या जमीनदारांच्या हातातली 'बाहुले' (dummy) असतात. खरी सत्ता अशा जमीनदारांकडे असते. हे टीकाकार फक्त त्रुटी दाखवतात. तात्त्विक दृष्ट्या असे आरक्षण देण्यामागे, विस्कळीत अल्पसंख्यांकाचे राजकीय सबलीकरण करणे हा हेतू आहे. लोकशाहीचा गाभा, 'सामाजिक न्याय' या प्रणाली नुसार प्रातिनिधिक सरकारमध्ये आरक्षण असणे गरजेचे आहे. काही गटांचे किंवा विभागांचे प्रतिनिधी अधिकारी नेमतात. भारताचे राष्ट्रपती दोन सभासद, अँग्लो इंडियन समाजातून लोकसभेत, तर काही सभासद खेळ, कला क्षेत्रातील राज्यसभेत नेमतात. हे सभासद आपल्या विषयाचे

हितसंबंध जपतात. आपण असे म्हणून शकतो की, निवडून आलेले उमेदवार विस्तृत सर्वसाधारण दृष्टीकोन ठेवतात तर नेमलेले उमेदवार विशिष्ट कार्याबद्दल बोलतात. या नेमणुका होण्यापूर्वी पुष्कळशी चर्चा सल्ला मसलत होते.

सर्व प्रकारच्या प्रातिनिधिक पद्धतीचे गुण दोष आहेत. परंतु विस्तारीत लोकशाही पद्धतीमध्ये ती आवश्यक आहे. बलवान गटांच्या राजकीय मक्तेदारी पासून असलेल्या धोक्या विरुद्ध ही पद्धत म्हणजे एक संरक्षण आहे. परंतू ह्या आरक्षणामुळे मिळालेले अधिकार किंवा सामर्थ्य, राजकीय सबलीकरणाची खात्री देत नाही. ते (आरक्षण) एक साधन आहे. ते अल्पसंख्यांकांना, राजकीय दृष्ट्या जास्त सक्रीय, होण्यासाठी, नेतृत्वाची दूसरी फळी उभारण्याची संधी देत आहे. या सवलतीचा उपयोग, त्यांनी 'जनतेला' पायाभूत ठरेल अशी राजकीय यंत्रणा उभारण्यासाठी केला पाहिजे. म्हणजे मग भविष्यामध्ये, आरक्षणा शिवायच, ते राजकीय सत्ता हस्तगत करु शकतील. अखेरीस सचोटी, प्रामाणिकपणा आणि अमर्याद कष्ट व प्रयत्न यांच्या जोरावर एक राजकीय पुढारी समाजाचे, राजकीय सबलीकरण करु शकेल. जर नेते स्वार्थी असतील आणि प्रतिनिधित्वाच्या आरक्षणांचा उपयोग फक्त आपल्या कुटुंबाला कायमचे मिळविण्यासाठी करतील तर आपण जहागीरदारी पद्धतीकडे परत वळू. लोकशाहीमध्ये 'संधी मिळण्याची समानता' हा हक्क शाबूत राहणे आवश्यक आहे.

**आपली प्रगती तपासा :**

१) प्रातिनिधित्व ह्या संकल्पनेची व्याख्या करा. प्रतिनिधीत्वाच्या विविध पद्धतीची चर्चा करा. त्यांचे फायदे आणि तोटे विशद करा.

## १२.३ पारंपारिक राजकीय विचारवंत आणि प्रतिनिधित्वाची कल्पना :

जर लोकशाहीमध्ये लोकांचे वर्चस्व असते तर त्या सर्वोच्य सत्तेचे इतरांकडून प्रतिनिधित्व होऊ शकेल का? Thomas Hobbess सर्वात आधीच्या सामाजिक कराराच्या संकल्पनेचा उद्‌गाता (जनक) होता. सर्वोच्य सत्ता लोकांकडे असते हे मान्य करताना, वैयक्तिक सुरक्षीततेसाठी सत्ता एका व्यक्तिकडे किंवा अनेक व्यक्तिंच्या मंडळाकडे हस्तांतरित करणे आवश्यक आहे. पण Thomas Hobbess च्या संकल्पनेप्रमाणे प्रातिनिधित्व ही एकदाच होणारी घटना आहे. आणि प्रजा म्हणून राहतात त्यांना कोणताच अधिकार रहात नाही नंतर प्रतिनिधिंच्या आज्ञेचे पालन करणे एवढेच कर्तव्य त्यांच्यासाठी उरते. "कायदा नसण्यापेक्षा, चुकीचा कायदा असणे बरे" असे Hobbess चे मत होते. त्यांचा असा आग्रह होता की सर्वोच्य सत्तेचा, सुरक्षितेसाठी लोकांनी त्याग करावा. प्रतिनिधित्वाची अशी रीत, प्रतिक्रियात्मक असून त्याची परिणति हुकुमशाहीत होईल आपल्याला ही पद्धती आवडत नाही कारण तीचे स्वरुप लोकशाही विरोधी आहे. पण आपल्याला हे माहित हवे की, तिसऱ्या जगातल्या, अविकसित

देशामध्ये अशी व्यवस्था दिसून येते. एकदा प्रतिनिधि निवडला की, लोकशाही विषयक सर्व कर्तव्ये त्याच्याकडे सोडून दिल्यावर, अक्षरशहा सर्व सत्ता त्याचाचकडे सूपूर्द करतात. निर्वाचित लोकशाहीत, फरक एवढाच कि प्रतिनिधीची कारकीर्द, मर्यादित काळासाठी असते तर Hobbess च्या संकल्पनेप्रमाणे कारकीर्द अमर्याद होती. पण हा थोडासा फरक ही नष्ट होतो, जेव्हा आपण या तीसऱ्या जगातल्या निवडणूकांचे विश्लेषण करतो. फार क्वचित राजवटीमध्ये बदल येतो आणि राज्यकर्ता बदलला तरी त्याच्या कुळातील व्यक्तिकडे सत्ता बहाल होते. प्रतिनिधित्व आणि निवडणूका यांच्या परस्पर संबंधाविषयी मूलभूत प्रश्न उभा राहतो. काहीं विचारवंतांना हे संबंध परस्परावलंबी आहेत असे वाटते. म्हणून निवडून आलेल्या उमेदवाराला लोकांचा प्रतिनिधी म्हणतात, प्रामुख्याने त्यांच्या निवडणूकीतील विजयामुळेच. पण आपण असे खरेच म्हणू शकतो का? उदा. एका A उमेदवाराला ५१% मते मिळतात तर दुसऱ्या B ला ४९% मते मिळतात. ५१% मिळवणारा उमदेवार निवडणूक जिंकतो. मग तो कोणाचे प्रतिनिधित्व करतो? त्या भूप्रदेशातील सर्व लोकसंख्येचे? का काही प्रमाणात? इथे वेगळेही चित्र असू शकते. बहुपक्षीय निवडणूक लढतीमध्ये विजयी उमेदवाराला मिळालेल्या मतांपेक्षा विरोधातील मते जास्त असतात. कारण ती इतर छोट्या उमेदवारांमध्ये विभागलेली असतात. लोकशाहीतील बहुमताची पवित्र संकल्पना महत्त्वाची असूनही उमेदवार मात्र, खरे बहुमत नसतानाही, विजयी घोषित होतो. असे असतानाही तो लोक प्रतिनिधी कसा होऊ शकतो? कधी कधी निवडणूका स्पर्धे शिवाय होण्याच्या घटना घडतात. एकच उमेदवार असतो. जो स्वतःला लोकांचा प्रतिनिधी असल्याचा दावा करतो. हुकुमशाही मध्ये एक पक्षीय निवडणूका म्हणजे फक्त मुखवटा असतो. लोकांनी सरकारी नेमणूकांवर (छाप) शिक्कामोर्तब करावाच लागतो. बहुपक्षीय अथवा एक पक्षीय पद्धती ही समाधानकारक प्रतिनिधी पद्धती पासून फार दूर आहे.

निवडणूकांच्या प्रणाली पेक्षा, प्रतिनिधित्वाच्या पायावर, निवडणुकाच्या साच्याचे अवलोकन करण्यामध्ये समस्या आहेत. निवडणूका प्रातिनिधिक असतात. जर एखाद्या विशिष्ट सरकारला कार्य करण्यासाठी लोकप्रिय सत्तेने अधिकार बहाल केले असतील तर त्याला निवडणूकांचा निकाल अशा अर्थ लावता येतो यालाच mandate म्हणजे लोकांचा हुकुम असे म्हणतात. ज्या राजकीय पक्षाला बहुमत मिळते. तो पक्ष असा दावा करु शकतो कि, त्यांच्याकडे विशिष्ट योजना राबवण्यासाठी लोकमताचे पाठबळ आहे. त्यामुळे mandate असणे म्हणजे विजेत्या पक्षाला लोकांचे प्रतिनिधित्व करण्याचे बळ, कायदेशीर आहे. पण ह्या विधानाला बऱ्याच पळवाटा आहेत. बऱ्याच वेळेला सरकारला अकल्पित अंतरराष्ट्रीय घटनाना सामारे जाताना, क्षणार्धात निर्णय घ्यावे लागतात. अशावेळी ह्या निर्णयासाठी सरकारला लोकांचे पाठबळ होते असे कोणीही म्हणणार नाही. उदा. जागतिक बाजारपेठेत फार चढ उतार झाले तर सरकारला काही सबसीडीज (द्रव्यसहाय्य) मध्ये काटछाट करावी लागते; यामुळे आर्थिक संकटाची लाट थोपवता येते. पण असा निर्णय लोकांना निश्चितच दुखावेल. सरकारच्या अशा अप्रिय निर्णयामुळे त्या आपण नक्किच असे म्हणू शकतो की, त्या निर्णयाला बहुमताचे mandate चे पाठबळ नव्हते. मग "निवणुकाद्वारे निवडलेले लोक प्रतिनिधित्व" या पद्धतीच्या उदात्तीकरणाचे समर्थन आपण कसे करु शकतो? पून्हा आपण निवडणूक घेण्याची पद्धती पाहिली असता असे दिसून येईल कि, त्यामध्ये अनेक उणीवा आहेत; लहान मुले, मनोरुग्ण लोक ज्यांना मतदानाचा अधिकार नाही त्यांना सोडून देऊ. पण त्या व्यतिरिक्त मतदानास पात्र असलेल्या लोकांची संख्या जास्त आहे. जे मतदानाचा हक्क बजावत नाहीत. कारण बरेचसे लोक हे अयोग्य असमंजस विचारसरणीच्या प्रभावाखाली असतात. उदा. धर्म, जात आणि नेत्यांची वलयांकित आकर्षक व्यक्तिमत्त्व इ. आधुनिक लोकशाहीतील नागरिकांची विचार शक्ति, तंत्रज्ञानांच्या

प्रसारामुळे लोप पावली आहे. असे बुद्धीभ्रंश झालेले नागरिक, लोकशाही आणि हुकुमशाहीतील फरक न समजल्यामुळे, एखाद्या व्यक्तीला आपला प्रतिनिधी म्हणून मान्य करणे भाग पडते, असे दिसून येते. दूरदर्शन सारखी प्रसार माध्यमे चर्चेसाठी असलेल्या विषयाला प्राधान्य देण्याऐवजी, नेत्याच्या व्यक्तिमत्त्वाला केंन्द्रस्थानी ठेऊन कार्यक्रम करतात. कोणत्याही परिस्थितीत निवडणूका मधून लोकांचे प्रतिनिधित्व निर्माण करणे ही प्रतिनिधित्व पद्धतीची खरी कसोटी नाही.

प्रातिनिधित्व पद्धतीची निंदा नालस्ती करण्यात Rousseau हा फ्रेंच तत्वज्ञ अग्रभागी होता. Locke या विचारवंताने ‘सामाजिक करार’ ची संकल्पना मांडताना असे म्हटले की, निवडून आलेला प्रतिनिधी, लोकांच्या अपेक्षा पूर्ण करण्यात अयशस्वी झाला तर लोक तो करार नाकारतील. परंतू आपल्या सर्वांना माहित आहे की अशी शक्यता कशी असंभवनीय आहे. काही विचारवंताच्या मते, लोकमत अजमावण्याची तरतूद, किंवा सतत घेतलेल्या निवडणूका ह्या ही Locke च्या गृहितकांचे (संकल्पनांचे) समर्थन करतील. म्हणजेच प्रतिनिधी आपले कर्तव्य बजावताना काळजी घेतील.

प्रातिनिधित्वाच्या कल्पनेबद्दल Rousseau या तत्वज्ञाचा वेगळा दृष्टीकोन होता. ते म्हणाले, जेव्हा लोक आपली सत्ता प्रतिनिधीवर सोपवातात त्याचवेळी नागरी समाजाचा अंत होतो. तो निवडणूकांचाच धिःकार करतो. प्रातिनिधित्व आणि लोकप्रिय सार्वभौमत्व ह्या दोन संकल्पना परस्परांशी विसंगत आहेत. प्रतिनिधिंची निवडणूक म्हणजेच लोकांच्या स्वातंत्र्याचा संकोच. असे तो Rosseau म्हणतो. प्रातिनिधिक पद्धतीमध्ये ‘लोक सेवेचा’ अंत होतो; आणि स्वतःचे पैसे कमवण्याचे उद्योग सुरु होतात. प्रजा बाजूलाच राहते. अशा वेळी राज्य कोलमडायला फारसा वेळ लागणार नाही. जेव्हा लोकांना देश रक्षणासाठी लढायला सांगितले जाते तेव्हा ते (लोक) म्हणतात, सैन्याला पैसे द्या आणि स्वतः सुरक्षितपणे घरात बसतात. जेव्हा एखाद्या सभेला जाणे, आणि सामाजिक समस्यांची चर्चा करणे आवश्यक असते तेव्हा ते अधिकाऱ्यांची नावे सूचवून, सांगून, स्वतः घरात बसतात. लोक आळशी होतात. पैसा त्यांना भ्रष्ट करतो. त्यांच्या आळशीपणामुळे सैनिकी सत्ता देशाला गुलाम बनविते आणि प्रतिनिधी देश विकतात. रुसो कडवटपणे प्रतिपादन करतो कि, व्यापार वाढीमुळे पैशाची सत्ता (money power) वाढीला लागली आहे. वैयक्तिक सेवां पैशारुपी मोल देऊ करुन घेतल्या जातात. ‘अर्थव्यवस्था’ हा शब्द गुलामी दर्शवितो. प्राचिन शहरी व्यवस्थेमध्ये हा संकल्पना माति नव्हत्या. खऱ्या अर्थाने स्वतंत्र असलेल्या देशात नागरिक सर्व कर्तव्ये स्वतः पार पाडतात आणि त्यासाठी पैसे मोजत नाहीत. आधुनिक प्रातिनिधिक लोकशाहीत नागरिक कर रुपाने सरकारला पैसे देतात. ह्या बदल्यात नागरिक आपली कर्तव्ये दुसऱ्याकडून करवून घेतात, जी त्यांनी स्वतः करायला हवी होती. Rousseau च्या म्हणण्याप्रमाणे आदर्श राजवटीमध्ये नागरिक स्वतःची कर्तव्ये तर करतीलच पण शिवाय अशी कर्तव्ये पार पाडायला परवानगी देण्याबद्दल राष्ट्राला मोबदला देतील. परंतु अकार्यक्षम सरकार असताना लोक तिकडे फिरकणारही नाहीत. आधुनिक लोकशाहीतल नागरिकांबद्दल Rousseau ने फार पूर्वी वर्तवलेली मते, आपण आजही अनुभवतो आहोत. “चांगले कायदे पुढे अधिक चांगले होतात तर वाईट अधिक वाईट होतात.” मला काय करायच आहे? अशी भावना एखाद्या सामाजिक समस्ये बद्दल नागरिकांची असते तेव्हा सरकारी यंत्रणा संपलीच असे समजा. अशी समज Rousseau देतो.

राष्ट्रीय सभेमध्ये आपल्यातर्फे लोकांनी प्रतिनिधी किंवा अधिकारी व्यक्ती नेमणे हा सरकारचा अपमान आहे. आस्थारहित उदासिन देशाभिमान खाजगी हित रक्षणाचे अनेक उपद्व्याप आणि राज्याचा प्रचंड विस्तार याचे फलित म्हणजे जनतेची ही प्रवृत्ती होय.

राजकीय समाजाला एकत्र ठेवणारा समान धागा म्हणजे 'आम जनतेची इच्चा' असे Rousseau म्हणतो, ही 'सर्वसामान्य इच्छा' सार्वभौम आहे आणि तिथे फारकत करणे शक्य नाही. तसेच तिचे प्रतिनिधीत्व होऊ शकत नाही. नेमलेले अधिकारी, प्रतिनिधी सामान्यांच्या इच्छेचे प्रतिनिधित्व करुच शकत नाहीते. ते त्यांचे केवळ कारभारी आहेत आणि त्यांना करायला विशिष्ट असे कामही करता येत नाही.

Rousseau च्या मते 'प्रत्येक कायदा जो लोकांनी ना मंजूर केला आहे तो रद्द होतो. वास्तविक तो कायदाच नसतो.' प्रातिनिधित्वाची कल्पना आधुनिक आहे आणि ती जाहगिरदारी, सरंजामी सरकारातून आली आहे. प्राचिन प्रजासत्ताक राज्ये किंवा राजेशाहीमध्ये लोकांनी कधीही आपले प्रतिनिधी निवडले नाहीत. हा शब्द सुद्धा लोकांना माहित नव्हता. रोममध्ये, विशेषतः जास्त मोठ्या संख्येने लोकवस्ती झाल्यामुळे, संरक्षक अधिकाऱ्यांनी, कायदे अमलात आणताना, लोकांचे अधिकार बळकावायला सुरुवात केली. Rousseau साहेबांच्या मते निसर्ग नियमाप्रमाणे जे नसेल त्याचे तोटे हे असणारच, विशेषतः नागरी समाजासाठी त्याच्या मनात प्राचिन ग्रीक व्यवस्थेबद्दल खूप आदर होता. जिथे लोकांना जे करणे आवश्यक होते ते लोक करत असत. समसितोष्ण हवामानात राहून, नैसर्गिक हावेच्या पलीकडे पण मुक्त जीवनासाठी आस असलेले ते लोक हाते. पण, अर्थात तिथेही गुलामगिरी होतीच. पण गुलामगिरीची तरफदारी आपण करु शकत नाही. Rousseau शेवटी म्हणतो, "आधुनिक लोक स्वतःला स्वतंत्र समजतात आणि प्रतिनिधी नेमतात; तर प्राचीन लोकांकडे दोन्ही गोष्टी नव्हत्या. पण कोणत्याही परिस्थितीत, ज्या क्षणी लोक स्वतःऐवजी 'प्रातिनिधिक' राहणे पसंत करतात, ते पुढे कधीही स्वतंत्र नसतात. स्वातंत्र्य मुळी अस्तित्वात नसते."

उपयुक्ततावादाचा तत्ववेत्ता, James Mill त्याचे प्रातिनिधित्वाच्या पद्धति बद्दल अगदी वेगळे दृष्टीकोन होते. त्याचा प्रसिद्ध निबंध, 'On Government' मध्ये तो म्हणतो, आधुनिक काळातली हा 'महान शोध' आहे. तो प्रामाणिकपणे खात्री देतो कि, 'प्रातिनिधित्वाच्या पद्धतीमध्येच चांगल्या सरकारची, संरक्षक लक्षणे सापडू शकतील? 'चांगले सरकार ही अशक्य संकल्पना आहे. लोकांनी नेमलेली एक सभा, सरकारी व्यवहाराची कार्यवाही करु शकत नाही. म्हणून लोकांनी त्यांना एका व्यक्तिला किंवा मंडळाला काही अधिकार बहाल करायला हवेत. पण अशा प्रतिनिधींना मिळालेले अधिकार स्वतःच्या प्रगतीसाठी वापरण्याची संधीच मिळेल. म्हणून आपण म्हणू शकतो की चांगले सरकार अशक्य आहे.''

पण James Mill ला तसे वाटत नव्हते. त्याच्या मते अधिकारावर असलेली व्यक्ति आपल्या अधिकाराचा गैरवापर करु शकते. पण त्यावर नियंत्रण ठेवणारी यंत्रणा उभी राहू शकते. सर्व सरकारे चांगली चालतात कारण त्यांच्यावर घटनेने नियंत्रण ठेवले असते. समाज स्वतः सरकारी अधिकारांची अमंलबजावणी करु शकत नाही म्हणून त्यांना लोकांना ते अधिकार काही व्यक्तिवर किंवा काही व्याक्तिंचा एकागटाला सोपवावे लागतात. समाज स्वतः त्या व्यक्तिवर नियंत्रण ठेऊ शकतो. नाहीतर अधिकारी स्वतःचे हित संबंध जपतील आणि अकार्यक्षम सरकार निर्माण करतील. पण समाज कसे नियंत्रण ठेऊ शकतो? सभा होते तेव्हा, कृति करणे शक्य नाही. म्हणून सभा प्रतिनिधी निवडते. आणि हे प्रतिनिधी नियंत्रण ठेवतात.

आपणास असे दिसते की, James Mill सुचवितो की, प्रथम समाज एका लहान गटाला अमलबजावणीचे अदिकार देतो नंतर त्या लहान गटाने सत्तेचा दुरुपयोग करु नये म्हणून

एक त्याहून मोठा गट प्रतिनिधींना निवडून त्यांना 'लोकांच्या अधिकाराचे संरक्षक Watch dog म्हणून नेमता ही पद्धती परिणामकारक होण्यासाठी जेम्स मील दोन गोष्टी सुचवितो.'

१) नियंत्रक गटाला, नियंत्रणाचे पुरेसे अधिकार असायला हवेत.
२) समाज हितामध्ये त्यांना रस असायला हवा. नाहीतर तेच सत्तेचा गैरवापर करतील. त्यांना (प्रतिनिधिंना) दिलेले अधिकार हे कोणत्याही समस्येतून तोडगा काढण्यासाठी सक्षम हवेत तसेच त्यांनीही प्रतिनिधित्वाचा गैरवापर केल्यास त्यांचे ते पद काढून घेण्याची सोय हवी.

जर एखाद्याला मूलभूत मानवी स्वभावाच्या मूलभूत तत्वानुसार प्रेरित होऊन आपल्या इच्छेचे समाधान शोधू इच्छितो, आणि प्रयत्नात अडचण आल्यास, शक्य असल्यास ती अडचण दूर करतो. जर एखादा गट त्याला विरोध करेल आणि तो त्यांच्यावर कुरघोडी करेल जर त्याला रोखण्यासाठी त्या गटाकडे निदान राजा एवढे सामर्थ्य असायला हवे. James Mill या प्रकारच्या घटनेचे सोदाहरण स्पष्टीकरण देतो. त्या काळच्या ब्रिटीश राजेशाही मध्ये 'House of commons' लोकसभेला जी लोकांची प्रातिनिधिक समिती होती, तिला राजा आणि House of Lords उमरावांची सभा, या दोघांच्या एकूण राजकीय शक्ती एवढी राजकीय क्षमता होती ज्यायोगे सत्तेच्या गैरवापरला आळा बसेल.

प्रतिनिधि आपल्या अधिकारांचा दुरुपयोग करण्याची शक्यता आहे. या दुरुपयोगाची शक्यतेबद्दल James Mill ला जाणीव आहे व तो त्याबद्दल लिहितो. "प्रत्येक प्रतिनिधीची क्षमता दोन गोष्टींवर जोखली जावी. एक म्हणजे, ते प्रतिनिधी आपल्या अधिकारांचा वापर इतरांवर कसा करतात? आणि दुसरा, एका समाजाचे त्याच्यावर असलेले अधिकार म्हणजेच त्याच्याकडून असलेल्या अपेक्षा." "अधिकाराचा दुरुपयोग टाळणे हे उद्दिष्ट गाठण्यासाठी, त्यांच्या (प्रतनिधिंच्या) कार्यकाल खंडावर मर्यादा घालणे हा उपाय आहे" असेही James Mill सुचवतो. ब्रिटीश राजवटीचे, स्वतःचे समकालीन उदाहरण देऊन तो अनुमान काढतो, ही एक जुनी आणि मान्यता पावलेली पद्धत आहे. जीमध्ये राज्य चालवणाऱ्याचे हित आणि ज्यांच्या हितासाठी जनतेसाठी, राज्य चालवले जाते का? याची पडताळणी करता येते. हा जनहितचा फायदा, पाठपुराव्याने, सतत व्हावा म्हणून 'ब्रिटीश कॉमन हाऊस' चे सभासद मर्यादित कालखंडासाठी निवडले जातात. जर सभासद पिढीजात असतील किंवा तहहयात मर्यादेसाठी निवडलेले असतील ते आपल्या सत्तेचा वापर आपल्या फायद्यासाठी करतीलच, पण त्याशिवाय ते लोकांचा आणि त्यांच्या मालमत्तेचा अवमान करतील.

म्हणून James Mill असा विचार करतात की, ठराविक मुदतीची सद्य व्यवस्था, सत्तेचा दुरुपयोग प्रतिनिधींनी करण्याला पायबंद घालेल. कार्यकारी अधिकाऱ्यांएवढेच अधिकार प्रतिनिधिंवर सोपवलेले असतील जे अधिकाऱ्यांकरवी होणाऱ्या सत्तेच्या गैरवापरावर निर्बंध लागू करतील. जर कार्यकारी अधिकारी आणि प्रतिनिधींमध्ये मूर्ख माणसे असतील तर मात्र सरकार कसे काम करणार? या प्रश्नाचे उत्तर, विशिष्ट देशातील विविध घटनाच्या प्रगतीकडे बघितले जाणे जरुरी आहे.

प्रतिनिधित्वाच्या पद्धतीची एक विशिष्ट दृष्टीकोन आहे. सद्यकालीन लोकशाहीमध्ये सगळीकडे प्रतिनिधित्व पद्धतीच आमलात आणली जात आहे; तिच्यामध्ये भलेही किती त्रुटी असुदेत किंवा मर्यादा असु देत. पण वास्तवात एका प्रतिनिधीचे कर्तव्य काय असते? तो फक्त

मतदारांचा प्रवक्ता असतो काय? का त्याला स्वतःचा काही मते, दृष्टीकोन सरकारच्या योजनांबद्दल असू शकतो? तो म्हणजे आपल्या मतदारांसाठी फक्त 'रबरी शिक्का' असतो का स्वतःची बुद्धीमत्ता वापरुन, लोकांसाठी खऱ्या अर्थाने फायदेशीर काय ठरेल यावर कार्यवाही करेल. अल्प, अदूरदर्शी लोकांना दूरगामी योजनाचे फायदे समजत नाहीत. अशावेळी लोकप्रतिनिधीने सक्तीने का लोकप्रियतेच्या निकषावर मन घ्यावे किंवा स्वतःच्या बुद्धीमत्तेच्या प्रमाणे संयुक्तिक योग्य मत द्यावे. एखाद्या बाबीवर मत देताना त्या गोष्टींच्या योग्यतेवर विचार करावा किंवा फक्त ज्यांनी त्याला मत दिले त्याच्या मताला आवाज द्यावा, म्हणजे त्याच्यासारखे मत मांडावे? Edmund Bruke १८ व्या शतकाला तत्वज्ञानी, ३ नोव्हेंबर १७७४ ला झालेल्या निवडणूका वर दिलेल्या भाषणाच्या काढलेल्या अनुमानात याचे उत्तर देतो, तो प्रतिनिधी (Representative जास्त लोकसंख्येने निवडलेला) आणि Delegates त्यामानाने कमी लोकसंख्येने निवडलेले प्रतिनिधी, यांमध्ये नेटका, काळजीपूर्वक फरक उघड करतो. तो प्रतिनिधीचे कर्तव्य हे खूपच पवित्र आणि धार्मिक आहे असे मानतो. आपण त्याच्या ऐतिहासिक भाषणाचा गोषवारा खालीलप्रमाणे करु शकतो. प्रतिनिधिच्या आनंदासाठी आणि गौरवासाठी हे आवश्यक आहे कि, त्याने आपल्या मतदार संघाशी एकजूट होऊन रहावे. तसेच एकांकातील मसलती आणि पत्रव्यवहार तसेच मोकळेपणाची विचारविनीमय आणि माहिती घेण हे त्याचे कर्तव्य आहे. त्यांच्या (लोकांच्या) इच्छेला त्याच्यामते महत्त्व असले पाहिजे; त्याच्या मतांचा आदर असला पाहिजे. त्यांच्या कामात अविरत कायम लक्ष घातले पाहिजे. स्वतःच्या वैयक्तिक विश्रांतीचा, सुखा समाधानाचा, संतोषांचा त्याग करणे हे त्याचे कर्तव्य आहे. त्याने हे सर्व लोकांच्या कल्याणाकरीता केले पाहिजे. प्रतिनिधी आणि त्याच्या मतदार संघामधील जनता यांच्यामध्ये कशी सलगी असली पाहिजे हे स्पष्ट केल्यावर, Bruke हा तत्ववेता, प्रतिनिधिनी कोणत्या स्थितीत स्वायत्ततेने निर्णय घेतले पाहिजेत हे स्पष्टपणे सांगतो. मतदारांना संबोधित करुन तो म्हणतो, पूर्वग्रह विरहित, प्रगल्भ निर्णयशक्ति, अभिजात, सुसंस्कृत सद्सद् विवेक बुद्धी असलेल्या प्रतिनिधीने, आपले अधिकार कोणत्याही माणसाला कोणत्याही जीवित व्यक्त समुहाला देऊ टाकू नयेत. तुमचा प्रतिनिधी तुमचा ऋणी आहे. त्यांची मेहनतच नव्हे तर निर्णय क्षमता सुद्धा याउलट तुमचे कल्याण होइल, असे न करता तूमच्या मतासारखे तो दृष्टीकोन ठेवील तर तो तुमच्याच विश्वासघात होईल. आपले मत नोंदविण्याचा हक्क प्रत्येकालाच असतो. हे मान्य करताना त्या दृष्टीकोनाशी मिळता जुळता विचार ऐकायला प्रतिनिधिने नेहमीच इच्छूक तयार असायला हवे. तरीही Bruke म्हणतो, ही मते म्हणजे प्रामाण्य असलेली मते सूचना आहेत अशा तऱ्हेने प्रतिनिधीने त्याकडे पहावे असे नाही. किंवा लोकमताच्या पाठींब्याची बाबही नाही जी त्याने डोळे झाकून आज्ञाधारकपणे कार्यान्वित करावी. थोडक्यात जनमताचा सर्वसाधारण आदर असणे वेगळे आणि त्याच्याकडून आलेल्या सर्वच सूचना किंवा मागण्या वेगळ्या होत. प्रतिनिधिने सद्सद् विवेकबुद्धीला स्मरुन तारतम्याने त्यांच्यावर कारवाई करावी. House of Representative आणि International Organization Like Congress of Ambassaders या दोन्हींच्या जडणघडणीत आणि स्वरुपामध्ये फरक आहे. असे Bruke म्हणतो. दोन्हीमध्ये निराळे आणि प्रतिकूल हितसंबंध असतात. प्रत्येक देशाचा राजदूत संकुचित आणि पक्षपाती दृष्टीकोन ठेऊन, आपल्याच देशाचे हितसंबंध सुरक्षित रहावेत हे पाहिल. पण संसद ही एका राष्ट्राची, साधक बाधक चर्चा करणारी सभा असते जिचे हितसंबंध (सभासदांचे) एकच असतात. या संसदेमध्ये, स्थानिक हेतु, स्थानिक पूर्वग्रह प्रतिनिधिंना मार्गदर्शन करणार नाहीत. सर्वात महत्त्वाचे काय तर चांगल्या उद्देशातून सर्वांचे एकूणातच चांगले होणे. मग त्यामध्ये जर एखाद्या स्थानिक सभासदाने घाईघाईने सर्वांचय भल्याचा निर्णयाला विरोध केला, तर बाकीच्यांनी तो विरोध हाणून पाडला पाहिजे.

दुसऱ्या शब्दात Edmund Bruke लोकशाहीची सुशिक्षित संकल्पना सुचवितो आहे, जी लोकप्रिय संकल्पनेच्या विरुद्ध आहे. त्याच्या काळात साक्षरतेचे प्रमाण फार खालच्या दर्जाचे होते; मतदाराचे मतदानाचे हक्क मर्यादित होते. सुशिक्षित प्रतिनिधिनींची राजवट हि कदाचित तेव्हा समर्थनीय असेल. पण आजही तेच लागू पडेल का हा वादाचा मुद्दा आहे पण Bruke जमावाच्या मताबद्दल ताकिद देतो आणि योग्यपद्धतीने प्रजेचे प्रश्न सोडविण्यावर भर देतो. त्या मुद्यापर्यँत तो तर्कसंगत आहे.

**आपली प्रगती तपासा :**

१) पारंपारिक प्रतिनिधित्वाच्या संकल्पनेचा टीकायुक्त आढावा घ्या. त्याच्या मर्यादा काय आहेत ते लिहा.

## १२.४ 'प्रतिनिधी पद्धती' संबंधी समकालीन मुद्दे

प्रतिनिधित्व पद्धतीमध्ये राजकीय हक्काचा सुद्धा समावेश होतो. अमेरिकेतील राजकीय तत्वज्ञ Hannah Fenichel Pitkin त्याच्या प्रतिनिधित्वाच्या संकल्पनेचे लिखाणात नवीन बाबींवर लक्ष केंद्रित करतो. आपण सरकार प्रातिनिधिक आहे असे गृहित धरुन, "सरकारच्या कार्यवाहीवर लोकांचे नियंत्रण आहे हे दर्शवितो." Pitkin मान्य करतो, सरकारच्या सर्व औपचारिक कारवाया लोकांशी संबंधित असतात. प्रातिनिधिक सरकार हे इतर प्रकारांच्या सरकारांपेक्षा वेगळे असते ते त्याच्या, ह्याच वरील लोकांशी संबंधित असण्याच्या मूळ भरीव गुणधर्मामुळे होय. या पद्धतीमध्ये लोक हे केवळ चांगल्या कार्यवाहीचे निक्रिय उपभोक्ते नसतात. तर ते प्रतिनिधिमार्फत कार्यरत असतात. ह्या पद्धतीचा गुणधर्म असा की, सरकार जनतेच्या नियंत्रणात असते तसेच ते लोकांना उत्तरे देण्यास संवादी असतात. प्रतिनिधीत्वाच्या सखोलतेचे स्पष्टीकरण करताना Pitkin प्रतिपादन करतो, या पद्धतीमध्ये, लोकांकडे सरकारी र्कावाहीचे आकलन असणे आवश्यक आहे. ती कार्यवाही करण्यासाठी सरकारला उद्युक्त करणारे असावे त्यामुळे सरकार व जनता यामध्ये सुसंवाद होईल. जर जनता सार्वभौम सत्ताधीश असेल. तर त्याच्यांकडे (लोकांकडे) लोकहिताच्या सरकारी कार्यवाहीला पारखण्याची क्षमता असायला हवी. लोकांनी इच्छा प्रदर्शीत करणार नाहीत किंवा नोंदवणार नाहीत परंतू त्याच्या परिपूर्ततेसाठी लागणारे सामर्थ्य, त्यांच्याकडे असावे. सामान्यतः अशा इच्छा मान्य होतील अशी अपेक्षा असते परंतू जर त्या इच्छा त्यांच्याच हितासाठी समर्थनीय नसतील तर त्याचा पूर्तता होणे शक्य नाही. उदा. बंदुक धारण करण्याचा परवाना, आमली पदार्थ सेवना विरुद्ध कायदा इ. पण हे सर्व नियम नव्हेत तर अपवद आहेत. म्हणजे अपवादात्मक बाबी सोडता लोकांच्या इच्छा प्रदर्शित करण्यासाठी एका यंत्रणेची आवश्यकता आहे. ज्या सरकार द्वारे त्यांची पूर्तता व्हावी. सतत प्रतिसाद देण्याची क्रिया आवश्यक नाही पण कायम सुसंवादी असण्याची शक्यता, तयारी असावी. लोकप्रिय मागण्यांसाठीच सरकारने कृती करणे पुरेसे नाही. बऱ्याच वेळा लोकप्रिय

मागण्यांना हिंसक वळण मिळते. तद्नंतर सरकार कृति करत असेल तर, लोकांमध्ये असा समज पसरेल कि, जनतेने हिंसक चळवळ केल्यावरच सरकार कृतिशील होते. असे घडू देऊ नये. पूर्वकल्पने नुसार लोकांच्या अपेक्षांची पूर्ती सरकारने करावी. जर जनता एखादी कृती सरकारला करण्यास भाग पाडण्यासाठी प्रवृत्त करु शकत असेल तर, सरकारच्या मार्फत लोकच कार्यरत आहेत असे आपण म्हणू शकतो. ज्यावेळी (दिवशी) लोकांच्या इच्छा निष्फळ होऊन ते नाऊमेद होतील तेव्हा आपण 'प्रातिनिधिक सरकार' म्हणून (जाहिर करणे) सरकार चालवू नये. ही एक जास्त कालखंडासाठी पद्धतशीर व्यवस्था करणारी संस्था, आणि तिची कार्यप्रणाली आहे. 'लोकांच्या इच्छाचे समाधान करणारी किंवा तसे न करणारी सरकारी व्यवस्था; जी 'सरकार प्रातिनिधिक आहे की नाही? हे ठरवू शकेल असा कायदा नाही. एक लेखक John Plamentaz मुद्दा मांडतो एखादा हुकुमशहा, लोकांच्या इच्छा पूर्ण करण्याचे धोरण निवडेल जरी तो प्रातिनिधिक नसेल. जर तो हा निर्णय (धोरण) संस्थापनात्मक करेल, केवळ त्याला वाटेल तेव्हाच नाही तर कायम पद्धतशीर संवादी स्वरुपाच्या करेल. तरच तो प्रातिनिधिक होईल. दूसऱ्या शब्दात नियमित, न्याय्य आणि मोकळ्या वातावरणात निवडणूका होणे आवश्यक आहे. आपली मते प्रदर्शित करण्याची लोकांची क्षमता, निवडणूकींमुळेच सशक्त, पुर्नस्थापित होते. त्याच्याकडे असलेली राज्य करण्याची क्षमता ते थेट वापरत नाहीत म्हणून प्रतिनिधिक सरकारकडून प्रतिसादाची अपेक्षा असते. नव्हे ती गृहित धरली जाते. त्यांच्या सत्तेत शिरकाव आहे पण त्याच्या प्रत्यक्ष कार्यवाहीत नाही. म्हणून सरकारने त्या इच्छांची योग्यता ओळखायला हवी. निराळ्या शब्दात कार्यतत्पर सक्षम सरकारने लक्ष घालायला हवे अशा गरजा आणि सशिक्षित, राजकीयदृष्ट्या सक्रिय, नागरिक यांना Pitkin ची संकल्पना सामोरी जाते. नागरिक आणि सरकार यांच्यातील सौहार्दपूर्ण स्नेहपूर्ण सहसंबंध, तसेच संस्थात्मक व्यवस्था जसे नियमित, स्वतंत्र निवडणूकांनी प्रतिनिधित्व पद्धत बनते.

Anne Philips तिच्या The politics of presence या पुस्तकात प्रतिनिधि पद्धती मधील अपूर्णतेवर बोट ठेवते. ती लोकशाही प्रणालीच्या सद्य स्वरुपातील आत्तापर्यंत वगळलेले (विचारात न घेतलेले) 'अल्पसंख्यांक गट' च्या साठी, विचारात घेतले जावेत अशा मुद्यांसाठी कळकळीचे आवाहन करते. विविध सांस्कृतिक गटांच्या समाजाचे समाजामध्ये कोणी एक प्रतिनिधि आपल्या असा दावा करु शकत नाही कि तो अशा विभिन्न गटांचा प्रवक्ता आहे. जेव्हा सर्वमान्य अशा योजना असतील, जसे वृद्ध निवृत्ती वेतन, बेकार भत्ता, पर्यावरण इ. बाबी कोणीही व्यक्ति गटाचे प्रतिनिधित्व करु शकते. पण कायदेशीर दृष्ट्या आणि वास्तविक पाहता महिलांचे प्रतिनिधित्व प्रत्येक वेळी हे कसे करु शकतात? असे Anne विचारते. त्यासाठी ती कामगार वर्गाचे प्रतिनिधित्व हा मुद्दा उदाहरणार्थ घेते. याबाबत दोन मते आहेत. त्यातील एक विचार म्हणजे, एखादी व्यक्ति, जीला कामगाराशी संलग्न प्रश्नांबद्दल उत्तम ज्ञान आहे; पण ती स्वतः कामगार नाही, तरी अशी व्यक्ती कामगाराचे प्रतिनिधित्व कसे करु शकते. या विचारला दुसरी विचारसरणी आव्हान देऊन म्हणते, फक्त एक कामगारच, कामगारांच्या बाजूने बोलू शकतो. आज गटासाठी हक्क या मागणीचा उदय होत आहे. "पर्याप्त (पुरेसे) प्रतिनिधित्व" या संकल्पनेचे अर्थबोधन हे, विविध सामाजिक गटांनी संयुक्त असे नागरिक प्रतिनिधी सभा तयार करणे असा केला जात आहे. अनेक सामाजिक चळवळींचा परिणामस्वरुप ही मागणी आहे. ह्या चळवळी आपल्या गटाची वेगळी ओळख व्यक्त करत असतात. जरी 'समानतेचे आदर्श तत्व' आमलात आहे तरी समाजात 'असमानता' असते जी पुसुन टाकता येत नाही. "बायकांना आपल्या हक्कांसाठी लिंग बदल करायचा आहे, किंवा काळ्यांना आपल्या त्वचेचा रंग बदलायचा आहे असे काहीही करण्याची त्याना नागरी हक्क मिळविण्यासाठी गरज नाही. किंवा सारखेपणा

लादलेल्या समाजामध्ये, स्वतःच्या वेगळेपणाबद्दल त्यांना विशेष सवलत ही नको आहे."असे Anne Philips म्हणते.

काळ्यांचे हे गट, जे स्त्री हक्कासाठी कार्यरत आहेत, ते स्वायत्त आहेत. ते आत्मनिर्भर आहेत. "Unity of shared concerns" त्यांना नको आहे. म्हणजे वेगळ्या शब्दात Anne सुचविते, प्रतिनिधित्वाची विद्यमान पद्धतीमध्ये जास्त गटांना प्रतिनिधित्व देण्याची व्यवस्था करायला हवी. मग एखाद्या राजकीय यंत्रणेच्या 'सामाजिक एकता' या पायाभूत तत्वाचे काय होईल? तर ती म्हणते, 'आम्ही पूर्वीपासून चालत आलेले सामाजिक ताण' आणि 'सामाजिक गटातील वैमन्सय' कमी होण्यासाठी "गट प्रतिनिधित्व" वाढवून त्याला कायदेशीर स्वरुप देण्याचा प्रयत्न करत आहोत.

ह्या क्षमतेला Marin Young यांनी हात घातला आहे. आपल्या लिखाणात, "फरकाचे राजकारण आणि न्याय" यावर 'RainBow Coalition' ची कल्पना करतात. सामाजिक गट किंवा विद्यमान सामाजिक संस्था या निरनिराळ्या स्थानिय सामाजिक अनुभवातून निर्माण होतात. त्यावरुन असे दिसून येते की काही गट संस्थात्मक फायदे, विद्यमान सरकार कडून घेतात. उदा. मोफत कायदेशीर सल्ला औषध विमा इ. जे इतर गटांना मिळत नाहीत. म्हणून खऱ्या न्यायाची मागणी अशी आहे की, वेगवेगळ्या गटांना निराळ्या सामाजिक आणि राजकीय संस्थामध्ये प्रतिनिधित्व द्या. म्हणजे विशिष्ट प्रतिनिधित्व, सामाजिक गटाचे असणे गरजेचे आहे. असे हे आदर्शवादावर आणि विशिष्ट हितसंबंधांवर अवलंबून असलेले प्रतिनिधित्व, उपेक्षीत सामाजिक गटांना न्याय देण्यात पुरेसे पडेल असे वाटत नाही, जरी त्याचे काही फायदे असतील. सामाजिक गटाची व्याख्या करताना Young म्हणतो, "एक लोक समुदाय, ज्यांची जीवन पद्धती आणि राहण्या वागण्याच्या विशिष्ट पद्धतीमुळे एक असल्यामुळे त्यांच्यामध्ये परस्परांबद्दल सादृश्य आकर्षण असते." आपल्या विशिष्ट सांस्कृतिक संरचनेमुळे हे सामाजिक गट एकमेकांपासून कसे वेगळे पडतात ते Young सिद्ध करतो 'सामाजिक गटाना प्रतिनिधित्व' या मतांचा पाठपुरावा करताना, लेखक ठामपणे 'हे प्रतिनिधित्व' फक्त 'शोषित किंवा दडपले गेलेल्या लोकांचे गट किंवा पिडित, नुकसान झालेल्या गटांना, (जसे आपल्याकडे सामाजिक अन्यायामुळे झालेले पिढ्यानपिढ्याचे नुकसान किंवा हानी) मिळाले पाहिजे. कारण इतर गटाना प्रतिनिधित्व आधीच मिळालेले असते. त्यांचे अनुभव, मुल्ये, आग्रक्रम इ. वर आधीच कारवाई झाली आहे. त्यावर लक्ष दिले गेले आहे. एकदा का हे प्रतिनिधित्व 'फक्त शोषित, पिडिंतासाठी' आहे हे स्पष्ट झाल्यावर प्रतिनिधित्वामध्ये अनावश्यक वाढ होण्याची भिती नाश पावेल. सामाजिक न्यायासाठी लढणाऱ्या संस्थासाठीही 'गट प्रतिनिधित्व' ग्राह्य आहे असे Young म्हणतो. उदा. काळ्यां पक्षांनी महिलांना विशिष्ट प्रतिनिधित्व द्यावे तर महिला गटांनी काळ्या पक्षांना असे प्रतिनिधित्व घ्यावे. वेगळ्या शब्दात 'शोषित गटांनी आपले प्रश्न सोडविताना' परस्पर सामंजस्यावर भर द्यावा असे Young सुचवितो. त्याकारणे सामाजिक संबंधांमुळे एकी निर्माण होईल. पण या एक झालेल्या गटांनी आपल्या स्वायत्ततेला सुरुंग लाऊ नये.

पारंपारिक संयक्त पक्ष आणि नवीन उदयास आलेले या दोन्हीमध्ये पक्ष Young स्पष्टपणे फरक करतो. विशिष्ट ध्येय, उद्दिष्ट प्राप्तीसाठी पारंपारिक संयुक्त गटामध्ये, विविध गट कार्यरत असतात. अर्थात आपले मतभेद, आपल्या उद्दिष्टपूर्तीच्या आड येतील असे ते करणार नाहीत, हे गृहित आहे. हा एक कल्याणकारी राज्याचा नमूना आहे, जिथे लहान गट

आपल्या विशिष्ट मागण्या बाजूला ठेऊन, सर्वसामान्य ध्येय गाठण्यासाठी एकजूट करतात. पण Rain Bow Coalition मध्ये प्रत्येक मतदार गट इतर गटांचे अस्तित्व पूर्णपणे मान्य करताना, स्वतःच्या गटाच्या विशिष्टतेचे अनुभवांचे, सामाजिक समस्यांच्या यथार्थ दृश्याचे प्रतिनिधित्व करतात. हे Coalition पिडीत गटाच्या सर्व हक्कांना, अस्तित्वांना पाठिंबा देते ज्यायोगे राजकीय कार्यक्रमात स्थान मिळेल. त्यांच्यातील निराळेपण दडपून टाकण्याने हे साध्य होणार नाही. परंतू प्रत्येक मतदार संघाने आर्थिक आणि सामाजिक समस्यांचे विश्लेषण करुन, त्यांच्या अनुभवांचे यथार्थ दर्शन घडविले पाहिजे. स्वतःची स्वायत्तता जपत असतानाच तळागाळातील लोकांसाठी संस्थांची निर्मिती करणे हे एकता मिळविण्यासाठी गरजेचे आहे.

Rain Bow Coalition स्तूत्य, प्रशंसनीय आहे पण स्वतःच्या हितसंबंधांचे संरक्षण करताना, हे विविध गट परस्पर सामंजस्याने एकमतावर कसे येणार हे स्पष्ट नाही. पण लोकशाहीचा 'स्वसुधारणा' मत वळवणे आणि शांततापूर्ण एकते मध्ये विश्वास आहे. म्हणून विस्कळीत समाजाला, त्यांच्या विशिष्ट सांस्कृतिक ओळखीला धक्का न लागता सामाजिक न्याय मिळणे अपेक्षित आहे. Young चे Rain Bow Coalition हे त्या दृष्टीने टाकलेले एक पाऊल आहे.

**आपली प्रगती तपासा :**

१) आधुनिक टीकाकारांच्या प्रातिनिधिक दृष्टीकोनाचे टीकात्मक सिंहावलोकन करा.

## १२.५ सारांश

राज्यांच्या अतिविशालतेमुळे थेट लोकशाही ही संकल्पना गतकालीन झाली आहे. मोडित निघालेली आहे. राजकिय तत्वज्ञानांनी बऱ्याच पद्धती रचल्या आहेत, ज्यामध्ये प्रशासनीय उद्देश आणि जबाबदारी साधली जाईल असे वाटते. लोकांच्या म्हणण्याला, विचाराला प्रशासनामध्ये स्थान हवे, पण ते थेट राज्यकारभार करणार नाहीत. म्हणून त्यांनी निवडलेले प्रतिनिधी लोकांसाठी काम करतील, पण त्याच्याकडे (प्रतिनिधीकडे) स्वतंत्रपणे कार्यवाही करण्याचे स्वातंत्र्य असेल का? या प्रश्नाला होकारात्मक उत्तर देताना Bruke म्हणतो, प्रतिनिधिना धोरणात्मक योजनाना मतदानाची विशाल स्वायत्तता ही मतदारांच्या फायद्याचीच असते. जे J.S.Mill सारखे इतर विचारवंत सस्थापनात्मक (घटनात्मक) नियंत्रण हे सत्तेच्या समतोलासाठी आणि प्रतिनिधि किंवा सरकार कडून सत्तेच्या गैरवापराला रोखण्यासाठी आवश्यक आहे असे म्हणतात.

आधुनिक विचारवंतांनी, सार्वत्रिक प्रौढ मतदानाने दुर्बल गटांचे प्रतिनिधित्व करण्यासंबंधी असलेल्या अपूर्णतेच्या मुद्याकडे निर्देश केला आहे. ते 'गट प्रतिनिधित्वाचे' प्रवक्ते

आहेत. यांचे दोन उद्देश आहेत, "एक सामाजिक न्याय मिळवणे त्याच बरोबर त्याची सांस्कृतिक विशिष्ट ओळख जपणे" अशा साठी गट प्रतिनिधित्वाची गरज आहे. यालाच Rain Bow Coalition म्हणतात.

रुसो सारखे पारंपारिक विचारवंतांच्या म्हणण्यानुसार लोकांच्या इच्छेचे प्रतिनिधित्व कधीच होऊ शकत नाही. आणि प्रतिनिधित्व पद्धती ही एक फसवी संकल्पना आहे. J.S. Mill सारखे आधुनिक विचारवंत अशा बेबंदशाहीला पाठिंबा देतात. जे लोक प्रतिनिधिंना निवडून देतात, त्याच लोकांपासून ते अपरिहार्यपणे दूर जातात. बेबंदशाही मध्ये किंवा अराजकामध्ये कोणत्याही संस्थांना स्वातंत्र्य नसते. "राजकारणातील उत्स्फूर्त स्वरुप" त्याना आवडते. पण आधुनिक लोकशाहीत हे शक्य होईल का? याबद्दल शंका आहे.

## १२.६ पाठावरील प्रश्न

१) 'प्रतिनिधित्व' या संज्ञेची व्याख्या करा. विविध प्रकारच्या प्रतिनिधि पद्धतीचे सिंहावलोकन करा.

२) प्रतिनिधिंचे कार्य आणि त्यांच्या मर्याधा स्पष्ट करा. Bruke चा संदर्भ देऊन स्पष्टीकरण करा.

३) आधुनिक लोकशाहीमध्ये गट प्रतिनिधित्वा चे महत्त्व विशद करा.

❖❖❖❖

# १३

# राजकीय सिद्धांताच्या पायाभूत संकल्पना आणि उदारमतवाद

**घटक रचना :**

१३.० उद्दिष्ट्ये
१३.१ प्रस्तावना
१३.२ विशेष लक्षणे, व्याख्या आणि अर्थ
१३.३ राजकीय सिद्धांताच्या मूलभूत कल्पना
१३.४ उदारमतवाद
१३.४.१ उदार मतवादाच्या केंद्रिय संकल्पना
१३.५ नवउदारमतवाद
१३.६ सारांश
१३.७ पाठावरील प्रश्न

## १३.० उद्दिष्ट्ये

१) सर्वसाधारण अर्थ, व्याख्या आणि विशेष लक्षणे समजून घेणे.
२) राजकीय सिद्धांत आणि सर्वसाधारण कल्पना यामध्ये असलेल्या फरकाचे आकलन करणे.
३) उदारमतवादाच्या संकल्पनेचा, तसेच त्यासंबंधी अत्यंत महत्त्वाचा कल्पनांचा अभ्यास करणे.
४) नवउदारमतवादाच्या मूलभूत तत्त्वांची परीक्षा करणे.

## १३.१ प्रस्तावना

सर्वसामान्यपणे तत्त्वज्ञान, समाज आणि धोरणे यांच्याशी संबंधित प्रमाणीभूत तत्त्वांच्या संकल्पनांचा एक संच म्हणजे “Ideology” पण निव्वळ कल्पना म्हणजे Ideology नव्हे तर तो Ideology चा एक आशय संपन्न विभाग आहे. विविध कल्पना, श्रद्धा, सामाजिक, राजकीय, आर्थिक आणि सांस्कृतिक बाबीकडे बघण्याचा, व्यक्तिच्या दृष्टीकोनातून तिच्या गट, व्यक्ति किंवा समाजाबद्दलच्या एकत्रित कल्पना स्पष्ट होतात. त्याला Ideology असे म्हणू शकतो. दूसऱ्या शब्दात ज्या मूलभूत तत्त्वसंचाने Ideology झालेली आहे. त्यांचा बांधीलकीने केलेला

व्यासंग म्हणजेच Ideology. Ideology हे एक असे प्रमाणीभूत साधन आहे ज्या मार्फत सामाजिक आणि राजकीय क्षेत्रात बदल घडवून आणले जाऊ शकतात किंवा सध्या कार्यरत असलेल्या सामाजिक राजकीय व्यवस्थेचे समर्थन करण्यासाठी याच साधनांचा गैरवापर होतो. विशेषतः राजकारण आणि अर्थकारण या क्षेत्रात तात्त्विक शैली महत्त्वाची भूमिका करते. विविध सामाजिक शास्त्रे, जसे तत्त्वज्ञान, राजशास्त्र, अर्थशास्त्र, इतिहास, समाजशास्त्र इ. विषयांमधील बौद्धिक कार्यक्रम संकल्पनांच्या संचामार्फत मानवाच्या भाषिक वाढ झाल्यानंतरच्या काळापासूनच सुरु आहेत. मात्र Ideology या संज्ञेला वापराला नवीन काळात सुरुवात झाली. या संज्ञेला (Ideology) चलनी नाण्याचे स्वरुप फ्रेंच राज्यक्रांतीनंतर आले. त्यावेळच्या क्रांतीकारकांच्या विविध गटांची विविध मते, बऱ्याचदा विरोधी मते, दृष्टीकोन अस्तित्वात होते. तत्वज्ञान, सामाजिक, राजकिय, अर्थशास्त्र इ. विषयांवर विविध बाबींवर त्या गटांचे वाद-विवाद, चर्चा आपापसात होत असत. समकालिनांच्या भूमिकांमध्ये, भाषिक चकमकी वाढत होत्या त्या पार्श्वभूमीवर, १७९६ या साली, विद्वानांच्या मते Destutt de Tracy या ने (Ideology) आयडिओलॉजी ही 'संज्ञा' शोधून काढली. थोडक्यात अशा पद्धतीच्या विविध संकल्पनांचे त्याने नामकरण केले. हा शब्द हे दोन शब्दांचे एकीकरण आहे हे स्पष्ट आहे; Idea and logy. या दोन शब्दांच्या संयोगाने, Tracy याने 'कल्पनांचे शास्त्र' बनविण्याच्या प्रयत्न केला. त्यांच्या मते, कल्पना, तर्कशास्त्र आणि व्याकरण यांचा समावेश आहे. पुढे Tracy च्या संकल्पना फ्रेंच क्रांतीकारकांना प्रेरणादाई सिद्ध झाल्या त्यांनी क्रांतीकाऱ्यांच्या सरकारचे (जे लष्करशाही होते) 'लोकसत्ताक' राज्यघटना, ज्यामध्ये बुद्धिप्रामाण्यवादी मूल्यांना अत्यंतिक महत्त्व होते, अशा सरकारमध्ये रुपांतर होते.

## १३.२ विचारप्रणाली संकल्पनेची व्याख्या अर्थ आणि विशेष लक्षणे :

'आयडिओलॉजी' या संकल्पनेचा अर्थ 'कल्पनांचे शास्त्र' जे 'विषयाचा आशय' ठरविण्याच्या विभागात येतो. दुसऱ्या शब्दात एखादा दृष्टीकोन असंबंध भाषेते, असंयुक्तिक प्रकारे मांडला तर तो 'आयडिओलॉजी' च्या शास्त्रात मान्य होत नाही. त्याच बरोबर हेही लक्षात घेणे आवश्यक आहे की, 'आयडिओलॉजी' हा शब्द प्रचलित झाल्याबरोबर, त्याचा उपयोग नेपोलिअन बोनापार्टने आपल्या विरोधकांचा अपमान करण्यासाठी, त्यांची अप्रतिष्ठा करण्यासाठी जरुर करत असे. तो त्यांना 'आयडिओलॉग्ज'- 'पढतमुर्ख' असे कुचेष्टेने म्हणत असे.

Hipolyke Taine ह्या दुसऱ्या फ्रेंच विद्वानाने, ज्याच्या विचाराना प्रकट करताना 'Origin of Contemorary' या पुस्तकात Ideology चा निराळा अर्थ सांगितला आहे. त्याने Ideology आणि सॉक्रेटिस च्या पद्धतीमधील साम्य प्रस्थापित केले आणि ते तो आपल्या विद्यार्थ्यांना तत्वज्ञानात शिकवत असे. परंतू सॉक्रेटिसच्या शिकवण्याच्या पद्धतीत दोन प्रकारच्या संदर्भात फरक आहेत. एका पद्धतीत ती सर्व सामान्यांच्या भाषेत सादर होते, ज्यामुळे ती सर्वांना विस्ताराने समजते. दुसरी म्हणजे ही पद्धती प्रात्यक्षिक शास्त्राच्या सर्वसाधारण पद्धतीमध्ये निरीक्षणावर आधारित नमुनेदार उदाहरणाचा आधार देणे हे टाळते. समकालिन जगात Value free ही संज्ञा, मूल्यांनी भारलेल्या संकल्पनांचे विश्लेषण करणे शक्य करते. अजूनही या 'संज्ञेला' तत्त्वज्ञाना मध्ये संदर्भ आहे. या संकल्पनेचा वापर प्राधान्याने, राज्यशास्त्र आणि अर्थशास्त्रात होतो. वास्तववादी घटनांच्या आढाव्यावर वेगवेगळ्या कल्पना शास्त्रानी घेतलेल्या भूमिका ह्या वैयक्तिक मतांवर ठरविणे योग्य होणार नाही. कोणत्याही 'कल्पना शास्त्राचे स्वरुप'

हे चूक किंवा बरोबर नसते. ती एक त्या कल्पनेच्या पुरस्कर्त्यांची व्यक्तिगत निवड असते. एखाद्या Ideology वर विश्वास हा घटनांच्या परिस्थितीच्या विषया पलीकडे असतो. हे म्हणजे, काय आहे त्यापेक्षा काय काय असायला हवे ते सांगणे आहे. William A. Mullins Ideology ची चार मूलभूत लक्षणे सांगतात.

१) माहितीपेक्षा जास्त अधिकार
२) एखाद्या मूल्यमापनाला मार्गदर्शन करण्याएवढी योग्यता
३) कृतिसाठी मार्गदर्शनात्मक योग्यता
४) तर्कशास्त्राशी सुसंगत

साध्या शब्दात एखाद्या व्यक्तिच्या, गटाच्या, राज्याच्या आणि समाजाच्या आकांक्षा आणि मूल्ये ज्या 'कल्पना संचा' द्वारे प्रतिबिंबित होतात त्याची आयडिओलॉजी अशी व्याख्या होते. Karl Marks आणि Frederick Engels या दोघांनी संयुक्तपणे, एक तर्कशुद्ध विधान, 'The German Ideology' मध्ये आयडिओलॉजीच्या संदर्भात आढळते. "मानव निर्मित कल्पना, धारणा आणि त्याची सद्सद्विवेकबुद्धी ह्या तिन्हींनी मिळून Ideology तयार होते." या कल्पनांमध्ये, कायदा, राजकारणाची पद्धत, धर्म आणि नैतिक प्रामाण्य या तत्त्वांचा समावेश असतो. Marks आणि Angels म्हणतात, 'आयडिओलॉजी, सामाजिक मूल्यांची पायाभरणी करते; आणि महत्त्वाचे म्हणजे, एका विशिष्ट ऐतिहासिक टप्प्यावर, राज्यकर्त्यांच्या, राज्य करण्या संबंधी काय कल्पना आहेत हे सांगते "राज्यकर्त्यांच्या कल्पना ह्या भौतिक, प्रभावी संदर्भाहून फारशा वेगळ्या नसतात, ह्या भौतिक संदर्भातूनच कल्पनांचा अर्थ लागतो. आणि एक 'राज्यकर्त्यांच्या वर्ग' तयार होतो म्हणून त्यांच्या Ideology चे वर्चस्व त्यामध्ये असते. मूल्ये आणि श्रद्धा यांचा विकास, स्वतःला अनुकुल असा करुन, आयडिओलॉजी स्वतःला कायदेशीर करु शकते यासाठी त्या श्रद्धा आणि मुल्याचा सार्वत्रिक आणि स्वाभाविक पादुर्भाव झाला पाहिजे आणि तो प्रभाव स्वयंसिद्ध आणि निर्विवादपणे स्पष्ट असायला हवा असे एक Marxist, Terry, Eagleton म्हणतात.

John B Thompson यांची व्याख्या सर्वमान्य आहे असे मत Eagleton मांडतो. व्याख्या म्हणजे, "ज्या मार्गांनी, वर्चस्वाची कल्पना टिकून राहते, त्यांचा अभ्यास करणे म्हणजे Ideology. Louis Althusser, एक फ्रेंच मार्कीस्ट तत्वज्ञ, ठामपणे म्हणतो, मानवाना त्यांच्या अस्तित्वासाठी, स्वतःच्याच मागण्यांच्या प्रतिसादाना सुसज्य करण्यासाठी, लोकांची घडण होणे त्या घडणीचे परिवर्तन होणे यासाठी Ideology हा कोणत्याही समाजाचा अविभाज्य भाग आहे. वर्चस्व गाजवणारा वर्ग अथवा ज्याला 'राज्यकर्ता गट' ज्या कल्पना प्रिय मानतो त्या कल्पना म्हणजे Ideology असे मानण्याची स्वाभाविक प्रवृत्ती फक्त Marxist चीच आहे असे नाही तर इतर काही विद्वानांचाही तसाच दृष्टीकोन असतो. उदा. Karl Mannheim एक (मार्क्सेत्तर) बुद्धीमंत म्हणतो, Ideology म्हणजे जैसे थे! आहे तसे स्विकारा, हा राज्यकर्त्यांचा दृष्टीकोन.

इथे हे लक्षात घेतले पाहिजे कि, Ideology चा एकाच पद्धतीने उपयोग होतो असे नाही. सामाजिक राजकिय परिस्थिती लोकांची ध्येये आणि आकांक्षा यावर तिचा वापर निराळ्या प्रकारे होऊ शकतो. David Minar यांच्या मतानुसार Ideology ह्या संज्ञेचा वापर, सहा वेगवेगळ्या पद्धतीने केला जातो.

१) प्रमाणीभूत विषयांचे विशिष्ट प्रकारा बरोबर विशिष्ट कल्पनांचा संच
२) संचातर्गत कल्पनांची तर्कशुद्ध अंतर्गत रचना किंवा धोरण
३) मानवी सह संबंधातील ह्या कल्पनांचे स्थान किंवा भूमिका
४) संस्थेच्या बांधणीमध्ये या कल्पनांची भूमिका
५) ज्याचा उद्देश मन वळविणे असा आहे
६) सामाजिक सुसंवादाला शक्यतो केंद्रस्थानी ठेवणे

**आपली प्रगती तपासा :**

१) Ideology चा अर्थ स्पष्ट करुन त्यांच्या विविध व्याख्यांची चर्चा करा.
२) Ideology ची व्याख्या करा आणि तिची लक्षणे आणि उपयोगाचे विविध प्रकार यावर चर्चा करा.

## १३.३ राजकीय सिद्धांताच्या मूलभूत संकल्पना

राज्यशास्त्राच्या अभ्यासात 'राजकीय सिद्धांताच्या मूलभूत संकल्पनांना अत्यंत महत्त्वाच घटक' मानले जाते. अभ्यास करण्याने या राज्यशास्त्र शाखेच्या विद्यार्थ्याला समजून येते की, सत्ता ही कशा विविध स्थानी स्थित असते आणि ती वेगवेगळ्या राज्यघटनांमध्ये सत्ता कशी उपयोगात आणली जाते. सत्ता विभाजन आणि ते साधण्यासाठीची ध्येये, आयडीओलॉजीच्या गाभ्यात एकरुपतेने असलेल्या मूल्यात शोधण्यासाठी राज्यशास्त्राचा अभ्यास हे मार्गदर्शक साधन पुरवते.

Ideology ची व्याख्या मुख्यत्वे करुन, सरकार चे प्रकार, अर्थव्यवस्था, समाज रचना, या विषयांच्या संकल्पनांचा संच या भोवती फिरते, इथे हेही लक्षात घेतले पाहिजे की, प्रत्येक राजकीय सत्ता ही आपल्या राजकीय संकल्पनांचे आणि अस्तित्वाचे सातत्य जपण्यासाठी त्यांना (कल्पनांना) कायदेशीर स्वरुप देते. राजकीय आयडिओलॉजी ही एका अर्थी आकार विरहित किंवा विशिष्ट स्वरुप नसलेली संकल्पना आहे. लोकशाही मध्ये प्रत्येक राजकीय पक्ष उघडपणे एखाद्या विशिष्ट संकल्पानेचा अंगीकार करुन इतर राजकीय पक्षांशी स्पर्धा करतात. बहुआयामी लोकशाही मध्ये आपण अशा संकल्पनांचे साक्षीदार आहोत. अर्थात तो पक्ष त्या जाहीर केलेल्या (संकल्पनांना) किती घट्टपणे चिकटून राहतो हा प्रश्न वेगळा. या कारणास्तव लोकशाही सरकारी यंत्रणा असणाऱ्या राज्यांचे निरीक्षण करणाऱ्या निरीक्षकांना प्रत्यक्ष अनुभव आणि त्यांच्या संकल्पना यामध्ये तफावत जाणवते. राज्यशास्त्राच्या 'वर्तणूक दृष्टीकोन' या प्रकारच्या क्षेत्रात वरील गोष्टीचा अंतर्भाव होतो. राजकारण विषयक मूलभूत संकल्पना, प्रमुख तत्वे, त्यांची शिकवण व मते, लाक्षणिक चिन्हे, आणि अतार्तिक कथा, इ. सर्वांचा समावेश

राजकीय आयडिओलॉजी मध्ये, वर्गामध्ये किंवा संस्थेमध्ये होतो, ज्यामध्ये आपला भर प्रामुख्याने कल्पनांच्या समुच्चयाने बनणाऱ्या उपपत्तीकडे असावा.

एखादे राज्यकर्ते सरकार किती प्रमाणात राजकीय दृष्ट्या यशस्वी झाले आहे यांचे विश्लेषण करण्याचे प्रमुख साधन म्हणजे 'राजकिय आयडिओलॉजी'. लोकनियुक्त सरकार नसलेल्या जवळजवळ सर्व जुलुमशाही, राजे, हुकुमशाही, अल्पलोकसत्ता असलेल्या राजेशाह्या, सशस्त्र लष्करी राजकिय गट, आणि पक्षीय नोकरशहा, या सर्वांचे हितसंबंध जपणारी राजकिय संकल्पना Political Ideology पुरवते. एवढेच नव्हे तर त्यांना कायदेशीर करवते आणि त्यांची राजवट कायम करते. लोकसत्ताक राज्यपद्धती मध्ये मतदार संघांना राजकिय निवड करण्या संदर्भात माहिती पुरविते. या संदर्भात राजकिय आयडिओलॉजीच्या दोन बाजूंचा विचार करावा लागतो. उदा. उद्दिष्टे आणि ती उद्दिष्टे साकारण्यासाठी ज्या पद्धतीचा वापर केला असता ती उत्तम तऱ्हेने गाठता येतील ती पद्धती. प्रत्येक राज्यकर्ता, अगदी एखादा जुलमी राज्यकर्ता सुद्धा त्याच्या राज्याच्या हेतू, लोकहित किंवा राष्ट्रहित हे विशिष्ट ध्येय्य साध्य करणे हाच आहे, असे जाहीर करतो. त्याला अनुसरुन तो असे प्रतिपादत करतो की, त्याने अवलंबलेल्या साधनांनीच तो हेतू, ती अपेक्षित धेय्ये यशस्वीपणे गाठता येतील. लोकशाहीमध्ये सुद्धा असाच प्रयत्न राजकीय पक्ष करत असतात. कारण ध्येय्यप्राप्तीसाठी त्यांनी जे मार्ग, साधने जी अवलंबलेली असतात ती लोकशाहीच्या सर्व मानव समानता, विश्वासार्हता आणि राजकिय न्याय या तत्त्वांवर अधिष्ठित असतात.

जीवनातील सर्व महत्त्वाच्या अंगांशी राजकिय आयडिओलॉजी संबंधित आहे. त्याबरोबर मूळ गाभ्याचे विषय, जसे राजकिय संकल्पना, सरकारची रचना, अर्थव्यवस्था आणि सामाजिक बांधणी या सर्वांचा, धर्मविषयक, वंश, भाषा, शिक्षण, आरोग्य, कामगार कायदे गुन्हेगारी संबंधीचे कायदे, राष्ट्रीय सुरक्षितता, सामाजिक सुरक्षितता व्यापार उदीम, स्थलांतरितासाठीची योजना आणि परदेश विषयक धोरण इ. एकमेकांशी अर्थपूर्णतेने जोडलेले आहेत. त्या संदर्भात राज्यकर्त्यांनी घेतलेली, विशेषतः राजकिय पक्षांनी याबाबत घेतलेली भूमिका ही, त्याच्या धोरणात्मक राजकीय संकल्पनेच्या डावपेचाचा भाग असतो. राजकीय संकल्पना आणि राजकीय धोरणांच्या समजूतीबद्दल गैरसमज, गोंधळ करुन घेऊ नये. वेळोवळी कधी मतपेटीच्या लाभासाठी राजकीय पक्ष वैयक्तिक बाबीही पूढे करतात. सामान्य माणसांच्या लोकप्रिय भाव भावनांना, प्रसंगी पुष्टी देऊन त्यांना प्रायोजन देतात. जरी त्या राजकीय पक्षाची लोकशाहीच्या मूलभूत गाभ्याशी बांधिलकी असली तरी निवडणूकांच्या फायद्यासाठी अशा गोष्टी घडतात. त्याची व्याख्या आपण राजकीय संकल्पना अशी न करता (populism) लोकमान्यता / लोकप्रिय संकल्पना अशी करु या.

राजकीय पक्षाचे वर्गीकरण हे त्यांच्या राजकीय धोरणा ऐवजी अर्थविषयक पद्धतींच्या धोरणांवरुन ठरते. हे विस्मयकारक आहे. सर्वात लोकप्रिय असलेली वर्गीकरणाची पद्धति म्हणजे, त्याना 'डावे' 'उजवे' 'मध्य' मध्याच्या डावीकडे आणि मध्याच्या उजवीकडे इ. विविध मतांचा विस्तार असलेल्या या राजकीय पटलामध्ये, डावे म्हणजे साम्यवादी आणि समाजवादी, 'मध्य' प्रणाली, आर्थिक संकल्पना, ज्यामध्ये समाजवादी विचारसरणी आणि मुक्त व्यापारपेठ यांचे एकीकरण असते. तर उजव्या प्रणाली, भांडवलशाही आणि मुक्त बाजारपेठ यांचा पुरस्कार करते. हे निर्विवाद आहे की, मध्याच्या डावीकडील राजकीय पक्षांचा संमिश्र अर्थ व्यवस्थेवर विश्वास असतो पण नियमानुसार त्यांचा कल समजवादी व्यवस्थेकडेच असतो. जसेच मध्याच्या

उजवीकडील राजकीय पक्ष, जरी संमिश्र अर्थव्यवस्थेचे प्रायोजक असले तरी त्यांचा कल मुक्त बाजार व्यवस्थेकडेच असतो.

राज्यशास्त्राच्या व्याख्येनुसार, राजकीय पक्ष एक किंवा एकापेक्षा जास्त राजकीय पद्धतीचा मार्ग अनुसरतात. ज्या खालील नावांनी ओळखल्या जातात.

१) Absolutism - निरंकूश - अमर्याद सत्ता असणे अशी ओळखली जाते.
२) Anarchism - बेबंदशाही (कायदा, पोलिस, सरकारी व्यवस्थेचा अशी पद्धती जि स्वतः सर्व करते अभाव असणे)
३) Aristocracy - अमीर उमराव, बड्या लोकांचे राज्य.
४) Autocracy - निरंकूश सत्ता, एका व्यक्तिची अमर्याद सत्ता एकाधिकारशाही.
५) Consrvatism - जसे आहे तसे सामाजिक आणि अर्थव्यवस्थेमध्ये सरकारचा कमीत कमी हस्तक्षेप.
६) Democracy - लोकांचे सरकार जे निवडलेल्या उमेदवारांमार्फत कार्यवाहित होते.
७) Dictatorship - हुकुमशाही एकाच माणसाच्या हाती सर्व सत्ता एकवटलेली असणे.
८) Fascism - धर्म, वंश, जात विषयक अमानुष माणसांचे बहुमत, ज्यायोगे ते कामगार व अल्पसंख्यांकांना गुलाम बनवतात.
९) Monarchy - राज सत्ता, किंवा राणीची सत्ता, जिथे अनुवांशिकतेने सत्तांतर होते.
१०) Oligarchi - श्रीमंत माणसांच्या गटाचे सरकार जे सर्व सत्तेचे मक्तेदार बनतात.
११) Theocracy - ईश्वरसत्ताक सर्व सत्ता, देशात ज्या धर्माचे वर्चस्व असेल त्या धर्माच्या, धर्मगरुच्याकडे सत्ता असते.

अशा तऱ्हेने वेगवेगळ्या संकल्पनांच्या आधारे वेगवेगळ्या तऱ्हेने राज्य, सरकार कार्यवाही करते.

समकालीन (सध्य, चालू) आजच्या एक धृव्वीय जगात U.S.A. ने आपल्या लष्करी सामर्थ्यांचे प्रदर्शन आणि वापर ज्या निर्लज्ज तेने सर्वत्र चालवला आहे. त्यावरुन दोन चार विचारवंतांनी आयडिओलॉजीचा अंत घोषित करताना U.S.A. प्रचलित वर्चस्वाचा उदारमतवादी लोकशाहीचा आणि मुलतः अर्थ व्यवस्थेचा अंतिम विजय, मानायला सुरुवात केली आहे.

मूळचा जपानि असलेला अमेरिकन समाज शास्त्रज्ञ Francis Fukuyama वरील विचारसरणीचा अत्यंत लोकप्रिय प्रतिनिधी आहे. इथे हेही लक्षात ठेवले पाहिजे की, वैचारिक विजयावर आनंदोत्सव करण्याची प्रवृत्ती नवीन नाही. पहिल्या महायुद्धानंतर, पंधरा वर्षांनी ब्रिटीश विचारवंत Daniel Bell याने अशीच प्रतिक्रिया The End of Ideology ह्या त्याच्या पुस्तकात व्यक्त केली आहे. तो प्रतिपादन करतो असे करतो की, १९ व्या शतकातील दोन प्रबळ संकल्पना म्हणजे समाजवाद आणि भांडवलवाद. त्या दोन्ही संकल्पना युद्धानंतरच्या जगासाठी संदर्भहिन आहेत कारण कल्याणकारी राज्य या संकल्पनेने या दोन्ही वादांमधील उत्तम तत्वांचा (जे एकमेकांच्या आर्थिक धोरणाबद्दल विरोधी होते) अंगिकार, नवीन जगाने केला आहे. परंतू नंतरच्या घडामोडींनी त्याला (त्याच्या विचार सरणीला) चूक ठरविले. तसेच Fukuyama जागतिकीकरणाचे कळकळीचे, मनोवेधक समर्थन त्यांच्या End of History and The Last Man या पुस्तकात आहे, जे फार अल्पजीवी ठरले. मुसलमान धर्माचे वर्चस्व

असणाऱ्या देशातील मुलतत्ववाद (Fundamentalism) उदय, आर्थिक महासत्ता म्हणून चीन जो बाह्यात्कारी 'Communist Political System' आणि Nondemocratic लोकशाही नसलेले राष्ट्र म्हणून उभा ठाकला आहे. तर USA मध्ये आणि काही पश्चिमी देशात आर्थिक मंदीचे वातावरण आहे. वरील ३/४ उदाहरणातून असे दिसते कि, Fukuyama ने उभा केलेला आवेशपूर्ण आशावाद, जो उदारमतवादी लोकसत्तेचा आणि मुक्त बाजार व्यवस्थेच्या विजयाची तरफदारी करतो, तो चुकीचा ठरला आहे. सुरुवातीपासूनच, राजकीय आणि आर्थिक संकल्पनांच्या सिद्धांतांचे सातत्य भेसूर अनिश्चितेने अधोरेखित केलेले आहे.

**आपली प्रगती तपासा :**

१) आयडिओलॉजी व्याख्या करा.
२) राजकिय आयडिओलॉजीच्या सिद्धांतावर (समकालीन धृव्वीय जगातील) चर्चा करा.

## १३.४ उदारमतवाद

डेमॉक्रॅसी, अर्थात लोकशाहीच्या संदर्भात उदारमतवाद हे राजकिय तत्व फार प्रसिद्ध आहे, ह्या कल्पनाशास्त्राची (आयडिओलॉजीचा) घडण किंवा घाटणी फार सुघट्ट किंवा बांधील नाही, जिच्या तुलनेने, समाजवाद, साम्यवाद किंवा फॅसीझम च्या तत्व रचनेमध्ये आहे. उदारमतवादाच्या अनेक कल्पना, जसे समता आणि स्वातंत्र्य यांच्या संकल्पना मध्ये, मत वैचित्र ग्रंथामध्ये आढळे जे उदारमतवादी विचारवंतांच्या दृष्टीकोनातून त्यांचे जगाकडे पाहण्याचे संकेत आहेत, हे सर्व एका मोठ्या विषयांतर्गत येणाऱ्या बाबी आहेत. मूळ लॅटीन शब्द Liber म्हणजे Free अशा तऱ्हेने लोकसत्ता असलेले राज्य Liberalism अशी सज्ञा घडली गेली, जिमध्ये लोकांना विविधप्रकारचे स्वातंत्र्य उपभोगता येतेच याशिवाय ते राजकीय आणि सामाजिक दृष्ट्या समान दर्जाचे असतात. उदारमतवाद हा प्रामुख्याने पश्चिमी उदार लोकशाहीशी कायमचा जोडलेला आहे. जो मुक्त बाजारपेठ अर्थव्यवस्था किंवा मर्यादित स्वरुपाचा, माफक सरकारी निर्बंधाना अनुकूलता दर्शवतो. तसेच घटनात्मकता, मुक्त आणि न्याय्य निवडणुका, धार्मिक स्वातंत्र्य आणि मानवी हक्कांचे संरक्षण इ. गोष्टींची हमी देतो.

युरोपात झालेल्या मन्वंतराचा (वैचारिक पुनरुज्जीवन) आणि त्याच्या परिणामांच्या कालखंडाचा म्हणजे (Age of enlightenment) सुसंस्कृतिने (अज्ञान नाशक सुसंस्कृति) तोपर्यंत मानवी जीवनात अस्तित्वात असलेल्या अगम्य, अतार्तिक अध्यात्मवादी बाबींवर प्रभाव टाकून त्यांना दूर केले होते. त्यानंतरच उदारमतवादाचा एक राजकीय संकल्पना म्हणून उदय झाला. उदाहरणार्थ The Devine Origin Theory जिच्यामुळे निरंकुश राजेशाहीला

समर्थन देण्याचे, राजकीय सामर्थ्य मिळाले होते. ज्यामुळे 'निरंकुश राजेशाही' म्हणजेच 'कायदेशीर सरकार पद्धती' या विचारसरणीला John Locke या उदारमतवाद विचारवंताने, सर्व प्रथम आपल्या लेखनात 'दुषणे' दिली, ज्याला 'उदारमतवादाचा जनक' असे योग्य नामाभिधान दिले गेले. John ने आपल्या Theory of Social Contract या पुस्तकात महत्त्वाची उदारमतवादी तत्वे विशद केली आहेत. उदा. लोकांचे नैसर्गिक हक्क, जीवीताचे हक्क, स्वातंत्र्य आणि मालमत्ते संबंधी हक्क, कायद्याचे राज्य आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे लोकांच्या Consent ने म्हणजे परवानगीने (मतदानाने) अधिकारावर आलेले सरकार. फ्रेंच राज्यक्रांती आणि अमेरिकेचे स्वातंत्र्य युद्ध यांच्या मागील प्रेरक तत्वे उदारमतवादामध्ये प्रामुख्याने आढळतात. ज्यांच्या प्रेरणेमुळे अन्यायी आणि जुलमी राजसत्तांचा पाडाव करण्यात क्रांतीकारक यशस्वी झाले. युरोप आणि अमेरिकेतील अनेक राज्यांनी, १९ व्या शतकात उदारमतवादाचा अंगिकार केला. तरी साम्यवाद आणि fascism यांनी दिलेल्या आव्हांनाना उदारमतवादाला, १९ आणि २० व्या शतकात तोंड द्यावे लागले. तरीही या जोरदार हल्याला उदारमतवादाने यशस्वीपणे सामोरे जात आपले अस्तित्व अबाधित ठेवले त्याचा परिणाम म्हणून आजच्या जगात उदारमतवादाचे बऱ्याच देशात प्राबल्य आहे.

### १३.४.१ उदारमतवादाच्या केंद्रिय संकल्पना :

सतराव्या शकतात उदयास आलेल्या आधुनिक राजकिय कल्पनांच्या उगम पुरातन ग्रीक त्वात्विक आणि बौद्धिक परंपरांमध्ये आढळतो. उदारमतवादातील अत्यावश्यक कल्पना, जसे, मानवाचा समतेचा अधिकार, आपले मत व्यक्त करण्याच्या अधिकार आणि नागरिकांना असलेले स्वातंत्र्य इ. गोष्टींनी, तेव्हापासूनच जगभरातल्या विचारवंतांनी आणि विद्याशाखांमधील विद्वानांनी प्रभावित करुन त्यांनी त्याबद्दल वैचारिक उहापोह, चर्चा केल्या आहेत. त्यातून पुढे विविध संकल्पना, प्रसंगी एकमेकांशी विरोधी भासतील अशा संकल्पनांचे संकलन होऊन उदारमतवादाची तत्वे तयार झाली. विविध संकल्पननांच्या रचनांना व्याख्यारुप देणे हे फारच अवघड, चिकित्सक काम आहे. म्हणूनच विविध आणि एकमेकांशी विसंगत विचार प्रवाह उदारमतवादाचा भाग आहेत हे आश्चर्यजनक नाही.

जरी उदारमतवादामध्ये विविध आणि विसंगत विचारसरणीचे एकत्रीकरण झाले आहे तरी मूलभूत, गाभ्यातील काही संकल्पना उदारमतवाद असणे अत्यावश्यक आहे. सर्वदूर असा समज आहे कि, उदारमतवाद म्हणजे एक तत्वज्ञान जे मानवता आणि समाज यांचा अर्थ सांगते. प्रसिद्ध राजकिय विचारवंत John Gray, यांच्या मते, व्यक्तिवाद, सर्वमानव समान आहेत असे मानणारा विचारप्रवाह (egalitarianism), आणि विश्वजनहितवाद हे उदारमतवादाचे महत्त्वाचे अंग किंवा भाग आहेत. व्यक्तिची प्रतिष्ठा आणि व्यक्तिची योग्यता, कोणत्याही सामाजिक दबावामुळे कमी लेखलि जाणार नाही याबाबत व्यक्तिवाद ठाम आहे. सामाजिक स्थान, राजकीय दृष्टीकोन आणि आर्थिक स्तर यांच्या त्याच्या व्यक्तिगत स्वातंत्र्यावर परिणाम होणार नाही. लोकशाहीतील सर्व अधिकार त्याला मिळतील. Egalitarianism हे तर उदारमतवादाचे (ह्रदयस्थानी) सर्वात महत्त्वाचे तत्व आहे. सामाजिक आणि राजकीय समानतेचा अभाव असलेल्या उदारमतवादी लोकशाहीची आपण कल्पनाच करु शकत नाही. तरीही हे समजून घेतले पाहिजे कि, बरेच उदारमतवादी विचारवंत आर्थिक धोरणांबाबत सर्व मानव समान ह्या तत्वावर जोर देत नाहीत. त्यांच्यामते ते तत्व व्यक्तिच्या वैयक्तिक स्वातंत्र्याच्या विरोधात जाते. अर्थात सर्व उदारमतवादी विचारवंताना असे वाटत नाही. त्यांच्यातील काही जण विकसनशील राष्ट्रे किंवा मागास राष्ट्रे यांच्या समस्यांना सामोरे जाताना, आर्थिक समते ऐवजी आर्थिक

न्यायांचा पुरस्कार करतात. सर्व मानव समान आहेत या egalitarian तत्वाच्या आधारावर खऱ्या समाज बांधणी करण्यासाठी या मूलभूत तत्वाच्या आड येणाऱ्या सर्व गोष्टींचे महत्त्व कमी केले आहे. उदा. वंश, धर्म, भाषा, भारतामध्ये विविध जाती, आणि लिंगभेद धार्मिक प्राबल्य कमी करण्यामुळे धर्मनिरपेक्ष समाज प्रस्थापित होण्यास मदत होते. असे राजतंत्र, राज्यघटना हे उदारमतवादाचे अत्यंत उत्तम उदाहरण होय. सार्वत्रिक प्रौढ मतदान हे याच राजकीय egalitarian तत्वाची महती सांगते. तसेच मतदान प्रक्रिया ही पारदर्शक असायला हवी, ज्यामुळे विविध मतांचे, प्रतिनिधीत्व करणारे विविध पक्ष मोकळ्या वातावरणात मतदानाच्या प्रक्रियेमध्ये सहभागी होतील.

उद्‌बोधन युगाच्या या तीन प्रसिद्ध विचारवंतांनी Thomas Hobbs, John Locke and Jen Jacques Roussequ, राजकीय उदारमतवादाचा पाया घातला. उदारमतवादासाठी पहिल्या दोघांचे दृष्टीकोन जास्त महत्त्वपूर्ण आहेत, जरी त्यांची सामाजिक करारा संबंधी परिकल्पना एकमेकांपेक्षा वेगळ्या आहेत. त्यानी अनेक सामाजिक राजकीय मुद्दे धर्माच्या पकडीतून सोडविले आणि त्यावर सर्वधर्मसमभाव किंवा धर्मनिरपेक्ष विचारसरणी ठेऊन चर्चा करण्यासाठी मदतच केली. 'सामाजिक करार' या Hobbs चा सिद्धांत सामाजिक, सत्तेचे मुळ आणि मर्यादा सांगताना राजकीय प्राधिकाराचा अस्तित्वाचे समर्थन करतो. परंतू Hobbs हा पक्का उदारमतवादी नव्हता. कारण 'निरंकुश राजेशाही' असलेले सरकार आदर्श असते असे त्याचे मत होते. John Locke याचे 'ब्रिटिश उदारमतवादी विचारवंतांमध्ये 'संस्थापकिय महत्त्व' कायम आहे. त्याने जीवनाचा (जगण्याचा) हक्क, स्वातंत्र्य आणि मालमत्तेचा हक्क यांचा आग्रह धरुन कोणतीही राजकीय सत्ता या नैसर्गिक हक्कांना जनतेपासून कोणत्याही परिस्थितीतून हिरावून घेऊ शकत नाही असे हिरारीने प्रतिपादन केले. तसेच राजकीय प्राधिकारांच्या कार्यवाहीवर लोकांनी नियंत्रण ठेवण्याच्या लोकांच्या हक्कांचे तो अधोरेखन करतो म्हणजे महत्त्व सांगतो. तसेच भ्रष्ट अधिकाऱ्यांना काढून टाकण्याच्या त्यांना हक्क आहे असे सांगतो. त्यांचा सिद्धांत हा नैसर्गिक हक्कांना शाबूत ठेवण्याच्या तत्वावर आधारित होता. कायद्याचे राज्य हे त्याच्या उदारमतवादी सिद्धांताच्या गाभा होता. Locke च्या या 'जबाबदार राजकीय प्राधिकार' या विचाराच्या आग्रहामुळे 'मर्यादित सरकार' ह्या संकल्पनेचा विकास होण्यास मदत झाली, जी संकल्पना १९ व्या शतकाच्या अखेरपर्यंत उदारमतवादी विचारवंतांनी उचलून धरली.

१७ ते १९ व्या शतकाच्या कालखंडात, उदारमतवादाचे स्पष्टीकरण करण्यात अग्रेसर असलेल्या देशांमधील, विशेषतः इंग्लंड मधील, दोन विचारवंतांनी मांडलेले सिद्धांत उदारमतवादाच्या इतिहासात 'स्मारकिय महत्त्वाचे' आहेत. Adam Smith ह्याचे लिखाण, औद्योगकिरणाच्या सुरुवातीच्या टप्प्यातले आहे. निरंकूश अर्थव्यवस्थेचा पुरस्कार करताना तो अर्थव्यवस्थेवर सरकारचा कमीत कमी हस्तक्षेप असावा असे म्हणतो. व्यापार उद्योगाच्या सर्व बाबी सरकारी हस्तक्षेपातून पूर्णपणे मूक्त असाव्यात असे तो कळकळीचे आवाहन करतो. John Stuart Mill हा मूळचा 'उपयुक्ततावादी' सिद्धांताच्या विचारसरणीचा होता. परंतू १८८९ मध्ये त्याने लिहिलेल्या On Liberty या विशेष लेखाच्या प्रसिद्ध होण्याने तो सर्वात मोठा 'उदारमतवादी' विचारवंत गणला गेला. उदारमतवादाचे सर्वात महत्त्वाचे तत्व 'स्वातंत्र्य Liberty ज्यावर लिहिताना तो म्हणतो "आमचे कल्याण, आमच्या मार्गाने, पद्धतीने" हेच त्या स्वातंत्र्याला तो नाव देतो. अशा तऱ्हेने Laissez-Faire - मुक्त व्यापार आणि Mill चा 'उदारमतवाद' या दोन्हींच्या संयोगाने भांडवलवाद रुजण्यास चांगलीच सुरुवात झाली. वीसाव्या

शतकाच्या सुरुवातीला Friedrick Hayek हा वरील उदारमती विचार पद्धतीचा प्रमुख व्याख्याता होता. त्याचे पुस्तक 'The Road to Serfdom' १९४४ मध्ये प्रसिद्ध झाले. Hayek म्हणतो, मुक्त बाजारपेठांच्या निर्मितीमुळे एकपक्षीय सरकार उदयास येण्यास प्रतिबंध बसेल. अर्थात उदारमतवादाची ही बाजू नकारात्मक आहे. एकोणीसाव्या शतकाच्या अखेरीस, ब्रिटीश विचारवंत Thomas Hill Green याच्या 'उदारमतवादातील सकारात्मक भूमिका प्रस्थापित करताना त्याने मूळची नकारात्मकता खोडून काढली. त्याच्या म्हणण्यानुसार, व्यक्ति ही नेहमीच स्वतःच्या हितरक्षणार्थ जागरुक असते. तो मानवाच्या व्यक्तिमत्वाच्या नैतिक स्वरुपावरही भर देतो. त्याने समाजाला आणि सरकारला 'मानवी स्वातंत्र्य आणि मानवी प्रतिष्ठा' जोपसण्यासाठी भरपूर वाव ठेवला आहे. Green च्या ह्या दृष्टीकोनाने आधुनिक उदारमतवाद प्रभावित झालेला आहे.

बहुतेक उदारमतवाद्यांचा असा विश्वास होता कि, सरकारी यंत्रणेवर असलेल्या निर्बधामुळे लोकांना आपोआपच अधिक स्वातंत्र्य मिळेल. या अनुषंगाने Baron आणि Montesquiee यांनी सत्तांचे विभाजन हा सिद्धांत पुढे मोडला. सरकारच्या ३ सत्ता विभागांचे विभाजन, जसे सरकारी विधीमंडळ, कार्यकारी मंडळ आणि न्याय मंडळ. या योजनेमुळे एखाद्या सरकारला एक पक्षीय हुकुमशाही सरकार बनण्याला आपोआप अडथळा येईल. सामाजिक उदारमतवादाच्या आग्रही प्रतिपादकांचा 'मर्यादित संविधानात्मक सरकार' या संकल्पनेवर निश्चित विश्वास आहे. जे सरकार समाजातील सर्व लोकांचे 'समान हक्कांचे' संरक्षण करते. आधुनिक उदारमतवाद, ज्याला वारंवार सामाजिक उदारमतवाद असे संबोधिले जाते, त्यांच्या शिफारसीनुसार सरकारला, अधिक व्यापक आणि परिणामकारक भूमिका घेणे गरजेचे आहे. व्यक्तिला मिळणारे वैय्यक्तिक संविधानीक हक्कांचे आश्वासन हे आर्थिक आणि भौतिक फायद्यांच्या अभावामुळे निव्वळ शब्दकोडे (शाब्दिक आश्वासन) ठरणार आहे. आधुनिक उदारमतवादी संकल्पना ही मुक्त लोकशाहीशी ठामपणे जोडलेली आहे. पण त्याचवेळी 'बहुमत वाल्यांनी केलेली जुलुमशाही' असे परस्पर विरोधी स्वरुप होईल असे Mills चे प्रतिपादन आहे.

समता आणि स्वातंत्र्य या संकल्पना नेहमीच उदारमतवादाच्या केंद्रिय स्थानी आहेत. परंतु अनेक विचारवंतांनी त्यामध्ये सहिष्णुता, बहुलतत्व इ. सारख्या कल्पना मुख्य तत्वात घातल्या आहेत. विचारवंत जसे Smith, Mills आणि Hayek हे आर्थिक व्यवहारांना 'मुक्त बाजारपेठ व्यवस्थे' मध्ये अत्यूच्य महत्त्व सुचवतात. तर सामाजिक उदारमतवादी, जसे Voltaire सारखे हे स्वातंत्र्याच्या पेक्षा जास्त महत्त्व समानतेला देतात. त्याच्यामते हे "एकाच वेळी अत्यंत नैसर्गिक पण असंभाव्य गोष्ट आहे" जेव्हा एखादे सरकार 'सर्व मानव समान' हे मार्गदर्शक तत्व अंगिकारते तेव्हा ते नक्कीच व्यक्तीच्या स्वातंत्र्याच्या संकोच करते हे मत चुकीचा समज पसरवणारे आहे. वास्तविक दोन्ही संकल्पना एकमेकींना पुरक आहेत, आणि एकीच्या गैरहजेरीत उदारमतवाद म्हणजे फक्त 'शाब्दिक खेळ' होतो. लोकांचे स्वातंत्र्य, समानतेच्या हमी सकट जी राज्यघटना देते ती खरी 'उदारमतवादी' या संकल्पनेवर खरी उतरते. या संदर्भात John Rawls सामाजिक विषयक संकल्पनाना व्यापक महत्त्व आहे असे मानतो. Rawls च्या संकल्पनेने, समता आणि स्वातंत्र्य या तत्वांची अत्यंत हुषारीने, प्रयत्नपुर्वक सांगड घातली आहे कि, 'सामाजिक न्याय' ही संकल्पना खरी ठरते. यामध्ये दोन कल्पनांचा समावेश आहे. पहिली संकल्पना प्रत्येक व्यक्तिचा मूलभूत स्वातंत्र्याच्या अधिकाराचा दावा करते, जो समाजातील प्रत्येक व्यक्तिला आहे. दुसरी संकल्पना, सामाजिक आणि आर्थिक

असमानतेचे समाधान सांगणाऱ्या २ अटी सांगते. या अटी व्यवस्थापन आणि त्यातील पदांना लागू करावयात

१) ही पदे सर्व निम्न स्तरीय, लोकांसाठी खुली असावीत, त्यामध्ये न्याय्य, योग्य समान संधी सर्वांना असावी.
२) समाजातील सर्वात कमी लाभ असणाऱ्या सभासदांना ही जास्तीत जास्त फायदा देणारी असावीत.

Rawls चा असा विश्वास होता कि वैधानिक लोकशाहीमध्ये, 'सामाजिक न्यायाची' त्याची संकल्पना खऱ्या अर्थाने कार्यविहित होईल जिथे सरकारचे उद्योगांवर नियंत्रण असेल. विसाव्या शतकातला तो सर्वात थोर उदारमतवादी विचारवंत गणला जातो.

तिनशे वर्षाच्या इतिहासात अनेक बुद्धीमंत, विचारवंतांची प्रशंसा आणि तीव्र नापसंती दोन्ही आपापल्या विचारसरणीच्या हटाग्रहाने 'उदारमत प्रणाली' ने अनुभवली आहे. उदारमतवादी विद्वानांचा एक गट 'स्त्रीवादी' प्रणालीला चिथावणी देतो तर दुसऱ्या गटाच्या मते, लोकशाहीवादी उदारमतवाद 'स्त्रीवादी' संकल्पनांना प्रत्यक्षात आणण्यास, परिणामकारक पावले उचलण्यास मदत करत नाही. Edmund Bruke ज्याने फ्रेंच राज्यक्रांतीची मूलभूत तत्वे 'स्वातंत्र्य, समता आणि तर्कशुद्धता यांना विरोध केला होता, पण त्याच तत्वानी रुढीवादी सरकारचे समर्थन केले होते.' रुढी परंपरावादी विचारसरणीचे लोक, समता आणि स्वातंत्र्य या तत्वांना विरोध करताना म्हणतात की, लोकांची आर्थिक प्रगती आणि समता या समाजाच्या परंपरागत रुढीच्या विरोधात जातात. उत्तम श्रेणीच्या साम्यवादाचे समर्थक, उदारमतवादी सरकारचा विरोध करताना आपले मत मांडतात की, उदारमतवाद हा शेवटी भांडवलवादालाच जो कामगारांचे शोषण करतो त्यालाच मदत करतो. वीसाव्या शतकातील सामाजिक लोकशाही भांडवलशाहीचे स्पष्ट दोष कमजोर करण्याचा प्रयत्न, लोकप्रिय सुधारणा करुन करत आहे. तसेच लोकप्रियतेच्या आधारे आर्थिक सामाजिक सुधारणा करण्यास महत्त्व देऊन सरकारी संस्थांना भाग पाडते. सध्या बऱ्याच लोकसत्ताक सरकारांनी सामाजिक लोकशाही ध्येयाशी बांधीलकी मानली आहे.

**आपली प्रगती तपासा :**

१) उदारमतवादावर एक निबंध लिहा.
२) उदारमतवादाचा मूलभूत संकल्पनांचे टीकात्मक परीक्षण करा.

## १३.५ नवउदारमतवाद

सामाजिक उदारमतवाद किंवा सामाजिक लोकशाहीच्या संकल्पनांच्या अगदी विरोधात नवउदारमतवाद आहे, जो अत्यंत कळकळीने आर्थिक उदारमतवादाचे मुक्त व्यवसाय आणि मोकळ्या बाजारपेठेचे समर्थन करतो. उदारमतवादी राजनितीच्या माध्यमातून, आर्थिक बाबींवर लक्ष केंद्रित करुन, संपूर्ण अर्थक्षेत्राचे खाजगीकरण करण्यासाठी, सरकारचे नियंत्रक कायदे रद्द करण्याबाबतच्या विचारांचा प्रसार करणे हे ह्या 'नवउदारमतवादाचे' धोरण आहे. सरकार नियंत्रित अर्थव्यवस्थेला विरोध करण्यात, मुक्त बाजारपेठेचे व्याख्याते नेहमीच पुढे होते. भांडवलवादाची संकल्पना, अत्यंत्य प्रभावी असा नवउदारमतवादाच्या संकल्पनांखाली विकसित करत असत. १९८० मध्ये USSR चे जेव्हा आर्थिक आणि राजकिय पतन झाले, तेव्हापासून 'neoliberalism' नवउदारमतवाद हा शब्द राजकिय आणि अर्थशास्त्र विषयक साहित्यात केवळ 'शब्दकोषीय शब्द' म्हणून राहिला. हा Neoliberalism हा शब्द Alexander Rustow या जर्मन विचारवंतांने १९३८ मध्ये प्रथम वापरात आणला. या नवउदारमतवादाची व्याख्या करताना तो म्हणतो, 'अग्रक्रमाने किंमतीचे नियंत्रण, मुक्त व्यवसाय, स्पर्धात्मक पद्धत, आणि बळकट निपक्षपाती सरकार' शिकागो येथील 'शिकागो अर्थशास्त्राच्या विद्यालयाच्या संप्रदायाने 'नवउदारमतवाद' ही संकल्पना लोकप्रिय केली. आणि नंतर ती पश्चिमी युरोपीय राष्ट्रे आणि U.S. सरकारांनी आत्मसात केली. इतकेच नव्हे त्या मार्फत त्यांनी अविकसित आणि दयनीय देशांमध्ये आपली निर्लज्य अर्थशास्त्रीय योजना, आणि सैनिकी बळ वापरुन त्यामध्ये हस्तक्षेप केला. अशा तऱ्हेने, आर्थिक जागतीकरणाच्या पहिल्या टप्प्यावर अतिउत्साही व्याख्यांत्याच्या कल्पनांचा जोर, 'नवउदारमतवादावर होता' हे सिद्ध होते.

आर्थिक धोरणावर नियंत्रण नको; तर सामाजिक कल्याणकारी योजनांचा फाटा, सर्व गोष्टींवर दिले जाणारे अर्थ सहाय्य उदा. आरोग्य, शिक्षण आणि निवारा (housing) यावर बंदी घालावी. प्रगतीशील कामगार कायदेही रद्द व्हावेत इ. मर्यादित भूमिका (जी सर्वसामान्य जनतेच्या पूर्ण विरोधी होती) नवउदारमतवादी विचारवंतांनी ठोसपणे सरकारांपुढे केली.

David Harvey हा आपापल्या A Brief History of Neoliberalism मध्ये लिहितो "सर्वप्रथम ही एक अशी राजकीय आर्थिक पद्धत आहे ज्यामध्ये मानवाचे कोटकल्याण होण्यासाठी, व्यक्तिगत, मुक्त औद्योगिक स्वातंत्र्य, आणि संस्थात्मक बांधणीमध्ये, खाजगी मालमत्तेचे मजबूत हक्क, मुक्त बाजारपेठा आणि खूला व्यापार या संकल्पना अभिप्रेत आहेत." "सरकारची भूमिका, सर्व तऱ्हेची हमी देणाऱ्याची असावी. उदा. 'वित्ता'ची 'धनाची' सचोटी आणि विशेष दर्जा राखणे. सरकारने सैनिकि, संरक्षक, पोलिस आणि कायदा या सुव्यवस्थांचे कार्य करणाऱ्या संघटना ठेवल्या पाहिजेत.यांनी खाजगी मालमत्तांचे हक्क सुरक्षित राहतील याची खात्री दिली पाहिजे, गरज पडल्यास त्यासाठी सैनिकी बळ वापरले पाहिजे; जेणे करुन व्यापार उदीमाचे काम व्यवस्थित चालेल. इथे हे लक्षात घेतले पाहिजे की, नवउदारमतवाद, मुक्त बाजारपेठांसाठी सरकारने काय केले पाहिजे हे आधीच सांगत आहे. त्यासाठी सैनिकी पोलिस संरक्षण त्यांना हवे आहे त्यांचे सर्व भौतिक हितसंबंध जपण्यासाठी त्यांना सरकारी यंत्रणा राबवायला हवी आहे. पण समाजकल्याणासाठी कोणत्याही प्रकल्प योजनांना ते परवानगी देत नाहीत. समाजातील गोरगरीबांच्या upliftment (विकासासाठी) काहीही करण्याची त्यांची तयारी नाही."

Fredrich Hayek जो नवउदारमतवादाचा प्रमुख समर्थनकार होता, तो कायदा आणि सुव्यवस्थेचे अस्तित्व, उदारमतवादी लोकशाही मध्ये आवश्यक मानतो. अर्थात हे उघड आहे की जिथे राज्यात कायदा आणि सुव्यवस्था असेल तिथेच भांडवलशाही वर्गाची खाजगी मालमत्ता सुरक्षित राहू शकली. ज्याच्याकडे मालमत्ताच नाही त्यांना असा संरक्षक यंत्रणेची गरजही नाही. Hayek ने मात्र धूर्तपणे परंपरांच्या आड कायद्याला लपवले आहे. तो परंपरांना कायद्याचे लेबल लावतो आणि त्या परंपरांचे पालन करणे म्हणजेच कायद्याचे पालन असे तो म्हणतो. म्हणूनच हे आश्चर्यकारक नाही कि, Hayek हा मर्यादित सरकार या संकल्पनेचा समर्थक आहे. तो अतिशय ठामपणे 'दमन करणारी ताकत' सरकारकडे असायला हवी हे सांगतो. फसवणूक आणि अप्रामाणिकपणा जो मोठ्या उद्योगगृहांना (घराण्यांना / कंपन्यांना) हानिकारक ठरेल त्यांना कठोर कायद्याने ताब्यात ठेवले पाहिजे. Hayek 'कायद्यापुढे सर्व समान' या तत्वाला पाठिंबा देतो कारण उघड आहे. सत्तेवरील सुशिक्षीत आणि समाजाचे कंगाल निराश्रीत सभासद यांना एकाच मापदंडाने न्याय मिळेल. कायद्याचे संरक्षणचे सुशिक्षित राज्यकर्त्यांना मालमत्ता धारकांना आहे आणि सामान्यांना नाही त्याबद्दल तो साळसूदपणे गप्प बसतो. तो वैयक्तिक स्वातंत्र्याचा खंदा समर्थक आहे आणि असे म्हणतो कि, प्रत्येक व्यक्ति ही आपल्या कृतीला जबाबदार आहे. Hayek च्या अशा सूचक वक्तव्यामुळे काही नवउदारमतवादी भाष्यकर्ते असाही विश्वास ठेवतात कि, जो आपखुषीने गुलामगिरी पत्करतो, त्या गुलामगिरीला अवैध किंवा बेकायदेशीर म्हणता येणार नाही.

दूसरा प्रमूख नवमतवादी विचारवंत Milton Friedman त्याच्या प्रसिद्ध (कामात) पुस्तकात Capitalism and Freedom म्हणतो, सरकारी निर्बंध असलेल्या अर्थव्यवस्थेचा परिणाम स्वरुप फक्त आर्थिक विकासामध्ये शैथिल्य हा नसून राजकिय स्वातंत्र्य उपभोगण्यासाठी लागणारी स्थितीही क्षीण करते. स्वातंत्र्याच्या मूलभूत तत्वाचा गाभा म्हणजे आर्थिक स्वातंत्र्य तेच तर नसेल तर स्वातंत्र्यच नाकारले गेल्यासारखे आहे. बऱ्याच वेळा सरकारी निर्बंधाखालील अर्थव्यवस्था ही राजकीय दडपशाहीकडे वाटचाल करते. २००८ साली झालेल्या आर्थिक अध:पतनाने 'नवउदारमतवादी' संकल्पना inaccurate म्हणजे चूकिच्या आहेत हे सिद्ध झाले आहे. 'जागतिकरण' हा नवउदारमतवादाचा विजय, आता अस्तांचलाकडे झुकत आहे. बऱ्याच पश्चिमी राष्ट्रांनी आता, सावकाश पण ठामपणे विशिष्ट, आर्थिक, धोरणांचा अवलंब केला आहे. ज्यायोगे 'संरक्षणवादी बचावात्मक धोरणाची' ची आठवण येते.

**आपली प्रगती तपासा :**

१) नवउदारमतवादाची व्याख्या करा आणि त्यातील तत्वांची चर्चा करा.

२) नवउदारमतवादाच्या संकल्पनेची चिकित्सा करुन तिचे मूल्यमापन करा.

## १३.६ सारांश

(आयडिओलॉजी) म्हणजे कल्पना शास्त्र हे, तत्वज्ञान, राजकारण आणि समाज यांच्याविषयी प्रमाणीभूत संकल्पनांचा संच यांनी घडलेले आहे. हे कल्पनाचे शास्त्र आहे ज्याचा आशय शास्त्राचा विषय ठरवितो. व्यक्तिच्या, गटाच्या, समाजाच्या आणि सरकारच्या आकांक्षा आणि मूल्ये ज्या अनेक संकल्पनांतून प्रतिबिंबित होतात, त्यांना 'आयडिओलॉजी' म्हणजे कल्पना शास्त्र म्हणावे, अशी व्याख्या करता येते.

राजकीय संकल्पना हा राज्यशास्त्राच्या अभ्यासाचा मूळ गाभा आहे. सरकारच्या स्वरुपाबद्दलच्या कल्पनांचा संच, तसेच समाजाची आर्थिक आणि सामाजिक बांधणी यांचा समावेश राजकीय कल्पना शास्त्रात होतो. राजकीय ध्येय्ये आणि काही प्रमाणात सिद्धांताच्या राजकीय प्रक्रियेचे स्वरुप याचे विश्लेषण करणारे, ' राजकीय आयडिओलॉजी' हे एक साधन आहे.

लोकशाहीच्या संदर्भात 'उदारमतवाद' हे एक विशेष राजकीय सिद्धांत आहे. हे एक सुघड, बांधीव कल्पना शास्त्र नाही. पण ज्यामध्ये समता आणि स्वातंत्र्य या पायावर घुमटाकार रचनेप्रमाने विविध तत्वे येतात. १७ व्या शतकात Adam Smith ने उदारमतवाद आणि मुक्त व्यापार यांचे एकत्रिकरण केले होते. १९ व्या शतकात John Stuart- Mill ने स्वातंत्र्याचे तत्व अधोरखित केले. फ्रेंच विचारवंत Monttsequieu ने सत्तेचे विभाजन करुन, जबाबदार सरकार, जे जनतेचे स्वातंत्र्य अबाधित राखेल अशी संकल्पना सरकारबद्दल मांडली. समता आणि स्वातंत्र्य या व्यतिरिक्त बहुत्मत्ववाद, सहिष्णुता आणि मानवी हक्क या उदारमतवादी संकल्पनेशी जोडलेले आहेत. सामाजिक न्यायाच्या आपल्या सिद्धांतामध्ये Rotin Rawls याने स्वातंत्र्य आणि समता या दोन तत्वांचा मेळ घालण्याचा प्रयत्न उदारमतवादात केला आहे तो महत्त्वपूर्ण आहे.

नवउदारमतवादी ही अत्यंत कळकळीने आर्थिक स्वातंत्र्याचा, मुक्त बाजारपेठेचा आणि खुल्या व्यापाराचा पुरस्कार करतो. Eriedrich Hayck and Milton Friedman नवउदारमताचे प्रमुख व्याख्याते आहेत. सरकारने स्वतंत्र व्यापाराचे संवर्धन करावे. सौरक्षण आणि पोलिस या खात्यांचे नियोजन करावे. असे याचे मत आहे. सामाजिक कल्याणकारी प्रकल्पांच्या, निम्मस्तरीय लोकांच्या प्रगतीसाठी सरकारने काही करावे या मताला त्यांचा सपशेल विरोध आहे.

## १३.७ पाठावरील प्रश्न

१) कल्पनाशास्त्र या संकल्पनेबद्दल तुमची समजूत काय आहे ?
२) राजकीय कल्पनाशास्त्राची संकल्पना स्पष्ट करा.
३) उदारमतवादावर निबंध लिहा.
४) नवउदारमतवादाची 'मूलभूत' तत्वे कोणती ?

❖❖❖❖

# १४

# साम्यवाद आणि समाजवाद

**घटक रचना :**

१४.० उद्दिष्ट्ये
१४.१ प्रस्तावना
१४.२ भौतिकवादाचे तर्कशास्त्र
१४.२.१ ऐतिहासिक भौतिकवाद
१४.३ भांडवलशाहीचे समालोचन
१४.३.१ वस्तूची स्वत्वनिवृत्ती Commodity Fetishism or Atienation
१४.३.२ अतिरिक्त मूल्ये
१४.३.३ शोषण / पिळवणूक
१४.३.४ भांडवलशाहीतील विसंवाद
१४.४ श्रमजीवी क्रांती
१४.४.१ श्रमिकांची हुकुमशाही
१४.४.२ राज्याचा क्रम विलय
१४.५ समाजवादाशी ओळख
१४.६ समाजवादाचा उगम आणि अर्थ
१४.७ समाजवादाच्या मूलभूत संकल्पना
१४.८ सारांश
१४.९ सरावासाठी प्रश्न

## १४.० उद्दिष्ट्ये

१) साम्यवादाच्या सर्व मूलभूत संकल्पनांचे पुर्नविलोकन करण्यासाठी साम्यवादाचा सखोल अभ्यास करणे.
२) समाजवादाच्या प्रमुख संकल्पना, त्यांचा अर्थ व उगम यांची एकमेकांशी बांधिलकी कशी आहे याचे आकलन करणे.
३) साम्यवाद आणि समाजवाद यांचा तौलनिक अभ्यास.

## १४.१ प्रस्तावना

विसाव्या शतकात दूसऱ्या कोणत्याही राजकीय, आर्थिक संकल्पनांचा जितका प्रभाव साम्यवादांचा सर्व जगावर झाला, तितक्या दुसऱ्या कोणत्याही राजकीय आर्थिक संकल्पनेचा झाला नाही. १९८० च्या USSR च्या पतना आधी, जगातली अर्धी लोकसंख्या, साम्यवादी राजवटीखाली जगत होती, ज्या सर्वांचा 'ते मार्क्स' च्या साम्यवादी तत्वाच्या अनुसार राजवट चालवत होते असा त्यांचा कायदेशीर दावा होता. थोडक्यात 'साम्यवाद' म्हणजे एक आर्थिक तत्वज्ञान जे स्वतःच्या दृष्टीकोनातून जगातील सामाजिक आणि राजकीय घटनाकडे पाहतात ते दर्शवते. साम्यवादाच्या सिद्धांतामध्ये अंर्तभूत असलेल्या संकल्पना पुढीलप्रमाणे :

१) भौतिकवादाच्या इतिहासाचे अर्थबोधन.
२) सामाजिक बदलाकडे समजण्यासाठी तर्कशास्त्रिय दृष्टीकोन.
३) भांडवलशाहीच्या इतिहासाचे चिकित्सक मूल्यमापन (१८१८-१८८३)

उत्कृष्ट साम्यवादाच्या सर्व कल्पना एकत्रितपणे Karl Marx च्या लिखाणावर आधारित आहेत. कार्ल मार्क्स, एक असा जर्मन तत्वज्ञ,जो अर्थशास्त्रज्ञ, समाजशास्त्रज्ञ, इतिहासकार, पत्रकार, आणि क्रांतीकारी समाजवादी ही होता. ज्याच्या संकल्पनांनी, सर्व ज्ञानशाखांच्या प्रगतीला आकार दिला आणि अजूनही त्या संकल्पना अनेक विद्या शाखावर प्रवाह राखून आहेत. १८४८ मध्ये, Friedrich Engles च्या जोडीने Marxs ने बारा हजार शब्दांची एक पुस्तीका लिहिली, The Communist - Manifesto ज्यातील विचार प्रसारामुळे, फक्त सात वर्षाच्या आत, जगाच्या इतिहासाचे वळण बदलले. Engles 'जर्मन-इंग्लिश' ???? जो राजकिय तत्वज्ञ होता, कार्लला सप्टेंबर १९८८ मध्ये भेटला. त्यांच्या प्रगाढ मैत्रीतून 'क्रांतीकारी संकल्पनांची लक्षणीय संघटना उदयास आली.' Communist Manifesto व्यतिरिक्त या मित्रद्वयाने The Holy Family चे लेखन केले. तसेच एक राजकिय क्रांतीकारी वृत्तपत्र 'cologne' सुरु केले पण जे अल्पजिवी ठरले कारण जर्मन सत्ताधाऱ्यांनी त्यावर बंदी घातली. मार्क्सने प्रचंड लेखन केले पण त्याचे सर्वात गाजलेले पुस्तक म्हणजे 'Capital' भांडवलशाही अर्थव्यवस्थेवर केलेली चिकित्सक टीका; जी तीन खंडात प्रसिद्ध आहे. 'मार्क्सवाद' ही सतत विकसित होणारी संकल्पना आहे. निरनिराळ्या काळात आणि निरनिराळ्या रचनांमध्ये, जगभरातले विद्वान या साम्यवादाचा अर्थ लावण्याचा, त्याला नवे महत्त्व, विस्तार देण्यात तसेच त्याचे रुप उत्तम अशा साम्यवादाशी अनुकुल करण्यात गढले आहेत. आपण या पाठात 'कार्ल मार्क्स' ला अभिप्रेत असलेल्या 'शास्त्रीय साम्यवादाच्या मूलभूत कल्पनांचा अभ्यास करणार आहोत.'

## १४.२ भौतिक वादाचे तर्कशास्त्र

हे जग आणि त्यातील सर्व गोष्टी नैसर्गिक आहेत म्हणून त्यांनी निसर्गाच्या कायदा मान्य करायला हवा आहे. 'साम्यवादाची पायाभूत उभारणी करणारे भौतिकवादाचे तत्वज्ञान या दृष्टीकोनाच्या ध्वन्यर्थ' या जगात अद्भूत, अलौकिक असे काहीच नाही. मार्क्स आणि एन्जल्स यांनी विविध वैचारिक गमाचा अभ्यास त्यांना त्यांच्या एकत्रिकरणाची प्रेरणा मिळाली, ज्यातून त्यांचा भौतिकवादाचे तत्वज्ञान तयार झाले त्यातूनच 'भौतिकवादाचे तर्कशास्त्राचा' उगम झाला.

'dialectics' हा शब्द ग्रीक शब्द dialego याचा अर्थ वादविवाद आणि धर्मचर्चा. प्राचतिन ग्रिसमध्ये, ग्रीक तत्ववेत्ते, सत्य शोधनासाठी, त्या विषयाच्या बाजूने आणि विरोधी मताची तात्वीक चर्चा करत असत. अशा तऱ्हेने dialetics ही तर्कशुद्ध पद्धतीने मतभेदाचे विषय सोडविले जात. ही फार जूनी पद्धत आहे. कारण Plato ने सुद्धा Republics चे संवाद लिहिताना हीच पद्धत वापरली होती. प्लेटो व्यतिरिक्त Immanual Rant, G.W.F. Hegel and Ladwig Feuerback या जर्मन लेखकांच्या लिखाणाने मार्क्स प्रभावित झाला होता. विरोधाभाच्या भौतिकवादाच्या तर्कशास्त्राच्या संदर्भात त्याने Hegel च्या संकल्पना त्यांने तर्क विद्येच्या भौतिकशास्त्रात उतरवल्या. Hegel ने तीन स्तरीय सामाजिक विकासाच्या कल्पना वर्णन केल्या. ? ? ? तर्कशास्त्रावर आधारित प्रबंधामध्ये 'विरोधी तत्त्व' ही निर्माण झाले आहे. उदा. प्रबंधाच्या बाजूने आणि विरोधाना परिणात स्वरुपात विरोध आहे त्याचे सरतेशेवटी एका संयोगात रुपांतर होते.

जरी Hegel च्या dialectic ने मार्क्स प्रभावित झाला होता तरी हेगेलच्या आदर्शवादाने भौतिकवादाचा कलेला बचाव, कार्ल मार्क्सला मंजूर नव्हता. त्याच्या magnum opus Capital या ग्रंथात मार्क्स म्हणतो, "माझा तर्कवाद हा Hegel च्या तर्काहून केवळ भिन्न नाही तर तो त्याच्या थेट विरुद्ध आहे. हेगेल च्या मते, जिवंत माणसांच्या मेंदूची प्रक्रिया, म्हणजे विचार प्रक्रिया, जिला 'कल्पना' असे नाव देऊन तो तिचे एका स्वतंत्र विषयामध्ये रुपांतर करु शकतो. हे रुप हे खऱ्या जगाचे 'demiurgos' आहे. आणि खरे जग म्हणजे कल्पनेचे 'बाह्यात्कारी रुप'." माझ्या मते (मार्क्सच्या मते) उलटपक्षी, आदर्श म्हणजे दूसरे काही नाही तर भौतिक जगाचे मानवी मनाने केलेले प्रतिबिंब आहे. ज्यांना त्याने विचार स्वरुप दिले आहे. तसेच Hegel च्या मते निसर्गही तर्कशुद्ध आहे. अशा तऱ्हेने भौतिकवादाचे तर्कशास्त्र प्रधान गुणांबद्दल ठासून सांगतो कि जगातील सर्व गोष्टीचे अस्तित्व हे भौतक आहे. आणि विकासाची प्रक्रिया सतत जगभरात चाललेली आहे. जग हे एकीकरण झालेले अस्तित्व असून, त्यात घडणाऱ्या सर्व घटना एकमेकांशी फक्त जोडलेल्या नाहीत तर एकमेकांवर अवलंबून आहेत. सगळ्यात महत्त्वाचे विधान हे आहे कि फक्त शास्त्रिय संशोधनातून हे जगाबद्दलचे सत्य उलगडू शकेल, असे तो ठासून सांगतो.

भौतिकवादाच्या Feuerback च्या संकल्पनांनी मार्क्स आणि अेन्जल्स दोघेही प्रभावित होते पण त्यांनी त्यामध्ये आपल्याला हे तुला साजेसे थोडे फेरबदल केले. Feuerback याने आपल्या भौतिकवादाच्या संकल्पना, आदर्श, धार्मिक आणि नैतिकतेच्या संकल्पनांना पायाभूत संकल्पना म्हणून स्पष्ट केले होते. मार्क्स आणि एजेंल्सने त्यातील सारभूत संकल्पना घेऊन स्वतःची शास्त्रीय, तत्वज्ञानी, भौतिकवादाची कल्पना विकसित केली होती. स्वतः केलेल्या फेरफरकांचे समर्थन करताना अेंजेल्स म्हणतो, जरी Feuerback हा भौतिकवादाचा उद्‌गाता होता, तरी तो पारंपारिक आदर्शवादाच्या मार्गामध्ये अडकला होता. त्याचा खरा आदर्शवाद त्याच्या लिखाणातून पुराव्यानिशी पुढे येतो.

तर्कधिष्ठित भौतिकवाद विधान करतो कि, जर सर्व निसर्ग ही एकत्रित अस्तित्व असलेली एक गोष्ट आहे, त्यामध्ये सर्व घटना या परस्परांशी जोडलेल्या आहेत या त्याच्या एकजिनसी गुणधर्मामुळे, कोणत्याही नैसर्गिक घटनेचा (इतर गोष्टींचा विचार न करता) एकाकीपणे, आपण विचार करु शकत नाही. नैसर्गिक घटनांचे आकलन तिचे संबंध निसर्गाशी असलेल्या संबंधानेच होऊ शकते. तसेच या तर्कनिष्ठ भौतिकवादानुसार निसर्ग हा कायमच

बलदत असतो. तो हालत असतो, बदलत असतो आणि विकसित होत असतो. आधि भौतिक तत्वाप्रमाणे निसर्ग विश्रांती घेतो आणि स्थिर असतो. परंतू हे मत भौतिकवादी मान्य करणे शक्यच नाही. परंतू निसर्गातील चिरस्थाई हालचालीचा आणि बदलाचा विचार करण्याचे प्रयत्न तर्कधिष्ठित भौतिक वादाने करावेत. हा मुद्दा ठोसपणे स्पष्ट करताना Engles म्हणतो, "निसर्गातील लहानपासून मोठ्यापर्यंत, वाळूच्या कणापासून ते सूर्यापर्यंत, अगदी लहान पेशी, किडे मुंग्यापासून ते मानवापर्यंत सर्वांचे अस्तित्व, सनातन शाश्वत अस्तित्वात येणे आणि जाणे (जन्म घेणे आणि मृत्यू पावणे) ही एक शाश्वत, अखंड अविरत चालणारी क्रिया आणि बदल ही आहे. म्हणून तर्कनिष्ठ भौतिकवाद, नैसर्गिक घटनांना एकमेकांशी जोडणारे, संपूर्ण निसर्गाचा एक भाग असतात, आणि त्याखेरीज स्वतःची वेगळी, गतीशीलतेची कायमची ओळख त्यांना असते हे मान्य करतात."

तिसरा मुद्दा 'तर्कनिष्ठ भौतिकवादा' मध्ये हा आहे कि परिमाणवाचक बदल हा पुढे गुणात्मक बदलाकडे जातो. ही स्थिती अधिभौतिकवादाच्या दृष्टीकोना विरुद्ध आहे. त्यांच्यामते विकास प्रक्रिया ही, वाढीच्या सरळसोट (प्रामाणिक) मार्ग आहे. ज्यामध्ये मूळ संकल्पनांच्या गाभ्यामध्ये काहीच बदल होत नाही. तर्कनिष्ठ भौतिकवादाच्या मते, ही फक्त परिणामात्मक बदल हा गुणात्मक बदल घडवतोच असे नाही तर हा अशा गुणात्मक बदलाची जलद मालिकाच सुरु करतो कि एका नैसर्गिक प्रक्रियेतून दुसऱ्याची सुरुवात होते. म्हणून हा तर्कनिष्ठ भौतिकवाद पुढे आणि वर जाणाऱ्या विकास प्रक्रियेचा मार्ग प्रतिपादन करुन विकासाच्या वर्तूळात्मक हालचाली ज्या परत परत घडतात अशा बद्दलच्या कल्पना मोडित काढतो. नैसर्गिक प्रक्रिया ही तर्कशास्त्रिय आहे आणि आध्यात्मिक नाही, म्हणजे ती एकाच पद्धतीने फिरुन फिरुन सतत घडणारी नाही. पण खऱ्या इतिहासातून हे दिसतो असा निर्देश 'Engels' करतो. इथे महत्त्वपूर्ण उल्लेख 'Darwin' चा करायला हवा त्याने निसर्गविषयक अध्यात्मशास्त्रिय संकल्पनांना मोठाच धक्का दिला. त्यने असे सिद्ध केले कि, आज आपण जे जग बघतो आहोत, ज्यामध्ये वनस्पती, प्राणी आणि मानव जात हे सर्वच या नैसर्गिक विकासाच्या प्रक्रियेचा भाग आहेत; जी विकास प्रक्रिया लाखो वर्षापासून चालू आहे.

चौथा मुद्दा, भौतिक तर्कवाद हे उघड करतो की, निसर्गातील प्रक्रियांमध्ये अंतरिक विरोधाभास आढळून येतो. त्यांच्यातील सकारात्मक आणि नकारात्मक, सर्व मूलभूत लक्षणे साठविलेली असतात. त्यामुळे एखाद्या नैसर्गिक चमत्काराचा नाश किंवा अंत झाल्यास नैसर्गिकपणेच, काही नवीन असे जे पुढील विकास क्रमात गुणात्मक बदलात टिकू शकेल, असे निर्माण होईल. या संदर्भात लेनिन यांनी केलेले निरिक्षण समर्पक आहे. तर्कशास्त्राचा अभ्यास म्हणजे वस्तूच्या विरोधी तत्वांचा मर्मग्राही अभ्यास आणि म्हणून भौतिक शास्त्र म्हणजे निसर्ग आणि त्याचा विकास याकडे बघण्याच्या 'अध्यात्मिक दृष्टीकोणास' विरोध. या विचाराचा मध्यबिंदू असा आहे की निसर्ग हा भौतिक चमत्कार आहे. जो सतत कार्यरत असतो. नव नवीन चमत्कार घडवत असतो तो एक सततच्या पुढे होणाऱ्या नैसर्गिक प्रक्रियेचा भाग आहे. निसर्गाचा होणारा हा प्रवास, निसर्गाच्या कार्यप्रणालीशी सुसंबद्धच असतो. Hegal च्या म्हणण्याप्रमाणे 'जागतिक आत्म्याच्या' म्हणजे अध्यात्मिक जोरामुळे या गोष्टी घडतात. प्रत्यक्षात मात्र हे निसर्गाच्या नियमानुसार घडत असते. त्यामुळे Hegal चे मत कोणालाच मान्य नाही.

मार्क्सच्या म्हणण्याप्रमाणे, भौतिक वस्तूचे अस्तित्व हे वस्तूनिष्ठ वास्तविकता आहे आणि ती माणसाच्या सद्सद्विवेक बुद्धीच्या कक्षे बाहेर स्वतंत्र आहे. या अर्थाने, भौतिक विषय हे

प्राथमिक महत्त्वाचे आहेत. माणसाची सद्सद्विवेक बुद्धी जी भौतिकविषयांवर प्रतिबिंबित होते ती कमी महत्त्वाची आहे. म्हणून मुख्य कल्पना किंवा विचार असा आहे की, माणसाचा भौतिकतेचे स्वरुप म्हणजे त्याच्या परिपूर्ण असा मेंदू ज्याच्यातून विचार निर्माण होतात. तर्कशुद्ध भौतिकवादाच्या दृष्टीकोनातून, भौतिक विषय आणि कल्पना यांना वेगवेगळे करणे निरर्थक आहे. मानवाच्या चेता संस्था मार्फत, आपण ज्या जगाचे आहोत त्यांचे ज्ञान घेत असतो. आमचे विचार आणि सद्सद्विवेक बुद्धी ते कितीही उच्च कोटीतले असले तरी ते शेवटी भौतिक, शारीर, अवयवाचेच (मेदूंचेच) (उत्पादन) काम आहे. जडवस्तू, भौतिकवस्तू ही मनाने निर्माण होत नाही. पण मन हेच अत्यूच्य जडवस्तू आहे असे Angels म्हणतो. आदर्शवादी विचारवंत म्हणतात, निसर्ग अशा अनेक गोष्टींनी घडलेला आहे ज्याचे आकलन करणे हे मानवी मेंदूच्या पलीकडे आहे. आध्यात्मिक दृष्टीकोन असणारे सुद्धा हेच मत मांडतात. परंतू तर्कनिष्ठ भौतिकवादाच्या मते मानवी मन सर्व नैसर्गिक घटना समजू शकते. गरज आहे, ती निरीक्षण तुलना, प्रयोग, सराव करण्याची थोडक्यात शास्त्रीय संशोधनाच्या माध्यमातून निसर्गाचे सर्व चमत्कार खऱ्या अर्थाने उघड होतील.

### १४.२.१ भौतिकवादाचा इतिहास :

कार्ल मार्क्सच्या व्याख्येप्रमाणे, ऐतिहासिक सामाजिक विकासाला समजून घेताना, तर्कनिष्ठ भौतिकवादाचा आधार घेतला असता त्याला भौतिकवादाचा इतिहास असे म्हणतात. काही माक्सीस्ट विद्वान त्याला इतिहासाचे भौतिक अर्थ समजुन घेणे असे म्हणतात. भौगोलिक परिस्थिती, सामाजिक प्रगतीवर प्रभाव टाकते; म्हणजे भौतिक परिस्थिती विकासासाठी कारणीभूत असते हे स्पष्ट आहे. तथापि भौतिकवादाच्या ऐतिहासिक तत्वानुसार, भौगोलिक परिस्थिती ही फारशी प्रभावी किंवा महत्त्वाची नाही कारण सामाजिक बदल हे नैसर्गिक भौगोलिक बदलांपेक्षा बऱ्याच वेगाने होत असतात. युरोपियन इतिहासाकडे निर्देश करताना मार्क्स म्हणतो, गेल्या तीन हजार वर्षात तीन सामाजिक व्यवस्था दिसून आल्या जसे एक म्हणजे, अगदी प्राचीन गटागटाने राहणाऱ्या लोकांची व्यवस्था, मग गुलामगिरी व्यवस्था आणि मग अमिरउमरावांची व्यवस्था. पण त्याच कालखंडात भौगोलिक परिस्थिती जवळजवळ तशीच राहिली. जशी पूर्वी होती. आणि जे काही थोडेफार भौगोलिक युरोप बदल जाले ते अगदीच नगण्य होते.

ऐतिहासिक भौतिकवाद असे मानतो की, लोकसंख्येमध्ये वाढ झाली असता, त्याच्या सामाजिक पद्धतीच्या धारणा बदलणे किंवा ठरवणे यासारखा प्रभाव नसतो. लोकसंख्यावाढ ही सामाजिक विकास प्रक्रियेला चालना देईल किंवा अडथळा करेल; पण सामाजिक विकास प्रक्रियेत तो महत्त्वाचा असू शकत नाही. सामाजिक व्यवस्थेमध्ये जे बदल घडतात त्यांना 'वाढती लोकसंख्या' उत्तर पूरवू शकत नाही. Communal system चे Slave System मध्ये रुपांतर का झाले याचे उत्तर वाढलेली लोकसंख्या देऊ शकली नाही. तसेच Slave System चे Fcudal System मध्ये रुपांतर का झाले हेही स्पष्ट होत नाही. उच्च दर्जाचा सामाजिक पद्धतीमध्ये बदल, हा जास्त लोकसंख्येचा परिणाम नाही. उदा. भारताची लोकसंख्या ही USA च्या पाचपट मोठी आहे. म्हणून भारतीय समाज व्यवस्था USA पेक्षा अधिक वरच्या दर्जाची आहे असे होत नाही.

तर स्पष्ट उघड प्रश्न असा कि भौगोलिक परिस्थिति किंवा लोकसंख्येतील वाढ हे दोन्ही मुद्दे सामाजिक रुपांतर होण्यास पुरेसे नाहीत तर ते कोणते मुद्दे ह्या रुपांतरास निर्णायक ठरतात? भौतिक मूल्य असलेल्या, उत्पादनाच्या विविध पद्धति ह्याच सामाजिक पद्धतीमध्ये बदल घडवून आणतात, असे ऐतिहासिक भौतिकवाद म्हणतो. जगण्यासाठी आणि जीवनमान

उंचावण्यासाठी लोक भौतिक मूल्य असलेल्या वस्तूंचे उत्पादन करतात. त्या भौतिक उत्पादनासाठी वापरलेली साधने, त्यासाठी आवश्यक ते कुशल कामगार आणि इतर काही गोष्टी उत्पादक समाजावरी प्रभाव असा शब्दात मांडता येईल. दूसरा मुद्दा काही वेळा सहकारी तत्वावर लोक काम करुन, निसर्गाचे शोषण करुन भौतिक मूल्ये असणाऱ्या गोष्टी बनवतात. अशा तऱ्हेने एकटा दुकटा माणूस एकाकीपणे उत्पादन करु शकत नाही. ते काम इतर माणसांच्या सहकार्यनेच पूर्ण होऊ शकते. म्हणूनच त्याला सामाजिक उत्पादन असे म्हणतात. भौतिक मूल्ये असलेले उत्पादन करण्याच्या हेतूने लोक एकमेकांशी सहकार्य करुन एकमेकांना (परस्परांना) अशी मदत करतात ज्यामध्ये कोणत्याही तऱ्हेचे शोषण नसते. उत्पादनाशी संबंधित अधिकारी परंपरा किंवा त्या संबंधातील बदल असे काही फरक उत्पादनाशी संबंधित असतील पण अशा अधिकारी परंपरा किंवा उत्पादन प्रक्रियेची बदलती रुपे, उत्पादकांशी न्याय्य आणि योग्य असतील. मार्क्सच्या मते, उत्पादनात लोक नैसर्गिकपणे काम करतात आणि इतरांवरही त्याचा प्रभाव असतो ते एका विशिष्ट पद्धतीने एकमेकांना सहकार्य करतात, परस्पर पूरक बदल त्यांच्या कार्यात करतात. उत्पादन करण्याच्या हेतूने ते एका विशिष्ट तऱ्हेने नात्यात जोडले जातात आणि या सामाजिक संबंधातून त्याच्या कृति / कामे उत्पादन नैसर्गिकपणे होते.

उत्पादनाचे महत्त्वाचे लक्ष्य म्हणजे ते सतत बदलत असते. विकासाच्या विविध टप्प्यांवर, विविध तऱ्हेने उत्पादन करण्याची तऱ्हा दिसू लागते. यास्तव, उत्पादनाच्या पद्धतीचा परिणाम, सामाजिक संस्था, राजकीय संस्था, धार्मिक संस्था आणि लोकांची विचारसरणी यावर होतो. म्हणून सामजिक पद्धतीचे स्वरुप ही उत्पादन पद्धत निश्चित करते हा मुद्दा अत्यंत महत्त्वाचा आहे. कारण ह्या दृष्टीकोनानुसार, राजा, राण्यांचे जीवनाबद्दलच्या नोंदी, त्यांनी केलेल्या लढाया आणि शोषण, कट कारस्थाने म्हणजे इतिहास नव्हेच. खरा इतिहास हा उत्पादन विकासाच्या गोष्टी सांगतो त्याचे निर्माते, त्यांची भौतिक मूल्ये, कामगार, जे भौतिक उत्पादन प्रक्रियेत महत्त्वाची भूमिका करतात, तेच इतिहास घडवतात.

उत्पादन प्रक्रियेतील प्रत्येक बदल हा माणसांच्या नाते संबंधात आणि आर्थिक संबंधात बदल घडवतात. जरी विकासाचे उत्पादक बळ हे उत्पादनाच्या संबंधित असते. तरी उत्पादन बळाची प्रतिक्रिया ते उत्पादन वाढवण्याची असेल किंवा कमी करण्याची असेल. महत्त्वाचा मुद्दा हा की उत्पादन संबंधित नातेसंबंध आणि उत्पादक बळाचा विकास यांनी हायीपूर्वक उत्पादकाच्या वाढीबद्दल खात्री दिली पाहिजे नाहीतर, उत्पादनाचे नातेसंबंध आणि उत्पादन वाढीच्या वेग यांच्यातील विसंगतीचा परिणाम म्हणून उत्पादनात आणीबाणीची वेळ येईल आणि उत्पादक बळाचा नाश होईल. आपला मुद्दा सिद्ध करण्यासाठी भांडवलशाहीतील उत्पादन पद्धतीचे उदाहरण मार्क्स देतो. खाजगी मालकीच्या, उत्पादन साधनात, उत्पादक बळात विरोध आहे. याचा परिणाम म्हणून उत्पादक बळाचा नाश होतो. त्याच्या मुळे सामाजिक क्रांती घडू शकते. ज्यामुळे नवीन उत्पादनाच्या नात्याचा उत्पादक बळाशी कसे नाते आहे हे सांगू शकेल. ह्यातूनच समाजवादी समाजाची निर्मिती होईल. अशा तऱ्हेने तर्कनिष्ठ भौतिकवादानुसार उत्पादनाचे पाच प्रकारचे नातेसंबंध असतात. उदा. प्राचीन, गटागटाने, गुलामगिरी, अमीरउमरवांची, भांडवलशाही आणि समाजवादी.

**आपली प्रगती तपासा :**

१) तर्कनिष्ठ भौतिकवादाची व्याख्या करा. त्याच्या स्वाभाविक महत्त्वाची चर्चा करा.
२) 'ऐतिहासिक भौतिकवाद' या संज्ञेमधून तुम्हाला काय समजते आणि इतिहासाच्या अभ्यासाला त्याची कशी मदत होते.

## १३.३ भांडवलशाहीचे समालोचन

भांडवलवाद हा अपरिहार्य झाला असून त्याच्या प्रगतिशीलतेचा इतिहास आहे, मार्क्सच्याा म्हणण्याप्रमाणे, हा भांडवलवाद एक दिवस कोसळणार आहे; त्याच्या मधल्याच अंतरिक विरोधी संकल्पना मुळे हे घडेल आणि शेवटी साम्यवाद त्याची जागा घेईल. त्याच्या मतानुसार, भांडवल हे लोकांमध्ये असलेले सामाजिक आणि आर्थिक नाते आहे. ते काही लोक आणि वस्तूं मधले नाते नाही. भांडवलशाहीचा महत्त्वाचा अंतर्गत मुद्दा म्हणजे, उत्पादन साधनांची खाजगी मालकी, ही फक्त (bourgeoisie) भांडवलवाद्यांना संपत्तीचा साठा करायला मदत करते, आणि प्रत्यक्ष त्या उत्पादित वस्तूच्या मूल्याचा खरा कर्ता म्हणजे कामगार, गरीबच होतो. दुसऱ्या शब्दात हे मालक (उत्पादन व्यवस्थेचे मालक) जे काहीही न करता धनसंपत्ती जमा करतात. ते खरे तर कामगारांचे शोषण करुन स्वतः धनाढ्य होतात. या निर्मिती प्रक्रियेत खरे तर 'परोपजीवी वनस्पती' किंवा भांडगुळा सारखे असतात. जे मुख्य वनस्पतीच्या जीवनरस चोरत असतात. मार्क्साझम एक मूलभूत प्रश्न विचारतो, "वस्तूच्या मूल्याची किंमत दुप्पट, तिप्पट का होते ?" याचे उत्तर 'Labour Theory of Value' यामध्ये सापडते. "सर्व वस्तू या श्रमातून (कामगाराच्या) उत्पन्न होतात." आता ह्या विविध वस्तू, विविध प्रकारच्या श्रमातून उत्पन्न झाल्या आहेत. त्यांची एकमेकांशी कशी तुलना करुन त्याचे परिमाण कसे घडवायचे हा खरा पुढचा प्रश्न आहे. मार्क्सच्या 'Capital' मध्ये तो म्हणतो, "आपण जेव्हा एखाद्या व्यवहारात निरनिराळ्या वस्तूंच्या किंमतीचे समीकरण करतो तेव्हाच आपण त्यासाठी खर्च झालेल्या वेगळ्या अतिरिक्त मानवी श्रमाचेही समीकरण करतो."

### १४.३.१वस्तूची स्वत्वनिवृत्ती Commodity Fetishism or Alienation :

मार्क्सच्या म्हणण्याप्रमाणे, वस्तूच्या बदलाचे (विक्रीचे) मूल्य हे त्याच्या किंमती इतके बरोबर होईल, जेव्हा उत्पादना करिता लागणारा श्रमकाळ सामाजिक दृष्ट्या गरजेचा असेल. श्रमाचे पैशात दिलेले मूल्य श्रमीकांमधील भिन्नता अमूर्त श्रमकाळात कमी करते असे नाही तर ते पैशातील मूल्य तर्कधिष्ठितही नसते. Feudalism अमीर उमरावांच्या कारकीर्दीध्ये, जेव्हा जमीन ही जमीन मालकाच्या ताब्यात असे शेतकरी जमीन कसत असे आणि पीक काढत असे. मग जमीन मालक, उत्पन्न झालेल्या पिकाचा कितवा भाग त्या शेतकऱ्याला देईल आणि स्वतःकडे

किती ठेवेल हे ठरवत असे. त्यामुळे शेतकरी आणि त्याने पिकवलेले धान्य यामध्ये कोणतीही निराळी कल्पना, जी वास्तवापासून निराळी अशी नव्हती. कारण मोबदला हा kind मध्ये म्हणजे वस्तूरुपाने (पीकांच्या रुपाने) दिला जात असे त्यामुळे शेतीकाम करणाऱ्या कामगारांचे त्यांच्या उत्पादनाशी, वैयक्तिक आणि खरे संबंध असत. मार्क्स वरील विवेचनातून सोदाहरण स्पष्ट करतो. भांडवलवादामध्ये उत्पादन करणारा कामगार आणि त्यांने उत्पादित केलेली वस्तू यांचा एकमेकांशी (अजिबात) सूतराम संबंध नसतो. ज्याला मार्क्सCommodity Fetishism or Alienation म्हणतो. ज्यामध्ये माणसा माणसांचे आपापसातील सामाजिक संबंध हे कमी होऊन, वस्तूंमधील संबंधासारखे विचित्र होतात. यामुळे कामगाराला हीनावस्था येऊन तो बाजारातील विन्मियोग्य वस्तू बनतो. भांडवलवादी मनुष्य स्वतःतील मानवताच हरवून बसतो. आणि वस्तूच्या परस्परावलंबिता परस्परांवर अवलंबून राहण्याच्या, सर्वसामान्य देवघेवीच्या व्यवहारात कलागती करणारा एक बनून राहते. मार्क्स विचारतो, Adam Smith आणि Locke या आर्थिक, राजकीय विचारवंता मार्क्स विचारतो, श्रमाचे प्रतिनिधित्व कामगाराने निर्माण केलेल्या उत्पादनाचे मूल्य आणि त्यासाठी दिलेला अपरिमित वेळ यानेच का होतो. यावरुन हेच स्पष्ट होते की, उत्पादन प्रक्रियेची माणसावर सत्ता आहे, जी खरी म्हणजे, माणसाची सत्ता उत्पादन प्रक्रियेवर असायला हवी.

### १४.३.२ फाजिल मूल्ये :

फाजिल किंवा अतिरिक्त मूल्य ही संकल्पना, भांडवलवादी राजवटीखाली नसलेल्या समाजात चांगली प्रसिद्ध आहे. प्रत्यक्षात याचा अर्थ श्रमजीवीचा अतिरिक्त वेळ, जो त्याच्या स्वतःच्या प्रतिपालनासाठी वापरला जात नाही. मार्क्सच्या म्हणण्यानुसार, "साध्या शब्दात कामगरानिर्मित मूल्य, पण ज्याचा वापर त्याच्यासाठीच केला जात नाही. आपल्या मेहनतीने, कामगार कच्च्या मालाचे, अशा वस्तूंमध्ये रुपांतर करतो की ज्यांना बाजारात बरीच जास्त किंमत मिळते, जी वास्तवात ती निर्माण होण्याच्या प्रक्रियेत लागलेली असते. म्हणजे कामगाराचे श्रम बाजारात विक्रीसाठी असतात. भांडवलवादामध्ये, कोणीही भांडवलवादी, असा कामगार स्वतःकडे कामाला ठेवणार नाही ज्याच्या उत्पादनाची किंमत, त्याच्या (कामगाराच्या) पगारापेक्षा कमी असेल. अर्थात मार्क्स हे मशीन्स (यंत्रा) बदल बोलत नव्हता. तो मान्य करतो की, कामगाराची कार्यक्षमता यंत्रामुळे वाढते, पण मशीन्स चालवायला माणसे लागतात. तसेच ते स्वयंजिवी नसतात. त्यांनाही झाकलेल्या किंवा अदृश्य श्रमशक्तीची गरज असते. कारण त्यांना सुद्धा मानवाच्या श्रमबळाने निर्माण केले असते. अशातऱ्हेने, भांडवलवादी समाजात हे अतिरिक्त मूल्य हे कामगाराच्या मेहनतिमुळे आलेले आहे ते त्याच्या (कामगाराच्या) खिशात कधीच जात नाही. हा मुद्दा लक्षणीय आहे. आणि त्यातूनच पुढे 'शोषण' व्यवस्थेची सुरुवात होते."

### १४.३.३ शोषण / पिळवणूक :

कामगारांचे नेहमीच शोषण होत आले आहे हे ऐतिहासिक वास्तव सर्वज्ञात आहे. मार्क्सच्या मते गुलामगीरी आणि अमीर उमराव राजवटींमधील पिळवणूक ही फारच उघड होती. भांडवलवादामध्ये गोष्टी जास्त गुंतागुंतीच्या होतात. यामध्ये सामाजिक सहसंबंध वैयक्तिक राहात नाहीत. तसेच ते छुपे असतात. पिळवणूकही अशाच स्वरुपाची असते. कार्लमार्क्स हे मान्य करतो कि, भांडवलवादी व्यवस्थेमध्ये, कामगाराला त्याच्या उत्पादनक्षमतेप्रमाणे पगार मिळतो. म्हणजे मालक कामगाराला लुबाडत नाही. हे ही खरे की, कामगारांना त्यांच्या इच्छेविरुद्ध कामाला ठेवलेले नसते. त्याच्यावर काम करण्याची जबरदस्ती केली जात नाही. कामगार संघात प्रवेश करण्याचा निर्णय त्याचा स्वतःचा असतो. तो पगाराच्या बदल्यात

स्वखुशीने, कामासाठी स्वतःला उपलब्ध करुन देतो. म्हणून मार्क्स म्हणतो, "उघड्या नागड्या गुलामगिरी ऐवजी ही 'वेतन गुलामगिरी' जी भांडवलवादी व्यवस्थेमध्ये असते, जी वेगळ्या प्रकारची असते आपले श्रम विकण्यासाठी तो स्वतंत्र आहे या मृगजळी संकल्पनेखाली कामगार असतो. पण अखेर तो कामगार, ज्यांच्याकडे उत्पादन साधन प्रक्रियेची मालकी (कारखानदार / गिरणीमालक) असते. त्यालाच आपले श्रम विकतो. भांडवलवादाचे आर्थिक आणि सामाजिक व्यवस्थेवर प्रभुत्व असते. श्रमजिवीची, उत्पादनाचे भौतिक मुल्य निर्माण करण्याच्या ताकती शिवाय 'भांडवलवादाचे' अस्तित्व कठिण आहे. उत्पादन कौशल्यामुळे जे अतिरिक्त मूल्य प्राप्त होते ते फक्त मालकाच्या (भांडवलवादी) खिशात जाते असे नाही तर त्याला 'फायदा' असे कायदेशीर नावही दिले गेले आहे. तर हे अगदी पद्धतशीरपणे भांडवलशाही व्यवस्थेमध्ये केले जाते. असे हे शोषण भांडवलशाही मध्ये वाढतच जाते. उदा. एखादा भांडवलदार, १०० कामगाराची अतिरिक्त मूल्ये (Surplus Value) खिशात घालून, अजून एका उत्पादक प्रक्रियेची सुखात करणार आहे; ज्यासाठी तो, तेच पैसे वापरणार आहे. अशा तऱ्हेने 'भांडवलवादी अर्थव्यवस्थेमध्ये' औद्योगिक समाज हा अधिकाधिक शोषण करणारा समाज म्हणून तयार होतो."

### १४.३.४ भांडवलशाहीतील विसंवाद :

स्पष्ट दिसण्यासारखा, प्रमुख विरोधाभास जो भांडवलवादी अर्थव्यवस्थे कारखानदारांत जमवलेली संपत्ती ही सामाजिक परिणाम किंवा सामाजिक गुणाकारा मूळे उत्पन्न झाली आहे. 'भांडवलवादी अर्थव्यवस्था' आपल्या कारखान्याच्या उत्पादनाचा विस्तार करुन, कामगार वर्गाचे शोषण वाढत्या प्रमाणात चालूच ठेवतो. "अतिरिक्त मूल्याचे" जे खरेतर कामगारांना मिळायला हवे. दुरुपयोग करण्याच्या कायदेशीर अनुमतीतेच त्याना हे शोषण करणे शक्य होते. भांडवलवादी अर्थव्यवस्थेमध्ये बहुतेक वस्तूंचा खरा उत्पादक हा त्या वस्तूचा उपभोग स्वतः कधीच घेऊ शकत नाही. उदा. स्वयंचलित वाहने Automobile उद्योगामध्ये काम करणारे कामगार स्वतःची चारचाकी घेण्याच्या परिस्थितीमध्ये नसतात. हे इतरही वस्तूंबाबत होऊ शकते. कामगारांना मिळणारे वेतन इतके कमी असते कि त्या खरेदी करणे त्यांच्या शक्तीबाहेरचे असते. दूसरे म्हणजे कामगारांसाठी Recession म्हणजे मंदी ही भांडवलशाहीपेक्षा जास्त अपायकारक आहे. मंदिपूर्व लक्षण म्हणजे अंशकालीन काम स्थगिती (Lay off) ज्यामुळे कामगाराला आधीच जटील असलेली अवस्था आणखीनच वाईट होते.

'मंदीच्या' लाटेचा कारखानदार मालकीवर फारसा वाईट परिणाम होत नाही. कारण एक तर त्यांच्याकडे जंगम, स्थावर मालमत्ता असते. तसेच भांडवलशाही व्यवस्था असलेले सरकार त्यांच्या मदतीसाठी नेहमीच तयार असते. म्हणून सरकार कारखानदारांना अनेक सवलती देतात. उदा. करामध्ये कपात, अर्थसहाय्य, bailouts इ. 'अशा विरोधांभासांमुळे भांडवलवादी अर्थव्यवस्था स्वतःच्याच वजनाखाली दबून जाईल.' असे मार्क्स म्हणतो.

**आपली प्रगती तपासा :**

१) 'भांडवलवादावरील मार्क्सचे समालोचन' यावर निबंध लिहा.
२) 'भांडवलवादाचे' महत्त्वाचे लक्षणे सांगून मार्क्सवाद त्याचे टीकात्मक मूल्यमापन करतो ते लिहा.

## १२.४ श्रमजीवी क्रांती

बूईर्वा वर्गाने चालवलेल्या शोषणामुळे पिडीत झालेल्या श्रमाजीवी वर्गाकडे, त्यांच्या कचाट्यातून सूटण्यासाठी हिंसक क्रांती करण्याखेरीज दूसरा पर्याय राहणार नाही. कार्ल मार्क्स जगातल्या सर्व श्रमजीवी वर्गाच्या लोकांना कंठशोष करुन सांगतो, "बूईर्वा वर्गाची तानाशाही मोडीत काढा, फेकून द्या. आणि सर्व उत्पादक प्रक्रिया असलेल्या संस्था, म्हणजे सर्व कारखान्यांची मालकी 'सामुदायिक' ठरवा." मार्क्स आणि एन्जेल्स वर्ग कलह हा इतिहासाच्या प्रत्येक टप्प्यावर अस्तित्वात असल्याचे निदर्शनास आणतात. साम्यवादाच्या जाहीरनाम्यात हे दोघे क्रांतीकारी तत्वज्ञ ठोसपणे म्हणतात, "आजपर्यंत अस्तित्वात असलेल्या समाजाचा म्हणजे, 'वर्ग कलहाचा इतिहास'." मुक्त मानव आणि गुलाम, उच्चकुलिन आणि सर्वसामान्य, स्वामी आणि दास, संघनायक आणि कुशल कामगार, थोडक्यात 'शोषक आणि शोषित' (oppressor and oppressed) सतत एकमेकांच्या विरोधात, अविरतपणे कधी उघड उघड तर कधी लपून छपून भांडत असत. कलह जो कधी 'समाजाची पुर्नबांधणी होण्यात किंवा भांडणाऱ्या गटांचा ऱ्हास होण्यात शेवटास गेला.'

अमीर उमरावशाही (Feulalism) च्या अतिरिक्त शोषण पद्धतीनंतर एक नवीन शोषण पद्धत, अस्तित्वात आली, जी अत्यंत गुढ (मार्मिक) किंवा सूक्ष्म, वेशांतरीत म्हणजे सहज न कळून येण्यासारखी पण जास्तच पाषाणह्रदयी आणि निरंकुश होती. त्याला 'भांडवलशाही' म्हणतात तिचा उदय झाला सतत दोन वर्ग, एक बुईर्वा (शोषक) आणि दूसरा कामगार (शोषित) या भांडवलशाही व्यवस्थेमध्ये एकमेकांशी झगडत असतात.

जसे जसे भांडवलशाही, अर्थव्यवस्थेमुळे कारखानदारीत वाढ होते तसे तसे कामगारांचे शोषण वाढते. शोषण एवढ्या थराला जाते की, कमागार एकत्र येतात आणि भांडवलशाहीचा पायाच मोडतात. आपल्या करारनाम्यात, मार्क्स आणि एन्जेल्स जगातल्या सर्व कामगारांना एकत्र येण्याची कळकळीने हाक देतात. आणि भांडवलशाहीपासून मूक्त होण्यास सांगतात. आणि जिथे राज्यकर्ता कामगार असेल अशा नवयुगाची जगाला ओळख करुन द्यायचे आवाहन करतात साम्यवादाच्या प्रसिद्ध जाहिरनाम्यातील शब्द आहेत, "समाजात प्रचलित असलेल्या सर्व परस्परविरोधाचा निःपात करण्यासाठी बळाचाच वापर करावा लगोल. प्रचलित

राज्यकर्त्यांना, साम्यवादाच्या क्रांतीचा धाक वाहू द्या, त्यांना थरथरु द्या, हळूहळू ह्या कामगारांचे यात काहीच नुकसान नाही. उलट फक्त त्यांना बंधने सैल करायची आहेत. त्यांना जग जिकांयचे आहे. एक व्हा; सर्व देशातल्या कामगारांनो एक व्हा."

भांडवलशाही व्यवस्थेमधून साम्यवादी व्यवस्थेमध्ये समाजाचे रुपांतर होताना, कामगारांच्या मार्गदर्शनाखाली होणारी हिंसक चळवळ टाळता तर येणार नाहीच पण ती अत्यावश्यकही आहे. साम्यवादी चळवळ फक्त एका दाईचे Modwife चे काम करते. ह्या रुपांतरासाठी जी प्रक्रिया, जी लढ्याची वाटचाल आहे तीच बुईर्वा लोकांनी चालवलेल्या शोषणाचा नाश करेल आणि कामगारांच्या हुकमतीच्या युगाची नांदी करेल. शोषकांच्या वर्चस्वाच्या नाश करण्याकरता हिंसक कृतिची शिफारस करायला साम्यवादी जराही कचरत नाहीत, घाबरत नाहीत. त्यांचा विश्वास आहे की खुद्द राज्यकर्ता, संस्थांच भांडवलवादी सरकार हीच एक हिंसात्मक राजकीय रचना आहे. जी सैन्य आणि पोलिस दलाच्या माध्यमातून आपली जुलमी राजवट कार्यान्वित ठेवते. जगाच्या इतिहासाकडे एक धावता दृष्टीक्षेप टाकल्यास आपल्याला हे दिसून येईल की, राज्यकर्ते, म्हणजेच शोषणकर्त्यांनी आपली सत्ता स्थापण्या आणि टिकण्यासाठी हिंसेचा आणि जुलुमाचा वापर केला आहे, ही दोन दले, सैन्य आणि पोलिस हे अशा राज्यकर्त्यांचे मोठेच आधारस्तंभ होते. मार्क्सीस्ट व्यवस्थेला, कामगारांचे सरकार शांततापूर्ण मार्गाने स्थापण्यास आवडले असते. पण केव्हा? भांडवलवादी शोषक सरकार स्वतःहून कधीही सत्ता त्याग करणार नाहीत उलट त्यांना जरी कानोकान खबर कामगारांच्या वर्चस्वासाठीच्या उठावाची बातमी लागली तरी ते वाईटात वाईट हिंसक मार्गाने त्याचे दमन करतील. क्रांतीकारकांना ठेचून टाकतील म्हणून कामगारांसाठी सशस्त्र हिंसक क्रांती करुन भांडवलवादी बुईर्वा कारखानदारांचा नायनाट करणे अत्यावश्यक आहे. त्यांचे स्वस्वःचे कामगारांचे स्वामीत्व स्थापण्यासाठी त्यांना हे करावेच लागेल.

## १४.४.१ श्रमिकांची हुकुमशाही

हिंसक सशस्त्र क्रांतीनंतर, कामगारांना स्वतःचे हुकूमशाही सरकार स्थापावे लागेल. याविषयी सर्व संदर्भ साहित्यात (Classical Marxism) शास्त्रीय साम्यवादात स्पष्टपणे, कामगारांच्या हुकुमशाहीबद्दल स्थापने बद्दल स्पष्टपणे उल्लेख आहे. ह्या साहित्यामधील कोणत्याही मुद्यापासून मार्ग भ्रष्ट होणे, हे किंवा त्यामध्ये सुधारणा सारखे बदल करणे हे संधिसाधूपणा करण्यासारखे शास्त्रीय मार्क्ससीस्ट पद्धतीला वाटेल. जो जो समाज भांडवलशाहीखालील ज्याच्यामध्ये भरडला गेला, आणि जिथे जिथे कामगारांनो साम्यवादी समाजाची स्थापना करण्यासाठी, क्रांती केली, तिथे कामगारांची हुकूमशाही ही आवश्यक बाब आहे असा दृष्टीकोन मार्क्सीस्ट ठेवतात. हुकुमशाही म्हणजे सामाजिक अवस्था आहे जिथे कामगार लोकांचे नियंत्रण असेल. Joseph weydemeger हा एका पर्शियन सैनिकी हुद्देदार जो पत्रकारही होता, राजकारणी होता आणि मार्क्सवादी क्रांतीकारीही होता, त्याने कामगारांची हुकूमशाही हा शब्द प्रथम चलनात (वापरात) आणला. मार्क्स आणि एन्जल्स ने तो नंतर उचलला. माक्सीझमच्या मते कामगारांची हुकूमशाही ही एक तात्पुरती अवस्था आहे, जिमध्ये भांडवलशाहीचे उरले सुरले अवशेष ही नामशेष केले जातील तसेच भांडवलशाही भविष्यात पुन्हा डोके वर काढणार नाही अशी खबरदारी घेतली जाईल. कामगार सरकार समाजाची अशी समाजवादी रचना करेल. ज्यामध्ये समाज वर्गामध्ये विभागलेला नसेल. अशा तऱ्हेने कामगारांची हुकूमशाही ही वर्गहीन स्थितीहिन समाजाची निर्मिती करेल जो खऱ्या अर्थाने समाजवादी समाज असेल.

### १४.४.२ सरकार या संकल्पनेचाच विलय

समाजवादी समाजचे शेवटचे ध्येय राज्यसंस्था या राजकीय व्यवस्थेपासून मुक्ती मिळवणे, ”Withering away of states” या वाक्यप्रचाराचा उपयोग एन्जल्स ने सर्व प्रथम केला होता; ज्याचा अर्थ ‘सरकार शिवाय समाज’ म्हणजे तो स्पष्टपणे सांगतो की, सरकार नामक यंत्रणा ही नेहमीच पाशवी, दानवी राहिलेली आहे. तो म्हणतो, नवीन मोकळ्या वर्गहिन समाजामध्ये अशी नवी पिढी उपजेल जी संपूर्ण बाद झालेली अडगळ फेकून देईल. (सुरुवातीला क्रांतीनंतर स्थापन झालेल्या कामगार हुकूमशाहीला त्यावेळी अस्तित्वात असलेल्या भांडवलशाहीच्या अवशेषांना लवकरात लवकर नष्ट करणे क्रमप्राप्त आहे)

कामगार हुकुमशाहीचे समर्थन भांडवलवादाचा नाश करण्यासाठी आहे. नंतर अशा जुलुम जबरदस्तीचे कायच उरणार नाही. साम्यवादाने आम्हाला कामगार वर्गाने नेतृत्व केलेल्या राज्य यंत्रणेचे चित्र दाखविले. मग तिथे शोषण करणारे प्रतिनिधी प्रतिस्पर्धी (कारखानदारच) नसल्यावर सरकारी यंत्रणेचाच विलय होईल.

**आपली प्रगती तपासा :**

१) साम्यवादी समाज रचनेकडे वाटचाल करताना कामगारांची क्रांती होणे आवश्यक आहे असे माक्सीझम का म्हणतो ?

२) कामगारांच्या क्रांतीनंतरची अवस्था साम्यवादाच्या आधारे स्पष्ट करा.

## १४.५ समाजवादाची ओळख

समाजवादाचे सिद्धांत समजण्यामधली सर्वात मोठी अडचण म्हणजे त्याच्या असलेल्या विविध व्याख्या अनेक विद्वानांनी सिद्धांताच्या विविध, निरनिराळ्या आवृत्या मांडल्या आहेत. ज्या एकमेकांशी अर्थपूर्णतेमध्ये फरक करतात. बरे काही सारखे मुद्देही त्यांच्या स्पष्टीकरणात आढळतात. समाजवादाच्या शब्दकोशामध्ये, समाजवादाच्या चाळीस व्याख्या सापडतात. आपण त्यातील सारख्या घटकांना ओळखून त्यांना या व्याख्येमध्ये बसवायचे ठरविल्यास आपण पुढील मुद्दे त्यात घेऊ शकू.

१) खाजगी मालकीच्या कारखानदारीवर टीका सामाजिक दृष्टीकोनातून

२) उत्पादन व्यवस्थेवर समुहाचे नियंत्रण

३) तसेच वाटप भौतिक मूल्याची अदलाबदल

४) सामाजिक न्यायावर आधारलेली समाज रचना

एक विद्वान, श्री भिखू पारेख, आपल्या The concepts of socialism या प्रसिद्ध पुस्तकात समाजाशी निगडित असलेली चार महत्त्वाची तत्त्वे मांडतात.

१) सामाजिकता
२) सामाजिक जबाबदारी
३) सहकार्य
४) नियोजन

दुसरे एक लेखक Michel freeden, हे पाच तत्त्वांचा उल्लेख करतात, जी समाजवाद्यामध्ये मान्य आहेत. सर्वप्रथम समाज म्हणजे केवळ अनेक व्यक्तिंचा प्रतवारी असलेला गट नसून त्यामध्ये त्याहून अधिक भरीव अर्थ आहे. दुसरे म्हणजे मानवाचे कल्याण हा इच्छित हेतू असणे गरजेचे आहे. तिसरे म्हणजे मानव हे नैसर्गिकपणे कृतिशील आणि प्रजनन करणारे असतात. चौथे म्हणजे सर्व मानव समान असतात. पाचवे सर्वात महत्त्वाचे इतिहास साक्षी आहे की, मानव हा त्यांच्या इच्छेनुसार परिस्थितीमध्ये सकारात्मक बदल घडविण्यासाठी सक्षम आहे.

## १४.६ समाजवादाचा अर्थ आणि उगम

समाजवादी शैलीने जगण्याची कल्पना किंवा समुहाने एकत्रीतपणे जगणे ही फार जुनी गोष्ट आहे. प्राचिन परशिया मध्ये आदिम समाजवादी संस्था होत्या. असा विश्वास आहे. प्लेटो आणि ॲरिस्टॉटलच्या राजकिय तत्वज्ञानातील समाजवादी कल्पना ओळखू शकतो. पण हा शब्द वापरात आणण्याचे श्रेय Saint Simon यांना जाते.

उदारमतवादातील अत्यंत महत्त्वाचे तत्व व्यक्तिवाद याचा धिःकार करताना सायमनने ही संज्ञा वापरली. 'egalitarian' सर्व मानव समान आहेत या सिद्धांतावर आधारित समाज स्थापना करत येईल. समाजातील भेदाभेदाच वर्गीकरण, भांडवलशाहीचे इतर दुष्परिणाम काढून टाकता येतील. हे सर्व करण्याची सुवर्ण संधी, विज्ञान आथि तंत्रज्ञानाच्या विकासामुळे मिळेल असा त्याचा विश्वास होता. एका न्याय्य अशा समाज रचनेचा तो खंदा पुरस्कर्ता होता. अशी समाज व्यवस्था ज्यामध्ये प्रत्येक व्यक्तिला त्याच्या कार्यक्षमतेप्रमाणे दर्जा मिळेल आणि सामाजिक उत्पादनामध्ये तो जे योगदान देईल त्याप्रमाणे त्याला reward मोबदला मिळेल. विज्ञान आणि तंत्रज्ञानाच्या अव्यक्त सामर्थ्याच्या जोरावर, तो एका विकसित समृद्ध समाजाची कल्पना करु शकत होता, फक्त अशा साम्यवादी समाजाच्या उभारणीसाठी शासकिय कार्यक्षम प्रशासनाची आणि विस्तारित औद्योगिकरणाची गरज होती.

औद्योगिकरण आणि व्यवस्थापकीय कार्यक्षमता याशिवाय आधिच्या समाजवादी लोकांनीही सूज्ञपणे राबवलेली अर्थव्यवस्था, जी अशा योग्य नियोजनावर आधारित विविधांगी भौतिक आणि शास्त्रीयदृष्ट्या प्रगतीशील असेल असा विचार केला होता.

Robert Owen, charles faurier , Pierre Joseph Proudnon and Lauis Blanc and Saint simon हे चारही प्राचिन समाजवादी विचारवंत आजच्या आधुनिक जगातही मान्यता पावलेले आहेत. औद्योगिकरणामुळे ढवळून निघालेल्या पश्चिमी देशातल्या समाजाची झालेली नागवणूक आणि गरीबी पाहून ते अत्यंत व्यथित झाले होते. हादरले होते त्यांची सद्सद्विवेक बुद्धी त्यांना सतत टोचत होती, त्यांना समाजाची दळभद्री, हतभागी अवस्था सुधारु शकेल अशा युक्तीच्या, खात्रीलायक कायद्याच्या निर्मितिची आवश्यकता वाटली.

परिणामस्वरुप अनेकांनी, आर्थिक सामाजिक सुधारणा करुनच लोकांची भयानक गरीबीतून सुटका करता येईल, असे सुचविले. Rober Owen चा विश्वास होता की, ही अवस्था सुधारु शकेल. समाजाचे छोटे छोटे भाग पाडून आणि ज्यामध्ये कोणाचीही खाजगी मालकी नसेल असे सभासद ठेऊन परिस्थिती आटोक्यात आणता येईल. Owen युक्तीवाद असा करतो की, माणसाचा स्वभाव, विचार आणि कृतिंना सामाजिक वातावरण आकार देते म्हणून तो सामाजिक सुधारणांना समर्थन देतो. Owen च्या या मुद्यांशी Charles Fourier हा दूसरा विचारवंत सहमत नाही. तो व्यक्तिवादाचे समर्थन करीत असे आणि व्यक्तिचे स्वातंत्र्य हेच त्यांच्या मानवि जीवनाचा अविभाज्य भाग आहे. ज्यामुळे त्यांची निर्मितीक्षमता वाढेल इतकेच नाही तर तो आनंदीही होईल. १९व्या शतकाच्या मध्यावर अमेरिका आणि युरोप या दोन्ही खंडामध्ये दोन्ही तऱ्हेच्या विचारधारा (Owen and charles Fourier) च्या कार्यान्वित होत्या. उदा. Owen जो स्वतः कारखानदार होता. त्याने U.S.A खंडात Indian स्टेट मध्ये प्रंचड मोठी जागा खरेदी केली. १८२५ मध्ये तिथे New Harmony नावाची सामाजिक संस्था स्थापन केली. ही एक प्रायोगिक सामाजिक जीवन पद्धती होती. जीमध्ये स्वावलंबन सामुहिक मालकी आणि सहकार्य या तत्वावर व्यवस्था चालत असे प्रयोग फसला. Owen यामध्ये कंगाल झाला. पण Owen हाडाचा समाजवादी असल्यामुळे तो कामगार संघटताना संघटीत करण्याचे, त्याचे सहकारी उद्योगधंद्याना बढौती देणे सल्ला देणे कामात मग्न झाला.

साम्यवाद आणि समाजवादाच्या संकल्पनांमध्ये गोंधळ असू शकतो. कारण मार्क्स आणि एंन्जेल्स स्वतःच्या कल्पना विशद करताना समाजवाद हा शब्द वारंवार वापरला होता. मार्क्सवादाची व्याख्याही, शास्त्रीय समाजवाद अशी केली आहे. जेव्हा या संकल्पनाचे जोरजोरात वादविवाद चालले होते, त्याच काळात हा गोंधळ निर्माण झाला. मार्क्स आणि एंन्जल्सने शास्त्रीय समाजवादाची संकल्पना विकसित करण्यापूर्वी, कितीतरी आधी Saint simon, Rober owen इ. विचारवंत समाजवादी कल्पनांचा प्रसार करत होते. पण मार्क्सीस्ट विचारधारा जुन्या विचारवंतांशी काही बाबतीत सहमत नव्हती. मूख्य फरक हा तर्कनिष्ठ भौतिकवाद, वर्ग कलह, हिंसक क्रांती आणि सरकारी राज्यव्यवस्थेचा विलय; या बाबतीत होता. ही तत्वे आधीच्या समाजवादात सापडत नाहीत. दूसरा मुद्दा, निरीक्षरवादीपणाचा साम्यवाद हा पूर्णपणे भौतिकवादी आहे, जो माणसाच्या अस्तित्वाचे अर्थबोधन करतो; ज्यामध्ये धर्माला स्थान नाही. समाजवाद हा समाजाचे रुपांतर करु इच्छितो, सुधारणांच्या मार्फत तो भांडवलशाहीच्या शोषणातून मुक्त करु इच्छितो. पण साम्यवाद कामगारांच्या हिंसक क्रांतीला समर्थन देतो. मार्क्स मात्र यालाच शास्त्रीय समाजवाद म्हणतो, आणि त्याच्या आधिच्या सर्व संकल्पनांना सुखासीन समाजवाद असे म्हणतो.

**आपली प्रगती तपासा :**

१) समाजवाद म्हणजे काय ?

२) समाजवादाचा उगम आणि व्याख्या यावर चर्चा करा.

---

---

---

---

---

## १४.७ समाजवादाच्या मूलभूत संकल्पना :

साम्यवादा प्रमाणेच समाजवाद हा अशा संकल्पनांवर विश्वास ठेवतो. ज्यात, उत्पादन प्रक्रियेवरील खाजगी कारखानदांराचा मालकी हक्क नष्ट होईल आणि राज्याच्या आर्थिक उत्पादनांवर सरकारचा ताबा आणि निर्बंध राहील. मानव हा सर्वाधिक समाजप्रिय प्राणी आहे आणि म्हणून त्याच्या बऱ्याचशा उत्पादनाच्या क्रिया या समाजातील इतर लोकांच्या सहकार्याने होऊ शकतात. असा समाजवादाचा ठाम विश्वास आहे. या अर्थाने समाज ज्या वस्तू उत्पन्न करतो ते त्या समाजाचे उत्पादन असते. म्हणून सामाजिक उत्पादनावर मालमत्तेवर आणि भौतिक मुल्यावर समाजाची मालकी किंवा नियंत्रण या संकल्पनेचे समाजवाद समर्थन करतो. कारण ते समाजाच्या सहकार्याने निर्माण झालेले असते. भांडवलवादी संकल्पनेच्या संपूर्ण विरुद्ध अशी ही संकल्पना आहे. कारण भांडवलवादी हा खाजगी मालकीच्या उत्पादन प्रक्रियेच्या (कारखानदारीचा) पवित्र हक्कांचा हकदार असतो. त्यातून जमवलेल्या अमर्याद संपत्तीच्या जोरावर सुशिक्षित राज्यकर्ते आणि सामाजिक संस्थांवर हा चिरस्थाई वर्चस्व गाजवू शकतो. उदारमतवादी लोकशाही ही एक राजकीय संकल्पना आहे ज्यामध्ये व्यक्तिस्वातंत्र्य आणि सर्वांना न्याय्य आणि समान संधीचा डंका वाजवला जातो पण बहुतांश वेळा भांडवलवादी वर्गालाच याचा फायदा मिळतो कारण त्या वर्गाकडे शोषण करण्याच्या सर्व भौतिक साधनांची मालकी असते. न्याय आणि समान संधी सर्वांसाठी असे आपण तेव्हाच म्हणू शकतो जेव्हा समाजातले सर्व सभासद सर्व बाबतीत खरोखर समान आहे. ज्या मोठ्या समाजामध्ये, तुलनेने लहान गट, भौतिक आर्थिक उगमाचा ताबा सर्वस्वी स्वतःकडे घेतो, व्यक्ति स्वातंत्र्याच्या आणि समान संधीच्या गप्पा मारतो त्या एखाद्या दुष्ट विनोदा सारख्या क्रूर वाटतात. समाजवाद प्रयत्न करतो कि, खरे स्वातंत्र्या आणि सर्वांना समान संधी तेव्हाच शक्य होइल जेव्हा कारखानदारीचे मालकी हक्क सरकारी नियंत्रणात हस्तांतरीत होतील.

सरकारकडे कोणत्या कलाने ठेवाव्यात आणि कोणती कलमे किंवा विषय खाजगी मालकांकडे असावेत यावर विचारवंतामध्ये एकमत नाही. Sir Thomas More एक प्रसिद्ध इंग्लीश, मानवतावादी, त्यांच्या गाजलेल्या पुस्तकात - 'treatise Utopia' (१५१६) मध्ये असे सुचवितो की, वैयक्तिक उपयोगाच्या काही किरकोळ गोष्टी सोडल्या तर बाकी सर्व गोष्टी सामाजिक असाव्यात. या उलट इतर सामाजिक विचारवंतांना वाटते कि, महत्त्वाच्या सर्व वस्तूंचे उत्पादन हे सामाजिक नियंत्रणाखाली पाहिजे. उरलेल्या कमी महत्त्वाच्या धंदेउद्योगात घरे, शेते, दुकाने इ. साठी वैयक्तिक मालकी असावी.

'Proudhon' प्रसिद्ध फ्रेंच अर्थतज्ञ राजकारणी आणि तत्वज्ञ त्याचे What is property? या प्रबंधात विचारतो (१९४०) आणि जाहीर करतो "Property is theft" याचा अर्थ मालमत्ता म्हणजे चोरी. त्यांच्यामते समाजाच्या निर्मितीमुळे झालेल्या उत्पादनावर त्या समाजातील व्यक्तिचाच एकत्रित हक्क राहील. नैसर्गिक उत्पादन आणि उत्पादनाची इतर साधने ही सहकारी तत्वावरील सहजीवनाकडे वाटचाल करतील. त्याच्यामध्ये समाजातील परस्पर सहसंबंधामुळे वस्तूंची देवाण घेवाण सुलभ होईल. स्वनिर्मित वस्तूंची परस्परांशी करार करुन गरजा भागवता येतील. यामध्ये सरकारी हस्तक्षेप नसेल आधुनिक काळातला Proudhon हा पहिला महत्त्वाचा विचारवंत ज्याने स्वतःला 'Anarchist' बंडखोर म्हणून घोषित केले होते. ज्याच्यासाठी सरकार म्हणजे एक जुलमी संस्था होते. शास्त्रीय साम्यवादही राज्यसंस्था किंवा सरकार बद्दल हेच मत मांडतो.

समाजवादी विचारसरणीप्रमाणे, माल तयार झाला पाहिजे आणि समाजाला त्याच्या जरुरीप्रमाणे सेवा उपलब्द करुन दिल्या पाहिजेत. थोडक्यात उत्पादन आणि सेवांच्या मागील उद्देश समाज उपयोगिता असला पाहिजे. याच्या अगदी उलट विचार भांडवलवादी सरकारचा असतो. उत्पादन प्रक्रियेमागील हेतूच व्यक्तिगत भांडवलदाराला फायदा होणे हा असतो. समाजवादी रचना, उत्पादन प्रक्रिया म्हणजे कारखान्याची मालकी कामगारांच्या सहकारी सोसायटीकडे किंवा समाजाकडे असली पाहिजे. कामगारांचे अंतिम ध्येय हे, समाजासाठी उत्पादनव्यवस्था चालवणे, वस्तूंचे उत्पादन करणे आणि त्याचा फायदा आणि उपयोग समाजासाठी करणे, हे असले पाहिजे. अशा सामाइक सामाजिक मालकीच्या विभागात (कारखान्यामध्ये) व्यवस्थापकीय उच्च नीच स्तर नसावेत. तंत्रज्ञानातील कौशल्याचा दर्जावर कामगारांची वरीष्ठ / कनिष्ठ दर्जामध्ये असलेला फरक या व्यवस्थेला मान्य आहे. मोठमोठ्या तत्वज्ञ, शास्त्रज्ञ, साहित्यिक, राजकारणी, अर्थशास्त्रज्ञ, कलाकार, समाजशास्त्रज्ञ, बुद्धीवंत लोकांची फार मोठी यादी आहे ज्यांची फार पूर्वीपासून समाजवादावर निष्ठा आहे. इथे उदाहरणादाखल आइनस्टाइन काय म्हणतो, ते पाहणे पुरेसे आहे. भांडवलशाहीच्या दुष्ट कारनाम्यापासून मुक्ती मिळविण्याच्या एकमेव मार्ग म्हणजे सामाजिक अर्थव्यवस्थेचे, सुशिक्षित पद्धतीचे व्यवस्थापन करुन समाजवादाकडे वाटचाल करणे होय. अशा प्रकारच्या अर्थव्यवस्थेमध्ये उत्पादन प्रक्रियेची मालकी समाजाकडे असते आणि त्याचा वापर आणि उपयोग योग्य शैलीने होतो नियोजित अर्थव्यवस्था, आपले उत्पादन हे समाजाच्या गरजेनुसार करते. असलेले काम, कार्यक्षम लोकांना वाटून दिले जाते आणि त्या सर्वांनाच, मुले, बायका आणि पुरुषांना जीवनाबद्दलची शाश्वती मिळते. समाजवादी समाजातील व्यक्ति, सत्तेच्या चकमकाटाने आणि यशाने हुरदून न जाता उलट त्या जास्त जबाबदार होतील. शिक्षणाबरोबरच, अंतर्गत क्षमता, कौशल्यांच्या विकासामुळे त्याच्यामधली सहाकाऱ्यांबद्दल जबाबदारीची जाणीव वाढीस लागेल.

**आपली प्रगती तपासा :**

१) समाजवादाच्या मुलभूत संकल्पनांची चर्चा करा.
२) समाजवादाची मूलभूत तत्वे, तूमच्यामते कोणती ते स्पष्ट करा.

## १४.८ सारांश

मार्क्सीझम चे सारभूत आहे, आर्थिक तत्वज्ञान Marxian सिद्धांतामध्ये पुढील तत्वांचा समावेश आहे.

१) इतिहासाचे भौतिक अर्थबोधन
२) सामाजिक बदलाबदल तर्कशुद्ध विचार
३) भांडवलशाहीचे टीकात्मक मुल्यमापन

अर्थात या प्रत्येक तत्वाला अनेक उपमुद्दे आहेत. तर्कशुद्ध मार्क्सवादाच्या सिद्धांतानुसार, जगात सामावलेल्या सर्व वस्तू ह्या नैसर्गिक असतात म्हणून त्याला निसर्गाचा न्याय लागू पडतो. जरी मार्क्सने तर्कवाद Hegel कडून उचलला असला, तरी त्याने भौतिकवादाच्या समर्थनार्थ वापरलेल्या संकल्पना मार्क्सला मान्य नव्हत्या. मार्क्स आणि एजेंल्सने स्वतःची शास्त्रीय आणि तत्वज्ञानिक भौतिक संकल्पना विकसित केली, जग ही एक भौतिक संकल्पान आहे जी एकत्रितपणे समजली जाऊ शकते. उत्पादन प्रक्रियांची मालकी ज्यांना भौतिक मूल्य आहे त्याचाच बळावर सामाजिक बदल घडवून आणता येतो. ऐतिहासिक भौतिकवादाप्रमाणे पाच तऱ्हेच्या उत्पादन प्रक्रियांचे सहसंबंधची इतिहासात व्याख्या सापडते. उदा. प्राचिन सामुहिक, गुलाम, उमराव, भांडवलवादी, समाजवादी.

भांडवलाचे साम्यवादी समालोचन हा एक महत्त्वाचे भाग आहे. मार्क्सवाद-म्हणजेच साम्यवाद ठामपणे म्हणतो. जरी भांडवलवाद कितीही विकसित झाला तरी केव्हा ना केव्हा तो कोसळणारच, त्या अंतर्गत असलेल्या विरोधाभासामुळेच तो कोसळेल. त्यामध्ये कामगार-उत्पादन यामध्ये वस्तू निवृत्ती मध्ये रुपांतर होते जे कामगाराच्या व्यक्तिमत्त्वाचे अवमूल्यन करते. भांडवलशाही मध्ये अतिरिक्त मूल्य ही अजून एक महत्त्वाची संकल्पना आहे. हे अतिरिक्त मूल्य कामगारांच्या श्रमातून निर्माण झालेले असते. पण ते थेट मालकाच्या खिशात जाते. यालाच मार्क्स शोषण म्हणतो. अशा तऱ्हेचे बहुतेक औद्योगिकरण झालेल्या समाजांमध्ये हे शोषण अत्यूच्च बिंदूपर्यंत पोहोचते. कारखानदार आणि कामगार या दोन वर्गातील कलह अपरिहार्य आहे. भांडवलवादाची ऐन अखेर कामगाराच्या हिंसक क्रांतीमुळेच होईल. तद्नंतर तात्पुरती व्यवस्था म्हणून कामगारांची हुकूमशाही प्रस्थापित होईल. त्यानुसार वर्गहिन विशिष्ट दर्जा विरहित एकसंघ असा समाज निर्माण होईल.

सरकारी नियंत्रणाखालील बाजारपेठा आणि उत्पादन प्रक्रियेची (कारखान्याची) मालकी समाजाकडे आणि खाजगी मालकि ह्यांचा रद्दबादल ठरवणे. इ. संकल्पनांचे समाजवाद समर्थन करतो. ह्या समाजवादी संकल्पना फार पूर्वीपासून प्रचलित आहेत, ज्या प्लेटो आणि ॲरीस्टॉट्लच्या लिखाणात सापडतात. आधुनिक युगात Saint Simon Robert Owen, Charles Fourier, Prouhon and Louis Blanc सारख्या विख्यात विचारवंतांनी समाजवादाची संकल्पना विकसित केली आहे. साम्यवाद आणि समाजवादामध्ये काही मुद्दे समान आहेत. परंतू भांडवलशाहीचे समाजवादी व्यवस्थेमध्ये रुपांतर करण्याच्या दोघांच्या पद्धतीमध्ये त्यांच्या विचार सरणीमध्ये तफावत आहे. हिंसक क्रांति ऐवजी सामाजिक आर्थिक सुधारणाद्वारे समाजाचे विकसन होणे, उत्क्रांत होणे, समाजवादी समर्थनीय मानतात.

## १४.९ पाठावरील प्रश्न

१) साम्यवादाच्या पायाभूत तत्वांची चर्चा करा.
२) साम्यवादाचे टीकात्मक परीक्षण करा.
३) समाजवादाची व्याख्या करा आणि त्यांच्या मूख्य तत्वांची चर्चा करा.
४) साम्यवाद आणि समाजवादाचा तूलनात्मक अभ्यास करा.

❖❖❖❖

# १५

# फॅसिझम-जमातवाद, गांधीवाद
# (FASCISM, COMMUNITARIANISM, GANDHISM)

**पाठ्य रचना :**

१५.० उद्दिष्ट्ये
१५.१ प्रस्तावना
१५.२ 'फॅसिझम' या शब्दाचा उगम आणि व्याख्या
१५.३ 'फॅसिझम' ची पायाभूत तत्त्वे
१५.४ जमातवादाशी ओळख
१५.५ 'जमातवाद' शब्दाचा उगम आणि विकास
१५.६ जमातवादाच्या मूलभूत संकल्पना
१५.७ गांधीवादाची ओळख
१५.८ गांधीवादाच्या मूलभूत संकल्पना
१५.९ सारांश
१५.१० पाठावरील प्रश्न

## १५.० उद्दिष्ट्ये

१) फॅसिझम च्या तत्त्वांची व्याख्या आणि उगम समजून घेणे.
२) जमातवाद या संकल्पनेच्या अर्थाचे आकलन करणे.
३) गांधीवादाच्या महत्त्वाच्या तत्त्वांचा अभ्यास करणे.

## १५.१ प्रस्तावना

'फॅसिझम' ही एक राजकीय संकल्पना. जिला कठोर आणि नकारात्मक अर्थ प्रतित करणारा अर्थ आहे. 'फॅसिझम' ची भूमिका, अमूलाग्र बदल करणारी जहाल कट्टर राष्ट्रवादी, हुकूमशाही सरकारची आहे. एकवंशीय एक सांस्कृतिक व्यक्तीनी बनलेली समाज रचना असलेले राष्ट्र उभे करणे हे 'फॅसिझम' चे ध्येय आहे. जिचे सरकार एक पक्षीयच असेल. हे सरकार आपल्या अधिपत्याखालील, राष्ट्रीय नागरिक विशिष्ट शुद्ध वंशाचे असतील. तसेच mix race चे म्हणजे संमिश्र वंशाच्या संततीचा, इतर वंशीय लोकांचे असित्वाचा तिरस्कार करतील. थोडक्यात त्यांना 'बहुल' विविध संस्कृतिचे किंवा वंशाचे लोक आपल्या राष्ट्रात नको आहेत. त्यांना 'एकाक्ष' फक्त एकवंशीय लोकांचे राष्ट्र उभे करायचे आहे जे शारिरीकदृष्ट्या मजबूत

असतील. ज्यातील लोक राष्ट्राच्या समृद्धीसाठी आणि गौरवासाठी कशाचाही स्वार्थत्याग करायला तयार असतील. अशा समाजाचे (सर्व लोकांचे) या सिद्धांतरोपण करुन मग त्यांचा उपयोग अल्पसंख्यांकाना नामोहरम करण्यासाठी किंवा त्यांना नष्ट करण्यासाठी, त्यांना 'इत प्रदेशाचे' किंवा इतर धर्माचे इतर संस्कृतिचे ठरवून त्याचे खच्चीकरण करण्यासाठी वापरायचे धोरण 'फॅसिझम' चे होते.

राजकीय संकल्पना म्हणून, 'फॅसिझम'चा उदय युरोपमध्ये झाल्याबरोबर त्याने प्रथम इटली आणि मग जर्मनीमध्ये हैदोस घातला. ह्या घटना विसाव्या शतकाच्या पहिल्या पन्नास वर्षात झाल्या. फॅसिझम ही विचारप्रणाली चळवळ म्हणून पहिल्या महायुद्धाच्या काळात इटलीमध्ये एका राजकिय गटाने सुरु केली. जो स्वतःचा (Syndicates) 'राष्ट्रीय कार्यकारी मंडळ' म्हणवण्यात यावे असे म्हणाला. फॅसिझम 'उजव्या' आणि डाव्या या पैकी कोणालाच विचारसरणीचे सिद्धांत मान्य नव्हते कारण त्यांचा राजकीय कार्यक्रम संपूर्णतः निराळा होता. त्यांच्या मुख्य जोर, एकपक्षीय, राष्ट्रीय कार्यकारणीचे सरकार स्थापण्यावर होता. कार्यकारणीतील सभासद हे अर्थातच फॅसिस्ट ज्यांना हलक्या दर्जाचे समजतात, त्यांच्यापेक्षा उच्च दर्जाचे, नैसर्गिकच उच्च वंशाचे उच्च संस्कृतिचे असायचे. जरी फॅसिस्ट स्वतः राजकीय कार्यक्रम 'उजव्या' पेक्षा वेगळा असल्याचे सांगतात तरी त्यांच्या कार्यवाहीत त्यांचा अति उजवेपणाच दिसून येतो.

## १५.२ फॅसिझमची व्याख्या आणि त्याच्या उत्पत्ती विषयक :

मुळ लॅटिन शब्द Fasces याचा अर्थ 'प्रतिमेचे वर्णन', एका कुऱ्हाडीला बांधलेला लोखंडी गजांचा एक जुडगा, हे नागरी न्यायाधिशाचे प्राचिन रोममधले 'चिन्ह' होते. यातून 'एकी हेच बळ' हे समजून येते. ही गोष्ट तर सर्वश्रृत आहे कि एकच काठी ही कितीही तुकड्यांमध्ये मोडू शकते पण तीच काठी एखाद्या अनेक काठ्यांच्या समुहाचा भाग बनली तर सहजी तुटणार नाही. फॅसिझमच्या नावाने, वीसाव्या शतकातले त्याचा बोलबाला करणारे लोक, इटलीच्या लोकांना त्यांच्या ऐतिहासिक गौरवाची आठवण करुन देत होते. इटली देश हा एक वंशीयच होता जो शिस्तबद्ध, बळकट होता. संपूर्ण युरोप, काही भाग एशिया आणि आफ्रिकेवर त्यांचे राज्य होते आणि ते योद्धे इतर वंशियापेक्षा श्रेष्ठ होते. असा गोष्टी सांगून इटलीच्या लोकांची भावनिक एकी साधण्याचा हेतू या fasist लोकांचा होता. शुद्ध वंशाच्या प्रामाणिक इटालियन नागरिकांना त्यांचे गन वैभव प्राप्त होईल जर ते फॅसिस्ट नेत्यांची, इटालियन लोकांना फसवण्यासाठी पूर्ण कावेबाज, चाणाक्ष चाल होती.

एकोणिसाव्या शतकात इटलीमध्ये उदयास आलेल्या 'फॅसिझम'ची व्याख्या, विद्वानांनी वेगवेगळ्या संज्ञांमध्ये केली आहे. अशाच संकल्पना विविध संकल्पना इतर देशातही दिसून आल्या ज्या मूळ इटालियन फॅसिझमपेक्षा बऱ्याच वेगळ्या होत्या. Roger Griffin यांच्या व्याख्येनुसार 'फॅसिझम' हा अस्सल क्रांतीकारी, उदारमतवादाविरुद्ध असलेला, 'वर्गबद्दल'आणि शेवटचे विश्लेषण म्हणजे परंपरावादी राष्ट्रवादा विरुद्ध आहे. सांस्कृतिक आणि वांशिक अच्यूत्वतेचे कल्पनामूळ 'फॅसिझम' मध्ये आहे. मुसोलिनीच्या शब्दात 'फॅसिझम' हे एक क्रांतीकारी तत्त्व आहे जे उदारमत वादाच्या विरुद्ध आहे. कारण त्याला राज्याचा आकार त्याच्या कार्यवाहीसाठी मर्यादित ठेवायचा आहे. दुसरा एक तज्ञ, Robert Paxton त्याच्या The Anotomy of Fascism मध्ये फॅसिझम म्हणजे काय हे विस्तृतपणे सांगतो. उतरती कळा

लागलेल्या समाजाला अपमानीत करुन किंवा विजयश्री चे चित्र उभे करुन, एका विशिष्ट राजकीय प्रणालीने भारुन टाकून त्यांना एक नवीन टूम ज्यात एकी, स्फूरण आणि पावित्र आहे अशा एक सामाजिक पक्ष आहे. जो लढाऊ राष्ट्रवादीचा आहे. तो फारसा नैसर्गिकरित्या स्वस्थ नाही. पण पारंपारिक बुद्धीमंताशी परिणामकारक हात मिळवणी करुन, लोकशाहीतील स्वातंत्र्याला तिलांजली देऊन, नीती अनिती किंवा कायद्याच्या विचार न करता, हिंसक मार्गाने अंतर्गत सफाई आणि बाह्य विस्तार करण्याच्या मनोदय ठेवतो तो खरा फॅसिस्ट.

वरील प्रातिनिधीक व्याख्यावरुन आपल्याला हे समजले की, फॅसिझम ही इतर राजकीय संकल्पना सारखी संकल्पना आहे जी उदारमतवाद, साम्यवाद आणि परंपरावाद या सर्वानाच नाकारते. त्यांची दूसरे लक्षणे म्हणजे त्यांचे ध्येय, एका अशा राष्ट्र उभारणीचे होते ज्यामध्ये बाह्यात्कारी उच्च वंशाचे, उच्च संस्कृतीचे लोक नागरिक असतील ज्यांचे सरकार एकपक्षीय आणि हुकूमशाही पद्धतीचे असेल. तिसरे म्हणजे त्यांना आपल्या राष्ट्रात दूसऱ्या वंशाचे दूसऱ्या धर्माचे किंवा दूसऱ्या संकल्पना असणाऱ्या अल्पसंख्यांक जमाती नको होत्या. या इतराना गुलाम करावे किंवा पूर्ण नष्ट करावे. चौथे लक्षण आर्थिक व्यवहार हे हुकूमशहाच्या अख्यत्यारीत (ताब्यात) राहतील त्यामुळे 'फॅसिस्ट राज्य' पुढे समृद्ध आणि कारखानदारीत अग्रेसर होण्यास उपयुक्त होईल. फॅसिस्ट हे सामान्य लोकांपुढे, गतवैभवाचे रम्य चित्र उभे करीत. आणि आपल्या राजकीय संकल्पनेला लोकांचा पाठिंबा मिळवत. सहावे लक्षण, इतर वंशा, धर्माच्या लोकांविरुद्ध हिंसक व्हायला प्रवृत्त करुन ज्यायोगे, फॅसिस्ट राष्ट्र स्वच्छ होईल. तसेच इतर राष्ट्रे, जिथे निम्न स्तरीय वंशाच्या लोकांचे सरकार आहे त्यावर हल्ला करुन, लढाया करुन आपले राष्ट्र विस्तार करण्यास उत्तेजन देत असत शेवटी फॅसिझम आपल्या संकल्पनेचा प्रसार करताना, आपली राजकिय संकल्पना, युवकांना आकर्षित करण्यासाठी म्हणतात, 'एका अशा समाज स्थापनेसाठी, जीमध्ये बलदंड, मर्दानी, मॅचो पुरुष स्वामित्व गाजवतील.'

**आपली प्रगती तपासा :**

१) फॅसिझम म्हणजे काय ?

२) फॅसिझमची व्याख्या करा आणि त्याच्या लक्षणांची चर्चा करा.

## १५.३ फॅसिझमची मूलभूत तत्त्वे :

फॅसिझमचे सिद्धांत आणि त्यांचे बनिटो मुसोलिनीने आणि नाझी जर्मनीच्या ॲडॉल्फ हिटलरने केलेले 'उपयोजन' पाहिल्यावर आपण फॅसिझमच्या गाभ्याच्या तत्त्वांना ओळखू शकतो. त्यांचे सर्वात महत्त्वाचे तत्त्व म्हणजे राष्ट्रवाद. एका भौगोलिक परिसीमेंतर्गत असलेले जे कट्टर राष्ट्रवादाने मंतरलेले आहे. फॅसिझमचा असा विश्वास आहे कि, राष्ट्र कमजोर होते.

कारण त्यामध्ये विविध धर्म, संस्कृति आणि निम्न वंशाचे अल्पसंख्यांक, बहुसंख्य उच्चवंशिय समाजामध्ये वास्तव्य करतात. ह्या इतर अल्पसंख्यांकाच्या एकाच सीमेमध्ये वास्तव्याचा परिणाम म्हणून त्यांच्यामध्ये सांस्कृतिक आणि वांशिक झगडे होतात. ज्यामुळे राष्ट्र कमजोर होते अशा तऱ्हेने साम्यवाद्यांच्या वर्ग कलहाप्रमाणेच पण त्याऐवजी फॅसिस्ट 'सांस्कृतिक आणि वांशिक' कलह समाजात चालू राहतो असे म्हणतात. फॅसिस्टांची राष्ट्राची संकल्पना म्हणजे एका वंशाचा लोकांचा समुह, ज्यांचे एका भौगोलिक प्रदेशात बहुसंख्येने वास्तव असते. ज्यांचा धर्म आणि संस्कृति एक असते. त्यांचे असे मत आहे की, अशाच लोकांचा एकमेकांशी भावनिक आणि आत्मिक सहसंबंध शक्य आहे असेच लोक अशा देशात वास्तव्य करतात. आमच्या साठी देश म्हणजे फक्त भूप्रदेशच नाही तर काहीतरी आध्यात्मिक असते. देश तेव्हाच महान होतो जेव्हा त्याच्या मागे अशा आत्मिक बळाचा जोर असतो.

परराष्ट्र संबंधाविषयी 'फॅसिस्ट' सरकार उघडपणे 'विस्तार आणि दुसरे देश ताब्यात, नियंत्रणात ठेवणे या योजनांचा संपूर्ण परराष्ट्र धोरणाचा भाग म्हणूनच विचार करते. एका उत्साही, शूर, हिंगवान, राष्ट्रासाठी आवश्यक लक्षणांनी युक्त असे सरकार या दृष्टिकोनातून 'फॅसिस्ट' 'साम्राज्यवादाकडे' बघतात. १९३२ च्या Italian Encyclopedia मध्ये नमून केल्याप्रमाणे, राष्ट्राची साम्राज्यवाद म्हणजे साम्राज्याचा विस्तार हा फॅसिझमच्याही अत्यावश्यक अशी जाहिरनाम्यातली चेतना आहे. "साम्राज्य विस्ताराला विरोध म्हणजे राष्ट्राला उतरती कळा लागणे" असे फॅसिस्टांचे मत होते. वीसाव्या शतकाच्या प्रथमार्धात, आणि निरक्षण म्हणजे दोन जागतिक युद्धांच्या कालखंडात याच विशिष्ट तत्त्वामुळे (साम्राज्य विस्तार) फॅसिझम ने प्रचंड मालमत्ता आणि समाज (प्रचंड लोकसंख्या) उजाड केली, फक्त युरोपमधये नव्हे तर जगाच्या इतर भागातही. दोन महायुद्धांच्या मधल्या काळात जर्मनीने 'फॅसिझमचा' अत्यंत वाईट चेहरा पाहिला. नाझी हिटलरने निर्लज्जपणेपण त्याच्या तत्त्वज्ञानानुसार, साम्राज्य विस्तार करत होता कारण त्याला जर्मन राष्ट्रासाठी लोकांना जगायसाठी जागा निर्माण करायची होती. फॅसिस्ट साम्राज्य विस्तारासाठी, इतर भूप्रदेश बळकावणे हे सैनिकी कार्यवाही, हिंसक चळवळी शिवाय शक्य होणार नव्हत. 'फॅसिस्ट' तत्त्वाप्रमाणे सैनिकी कारवाई अग्रेसरपणे करणे आणि बळाचा वापर करणे हे सरकारचे सद्‌गुण होते. शांती आणि अहिंसा ही दूबळ्या राष्ट्रांची लक्षणे आहेत, असे ते मानत. मुसोलिनी म्हणतो, माणसातली सर्वाधिक उर्जा ही लढाईच्या काळात दिसून येते. कारण युद्ध काळात सैनिक मानसिक दडपणाखाली असतात. ज्यावर लोक वीरतेचा शिक्का मारतात. त्यामुळे ते लढाईला सामोरे जाण्याचे धाडस दाखवतात.

फॅसिझमचे तिसरे महत्त्वाचे तत्त्व म्हणजे, एक अनियंत्रित सरकारी यंत्रणा, जी उदारमतवादी लोकशाहीच्या विरोधात असेल व जिचा एकपक्षीय हुकूमशाही कारभार असेल. एकपक्षीय हुकूमशाहीचे चित्र रंगवताना मुसोलिनी म्हणतो, "फॅसिझम च्या 'राष्ट्रविषयक संकल्पनांमध्ये' सर्व कल्पनांचा समावेश आहे. त्या बाह्य कोणतीही मानवी किंवा अध्यात्मिक संकल्पना अस्तित्वात नाही. थोडक्यात सरकार, हा सर्व मूल्यांचे एकीकरण करणारे, अर्थ बोधन करणारे, सर्व लोकांच्या जीवनाचे संभाव्यक्त दर्शवणारे एकमेव घटक आहे अशा तऱ्हेच्या, हुकूमशाही सरकारचे राजकीय शासन, परिणामकारक असेल, फॅसिस्टांची राजकीय कार्यक्रम यशस्वी आणि परिणामकारकरीत्या राबवणे हे लोकशाही सरकारला जमणार नाही. म्हणूनच ते लोकशाही नाकारतात. दोन महायुद्धाच्या मधल्या काळात, 'फॅसिस्ट' ने असा प्रचार केला की, 'बहुल प्रजा' असल्यामुळे जर्मनीला युद्धात फार त्रास सहन करावा लागला. तसाच त्रास पुढे भोगावा लागेल जर कडक कायदे आमलात आणले नाही तर." Carl Schmit नाझी सिद्धांतवादी निरीक्षण करतो, एक असे मजबूत सरकार, ने राजकीय एकात्मतेची पूर्णता

करण्याची खात्री देते. आणि विभिन्नतेला मागे टाकेल. तसेच जे जर्मनामध्ये फूट पाडतात अशा अनर्थकारक अनेक तत्त्ववाद्यांना दूर सारते. ते खरे 'फॅसिस्ट' कोणीही लोक-पुढारी जो 'निर्दय' असेल त्याला फॅसिस्ट आपला राज्याचा प्रमुख करतील. ज्याचे हुकूम निर्विवादपणे सर्वांनी पाळले पाहिजेत. आणि फॅसिस्ट राज्याचा 'नेता' म्हणून त्याने केलेली सर्व कार्यवाही ही जनतेच्या आक्षेपा बाहेर राहील. म्हणजेच जनतेला उत्तरे देण्यास तो बांधील नाही. जनता त्याच्या कोणत्याही कृतीची निंदा करु शकणार नाही. म्हणून 'मुसोलिनी' हा असा नेता होता, Duce in Italy आणि Hitler Fuhrer in Germany.

४ थे लक्षण म्हणजे डार्विनच्या 'सामाजिक सिद्धांता'नुसार फक्त शारीरिक दृष्ट्या आणि सामाजिक दृष्ट्या बळकट असलेल्या राष्ट्रांनाच दुर्बल लोकांचा भूप्रदेश हिरावण्याची, त्यांच्यावर राज्य करण्याचा अधिकार आहे. हे फॅसिझमचे पण तत्त्व आहेच. बळकट राष्ट्राच्या निर्मितीसाठी इतर धर्मीय, इतर वंशीयांना नष्ट करणे जरुरी आहे. कारण ते केवळ 'इतर म्हणजे वेगळे नाहीत, तर नीच आणि कमजोर ही आहेत.' डार्विनच्या म्हणण्याप्रमाणे सगळ्यात शारीरिक दृष्ट्या बळकट असेल तो टिकेल या नियमाला धरुन फॅसिस्ट म्हणतात, कणखर आणि कर्तृत्ववान वंशीय लोकांनाच कमजोर लोकांवर वर्चस्व गाजवायचा नैसर्गिक अधिकार आहे. एक इटालियन फॅसिस्ट लेखक Alfred Rocco सामाजिक सहसंबंध हेही जीवशास्त्रीय संबंधासारखेच असतात. वास्तविक पाहता 'विरोध' किंवा 'झगडा' हा जीवनाचा मूलभूत पाया आहे. समाज स्थापन होतो. बळकट होतो. आणि कलहातून विकसित होत जातो. या झगड्यात कमजोर लोकांवर बलदंड शक्तिशाली लोक जबरदस्ती करतात. अशा तऱ्हेने स्वाभाविक राष्ट्र उदयास येते, आणि विरोधातून वंश स्थापित होतात. नाझी जर्मनी मध्ये बहुतेक लोक आर्यन वंशाचे होते, जे लढाऊ वृत्तीचे म्हणून ओळखले जात, ज्यांना नैसर्गिक अधिकाराने 'कमजोरा' ना आधीन करण्याचा, ताब्यात ठेवण्याचा हक्क होता आणि संपूर्ण जगावर अधिपत्य गाजवण्याचा अधिकार होता. नाझी जर्मनीचे एक बलाढ्य राष्ट्र उभारण्यासाठी, एका अंदाजाप्रमाणे तीन लाख, शारीरिकदृष्ट्या दुर्बळ आणि पंगू लोकांचे हत्याकांड करण्यात आले.

'फॅसिझम' तरच फोफाऊ शकेल जर त्याच्या तत्त्वांचा गाजाबाजा, निरनिराळ्या कार्यक्रमातून केला जाईल. म्हणून त्याची ५ वे महत्त्वाची लक्षणे म्हणजे, शिक्षण, प्रसार माध्यमांचा अत्याधिक उपयोग करुन लोकांच्या मनात ही तत्त्वे बिंबवणे, त्यावर जनतेला भाषणे देणे आणि लिखित साहित्य पुरवणे हे होते. ह्या गवगवा करणाऱ्या शस्त्राचा परिणामकारक वापर, जर्मनीच्या 'नाझींनी' आणि इटलीच्या फॅसिस्टनी पुरेपूर करुन घेतला. 'शिक्षणावर संपूण नियंत्रण ठेवणे हा अत्यंत महत्त्वाचा मुद्दा 'फॅसिस्ट' प्रणालीचा होता. त्यामार्गाने जर्मनीच्या गत वैभवाच्या खोट्या नाट्या गोष्टी, शालेय पाठ्य पुस्तकात छापवून, एक नवीन, शुद्ध वंशाची पिढी, जी 'फॅसिस्ट' तत्त्वांशी बांधील राहील, अशी घडवणे हा त्यांचा प्रमुख उद्देश होता. स्वराष्ट्राचा गत वैभवाच्या आणि महानतेच्या खोट्यानाट्या गोष्टी पसरवण्या पलीकडे फॅसिस्ट आणखी एक गैर लागू मतप्रसार करत तो म्हणजे अल्पसंख्याक समाजातील लोकांना, अल्पसंख्यांक धर्मियांना वा अन्य सांस्कृतिक गटांना त्यांनी न केलेल्या गुन्ह्यांसाठी, त्यांनी न केलेल्या विश्वासघाताबद्दल, न केलेल्या राजद्रोहाबद्दल दोषी ठरवत तसा मत प्रसार करत. शत्रू म्हणून अत्यंत हीन, वाईट राष्ट्रद्रोही अशी प्रतिमा निर्माण करण्यासाठी फॅसिस्टना 'Other' म्हणजे इतर अल्पसंख्यांकाची गरज होती. ज्यामध्ये ते स्वतः नैसर्गिकपणे वरीष्ठ असल्याचे ह्या इतरांहून उच्च आहेत सिद्ध करायचा प्रयत्न करीत. खोट्या नाट्या, दांभिक गोष्टी सांगूनच 'फॅसिस्ट' तत्त्वांचा प्रसार शक्य होता. 'फॅसिस्ट', इतर कोणत्याही संकल्पना, ऐतिहासिक संदर्भ, हे निर्विकारतेन शास्त्रीय आणि वस्तूनिष्ठतेने अभ्यास करण्याच्या पद्धतीचा तिरस्कर

करत. फॅसिझम हा बुद्धीवादी, विद्यापीठीय संस्कृतीच्या अत्यंत विरोधात होता. हिटलर, प्रोफेसरांचा आणि विद्यापिठांचा तिरस्कार करत असे. तो आपले मत मांडतो, "मी जेव्हा आपल्याकडील बुद्धीमान वर्गाकडे (समाजाकडे) बघतो. तेव्हा, दुर्दैवाने मला असे वाटते की, ते लोक आवश्यक आहेत. नाहीतर एखादे दिवशी मला माहित नाही मी त्यांना समूळ उखडून टाकिन; किंवा दुसरेच काही ...... (अर्थात काय ते स्पष्ट आहे पण दुर्दैवाने ते लोक म्हजे बुद्धीवादी आवश्यक आहेत)."

फॅसिस्ट साम्यवाद आणि भांडवलवाद दोघांना नाकारतात. त्याऐवजी ते देशात, त्यावेळी जी आर्थिक परिस्थिती असेल त्याप्रमाणे दोन्हीतील (साम्य आणि भांडवल) वादातील कलमे उपयोगात आणतील. इटलीमध्ये विकसित झालेल्या आर्थिक व्यवस्थेला 'corporatism' म्हणत असत ज्यामध्ये देशाचे आर्थिक व्यवहार सामुहिकपणे, मालक, कामगार आणि सरकारी अधिकारी मिळून करत असत. जरी फॅसिझम हा साम्यवादाच्या कट्टर विरोधक असला तरी मोठ्या प्रमाणातील खाजगी कारखानदारी मोडून काढणे हे त्यांचे ध्येय्य होते. 'फॅसिझम' खाजगी उद्योगधंद्यावर आणि मालमत्तेवर सरकारी नियंत्रण असावे असे मानतो. पण तो त्याचे 'राष्ट्रीयीकरण' करावे असे म्हणत नाही. वर म्हणण्याप्रमाणे फॅसिस्ट एक विशिष्ट अर्थ विषयक मतप्रणाली मानत नाही. ते त्या आर्थिक योजना, परिस्थितीनुरुप बदलू शकतात. उदा. नाझी जर्मनीमध्ये काही उद्योगधंद्याचे राष्ट्रीयीकरण झाले होते. तर काही उद्योगधंदे संपूर्ण नियंत्रणात होते. Corporatism च्या सिद्धांताप्रमाणे खरे तर 'फॅसिस्ट' आर्थिक यंत्रणेमध्ये, कामगारांना पण मालक आणि सरकारी सभासदाप्रमाणे अधिकार हवेत पण वास्तवात संपूर्ण नियंत्रण हे मालकाकडे आणि सरकारी अधिकाऱ्यांकडेच धंद्याचे संपूर्ण नियंत्रण असते.

हिटलर हा कामगारांना अधिकार देण्याच्या, कट्टर विरोधात होता. १९३४ मध्ये त्याने एक कायदा केला. त्याचे नाव Law for the ordering of National Labour. या कायद्याने कामगार संघटना पूर्णपणे दडपल्या गेल्या होत्या. त्यांना कामगारांचे वेतन ठरविण्याचे किंवा कामाच्या अटी ठरविण्याचे अधिकारही नाकारले गेले होते. अर्थ खात्याची रचनाच अशी केली होती की, सरकारचे अधिकार वाढत जावेत आणि 'फॅसिस्ट पक्षाच्या संकल्पनेचा प्रसार व्हावा. सरते शेवटी सर्व कामगार संघटना त्यानुषंगाने असणाऱ्या संस्थांवर फॅसिस्ट पक्षाचे नियंत्रण आले. मुक्त व्यापाराचे त्यांनी कधीच स्वागत केले नाही. पण महामंदीनंतर तर ते त्याचे (मुक्त बाजारपेठेचे) प्रखर विरोधक बनले. भांडवलवादी सत्तावर, व्याज आकारणे, नफेखोरी मुक्त बाजारपेठ इ. चा फॅसिझमने धिक्कार केला. इतका प्रखर विरोध होण्याचे कारण, सर्व आर्थिक व्यवहार ज्यू लोकांच्या नियंत्रणात होते. त्यांना निम्न वंशाचे, निम्न धर्माचे, निम्न संस्कृतिचे समजले जाई. जे 'ज्यू'लोकच होते तेच उच्च आर्यलढाऊ वंशीयांच्या 'भौतिक साधनांना लुबाडत होते. ह्या बांडगुळ किंवा टारफूला सारख्या 'ज्यू' जमातीला आणि ते करत असलेल्या उद्योगांकडे अत्यंत तिरस्काराने बघितले जाई. फॅसिझम व्यक्तिपेक्षा समाजाला जास्त बांधलेला आहे कि खाजगी मालमत्तेचे नियंत्रण असे करायला हवे की त्याचा फायदा जास्त करुन राष्ट्राच्या मदतीसाठी झाला पाहिजे, व्यक्तिच्या नाही, तसेच फॅसिझम संपूर्ण राष्ट्रीयीकरण किंवा कामगार सेना सुद्धा योग्य मानत नाही. इतर प्रत्येक बाबीप्रमाणे आर्थिक व्यवहार हे सुद्धा राष्ट्राच्या उन्नतीसाठी राष्ट्राच्या निर्मितीसाठी, राष्ट्राच्या फायद्यासाठी वापरले गेले पाहिजेत.

तात्पर्याने पाहता, असे म्हणता येईल की, 'फॅसिझम' ही एक अमानवी, पाशवी, धोकादायक राजकीय संकल्पना आहे. ही संकल्पना, एका शुद्ध, सर्वोच्च आणि लढाऊ वंशाचा, सर्व जगावर राज्य करण्याचा नैसर्गिक अधिकार असलेला सिद्धांत गृहित धरले. या तथाकथित

सर्वोच्य वंशीयांना इतर अशक्त, क्षुद्र वंशियांना, त्यांच्या जमीनींना ताब्यात घेण्याचा त्यांचा छळ करण्याही हक्क आहे असे मानते. असे हास्यापद फोल दावे हे, इतिहास आणि शास्त्रीय कसोट्यांवर खरे उतरणारे नाहीत. चाकाच्या शोधापासूनच जगातील सर्व लोकसंख्या ही प्रगती पथावर आहे. शास्त्र आणि तंत्रज्ञानाच्या प्रचंड विकासामुळे सर्व थरातील लोकांचे चलन वलन वाढले. अंतरराष्ट्रीय युद्धे, अंतरराष्ट्रीय व्यापार आणि साम्राज्यशाहीमुळे सगळीकडेच वंश-संकर झालेला आहे. त्यामुळे कोणताही एक वंश हा सर्वार्थाने उच्च आणि शुद्ध असल्याचा दावा करु शकत नाही. 'फॅसिझम' ही एक अत्यंतिक हिंसक, लढाऊ, राजकीय संघटना आहे, जिच्या मुळे कल्पनातीत हानी आणि दुःख वेदना, यातना सर्व जगालाच, पण विशेषतः युरोपला भोगाव्या लागल्या आहेत. 'फॅसिझमचे' खंदे प्रचारक 'मुनोलिनी' आणि 'हिटलर'ही दोन्ही व्यक्तिमत्त्व सर्व जगातल्या सुसंस्कृत लोकांकडून तिरस्कार पात्र झाली. त्यांच्या एवढा तिरस्कार दूसऱ्या कोणाचा झाला नाही.

**आपली प्रगती तपासा :**

१) 'फॅसिझम' ची प्रमुख तत्त्वे सांगा.
२) 'फॅसिझम' च्या तत्त्वांची चिकीत्सापूर्ण परीक्षा करा.

---

---

---

---

---

## १५.४ जमातवादाशी ओळख

उदारमतवादाचे अस्सल बोध चिन्ह म्हणजे 'व्यक्तिचे स्वातंत्र्य'. या मताच्या अतिरिक्त प्रसाराला विरोध करण्यासाठी 'जमातवादाची' संकल्पना विकसित झाली. व्यक्ति आणि समाज यांचे परस्पर सहसंबंध 'जमातवाद' अधोरेखित करतो. समाजाच्या गैरहजेरीत, व्यक्तीचे टिकून राहणे जवळ जवळ अशक्य आहे. या तत्त्वाचा ते पाठपुरावा करतात. 'कुटुंब' म्हणजे समाजाचेच एक संकुचित रुप असते. तरीही 'समाज' या शब्दाशी सांस्कृतिक, धार्मिक, वंशिय किंवा भौगोलिक समाज असा गर्भितार्थ असू शकतो. सभासदांच्या ऐतिहासिक वारसा एक असू शकतो. उदारमतवादा मध्ये असलेल्या त्रृटींना, कमतरतांचा विचार करताना 'जमातवाद' या संकल्पनेचा उदय झाला. जमातवादाचे विचारवंत, तथाकथित राजकिय उदारमतवादाच्या, विश्वव्यापकतेच्या संकल्पनेला नापसंत करतात. John Rowel ची 'न्यायाची संकल्पना' जमातवादी विचारवंत आवेशाने खोडून काढतात, कारण जॉन च्या संकल्पनेप्रमाणे सर्व मानव जातीसाठी समान सामाजिक न्याय ही संकल्पना जनमान्य आहे पण जमातवाद्यांच्या म्हणण्याप्रमाणे प्रत्येक समाजाला स्वतःच्या अशा सामाजिक, सांस्कृतिक परंपरा असतात ज्या इतरांपेक्षा भिन्न असू शकतात म्हणून 'जागतिक दर्जाचा सामाजिक न्याय'ही संकल्पना प्रत्येक जमातीला लागू पडत नाही. या मताशी सहमत असणारे अनेक नामवंत विचारवंत आहेत. ज्यांची नावे खालीलप्रमाणे Alasdair Maclntyre, (After virtue), Michael Sandal

(Liberatism and the limites of justice) Charles Tailor (Sources of the self) and Michel Valres (Sphcrco of Justice)

## १५.५ जमातवादाचा उगम आणि त्याच्या उदयाची कारणे

वीसाव्या शतकाच्या सुमारास 'कॅथालिक कामगारां' मध्ये 'धार्मिक ग्रह, किंवा मत' म्हणून सुरुवातीला जमातवाद उदयास आला. वास्तवात 'कॅथालिक कामगार वर्गाची चळवळ, याचे स्पष्टीकरण असे देते कि, जमातवादाचा पाया 'Mystical Body of Christ' हा आहे. पुढे हीच संकल्पना सामाजिक कल्पना म्हणून 'ॲरिस्टाटलच्या' कल्पनेशी मिळती जुळती असल्याचे समजून आले आहे. मागच्या शतकाच्या, शेवटच्या दशकात जमातवादी विचारवतांनी, नागरी सामाजिक भूमिकेला समर्थन घ्यायला सुरुवात केली होती. जी पोलिस साम्यवाद्यांच्या तिसऱ्या विचारसरणीची निर्मिती होती. परंतू ज्यात 'कल्याणकारी राज्य' या संकल्पनेचा अभाव होता.

विसाव्या शतकात, जमातवाद हा शब्द राजकीय साहित्यात, मुबलकपणे वापरला जातो तरी त्याचा प्रथम वापर 'Godowyn Barmby' याने १८४० मध्ये, एका 'साम्यवादी समाजाचा सभासद' अशा अर्थाने केला होता समकालीन राजकिय साहित्यात 'जमातवाद' या संज्ञेचे दोन अर्थ घेतले जातात. १) ॲरिस्टॉटल च्या म्हणण्याप्रमाणे मनुष्य हा सामाजिक प्राणी आहे. या आधारावर, व्यक्तीच्या व्यक्तिमत्त्वाची जडण घडण करण्यामध्ये ही समाजाची मुख्य भूमिका आहे. २) राजकिय आणि आर्थिक बाबतीत ते डाव्या विचारसरणीशी जवळीक ठेवतात. तर सामाजिक मुद्यांवर ते ज्या नीतीमूल्यांचे समर्थन करतात ती मूल्ये परंपरा वाद्यांना प्रिय असतात.

मानवी मुल्यांची जडण घडण आणि प्रसार यामध्ये समाजाची असलेली महत्त्वाची भूमिका सांगणाऱ्या संकल्पना ज्यात मानवी मूल्ये आणि श्रद्धा यावर चर्चा होऊ शकते. अशी आयडिओलॉजी म्हणजे 'जमातवाद'. याचे समर्थक म्हणतात, मुले मौखिक आणि अमौखिक परंपरा वारसा हक्कानेच, समाजाच्या इतर सभासदांकडून घेत असतात, ज्यांची मदत पुढे त्यांच्या श्रद्धा आणि विश्वास विकसित होण्यास होते. समाज मान्यता असलेल्या श्रद्धा आणि मूल्यांना एखादी व्यक्ति स्विकारु अथवा नाकारु शकते ही शक्यता 'जमातवाद वाले' गृहित धरतात.

**आपली प्रगती तपासा :**

१) जमातवाद म्हणजे काय?

२) जमातवादाची मूळ संकल्पना, उगम आणि व्याख्या यावर चर्चा करा.

## १५.६ जमादवादाच्या मूलभूत संकल्पना

जमातवादाची संकल्पना ही उजवी किंवा डावी अशी म्हणता येणार नाही. बरेच जमातवादी विचारवंत ‘विविध मुद्यांचे केंद्रीभूत स्थान’ असे समर्थन त्याला देतात. उदा. पर्यावरणाचे संरक्षण आणि शिक्षण या मुद्यांवर बहुतेक विचारवंत प्रगतीशील, डाव्या विचारसरणी बरोबर जातात. पण सांस्कतिक कलमांबाबत ‘विविध धर्म, वंश, विजयक शिक्षणा संबंधी, श्रद्धा, विश्वास इ.’ संबंधी विषय असेल तर ते परंपरावाद्यांची बाजू घेतात. त्याचवेळी ते भांडवलशाहीचा निषेध करतात; जी परंपरावाद्यांनीच टिकवली आहे आणि पूढेही चालवली आहे. दूसरे असे कि जमातवादी विचारवंत मानवी सकारात्मक हक्कांना समर्थन देतात. ह्या सकारात्मक हक्कांमध्ये खालील हक्कांचा समावेश होतो. १) शिक्षणाला, निवारा म्हणजे घरांना, सुरक्षित आणि स्वच्छ पर्यावरणाला, आरोग्य सुविधा इतकेच नव्हे तर प्रत्येक व्यक्तिला रोजगार हमी च्या हक्कांना द्रव्य सहाय्य करण्यास समर्थन देतात. याबाबत जमातवादाबाबत काही निरीक्षकांचे असे म्हणणे आहे की, या जमातवाद्यांच्या सहसंबंधामुळे व्यक्तीचे समाजाशी असलेले नाते महत्त्वाचे, पण व्यक्ति दुय्यम ठरते. याचा परिणाम म्हणून एकपक्षीय हुकूमशाही जी जुलूमशाहीकडे झुकु शकते, जी साम्यवाद किंवा फॅसिझम शी साम्य दाखवते किंवा सैनिकी पदावरील लोकप्रिय नेत्याची राजवट, अंशासारख्या घटना घडू शकतात. मात्र काही झाले तरी जमातवाद हे व्यक्तीच्या स्वातंत्र्याच्या आणि सकारात्मक हक्कांच्या संकल्पनेला पूर्णपणे महत्त्व देतात, असे ते ठोसपणे मांडतात. जे साम्यवाद, फॅसिस्ट किंवा मिलीटरी हुकूमशहा देत नाहीत ते (जमातवादी) तसेच ते नागरी समाजाच्या प्रगतीकडे, लोकशाहीच्या वाटचालीमध्ये प्रगती पथावरील महत्त्वाचा घटक म्हणून बघतात. जुलमी एकाधिकाराशाहीला विरोध करण्यात ‘जमातवादी’ संकल्पना महत्त्वाची भूमिका बजावते. जमातवाद निरनिराळ्या नागरी समाज संघटनांना प्रोत्साहन देते. उदा. उद्योगधंदे, धर्म, संस्कृति, बिगर सरकारी संस्था आणि कामगार संघटना इ. ज्यायोगे समाज परिपूर्ण होईल.

एक ख्यातनाम जमातवादी विचारवंत Robert Putman त्यांच्या ‘Bowling Club’ या सुप्रसिद्ध पुस्तकात म्हणतात, आधुनिक जगात बरेच लोक bowling club मध्ये अडकले गेले आहेत; पण Bowling Club ची संख्या मात्र कमी कमी होत आहे. दुसऱ्या शब्दात माणूस एक एकटेच खेळले पसंत करतो आहे. इतकेच नाही तर त्या Clubs च्या म्हणजे संघांच्या उणिवा त्यांना तसे करायला भाग पाडत आहेत. Putman ज्याला सामाजिक भांडवल ही संज्ञा वापरतो. तो म्हणतो क्लबच्या संख्येत घट म्हणजे ‘सामाजिक भांडवलात’ घट व्यक्तिवादावर वाजवीपेक्षा अधिक जोर दिला गेल्यामुळे परिणाम स्वरुप हे सामाजिक भांडवल घटले. सारांशाने सामुहिक मूल्य, सर्व सहसंबंधांचे Network आणि त्यातून एकमेकांसाठी काही करण्यास प्रवृत्त होणे म्हणजे जमातवाद. Putman अशा सामाजिक भांडवलाची आवश्यकता ठासून सांगतो, कारण लोकशाहीच्या बांधणीसाठी आणि संवर्धनासाठी ते आवश्यक आहे. नागरी समाजा व्यतिरिक्त सामाजिक भांडवलांचे संरक्षण हा जमातवादाचा महत्त्वाचा घटक आहे. संवादशील जमातवाद एक संघटना Responsive Communication Platform एक मंच ज्याला अनेक उद्दिष्टे आहेत. ज्यामध्ये जनता आणि खाजगी गटांची भागीदारी आवश्यक आहे. स्थानिक जमातींची जागा सरकारी सभासदांनी अडवू नये. पण सरकारने या लोकांना अशी सत्ता द्यावी ज्यामुळे त्यांना धोरणात्मक पाठिंबा, करामधला काही हिस्सा आणि तंत्रज्ञानाची मदत मिळेल. यासाठी पुष्कळ अध्ययनाची आणि प्रयोगशीलतेची गरज आहे. विशेष करुन नागरी समाज रचनेची उभारणी, खाजगी आणि जनतेच्या सहकारी संस्थामध्ये, शिक्षण,

समाजसेवा, आरोग्य सेवा इ. ह्या उपभोक्त्यांपर्यंत पोहोचायला हव्यात यासाठी खास प्रयत्न हवेत.

जागतिक, सामाजिक, राजकीय किंवा आर्थिक दर्जा, विशेषतः ज्यांना अमेरिका आणि ब्रिटन विचारसरणीमुळे पूर्वग्रह दुषित केले आहे. त्यांना जमातवाद नाकारतो. त्याऐवजी ते उदारमतवादी आणि पश्चिमी नसलेल्या देशांकडून शिकण्याची, त्यांचा आदरपूर्वक विचार करण्याची सूचना करतात. उदा. Alasdair Machintyre त्याच्या After virtue या पुस्तकावर 'ॲरिस्टॉटलच्या सामाजिक जवळच्या स्नेहसंबंधाच्या सहकारी स्थानिक जमातीच्या संकल्पनेला आदरांजली वाहतो.' याचे सर्व सभासद नेमेलेल्या धेय्याची पूर्ती अत्यंत जबाबदारीने कर्तव्यनिष्ठेने करतो. दूसरा जमातवादी विचारवंत Micheal Walzar त्याच्या Spheres या पुस्तकात, भारतातल्या 'जाती संस्थेचे' उदाहरण देतो. त्याच्या म्हणण्यानुसार ह्या जातीव्यवस्था पद्धतीमध्ये सामाजिक कार्य साधने ही अधिकाराच्या परंपरेनुसार पूर्ण केली जातात. हे उघड आहे की, त्याच्या बहुलत्वाच्या उत्साहामुळे, अगदी प्राचीन आणि शोषक समाजरचनेचे ते समर्थन करतात. समकालीन जगतासाठी ॲरिस्टाटलने सुचवलेल्या Closeknit समाजपद्धती औद्योगिक समजासाठी समर्पक नाही. तसेच Walzar हा, जाती संस्थेच्या अमानुष परिणामाबाबत जागरुक नव्हता. अनभिज्ञ होता. भारतातले अनेक समाज सुधारकांनी ह्या जाती संस्थेच्या कचाट्यातून, भारतीयांना सोडविण्याचा अथक प्रयत्‍ करत आहेत.

John Rowel's च्या टीकाकारांच्या म्हणण्या प्रमाणे न्यायाचा सिद्धांत हा समुहासाठी महत्त्वाचा असतो पण त्याविरुद्ध व्यक्तिसाठी नाही. रॉवेल माणसाच्या व्यक्तिमत्वाच्या कल्पनेला दुजोरा देतो पण जमातवाले, Micheal Sandal and Charles Tailor म्हणतात, व्यक्तिला तिच्या समाजामुळे ओळख मिळते तो समाज म्हणजे कुटुंब असेल. संस्कृतिक गट असेल नाहीतर धार्मिक गट असेल. या मुद्याचा विचार करता, जमातवादी असे ठामपणे म्हणतात. व्यक्तिला तिचे स्वायत्त निवडिचे अधिकार वापरण्यास योग्य अशी परिस्थिती निर्माण करणे हा राजकारणाचा प्रमुख हेतू असू शकत नाही. तर उलट राजकिय प्रक्रियेने, जमातवाद्यांचे, आपापसातले स्नेहसंबंध, जे व्यक्तिच्या कल्याणासाठी आवश्यक आहेत, त्याकडे दुर्लक्ष करुन चालणार नाही. उदारमतवादाचा व्यक्ति स्वातंत्र्याच्या दृष्टीकोनाला, ज्यांच्या मते, "लोक हे समाजाबाहेरच स्वयंपूर्ण असतात" या कल्पनेला Charles Taylor कडाडून विरोध करतो. त्याच वेळी तो ॲरिस्टॉलचा दृष्टीकोनाचा "मानव हा सामाजिक प्राणी आहे, खरोखर राजकिय प्राणी आहे," पुनरुच्चार करतो. कारण तो एकटा, एका महत्त्वाच्या कारणासाठी समाजाबाहेर स्वयंपूर्ण नसतो. जमातवादींच्या म्हणण्याप्रमाणे, व्यक्तिच्या atomistic दृष्टीकोन हा उदारमतवादाच्या तत्त्वांसाठी घातक ठरु शकतो, कारण अशा स्वायत्त निवड स्वातंत्र्य असलेल्या परिस्थितीमध्ये, त्या स्वातंत्र्याचा वापर करण्याइतकी मोकळी परिस्थिती असेल असे नाही.

युरोपियन आणि नॉर्थ अमेरिकन समाजाकडून गोळा केलेली अनुभवजन्य गृहितकांच्या आधारे, जमातवादी लोक त्यांच्या विरुद्ध असा दावा करतात की, मानसशास्त्रीय दृष्ट्या आणि सामाजिक दृष्ट्या नकारात्मक प्रवृत्ती वाढीस लागल्या आहेत. ज्या या वरील निर्देशित देशातील उदारमतवादी समाजामध्ये सर्रास आढळून येतात. उदा. जमातवादी लेखक जसे Amitai Etziomi and William Galston असा सुद्धा मुद्दा मांडतात की, उदारमतवादी समाजामधल्या व्यक्तिंना अनेक व्यक्तिगत समस्यांना तोंड द्यावे लागते. उदा. राजकीय प्रक्रियेमधून बाजूला व्हावे लागणे, एकाकीपणा, जबरदस्त हाव, शहरी गुन्हे, कौटुंबिक विभाजन

आणि घटस्फोटाचे वाढते प्रमाण इ. अशा प्रकारे त्यांच्या मते, अशा सामाजिक - राजकीय संस्कृति मध्ये, जिथे फक्त व्यक्तिला महत्त्व आहे, तिथे समाजाला गौण मानले जाते. म्हणून जमातवादी विचारवंतांच्या मते 'उदारमतवादाचे' पुर्नपरिक्षण व्हायला हवे. व्यक्ति आपल्या सर्व जबाबदाऱ्या एका सहकारी समाजाच्या सभासदाच्या जाणीवेने करेल अशा स्थितीला सामोरे जाण्याचा जमातवाद्यांचा हेतू आहे.

जरी जमातवाद 'समाजाचे महत्त्व' हा मुद्दा अधोरेखित करतो, (कुटुंब, अेथनिक गट, धार्मिक गट) जो समर्थनीय आहे तरी उदारमतवादाच्या सामाजिक जीवनातल्या स्थानाचे मूल्यमापन करताना ते चूक करतात. व्यक्तिचे समाजापासून संपूर्णतः तुटणे हे फक्त संकल्पनेतच शक्य आहे. वास्तवात नाही. मानव हा समाजप्रिय प्राणी आहे हे ॲरिस्टॉटलचे मत उदारमतवादी समाजालाही लागू आहे. Rowel Theory of Justice च्या टीकेवर आधारित जमातवाद्यांची मते असली तरी त्यांची संकल्पना 'समाजाच्या महत्त्वाला' कमी लेखत नाही. Rowel's Theory's Second Port ('difference principle') हा व्यक्तिगत न्यायाबद्दल नाही तर समाजातील सर्वात दुर्लक्षित अशा लोकांना जास्तीत जास्त फायदे कसे मिळवून देता येतील याबद्दल आहे. काही जमातवादी त्यांच्या उदारमतवादाचा उपहास करण्याच्या उत्साहात, पारंपारिक आणि विशेष करुन 'शोषण' करण्याऱ्या सामाजिक यंत्रणाना (उदा. जातीसंस्था) बळकट करण्याचा किंवा पुनरुज्जीवीत करण्याचा प्रयत्न करतात. हे भयंकर आहे. उच्छृंखल उदारमतवादाच्या वाईट परिणामांना टाळण्यासाठी आपण आधुनिक समाजाला, जाती व्यवस्थेच्या सांडपाण्यात ढकलणार नाही. कारण ते फक्त अन्यायकारकच नाही तर मानवेला काळीमा लावणारे आहे.

**आपली प्रगती तपासा :**

१) जमातवादाच्या पायाभूत तत्त्वांची चर्चा करा.
२) जमातवादाच्या मूख्य संकल्पनाचे टीकात्मक परिक्षण करा.

## १५.७ गांधीवादाची ओळख :

मोहनदास करमचंद गांधी ची विविध पत्रे, लेख आणि भाषणे जतन करुन ठेवली आहेत. त्यामध्ये त्यांनी सामाजिक, राजकिय व आर्थिक मुद्दे मांडलेले आहेत त्या सर्व एकत्रित संकल्पनांना 'गांधीवाद' या नावाने ओळखल्या जाते. जरी मूळ संकल्पनांच्या संग्रहात आपल्याला अस्सल मते क्वचितच वर्णिलेली आढळतात, तरी काही अंशी विसाव्या शतकात जून्या संकल्पनांचे पुनरुज्जीवन व उपयोजन गांधीवादाच्या राजकिय संकल्पना सार्थ ठरवितो. गांधीजी राजकिय तत्वज्ञानी नव्हते. किंवा संप्रदायी प्रणालीचे संस्थापक नव्हते ते विस्मयकारक रित्या यशस्वी ठरलेले, स्वातंत्र्य सैनिक, मुत्सद्दी जननेते होते. ब्रिटिश साम्राज्यवादाविरुद्ध त्यांनी

दीर्घकाल संघर्ष केला, ज्याची सुरुवात प्रथम दक्षिण आफ्रिकेत आणि नंतर भारतात झाली. या कालखंडात त्यांनी अनेक साप्ताहिके व पुस्तके लिहीली. अगणित भाषणे केली. हजारो पत्रातून त्यांनी स्वत:ची राजकिय, सामाजिक आणि आर्थिक भूमिका स्पष्ट केली. ही त्यांचे मते म्हणजेच गांधीवाद. गांधीजींनी स्वतः समाजकारण, राजकारण यामध्ये योगदान दिलेले नाही, याची त्यांनाही जाण होती. ते म्हणत, गांधीवाद हा वेगळा संप्रदाय नाही. माझ्या पश्चात माझा वेगळा संप्रदाय चालू ठेवण्याची माझी इच्छा नाही. नवीन तत्त्व प्रणालीचा मी प्रणेता आहे असा दावा मी करत नाही. दैनंदिन जीवनातील समस्या सोडविण्यासाठी सनातन, शाश्वत मूल्यांचा वापर करण्याचा मी साधासा प्रयत्न केला. मी मांडलेली मते व मी काढलेले निष्कर्ष म्हणजे 'ब्रह्मवाक्य' असे नाही. माझी मते उद्या बदलू शकतात. जगाला शिकविण्यासारखे नवीन असे मजजवळ काहीच नाही. अहिंसा आणि सत्य ही सनातन शाश्वत मूल्ये आहेत.

## १५.८ गांधीवादाच्या मूलभूत कल्पना :

भारताच्या स्वातंत्र्य लढ्यात गांधीचे योगदान निर्णायक होते आणि सर्व साम्राज्यशाहीच्या सत्तेविरुद्ध त्यांनी वापरलेले राजकीय डावपेच यशस्वी ठरले हे सिद्ध झाले आहे. भारताच्या राजकीय क्षितिजावर त्यांचा उदय होण्यापूर्वी स्वातंत्र्य लढ्यामध्ये फक्त उचभ्रू सुशिक्षित समाजाचा सहभाग होता. उचभ्रू सुशिक्षित समाजातील बरेचजण ब्रिटिश विश्वविद्यालयात शिकलेले होते व त्यांचे भारतीय राष्ट्रीय परिषदेत वर्चस्व होते. ज्या परकीय राजवटीच्या विरोधात चाललेल्या राजकीय चळवळी INC चे सभासद सक्रिय होते, त्याबद्दल तमाम भारतीय जनता (अनभिज्ञ) अजाण होती. राजकीय मुत्सुद्देगिरीने गांधीजींनी प्रथम INC च्या स्वातंत्र्य चळवळीत जनसामान्यांचा समावेश केला. या प्रक्रियेत त्यांनी उचभ्रू समाजाच्या चळवळीचे बहुसंख्य सामान्य जनतेच्या चळवळीत रुपांतर केले. INC च्या उदारमतवादी लोकशाही व धर्मनिरपेक्ष तत्त्वांना मुरड घालून अलौकिक यश संपादन केले हे अधोरेखित केले पाहिजे.

गांधीजींचा जगाकडे पाहण्याचा दृष्टीकोन हा एक हिंदू धर्माचे आचरण करणाऱ्या हिंदूचा होता. आपण स्वतः हिंदू धर्माचे नि:सिम भक्त आहोत ही गोष्ट त्यांनी कधीच लपवली नाही, उलट हिंदू असण्याचा त्यांना सार्थ अभिमान होता. त्यांचा इहवादी तत्त्वांवर (Secular Principle) विश्वास नव्हता. धर्मनिरपेक्ष राजवटीमध्ये धर्म आणि राजकारण यांना अलग करतात. वास्तविक, त्यांना राजकारणात धर्माला अधिष्ठान द्यायचे होते. त्यांनी १९२६ मध्ये Alexander Horace यांना पत्र लिहिले होते, "माझ्या अल्प समजामुळे मला वाटले आपण धर्म आणि जीवन यांना (Watertight) अगदी वेगवेगळ्या कक्षात विभागून ठेवतो, पण प्रत्यक्षात जर माणसामध्ये त्याचा खरा धर्म जीवंत असेल तर तो त्याच्या लहान सहान कृतीतून व्यक्त होईल. सार्वत्रिक अध्यात्मिक प्रयत्नांच्या पायावरच आपल्या समाजाचे आरोग्यरक्षण आणि स्वच्छता होऊ शकेल असे मला (गांधीना) वाटत होते. या स्वच्छता मोहिमेत छोट्यात छोटी अनियमितता ही सामाजिक आणि राजकिय जीवनातले अध्यात्मिक दारीद्र्याचे लक्षण आहे. त्यांच्या या राजरोज, उघड भूमिकेमूळे त्यांनी भारतीय समाजमन जिंकले ज्यांच्या मध्ये बहुसंख्य लोक अत्यंत दरिद्री, गरीब, अशिक्षित, अंधश्रद्धा असणारे होते. हे खरच, एका स्वातंत्र्य लढ्याच्या नेत्याचे लक्षणीय यश होते. पण राजकीय फायद्यासाठी किंवा सामान्य लोकांचे पूर्वग्रह, सामावून घेणे, एका राजकिय प्रकल्पांसाठी, त्यांचा पाठिंबा मिळविण्यासाठी त्यांना वापरणे हा एक वादविषयच राहतो."

गांधीवादाची दूसरी विलक्षण लक्षणीय कल्पना म्हणजे, 'सत्याग्रह'. सत्याग्रह या संज्ञेमध्ये दोन संस्कृत शब्दांचा संयोग आहे. एक म्हणजे 'सत्य' म्हणजे Satya-Truth आणि 'आग्रह' म्हणजे aghrh-force म्हणजे सत्याग्रह चा अनुवादित अर्थ सत्याचा जोर, सत्याची ताकद असा होतो. गांधींना असे वाटले की, टॉलस्टॉय यालाच 'आत्म्याचा जोर', 'प्रेमाची ताकद' असे म्हणत असत. गांधीचा असा ठाम विश्वास होता की, सत्य हे मानवी जीवनाच्या सर्व भागाला अगदी राजकिय प्रक्रियेला सुद्धा व्यापून आहे. त्यांना कल्पना होती की, 'निखळ सत्य' हे मृगजळ ठरु शकते, पण त्यांनी त्यापर्यंत (सत्यापर्यंत) पोहोचण्याचा सत्याचा मार्ग निवडला होता, भले मग त्यामध्ये प्रयोगामध्ये प्रयत्न करा, चुका करा आणि शिका अशा पद्धतीचा अवलंब करावा लागेल. त्यांची सत्याबद्दलची बांधीलकी अशासाठी होती की त्यांना माहित होते, समाजाने केलेल्या तोडफोडी पेक्षा कितीतरी पटीने सत्य हे शस्त्र अधिक प्रभावी, बळकट आहे. त्यांची सत्याग्रहाची संकल्पना संपूर्ण अंहिंसावादी होती. ब्रिटिश साम्राज्यवादाला आव्हान देण्यासाठी, राजकिय डावपेचाचा भाग म्हणून त्यांनी सत्याग्रहाचा वापर केला पण त्यांनी त्याच वेळी असे सांगितले की, ज्याला सत्याग्रहात सामील व्हायचे आहे त्याला 'अंहिसे'चे पालन केलेले पाहिजे. अगदी क्षुल्लक हिंसा ही सत्याग्रहाचे दूराग्रहात रुपांतर करेल. तसेच त्यांची सत्याग्रहाची कल्पना ही निष्क्रिय प्रतिकाराहून भिन्न आहे. सत्याग्रह आणि निष्क्रिय प्रतिकार यामध्ये उत्तर धृव्व आणि दक्षिण धृव्वाएवढा फरक आहे. दक्षिणेकडिल प्रतिकार हा दुर्बळांचा पण हिंसात्मक तर उत्तरेकडचा प्रतिकार हा प्रचंड ताकतीने पण कोणत्याही प्रकारच्या हिंसेला टाळून केलेला असा ग्रह तयार झाला आहे.

गांधीवादाचा महत्त्वाचा भाग म्हणून 'अंहिसेसा' उल्लेख होतो. सत्याग्रहाच्या चतूर आखणीमध्ये 'अंहिसेला' महत्त्वाचे स्थान होते. गांधीनी आपली 'अंहिसेची' संकल्पना बऱ्याच धार्मिक पुस्तकातून विशेषतः बौद्ध, जैन आणि ख्रिश्चन धर्म ग्रंथातून विकसित केली. एखाद्या न्याय आणि लोकप्रिय मागणीच्या परीपूर्ततेसाठी सुद्धा हिंसेचा अवलंब करण्याच्या ते विरोधात होते. याबाबतीत ते Machiavells च्या संपूर्ण विरोधात होते. Michiavelli च्या मते End justified mean म्हणजे आपले ध्येय गाठण्यासाठी कोणत्याही मार्गाचा, साधनांचा उपयोग करावा. तर गांधीच्या मते, साधन शुचितेला फार महत्त्व होते. म्हणजे मार्ग हा खरा, सत्याचा आणि अहिंसेकच हवा. ते एकदा म्हणाले होते, "बेघर अनाथ, मृत व्यक्तिंना काय फरक पडतो, की, कशामुळे हा विद्ध्वंस झाला? पवित्र लोकशाहीच्या, स्वातंत्र्याच्या नावाने का एकपक्षीय हुकूमशाही च्या नावाने?" म्हणजे त्या पिडितांसाठी विध्वंस हा विध्वंसच अथवा सर्वनाशच असतो. त्यांच्यामते (गांधीच्या) अंहिसा ही फक्त राजकीय संघर्ष किंवा सामाजिक कारणांपुरतीच मर्यादित आहे असे नाही तर व्यक्तिच्या व्यक्तिगत जीवनातही त्यांने अहिंसक वृत्ती बाणवल्यास त्याला क्रोध, हव्यास, विध्वंसक आवेश इ. पासून मुक्ती मिळेल. त्यांची इतर काही मते, किंवा श्रद्धा उदा. शाकाहार दारुबंदी, भाकड जनावरांची कत्तल विशेषतः गोहत्या इ. कडे आपण अहिंसा या तत्त्वाचे विस्तारित रुप म्हणून पाहू या.

गांधीनी यशस्वीपणे राबविलेल्या सत्याग्रहाच्या दोन्ही चळवळी (१ली दक्षिण आफ्रिका खंडातील, खंडातील-भारत पुढे एशिया) पुढे राजकिय शास्त्र म्हणून उदयास आल्या; जरी त्यांचे प्रमुख तत्त्व सत्य आणि अहिंसा होते. त्यातील काही शांततापूर्ण पद्धती होत्या उदा. उपोषण, वैचारिक देवाण घेवाण, तसेच काही कृतिजन्य चळवळी जसे निदर्शने, विरोधक घोषणा, आर्थिक बहिष्कार, कर न भरणे, नागरी असहकार इ. जरी गांधींनी या पद्धती भारतीय स्वातंत्र्य संग्रामात वापरल्या असतील, तरी यातील तीन प्रकार तुलनेने बऱ्याचदा म्हणजे वारंवार वापरले गेले. 'नागरी कायदेभंगाची' मूळ कल्पना अमेरिकन विचारवंत Thoreau (थोरो) यांने मांडली होती.

तीचा वापर गांधीजींनी प्रथम दक्षिण आफ्रिकेत नंतर भारतात केला. 'नागरी कायदेभंग' चळवळीचा मूख्य भर अन्याय्य कायद्यांना आव्हान देणे हा होता. कायदेभंगाच्या महत्त्वावर गांधीजी म्हणतात, न्याय देणाऱ्या संस्थांना चुकीचा कायदा सुधारण्यासाठी लोकांनी केलल्या अर्ज विनंत्या अयशस्वी ठरल्या तर तुम्हाला त्या संस्थेला ती सुधारणा करण्यास भाग पाडायला हवे (कायद्याला भगदाड पाडण्याचा, कायदा मोडण्याचा) तो गुन्हा करण्याबद्दल व्यक्तिगत दंड, म्हणजे हालअपेष्टा सोसायची तयारी ठेवायला हवी. म्हणून लोकांना ती चळवळ ही नागरी हक्कांविरुद्ध असणाऱ्या कायद्याच्या भंगासाठी (कायदेभंग) होती.

भारतावर असलेल्या परदेशी, जुलमी आणि शोषक राजवटी विरुद्ध गांधीनी दुसरे हत्यार उपसले ते म्हणजे, 'असहकाराचे'. 'अहिंसक असहकार' ह्या पद्धतीने आम्ही नवीन जनमत घडवत आहोत आणि ते तेव्हा उपयुक्त ठरेल जेव्हा स्वमताबद्दल संपूर्ण स्वातंत्र्य असेल म्हणून बहुसंख्याकांचे मत मानले गेले पाहिजे. सत्याग्रहाची सर्व तंत्रे एकमेकांशी जोडलेली आहेत. जर राज्यकर्ते लोकांवर बळाचा वापर करु लागले तर 'कायदेभंगाचे' तंत्र सुचविले आहे. जुलमी कायदे रद्द केले नाहीत तर त्यावर अहिंसक असहकाराची चळवळ करायला सांगितले आहे. गांधीजींनी केलेल्या सत्याग्रहामध्ये अनेक वळणे आली. जसे परदेशी मालावर बहिष्कार, मीठाचा सत्याग्रह, कर न भरणे, संप, निदर्शने इ. गांधींनी एक आणखी तंत्र राबविले होते; ते म्हणजे 'अनशन' एखाद्या भावना दुखावलेल्या व्यक्तिने, अन्याय निवारणा प्रित्यर्थ, अन्याय करणाऱ्याला त्याची जाण देण्यासाठी, स्वतःलाच उपवास करुन त्रास देणे हे, परदेशी व्यक्तीला अभिनव वाटत असे. मात्र भारतीय इतिहासात, अशा प्रकारच्या नैतिक दबावाने, जुलमी राजांना, लोकांच्या मागण्या मान्य करवून घेण्यासाठी, लोकांनी (जनतेने) स्वतःला त्रास करवून घेत पूर्ण केल्या आहेत. या उपवास तंत्राचा यशस्वी वापर गांधीजींनी परकीय सत्ता आणि आपलेच भारतीय लोक यांच्या विरोधात केला आहे. उदा. त्यांनी शेवटी केलेले 'आमरण उपोषण' हे उत्तर हिंदुस्तानातील मुसलमानांची, कट्टर हिंदू आणि शिख लोकांनी त्यांच्या मशीदींवर मालमत्तेवर ताबा मिळविण्यासाठी चालवलेल्या कत्तली विरुद्ध होते. उपवासाचे तंत्र यशस्वी होण्यासाठी, उपास करणाऱ्याची भूमिका खरी आणि न्याय असणे गरजेचे आहे.

तिसरी महत्त्वाची संकल्पना म्हणजे 'गांधीवाद' समाजवादाचे समालोचन (टीका) करतो, ही गोष्ट फारच विचित्र वाटते, नाही रे गटाच्या समस्या सोडविण्यामध्ये त्यांनी रस घेतला, किंवा प्रसंग विशेषी, कामगार वर्ग, गरीब वर्गाची परिस्थिती सुधारण्याचे काही मार्ग त्यांनी सुचविले; पण समाजवादी यंत्रणा त्यांनी भारतासाठी कधीच सुचविली नाही. विशेषतः रशियन पद्धतीच्या समाजवादाला त्यांचा विरोध होता. त्यासाठी त्यांची स्वतःची अशी कारणमिंमासा होती. ते म्हणतात, माझ्या माहितीप्रमाणे, Bolshevism मालमत्तेच्या सामुहिक मालकीसाठी, दुसऱ्याच्या मालकीची मालमत्ता हस्तगत करण्यासाठी बळाचा वापर करायला संपूर्ण मान्यता देतो. आणि म्हणून असे म्हणताना मी जराही विचलित होत नाही कि, सध्या ज्या पद्धतीने Bolshevism राजवट चालू आहे ती फार काळ टिकणार नाही. कारण माझा ठाम विश्वास आहे कि शाश्वत, टिकाऊ असे काहीही, हिंसेच्या पायावर उभे राहू शकत नाही. अहिंसा हे गांधींच्या अत्यंत जिव्हाळ्याचे तत्त्व होते, अर्थातच त्यामुळे ते Marx च्या "हिंसक नागरी कामगार चळवळ ही अविभाज्य टप्पा आहे, ज्यामुळे वर्गहीन समाज (कोणतीही उच्च निच्च, भेदभाव नसलेला) निर्माण होईल." अशा विचारसरणीच्या विरोधात होते. मात्र साम्यवादाच्या पायाभूत संकल्पनांच्या काही उपाययोजनांना त्यांची मान्यता होती. उदा. खाजगी मालमत्तेचा हक्क रद्द करणे, कामगारांचे शोषण, भांडवलशाहीला वगळणे, इ. अर्थात या गोष्टी पश्चिमी समाजवादाचा भाग होता म्हणून नव्हे तर ह्या गोष्टी उपनिषदांमध्ये आलेल्या आहेत, म्हणून

गांधींना मान्य होत्या. त्यांच्या मते, भांडवलशाहीतील गैर व्यवहारात विरोध म्हणून साम्यवादाचा उदय झाला असे नाही. उपनिशदाच्या पहिल्याच श्लोकात, साम्यवाद, समाजवादाचा अगदी स्पष्ट उल्लेख आहे. हे खरे आहे कि, काही सुधारकांना सामाजिक रुपांतराच्या पद्धतीवरील विश्वास उडाला, तेव्हा 'शास्त्रीय समाजवादाच्या' संकल्पनेचा उदय झाला. वरील माहितीतून हे स्पष्ट होते कि गांधींना साम्यवादाच्या काही कल्पना मान्य होत्या, पण त्याचे कारण, त्या संकल्पनाचा काही भाग त्यांना धर्माच्या पवित्र ग्रंथामध्ये सापडला होता. शास्त्रीय समाजवाद ही मार्क्सची कल्पना, म्हणून त्यांना मान्य नव्हती.

थोडक्यात, गांधीची वर्गविरहित समाज निर्माण करण्याची तयारी होती, त्यासाठी ते भांडवलशाहीच्या दोषांकडे दुर्लक्ष करु शकत होते. पण ते त्यांना अहिंसक मार्गाने करायचे होते. 'मार्क्सच्या समाजवादा' ऐवजी त्यांनी स्वतःची एक कल्पना 'सर्वोदय' म्हणजे 'सर्वांची प्रगती' या नावाने पुढे आणली. गांधींनी John Raskin's Book 'Unto This Last' 1908 मध्ये लिहिलेल्या पुस्तकाच्या नावावरुन हे नाव सुचले. दुर्दैवाने सर्वोदयाची कल्पना आमलात आणायला गांधीजी राहिले नाहीत, पण त्यांचे खंदे अनुयायी 'विनोबा भावे', 'जयप्रकाश नारायण' यांनी या प्रणालीचा प्रचार आणि अवलंब करण्याचा प्रयत्न केला. १९५०-६० च्या दशकात असे बरेच प्रकल्प, जसे 'भूदान', 'श्रमदान' इ. च्या माध्यमातून, भूमिहिन, कामगारांची परिस्थिती सुधारण्याचे असे प्रयत्न झाले. सुरुवातीला हे प्रयत्न काहींसे यशस्वी झाले पण अखेर 'सर्वोदयी' संकल्पनाची पुढे प्रगती झाली.

गांधीवादाची महत्त्वाची संकल्पना म्हणजे 'सत्तेचे विकेंद्रीकरण'. त्यांना 'खेडे' हे एक व्यवस्थापकीय घटक जे स्वयंपूर्ण असेल आणि 'खेड्यांचेच एक महासंघराज्य' असेल असे स्वप्न त्यांनी भारताबद्दल पाहिले होते. जेव्हा भारत स्वतंत्र होण्याच्या उंबरठ्यावर होता तेव्हा १९४६ मध्ये गांधी म्हणाले होते, स्वातंत्र्याची सुरुवात पायाभूत हवी. अशा तऱ्हेने प्रत्येक खेडे 'प्रजासत्ताक' असेल किंवा ग्राम पंचायतीला पूर्ण अधिकार असतील. ओघानेच असे प्रत्येक स्वयंपूर्ण खेडे आपल्या सर्व व्यवहाराचे व्यवस्थापन करु शकेल इतकेच नव्हे तर वेळ पडल्यास सर्व जगापासून स्वतःचा बचाव करु शकेल. अशा रचनेमुळे अगणित खेडी निर्माण होतील, आयुष्य म्हणजे 'मनोरा', 'पायावर' उभारलेला असे चित्र दिसणार नाही. अशा खेड्यांचा केंद्रबिंदू 'व्यक्ति' असेल, जी खेड्यासाठी कोणताही त्याग करायला सिद्ध असेल; आणि खेडे जे व्यक्तिच्या पाठी ठामपणे उभे राहील. अशा तऱ्हेने व्यक्ति आक्रमक, उद्धट न होता न्रम होतील. हे खरे आहे की, भारतासारख्या प्रचंड देशात, जिथे विभिन्न संस्कृति, विभिन्न भौगोलिक परिस्थितीमध्ये सत्तेचे विकेंद्रिकरण आवश्यक आहे कारण अति दूर असलेल्या वस्त्या, खेडी यांच्या समस्या, राज्य सरकार किंवा दिल्लीतले सरकार, ना सोडवू शकतात ना समजू शकतात.

गांधीजी पक्षीय पायावर उभारलेल्या लोकशाही सरकार किंवा संसदीय सरकारच्या परीणामकारकते बद्दल साशंक होते. त्यांचा नारा 'go back to villages' खेड्याकडे परत चला. हे आवाहन फक्त सुशिक्षितांनी खेडगावातील अनेक समस्यांकडे लक्ष द्यावे म्हणून नव्हते. तर देशातील वाढती बहुसंख्य जनता या समस्यांशी संघर्ष करत होती. म्हणून संपूर्ण भारत हा 'ग्रामपंचायत' ज्याचे सभासद स्थानिक असतील, त्या 'विकेंद्रीत व्यवस्था' असणाऱ्या सरकारची 'संकल्पना' त्यांना समर्पक वाटत होती. त्यांना राज्य सरकार, केंद्र सरकार या संकल्पना ज्या शेवटी संविधानाने भारतात लागू केल्या. त्या त्यांना मान्य नव्हत्या. गांधीजींना ज्या त्या लोकांनी समुदाय स्वतः (Self Govt.) स्थानिक पातळीवर सरकार व्हावे. त्यांच्या आध्यात्मिक विश्वासाला अनुसरुन सर्व चांगल्या आणि खऱ्या गोष्टी (अंर्तयामातून) आतूनच बाहेर आल्या

पाहिजेत म्हणून सरकार हे बाहेरुन लादलेले वरुन आलेले (ईश्वरदत्त) नसावे. ते स्पष्ट करतात, "स्थानिक स्वराज्य संस्था म्हणजे, सरकारी नियंत्रण, मग ते विदेशी असो वा स्वदेशी, त्यापासून स्वावलंबी होण्याचे, सातत्याने केलेले प्रयत्न." राज्य सरकार ही संस्था संपूर्णपणे बाद करणे हे एवढ्या मोठ्या देशाला शक्य होणार नाही हे त्यांना माहित होते. म्हणून त्यांनी राज्यशासनाच्या यंत्रणेला अनिच्छेने मान्यता देत असे सुचविले की राज्य सरकारचे अधिकार कमीतकमी ठेवावेत. या संदर्भात ते पुढे म्हणतात "मला मान्य आहे काही गोष्टी सत्ता असल्याशिवाय करता येत नाहीत. पण इतर अनेक अगणित गोष्टी राजकीय सत्तेवर अवलंबून नाहीत. म्हणून Thoreau विचारवंत म्हणतो, "उत्तम सरकार ते असते जो कमीत कमी नियंत्रण ठेवते" राष्ट्र जे स्वतःचे व्यवहार सुरळीतपणे आणि परिणामकारक रित्या, फारशा सरकारी मदतीशिवाय चालवते ते 'खरे लोकशाही राष्ट्र होय.'"

त्यांचे आर्थिक विचारही त्यांच्या इतर पायाभूत दृष्टीकोनासारखे होते. त्यांना आपला देश आर्थिक क्षेत्रात स्वावलंबी आणि स्वनिर्भर असायला हवा होता. ते अर्थतज्ज्ञ नव्हते, तरी त्यांनी भारताच्या आर्थिक समस्यांवर विचार केला आणि काही कल्पना त्यांनी सुचविल्या. त्याच्या म्हणण्याप्रमाणे, मी अर्थतज्ञ नाही पण भारत गरजेच्या सर्व गोष्टी निर्माण करुन स्वंयपूर्ण, स्वयंसिद्ध होऊ शकतो. देशाला लागणाऱ्या सर्व वस्तू निर्माण करणे अशक्य असते; यावर ते गरजा कमी करण्याचे सुचवतात. या संदर्भात गांधीजी, पारंपारिक भारतीय जीवन पद्धतीचा म्हणजे भौतिक सुखेच्छांना नियंत्रणात ठेऊन त्यांना अध्यात्मिक समृद्धीकडे वळविण्याचा सल्ला देतात. त्यांना भारतीय अर्थव्यवस्थेचा विकास व्हायला हवा होता पण अध्यात्मिक बैठकीची किंमत मोजून नाही. भारतीय अर्थव्यवस्थेचे पश्चिमी देशांच्या पठडीतले औद्योगिकरण त्यांना नको होते. त्याऐवजी 'लघुउद्योग' किंवा सहकारी तत्त्वावर चालणारे उद्योग जे सर्वांना समान फायदा देतील त्या पद्धतीचा ते प्रचार करत होते. मात्र सर्व मोठ्या उद्योगाचे, एकत्रिक उत्पादन, सर्वांच्याच मालकीचे असेल, सर्वांचेच नियंत्रण असेल. अशावेळी सरकार त्यांच्या वतीने राष्ट्रीयीकरणाची प्रक्रिया सुरु करेल. उदा. अवजड वाहन उद्योग जल वाहतूक, खाण काम, आणि मोठे कारखाने. Textile कापड उद्योग हा सर्वप्रथम विकेंद्रित होईल. अशा तऱ्हेने गांधीच्या अर्थ शास्त्राला फेबिअन समाजवाद आणि आध्यात्मवाद यांचे संयूक्त रुप म्हणता येईल.

गांधी तत्वज्ञानातील सर्वात 'विरोधी संकल्पना' कोणती असेल तर ती अर्थ विषयक तत्वज्ञान, "विश्वस्तपण" "Trusteeship" चे म्हणजे भांडवलशाहीचे विसर्जन न करता भांडवलशाही नाहीशी करणे. भांडवलशाही व्यक्तिंना हिंसक चळवळ करुन नष्ट करणे हे त्यांच्या 'अहिंसा' तत्त्वात बसत नव्हते. म्हणून त्यांनी भांडवलवाद्याचे मन वळविण्याच्या अहिंसक डावपेचाचा अवलंब केला. ते म्हणत, "कष्ट करतो त्या माणसाची त्या उत्पादनावर मालकी असते. जर सर्व श्रमिक बौद्धिक एकीने एकत्र आले तर ती एक मोठी श्रमिक ताकद निर्माण होईल. ते अपरिहार्य आहे असे मला वाटले तर मी त्याचा प्रचार, प्रसार करण्यात मागे पडणार नाही. 'व्यवहार्यता' आणि परिणामकारकता या दृष्टीने Trusteeship या संकल्पनेचा या तत्त्वावरच प्रश्नचिन्ह उठविले गेले. आणि या तत्त्वाबद्दलचा विरोध गांधीना सांगण्यास, कोणीही मागेपुढे पाहिले नाही. ते भांडवलशाहीच्या विरोधात होते पण त्यावेळी भांडवलदारांच्या मालमत्तेचे जबरदस्तीने जप्त करणे किंवा त्यांचे राष्ट्रीयीकरण याच्याही ते विरोधात होते. भौतिक गोष्टीच्या समान वाटणी करण्याबद्दल त्याचा विश्वास होता. 'विश्वस्त' या भूमिकेतून भांडवलदाराने, आपण या कारखान्याचे मालक आहोत असे समजून वागू नये. तसेच कामगारांनी आपण या उत्पादन प्रक्रियेचे मालक आहोत अशा तऱ्हेने वागू नये. या दोघांनी (भांडवलदार आणि कामगार) आपण कारखान्याचे विश्वस्त आहोत अशा भावनेने कार्यरत रहावे. दोघांनी आपांसात भांडणे

करण्यापेक्षा उद्योग क्षेत्रात त्यांनी एकमेकांबद्दल आदर बाळगला पाहिजे व सौहार्दपूर्ण नातेसंबंध जपले पाहिजेत."

राजकिय आणि आर्थिक गोष्टींकडे अध्यात्मिक दृष्टिकोनानुसार पाहणे म्हणजे गांधीवाद ते राजकिय विचारवंत नव्हते किंवा अर्थतज्ञ नव्हते. त्यांचे मूख्य ध्येय्य, भारताला, परकीय साम्राज्यशाहीच्या जोखडातून मुक्त करणे हे होते. या काळात त्यांच्या इतका उत्तुंग स्वातंत्र्य सैनिक तेच होत. असहकार, कायदेभंद यांच्या अभिनव उपयोजनांनी त्यांनी केलेल्या सत्याग्रहानी साम्राज्यशाहीला हादरविले. काही प्रमाणात त्यांना त्यात यशही आले. अर्थात सर्व तऱ्हेच्या जुलूम जबरदस्तीला आळा घालण्यात सत्याग्रह कितपत यशस्वी झअले हे वादग्रस्त आहे. उदा. हिटलर सारख्या कर्दनकाळासमोर 'सत्याग्रहाचे' शस्त्र कितपत चालले असते? सगळ्यात गांधी तत्त्वज्ञानाचा कले धार्मिक चिन्हे, वाक्यप्रचार दृष्टीकोन इ. चा वापर राजकीय हेतूंसाठी करणे, ही बाब सगळ्यात आक्षेपार्ह आहे. भारतासारख्या विभिन्न धर्म, जाती जमाती असलेल्या देशात असा दृष्टीकोन बाळगणे हा मोठाच विरोधाभास आहे. स्वतःला धार्मिक हिंदू म्हणवण्याचा त्यांना पूर्ण अधिकार आहे. पण भारतीय स्वातंत्र्य लढ्याच्या चळवळीचा प्रमुख नेता म्हणून, त्याला धार्मिक रंग देणे चुकीचे आहे. स्वयंपूर्ण खेडी, एका महासंघाला घटक म्हणून ही अद्‌भूत कल्पना प्रत्यक्षात आणणे फार कठिण. तसेच विश्वस्त ह्या संकल्पनेचे होते. भांडवलदारांने स्वतःला मालक न समजणे 'विश्वस्त' समजणे ही कल्पना अवास्तव आणि विसंगत होते.

**आपली प्रगती तपासा :**

१) गांधीवादाच्या प्रमुख तत्त्वांची चर्चा करा.
२) गांधीवादाच्या तत्त्वांची चिकित्सा करा.

## १५.९ सारांश :

फॅसिझम एक राजकिय संकल्पना म्हणून, फारच कठोर आणि नकारात्मक अर्थ असलेली राजवट असा आहे. त्वरित बदल करणारी हुकुमशाही आणि कट्टर राष्ट्रवाद ही त्याची प्रमुख लक्षणे. एक पक्षीय हुकुमशाही असणारे राष्ट्र जिच्या नागरिकांना वांशिक वारसा आणि सांस्कृतिक ओळख असेल. एका अशा राष्ट्रीय समाजाचे अस्तित्व शुद्ध वंशाचा असेल, जे इतर निम्न दर्जाचय, वर्ण संकरातून उत्पन्न झालेल्या वांशिकांचा तिरस्कार करतील अशा सामाजिक राजकिय संकल्पना म्हणजे फॅसिझम राजकिय भाषेत, ते विविधतेचा तिरस्कार करतात. एकाश्म समाजाची स्थापना करण्याची मनीषा ठेवतात. त्यांच्या समाजातील लोक शारिरिकदृष्ट्या सुदृढ असतील, शिस्तबद्ध असतील जे सदैव राष्ट्रांच्या समृद्धीसाठी, गौरवांसाठी सर्वस्वाचा त्याग करायला तयार असतील. जनसामान्याच्या मनात ते अशा सिद्धांताचे रोपण यशस्वीपणे करत की

त्यांनी आपले वर्चस्व आपला जोर इतरांवर (निम्न दर्जाचे, इतर) लावण्यात परधर्मीय, परसंस्कृतीय लोकांवर जबरदस्ती करण्यात किंवा त्यांना नष्ट करण्यास ते भूषण मानतील.

उदारमतवादातील 'व्यक्तिगत स्वातंत्र्याचा' अतिरेकी कल्पनांना विरोध म्हणून जमातवादाचा उदय झाला. व्यक्ति आणि समाज यातले सहसंबंध जमातवाद अधोरेखित करतो. त्यांचे महत्त्वाचे तत्त्व म्हणजे समाजाच्या अभावी (सामाजिक सहकार्याच्या नसण्यामुळे) व्यक्ति आपले जीवन क्वचित जगू शकते. अगदी छोटा समाज म्हणजे कुटुंब असे म्हटले तर त्याचे व्यापक स्वरुप म्हणजे विभिन्न सांस्कृतिक, भौगोलिक समाज ज्यांच्या सभासदामध्ये एक ऐतिहासिक बंध असेल. उदारमतवादातील तृटी किंवा कमतरतांना सामोरे जाताना जमातवाद प्रणालीचा उदय झाला. उदारमतवादाच्या तथाकथित स्वातंत्र्याच्या सर्व जगाला मान्य असणाऱ्या संकल्पनेचा जमातवादी विचारवंत निषेध करतात. जमातवादी तत्त्वांना घट्ट चिकटलेले विचारवंत 'John Rowl's Theory of Justice ला विरोध करतात. त्यांचा 'विश्वव्यापक सत्य मानला गेलेला atomistic individual' ही संकल्पना जमातवाद्यांना बिलकूल मान्य नाही. उलट ते म्हणतात, समाजाला स्वतःच्या अशा सामाजिक, सांस्कृतिक परंपरा असतात. विभिन्न संकल्पना असतात त्यामुळे ते individual atomistic संकल्पनेला कट्टर विरोध करतात.

गांधीवाद या नावाने ओळखले जाणारे तत्त्वज्ञान हे, वास्तवात मोहनदास करमचंद गांधी यांनी, सामाजिक, राजकिय आणि आर्थिक बाबींवर त्यांच्या विविध लिखाणातून प्रस्तृत केलेल्या विचाराची अभिव्यक्ती आहे. त्यांचे हे लिखाण म्हणजे, पुस्तके, लेख, पत्रे, केलेली भाषणे या सर्वांचे लिखित स्वरुप जतन केले गेले आहे. गांधीनी कुठलीही नवीन संकल्पनेचे मूळ शोधून काढलेले नाही. अतिप्राचिन जुन्या, काही कल्पना गांधीनी आपल्या राजकीय संकल्पनामध्ये, काही प्रमाणात यशस्वीपणे राबवल्या त्यामुळे गांधीवाद हा २० व्या शतकातली महत्त्वाची राजकिय आयडिओलॉजी ठरते. ते राजकारण तज्ञ नव्हते. एखादी नवीन प्रणाली सुरु करणारे संस्थापक नव्हते. पण तरीही ते स्वातंत्र्य लढ्याचे एक सैनिक, विस्मयकारकरित्या यशस्वी झालेले लोकनेते मुत्सद्दी होते. ब्रिटिश साम्राज्यशाही विरुद्ध त्यांनी दिलेला दीर्घकालीन लढा, (प्रथम आफ्रिकेत नंतर भारतात) लढताना त्यांनी प्रचंड लेखन केले. उदा. विविध साप्ताहिके, मासिके, वर्तमानपत्रे, लाखो पत्रे, भाषणे इ. या विविध माध्यमातून व्यक्त झालेले विचार सर्वदूर पसरले. ज्यामध्ये ते स्वतःची राजकिय, आर्थिक आणि सामाजिक विषयांवरील भूमिकाही स्पष्ट करतात. हे विचार म्हणजेच गांधीवादाचा पाया आहे.

## १५.१० पाठावरील प्रश्न :

१) फॅसिझमचा उगम, इतिहास आणि मूलभूत कल्पनांवर चर्चा करा.
२) फॅसिझम चे टीकात्मक परिक्षण करा.
३) 'जमातवादावर' एक निबंध लिहा.
४) गांधीवादाच्या मूलभूत संकल्पनांचे टीकात्मक परीक्षण करा.

❖❖❖❖

# १६

# विकास आणि जागतिकीकरण

**घटक रचना :**

१६.० उद्दिष्ट्ये

१६.१ प्रस्तावना

१६.२ विकासाचा अर्थ

१६.३ विकासाकडे पाहण्याचे विविध दृष्टीकोन

१६.३.१ उदारमतवादी विकास विचार सरणी

१६.३.२ साम्यवादी विकास-विचार सरणी

१६.४ जागतिकीकरण

१६.५ सारांश

१६.६ पाठावरील प्रश्न

१६.७ संदर्भग्रंथ वाचन सूची

## १६.० उद्दिष्ट्ये

१) विकासाची संकल्पना समजून घेणे.
२) विकासाच्या विविध पद्धती आणि मार्ग शिकणे.
३) जागतिकीकरणाची संकल्पना आकलन करणे आणि त्यांचा भारता सारख्या विकसीत होणाऱ्या देशांवर, कोणते परिणाम होतात त्यांचे विश्लेषण करावे.

## १६.१ प्रस्तावना

दुसऱ्या महायुद्धानंतर वसाहतवाद संपुष्टात आणण्याची प्रक्रिया सुरु झाली. सामाजिक शास्त्रामध्ये 'विकासाच्या' संकल्पनेला जास्त महत्त्व यायला लालगे. आफ्रिका आणि आशिया खंडातील देशांना आपला विकासाचा दर्जा फारच खालचा आहे हे जाणवू लागले. त्याची कारणे अनेक होती, जसे दारिद्र्याने पोखरलेला सर्व समाज, आशिक्षितपणा आणि जवळ जवळ शून्यावर असलेली आरोग्य व्यवस्था इ. या देशांची अशी दयनीय अवस्था होण्याचे प्रमुख कारण, ते नुकतेच साम्राज्यशाहीच्या जोखडातून निर्माण झालेल्या वसाहतवादातून मुक्त झाले होते. त्या वसाहतवाद्यांनी त्यांचे (देशांचे) पूर्ण शोषण केले होते. आपली हुकुमत चालवत ते त्या देशातील कच्चा माल त्यांना हवा त्या भावाने लुटुन नेत. त्यांना त्यांच्या फॅक्टरी (कारखाने) चालू

ठेवण्यासाठी प्रचंड कच्चा मालाची गरज असे. मग त्यांच्या कारखान्यात तयार झालेले भरमसाठ उत्पादन खपवायला ह्या गुलाम वसाहती होत्याच. त्यासाठी ही साम्राज्यशाही आपले बळ वापरुन, अपरिचित अवाजवी किमतीला माल त्या देशात विकत, साम्राज्यशाहीने, आफ्रिका आणि आशिया खंडातील देशांचे केलेले आर्थिक शोषण हा त्यांच्या (ब्रिटिशांच्या) तीन कलमी योजनेचा भाग होता. १ला टप्प्यावर एतद्देशीय समृद्ध कच्चा माल लुटुन तो आपापल्या देशातील (युरोपातील) कारखान्यांना पुरवायचा. दूसरा महत्त्वाचा भाग म्हणजे, त्यांनी स्थानिक धंदे उद्योग, उत्पादन करणारे कारखाने संपूर्ण उध्वस्त केले, ज्यायोगे त्यांच्याशी स्पर्धा करणारे शिल्लकच राहिले नाहीत. तिसऱ्या टप्प्यावर त्यांनी तयार माल आपापल्या देशातून आणला आणि या गुलाम देशातील बाजारपेठेत वाटेल त्या किमतीला विकला. ही लुटालुटीची प्रक्रिया शंभर वर्षाहून अधिक बहुतेक सर्व आफ्रिकन, एशियन देशांवर चालूच होती. अर्थात 'भारतातही तेच घडत होते. या सर्वाचा परिणाम लक्षणीय होता. जेव्हा या सर्व वसाहती, राजकिय दृष्ट्या स्वतंत्र झाल्या तेव्हा त्यांची आर्थिक स्थिती अनिश्चित अशा हलाखिची होती. बहुसंख्य समाजाची वाढलेली लोकसंख्या अशिक्षित होती. बहुतेकांना आरोग्याच्या सुविधा घेण्याची संधी मिळत नसे. त्याचा परिणाम म्हणू आयूमर्यादा फार कमी झाली होती. तर बालमृत्यूचे प्रमाण फार वर होते. अशा परिस्थितीतून बाहेर पडण्यासाठी करावयाचे (Change for better) प्रयत्न करणाऱ्या सर्व देशांचा एकत्रित गटाला 'तिसरे जग' या नावाने ओळखले जाऊ लागले. याच वेळी 'विकासाच्या संकल्पनेला' महत्त्व आले.

## १६.२ विकासाचा अर्थ :

इतर सामाजिक संकल्पनासारखी एखादी ठोस व्याख्या विकास या शब्दाला नाही. एक ठोस व्याख्या करण्यात अडचण अशी आहे की, वेगवेगळ्या समाजशास्त्रामध्ये या 'विकास' शब्दाला वेगवेगळे अर्थ जोडलेले आहेत. उदा. अर्थशास्त्रामध्ये याचा अर्थ राष्ट्राचे दरडोई उत्पन्न आणि ते वाढण्यासाठी प्रक्रियात्मक बदल असा होतो. हे लक्षात घेतले पाहिजे. हे प्रक्रियात्मक बदल पुढील अनेक मुद्यांवर अवलंबून असतील. उदा. १) कारखानदारीच्या दर्जावर २) कामगारांचे खेड्यातून कारखानदारीच्या टप्प्यात केलेले स्थलांतर ३) बाजारात भांडवलाचा सततचा पुरवठा ४) उत्पादन नाते संबंधात बदल ५) मुक्त बाजारपेठेला प्रोत्साहन देण्यासाठी सरकारी धोरणामध्ये, विशेषता करामध्ये बदल इ. राज्यशास्त्रानुसार राजकीय विकासाबरोबरच, राजकीय स्वातंत्र्याचे, पारदर्शक लोकशाही रुपातील सरकार हेही 'आर्थिक विकास' करण्यासाठी स्वतःला जबाबदार समजते कारण समाजाचे कल्याण हे जास्त करुन आर्थिक विकासावर अवलंबून असते.

'तज्ञ' लोक नेहमी 'विकास' या संकल्पनेची व्याख्या अशी करतात. "एका सर्वसाधारण खालच्या दर्जाच्या समाजाचे वरील दर्जात रुपांतर होणे". "i.e. upward mobility. J.H. Mittlelman यांच्या म्हणण्याप्रमाणे (development) विकास म्हणजे समाजाच्या गरजा पूर्ण करण्यासाठी, नैसर्गिक आणि मानवी संसाधनाचा वाढत्या क्षमतेने केलेला संयुक्तिक उपयोग. 'विकास' ह्या संकल्पनेची ही व्याख्या बरीच परीपूर्ण वाटते. कारण तीच्यामध्ये तीन महत्त्वाचे मुद्दे अधोरेखित केले गेले आहेत. जे 'विकासाच्या ३ संकल्पनाना धरुन आहेत.

१ ला मुद्दा - समाजाचे सदस्य त्याच्याजवळ असलेल्या उपलब्ध मानवी आणि नैसर्गिक संसाधनाचा उपयोग संयुक्तिक रीतीने करतात, जेव्हा ते राजकिय दृष्ट्या स्वतंत्र असतात, निर्णय प्रक्रियेत सहभागी असतात, अशा स्थितीत, ते नैसर्गिक संसाधनाचा उत्तम उपयोग कसा करुन घेता येईल, याचा निर्णय घेतात. यासाठी लोकशाहीची सरकारची आवश्यकता आहे. दूसरे म्हणजे समाजातील सर्व सभासद हे उच्चशिक्षित, विशेषतः शास्त्र आणि तंत्रज्ञान शिक्षण व्याख्येचाही बाजू घेतलेले असतील जे संसाधनांचा संयुक्तिक वापर करतील. तिसरा मुद्दा Social ends, विकास म्हणजे development चे ध्येय हे well being of a society at large म्हणजे समाजाच्या सार्वत्रिक कल्याणाचे असेल. दूसरा एक तज्ञ Paw Baran ह्याच्या म्हणण्याप्रमाणे 'विकास' ही संकल्पना सर्वदूर पसरणारी, समाजाच्या आर्थिक, सामाजिक आणि राजकीय रचनेचे रुपांतर करणारी, बाब आहे. जिच्यावर निर्मिती प्रक्रिया, वाटप आणि वापर किंवा उपयोग या संस्थांचे प्रभूत्व असेल. आर्थिक व्यवहारातले अत्यंतिक बदल, राजकिय आणि सामाजिक समाज रचनेचा साचा, आणि आर्थिक व्यवहार यांचे वैविध्य पाहिल्यावर, विकास ही संकल्पना विविधांगी आहे हेच सुचित होते.

Baran नावाच्या तज्ञाचे असे निरीक्षण आहे, विकास प्रक्रिया ही कधीही सरळसोट नसते. त्यामध्ये येणारे अडथळे हे काळाप्रमाणे वेगवेगळे असतील तसेच वेगवेगळ्या समाजात येणारे अडथळेही वेगळेवेगळे असतील. राजकिय वर्गाकडे हे बौद्धिक कौशल्य असणे आवश्यक आहे. ज्यायोगे ते लोकांना विकासामुळे होणाऱ्या फायद्यांबद्दल भरवसा देऊ शकतील.

सर्व सामाजिक समस्यांवर एकच रामबाण (एकमेव) उपाय म्हणजे 'मुक्त बाजार व्यवस्था' अशा विचाराने बरेच विचारवंत प्रभावित झालेले आहेत, ज्यांना विकास म्हणजे फक्त आर्थिक विकास अपेक्षित आहे, त्यांच्या विचारसरणीवर इतर अनेक तज्ञांनी टीका केली आहे. टीकाकारांच्या म्हणण्याप्रमाणे विकासाची संकल्पना फक्त आर्थिक प्रगती बरोबर जोडली जाऊ शकते. कारण सर्व मानवांच्या सर्वांगीण जीवनाच्या दर्जाची सुधारणा करणे, ही संकल्पना जटील आहे. या पार्श्वभूमीवर मानवी जीवनाच्या 'Well being' चे मूल्यमापन करणारी अनेक परिमाणे शोधली गेली आहेत. उदा. M.D. Morris यांनी Physical Quality of Life Index (PQL) ची संकल्पना मांडली, ज्यामध्ये मूख्य भर 'आर्यूमान' आणि बालमृत्यू यांच्या प्रमाणावर एखाद्या समाजाचा किती विकास झाला आहे ते ठरविते, यावर आहे. 'अर्थ केंद्रित विकास' या संकल्पनेला सर्वात महत्त्वाचे आव्हान United Nation Development Programme (UNDP) या संस्थेच्या वतीने झाला. UNDP च्या १९९० च्या अहवालात 'दरडोई उत्पन्न आणि विकास' यांचा परस्पर अनुकूल संबंध आहे. हे तत्त्व नाकारले गेले आहे. राष्ट्राचे कल्याण हे केवळ त्याच्या आर्थिक परिस्थितीवरुन पारखता येणार नाही. UN ने सुद्धा एक Human development formula बनविला (HDI) आहे. "त्यामध्ये चा अंदाज, आयूर्मान, बालमृत्यू आणि साक्षरतेचे प्रमाण या सर्वांचा समावेश होता." त्यानंतर १९९५ मध्ये HDI ने लिंग संबंधित विकास इंडेक्स (GDI) पुढे आणला त्यामध्ये विकास प्रक्रियेतून स्त्रियांना कसे वगळले जाते यावर रोख होता जे सर्वच देशांमध्ये घडत होते.

## १६.३ विकासाकडे पाहण्याचे दृष्टीकोन :

बऱ्याच समकालीन समाज शास्त्रज्ञांनी, विकासाबद्दलच्या विविध संकल्पना अंगिकारल्या आहेत. ठोकळ मनाने त्यांचे दोन भागांमध्ये विभाजन होते. एक म्हणजे

उदारमतवादी विचारसरणी, दूसरी म्हणजे 'मार्क्सवादी, साम्यवादी' विचारसरणी बाकीच्या सर्व दृष्टीकोनांबद्दल बोलायचे झाल्यास, त्याच्या तपशीलामध्ये किंवा सामाजिक किंवा राजकीय दृष्टीकोनावर महत्त्व देण्याच्या पद्धती मध्येच फरक आहे, बाकी सर्व रोख ज्या त्या (उदार किंवा मार्क्स) वादासारखाच आहे. त्यामुळे ते विकासाचे नमुने मानले जातात. उदा. काही समाजशास्त्रज्ञ 'मुक्त बाजार समाज' नमुना मांडतो तो 'उदारमतवादावर' आधारित असतो तर 'कल्याणकारी राज्य' नमुना दोन्हींचे, 'उदारमतवाद आणि साम्यवादाचे'संयोजन करतो. समाजवादी नमुना ही साम्यवादासारखाच आहे. या दोन दृष्टिकोनां व्यतिरिक्त आपल्याला गांधीवादातील 'विकास' दृष्टीकोनाबद्दल विचार केला पाहिजे. ज्याचा विशेष जोर 'शाश्वत विकासा'वर होता, ना की फक्त 'विकास संकल्पनेवर'.

### १६.३.१ उदारमतवादी दृष्टीकोन :

पश्चिमी देशातील बहुतेक उदारमतवादी प्रचारक असा दृष्टीकोण मांडतात की, सर्व समाजांना, एका विशिष्ट चक्रातून जावे लागते. उदा. प्रथम समाज, आदिम मग पारंपारिक किंवा पूर्व आधुनिक आणि मग संपूर्ण आधुनिक, औद्योगिक अशा विविध टप्प्यातून जातो. समाजाची राजकीय आणि 'सामाजिक परिस्थिती सुधारण्यासाठी, आधुनिकता सक्षम आहे. तसेच ते असेही सुचवितात कि शेतीजन्य अर्थ व्यवस्थेपेक्षा औद्योगिक अर्थव्यवस्था अधिक चांगली आहे. उदारमतवाद दृष्टीकोन असे गृहित धरतो कि, पूर्व आधुनिक राजकीय व्यवस्था तीन गोष्टींना जबाबदार होती. उदा. एक म्हणजे कर वसूल करणे, राज्यांतर्गत कायदा आणि सुव्यवस्थेची यंत्रणा ठेवणे, आणि राज्याचे संरक्षण करणे. उलटपक्षी, आधुनिक राज्यांना, वरील सांगितलेल्या जबाबदाऱ्या शिवाय इतर अनेक तऱ्हेची आवश्यक कामे करावी लागतात, त्यासाठी लोकांच्या स्वास्थ्याची (well being) आणि त्यांच्या upward mobility (सामाजिक, आर्थिक उन्मतीची) खात्री करावी लागते. दूसरे म्हणजे पारंपारिक राजकिय व्यवस्थेमध्ये जिथे राजा किंवा एकपक्षीय हुकूमशाही असे, तिथे जनतेला राजकिय घटनांमध्ये सहभागी होण्याची संधीच नसे. ते (लोक) म्हणजे फक्त 'रयत' होते 'नागरिक' नव्हते. उलटपक्षी आधुनिक राजकिय पक्ष, जे कायदेशीर आहेत, सरकारचे महत्त्वाचे अंग आहेत ते पक्ष, नागरिकांना राजकिय घटनांमध्ये सामील होण्यास प्रोत्साहन देतात. लोकशाहीमध्ये असे अनेक राजकिय कायदे आहेत, मतदानाचा हक्क, निवडणूक लढवण्याचा हक्क, सरकारच्या विविध धोरणांची सार्वजनिक टीका करण्याचा हक्क ज्यामुळे नागरिक जागरुक आणि बेडर होतात. प्रसार माध्यमांना, उदारमतवादी लोकशाही फारच जास्त महत्त्व देते. त्याच्या मार्फत नागरिक आपले दृष्टीकोन व्यक्त करु शकतात, मागण्या मांडू शकतात. आणि सरकारी धोरणांमधल्या चूका सांगू शकतात. उदारमतवादाचा राजकिय विकासाबद्दल दृष्टीकोन 'फरकाच्या' प्रकाराला अधोरेखित करतात. एक मुख्य म्हणजे सतत वाढत जाणारे विशेष प्राविण्य असणाऱ्या नागरिकांची भूमिका आणि समाजातल्या कामगारांचे लक्षणिय विभाजन. हे अनेक गोष्टी सूचित करते. जसे लहान गटाच्या सभासदाची असलेली ओळख, आणि त्याच्याशी (गटाशी) असलेली निष्ठा ही पूढे राष्ट्र निष्ठा आणि राष्ट्रीयत्वामध्ये रुपांतरित होते. तसेच परंपरेने दिलेली पत, ओळखीचे रुपांतर, व्यवसायातील कर्तृत्वाच्या कौशल्यावर ओळखले जाते. योग्य प्रक्रियांचा विकास, हे बदल सामावून घेण्याऱ्या संघटनाही उभ्या राहतात. पश्चिमी देशाचे विद्वान जे उदारमतवादाचे समर्थन करतात त्याच्या मते, विकसनशील देश जे अजूनही एकपक्षीय किंवा Non Democratic म्हणजे लोकशाहीची तत्त्वे नसलेल्या पारंपारिक सरकार व्यवस्थेला चिकटून आहेत. त्यांना राजकिय विकासाच्या लोकशाही नमून्याची निवड करतील तेव्हा त्यांना प्रसारमाध्यमाचे स्वातंत्र्य कळेल. जेव्हा त्यांना समानतेचे हक्क मानवतेचे हक्क सर्वांसाठी मिळतील. तेव्हा त्यांना ह्या

हक्काच्या पूर्ततेसाठी पूर्वतयारी म्हणून मुक्त बाजारपेठ ही सुधारणा जी मुक्त अर्थव्यवस्थेला पाठिंबा देते. तिला निवडावे लागेल. थोडक्यात, पश्चिमी विद्वानांच्या मते, विकसनशील देश जेव्हा पश्चिमी राष्ट्रांच्या राजकिय आर्थिक नमुन्याचे अनुकरण करतील. तेव्हाच त्यांचा पश्चिमी देशांसारखा विकास होईल.

**१६.३.२ साम्यवादी दृष्टीकोन :**

'मार्क्सीस्ट' म्हणजे विकासाबद्दलचा साम्यवादी दृष्टीकोन, हा कार्ल मार्क्स, फ्रेडरिक अेन्जेल्स आणि व्ही. आय. तेनित यांच्या लिखाणातून व्यक्त झालेला शास्त्रिय Marxism मधून उदयार आला आहे. भांडवलशाही सरकारामध्ये कारखानदारीत झालेली वाढ आणि त्यामुळे झालेला आर्थिक विकास, जो भांडवलदारांच्या नियंत्रणात असतो, त्याला 'खरा विकास' असे साम्यवादी विचारसरणीचे समर्थक मानतच नाहीत. मुक्त बाजार व्यवस्था किंवा भांडवलशाहीच्या नमून्याच्या जागी मार्क्सीस्ट लोक साम्यवादी नमूना सूचवितात जो खऱ्या अर्थात egalitarian म्हणजे सर्व मानव समान आहेत असे समजून, वर्गभेद, वंश भेद पन अब्रू इ. बदल भेद करणार नाही. 'Imperialism' नावाच्या लेनिन आपल्या एका महत्त्वाच्या पुस्तकात म्हणतो साम्राज्यशाहीच्या सत्तेखाली, भांडवलवादी अर्थव्यवस्था ही प्रामुख्याने वसाहतीच्या, नैसर्गिक संसाधनाचे शोषण करुनच बळकट झाली होती. साम्राज्यशाहीच्या जोखडामध्ये अडकलेल्या 'वसाहती राष्ट्रांना' लेनिन त्या विरुद्ध लढा द्यायला प्रोत्साहन देत होता. लेनिनचे लिखाण हे अशा गुलाम राष्ट्रांना, अन्यायाविरुद्ध लढायला, स्वातंत्र्यासाठी एक परीने प्रेरणा देत असे.

शास्त्रीय साम्यवादी मतानुसार, भांडवलवादी समाजामध्ये, कामगार वर्गाची अशी दिशाभूल केली जाते की, ते मुक्त आहेत. कारण त्यांच्या श्रमाची कामाची मजूरी त्यांना दिलेली असते. पण प्रत्यक्षात ते श्रम एका अज्ञान 'परिमाणात' रुपांतरीत होते जे विकले वा खरिदले जाऊ शकते, ज्याचा परिणाम म्हणजे भांडवल वाद्याच्या खिशात अतिरिक्त रक्कम जाते जी कामगरांचे शोषण करुन मिळालेली असते. भांडवलशाही समाजामध्ये कामगाराला परकेपणाची भावना येते कारण विशिष्ट काम मिळवण्यासाठी लागणारी हिकमतीचे किंवा चलाखीचे बळ त्यांच्याकडे नसते. भांडवलशाही व्यवस्थेत खाजगी मालमत्ता कायदेशीररीत्या भाडंवलदारांच्या मालकीची असते. कामगार वस्तूंची निर्मिती करतो पण त्या निर्मिती प्रक्रियेच्या साधनांची मालकी भांडवलदाराकडे असते. त्यामुळे कामगारांच्या मनात परकेपणाची भावना असणे हे अत्यंत नैसर्गिक आहे.

मार्क्सच्या म्हणण्यानुसार वस्तूंच्या किंमतीचे खरा हक्कदार कामगार असतो. पण सर्व जगात पैसा तूल्यबळ मानला जातो. मात्र प्रत्यक्षात पैसा वस्तूचे मूल्यु दडवितो. उदा. वस्तूच्या निर्मितीमागचे कामगार श्रम जितके जास्त श्रम हे वस्तूच्या उत्पादता मागे जातात. तितकी मोठी किंमत त्याला मिळते म्हणून Marx आपले अनुभव नोंदवतो, सर्व वटणावळीचे दर हे 'श्रमकाल' किती वेळ काम केले यावर ठरतात. भांडवलशाहीमध्ये लोकांना असा विश्वास ठेवायला भाग पाडतात की, 'सत्ता आणि किमंत' या कायम 'Money' पैसा रुपातच असतात. मात्र प्रत्यक्षात त्या श्रम आणि उत्पादनामध्ये अंगभूत असतात.

भांडवलवाद्यांच्या तथाकथित उदारमतवादी विकासाच्या नमून्याला असलेल्या अधिकृत पाठिंब्याला, मार्क्सवाद संपूर्णतः मोडित काढतो.

मार्क्सीस्ट विचारवंतांच्या म्हणण्याप्रमाणे 'भांडवलवादी विकास नमूना' हा विकसनशील देशांतील परिस्थितीसाठी अगदीच विशोभीत, अयोग्य आहे. समकालीन विकसनदेशातील राजकिय आणि आर्थिक विकासाचा दर्जा हा ज्यावेळी साम्राज्यशाही देशांनी भांडवलशाही विकास नमूना निवडला त्यापेक्षा अगदीच भिन्न आहे. Paul Baran यांच्या निरक्षणाप्रमाणे, आजच्या पुढारलेल्या देशांनी, तिसऱ्या जगातल्या नैसर्गिक संपत्तीचे अपहरण केले आणि संपत्ती जमवली. हे अगदी अधिकृत मत आहे. सध्याच्या विकसनशील देशांना इतर देशांच्या नैसर्गिक संपत्तीचे अपहरण करण्याची अशी नामी संधी मिळणार नाही. तिसऱ्या जगातील स्थानिक भांडवलवाद्यांजवळ आवश्यक तेवढे ज्ञान नाही. ज्यायोगे ते स्वबळावर आर्थिक विकास घडवून आणू शकतील. म्हणून मार्क्सीस्ट असे विश्वासाने म्हणतात की, विकासाचे भांडवलवादी मॉडेल हे विकसनशील देशांना त्यांच्या आर्थिक विकासासाठी गैर लागू आहे.

लॅटिन अमेरिकेतील परिस्थितीक लक्षात घेता Andre G. Frank त्यांच्या Capitalism and underdevelopment in Latin America (1967) या पुस्तकात, तेथील स्थानिक अडचणींना विचारात घेताना म्हणतात, तेथील भांडवलदार तेथे भांडवलवादाचा विकास करु शकत नाहीत. कारण त्यांची परिस्थिती आणि U.S.A. and U.K. मधील भांडवलदारांच्या परिस्थितीमध्ये तफावत आहे. युरोपमधले भांडवलदार सुरक्षित भांडवलशाही उभारु शकले कारण त्यांचे राजकिय धनी त्यांच्या वसाहतीच्या नैसर्गिक संसाधनाचे शोषण स्वतःच्या देशाच्या फायद्यासाठी करु शकत होते.

Frank स्पष्टीकरण देतो, केंद्रिय सत्ता म्हणजे साम्राज्यशाही. साम्राज्यशाहीचा विकास व्हायला हवा तर वसाहती मागास राहणारच. म्हणून तो विकसनशील देशांना 'भांडवलवादी विकास नमूना' नाकारायचा संदेश देतो. त्याचे म्हणणे आहे कि तो नमुना अंगिकारणे म्हणजे परागती - अविकासाकडे जाणारा मार्ग आहे.

इजिप्टिशीयन (Egyptian) अर्थशास्त्रज्ञ Samir Amir त्याच्या संशोधनात Accumulation on a world scale : A critique of the theory of underdevelopment (1970) औद्योगिकीकरण झालेले देश, म्हणजे ज्यांना आपले उत्पादन अविकसित देशावर लादायचे आहे त्यांचे संबंध त्या त्या वसाहतीतील लोकांशी कसे असतात? यावर भर दिला आहे. अमीन फ्रँकशी सहमत होत म्हणतो त्याचे विचार आफ्रिकन देशांना ही लागू पडतात. तिसऱ्या जगातला 'अविकसितपणा' हा मार्क्सीस्ट नॉम मार्क्सीस्ट तंज्ञाच्या मते, विकसित राष्ट्राचा राजकीय आणि आर्थिक विकासाच्या नमून्याचे परिणाम म्हणून आहे. हेच ते पश्चिमी देश ज्यांनी शेकडो वर्षे तिसऱ्या जगातल्या संसाधनाचे अपहरण केले. आजही करत आहेत.

**आपली प्रगती तपासा :**

१) विकासाची संकल्पना स्पष्ट करा.
२) उदारमतवादाचा विकासविषयक दृष्टीकोन टीकात्म पद्धतीने तपासा.
३) विकासा बद्दलचा मार्क्सीस्टच्या दृष्टीकोनाचे मूल्यमापन करा.

## १६.४ जागतिकीकरण

Globalisation हा शब्द अनेक आंतरराष्ट्रीय विषयांशी जसे सांस्कृतिक शिक्षण, आरोग्य, आर्थिक जोडलेला आहे. पण जास्त करुन तो शब्द देशादेशातील आर्थिक संबंधात बाबत वापरला जातो. Globalisation म्हणजे जगाचे एका मुक्त बाजारपेठेत रुपांतर करणे. जिथे उत्पादन आणि वितरण आंतरराष्ट्रीय बाजारात आयात निर्यात करांसारखे सर्व रद्द होतील. आर्थिक व्यवहाराव्यतिरिक्त हा शब्द कल्पनांची देवघेव, विविध भाषिक कौशल्य शिकणे, विविध संस्कृतिचा अंतरराष्ट्रीय स्तरावर ह्या शब्दाचा Globalisation चा वापर होतो, १९३० मध्ये या शब्दाचा वापर प्रथम, 'शिक्षणाच समग्र दर्शन' या संदर्भात वापरला गेला व सामाजिक शास्त्रांच्या शब्दकोषात प्रथम आणला गेला. अंतरराष्ट्रीय प्रसार माध्यमांनी तो १९८० मध्ये होऊ घालणाऱ्या अंतरराष्ट्रीय व्यापाराच्या, कमी निर्बंधाच्या संबंधात वापरला. The United Nations Economic and Social Commission for Western Asia (ESCWA). Globalisation ची व्याख्या अशी केली आहे, "सर्वत्र वापरली जाणाऱ्या ह्या संज्ञेची व्याख्या अनेक निरनिराळ्या प्रकारांनी करता येईल. जेव्हा ती आर्थिक विषयासंबंधी असेल तेव्हा ती दोन देशांमधील सीमारेषा आणि अडथळ दूर करुन, मालाचा प्रवाह, सेवा, भांडवल आणि कामगार (अर्थात कामगारांचे एका देशातून दुसऱ्या देशात येणे हे तितकेसे नवे नाही) इ. चे आदानप्रदान ह्याची सुरुवात १९ व्या शतकाच्या अखेरीस झाली, पण १ ल्या महायुद्धाच्या काळात ही क्रिया मंदावली ती १९ व्या शतकाच्या चौथ्या भागापर्यंत."

ESCWA ही संस्था वरील Globalization संबंधातील सर्व प्रकारच्या व्याख्या मान्य करते पण शेवटी 'आर्थिक संबंधानाच महत्त्व देते. जगातील सर्व विचारवंत आर्थिक वळणालाच जास्त महत्त्व देतात. अमेरिकन अर्थशास्त्रज्ञ Thomas L. Friedman म्हणतो, जागतिक व्यापार, राजकिय सत्ता, पुरवठा व्यवस्था आणि Outsourcing या चार गोष्टींनी अडथळा विरहित जगाला, चालना दिली आहे, ज्याने जग पूर्णपणे बदलले आहे; चांगल्या आणि वाईट साठी त्याप्रमाणे Takis Fotopoulos ने जागतिकीकरणाच्या आर्थिक बाजूने नियंत्रणमुक्त पुरवठा, भांडवल आणि कामगार पुरवठा या आधारावर नव जागतिकीकरणाची सद्य वाटचाल सुरु आहे. असे अधोरखित केले आहे. हे लक्षात घेतले पाहिजे की ही संकल्पना नवीन नाही. ही आयत जुनी पण अर्थ व्यवस्थेनुसार बदलत गेलेली आणि शास्त्रीय तंत्रज्ञानाच्या प्रगतीप्रमाणे विकसत गेलेली प्रणाली होती. त्यामुळे या प्राचीन व्यवस्थेकडे धावता दृष्टीक्षेप टाकणे योग्य ठरेल.

Andre G. Frank च्या म्हणण्याप्रमाणे जागतिकीकरणाचा पहिला टप्पा BC3000 मध्ये जेव्हा Sumer and Indico Valley Civilisation यांनी आपापसात व्यापारी संबध प्रस्थापित केले. नंतर Hellenistic Age मध्ये, पूढील देशांमध्ये चालू होता. उदा. ग्रीस, भारत, स्पेन, इजीप्टशीयन बंदरे जसे Alexandria तज्ञ लोकांचे असे मानणे आहे की व्यापारी आदान प्रदान तेव्हा जोरात होते. रोमन ॲम्पायर आणि पर्शियन ॲम्पायर, आणि हान डायनास्टी या तिघांचे आपापसात घट्ट व्यापारी संबंध होते. त्यामुळेच 'Silk Road' एक लोकप्रिय 'हमरस्ता' तयार झाला ज्याची सुरुवात पश्चिम चायना मध्ये झाली आणि तो पोर्तूगाल ॲम्पायरच्या मार्गाने रोममध्ये संपला. या काळातील वृतांताप्रमाणे तेव्हा भारत, ग्रीस आणि रोम मध्ये समुद्रमार्गे व्यापर चाले.

मध्य युगात मुसलमान आणि ज्यू व्यापारी 'भूमीवरील' आणि समुद्रमार्गावरील व्यापारामध्ये प्रमुख गणले जात असत. त्यांनी एशिया आफ्रिका आणि युरोप या तीनही खंडात व्यापारी मार्ग प्रस्थापित केले. याचा परिणाम म्हणून 'शेतीचे' जागतिकिकरण झाले. वास्तवात प्रथम अरब व्यापाऱ्यांची समुद्रमार्गावरील भारत, युरोप आणि आफ्रिका या तीनही देशांतील व्यापारावर मक्तेदारी होती. मुगल साम्राज्याचा उदय झाल्यामुळे. जागतिक व्यापारी हालचालींना विस्कळीतपना आला पण अंतरराष्ट्रीय प्रवासाला त्याने चालना दिली. पहिली जागतिक डाक सेवा करण्याचे श्रेय मोगलांना जाते. त्यांनी एशिया, युरोप आणि आफ्रिकेमध्ये ती सुरु केली.

१६ व्या आणि १७ व्या शतकात युरोपियन सत्ता असे पोर्तूगाल, स्पेन, हॉलंड आणि ब्रिटन यांनी आशिया आणि आफ्रिकन देशांशी समूद्रमार्गे व्यापार वाढवला होता. त्याचवेळी त्यांनी अरब व्यापाऱ्यांना हुसकावून लावले होते. या टप्प्याला तज्ञ लोक Protoglobalisation म्हणतात. १५९९ मध्ये इस्ट इंडिया कंपनीची स्थापना झाली, त्याचा एकमेव उद्देश म्हणजे, भारत आणि युरोप मधील 'मसाल्याच्या पदार्थांचा व्यापारावर संपूर्ण नियंत्रण ठेवणे हा होता. सन १६०० मध्ये ब्रिटिश व्यापारी आले. शेवटी भारताचे वसाहतीत रुपांतर झाले. ब्रिटिश देशात येण्यापूर्वी १५० वर्षे, डच, पोर्तुगीज आणि फ्रेंच यांनी आपापले व्यापारी झोन या देशात स्थापन केले होते. ते सर्वच उघड किंवा गुप्तपणे राजकिय घडामोडींमध्ये सहभागी होते.

१४९२ मध्ये ख्रिस्तोफर कोलंबसने अमेरिकेचा शोध लावला. समुद्र पर्यटन आणि समुद्री व्यापाराला यांच्यापूर्वीच चालना मिळाली होती. अर्थात यांनतर युरोपमधील देश निरनिराळ्या देशात वसाहती काबीज करण्यासाठी आपापसात स्पर्धा करत होते. त्यांच्यापैकी पोर्तूगीज, फ्रेंच, स्पॅनीश आणि ब्रिटिश विजयी ठरले. त्यांनी स्थानिक लोकांना पूर्णपणे कब्जात घेऊन, वसाहती कायमच्या ताब्यात घेतल्या. बाकी इतिहास सर्वज्ञात आहे. आज आपण ज्याला Globalisation म्हणतो, ते १९ व्या शतकाच्या सुरुवातीला सुरु झाले. ह्या संकल्पनेला आकार देण्याचे काम 'साम्राज्यशाही सत्तेचे' आहे. जीचे अधिपत्य दुसऱ्या महायुद्धा पर्यंत होते. दोन महायुद्धांच्या काळात आंतरराष्ट्रीय व्यापाराला उतरती कळा लागली तरी हळूहळू ती सुधारली त्याचे श्रेय Bretton Woods Conference of 1944 ला जाते. या सभेने तीन महत्त्वाच्या (mechanisms) यंत्रणा शोधून काढल्यामुळे आर्थिक जागतिकीकरणाला व्यापाराला, उत्तेजन मिळेल. त्यापैकी 2, International Monetary Fund (IMF) आणि World Bank लगेच स्थापन झाल्या. तिसरी General Agreement on Teriffs and trades (GATT) ची स्थापना १९४७ मध्ये झाली. सध्याचे Gatt, since 1995 त्यालाच World Trade Organisation (WTO) या तीन संस्था, याशिवाय अनेक देशीय संस्थांमुळे, पश्चिमी देशांनाच फायदा झाला. तिसऱ्या जगातल्या, वसाहतवाद नष्ट झालेल्या देशांत ही त्यांनाच (पश्चिमी देशाताच) अर्थविषयावर नियंत्रण ठेवता आले.

इथे वादाचा मुद्दा उभा राहतो; तो Globalization च्या परिणामाबद्दल. पश्चिमी भांडवलवादी याचे जोर जोरात समर्थन करतात कारण त्यांना थेट जागतिक बाजारपेठेत सुस्थापित व्हायला मदत होते. त्यांच्या मते globalisation दोघांच्या दृष्टीने, म्हणजे औद्योगिकीकरण झालेल्या पश्चिमी देशांना आणि तिसऱ्या जगातल्या देशांना फायद्याचे आहे. उदा. globalisation वरील U.N. चे पहिले सल्लागार, श्री. जगदीश भगवती यांचा असा विश्वास आहे की, हा एक सकारात्मक जोर / रेटा आहे ज्यामुळे तिसऱ्या जगातल्या जनसमुदायाची गरीबी कमी होईल. या जलदगती मुळे काही समस्या उभ्या राहतील. हेही ते अनिच्छेने मान्य करतात. पण तरीही अखेर त्यामुळे आर्थिक प्रगती खात्रीत होईल असे त्यांना

वाटते. वास्तवामध्ये जागतिकिकरणाच्या नावाखाली गरीब देशातील कुशल कामगार, शास्त्रज्ञ आणि I.T. आणि कॉम्पूटर इंजिनियर्स पश्चिमी देशात स्थलांतर करत आहेत. त्यामुळे या देशांचा ब्रेन ड्रेन (Brain Drain) होत आहे. दूसरी लोकप्रिय संकल्पना म्हणजे BPO ज्यामुळे भारतासारख्या विकसनशील देशांना खूप मदत होते आहे; जिथे कामगार कमी मोबदल्यात उपलब्ध आहे; पण त्याचा परिणाम म्हणून त्यामुळे श्रीमंत औद्योगिक देशातील निम्न दर्जाचय पदांसाठी इच्छूक असणाऱ्यांना बेकारीला तोंड द्यावे लागत आहे. बऱ्याच निरीक्षकांचे हे मत आहे की पड आणि युरोप या दोन्ही देशांतील २००८ मधील मंदीचे कारण हे BPO च आहेत.

टीकाकारांचे असेही मत आहे कि, Globalisation मुळे (Income) कमाई मध्ये तफावत आली, दोन देशांत आणि एकाच देशातील दोन (निराळे) गटांत, जे एकाच प्रकारचे काम करत होते. सध्याची आर्थिक मंदी ही अति श्रीमंतांचे छोटे गेट आणि अति गरीबांचे अति विशाल गट यांच्यामधील तफावती मुळे आहे. (Goverenment of India Report on unorganized sector 2007). भारत सरकारचा एक असंघटीत कामगारांबद्दलचा अहवाल प्रसिद्ध झाला होता. त्यामध्ये असे निष्कर्ष आले आहेत की, दरडोई वीस रुपये, प्रति दिवस यापेक्षा कमी मजूरी मिळणारे ७७% मजूर आहेत. तसेच Globalisation मुळे राष्ट्र या संकल्पनेची पदावनती झाली असून त्यांची जागा European Institute, WTO, G.B. आणि अंतरराष्ट्रीय Criminal Court ने अंतरराष्ट्रीय करारामधून घेतली आहे.

जागतिकीकरणाच्या विरोधात असणाऱ्या सर्वांनीच, त्याचा जो तिसऱ्या जगावर, त्याच्या आर्थिक, राजकिय आणि सामाजिक जीवनावर नकारात्मक परिणाम झाला आहे, त्यासाठी विरोध केला. विकसित देशात त्याला मध्यम वर्गाने, आणि सुशिक्षित तरुणांनी केला. महत्त्वाचा मुद्दा म्हणजे 'ग्लोबलाझेशन' चांगले नाही आणि वाईट ही नाही. प्रत्येक देश 'ग्लोबलायझेशन'चे कसे शोषण आपल्या फायद्यासाठी करतो, त्यावरुन त्याची किंमत ठरेल. उदा. चीन या देशाने त्याचा जास्तीत जास्त फायदा स्वतःसाठी करुन घेतला आहे. त्यांच्या स्वस्त ग्राहकोपयोशी वस्तूंनी जागतिक बाजारपेठ ओसंडून वाहाते आहे. परीणामस्वरुप, जगातल्या तीन महासत्तांपैकी एक, आर्थिक महासत्ता चीन बनला आहे. सद्य परिस्थिती मध्ये कोणताही देश हा मूर्खपणाचा विचार (जागतिकीकरणाला विरोध करुन, एकाकी राहण्याचा विचार करणार नाही. कारण कोणत्याच देशाला असे एकाकी जीवन शक्य नाही. Noam Chomsky, समकालीन जगातल्या अनेक महान बुद्धीमत्तांपैकी एक, त्यांच्या शब्दात समारोप करणे उचित ठरेल. त्यांच्या मते, आंतरराष्ट्रीय विशिष्ट आर्थिक एकात्मता असा संदर्भ 'सत्ताधारी' नी globalisation चा लावला आहे; एक प्रकारे पैसे लावणाऱ्यांच्या हक्कांच्या विचार करणारा, क्वचितच लोकांच्या मताची / सुखाची जाण ठेवणारा, म्हणून धंदा उद्योग करणारे, प्रामाणिकपणे 'मुक्त बाजारपेठे'कडे 'मुक्त ठेवी करार' असे (Wall St.) वॉल स्ट्रीट जरवल मध्ये म्हणते. उघड आहे. कमीतकमी अंतरराष्ट्रीय कर, कायदे आणि मोठ्यात मोठी बाजारपेठ उपलब्ध होणे ह्यासाठी ते globalisation ला पूरक विचार मांडतात. या उलट बोलणाऱ्यांना anti म्हटले जाते. जे सर्वस्वी चुकीचे आहे. कोणीही शहाणा माणूस, आजच्या काळात जागतिक एकात्मतेला विरोध करणार नाही. नक्कीच डावे ही नाही आणि चळवळीचे कामगार ही नाहीत. ज्या 'जागतिक एकात्मता' तत्त्वावर globalisation ची स्थापना झाली होती, त्यामध्ये लोकांच्या अधिकारांना महत्त्व होते; खाजगी मालमत्ता धारक भांडवलवादाला नव्हते. त्या जागतिकीकरणाला कोणालाच विरोध नसेल.

**आपली प्रगती तपासा :**

१) जागतिकीकरण संकल्पनेची चिकित्सा करा.

२) भारताचा विशेष संदर्भ लक्षात घेऊन, जागतिकीकरणाच्या परिणामाचे परीक्षण करा.

## १६.५ सारांश

दुसऱ्या महायुद्धानंतर वसाहतवाद संपुष्टात आणण्याची प्रक्रिया सुरु झाली. सामाजिक शास्त्रांमध्ये विकासाच्या संकल्पनेला जास्त महत्त्व यायला लागले.आफ्रिका आणि एशिया खंडातील देशांना स्वतःचा विकासाचा दर्जा फार खालचा आहे हे जाणवू लागले. त्याची कारणे अनेक होती. जसे दारिद्र्याने पोखरलेला सर्व समाज, अशिक्षितपणा आणि जवळ जवळ शून्यावर असलेली आरोग्य व्यवस्था त्यामुळे विकासाच्या योजनांवर लक्ष केंद्रित करणे अत्यावश्यक होते. दूसऱ्या कोणत्याही सामाजिक संकल्पनेप्रमाणे, विकास या शब्दाची एकमेव व्याख्या नाही. या शब्दाची एकच व्याख्या करण्यामध्ये समस्या कोणती असेल तर, हा शब्द निरनिराळ्या सामाजिक शास्त्रात निरनिराळ्या अर्थाने वापरला जातो. उदा. अर्थशास्त्रामध्ये विकास हा शब्द दर डोई उत्पन्न (Per Capita Income) आणि त्याचाशी निगडीत संस्थात्मक आणि प्रक्रियात्मक बदल, ज्यामुळे निश्चित विकास होतो असा आहे. पण लक्षात ठेवण्यासारखे म्हणजे संस्थात्मक आणि प्रक्रियात्मक बदल, औद्योगिकरणाचा दर्जा सुचवतात; कामगारांचे ग्रामिण भागातून औद्योगिक वसाहतीत होणारे स्थलांतर, बाजारात होणारा सततचा भांडवल पुरवठा, उत्पादनातील सहसंबंधांची अदलाबदल. मुक्त बाजार धोरणाला प्रोत्साहन देण्यासाठी कर धोरणातील बदल इ. राज्यशास्त्र आणि राजकिय विकास यांचा परीघ हा राजकिय स्वातंत्र्यापासून ते खऱ्या अर्थाने लोकांच्या सहभागाने चालणारी 'लोकशाही सरकार' पर्यंत विस्तृत आहे. या सर्वांचा संबंध आर्थिक विकासाशी आहे कारण लोकांचे कल्याण हे शेवटी आर्थिक विकासावर अवलंबून आहे.

विकासाबद्दल अनेक दृष्टीकोन, अनेक समकालीन समाज शास्त्रज्ञांनी मांडलेले आहेत. पश्चिमी देशातील बहुतेक उदारमतवादी प्रचारक असा दृष्टीकोण मांडतात की, सर्व समाजांना एका विशिष्ट चक्रातून जावे लागते. उदा. प्रथम समाज, आदिम मग पारंपारिक किंवा पूर्व आधुनिक आणि शेवटी संपूर्ण आधुनिक औद्योगिक समाज, अशा विविध टप्प्यातून जातो. समाजाची, सामाजिक आणि राजकिय परिस्थिती सुधारण्यासाठी पारंपारिक पद्धतिपेक्षा आधुनिकपणा हा अधिक सक्षम आहे. तसेच ते शेतीजन्य अर्थव्यवस्थेपेक्षा औद्योगिक. अर्थव्यवस्था अधिक चांगली असते असे सुचित करतात. औद्योगिकिकरणामुळे झालेला आर्थिक विकास, ज्याच्यावर भांडवलदारांचे नियंत्रण आहे. त्याला खऱ्या अर्थाने विकास असे म्हणता येणार नाही. असे याला (विकास धोरणाला) पाठिंबा देणारे म्हणतात. त्याऐवजी मार्क्सीस्ट

सुचवितात तसे समाजवादी नमूना खऱ्या अर्थाने संपूर्ण मानवजातीला समान मानणारी (equlitarian) वर्गरहित व्यवस्था अधिक कल्याणकारी असेल.

Globalisation ह्या शब्दाला अनेक अर्थ चिकटले आहेत. ज्यामध्ये त्यांचे आंतरराष्ट्रीय रुप, विविध संस्कृति शिक्षण, अर्थव्यवस्था आणि आरोग्य इ. बद्दल विचार केला जातो. अर्थशास्त्राच्या भाषेत, थोडक्यात जगाचे एका मोठ्या बाजारपेठेत रुपांतर करणे ज्यामध्ये मालाचे उत्पादन आणि वितरण यावर कोणतेही आयात, निर्यात कर किंवा निर्बंध नसतील. या शब्दाला दूसरा अर्थ विविध भाषा शिकण्याचे तंत्र, कल्पनांचे आदान प्रदान आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर सांस्कृतिक देवाण घेवाण म्हणजे Globalisation.

## १६.६ पाठावरील प्रश्न :

१) 'विकास' संकल्पनेची व्याख्या करा. त्यावरील दोन लोकप्रिय दृष्टीकोनांवर चर्चा करा.

२) Globalisation ही संकल्पना स्पष्ट करा. त्याचा विकसनशील देशांवर होणाऱ्या परिणामांची चर्चा करा.

❖❖❖❖

# १७

# आधुनिकता आणि लैंगिकता यावर समकालीन चर्चा

**घटक रचना :**

१७.० उद्दिष्ट्ये
१७.१ प्रस्तावना
१७.२ आधुनिकतेच्या सिद्धांता विषयी व्याख्या आणि टीका
१७.३ आधुनिकतावाद, आधुनिकता आणि पश्चात आधुनिकतावाद
१७.४ 'लैंगिक न्याय' संकल्पना : या वरील विविध संकल्पना
१७.५ स्त्रीवाद : २० व्या शतकातील 'स्त्री मुक्ती' चळवळीची स्थिती
१७.६ सारांश
१७.७ पाठावरील प्रश्न

## १७.० उद्दिष्ट्ये

१) आधुनिकतेची संकल्पना आणि राजकारणाच्या क्षेत्रातले तिचे महत्त्व समजून घेणे.

२) आधुनिकतेच्या सिद्धांताचे चिकित्सक परीक्षण करणे आणि 'आधुनिकता' या संज्ञेचा वापर विविध संकल्पना व्यक्त करण्यासाठी प्रस्थापित करणे.

३) 'पश्चात आधुनिकतावाद' या कल्पनेचा अभ्यास करणे.

४) 'लैंगिक न्याय' या संकल्पनेचा अर्थ आणि महत्त्व यांचे विश्लेषण करणे.

५) 'स्त्रीवादी' चळवळीशी संबंधित विविध सिद्धांतांचे विश्लेषण करणे.

६) 'स्त्रीवादी' चळवळीची सद्य स्थिती समजून घेणे.

## १७.१ प्रस्तावना

'बदल' हा एक न टाळता येण्याजोगा महत्त्वाचा सामाजिक घटक आहे. काही समाजांमध्ये बदल झपाट्याने होतात, तर काही समाजांमध्ये, मंद गतीने बदल होतात. सामान्यतः तंत्रज्ञानाने पुढारलेल्या समाजामध्ये, बदल झपाट्याने होताना दिसतात; तर इतरत्र होणारे बदल मान्य करायला, अविकसित समाजाला वेळ लागतो. एका तऱ्हेने पाहता विकसित, पुढारलेला समाज दर्जा ठरवितो. बाकीचा समाज त्यांचे अनुकरण करतो. सामाजिक बदल होताना नवीन मूल्ये, नवीन कल्पना समाजात पसरु लागतात. या नव्या कल्पनांचा जून्या, पारंपारिक संकल्पनाना विरोध होतो, कारण दोन्ही कल्पनांमध्ये तुलना होते; त्यांच्यामध्ये

विरोधाभास असतो. उदा. 'ब्राह्मणांचे वर्चस्व', 'स्त्रियांचे कार्यक्षेत्र म्हणजे 'चूल आणि मूल' पुरते मर्यादित ठेवणे' या जून्या, कालबाह्य कल्पना झाल्या. तर 'सामाजिक समानता', 'लैंगिक न्याय' या आधुनिक कल्पना आहेत. आपल्यासाठी महत्त्वाचा मुद्दा हा आहे की, राजकारणावर या आधुनिकतेचा काय परिणाम होतो हे पाहणे आहे.

मूळ लॅटीन शब्द Jessie म्हणजे एकत्र बांधणे या शब्दावरुन Justice म्हणजे न्याय हा शब्द तयार झाला आहे. समाजातले संघर्ष हे शांततापूर्ण मार्गाने सोडवून, सामाजिक एकी टिकवण्याचे ध्येय ठेवणे. 'न्याय' हा शब्द सांगतो. तथापि आज, आधुनिक काळात, न्याय म्हणजे 'सामाजिक न्याय' असे समजले जाते. उदा. अल्पसंख्यांक जमातीना प्रगती करण्यासाठी पुरेशा संधी उपलब्ध करुन देणे. हा प्रकार 'Distributive Justice' या नावाने ओळखला जातो. 'स्त्रियांना अन्याय वागणूकीला सामोरे जावे लागले.' हे सर्व प्रकारच्या समाजात घडत होते याला इतिहास साक्ष आहे. त्यांचा आत्मसन्मान कसा पुर्नस्थापित होईल? 'सर्व मानव समान आहेत' या egalitarian तत्त्वाशी मिळते जुळते 'समानतेवर' आधारलेले समाज उभारणे, या मुद्यावर या पाठाचा भर आहे.

## १७.२ आधुनिकता : व्याख्या आणि अर्थ :

लॅटिन शब्द 'Modernus' म्हणजे Just now आत्ताच! त्वरित! या शब्दापासून 'Modernity' म्हणजे आधुनिकता हा शब्द तयार झाला. हा शब्द चालू घडीशी, सद्य परिस्थितीशी संबंधित आहे. ती (आधुनिकता) ही जून्या पेक्षा पूर्ण निराळी असेल, जुन्या घटनांपेक्षा वेगळी असेल, जुनी मूल्ये आणि जुन्या संस्था ज्या आज अस्तित्वात नाहीत. त्यांच्यापासून फार दूर असेल. उदा. लोकशाही आधुनिक संकल्पना आहे तर 'राजेशाही', 'उदारमतवादी' या जुन्या संकल्पना आहेत. तसेच विभक्त कुटुंब पद्धत ही आधुनिक, आणि एकत्र कुटुंब पद्धत किंवा गटा गटाने, जमावाने एकत्र राहणे ही जुनी पद्धत म्हटले जाऊ शकते. तसेच सामाजिक मूल्यांमध्ये आधुनिक काळात Status चा अर्थ Class व्यक्तिचा आर्थिक दर्जा, सार्वजनिक कार्यालयातील त्याचे पद याच्याशी निगडित आहे तर जुन्या काळात Status चा अर्थ त्याचा संबंध सामाजिक आणि सांस्कृतिक मुद्यांशी जोडलेला होता. उदा. वंश, रंग, जात आणि सांस्कृतिक गट इ.

इतिहासाला कलाटणी देणाऱ्या घटनांचे वर्णन करताना Modernity हा शब्द वापरला जातो. आपण म्हणतो, जसे "Modern art", "Modern Language" अनुक्रमे 'आधुनिक कला', 'आधुनिक भाषा' असे शब्द वापरतो. मुळातच आधुनिकता म्हणजे प्रगतीशील प्रक्रियेची अभिव्यक्ती, जी राजकीय, आर्थिक सामाजिक किंवा सांस्कृतिक असू शकेल.

सर्व प्रथम Modernity या शब्दाचा उपयोग राजकिय परिभाषेत, इटालियन राजकिय विचारवंत 'Niccolo Machiavelli' याने वापरला.

आपल्या लिखाणातून तो 'नवीन नमुने आणि सुव्यवस्था' राजकारणामध्ये प्रचलित करेन असे म्हणतो. तो जुन्या जमान्याचा होता (१४६९ ते १५२९) तरी त्याने काही नव्या कल्पना उघड केल्या ज्या आजवर प्रचलित असलेल्या संकल्पनापेक्षा संपूर्णतः भिन्न होत्या. अशा तऱ्हेने 'आधुनिकता' ही संज्ञा 'नवीन विचारसरणी' किंवा जून्या पासून बाजूला होणे अशा अर्थी घेतली गेली. म्हणूनच १९ व्या शतकातल्या समाज सुधारकांनी, विधवा विवाह स्त्री-समता, या

संकल्पना २०० (दोनशे) वर्षापूर्वीच्या असल्यातरी त्यांना आधुनिक म्हटले जाते. कारण त्यांनी प्रस्थापित समाज धोरणे विरुद्ध, आणि त्याला अनादी कालापासून चिकटून असलेल्या मूल्यांविरुद्ध बंड केले. समाजाला नवीन दिशा दिली. त्यांनी नवीन मूल्ये निर्माण केली. राजकारण आणि समाजशास्त्रामध्ये Modernity म्हणजे आधुनिकता ही नवीन संकल्पना नवविचारांशी संबंधित आहे. कधी कधी जुन्या कल्पनाचे, नवीन अनुभवांमुळे नवीन अर्थ लावले जातात. उदा. नव-उदारमतवाद, 'नव बहुलत्ववाद', 'नव समाजवाद' इ. इथे पारंपारिक संकल्पनेतील जुन्या मूळ संकल्पना तशाच ठेऊन त्यामध्ये नवीन कल्पना घातल्या गेल्या हा ऐतिहासिक अनुभव आहे.

'सत्य' शोधण्यासाठी नवीन मार्ग शोधून काढणे हे सामाजिक शास्त्रात नित्याचेच आहे. पूढील सर्व नावे, ही 'आधुनिकतेच्या जनकांची' आहेत.

1) Machiavelli
2) Francis Bacon (1561-1626)
3) Galileo 1534-142
4) Rene Descartes 1596 - 1660

प्रॉटेस्टंट पंथाची धर्मसुधारणा चळवळ ही सैद्धांतिक दृष्ट्या 'आधुनिक' चळवळ समजली जाते. कारण त्यांनी Vatican चर्चच्या पदाधिकाऱ्यां विरुद्ध बंड केले होते. त्यांना 'शुद्ध आणि साधे' आयुष्य ख्रिश्चन समाजासाठी हवे होते. त्याचप्रमाणे भारतावरील 'भक्ती मार्ग चळवळीने, मानवांमधल्या समानतेला अग्रक्रम हवा असा आग्रह धरला. जातीसंस्थेच्या बंधनांवर प्रश्नचिन्ह ठेवले. तसेच देवासमोर सर्व समान आहेत' या मताचा प्रसार केला. प्रस्थापित धर्म मर्तांडांना आव्हान दिले.

राजकारणामध्ये, धर्म, संस्कृति आणि सामाजिक जीवनाचे अनेक पैलू या सदंर्भात विशिष्ट कालखंडातील बुद्धिजीवी विचारवंतांचे सांगणे आहे की, जून्या परंपरा सोडा, नव्या जीवन शैलीची सुरुवात करा, जी जून्या रुढीं पेक्षा अधिक हवी हवीशी वाटेल. कधी कधी गंगा उलटी वाहते. हा Break म्हणजे कधी जुन्या पुराण्या कालखंडाचा जसे भारतात १९ व्या शतकात 'आर्य समाज' आणि वेदाकडे परत चला ची सुरुवात झाली होती. किंवा महात्मा गांधींनी प्रसारित केलेली 'राम राज्य' संकल्पना याचा अर्थ, समाजाच्या विचारसरणी मध्ये, एका विशिष्ट कालखंडात, स्वतःच्याच संकल्पनांकडे चिकित्सक दृष्टीने पाहिले जाते; त्याचे विश्लेषण होते आणि त्यातून नवीन कल्पना उदयास येतात किंवा काल्पनिक सुराज्यची प्राचीन काळातल्या संकल्पनेशी संदर्भ जोडला जातो. म्हणूनच Modernity आधुनिकता ही एक संदिग्ध कल्पना आहे. त्याला अनेक अर्थ आहेत. तरीही 'आधुनिकतेचे काही विशिष्ट गुणविशेषांची आपण यादी करु, जे आधुनिकता साकार करतात.'

### **१७.२.१ आधुनिकतेचे महत्त्वाचे गुण विशेष :**

काही मूलभूत मूल्यांच्या आधारे आपण 'आधुनिकता' कशास म्हणावे याचा शोध लावू शकतो. उदा. एखादी समस्या सोडविताना तो धर्माचा विचार न करता 'reason' म्हणजे कारणांचा तर्काने विचार करत असेल तर त्यास आधुनिक माणूस म्हणावे.

खालील स्वाभाविक पायाभूत मूल्यांनी 'आधुनिकता' घडते.

१) कारणमिमांसा आणि तर्कशुद्ध, बुद्धिनिष्ठ विचारसरणीचा अवलंब करणे.
२) मोकळी मनोरचना आणि मुक्त विचार.
३) समाजात होणाऱ्या बदलांना मान्य करण्याची इच्छा व तयारी.

४) 'ज्ञान हीच शक्ती' यावर विश्वास.
५) शास्त्रीय बैठक : विचारांची पद्धत.
६) लोकशाहीतील मूल्ये, जसे समता, व्यक्ति ची प्रतिष्ठा आणि सामाजिक न्याय यावर विश्वास असणे.

आधुनकतेने पुढे संस्थात्मक रुप धारण केले. पूर्वी नमूद केल्याप्रमाणे, काही ऐतिहासिक बदल, समाजाच्या संस्थात्मक रचनेमध्ये झाले. ह्या आर्थिक, सामाजिक आणि राजकीय बदलांनी सामाजिक संस्थांचे स्वरुपच बदलून टाकले. अठराव्या शतकाच्या सुमारास आधुनिक संस्था अस्तित्वात आल्या.

'जून्या सरंजामशाही' च्या जागी 'राष्ट्रीय सरकार' ची स्थापना झाली. 'सार्वभौमत्वाची' संकल्पना याच काळात पुढे आली. 'राष्ट्रीय सरकारचा इतर सत्तेच्या केंद्रावर, चर्च, उमराव, जहागिरदार इ. गोष्टींवर निर्बंध आणि सत्ता होती. एक कायदेशीर सत्तेची संस्था जी आपल्या नागरिकांकडून कायदेशीर मान्यता मिळवते. हे आधुनिक संस्थेचे मानचिन्ह आहे.'

याच काळात 'बहुलत्व', 'धार्मिक विविधता' आणि 'धर्मनिरपेक्ष राजकारण' या संकल्पना उदयास आल्या. त्याची सुरुवात प्रोटेस्टंट पंथाची धर्मसुधारणा चळवळीने झाली. यामध्ये नागरी सत्ता आणि चर्चची सत्ता त्यांनी एकमेकांच्या कार्यक्षेत्रात हस्तक्षेप करु नये, असा विचार होता. 'धर्म' ही वैयक्तिक बाब आहे. सरकार कायद्याच्या आधारे, व्यक्तीच्या वागणुकीबद्दल, त्याला शिक्षा द्यायची का बक्षीस हे सरकार ठरवेल; चर्चा नाही. याचीच परीणती पुढे निधर्मी सरकार स्थापण्यात होईल.

हाच तो काळ, जेव्हा निदान युरोपमध्ये सर्वांनी लोकशाही आणि प्रातिनिधिक सरकार मान्य केले होते. सार्वजनिक कामे हाताळण्याची सत्ता सामान्य माणसांमध्ये असते असे जॉन लॉक, रुसो, जे. एस. मील्स आणि इतर विचारवंतांनी आपल्या लिखाणातून कंठशोष करुन सांगितले.

आधुनिकतेने नोकरशाहीचा उदय पाहिला. प्रशिक्षित नागरी अधिकारी, काही कडक कायद्यांच्या मदतीने राज्याचा कारभार चालवत असत. हा आधुनिक राज्याचा मूख्य घटक होता. हे नागरी अधिकारी कायम आणि पगारी होते. राजा आपल्या अधिकाऱ्यांना आपल्या मर्जीने निलंबीत करत असे. पण आधुनिक राज्यव्यवस्थेत, या प्रशिक्षित अधिकाऱ्यांना निलंबीत करता येत नाही. त्यांना निलंबीत करण्यासाठी त्यांच्यावर कायदेशीर कारवाई करण्यासाठी, त्यांचे दोष चुका दाखवण्यासाठी फार मोठी लांबलचक प्रक्रिया करावी लागते. यामुळे त्यांना (अधिकाऱ्यांना) संरक्षण मिळाले आणि सरकार, निदान तात्विक दृष्ट्या, निःपक्षपाती व्यवस्थापन देऊ शकते.सरकारी अधिकारी, सरकारी योजना राबवताना, वंश, धर्म, रंग, लिंग इ. कशाचाही विचार न करता, तटस्थ राहून त्यांची कार्यवाही करतो. तो नियमांचे पालन कठोरपणे करतो, आणि त्यांचे निःपक्षपातीपणे उपयोजन करतो.

युरोपियन वसाहतवाद आणि आधुनिक वाद विचार एकाच काळात योगायोगाने प्रचारात आले. आफ्रिका-एशिया खंडातले देश, युरोपच्या वसाहती झाल्या. युरोपची आर्थिक समृद्धी ही तिसऱ्या जगाच्या शोषणामुळे होती. या देशांची आर्थिक लूट झाल्यामुळे, ते गरीब झाले होते. पण त्यामुळे त्या देशातल्या लोकांमध्ये राजकिय जाणीवा जागृत झाल्या. विशेषतः भारतामध्ये, ब्रिटिश सरकारमुळे इंग्लिश ज्ञानाचे दरवाजे उघडे झाले. आणि सुशिक्षित भारतीय लोकांनी त्या ज्ञानाच्या जोरावर चिकित्सकपणे आपल्यातील उणीवांचे परीक्षण केले. त्यामुळे लोकांच्या

राष्ट्रीयत्वाच्या जाणिवा आणि राष्ट्रप्रेमाची भावना, आधुनिक दृष्टीकोन विकसित झाल्या. अशा तऱ्हेने वसाहतवादाने आधुनिकतेचे बीज आपापल्या वसाहतीत वृद्धींगत केले.

अर्थशास्त्राच्या दृष्टीने विचार केल्यास 'आधुनिकतेचा काळ तेव्हा सुरु झाला, जेव्हां 'बाजार अर्थव्यवस्थेने' मूळ धरले. देशा-देशातील अंतरराष्ट्रीय व्यापार वाढल्यामुळे औद्योगिकरणाला गती आली आणि कामगार समाजाचे स्थलांतर होऊ लागले. औद्योगिकरणाच्या पूर्वीच्या काळात, शेतीकाम करणारा मजुर छोट्याशा गावात, मर्यादित मिळकतीमध्ये भागवत होता, जगण्याचा प्रयत्न करत होता. परंतु औद्योगिकी करणाच्या वाढीमुळे कामगारांना मागणी वाढली. त्यामुळे कामगार खेड्यातून शहराकडे स्थलांतरीत होण्याची क्रिया सुरु झाली. शेतीकामाच्या मजूरीच्या तुलनेत त्यांना कारखान्यात चांगला पगार मिळू लागला. त्यामुळे ते शहरात कायम राहू लागले. आणि शहरीकरणाची प्रक्रिया सुरु झाली.

कारखानदारांना जास्त नफा मिळविण्याच्या दृष्टीने नवीन शोध आणि नवीन यंत्रे हवी होती. म्हणून त्यांनी तंत्रविज्ञान-संशोधनामध्ये पैसे गुंतविले. म्हणून आधुनिकतेच्या काळात तंत्र कौशल्याची झपाट्याने वाढ होत आहे. सर्व तऱ्हेच्या तंत्रज्ञानाच्या संशोधनाने कारखानदारांना समृद्धी आली, त्याच वेळी समाजाच्या इतर भागांनाही या संशोधनाचा फायदा झाला. शिक्षणाच्या प्रसारामुळे आणि शहरीकरणामुळे 'कामगारांच्या एकजुटी'ला प्रोत्साहन मिळाले. त्या एकीच्या जोरावर, कामगार चळवळींनी, चांगल्या स्थितीत (better working condition) काम करण्याऱ्या मागण्यांसाठी लढा दिला.

थोडक्यात आधुनिकतेने 'भौतिक संस्कृति'ला प्रोत्साहन दिले. मालाचा खप, विषय सूख आणि संपत्तीचा प्रचंड साठा करणे, ही सर्वमान्य मूल्ये झाली. आधुनिकतेचा मध्य बिंदू म्हणजे 'अमर्याद प्रगती'ची संकल्पना होय.

तत्त्वज्ञानाच्या संकेता नुसार, आधुनिकतेने नवीन भूमिका तयार केली. नवीन विचार हे सकारण आणि अनुभवावर आधारित असतात. या पूर्वीच नमूद केल्याप्रमाणे आधुनिकता आणि तंत्रज्ञानशास्त्र विकास एकाच कालखंडात सुरु झाल्यामुळे लोकांच्या विचारसरणीतील अग्रक्रमात बदल झाला. हो फक्त शक्यतेचे भाकित नव्हते तर वास्तववादी, विश्लेषण होते. 'Bacon' याने आपल्या (The Great Instauration) या पुस्तकाच्या प्रस्तावनेत म्हणतो, "मानवी ज्ञान आणि मानवी शक्ति, एकत्र येतात", "ज्ञानासाठी ज्ञान" ही कल्पना आता कुणालाच मान्य नव्हती. 'ज्ञानाचा उपयोग, मानवाच्या निसर्गाशी लढण्याला, सहाय्यभूत असा झाला पहिजे.' म्हणून त्याचा रोख ज्ञानांच्या उपयुक्तेतेवर आहे. त्या ज्ञानाचे उपयोजन करुन, मानवजातीला तोंड द्याव्या लागणाऱ्या सर्व समस्यांचे निराकरण करण्यासाठी झाला पाहिजे. 'परिस्थिती बदलणे शक्य आहे' हा आधुनिकतेच्या तत्त्वज्ञानाचा दावा आहे.

आधुनिक राजकिय सिद्धांतामध्ये, सरकारचे कामकाज कसे चालते, हे वागण्याच्या पद्धतीचा अभ्यास करण्यासाठी वापरले जाते. त्यांनी व्याक्तिला, राजकिय सामंजस्यासाठी केंद्रीभूत केले. या आधीच्या Normative and Speculative विचारवंतांनी 'न्याय' स्वातंत्र्य 'चांगल्या' अशा अमूर्त मूल्यांना केंद्रीभूत ठेवले होते. तर आधुनिक विचारवंत, व्यक्ति आणि तिच्या प्रतिक्रियाकडे, 'त्या व्यक्तिची परिस्थितीजन्य प्रतिक्रिया' अशा दृष्टीकोनातून पाहतात. "Hobbes Social Contract Theory" हे एक उदाहरण आहे. नैसर्गिक आव्हानांपासून स्वतःला सुरक्षित ठेवण्यासाठी, मानव कसे एकत्र आले, हे यातून दिसते. प्रत्येक व्यक्ति ही स्वायत्त आणि तर्कशुद्ध असते. तो आपली निवड मुक्तपणे करतो. म्हणून मूल्ये ही तोच

ठरवितो. म्हणून सरकार (पूर्वीच्या विचारवंतांनी उभे केलेल्या चित्राप्रमाणे) म्हणजे परीपूर्ण संस्था (सर्व कारभार सुरळीत चालवणारी सरकारी संस्था म्हणजेच शंभर टक्के योग्य व्यवस्थापन) नव्हे तर खरे पाहता, बहुमताच्या जोरावर, लोकांच्या मागण्या पूर्ण करणारी 'सरकार' ही एक औपचारिक संस्था आहे.

C.B. Macpherson यांच्या म्हणण्याप्रमाणे 'राजकिय आधुनिकता म्हणजे "Possessive Individualism" म्हणजे 'आत्मकेंद्रित व्यक्तिपद' हा समाजाशी नव्हे 'व्यक्ति'शी संदर्भ ठेवतो.

निरनिराळ्या संदर्भात 'आधुनिकता' हा शब्द वापरला जातो. ज्याच्याशी अनेक मुद्दे जोडलेले आहेत. तो पोशाख विषयक, खाण्यापिण्याच्या सवयी विषयक, सांस्कृतिक आवडी निवडी विषयक आणि आयुष्यातील अग्रकमा विषयक असू शकेल. आधुनिक व्यक्ति ही धार्मिक शिकवणूकीपेक्षा प्रथम अग्रक्रम 'शिक्षणाला' देईल. पैसे नुसतेच साठवण्यापेक्षा तो ते दुप्पट करण्यासाठी धंद्यांत गुंतवेल. कला आणि साहित्या यामध्ये 'आधुनिक' हा शब्द विशिष्ट काळाशी निगडीत आहे. कलेचे इतिहासकार १९ व्या शतकापासून १९७० पर्यंतचा काळ 'आधुनिक कलेचा' काळ असे मानतात. या काळात कलेचा रोख बदलला. प्रातिनिधिक आणि धार्मिक देवदेवता, चिन्हांची चित्रे काढणे सोडून, नवीन प्रकारची चित्रे काढण्याकडे चित्रकारांचा कल वाढला.

August Comte (1798-1857) च्या मते, 'आधुनिक काळाचे वर्णन म्हणजे ऐतिहासिक तीन टप्प्यांची परिणती आहे.' प्रथम आधिभौतिक आणि धर्मशास्त्राचे युग होते, ज्यातून सकारात्मक युग सुरु झाले आता आपण शास्त्रीय युगात आहोत. शास्त्रशुद्ध पद्धतच खऱ्या ज्ञानाचा मार्ग दाखवेल.

**आपली प्रगती तपासा :**

१) 'आधुनिकता' या संज्ञेचा अर्थ सांगा.
२) 'आधुनिकता' या संज्ञेशी संलग्न असलेल्या विविध मुद्यांची चर्चा करा.

## १७.३ आधुनिकतावाद, आधुनिकता आणि पाश्चात्य आधुनिकतावाद :

आधुनिकतावाद आणि आधुनिकता या दोन शब्दांचा वापर करताना संभ्रम निर्माण होतो. ते दोन शब्द एका अर्थाचे नाहीत. त्यांच्यामध्ये अर्थपूर्ण फरक आहे. आधुनिक हा शब्द बाह्य नवीन शोधांमुळे, निर्माण झालेल्या वस्तू. उदा. दुरदर्शन, संगणक इ. पण जेव्हा आपण

'आधुनिकता' हा शब्द वापरतो तेव्हा तो विशिष्ट मूल्यांशी संबंधित असतो. उदा. समानता, सामाजिक न्याय, स्वातंत्र्य, इ. आणि संबंधित इतर मुद्दे. निरीक्षणांतर्गत असे आढळून आले आहे की, बहुतेक धार्मिक मूलतत्त्ववादी आपले ध्येय साधण्यासाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा उपयोग करतात हे अत्यंत प्रतिगामी आहे. उदा. इस्लामी मूलतत्ववादी संस्था, उदा. अलकायदा, सारखे लोक अत्यंत आधुनिक तंत्रज्ञान, जसे संगणकीय ज्ञान, आपली दहशत पसरविण्यासाठी वापरत असतात, आणि चुकीच्या संकल्पना, चूकीची मूल्ये, जी आधुनिकतेच्या कोणत्याच परिभाषेत सामावत नाहीत, त्यांचा प्रसार करतात.

Bruce Lawrence या मताला पुष्टी देत म्हणतो, बरेच मूलतत्त्ववादी धार्मिक लोक, आधुनिक असल्यासारखे दिसतात. कारण ते तंत्रविज्ञानाच्या प्रगतीचा फायदा घेतात. पण ते आधुनिकतेची मूलतत्त्वे नाकारतात जसे सामाजिक समानता, लैंगिक न्याय निवडीचे स्वातंत्र्य, आणि ते आधुनिक जगाची मागणी असलेले हे बदल स्विकारायला ते नकार देतात. ते स्वतःला आधुनिकतेचे प्रतिनिधी म्हणवूच शकत नाहीत. हल्ली, जागतिक आतंकवादी अत्यूच्य, उच्चभ्रू आधुनिक तंत्रविज्ञान वापरत आहेत.

आधुनिकतेलाही टीकाकार आहेत. सर्वात महत्त्वाची टीका झाली ती 'कार्ल मार्क्स' याच्याकडून त्याच्या मते, आधुनिक भांडवलवादी यंत्रणेमध्ये, 'माणसाचे परकीयपण' हा घटक आहे. एकदा का माणूस या (आधुनिकपणाच्या) तत्त्वामध्ये विश्वास ठेऊ लागला की तो सामाजिक बंध विसरतो. Cut Throat म्हणजे अटीतटीच्या स्पर्धेमध्ये माणूस सामाजिक (कल्याणाची) किंमत देऊन, व्यक्ति स्वतः समृद्ध होईल. दुर्बळ आणि गरीब यातून दूर फेकले जातील. मार्क्सने 'साम्यवादी यंत्रणा'ची कल्पना केली होती. एक समाज धारणा, जिथे सर्व गोष्टींची सामाजिक मालकी असेल; ज्यामुळे समाजापासून कोणीच वेगळे पडणार नाही.

परंपरावादी टीकाकार आधुनिकतावादावर हल्ला करताना म्हणतात, 'समाजातील प्रस्थापित मूल्ये, रुढी, परंपरा, संस्कृति आणि धार्मिक श्रद्धा या आधुनिकतेच्या लाटेने वाहून जातील. त्यामुळे सामाजिक पायाच कच्चा राहील.' Edmund Bruke ने केलेले भाष्य, फ्रेंच राज्यक्रांतीच्या वेळी, कसाला लागले, खरे ठरले. पश्चिमी आधुनिकता आणि औद्योगिकीकरण यावर गांधींचे 'Hind Swaraj' हा उघड हल्लाच होता.

औद्योगिकीकरणावर जास्तच भर देण्याऱ्या आधुनिकतेवर पर्यावरणवाद्यांच्या टीकेचा रोख आहे. त्यांच्या म्हणण्याप्रमाणे हवेचे प्रदुषण, हे निसर्गात हस्तक्षेप करण्यामुळे आहे. नैसर्गिक आपत्ती जसे महापूर, दुष्काळ, जागतिक उष्णता वाढवणे, हे सर्व औद्योगिकीकरणाच्या अतिक्रमणामुळे होत आहे. माणसाच्या आनंदी राहण्याच्या हक्काचा भंग निसर्गावर केलेल्या अत्याचारामुळे होत आहे. त्यांच्या सूचनप्रमाणे 'लहान आणि सुंदर' आर्थिक नमुना हा मानवाला अधिक सुखकर होईल.

तात्वीक दृष्ट्या विचार करता, बऱ्याच टीकाकारांना असे वाटते की, आधुनिक विचारवंत तर्कशुद्ध विचारसरणीवर जरा जास्तच जोर देतात. पण तर्कधिष्टीत विचारामुळे, गुंतागुंतीची मानवी विचार सरणी समजेलच असे नाही. अनेक सामाजिक आणि राजकिय जीवनात बदल होताना दिसतात. ज्याला तर्कशास्त्रीय उत्तर नसते. 'हिटलर समजण्यासाठी (उदाहरणार्थ) तर्कशास्त्रापेक्षा मानसशास्त्र अधिक उपयुक्त ठरेल.'

काही 'जमातवादी' विचारवंत म्हणतात 'व्यक्तिवादा' च्या जास्त प्रभावाने, मनुष्य समाजापासून तुटतो, वेगळा पडतो. व्यक्ति फक्त स्वतःच्या सुरक्षिततेचा आणि प्रगतीचा विचार करेल; समाजाबद्दल त्याला काहीच वाटणार नाही. उदा. एखादी व्यक्ती एखाद्या अशा कंपनीस पैसे गुंतवेल जिथे अफाट जास्त नफा मिळतो, त्या वेळी तो विचारही करणार नाही की या कंपनीचे उत्पादन काय आहे? त्याचे परिणाम काय आहेत? त्याचा समाजावर काय परिणाम होईल? शस्त्रास्त्रे बनविण्याचा कारखान्यात केलेली गुंतवणूक, ही गुतंवणूकदाराला अफाट फायदा मिळवून देईल पण इतरत्र मानवी मृत्यूचे ते कारण ठरेल. पण 'a modernist' म्हणजे आधुनिक माणूस त्याची पर्वा करत नाही. जमातवाद्यांना लोकांच्या मनात पूर्वीची जमाती बद्दलची भावना जागृत करायची आहे. मानवाची समाजाप्रति असलेली कर्तव्ये त्यांना अधोरेखित करायची आहेत. आधुनिकतेच्या उदारमतवादातील 'अंह' केंद्रित व्यक्तिवादाची जागा एकसंघीय, सहकारी, जागृत समाजाने घेणे आवश्यक आहे.

पाश्चात्य आधुनकता ही सामाजिक भूमिका माडंते.

**आपली प्रगती तपासा :**

१) आधुनिकतेवर काय काय टीका केली गेली आहे? त्यावरील alternative म्हणजे पर्यायी कल्पना मांडा.

______________________________

______________________________

______________________________

______________________________

______________________________

## १७.४ लैंगिक न्याय या संकल्पनेवरील विविध सिद्धांत :

सामाजिक न्याय हा 'लैंगिक समानतेशी' जोडलेला आहे. सर्व माणसांना समानतेने वागवले गेले पाहिजे. सर्वांना स्वत:मधील सुप्त क्षमतांचा विकास करण्याची समान संधी दिली गेली पाहिजे. त्यावेळी त्याचा रंग, वंश, लिंग कशाचाही विचार करता नेये. हा सामाजिक समतेचा आत्मा आहे, आणि लोकशाही त्याला घट्ट धरुन आहे. कोणत्याही समाजाला तो लोकशाही समाज आहे असे म्हणता येणार नाही. जर तो आपल्या नागरिकांमध्ये 'लैंगिकतेच्या' मुद्यावर भेदाभेद करणारा असेल. आज जरी 'लैंगिक समानता' सर्वत्र मान्य असली तरी तसे व्हायला शेकडो वर्षे जावी लागली. अजूनही एशिया आणि आफ्रिका खंडातील देशांमध्ये, स्त्रियांना त्यांचा नैसर्गिक हक्क मिळत नाही. त्यासाठी बरेच सामाजिक, सांस्कृतिक आणि धार्मिक मुद्दे जबाबदार आहेत.

**Gender and Sex :**

स्त्रियांच्या समस्यांचा अभ्यास करताना या दोन संज्ञांमध्ये (Gender and Sex) महत्त्वाचा फरक आहे, हे लक्षात घेणे जरुरी आहे. Sex ही संज्ञा जीवशास्त्रानुसार स्त्री आणि

पुरुष सभासदांचे वर्गीकरण करण्याशी संबंधित आहे. बऱ्याच पारंपारिक लोकांकडून तिचा उल्लेख स्त्रियांची दुय्यम भूमिका दाखविण्यासाठी केला जातो. त्यांचा म्हणण्यानुसार निसर्गानेच स्त्रियांना दुर्बल आणि परावलंबी बनविले आहे. त्या शारीरिक बळाचे काम करु शकत नाहीत. पुरुषाने रोटी कमवावी आणि स्त्रीने घरादाराची काळजी घ्यावी. स्त्रियांची जीवशास्त्रीय घडण, त्यांना समाजात दुय्यम स्थान घेण्यास भाग पाडते. काही विचारवंत तर स्त्रियांच्या विचार करण्याच्या क्षमतेबद्दलच शंका घेतात. त्यांच्या दृष्टीने ज्ञान ही पुरुषांची मक्तेदारी आहे. म्हणून फार मोठा काळ, स्त्रियांच्या शिक्षणाला विरोध झाला.

जीवशास्त्रीय विभाजन या मुद्यावर आज टीका होते आहे. आधुनिक विचारवंत 'Gender' ही संज्ञा 'भेदाभेद' दुजाभाव याबद्दल बोलताना वापरतात. Sex आणि Gender या मधील Sex ही संज्ञा जीवशास्त्रीय आहे. त्याचा अर्थ बदलण्यास अशक्य आणि प्रत्येकाला त्याच्या सह जगायचे आहे. स्त्रियांसाठी हे नैसर्गिक आहे की त्या पुरुषांपेक्षा दुय्यम असतात कारण निसर्गानेच त्यांना तसे शरीर दिलेले आहे. पण Gender ही संज्ञा पुरुषांचे समाजातील वर्चस्व दाखवते. हा भेदाभेद अनैसर्गिक आहे. हा सांस्कृतिक दृष्टीकोनाचा भाग आहे; आणि तो बदलला जाऊ शकतो, आणि बदलला गेला पाहिजे. फार पूर्वीच J.S.Mill ने, स्त्रिया निसर्गतः दुर्बल असतात हे नाकारले होते. माणसाच्या प्रवृत्तीला, चारित्र्याला आकार देण्याचे काम परिस्थिती करते असे त्याचे म्हणणे होते. जर बायका दुर्बल आणि परावलंबी असतील तर त्याचे कारण त्यांच्या परिस्थितीत आणि जोपासनेत (up bringing) मध्ये आहे. त्याच्या प्रसिद्ध पुस्तकात On Subjugation of Women तो म्हणतो, 'चांगले शिक्षण देऊन, परिस्थिती बदलेल. त्यांना संपत्तीत हिस्सा देऊन, त्यांची दुर्बल स्त्रीची प्रतिमा बदलणे शक्य आहे. बहुतेक सर्व उदारमतवादी त्याच मताचे आहेत.'

**"स्त्रीवादावर विविध संकल्पना व दृष्टीकोन" :**

लैंगिक न्यायासाठी जे लढत आहेत त्यांना (Feminist) स्त्रीवादी म्हणतात. १९ व्या शतकाच्या सुरुवातीला Gender या शब्दाला 'Medical' वैद्यक संबंध होता. याचा संबंध 'पुरुषाचे स्त्री सारखे वर्तन' किंवा स्त्रीचे पुरुषा सारखे वर्तन याच्याशी होता. आज या संज्ञेचा वापर, सामाजिक न्याय, समता आणि स्त्रियांचा त्यांच्या कायदेशीर हक्कांचा, सत्तेमध्ये सहभाग यासाठी होतो.

राजकिय तत्वज्ञानामध्ये 'लैंगिक न्याय आणि समानता याबद्दल विविध दृष्टीकोन आहेत. विशिष्ट संकल्पनेच्या बांधिलकीतून, विचारवंतानी लैंगिक समानता या मूलभूत तत्वाला वेगवेगळ्या प्रतिक्रिया दर्शविल्या आहेत.'

**उदारमतवाद :**

उदारमतवाद, एक राजकीय संकल्पना म्हणून, कोणत्याही प्रकारच्या अन्यायकारक भेदभाव करण्याच्या विरुद्ध आहे. उदारमतवादाचा व्यक्तिच्या प्रतिष्ठेवर, समानतेवर आणि निवडीच्या स्वातंत्र्यावर विश्वास आहे. लैंगिक समानतेचा प्रचार करणारे सर्वात पहिले विचारवंत हे उदारमतवादी होते. त्यांचा सामाजिक सुधारणांवर विश्वास होता; स्त्रियांच्या दुय्यम स्थानाला मान्यता देणाऱ्या जुन्या धार्मिक मतांशी ते असहमत होते आणि शेकडो वर्षे जुन्या भेदभावांच्या योजनाना कायदेशीर दुरुस्ती करुन स्त्रियांना न्याय मिळवून देण्यात त्यांचाच पुढाकार होता. सर्वश्रेष्ठ उदारमतवादी जॉन लॉक, जे.एस. मील आणि इतर उदारमतवाद्यांनी स्त्रियांच्या उन्नतीसाठी आटोकाट प्रयत्न केले.

जे.एस. मील यांनी आपल्या पुस्तकात On Subjugation of Woman स्त्रियांच्या न्यायासाठी परिणामकारक मुद्दे मांडले आहेत. सध्या दोन लिंगातील नातेसंबंध, एकाचे दुसऱ्यावर असलेले वर्चस्व हे मूलतः चूकीचे आहे. मानवी समाजाची सुधारणा होण्यामध्ये तो एक मोठा अडथळा आहे. 'समानतेच्या' तत्त्वाची अंमलबजावणी करुन, कोणालाही सत्तेचा फायदा किंवा जास्तीची जबाबदारी उचलावी लागणार नाही. म्हणजे पुरुषांना वर्चस्वही गाजवता येणार नाही आणि स्त्रियांच्या बाबतीत जास्तीची जबाबदारीही घ्यावी लागणार नाही. खरे पाहता बायका या 'गुलामवर्ग' झाल्या होत्या. त्यांच्या क्षमता या स्वतःच्या आनंदासाठी नव्हत्या तर दुसऱ्या Sex ला म्हणजे पुरुषांना खुष करण्यासाठी वाया जात होत्या. 'लैंगिक समानते'ला विरोध हा तर्कशुद्ध नाही. बऱ्याच वेळा स्त्रिया आपल्या जोडीदाराचे दुय्यमपद स्वखुषीने स्विकारतात. दुसऱ्यांसाठीच जगायचे, असे त्यांना शिकवले जात असे. J.S. Mill 'आदर्श सहसंबंध' विषयक त्याचा दृष्टीकोन व्यक्त करतो. पुरुष जर आपली शारीरिक ताकद, स्त्रियांना नमवायला वापरत असेल तर तसे करुन स्वतःचेच अवमूल्यन करतील. आदर्श नातेसंबंध म्हणजे 'सौहार्द विवाह' एका कणखर मनाच्या पुरुषाशी एक कणखर मनाच्या स्त्रीबरोबर केलेला विवाह. पुरुषांच्या पाठिंब्या बरोबरच स्त्रियांनी आपले स्वातंत्र्य कमावले पाहिजे. त्यांच्यातील नातेसंबंध मैत्रीपूर्ण असावेत; दोघांनाही (स्त्री-पुरुष) एकमेकांबद्दल आदर असावा.

उदारमतवाद, सार्वजनिक जीवनात कोणताही भेदभाव करण्यास विरोध दर्शवितो, पण वैयक्तिक जीवनात (खाजगी आयुष्यात) बाह्य घटकांचा हस्तक्षेप होण्यास विरोध करतो. स्थूलमानाने हे विचार संस्कारांनी बनलेले आहेत. 'बहुतेक उदारमतवादी हे 'मध्यम वर्गाच्या' सामाजिक स्तरातून उदयास आले, त्यामुळे विवाह बंधनाच्या पावित्र्या विषयी त्यांचे विचार दृढ होते, त्यामुळे चांगल्या कौटुंबिक जीवनाच्या गरजेसाठी, 'विवाह संस्थेच्या' आवश्यकतेलाच प्रश्न विचारण्याएवढे ते पुढे गेले नव्हते. ही गोष्ट आहे वीसाव्या शतकाच्या 'स्त्रीवादी' चळवळीचा दृष्टीकोनाची. थोडक्यात उदारमतवादी व्यक्तिगत आयुष्य आणि सार्वजनिक आयुष्य वेगळे वेगळे मानतात. सार्वजनिक आयुष्यामध्ये, जसे मतदान करणे, निवडणूक लढविणे, सार्वजनिक कार्यालयात नेमणूक होणे आणि शैक्षणिक संस्थांमध्ये प्रवेश इ. बाबीसाठी 'Gender' चा काहीही संबंध नाही, म्हणजे कोणत्याही वंशाच्या, जातीच्या, स्त्री पुरुषांमध्ये भेदभाव केला जाऊ नये. खाजगी आयुष्यात, कुटुंब-विवाह, निवडीचे स्वातंत्र्य हे प्रमुख तत्त्व असेल, आणि कुटुंबाबाहेरील कोणालाही त्या बाबत हस्तक्षेप करण्याचा अधिकार असणार नाही हे उदारमतवादाला अपेक्षित ध्येय आहे.

### Conservatics - पुराणमतवादी :

ज्यांना आहे त्या सामाजिक परिस्थिती मध्ये कोणताही बदल नको असतो त्यांना पुराणमतवादी असे म्हणतात, त्यांना 'लिंग-विभाजन', सामाजिक राजकिय दृष्ट्या महत्त्वाचे वाटते. त्याच्या मते समाज रचनेमध्ये, स्त्री आणि पुरुषांच्या कामाच्या संबंधात असलेले विभाजन नैसर्गिक आणि टाळण्यास अशक्य असे आहे, जे स्त्रियांच्या उन्नती संबंधात कोणत्याही सुधारणा करण्यास विरोध करतात. भारतामध्ये स्त्रियांचे विवाह योग्य वय कायद्याने वाढविण्यास, विधवा पूर्नविवाहास झालेल्या कडव्या विरोधाचा आढावा घेतल्यास, पुराणमतवाद्यांची बुरसटलेली मानसिकता लक्षात येते. अगदी अलिकडच्या काळात म्हणजे १९८० साली, राजस्थानात सती जाण्याला लोकांचा पाठिंबा होता. ते 'सती जाणे' हे एक पावित्र्याचे लक्षण मानले गेले, जरी अगदी लहान प्रमाणातल्या लोकांना असे वाटते की 'सती जाणे' हे पावित्र्याचे लक्षण आहे, तरी ते आक्षेपार्ह आहे पण ह्या पुराणमतवाद्यांचा गट बलदंड आहे. त्यांनी ३३% स्त्रियांचे संसदेतले

आरक्षण थोपवले. ज्या लोकांनी जाती बंधनांवर, हुंडा बळी बद्दल प्रश्न विचारण्यांऱ्याचा मुस्लीम व्यक्तिगत कायद्यात सुधारणांना विरोध करण्यांऱ्यांना, 'Honour Killings' 'दांपत्य-वध' विवाहित युगुलांचा, झुंडीने वध करण्यात आला. यावरुन या कर्मठ लोकांची केवढी मोठी सत्ता आहे तेच अधोरेखित होते. युरोप मध्ये अशा (re-actionary) कर्मठ लोकाचां पराभव, उदारमतवादी लोकशाही मूल्यांनी केला. पण तिसऱ्या जगातले, आफ्रिकी आणि एशियन देशातले चित्र मात्र भीषण आहे.

**Socialist साम्यवादी -**

उदारमतवाल्यां प्रमाणेच साम्यवादी 'Gender' ला फारसे राजकीय महत्त्व देत नाहीत. त्यांच्या मते Gender divisions हे आर्थिक असामनतेचे अधिक खोल रुजलेले लक्षण आहे. मार्क्सीस्ट 'पितृप्रधान' या संज्ञेकडे 'लैंगिक न्याय' या गाभ्याच्या तत्वाकडे 'सामाजिक आर्थिक मुद्दा' या दृष्टीकोनातून पाहतो. 'पितृप्रधान' याचा शाब्दिक अर्थ 'वडिलांचे राज्य', 'बापाचे राज्य' असा हातो. (मूळ लॅटीन शब्द Patri म्हणजे वडिल किंवा जनक)

मार्क्सच्या सिद्धांताने इथे नवे वळण घेतले. "Origin of Family Private Property and State' या एंजेल्स च्या पुस्तकात, आर्थिक दृष्टीकोनातून 'लैंगिक न्याय' या संकल्पनेचे विश्लेषण केले आहे. भांडवलवादाचा विकास आणि खाजगी मालमत्तेची कल्पना या दोन गोष्टींनी स्त्रियांचे समाजातले स्थान बदलले. एक काळ होता जेव्हा समाजात लोकांचे कौटुंबिक जीवन सामुहिक पद्धतीचे होते. स्त्रियांना 'मातृत्वाचा' अधिकार होता. त्यामुळे त्यांना वारसा हक्काची खात्री मिळत असे. 'स्त्री केंद्रित' कुटुंब व्यवस्था असल्यामुळे स्त्रियांचे सामाजिक स्थान खूपच चांगले होते. भांडवलवादाच्या वाढीमुळे, साधी कुटुंब व्यवस्था, सगळीकडेच विस्कटली गेली. भांडवलवाद हा खाजगी मालमत्ता, पुरुषांच्या मालकीची या तत्त्वावर आधारित आहे. त्याने 'मातेच्या' अधिकारांना धूडकावून लावले आणि स्त्रियांचा' जगातला, ऐतिहासिक पराभव घडवून आणला. कुटुंब व्यवस्था हीच 'स्त्रियांचे शोषण' करण्यात अग्रभागी आहे. The 'Bourgeoisie' कुटुंब 'पितृसत्ताक' असते. त्यातले पुरुष आपली संपत्ती मुलांच्या नावे होईल याची खात्री ठेवतात. लग्नामध्ये पुरुष नीतिमूल्ये ठरवितात; जी त्यांच्या नेहमीच फायद्याची असतात. स्त्रियांनी नेहमी शुद्ध आणि प्रामाणिक असावे अशी अपेक्षा असते, फक्त नवऱ्याशीच एकनिष्ठ असावे मात्र पुरुषांनी कसेही वागावे, असे हे स्त्रियांचे शोषण कशाने तरी भरुन काढायला हवे. मग त्याला निरपेक्ष अपत्यप्रेम आणि पतीप्रेम सारख्या कल्पनांनी गौरवणे म्हणजे पद्धतशीर भंपकपणा, खोटारडेपणा आणि कपटी कारस्थान आहे. ज्यामुळे पुरुषांचे वर्चस्व राखण्यासाठी आणि मालमत्ते मधला स्त्रियांचा हक्क डावलण्यासाठी त्याचा उपयोग होईल.

Charles Fourier, (1772-1827), Robert Owen, (1771-1858) या दोघांनी, कुटुंबाच्या माध्यमातून पुरुषी वर्चस्वातून स्त्रियांचे जे दमन होते त्यावर पर्यायी समाज रचना सुचविली आहे. ते जुन्या काळातले समाजवादी होते त्यांना 'सामुहिक जीवन' आणि 'मुक्त प्रेम' या संकल्पनेतले जीवन हवे होते. 'पितृसत्ताक' कुटुंब पद्धती ऐवजी त्यांना समुहाने एकत्र राहणे पसंत होते.

सध्याची कुटुंब व्यवस्थेमध्ये, स्त्रियांचे कार्यक्षेत्र 'चूल आणि मूल' एवढेच मर्यादित आहे. यामुळेक भांडवलवादी लोकांचे 'आर्थिक हिंतसंबंध' जपले जातात असे मार्क्स म्हणतो. वास्तविक पाहता स्त्रिया कामगारांची पूढची पिढी निर्माण करतात. जी भांडवलशाही

अर्थव्यवस्थेला पूरक आहे. म्हणून स्त्रियांचे खरे अधिकार त्यांना फक्त साम्यवादी आर्थिक विचारसरणीत मिळणे शक्य होईल. खाजगी मालमत्तेचा अधिकार नष्ट केल्याने, सहकारावर आधारित नवी संस्कृति उदयास येईल. त्याने सामाजिक सामंजस्यावर आणि शांततेवर उभारलेला नव्या समाजासाठी मार्ग खुला होईल. अशा समाजात शोषण करणारे घटक राहणार नाहीत.

याच कारणासाठी बरेच साम्यवादी, समान हक्काच्या मागणी संदर्भात फारसे उत्साही नाहीत, जे उदारमतवाद्यांसाठी फार महत्त्वाचे आहे. त्यांच्यासाठी कायदेशीर आणि राजकीय हक्क परम महत्त्वाचे आहेत. ज्यामुळे स्त्रिया सार्वजनिक जीवनात पुरुषांशी स्पर्धा करु शकतील. पण साम्यवादी तत्वाप्रमाणे समानतेचे तत्व प्रथम आर्थिक बळावर जोखले गेले पाहिजे म्हणजेच 'खाजगी मालमत्तेची मालकी' महत्त्वपूर्ण ठरते.

साम्यवादी लोकांमध्ये 'Gender Justics' मतभिन्नता आहे. जुने मार्क्सीस्ट 'Sexual Politics' बद्दल पुढचा अग्रक्रम 'Class Politics' ला देतात. 'वर्ग-सापेक्ष' शोषण हे 'लिंग सापेक्ष' शोषणापेक्षा अधिक खोलवर आणि भयंकर आहे. स्त्रियांचे सबलीकरण शक्य करण्यासाठी, भांडवलशाही मोडीत काढून तिच्याजागी साम्यवादी समाज रचना करणे अत्यावश्यक आहे. म्हणून ते म्हणतात, स्त्रीवादी शक्तीनी वेगळी चळवळ करण्यापेक्षा आपला रोख 'कामगार समस्या' कडे वळवावा कारण कोणतीही निराळी चळवळ ही कामगार चळवळ दुर्बल करेल ज्याचा फायदा भांडवलशाहीला होईल. अर्थात हा दृष्टीकोन आधुनिक, साम्यवादी, स्त्रीवादींना मान्य नाही. कारण स्त्रियांच्या समस्यांना, निराळ्या तऱ्हेने हाताळण्याची गरज आहे. सोव्हीएत रशिया आणि इतर साम्यवादी देशातील स्त्रियांची निराशाजनक प्रगती पाहता हेच सिद्ध होते की, लैंगिक शोषण हे आर्थिक शोषणा इतकेच अन्यायकारक आहे. साध्या आर्थिक संज्ञेतून, स्त्रियांच्या समस्या समजून घेता येणार नाहीत. त्यासाठी अधिक सखोल मानसशास्त्रीय, सांस्कृतिक, सामाजिक आणि राजकीय दृष्टीकोनांची गरज आहे.

### Fascist View फॅसिस्ट दृष्टीकोन :

एक धोरण म्हणून, फॅसिस्ट, समानतेवर विश्वास ठेवत नाहीत. ते बुद्धीजन्य राज्य व्यवस्थेला पाठिंबा देतात. कोणताही विरोधाचे पाशवी क्रूरपणे दमत करणे, लढाया करणे हे फॅसिझम चे महत्त्वाचे अंग आहे, जी समानतेच्या संपूर्ण विरोधात आहे. त्यामुळे 'लैंगिक समानता' त्यांना मान्य होणार नाही. यात आश्चर्य नाही. त्यांचा golden rule आहे, "प्रत्येकासाठी एक जागा, आणि प्रत्येक गोष्ट आपल्यासाठी" पुरुषांची जागा, लढाया आणि राजकारणात आहे तर स्त्रिया ह्या घरकामासाठी असतात. 'लिंग भेद' हा मानवात नैसर्गिकच आहे, म्हणून पुरुषाने नेतृत्वाची मक्तेदारी केली पाहिजे, निर्णय घेतले पाहिजेत, आणि बायकांनी दुय्यम भूमिका केली पाहिजे. बहुतेक फॅसिस्ट नेत्यांना स्त्रियां आणि त्यांच्या समस्यांबद्दल काही देणे घेणे नव्हते.

### धार्मिक मूलतत्ववादी :

'लैंगिक न्याय' या संकल्पनेला सर्वात मोठे आव्हान धार्मिक मूलतत्ववाद्यांकडून आले. इतिहास पाहता, सर्व धर्मांनी स्त्रियां विरुद्ध भूमिका घेतली आहे. माणसाच्या आत्मिक प्रगतीच्या मार्गातील 'स्त्री' हा अडथळा आहे, असे स्त्रीचे वर्णन आहे. ज्याने 'विषय सूखा' ला जिंकले (रती सुखाचा त्याग केला) तो आदर्श पुरुष मानला जातो. 'विवाह बंधन' हे धार्मिक पुस्तकातून वर्णन केल्याप्रमाणे अत्यंत पवित्र आहे. पण प्रत्यक्षात ज्याने स्त्रियांना गुलामच बनविले.

'घटस्फोट' हा बराच काळ विचार सुद्धा करण्यायोग्य नव्हता. लैंगिक समानता हेच मूल्य कोणत्याच धर्माला मान्य नव्हते. संघटित धर्माविरुद्धच प्रथम 'स्त्रियांच्या समानतेसाठी बंड पुकारले गेले, यात आश्चर्य नाही. समाज सुधारकांनी केलेल्या सुधारणा चळवळींना सर्वाथ मोठा विरोध धर्म मार्तंडाकडून झाला. लोकशाहीच्या विकासामुळे आणि सर्व धर्म समभाव' या Secular विचारसरणीमुळे, सामाजिक बाबींवर धर्माचा पगडा कमी होत चालला आहे. तरीही १९८० च्या दशकात आपण 'धर्म पुर्नवसन' संकल्पनेत वाढ झाल्यामुळे, स्त्रियांच्या मानवी हक्कांवर घोर परिणाम झाल्याचे आपण पाहतो. हे आफ्रिका-एशिया खंडातील देशात अधिक प्रमाणात आहे. 'कुटुंब नियोजनाला' विरोध करणाऱ्या अनेक प्रस्थापित घटना आपल्याकडे झाल्या. 'गर्भपात हे पाप आणि मातेच्या आरोग्यापेक्षा 'Male child' पूत्र प्रसवणे हे महत्त्वाचे अशा कल्पनेचे समाज अजुनही पछाडलेला आहे. सामाजिक अन्यायाचे मूर्तीमंत प्रतिक म्हणजे इस्लाम मधला 'तलाक' जो स्त्रियांचे किती खच्चीकरण करत असेल. ते समजून घ्या. आफ्रिकेतील ८०% स्त्रिया आजही अमानवी अशा 'Circumcision' ला धार्मिक रुढी म्हणून सामोऱ्या जातात.

**आपली प्रगती तपासा :**

१) 'Gender Justics' म्हणजे काय? निरनिराळ्या विचार प्रणाली च्या या बद्दलच्या दृष्टीकोनांची चर्चा करा.

## १७.५ स्त्रीवादाचा उगम आणि विकास :

स्त्री समस्या भोवती फिरणारा सिद्धांत म्हणजे स्त्रीवाद. या सिद्धांताचा असा ठाम विश्वास आहे की, 'लिंग भेद' हा कृत्रिम आहे. मनुष्य निर्मित आहे. त्यांचे समूळ उच्चाटन झाले पाहिजे.

१९६० च्या दशकात 'स्त्रीवाद' आणि 'स्त्री मुक्ती चळवळ' लोकप्रिय झाल्या. त्या मार्फत स्त्रीवादी विचारांचा प्रसार झाला ज्याचा उगम आपल्याला प्राचीन ग्रीक आणि चायनीज संस्कृति मध्ये सापडतो. १४०५ मध्ये Christine de Pisan या इटालियन लेखिकेने लिहिलेल्या Book of Ladies या पुस्तकात स्त्रियांनी केलेल्या 'धीरोदात्त कतृत्वा' च्या नोंदी आहेत. तिने स्त्रियांना शिक्षणाचा हक्क असायला हवा, त्यांना सार्वजनिक जीवनात अधिक मोठी भूमिका असायला हवी असेही मुद्दे मांडले आहेत. Mary Wollstone Craft हिने लिहिलेले १९७२ मध्ये प्रसिद्ध केलेले पुस्तक Vindication of rights of women हे पहिले, आधुनिक स्त्रीवादावरील हे पुस्तक फ्रेंच रिव्होल्यूशनच्या पार्श्वभागी होते.

१९ व्या शतकाच्या मध्यावर, स्त्रीवाद ऐरणीवर आला. याला आपण स्त्रीवादाचा १ला टप्पा म्हणूया. त्यांचा मुख्य भर 'समान कायदेशीर, राजकीय हक्क' यावर होता. या काळात निदान समाजाच्या विविध विभागात स्त्रियांचे मत विचारात घेतले जाऊ लागले. त्यामुळे त्यांना प्रेरणा मिळून त्यांनी मतदानाच्या हक्काची मागणी केली. एका परीने, ह्या देशात लोकशाहीने मूळ धरले होते, त्या देशात स्त्रियांच्या राजकीय हक्कासाठी, चळवळ प्रथम सुरु झाली. अमेरिकेमध्ये, सन १८४० गुलामगिरी नष्ट करणाऱ्या मोहिमेमधून प्रेरणा घेऊन, स्त्रीवादी चळवळ सुरु झाली. सन १८४८ मध्ये Geneca falls convention ने या भावनांचे प्रकटीकरण केले. या Convention ने declaration of independence पासून प्रेरणा घेतली. यातली सर्वात महत्त्वाची मागणी होती, स्त्रियांना राजकीय मतदानाचा हक्क, सन १८६९ मध्ये National Women's Suffrage Association ची स्थापना झाली.

१८५० ते १८५९ हा काळ इंग्लंड मध्ये 'स्त्रियांच्या राजकीय मतदानाचा हक्क' मागणाऱ्या चळवळीचा विकास दर्शवतो. १८६७ मध्ये, House of commons मध्ये, 'सुधारणा' कायद्या संबंधी चर्चा चालली होती, तेव्हा जे.एस. मील यांनी 'स्त्रियांना मतदानाचा हक्क मिळावा यासंबंधी कायद्यात दुरुस्ती सुचविली होती. जरी ह्या दुरुस्तीचे बील फेटाळले गेले तरी त्याने स्त्री मुक्तीचा लंडनमधला मार्ग खुला केला. १९०३ मध्ये 'अेमलीन पॅन्कर्हस्ट' (Emmeline Pankhurst) (१८५६ ते १९२८) हिने स्त्रियांची सामाजिक आणि राजकीय संघाची स्थापना करुन तिचे नेतृत्व केले. तिच्या बरोबर तिची मुलगी Christabel (1880-1950) U.K., यांनी मतदानाचा हक्काची चळवळ, युयुत्सु लढाऊपणे चालू ठेवली. त्यांनी भूमिगत होऊन आपली चळवळ सुरु ठेवली. त्यांना 'Suffragettes' म्हणून ओळखत असत, त्या सार्वजनिक मालमत्तेवर हल्ला करुन निदर्शने करीत असत.

स्त्रीवादी चळवळीचा १ ला टप्पा, सर्व युरोपात स्त्रियांना मतदानाचा हक्क मिळविण्यापर्यंत आहे. सन १८९३ मध्ये, न्यूझीलंडने सर्वप्रथम हा हक्क स्त्रियांना जाहीर केला. सन १९२० मध्ये, १९ व्या दुरुस्तीक कलमा प्रमाणे U.S. संविधानाने स्त्रियांना मतदानाचे हक्क दिले, ते काही निवडक वर्गाला दिले होते, सन १९१८ मध्ये तदनंतर जवळ जवळ एक दशक, स्त्रियांना पुरुषांसारखे मतदानाचा हक्क मिळायला झगडावे लागले.

मतदानाचा हक्क मिळाल्यावर स्त्रीवादी चळवळीचा जो कमी झाला कारण हक्क मिळेपर्यंत चळवळीला साध्य करण्यासाठी ध्येय होते. चळवळीमध्ये एकसंघपणा, एकी होती. चळवळ पुढे नेण्यासाठी प्रोत्साहित करणारा घटक, 'मतदानाचा हक्क' हा प्राप्त झाल्यामुळे, आपोआपच चळवळ मलूल झाली. मतदानाचा हक्क प्राप्त झाल्यामुळे स्त्रियांपुढील सर्व समस्यांचे निराकरण झाले होते असे नव्हे पण समान हक्क मिळाल्यामुळे, स्त्रियांना भेदभाव करण्याऱ्या इतर मुद्यांकडे लक्ष द्यायला संधी मिळाली.

६० साठाव्या दशकात स्त्रीवादी चळवळीने पुन्हा उचल घेतली. एका नवीन मुद्यासह हा स्त्रीवादी चळवळीचा दुसरा टप्पा होय. 'Feminine Mystique' हे लिहीणारी लेखिका Betty Friedan हिच्या पुस्तकाने स्त्रीवादी चळवळीला या कालखंडात चालना दिली. स्त्रिया ज्या फक्त माता आणि गृहिणी या भूमिकांमध्ये अडकल्या आहेत, त्यांच्या नैराश्याला, दुःखाला तिने वाचा फोडली. तिने याचे वर्णन (Problem with no name) नाव नसलेली समस्या असे केले आहे. Kate Millet ने लिहिलेली Sexual Politics (1970) ची Germaine

Greer ची The Female Eunuch, या दोघींनी, अमूलाग्र नवीन दृष्टीकोन 'स्त्रीवाद' संबंधी व्यक्त केला आहे. ह्यांचे लिखाण, स्त्रीच्या, वैयक्तिक मानसिक, आणि लैंगिक दमनाबद्दल स्पष्टपणे अभिव्यक्त होते. हे परिवर्तनवादी स्त्रीवादी फक्त मतदानाच्या हक्कावर समाधानी नव्हते. त्यांना सर्व सामाजिक व्यवस्थाच नीट बदलून टाकायची होती. त्यांना 'स्त्रियांचे सबलीकरण' नव्हे तर त्यांना 'स्त्रीमुक्ती' हवी होती. शिक्षण क्षेत्रात 'Gender' हा विषय प्रकाश झोतात आला.

साधारणपणे ९० वर्षे आपण, स्त्रीवादी संघटना स्त्रियांच्या मुक्तीसाठी सर्व जगभर लढत देत आहेत. विकसित आणि विकसनशील दोन्ही देशातील स्त्रीवादी संस्थानी स्वतःचे अस्तित्व दाखवून दिले आहे. पण त्यामध्ये अनेक भाग उदयास येत आहेत. असे निरिक्षणात येते. सुरुवातीला, परिवर्तनासाठी उत्सुक असलेली पश्चिम युरोप मधली स्त्रीवादी चळवळ, मतदानाचा हक्क मिळाल्यावर मागे पडली. त्यानंतर राज्य सरकारचा, कल्याणकारी योजनांना मिळालेला पाठिंबा, जसे गरोदर बाईला आर्थिक मदत, बालशाळेची सोय, कामाच्या जागेजवळ पाळणा घर, आरोग्यविमा, इ. मिळू लागल्यावर तर ती चळवळ अगदीच थंड झाली. स्त्रीवादी चळवळीमध्ये मग विभाजन झाले. जसे ब्लॅक-फेमिनिझम, पोस्ट मॉर्डन फेमिनिझम, ॲफ्रो एशियन फेमिनीझम इ. बऱ्याच वेळेला हे विभाग एखाद्या विशिष्ट मुद्याला धरुन पडतात. उदा. Pornography, गर्भपात, मातृत्व, वैश्या व्यवसाय इ. परिवर्तनवादी स्त्रीवादी संस्थांना, स्त्रियांचे कुटुंबाकडून होणारे शोषण थांबवायचे आहे. म्हणून त्या कुटुंब संस्थेवरच टीका करतात. बाहेरच्या माणसांचा, कौटुंबिक समस्येत हस्तक्षेप नको हा उदारमतवाद्यांचा दृष्टीकोन इथे म्हणजे विकसनशील देशात ठेऊन चालत नाही. कदाचित पुढारलेल्या युरोपियन देशांमध्ये, घटस्फोटा सारख्या सुविधा, आर्थिक स्वावलंबी जीवन जगण्याच्या संधी आणि एकट्या स्त्रीने जगणे ही संस्कृति इ. गोष्टींनी स्त्रीला कौटुंबिक दमनापासून संरक्षण दिले असेल पण ॲफ्रो-एशियन देशातील परिस्थिती मात्र दयनिय आहे. परिवर्तनवादींना युरोपियन संस्कृति ही जागतिक संकल्पना म्हणून मान्य व्हायला हवी आहे, ज्यामुळे स्त्री मुक्त असेल. पण तिसऱ्या जगाचा पारंपारिक समाजांना हे आवडत नाही. हा विरोध सतत चालूच आहे.

काहींचे म्हणणे आहे की, स्त्रीयांच्या सामाजिक स्थिती बद्दलचा साचेबंद विचार बदलला पाहिजे. उदा. स्त्रिया माता होऊ शकतात. पण त्यांच्यावर मुले वाढवण्याची आणि घरगुती कामे करण्याची जबाबदारी टाकणे आवश्यक नाही. मुल गरोदरपणात पोटात वाढवणे आणि मुले झाल्यावर त्यांचे संगोपन करणे ह्या दोन गोष्टीतली साखळी, 'जीवशास्त्रीय' नाही तर सांस्कृतिक आहे. नवरा, म्हणजे मुलाचा बाप ही, मुलाची काळजी घेऊ शकतो. सरकार ही त्यात मदत करु शकते. पण लोकांची मानसिकता बदलली पाहिजे. "बायका जन्माला येत नाहीत, तर त्यांना तसे बनविले जाते." असे प्रतिपादन परीवर्तनवादी करतात. त्यांचा असा प्रामाणिक विश्वास आहे की, मानवा मध्ये उभय लिंगी गुणधर्म असतात. प्रत्येक व्यक्तिमध्ये स्त्री आणि पुरुष गुणधर्माचे गुण असतात. व्यक्तिची परीक्षा त्याच्या लिंगावरुन नाही तर त्याच्या चारित्र्यावरुन, त्याच्या क्षमतांवरुन करावी. असे अहवाल, अमेरिकन स्त्रियां बद्दलही येतात की; हिंसाचार आणि नशिल्या पदार्थाचा तरुणाकडून वापर यात वाढ होण्यास, 'काम करणाऱ्या स्त्रिया' हे दोषारोपण होते. परंतु Profamily New Right Parties ना असे वाटते की स्त्रियांनी आपली मुलांसाठी असलेली आदर्शमातेची भूमिका सोडून दिली आहे. आणि ज्यांना योग्य मार्गासाठी मार्गदर्शन करण्यास कोणी नाही.

**आपली प्रगती तपासा :**

१) स्त्रीवादाची व्याख्या करा. स्त्रीवादाशी निगडीत विविध मुद्यांची चर्चा करा.

## १७.६ सारांश

'आधुनिकता' या शब्दाला अनेक अर्थ आहेत. राजकारणामध्ये त्याचा अर्थ वाढ-राज्याची, लोकशाहीची आणि व्यक्तीवादाची शास्त्र आणि तंत्र विज्ञान हे आधुनिकतेमध्ये अंर्तभूथ आहे. ही एक मनाची अवस्था आहे. म्हणूनच आधुनिक आणि आधुनिकता यामध्ये फरक केला जातो. अधिकची (extra) आधुनिकता पारंपारिक मूल्यांचा अवमान करेल. व्यक्ति आपल्या सामाजिक मुळांना विसरु शकत नाही. हे आगामी आधुनिकतेचे मत आहे.

स्त्रियांच्या समस्यांना जोडून, एकापेक्षा जास्त मते अस्तित्वात आहेत. स्त्रीवादाचा महत्त्वाचा मुद्दा, लैंगिकतेचा मुद्दा आता राजकारणाच्या मूळा पर्यंत पोहोचला आहे. स्त्रीला समान वागणूक मिळाली पाहिजे. तिला सामाजिक न्याय मिळाला पाहिजे, हा सर्व सिद्धांताचा 'लैंगिक न्याया' बद्दलचा महत्त्वाचा मुद्दा आहे.

## १७.७ पाठावरील प्रश्न :

१) 'आधुनिकतेची' व्याख्या करा. तिच्याशी संबंधित सर्व बाबींवर चर्चा करा.
२) "जास्तीची आधुनिकता, पारंपारिक सामाजिक जीवनाची वाट लावेल." भाष्य करा.
३) 'लैंगिक न्याया' ची व्याख्या करा. स्त्रीवादा बद्दलच्या सर्व सिद्धांताचे चिकित्सकपणे परीक्षण करा.

❖❖❖❖

# १८

# सांस्कृतिक विविधता आणि पर्यावरण यावर समकालीन वाद , चर्चा.

**घटक रचना :**

१८.० उद्दिष्टे

१८.१ प्रस्तावना

१८.२ पर्यावरणाचे राजकारण : विकास विरुद्ध हरित चळवळ आर्थिक विकास विरुद्ध हवेचे प्रदुषण. निगडीत मुद्दे.

१८.२.१ पर्यावरणाशास्त्राचा मूळ गाभा.

१८.३ बाहुल सांस्कृतिकता - व्याख्या , अर्थ आणि यथार्थता.

१८.४ आधुनिक परिस्थिती मध्ये बहुल सांस्कृती पुढील आव्हाने
संदर्भ : राज्याची एकता आणि सांस्कृतिक विविधता.

१८.५ सारांश

१८.६ पाठावरील प्रश्न

## १८.० उद्दिष्टे :

१) आधुनिक काळासमोरील, पर्यावरणाला असलेल्या धोक्यांचे महत्त्व आणि यथार्थता समजून घेणे.

२) पर्यावरणावर परिणाम करणाऱ्या, विकसित देशांनी राबवलेल्या आर्थिक धोरणाच्या यथार्थतचे विश्लेषण करणे.

३) जलद औद्योगिकीकरण आणि स्वछ वातावरण यांचा समतोल साधताना, विकसनशील देशांना भड़सावणाऱ्या समस्यांचा अभ्यास करणे.

४) 'बहुल सास्कृतिकता' या संज्ञेच्या अर्थाचे आणि यथार्थतचे विश्लेषण करणे.

५) बहुल समाजामध्ये, प्रखर राष्ट्रवादाची वाढ होत असताना 'बहुल सांस्कृतिकतेच्या संकल्पनेला असणाऱ्या समकालिन मूल्यामापन करणे.

## १८.१ प्रस्तावना :

राष्ट्राच्या संपत्तीची वाढ, वाढत्या सुखसोई औद्योगिकीकरणामुळे मिळाल्या पण त्या बरोबर पर्यावरण विषयक आव्हानेही पुढे उभी राहिली हवा, शुध्द पाणी या चैनीच्या वस्तू झाल्या आहेत. लोकांना घरे पुरवायची असतील तर जंगले तोडावी लागतील. कारखाने, जे हवा दुषित

करतात, तेच हजारो कामगारांना रोजीरोटी पुरवितात उर्जा हा जीवनाचा स्त्रोत आहे. 'आण्विक उर्जा ' ही काळाची मागणी आहे. निरुपयोगी किंवा वाया गेलेली अणुउर्जा ही एक समस्या आहे. अणुभट्टी बंद होणे, अपघात इ. गोष्टीचे भयंकर परिणाम बरेच वर्षे होत राहतात. म्हणून एके काळी तांत्रिक असलेली बाब, आता राष्ट्रीय, अंतरराष्ट्रीय पैलू असलेली राजकीय समस्या झाली आहे.

संस्कृति शब्दाचा अर्थ , मूल्यांचा संच परंपरांचे पालन करणारा समाज आज असा एकही समाज नाही जिथे फक्त एकच 'सांस्कृतिक गट' आहे प्रत्येक देशात प्रत्येक समाजात विविध सांस्कृतिक गट आणि समुह आहेत. त्यांच्या मध्ये आवश्यक असलेली एकता. कशी निर्माण करायची हा खरा आधुनिक सरकारी यंत्रणेपुढे प्रश्न लोकशाही असलेल्या देशात अधिक बिकट आहे.

## १८.२ पर्यावरणाचे राजकारण

Ecology हा विषय परिस्थतिजन्य विषयाचा अभ्यास करतो जीवशास्त्राच्या अभ्यासाचा हा विषय आहे. सुक्ष्म ति सुक्ष्म (जे साध्या डोळयांनी दिसत नाहीत) जीवीत जंतूं आणि त्यांच्या आजुबाजूचे वातावरण याचा परस्पर काय संबंध आहे, ही या म्हणजे Ecology विषयाची व्याप्ती आहे. १९६० नंतर पर्यावरणशास्त्र राजकीय संज्ञा झाली. हरित चळवळीशी याचा संदर्भ आहे. 'पर्यावरणवाद' एक राजकीय संकल्पना म्हणून पुढे आल्यावर 'निसर्ग' हा केंद्रबिंदु झाला. निसर्ग हा संपुर्णपणे समानतेने एकत्रितपणे जोडलेला आहे. ज्यामध्ये सजीव आणि निर्जिव सामावलेले आहेत. याचा समतोल राखणे आवश्यक आहे. नाहीतर ही निसर्ग साखळी नष्ट होईल. ही पर्यावरण केंद्रित संवेदनशिलता आधुनिक काळातल्या राजकिय विचारसरणीमधली 'नवी संकलपना आहे.

'निसर्ग' हा मनवी जीवनातिल महत्तवाचा घटक आहे या संकल्पनेची प्रेरणा जुन्या धर्मामधून मिळते, हिंदुधर्म, paganism म्हणजे इतर धर्मीय (ज्यु इस्लाम, ख्रिश्चन सोडून) Taoism, सर्वांनी निसर्गांचा सन्मान करा; या संकल्पनेवर भर दिला त्यासाठी वेगवेगळया देवता होत्या उदा. वायु, समुद्र, नद्या इ. हरवे झाड तोडणे हे पाप समजले जात असे. झाडे लावणे जनावरांना खाऊ घालणे, जंगलाचे रक्षण करणे, हे पुण्याचे पवित्र कर्तव्य समजले जाई. आजही वन्य जमाती 'वृक्ष देवाची उपासना करतात प्रसिद्ध चिपको आंदोलनात , वन्य जमातीच्या या बाबत असलेल्या तीव्र भावना ध्यानात आल्या होत्या. गावातल्या जीवनात 'शेती' ही अर्थ व्यवहारात केंद्रस्थानी होती. आधुनिक औद्योगिक संस्कृतिने भ्रष्ट न झालेले जीवन पर्यावरण प्रेमी होते. १९ व्या शतकातल्या औद्योगिकीकरण आणि जलद शहरीकरणामुळे पर्यावरणाचा घात झाला. कारखान्याला कच्चा माल हवा. त्यासाठी नैसगिक संपत्तीचे शोषण झाले. कागदाच्या निर्मितीसाठी जंगलांचा नाश होतो आहे. 'खाणकाम' एक मोठा औद्योगिक विभाग; त्याने पृथ्वीतून नैसगिक उत्पन्न जसे, सोने, कोळसा , ताबे काढून घेतले. ते पुन्हा भरणार नाही. आद्योगिकीरण म्हणजे निसर्गावर बलात्कार करणे आहे.

ह्या प्रकारच्या विकासावर म्हणजे निसर्गाचा नाश आणि शहरीकरण यावर अनेक प्रतिक्रिया निर्माण झाल्या. भारतामध्ये 'गांधीजींचा 'हिंदस्वराज' म्हणजे आद्योगिकीकरणावरील

विवेचनात्मक टीका आहे. त्यांनी 'ग्रामीण अर्थव्यवस्था, कुटीर उद्योग आणि स्वयंपुर्ण खेडी ' या साठी कळवळीचे आवाहान केले. त्यांचे आर्थिक सिद्धांत हे संपूर्णतः पर्यावरण पूरक होते. अशा तऱ्हेचे लिखाण, दुसरीकडे ही सापडू शकेल. युरोपमधले कांदबरीकार Thomas Hardy, राजकीय विचारवंत जसे William Morris आणि peter kropokin यांनी ग्रामीण जीवनासाठी वाद केले आहेत. लोकांच्या मनात साध्या ग्रामीण जीवनाबद्दल सुखद रमणीय आठवणी होत्या. औद्योगिकरणा विरुद्ध ही धडक प्रतिक्रिया होती. ज्या देशात ग्रामजीवना बद्दल अशी ओढ होती.उदा. जर्मनी. तिथे शेतकऱ्यांच्या पवित्र आणि प्रतिष्ठीत जीवनाबद्दल काल्पनिक गोष्टी प्रसारित होऊ लागल्या जर्मन तरुणांमध्ये 'Back to Nature' ही चळवळ सुरू झाली. याचा फायदा मात्र दोघांनी म्हणजे 'राष्ट्रवादी' आणि 'फॅसिस्ट' चळवळी , दोन्ही राजकीय प्रणालींनी घेतला.

२० व्या शतकात औद्योगिकीकरणामुळे झालेल्या पर्यावरणाच्या समस्येबद्दल,जास्त जागृति झाली आहे. जी आर्थिक प्रगती होत आहे तिच्यामुळे निसर्गाची फार मोठी हाती झाली आहे. ही समज आली आहे. यामुळे मानवी वंश आणि आपण राहतो ते 'प्लॅनेट पृथ्वी ' हे दोन्ही धोक्यात आले आहे आणि आपण मानव तग धरुन राहू शकू का, अशी रास्त शंका आहे.

निसर्गाला अनेक स्तरातून धोका आहे. शेतीचे उत्पादन वाढवण्यासाठी काही रसायने वापरली जातात त्यामुळे जमिनीचा नैसर्गिक कस कमी होतो.जमिनीत अनेक किडे, किटक राहात असतात जे शेतकऱ्याच्या शेतीला उपयुक्त असतात. पण कीटनाशक वापरल्यामुळे त्यांचाही नाश होतो.

Racher Carson याने त्याच्या लेखनात The silent spring (1962) मध्ये केलेल्या विश्लेषणात ते म्हणतात, 'अतिरिक्त किट नाशकाच्या आणि रसायनांच्या वापरामुळे 'जंगली जीवना'ची भयंकर हानी झाली आहे. अशा प्रकारचे हे पाहिलेच लेखन आहे. अधिक संदर्भ Goldsmith हा ऱ्यांच्या Blueprint for surviaval 1972 मध्ये,आणि The unofficial U. N. report 'Only one Earth', 1972 मध्ये 'The club of Rome's', 'The limit of Growth' (1977) या लेखनात सापडतो. या लखनाने, निसर्गाच्या अनियोजित वाढीमुळे होणाऱ्या धोक्यांकडे लक्ष वेधले. पाणी आणि हवेच्या प्रदुषणामुळे जीवंत जीवांच्या आरोग्याला धोका निर्माण झाला आहे. समुद्राच्या पाण्यात सांडलेल्या तेलापुढे हजारो माशांना विषबाधा झाली त्यामुळे त्यांना वापरणे [खाण्यासाठी मासे वापरणे] अशक्य झाले. म्हणून नैसर्गिक संपत्तीचे जतन करणे हे आजच्या पिढीचे नैतिक कर्तव्य आहे.

८० च्या दशकात पर्यावरणा विषयी झालेल्या जाणीवेमुळे काही चळवळी सुरु झाल्या. ìGreen peace', 'Friends of Earth', 'Animal liberation Activists' इ. सारख्या संस्थानी जनमत तयार होण्यासाठी परीणामकारक मोहिमा आखल्या. त्यांचे विषय होते,

१) प्रदुषणाचे धोके
२) मृत वनस्पतीपासून बनलेल्या कोळशांच्या साठा (इंधनाचा साठा) क्षीण झाला आहे.
३) जंगलांचे नष्ट होणे आणि त्याच्याशी संबंधित इतर मुद्दे आता सर्व औद्योगिक वसाहती मध्ये अस्तित्वात असलेल्या 'Green parties' मुळे, १८८० नंतर, पर्यावरणाच्या सर्व समस्या या टिपेच्या म्हणजे महत्त्वाच्या झाल्या आहेत.

पर्यावरणाविषयी सर्व बाबींना अंतरराष्ट्रीय महत्व आहे. एका देशात जे घडते त्याची त्वरित इतर सर्व देशात प्रतिक्रिया उमटते. नैसर्गिक आपत्ती जसे नद्यांना येणारे पुर, दुःष्काळ, भूकंप, यांचे परिणाम सर्व जगभर दिसतात. त्याला एक ऐतिहासिक बाजू ही आहे. आज औद्योगिकदृष्टया पुढारलेले देश हे एक काळी वसाहतींचे मालक होते, सत्ताधीश होते. त्या वसाहती मधल्या नैसर्गिक संपत्तीची त्यांनी लूट केली. त्यांच्या नैसर्गिक संपत्तीच्या हावेमुळे निसर्गाचे फारच नुकसान झाले आहे. आज अेशियन, अफ्रिकन देश आपापल्या देशात औद्योगिकीरणावर भर देत आहेत. तेव्हा ही, याच मोठया युरोपियन देशांकडून , त्याला 'पर्यावरणाच्या धोक्या 'साठी विरोध होत आहे. मुळचे गुन्हेगार तेच युरोपिय देश आहेत याचे त्यांना विस्मरण झाले आहे. म्हणून तिसऱ्या जगातल्या देशांनी ही गोष्ट अंतरताष्ट्रीय सभेत चर्चेसाठी नेली आहे. पर्यावरणाचा धोका सर्व जगाला भेडसावणारा असल्यामुळे, तो जागतिक राजकरणासाठी उपयुक्त, असा हा मुद्दा ,U.N मध्येही विचारात घेतला गेला. सन १९७२, स्टॉकहोम मध्ये U.N ने Human - Environment वर एक सभा भरवली. जागतिक पर्यावरणासंबधी समस्यांवर समन्वय साधण्याचे या परिषदेचे (सभेचे) ध्येय. होते. सन १९८७ मध्ये Brundtland Report ने 'शाश्वत विकास 'ही संकल्पना पुढे आणली. सन १९८२ मध्ये Rio येथे एक Earth summit झाली. होती.

या सर्व शिखर परिषदेंचे ध्येय एकच होते. ते म्हणजे पर्यावरणावरील धोके कमी करुनसुद्धा आर्थिक विकास साधणे. आधुनिक तंत्रज्ञान वापरुन ते कदाचित शक्य होईल.पण त्यासाठी अमाप निधीची आवश्यकता आहे. प्रत्येक उद्योगाने मोठी रक्कम (Research and Development) संशोधन आणि विकासासाठी गुंतवली पाहिजे. या गुंतवणुकीचे फायदे दुरगामी म्हणजे बऱ्याच काळाने मिळणारे असतात. बहुतेक उद्योगांना (उद्योजकांना) ताबडतोब फायदा हवा असतो ते R and D ची पर्वा करत नाहीत. उदा. बहुतेक रासायनिक कारखाने त्यांचा रासायनिक कचरा जवळपासच्या नदीमध्ये फेकतात. ज्यामुळे पाण्याचे प्रदुषण होते. पाण्याचे प्रदुषण घालवून, पाणी वापरण्यायोग्य करणे त्यासाठी पैसे गुंतवणे,खर्च करणे हे त्यांचे नैतिक कर्तव्य आहे. पण त्या खर्चामुळे त्यांना काहीच परतावा मिळणार नाही. म्हणून ते Short cut अवलंब करुन रासायनिक कचना इथे तिथे फेकून, सामाजिक कर्तव्य टाळतात. हा Waste , आधुनिक तंत्रज्ञानाने Recycle करता येईल. पण या साठी प्रचंड निधीची गरज असते. तिसऱ्या जगातल्या लोकांचे म्हणणे आहे की, त्यांची गरिबी आणि औद्योगिक मागासलेपणा हा वसावहवाद्यांनी केलेल्या शोषणामुळे आहे. आता त्यांना (विकसनशील देशांना) आपले देश औद्योगिक करायचे आहेत. तर विकसित देशांची ही नैतिक जबाबदारी आहे. ही त्यांनी तंत्रज्ञान या देशात पाठवावे ज्या योगे वातावरणातील प्रदुषण कमी होईल. त्यांनी R and D साठी होणाऱ्या खर्चामध्ये मोठा वाटा उचलला पाहिजे.

सन १९९७ , मध्ये Kyoto येथे भरलेल्या शिखर परिषदेत हे मुद्दे चर्चिले गेले. पर्यावरणाचा धोका सबंध पृथ्वीलाच घेरत आहे. हे शास्त्रज्ञानी रोखठोकपणे सांगितले. त्यांनी Global Warming चाही ईशारा दिला. त्याचे मुख्य कारण कार्बनडाय ऑक्साइड वातावरणात मिसळतो हे आहे. म्हणून Kyoto परिषदेने, यावर मर्यादा घालण्यास सुचविले आहे. विकसित देशांवर अशा Emission वर (वातावरणात ८०२ सोडले) हे emission एका प्रक्रियेच्या टप्प्यावर आहे ते कितपत परिणामकारक होईल हे येणारा काळच ठरवेल.

### १८.२.१ पर्यावरण विषयक मूलभूत गोष्टी :

लोकशाही, स्वातंत्र्य आणि समता या सारख्या राजकीय संकल्पनांपेक्षा 'पर्यावरणवाद'वेगळेपणाने उठून दिसतो, कारण तो मानव आणि इतर सुक्ष्मातिसुक्ष्म जीवजंतूच्या सहसंबंधाची परीक्षा करतो.

**जीवनाचे जाळे :**

पारंपारिक सिद्धांतानुसार निसर्गाच्या निर्मिती मध्ये केंद्रबिंदू, 'मानव ' होता. मानव हा निसर्गाचा मालक आहे. परमेश्वराने निर्माण केलेली सर्व नैसर्गिक संपत्ती ही फक्त मानवासाठीच आहे. त्या संपत्तीवर फक्त मानवाचाच अधिकार आहे. मानवाचा 'निसर्गावर विजय 'ही प्रगतीची कल्पना होती. आधुनिक पर्यावरण हे 'मानव 'केंद्रित सिद्धांत 'फेटाळून लावतात.

David Ehrenfeld (1978) याने, या सिद्धांताला सर्वस्वी चूक म्हटलेले आहे. पृथ्वी आणि त्यावर जगणारे सर्व विविध प्राणी यांचे जतन करणे, त्यांचा आदर करणे हे मानवाचे नैतिक कर्तव्य आहे. पण त्याउलट, मानवाने "आपण पृथ्वीचे मालक आणि उपभोक्ते आहोत असा समज करून घेतला " (John Locke). आधुनिक सिद्धांत नवीन राजकारणाचे प्रतिनिधीत्व करतो. 'अविभाज्य' या सिद्धांता मध्ये मानव निसर्गाच्या केंद्रस्थानी नाही. तर तो त्याचा एक अविभाज्य भाग आहे. निसर्ग म्हणजे एक जाळे आहे ज्या मध्ये अत्यंत मौल्यवान पण नाजूक संबंध आहे; जो मानवासहित इतर सर्व जीवीत प्राणी, पक्षी, वनस्पती आणि वातावरण या मध्ये आहे. यातील एखादया भागाला दुखापत झाली तर त्याचा परिणाम सपूर्ण 'जीवन साखळी 'वर होईल.

'Green thought' ची मध्यवर्ती कल्पणा ही 'पर्यावरणा संबंधी आहे. त्यांच्या म्हणण्याप्रमाणे, वनस्पती आणि प्राणी, नैसर्गिक योजने प्रमाणे, स्वतःचे स्वतः नियम पाळून जीवंत राहतात; तगून राहतात. पण मानवामध्ये मात्र स्वतःचे स्वतः नियंत्रण करण्याची क्षमता नाही. आपण निसर्गाकडून अत्यंत गरजेच्या गोष्टी , कमीतकमी प्रमाणात घेऊन बाकीच्या सोडून दिल्या पाहिजेत. पण माणसाच्या हावरटपणा मुळे निसर्ग धोक्यात आला आहे.उदा मासेमारी. पूर्वी पारंपारिक पद्धतीने मासेमारी करणारे लोक, काही ठराविक कालखंडात मासेमारी करत नसत त्यामुळे मांशाची उपज (Fish population) वाढत असे, तसेच पारंपारिक साधने जसे, जाळे वापरण्यामुळे बरेच मासे बाहेर जात असत पण आता सहकारी तत्वावर चालणारी , मासेमारी, मशीनच्या मार्फत होते. त्यामुळे संपूर्ण 'मत्स्य संपत्ती' ची लूट होते. पारंपारिक मासेमारी फक्त भूक भागवण्यापूरतीच, आणि म्हणून मर्यादित होती. आधुनिक मत्स्य व्यवसाय हा नफेखोरी साठी आहे. या वृत्तीला मर्यादा नाहीत हा भौतिक संपत्तीचा मानवाचा ध्यास, निसर्गाचा समतोल बिघडवत आहे. ज्यावर मानवाचे जीवन अवलंबून आहे. अशा (Eco system) पर्यावरणावर, संकट आले आहे, पर्यावरण धोक्यात येण्याची अनेक कारणे आहेत; ती पुढील प्रमाणे–

१) अमर्याद लोकसंख्या वाढ. फार पूर्वीच गांधीजी म्हणाले होते, "आपल्याकडे एकच भूमी आह, जी प्रत्येकाच्या गरजेसाठी पुरेशी आहे; पण प्रत्येकाच्या 'हावे' साठी नाही " अमर्याद लोकसंख्या आणि मर्यादित साधन संपत्तीमुळे पर्यावरण बिघडले आहे.

२) भूगर्भातील मर्यादित खनिज स्त्रोतांची, भरपाई होऊ शकणार नाही अशी घट, 'खाण' काम व्यवसायाने झाली आहे. उदा. कोळसा, नैसर्गिक वायु, तेल त्याचा परिणाम म्हणून हवामान ही बिघडते.

३) जंगलाचे निर्मूलन :- जंगलानी आपल्याला नेहमीच शुद्ध हवेचा पुरवठा केला आहे. त्यांच्यामुळे पूर नियंत्रणात राहतात, पावसाचे नियमित आगमन, जैव विविधता जपणे इ. गोष्टींही जंगलामुळेच शक्य होतात. जंगलांमुळेच विविध प्रकारच्या पेशी अस्तित्व टिकवून आहेत, याच जंगलाची अमाप तोड होत आहे.

४) नद्या, तलाव आणि तळी यांचे पाणी प्रदुषित झाल्यामुळे पाण्यातील प्राण्यांचे (उदा. मासे, कासवे, मगर इ.) जीवन धोक्यात आले आहे.

५) कीट नाशकांचे अनेक दुषपरिणाम होत आहेत.

६) सर्व जीवीत प्राणी आणि निसर्ग यांच्या मध्ये समतोल असावा यावर 'पर्यावरण शास्त्राचा' विश्र्वास आहे. आज सिंह,वाघ आणि  इतर विविध प्रकारची जंगली जनावरे अस्तंगत होण्याचा केल्यामुळे, आता जंगली जनावरे मानवी वस्तीवर वावरायला लागली आहेत. असा वृत्तांत आहे. ह्या घटना ही वातावरणातील असमतोल दर्शवितात.

वर सांगितल्याप्रमाणे, मानव हा निसर्गाचा मालक आहे, हा दृष्टीकोन बदलायलाच हवा. भगवान बुद्धाच्या शिकवणुकीतही, 'पर्यावरणासंबंधी शहाणपणाच्या समजुतीच्या गोष्टी अभिव्यक्त झालेल्या आहे. इतर सहकाऱ्यांशी, प्राणीमात्रांशी आणि निसर्गातील इतर जीव जंतुंशी सऱ्हदयतेने वागण्याची शिकवण बुद्ध धर्म देतो. ख्रिस्त पूर्व धर्मात विशेषतः आदीवासी धर्मात ह्या कल्पना अस्तित्वात होत्या. मानव हे परमेश्राचे पृथ्वीवरील सेवक आहेत. त्यांना ह्या पृथ्वी ग्रहाचे संरक्षण करायला सांगितले आहे. पृथ्वीचा उल्लेख 'पृथ्वी माता' भूमाता असा केला जातो 'निसर्ग गोष्टींना जीव आहे' असा याचा यथार्थ अर्थ आहे.

आधुनिक काळात 'Planet Earth is alive' 'पृथ्वी ग्रह जीवीत आहे ' ही संकल्पना एका कॅनेडियन विव्दावाने , James Lovelock याने विकसित केली आहे. त्याने याला "GAIA" हे नाव दिले आहे. ग्रीक देवता, Earth Gaia Hypothesis या सिद्धांतानुसार 'पुथ्वी हे एक जीवंत अस्तित्व आहे' हे समजूत घेतले पाहिजे. ती स्वतःच्या किया , स्वतच्या अस्तित्वाचे संरक्षण करण्यासाठी, नियंत्रित करत असते हा स्वक्रिया नियंत्रणाचा गुण इतर सजीवांमध्ये ही दिसून येतो या सिद्धांताचा सारांश असा आहे की,ज्या पेशी Gaia ला नियंत्रणांत मदत करतात त्यांची समृद्धी होते आणि जे मानव , Gaia ला धमकावतात त्यांचा नाश होतो. हा Gaia सिद्धांत बराच बळवट् झाला आहे. त्यांचा असा दृढ विश्वास आहे की मानवाने पृथ्वीच्या आरोग्याचा आदर केला पाहिजे. तिच्या सौंदर्याचे आणि साधन संपत्तीचे जतन केले पाहिजे. हा अगदी टोकाचा विचार आहे. मात्र मध्यम मार्गी पर्यावरण तज्ञांच्या मते,पर्यावरण विषयक अशा योजना तयार केल्या पाहिजेत की, ज्या योगे नैसर्गिक स्त्रोतांचा पुरवठा मानवाला जास्तीत जास्त काळ मिळेल. Gaia पर्यावरण तज्ञ मात्र निसर्गाला स्पर्श ही करु नका असे म्हणतात. मूलतः ही पर्यावरणा संबंधी, अमानवी एकता आहे. पृथ्वी ग्रहाचे आरोग्य इतर कोणत्याही व्यक्तिगत पेशींपेक्षा, अगदी मानवाच्या आरोग्यापेक्षा सुद्धा पृथ्वीचे संतुलंन राहणे अधिक महत्वाचे आहे.

पर्यावरणा संबंधी अजून एक महत्वाचा मुद्दा म्हणजे, शाश्वतीची, सातत्याची योजना. पर्यावरण तज्ञांच्या मते, भांडवलवादी आणि समाजवादी दोन्ही विचारसरणीचे लोक अतिरिक्त औद्योगिकीकरणावर विश्वास ठेवतात. पारंपारिक राजकीय पक्षांचे असे ठाम मत आहे की मानवी जीवनात संपत्ती मिळविण्याच्या आणि भौतिक विकासाच्या अमर्याद शक्यता आहेत ; संधी

आहेत. याच्या एकदम विरुद्ध पर्यारणतज्ञांची भूमिका आहे. त्यांनी नवीन शब्द चलनात आहे. त्याला “Spaceship earth” असे म्हणतात. पृथ्वीची तुलना आकाशयानाशी केली आहे.‘आकाशयान ’ हे पॅक बंद असते. बाहेरुन आंत काहीही जात नाही. आकाशयानातल्या लोकांना, जवळ असलेल्या वस्तू आपले अस्तित्व टिकवण्यासाठी, जपून आणि काटकसरीने वापराव्या लागतात. त्यांना बाहेरुन प्राणवायू किंवा ‘प्राण वाचविणारे पदार्थ ’ मिळू शकत नाहीत. त्यामूळे जिवंत राहण्यासाठी त्यांना जवळ असलेली तुटपुंजी सामग्री अक्कल हुशारीने वापरणे आवश्यक ठरते. म्हणून ‘sutainable development’ म्हणजे ‘शाश्वत विकास ’ ही संज्ञा अर्थ शास्त्राच्या संदर्भात वापरली जाते. ही ‘स्पेसशीप’ संज्ञा प्रथम ‘Kenneth Boulding’ याने पृथ्वीच्या संदर्भात ताकीद देताना वापरली. मानवाची अशी प्रवृत्ती आहे की तो ‘a cow boy economy’ मध्ये जगतो आहे. जिथे अमर्याद संधी उपलब्ध आहेत,जशा American west मध्ये Frontier period च्या वेळी होत्या. तो म्हणतो की ही बंद आकाशयाना सारखी पद्धती तो पर्यंतच चालेल जोवर अंतर्गत उर्जेमध्ये सातत्य राहील. एका दिवशी, सर्व पृथ्वी, ग्रह, एखाद्या बंद यानाप्रमाणे भरुन जातील.

E.F. Schumacher यांनी, सद्य बेपर्वा, शोषण करणाऱ्या आर्थिक विकासाला, पर्यायी योजना सुचविली आहे. त्यांच्या पुस्तकात, small is beautiful’ मध्ये ते म्हणतात, आधुनिक कारखानदारानी उर्जा स्त्रोताला आपलीच ‘मिळकत’ समजून सतत आठवडया मागून आठवडे,महिन्यांमागून महिने वापरत आहेत. वास्तविक ‘उर्जा’ हे नैसर्गिक भांडवल आहे. आपण त्याचे जतन केले पाहिजे. जसे आपण भांडवलाच्या व्याजावर जगतो.पण भांडवलच गिळून टाकत नाही. तसेच आपण उर्जेला भांडवल समजेल पाहिजे आणि त्याचा उपयोग शक्य तेवढया काटकसरीने केला पाहिजे. उर्जेलाच मिळकत समजत जाण्याचा प्रवृत्तीमुळे उर्जेची मागणी वाढते आहे. नैसर्गिक इंधनाच्या साठयात घट झाल्यामुळे, तो या शतकाअखेर पर्यंत पुरे पडेल असे वाटत नाही, आपल्याला सखोल विचार करुन, आर्थिक विकासासाठी नवे मार्ग शोधले पाहिजेत.

म्हणूनच सौर उर्जा आणि जल उर्जा, या पर्यायी उर्जा, ज्या पर्यावरणाशी मैत्रीपूर्ण आहेत त्यांच्यावर संशोधन चालू आहे. मानवाच्या महत्वाकांक्षेला स्पष्ट मर्यादा घालण्याची गरज आहे. नवीन अर्थशास्त्राचा उद्देश , कमाल उपयुक्तता नाही तर, सामाजिक जाण वाढीस लावणे हा आहे. एकत्र काम करण्याची सामाजिक प्रवृत्ती वाढीस लावणे हा आहे. साधारणपणे, जास्त प्रदुषण करणाऱ्या कारखान्यांना जास्त कर आकारणे, दंड आकारणे हे ही उपाय आहेत.

जर्मन देशातील अतिरेकी संस्था ‘Fundis’ नावाने ओळखली जाते. त्यांनी काही सद्य औद्योगिक अर्थ व्यवस्थेला पूर्णपणे उलटीकडे (u-Turn) अमुलाग्र नवे बदल सुचविले आहेत. पर्यावरणीय समस्या ही भौतिक वादातून उपभोक्तावाद, ध्येय निश्चिती , यातून सुरु होतात. त्यावर उपाय ‘Zero - Growth’ आणि ‘औद्योगिकरणानंतरचे युग ’ याची रचना याध्ये असेल लोक लहान लहान ग्राम समजामध्ये राहतील, आणि हस्त व्यवसायावर निर्भर राहतील, ही नक्कीच गांधीच्या मार्गाची नक्कल आहे. हा कारखानादारी आणि तंत्रज्ञानाला संपूर्ण नकार आहे. हे कितपत शक्य आहे ?, ‘निसर्गाकडे परत चला ’ असा त्यांचा नारा आहे ते यशस्वी होईल, का याची शंका वाटते.

या पर्यावरणाबद्दलाच्या विविध मंताना नक्कीच मर्यादा आहेत. वर नमूद केल्याप्रमाणे, विकसनशील देशांना असे वाटते की, पर्यावरणावर जास्त भर दिल्यामुळे त्यांना पश्चिमी

राष्ट्रांसारखी प्रगती करण्यास नाकारले जात आहे. आधुनिक औद्योगिक जग, जागतिक व्यापराला प्रोत्साहान देत आहे, पर्यावरणशास्त्र त्यांच्या विरोधात आहे. लोकशाही राज्यात zero growth ची संकल्पना कधीच यशस्वी होणार नाही.

आजच्या घडीला नैसर्गिक स्त्रोतांचे जतन करणे हे अत्यंत आवश्यक आहे.

**आपली प्रगती तपासा :**

१) सध्याच्या पर्यावरीण धोक्यांची काय कारणे आहेत ? पर्यायी सिद्धांताची चर्चा करा.

२) पर्यावरणाचे संतुलन राखण्यासाठी केलेल्या विविध चळवळीची यथार्थता पटवून द्या.

## १८.३ सांस्कृतिक विविधता - व्याख्या आणि अर्थ :

संस्कृति म्हणजे मूल्यांचा परंपरांचा, श्रद्धांचा संच आणि त्या त्या समुहाची जीवन प्रणाली याचा परीघ , भाषा, धर्म , अगदी खाण्या पिण्याच्या पद्धती आणि पोशाख पद्धत, एवढा मोठा आहे. याचे प्रतिबिंब इतिहासाच्या एखाद्या कालखंडात सापडते. उदा. आपण म्हणतो पौराणिक संस्कृती, सरंजामी संस्कृति किंवा आधुनिक संस्कृती इ.इ सकृत दर्शनी संस्कृती माणसाला ओळख देते. तो एखाद्या गटाचा भाग असतो. त्या गटाची काही विशिष्ट लक्षणे असतात, ज्यामुळे तो इतरांपेक्षा वेगळा दिसतो. हीच गटाची लक्षणे माणसाला त्याची ओळख देतात म्हणून माणूस हिंदु, मुस्लीम किंवा अफ्रिकन किंवा ब्रिटीश असा म्हटला जातो.

बऱ्याच वर्षात झालेल्या ऐतिहासिक लढाया, व्यापार झाल्यामुळे काही अंशात संस्कृतिचे एकमेकात मिसळणे झाले आहे. तरीही निरनिराळे गट, विशिष्ट समाजात आपापली वेगळी लक्षणे, वैशिष्टे जपतात. एकच धर्म पाळणाऱ्या समाजामध्ये अशी वेगळी लक्षणे जपणारे गट असतात. हिंदू मधल्या जाती संस्थामध्ये विविध सांस्कृतिक रुढी दिसतात. प्रत्येक जात, उपजाती मध्ये स्वतःचे सास्कृतिक लक्षण असते. विवाह इतर सामाजिक समारंभात त्यांचे (unique) वेगळेपण असते.

बऱ्याच वेळा व्यक्तिच्या सामाजिक आणि नैतिक बांबी बद्दलची विचार सरणी आणि निर्णय समता ही त्याच्या सांस्कृतिक वारशावर ठरते. उदा. रुडयार्ड किपलिंगने 'गोऱ्या माणसाचे ओझे ' हा सिद्धांत मांडला. त्याची जडण घडण वसाहतवादी वातावरणात झाल्यामुळे मानवजातीला मुक्त करण्याची जबाबदारी. पुढारलेल्या गोऱ्या लोकांवर आहे. हिंदुमधल्या ब्राम्हण-जातीचे वर्चस्व, शुद्ध आर्य वंशाच्या श्रेष्ठत्वाची हिटलरची कल्पना या दोन्ही गोष्टी विशिष्ट संस्कृतिचे गुणधर्म दर्शवितात. पण प्रत्येक समाजात, समाजसुधारक ही असतात जे समाजमान्य मतांना, कालबाह्य ठरवून आव्हान देतात आणि समजिक बदलासाठी समाजाचा दृष्टीकोन

बदलण्याचे आवाहान करतात. म्हणून, मूलतः संस्कृति ही स्थिर नसते. ती बदलातून जात असते. पण मूळ गाभाच्या तत्वांमध्ये तिची विशिष्ट ओळख असते जी त्यां लोकांना इतरापासून वेगळी ओळख देते.

असा कोणताही समाज नाही ज्याचा एकच सांस्कृतिक गट आहे. प्रत्येक समाजात, प्रत्येक देशात विविध सांस्कृतिक गट आहेत. या सर्व विविध सांस्कृतिक गटांना एका राजकीय रचनेमध्ये सामावून, त्याच्यांत एकी कशी घडवायची, ज्यामुळे राष्ट्राचा एकसंघपणा सुरक्षित राहील हे सर्वात मोठे आव्हान आहे. या प्रश्नाचे उत्तर शोधण्याआधी, साऱ्या जगभर विविध सांसकृतिक घटकांची वाढ होण्यास, काय कारणे आहेत याचा शोध घेणे जरुर आहे.

१) नवीन वस्त्यांचा शोध.
२) ख्रिश्र्चन धर्मोपदेशकांची भूमिका
३) तंत्रज्ञानातील नव नवीन शोधांमुळे जग लहान झाले आहे म्हणजे अंतर कमी झाले आहे. जग जवळ आले आहे.
४) नविन आर्थिक धोरणामुळे, विविध देशात स्थिरावलेले, विविध ज्ञान यांचे परस्परावलंलित्व आवश्यक झाले आहे.
५) लोकशाहीच्या बहुलत्व नव तत्वज्ञानाचा थर ही समाजातील विविधता जपणे आणि तिची प्रगती करणे यावर आहे.

या आधुनिक जगात,एकही देश, बहु - सांस्कृतिकतेपासून वाचलेला नाही. पर्वी ‘बहुविद्या संस्कृति ’ चा अर्थ वेगळया सांस्कृतिक, धार्मिक आणि वांशिक गटांचे एका विशिष्ट भूभागातील अस्तित्व असा होता. परंतु आज त्याला अधिक व्यापक परिमाण लाभले आहे. याचा संदर्भ एका वेगळया सांस्कृतिक नमुन्याचा, जीवन पद्धतीचा, आणि श्रद्धांचा, एका विशिष्ट स्थानिक समाजाने अनुसरलेला मार्ग आहे. उदा. आपल्याकडे Homosexuality ला पाठिंबा देणारे , किंवा स्त्री मुक्तीची तरफदारी करणाते किंवा अनेकांना पसंत नसणारे लैंगिक स्वांतत्र्य देणारे, Black Power इ.इ. गट असतील. तांत्रिकदृष्टया ते सर्व अमेरिकन असतील. पण ते आपली वेगळी संस्कृती प्रदर्शित करतात. आणि लोकशाही नियमांना मान्य आहे की अशा गटांना सन्मान, मान्यता मिळाली पाहिजे. कोणतीही एक संस्कृति वरचढ किंवा सर्वश्रेष्ठ नाही. प्रत्येक व्यक्तीला, कोणत्या मार्गाने जीवन जगायचे ते ठरविण्याचा पूर्ण स्वातंत्र्य घ्यायला हवे.

विविध सांस्कृतिक गटांशी व्यवहार करताना तिन, ऐतिहासिक पद्धती सापडतात. सर्वात पहिली म्हणजे समूह नाश करणे जी सर्वात क्रूर आणि रानटी होती. ह्या अमानवी योजने मध्ये ‘परकीय संस्कृति’ चे आपल्या राष्ट्रीय भूमीतून संपूर्ण उच्चाटन करणे. या पद्धती पाशवी आणि हिंसक होत्या. आहे ती पद्धत एकमेव सत्य म्हणून स्विकारणे आणि कोणताही फरक नाकारणे हा यांचा बाणा. एक सारखी जीवन प्रणाली आणि वागणुकीच्या पद्धती, ह्यामध्ये अपेक्षीत असतात. अशा या (Anninilation) समूळ नाशाची पद्धतीची काही उदाहणे खालील प्रमाणे.
१) हिटलरची ‘ज्यू’ लोकांविरुद्धची मोहिम.
२) अमेरिकन वसाहतवाद्यांनी, रेड़ इंडियन लोकांना दिलेली व़ागणूक
३) तिबेट मध्ये ‘बुद्ध धर्मीयांची’चीन कडून झालेली क्रूर द़डपशाही
४) हिंदु धर्मियांची पाकीस्तानातील स्थिती.
५) ‘तालिबान’चे सिद्धांत. इ.इ.

दुसरी पद्धत म्हणजे एकाधिकारशाही असलेली राजेशाही नियंत्रण असलेले सरकार वर्चस्व असलेल्या संस्कृतिच्या ‘वरचढ गुणांचा’ सगळीकडे गवगवा करुन इतर लहान सांस्कृतिक गंटाचे मूख्य प्रवाहात विलीनीकरण करून घेण्यास प्रोत्साहन देणे, एका तऱ्हेने हे सांस्कृतिक आक्रमणच आहे. भारतामध्ये R.S.S ने सुरु केलेला प्रचार असा की, हिंदु संस्कृति मध्ये , इतर सर्व संस्कृति सामावलेल्या आहेत,हे एक बहुमतवाले नमुनेदार उदाहरण आहे, जे इतर लहान सांस्कृतिक प्रवाह आहेत. त्यांचे मुख्य प्रवाहात विलिनीकरण दर्शवते. या प्रक्रियेमध्ये स्वतःची निराळी सांस्कृतिक ओळख हे गट हरवून बसतात. हिंदु धर्माने बुद्ध , सांख्य आणि चार्वाक तत्वज्ञानालाही स्वतंत्र अस्तित्व नाकारले आहे. त्याची प्रक्रिया हिंसक नसली तरी विलीनीकरणाचे धोरण, हे दुरुस्ती करण्यापलीकडची हानी करवते. लहान गंटांची ओळख यामुळे पुर्णपणे कायम नाहिशी होते.

तिसरी पद्धत जास्त व्यवहार्य,उदार आणि लोकशाही पद्धतीची आहे. योग्य ती ओळख ही पद्धत सर्व संस्कृतिंना देते. एका राष्ट्रीय संस्कृतिमध्ये, सर्व लहान सांस्कृतिक गंटानी मिसळून जावे असे ही पद्धत मानत नाही. या उलट, प्रत्येक सांस्कृतिक गटाला आपले वेगळेपण जोपासण्यासाठी प्रोत्साहान दिले जाते, आणि सर्वांना समानतेने वागविले जाते. मात्र या सर्व कार्यक्रमांचे आयोजन कायद्याच्या चौकटीत राहूनच व्हायला हवे. कायद्याने घातलेली मर्यादा सर्व गटांना बंधनकारक राहील. एका गटांचे कार्यक्रम,दुसऱ्या गटाला धमकी देत असतील, किंवा सामाजिक शांततेचा भंग करत असतील तर, सर्व सामान्यतः प्रस्थापित कायद्याप्रमाणे, भंगकरणाऱ्यांवर कारवाई केली जाते. सुजाण नागरिक असलेल्या सर्व देशात ही पद्धत मान्य आहे.

असे लक्षात आले आहे की, एखाद्या देशातील विविध सांस्कृतिक गंटांना त्यांची संस्कृति जपणारे कार्यक्रम मोकळेपणाने करायला नकार दिला तर विघटनाचे बीज पेरले जाते. त्यामुळे देशाचे विभाजन होऊ शकेल. ‘बांगला देशा’ ची निर्मिती, ही केंद्रिय सत्तेच्या बळावर, पाकिस्तानातील सकारने ,बंगाली भाषा आणि बंगाली संस्कृतीला योग्य ती मान्यता देण्यास नकार दिल्यामुळे झाली.तसेच दुरदृष्टीच्या अभावामुळे पूर्व बंगालवर (आताचा बांगला देश ) पंजाबी संस्कृति आणि उर्दु भाषेची जबरदस्ती करण्याचे फलित, देशाचे (पाकिस्तानचे) विभाजन झाले. अगदी अलिकडच्या काळात, युगोस्लाव्हियाचे विभाजन झाले. ते याच विविध संस्कृतिंना नाकारण्याच्या धोरणामुळे बहुतेक सर्व दक्षिण ऐशियाई देश, जसे श्रीलंका , अफगाणिस्थान, पाकिस्तान, आणि भारतात सुद्धा, मुख्य राजकीय प्रवाहापासून वेगवेगळया सांस्कृतिक जमाती दूर जात आहेत; ही समस्या सर्व देशांना सारख्याच गंभिरतेने भेडसावत आहे.

सामान्यतः लोकशाही सरकारे ही समस्या संस्थात्मक पद्धतीने सोडविते. संघराज्य पद्धत, जसे भारतामध्ये विविध भाषिक गटांना कायदेशीर मान्यता देऊन ही समस्या सोडविली आहे. काही स्वायत्त संस्थाही आहेत. संविधानात्मक स्पष्ट अशी सुरक्षा यंत्रणा हवी, जी विविध गटांची सांस्कृतिक ओळख अबाधित ठेऊन ही, राष्ट्राचे विभाज होण्यास प्रतिबंध करेल. अखेर राष्ट्रीय एकात्मता ही आतुनच (देशांतर्गतच) विकसित झाली पाहिजे बाहेरुन म्हणजे, सरकारच्या लादण्याने (imposing) ती होणार नाही.

प्रतिनिधीक सरकारमध्ये नेहमीच असमतोल आढळतो. सामान्यतः लोकशाही सरकार सर्व नागरिकांना समान राजकीय हक्क पुरविते. हे संस्थापक योजनांमार्फत साध्य केले जाते

उदा. प्रौढ मतदारानाव्दारे पण राजकीय विशेतज्ञांच्या मते, ही यंत्रणा बहुमतवाल्या लोकसंख्येच्या बाजुने कार्यरत असते. आणि म्हणून J.S. Mill त्याला Tyranny of Majority म्हणजे 'बहुसंख्यंकांची जुलुमशाही'असे म्हणतो. बहुमत वाले लोक, मताच्या जोरावर अनेक फायदेशीर गोष्टीवर हक्क सांगू शकतात, ज्याचा त्रास इतर लहान गटांना होऊ शकतो. काही लहान गट, धोरणात्मक योजनांमधून गाळले जाऊ शकतात. अनेकदा पुर्नउच्चार केलेला , पश्र्चिमी समाजातील 'वंशवाद' Coloured वंशाचे सतत शोषण करत आला आहे. पुरुष , स्त्रियांवर बंधने घालत आहेत वर्चस्व गाजवत आहे यामुळे लोकशाहीत सुद्धा बहुल सांकृतिकता टिकून राहणे कठीण आहे. भारतामध्ये, दलित मुस्लीम आणि O.B.C यांना सतत असे वाटते की, सद्य राजकीय व्यवस्थेमध्ये त्यांचे हित सुरक्षित केले जात नाही.

अशा तऱ्हेच्या प्रतिनिधिक पद्धतीतील असमतोलातुन बाहेर पडण्यासाठी, बहुविद्य संस्कृति तज्ञांनी काही उपाय सुचविले आहेत.

**आपले प्रगती तपासा :**

१) 'संस्कृतिच्या' यथार्थ बद्दल टीप लिहा.
२) विविध सांस्कृतिक गटांच्या वाढीला कोणते घटक जबाबदार आहेत त्यांची नांवे सागून आणि त्यांच्या पुढील समस्यांची चर्चा करा.

## १८.४ आधुनिक काळातील विविध सांस्कृतिकते पुढील आव्हाने

समाजरुपी वस्त्राचे विविध सांस्कृतिक रुप जपण्याचाठी तिन प्रकारच्या हक्कांच्या संरक्षणबद्दल,will kymlicka हे त्यांच्या multicultural Rights ह्या पुस्तकात सांगतात : ते असे

१) स्वराज्य सरकारचे हक्क
२) विविध सांस्कृतिक हक्क
३) प्रतिनिधीत्वाचे हक्क.

पहिला हक्क, हा एका भूप्रदेशातील राहणारा आणि अेक भाषा बोलणाऱ्य, अेकाच पद्धतीने जीवन जगणाऱ्या आणि उरलेल्या बहुसंख्य लोकांहून भिन्न असणाऱ्या गटाला लागू होतो. यामध्ये राजकीय सत्तेचे हस्तांतरण संघराज्य पद्धती किंवा स्वायत्त पद्धतीच्या मंडळामार्फत होते ज्याच्यावर अल्पसंख्यांक सभासदांचे नियंत्रण असते. भारतामध्ये असे खास स्थान 'जम्मू कश्मीर'ला 'दार्जिलिंग मंडळ'स्थापन करुन दिले आहे. तसेच सिक्कीम चे ही आहे. दुसरे हक्क

विविध सांस्कृतिक हक्क हे एखाद्या समाजाच्या विविक्षित सांस्कृतिक (Specialities) खासियत गोष्टींची संबंधात आहेत. हे हक्क बहुसंख्य लोकांच्या सांस्कृतिक आक्रमणापासून रोखण्यासाठी आहे. सांस्कृतिक वेगवेगळया असणाऱ्या निराळया गटांना आणि अल्पसंख्यकांना कायदेशीर संरक्षण आहे. भारतामध्ये मुस्लीम, ख्रिश्चन आणि इतर हिंदु नसलेल्या अल्पसंख्याकांसाठी स्वतंत्र नागरी कायदा आहे. काही देशात शिख लोकांना 'हेलमेट' न घालता मोटरसायकल चालवविण्याचा अपवादात्मक कायदेशीर परवाना आहे.मुस्लीम आणि ज्यू लोकांना जनांवाराच्या कत्तलीसाठी कायद्यातून सूट आहे. इ.इ. तिसरे खास प्रतिनिधीत्वाचे हक्क हे राजकीय हक्काचे असंतुलन 'खास भिन्नत्व'च्या प्रक्रियेतून संतुलित करण्याचा प्रयत्न करतात. अल्पसंख्यांकांच्या अपुऱ्या प्रतिनिधीत्वामुळे निरनिराळया राजकीय योजनांमध्ये असलेल्या त्रुटी भरुन काढण्याचा हा एक प्रयत्न आहे. 'राखीव जागा' हे धोरण भारतामध्ये आणि इतर कल्याणकारी राष्ट्रांमध्ये राबवले जाते, ते याच त्रुटीच्या दुरुस्ती करिता त्याचेच हे उदाहरण आहे.

विविध सांस्कृतिक हक्कांच्या सिद्धांतामध्ये काही समस्या आहेत. मुळात ही पद्धत सामुहिकता मान्य करते. पण 'व्यक्तिगतता' नाही व्यक्तिचे हक्क आणि समुहाचे हक्क हे एकमेकांच्या विरुद्ध असू शकतात. उदा. सहजपणे अल्पसख्यांक मुसलमानांना उपलब्ध असलेला घटस्फोटाचा हक्क हा मुस्लिम महिलांच्या व्यक्तिगत विरुद्ध जातो. शिवाय अल्पसंख्यांकांना विशेष सवलती दिल्यामुळे, बहुसंख्य समाज नाराज होतो. 'मुस्लीम समाजाचे'राज्यकर्ते लांगुलचालन करतात. या बद्दलची चर्चा आपण ऐकलेली आहेच. काहींना या धोरणामुळे देशाच्या ऐक्याला धोका निर्माण होईल आणि देशाचे विभाजन होईल असे वाटते.

अर्थात या हक्कांच्या मर्यादा आहेत. विविध सांस्कृतिक गंटाची विशिष्ट ओळख जपली जाण्याचा गरजेबद्दल कोणीच आपेक्ष घेणार नाही. हे हक्क बजावताना ज्या काही विरोधाभासांना तोंड द्यावे लागेल ते राजकीय आणि कायदेशीर मार्गाने देता येईल.

### १८.४.१ बहुविध संस्कृतिची वाढ :

ऐतिहासिक दृष्टया पाहता,बऱ्याच सामाजिक चळवळींनी बहुविध सांस्कृतिक समाजाचे बीजारोपण झाले, दक्षिण भारतात इ.व्ही रामास्वामी नाइकर यांनी सुरु केलेली "The Self Respect Movement" हे द्रविड संस्कृतिचे प्रतिपादन होते. त्याप्रमाणेच 'ब्राम्हण विरोधी 'चळवळ १९ व्या शतकात महाराष्ट्रात झाली. या चळवळीचा उद्देश आपापल्या समाजात जागृति निर्माण करणे हा होता. तसेच त्यांना स्वतंत्र ओळख आणि सांस्कृतिक मान्यता, जी बहुसंख्यकांनपेक्षा वेगळी होती, ती मिळवणे हा उद्देश होता अलिकडचा दलित विव्दान Kanchana Illiah लिहीतो, "मी हिंदु नाही" हे शपथेवर सांगतो. आणि दलित संस्कृति ही हिंदु संस्कृति पेक्षा संपूर्णपणे वेगळी आहे. सर्व सामाजातील वरीष्ठ संस्कृतीशी केलेले बंड म्हणजे लोकप्रिय संस्कृतिचा उदय होय. १९६० ते ७० च्या दशकात युरोपमध्ये एक नवीच टूम निघाली Ethno - Cultural - Nationalism म्हणतात. हा 'राष्ट्रवादा' चा एक भाग आहे, ज्याला विविध संस्कृतिक गटाचे वेगळेपण टिकवण्याच्या संकल्पनेतेने चेतना दिली. हे कॅनडामध्ये स्पष्ट उघड झाले, जिथे फ्रेंच भाषा बोलणाऱ्या 'क्युनंक' देशाच्या लोकांनि आपले वेगळेपन दाखवून दिले. तसेच U.K मधला 'राष्ट्रवाद' जिथे वेल्श आणि स्कॉटिश लोकांनी आपले वेगळेपण दाखवणारी चळवळ केली. कॅटालोनीया आणि स्पेनच्या 'बास्क' अेरिया आणि अकालीच्या खालिस्तानच्या मागणी मध्ये Ethno - Cultural - Nationalism ची दोन उदाहरणेच

दिसतात. भारत - पाकिस्तान फाळणी हे त्याचेच उदारण आहे. अमेरिकेतल्या 'Blacks' ना असे फार वाटते की Whites, हे त्यांची संस्कृति, तिचे वर्चस्व सतत गाजवत, आमच्या संस्कृतिकडे तुच्छतेने बघतात. म्हणून Black is Beautiful हे 'ब्लॅक आयडेंटीटीचे ' चिन्ह आहे , जे Whites च्या एकधिकार शाहीला शह देते.

अंतरराष्ट्रीय राजकारणात, अल्पसंख्यांकांना महत्त्व येते आहे. त्यामुळे विविध सांस्कृतिक समाज वाढत आहेत. प्रथम स्थलांतर होते. बहुतेक वेळा कामगारांचे स्थलांतर हे त्यांच्या वसाहतीतून, आपल्या जुन्या वसाहत मालकांकडे (परदेशात) स्थालांतर करतात. उदा. १९५० ते ६० च्या दरम्यान वेस्टइंडिज आणि भारतीय उपखंडातून बरेच लोक ब्रिटेनमध्ये स्थलांतरीत झाले. अलजेरिया, मोस्को आणि टुनिसियामधून कामगार फ्रांन्सला स्थलांतरीत झाले.

१९९० पासून शरणार्थींची संख्या वाढते आहे. १९९३ मध्ये १ कोटी ८० लाख शरणार्थी संख्या होती. Cold War नंतरच्या कालखंडानंतर झालेल्या लढायमुळे अल्जेरिया पासून ते खांडा, युगांडा. ते थेट श्रीलंका अफगाणीस्तान पर्यंत शरणार्थींची संख्या वाढतच होती.

तिसरे म्हणजे पूर्व युरोपातील, साम्यवादी यंत्रणा कोलमडल्यामुळे, स्थालांतरीतांची संख्या वाढली कारण त्यांना पश्चिमी युरोपमध्ये नवीन आर्थिक बदल मिळतील असे वाटले.

या सर्च घडामोडींचा आढावा घेता विविध सांस्कृतिकता असलेला समाज, ही एक औपचारिक सामाजिक संकल्पना बहुतेक सर्व युरोपियन देशात मान्य झाली. आता ही एक प्रस्थापित समाजमान्य बाब आहेत की सर्व आधुनिक राज्ये बहुविध सांस्कृतिक बहू धार्मिक, बहु वंशीय आहेत. आता हा मागे फिरणार नाहीत बहु सांस्कृतिक, आणि कट्टर राष्ट्रवादासह, म्हणजे मोठेच आव्हान आहे. याला जागतिक आंतकवादाची ही बाजू आहे. इस्लामी मूलतत्ववादी या बहूविध सांस्कृतिकतेचा उपयोग आपल्या गुप्त कारवायांसाठी करतील ही ह्या पुढील संकटे आहेत.

बहुविध संस्कृतिचे दोन उपयोग आहेत. एक normative आणि दुसरी Descriptive म्हणजे विश्लेषणात्मक पद्धतीमध्ये समाजाच्या विविध फरकांमध्ये लक्ष घातले जाते, त्यांचे सरकारने केलेल्या विविध योजनांचे विश्लेषण केले जाते, ज्यामुळे विविध अल्पसंख्यांक समाजांना येणाऱ्या समस्या सोडवायला मदत हाते normative म्हणजे रीतसर पद्धती प्रमाणे विविध गटांच्या हक्कांचा, आपली निराळी जीवन पद्धती चालू ठेवण्याच्या हक्कासाठी वापरली जाते. त्यामुळे सर्वसामान्य पणे सर्व समाजाचा विकास होण्यासाठी ही विभागणी फायदेशीर ठरेल.

विविध सांस्कृतिकता या मध्ये महत्वाचा घटक वसाहत वादा नंतरची संकल्पना ही Non Western आहे कधी कधी Western विरोधी आहे. यांचे दृष्टीकोन हिंसक आणि अहिंसकही आहेत. गांधीजींनी ब्रिटीश वसाहतवादा विरुद्ध अहिंसक लढा देताना हिंदु धर्मातील सत्य, अहिंसा आणि त्याग ह्या मुल्यांतून प्रेरणा घेतली. फ्रेंच लेखक Franz Fanon हा हिंसा आणि वसाहतवाद विरोधी लढा यांची सांगड घालतो. तो कळवळीने आपले म्हणणे मांडतो की, जोपर्यंत अतंरदेशीय संस्कृति, नवीन पेर्शींची माणसे जन्माला येत नाहीत तो पर्यंत वसाहतवाद नष्ट होण्याची प्रक्रिया पूर्ण होत नाही.

वसाहतवाद संपुष्टात आणण्याच्या प्रक्रियेचा परीणाम म्हणून 'बहु सांस्कृतिकता 'उदयास येते.

१) आजतागायत असलेल्या युरोपियन दृष्टीकोनाच्या वर्चस्वाला आव्हान

२) वसाहत वादावर चर्चा करताना 'संस्कृति' या विषयाला केंद्रस्थान देणे.

समाजातील सांस्कृतिक विविधता ही नैसर्गिक आणि आवश्यक बाब आहे आणि तिला प्रोत्साहन द्यायला हवे अशी आधुनिक संकल्पना आहे. जरी उदारमतवादी 'बहु सांस्कृतिकते कडे 'एक निरोगी समजुदार, नैसर्गिक घटना अशा दृष्टीने पाहतात तरी, 'सांस्कृतिक विविधततावाद' आणि उदारमतवादा मध्ये फरक आहे. उदारमतवादी, मूलतःच धार्मिक आणि नैतिक बाबींबद्दल तटस्थ असतात. सहिष्णुता आणि निवड करण्याच्या इच्छने स्वातंत्र्य या दोन बाबी, उदारमतवादाच्या मूलभूत तत्वांची महत्वाची तत्वे आहेत. जर एखादया व्यक्तिच्या व्यक्तिस्वातंत्र्याच्या आड , एखादी गोष्ट येत असेल तर उदारमतवादी त्याला कधीच अधिकृत पाठींबा देणार नाहीत. 'विविध सांस्कृतिकता वाद' हा आधुनिक जमातवादाच्या जवळ आहे. 'समजा बाहेर, लोकांना समजून घेणे शक्य नाही. आणि उदारमवादी 'व्यक्तिनिष्ठ' संकल्पना ही गट संस्कृति पेक्षा अधिक महत्वाची वाटते. त्यामुळे एकही उदारमतवादी हा 'जमात संस्कृति', सामाजिक बहिष्कार, अंतरजातीय लग्नाला विरोध करणे, स्त्रियांचे Circumscision इ. गोष्टींना अधिकृत पाठिंबा देणार नाही. मात्र विविध सांस्कृतिकता वादी लोकांना बहुलत्व आणि विविधता ही प्रस्थापिक सामाजिक मूल्यांपासून स्वतःच्या identity ला जपण्यासाठी आवश्यक वाटत होती. आपण विरोधाप्रति सहिष्णु असणे गरजेचे आहे. विविध सांस्कृतिक गटांनी इतर गटांबद्दल अशी सहिष्णुता ठेवण्याची आणि इतर संस्कृतिंना आदर, सन्मान देण्याची तयारी ठेवली पाहिजे.

परंपरावादी लोक हे एकूणच विविधतेच्या विरोधात आहेत. ही सांस्कृतिक विविधता म्हणजे युगानुयुगे सुरु असणाऱ्या रुढी, परंपरा, सर्व मान्य जीवन पद्धती यांना धमकी आहे. त्यांना ती पद्धत 'शुद्ध देशी' रुपात जतन करायची असते. म्हणून ते स्थलांतराला विरोध करतात आणि परदेशी व्यक्तींना त्यांच्या देशात परत पाठविण्याची मागणी करतात.

काही समाज शास्त्रज्ञ म्हणतात की, 'विविध सांस्कृतिकतेमुळे वरचढ संस्कृतिवर काही (Salutary) सन्माननीय चांगले परिणाम होतील. उदा. काही वन्य जमाती, जंगले, जमीन यांना पवित्र गोष्टी मानतात. ही संस्कृति, नागरी संस्कृतिवर योग्य परिणाम करुन जंगले कापण्याचे प्रदुषणाचे दुषःपरिणाम पटवून देईल'. थोडक्यात अस्तित्वात असलेली वरचढ संस्कृति आणि विविधता असलेली संस्कृति या दोन्ही परिपूर्णते पासून खूपच दूर आहेत. जीवनाला अनेक बाजू आहेत, ज्या 'विविध सांस्कृतिकतेतून' शिकायला हव्यात.

## १८.५ सारांश :

अतिरिक्त औद्योगिकिकरणामुळे, जगापुढेच वातावरणासंबंधी धोका निर्माण झाला आहे. यामध्ये विकसित देशांचाच भाग मोठा आहे. त्याबद्दल अंतरराष्ट्रीय मंडळाने अनेक सुधारणा सुचविल्या आहेत पण त्याचे समाधानकारक उपयोजन झालेले नाही. तत्त्वतः 'हरित योजना' दैनंदिन जीवनाचा भाग झाली आहे. विकासाच्या पर्यायी योजना, क्षीण होत जाणाऱ्या नैसर्गिक स्त्रोतांना पुनरुज्जीवन करण्यासाठी सुचविल्या गेल्या आहेत. काही एकदम 'Zero Growth' आणि खेड्याकडे परता सारख्या योजना सुचवत आहेत. हे लोकशाहीला विरोधी तत्त्व आहे.

बऱ्याच विचारवतंच्या मते, पर्यावरणासंबंधी चिंता करणे, हे शहरी फॅड आहे. ही जागतिकीकरणानंतरची, अद्‌भूतरम्य, तात्पुरती स्थिती आहे. काहीजण त्याला (पर्यावरणाला) राजकारणाइतकेच महत्त्व देतात.

बहुविध संस्कृति ही आज प्रचलित गोष्ट आहे. अशा संस्कृति तयार होण्यामागे अनेक अंतरराष्ट्रीय घटक जबाबदार आहेत. प्रखर राष्ट्रवादींच्या मते अशा विविध संस्कृति राष्ट्रवादाला मारक आहेत. उदारमतवादी, Pluralist विविध संस्कृतिचे स्वागत करतात.

एका दृष्टीने पाहता, विविध सांस्कृतिकता, लोकांना, ते इतरांपेक्षा कसे वेगळे आहेत यावर लक्ष केंद्रित करायला शिकवते, ते कशामुळे एकत्र येऊ शकतील हे ही विचारसरणी सांगत नाही. म्हणून, ही गोष्ट राष्ट्रीय ऐक्याला आव्हान देते. जरी बहुविध संस्कृतिमध्ये राष्ट्रीय एकात्मतेला धोका असला, एकजिनसी समाजभावनेचा अभाव असला तरी ती प्रस्थापित वरचढ संस्कृतिचे दोष उघड करते आणि मानवी मूल्यावर आधारित एका नव संस्कृतित अवतीर्ण होते.

## १८.६ पाठावरील प्रश्न :

१) ‘हरित राजकारणाशी’ संबंधित बाबींची चर्चा करा. पर्यावरणाची शोकांतिका नियंत्रणात ठेवण्यासाठी काही ठोस उपाय सुचवा.

२) पर्यावरणा विषयी, विकसित आणि अविकसित देशांचे दृष्टीकोन काय आहेत ?

३) बहुविध सांस्कृतिकतेची व्याख्या करा. ‘विविध सांस्कृतिकता’शी संबंधित कोणत्या सिद्धांतिक कल्पना आहेत.

❖❖❖❖